ऐतिहासिक-लेख-संग्रह.

मासिक पुस्तक.

माधवराव बल्लाळ उर्फ रावसाहेब पेशवे
यांची कारकीर्द.

भाग पहिला.

(अर्थ निर्णायक व अवांतर माहितीच्या विपुल टीपांसह)

वासुदेव वामन शास्त्री खरे.
मिरज हायस्कुलांतील संस्कृत शिक्षक

यांनीं

तयार करून

कुरुंदवाड येथें

" भाऊनाना " छापखान्यांत छापविला.

किंमत तीन रुपये.

प्रस्तावना

३/३७

ज्यानीं रामेश्वरापासून अटके पर्यंत भगवा झेंडा नाचविला. ज्यांनीं गिलचे, रोहिले, पठाण, शीख, रजपूत, रांगडे, इत्यादि शूर लोकांच्या फौजा शेंकडों वेळां लढाईत गांठून मारून तुडवून धुळीस मिळविल्या, दूर दूरच्या प्रांतांतील मानी व प्रतापी राजांचीं सिंहासनें ज्यांच्या विजय-दुंदुभींच्या नादानें दर वर्षास हदरूं लागत, त्या महाराष्ट्रवीरानीं काय काय पराक्रम केले तें लिहून ठेवण्याचें काम सुद्धां आह्मांपैकीं कोणाच्या हातून अजून झालें नाहीं ! तें काम कित्येक इंग्रज ग्रंथकारांनीं केलें आहे ! त्या इंग्रज ग्रंथकारांनीं दिलेली माहिती बस्स असून ती खरी आहे, हीच समजूत इंग्रजी अंमल सुरू झाल्या पासून आम्हां पैकीं सुशिक्षित म्हणविणारांच्या मनांत बहुत वर्षें वसत होती. खरें पाहिलें तर, सदरहू इंग्रज ग्रंथकारांनीं आपले इतिहास इंग्रजासाठीं लिहिले असल्यामुळें त्यांतून आह्मांविषयीं माहिती त्रोटक असावयाची, व तींत जिंकलेल्या लोकांची बाजू पुढें न येतां फक्त [illegible] ज्यांचीच बाजू दाखविलेली असावयाची, हें कोणाही विचारी मनुष्याच्या लक्षांत येण्याजोगें आहे. 'काव्येतिहास-संग्रहांत' जेव्हां निरनिराळ्या बखरी व अत्यंत महत्वाचे कागदपत्र छापून प्रसिद्ध झाले, तेव्हां आमच्या लोकांचा वर निर्दिष्ट केलेला ग्रह फिरला, व मराठी इतिहासाचें आस्थेनें पर्यालोचन करण्याची इच्छा बऱ्याच लोकांच्या मनांत जागृत झाली. दुर्दैवानें काव्येतिहास-संग्रह बंद पडला, तथापि त्या वेळेपासून तेंच काम पुढें सुरू ठेवण्याविषयीं मधून मधून प्रयत्न कित्येकदां झाले व हल्लीं ही होत आहेत, परंतु हें काम जितक्या नेटानें, आस्थेनें व व्यवस्थेनें व्हावयास पाहिजे तितकें तें होत नाहीं, ही गोष्ट निर्विवाद आहे.

बखरी व दंतकथा यांचा इतिहासास उपयोग फार थोडा आहे. मराठी इतिहासाचा खरा पाया तत्कालीन पत्रव्यवहारावर रचिला असला पाहिजे. तो पत्रव्यवहार हातीं लागल्या शिवाय ज्या काळाचा इतिहास लिहावयाचा त्याकाळीं लोकांची सामाजिक व राजकीय स्थिति खरोखर

कशी होती हें कधीं कळावयाचें नाहीं. परंतु अस्सल जुने पत्रव्यवहार अनेक स्थळीं हिंडून धुंडाळण्याचें काम फार दगदगीचें व खर्चाचें आहे. शिवाय तें एकदोघांनीं कितीही खटपट केली तरी सिद्धीस जाणारें नव्हें. पण आतां या कामीं हेळसांड केल्यास पुढें तें करण्याचें कारणच राहणार नाहीं ! कारण कीं, इंग्रजी राज्यांत तर असले महत्वाचे कागद आतां लुप्तप्राय झालेच आहेत. नेटीव संस्थानांत ते जेथें कोठें थोडें बहुत राहिले आहेत तेथें ही त्यां विषयीं अनास्थाच दिसून येत्यें. जुने कागदांची हल्लीं किंमतच नाहींशीं झाल्यामुळें त्यांपैकीं किती गहाळ झाले, किती कसरीनें खाल्ले, किती पावसानें भिजून कुजले, या विषयीं कोणी फिकीर बाळगित असेलसें दिसत नाहीं ! एखादा अडाणी अंमलदार भेटला कीं शेंकडों रुमाल ' बी लिस्टांत ' ओढले जाऊन त्यांचा कुट्टा होण्याची मात्र भीति आहे ! व असा प्रकार घडून आल्याचीं उदाहरणें ही आहेत.

असल्या या बहुमोल व दिवसें दिवस दुर्मिळ होत जाणाऱ्या कागदपत्रांचा कांहीं जीर्णोद्धार आपल्या हातून होईल तर पहावा, या हेतूनें आम्हीं कित्येक वर्षें अश्रांत परिश्रम करून मिरज, कुरुंदवाड व मुख्यत्वें मिरजमळा येथील चिटणिशी दप्तरें या त्या संस्थानच्या मुख्य अधिकाऱ्यांच्या परवानगीनें तपासून पाहिलीं व त्यांतून ऐतिहासिक महत्वाचे उत्तम उत्तम कागद निवडून काढून त्यांच्या नकला करून घेतल्या. शिवाय जमाखिंडी, पुणें व दुसऱ्याही कित्येक स्थळांहून आम्हीं पुष्कळ कागद मिळवून आणिले आहेत; व अजूनही तो उद्योग ज्यारीनें सुरू ठेविला आहे. तथापि सात आठ वर्षें पर्यंत पुरेल इतकी सामग्री आपल्या जवळ जमली आहे, अशी खातरी झाल्यावरून आतां जमलेला संग्रह छापून लोकसेवेस सादर करावा असें वाटलें, व त्यावरून तो ' **ऐतिहासिक-लेख-संग्रह** ' या मासिक पुस्तकाच्या रूपानें दर महिन्यास थोडा थोडा छापून प्रसिद्ध करण्याचें योजिलें आहे.

पटवर्धन सरदारांची चलती इ० स० १७६० पासून १८०० पर्यंत चाळीस वर्षें विशेष होती. तितक्या अवधींत पेशव्यानीं जितक्या स्वांया केल्या तितक्या सर्वांत पटवर्धन प्रमुख होते. प्रत्येक लढाईंत अघाडी

चा मान त्यांचा असे, व या चाळीस वर्षांच्या अवधींत त्यांच्या घराण्यापैकीं पांच पंचवीस पुरुष समरांगणांत पतन पावले आहेत. प्रत्येक स्वारीं सैन्याच्या हाल चाली, वेढे, लुटालुटी, लढाया, छापे, पाठलाग, फितूर वगैरे जे जे प्रकार झाले, त्या सर्वांचें त्या त्या स्वारींतील सरदारानीं व कारकुनांनीं इत्यंभूत वर्तमान मिरजेस लिहून कळविलेलें आहे. पटवर्धनांच्या कुळांत **गोपाळराव** व **परशुरामभाऊ** हे धुरंधर योद्धे होऊन गेले. त्यानीं मोठमोठ्या आणीबाणीच्या वेळीं लिहिलेलीं हजारों पत्रें आम्हांस उपलब्ध झालीं आहेत इतकेंच नाहीं, तर **वामनराव, नीलकंठराव, कोन्हेरराव, रघुनाथराव, पुरुषोत्तमराव, पांडुरंगराव, ववैरे** पटवर्धनांचीं तशींच **नानासाहेबां** पासून **रावबाजी** पर्यंत सर्व पेशवे, **सखारामबापू, मोरोबा फडनवीस, नानाफडनवीस, गोविंदशिवराम, आपाबळवंत, त्रिंबकरावमामा, नारोशंकर, विठ्ठलशिवदेव, महादाजीशिंदे, तुकोजी होळकर, धायगुडे, रास्ते, कोल्हापूरच्या राजमंडळाचे सरदार, हैदरअल्ली, निजामअल्ली, नागपूरचे भोंसले, गाईकवाड, मुरारराव घोरपडे,** व दुसऱ्या अनेक इतिहास प्रसिद्ध पुरुषांचीं पत्रें आम्हांस पटवर्धनांच्या दप्तरांत मिळालीं आहेत. **परशुरामभाऊ, नानाफडनवीस** व **हरीपंतफडके** या त्रिकूटाच्या अनेक–विध कारस्थानांचीं व त्यां पैकीं त्या दोघा सरदारांचीं स्वांऱ्यांतील स्वहस्तलिखित अशीं तीं साग्र व सुसंगत मजकुरांचीं पत्रें वाचूं लागले ह्मणजे त्या थोर पुरुषानीं स्वदेशा साठीं कशा हाल अपेष्टा भोगिल्या, कसे पराक्रम केले, मोठमोठ्या संकटांतून कसा बचाव करून घेतला, या सर्व गोष्टींचें हुबेहुब चित्र डोळ्यापुढें उभें राहून वाचक तल्लीन होऊन जातो, व हल्लींच्या काळाचा त्यास विसर पडून तो त्या पत्र लिहिणारांच्या सुख–दुःखांचा विभागी होतो! सारांश काय कीं, ज्यानीं कारस्थानें लढविलीं व पराक्रम केले व पाहिले, त्यानींच लिहिलेला हा पेशवाईच्या चाळीस वर्षांचा लांबचलांब इतिहास, आह्मीं प्रस्तुत मासिक पुस्तकाच्या द्वारें प्रसिद्धीस आणीत आहों!

वर सांगितल्या प्रमाणें पेशवाईच्या इतिहासाची वाचकास माहिती होईलच. पण त्या बरोबर पटवर्धन सरदार, कोल्हापूरकर, दक्षिणमहाराष्ट्र

व कर्नाटक या प्रांतांतील संस्थानिक व देसाई वगैरे जमीदार लोक, या विषयीं भरपूर माहिती या पुस्तकाच्या वाचनानें अवगत होणारी आहे. म्हैसूर देशाचा इतिहास कर्नल विल्क यानें लिहिलेला आहे, पण त्यांत ही न सांपडणारी हैदरअल्ली व टिपूसुलतान या विषयींची माहिती प्रस्तुत पुस्तकावरून उपलब्ध होईल.

सर्व कागद आम्हांस अस्सलच मिळाले. त्यांच्या नकला जरी आम्हीं लेखकांकडून करून घेतल्या आहेत तरी स्वतः प्रत्येक नक्कल मूळ कागदाशीं ताडून शुद्ध करून घेतलेली आहे. क्वचित आम्हांस फक्त नकलाच पहावयास मिळाल्या. पण असा प्रसंग फारच विरळ. नकला करून घेण्याचें काम जेव्हां फारच वाढूं लागलें तेव्हां कित्येक पत्रांतील हांसिलाचा तेवढा मजकूर आम्हीं स्वतः उतरून घेतला आहे; त्यांत ही मूळ पत्रांतील शब्द जसेच्या तसेच ठेविले आहेत.

पटवर्धनी दप्तरांतील स्वांऱ्यांचे कागद आम्हीं छापूं ते सालवारीनें व प्रकरणवारीनेंच छापीत जाऊं. कांहीं जुन्या बखरी, सरंजामाचे बेहडे, तैनात जाबते, किरकोळ टिपणें, पंचाइतीचे निकाल, बाजार निरख, तत्कालीन सामाजिक स्थितीचीं द्योतक पत्रें, वगैरे कागद आम्हीं मिळविले आहेत ते ही मधून मधून प्रसिद्ध करीत जाऊं. ज्या ज्या गृहस्थांजवळ बखरी, वाके, किरकोळ यादी, टिपणें, जुनीं पत्रें, वगैरे कागदपत्र असतील त्यांस आमची नम्रतापूर्वक अशी विनंती आहे कीं, सदरहू कागद प्रसिद्धीस न आणितां त्यानीं आपणाजवळच बाळगून ठेविले तर त्यापासून त्यांस फायदा कांहीं नसून देशाची मात्र हानि आहे; या करितां ते कागदपत्र त्यानीं कृपा करून आम्हांकडे पाठवावे. या पुस्तकांत छापण्यासाठीं त्या कागद पत्रांच्या नकला करून घेऊन आम्हीं ते जसेचे तसेच मालकांकडे परत करूं. नकला पाठविल्या तरी ही चालतील. मात्र त्या काळजी पूर्वक तयार केलेल्या व सुवाच्य अक्षरानें लिहिलेल्या असाव्या. अमुक ठिकाणीं इतिहासाच्या उपयोगाचे कागद आहेत असें जरी कोणी सांगितलें तरी तेथून आम्हीं आपल्या खर्चानें नकला करून आणण्याची तजवीज करूं.

आम्हांपाशीं जे कागद आहेत त्यां पैकीं इ० स० १७७४ पासून

पुढील कागदांवर बहुधा पैवस्ती घातलेली असून तींत मुसलमानी तारीख महिना व सन घातलेला आहे. परंतु त्या पूर्वीच्या कागदांवर फक्त मुसलमानी महिना व तारीख व क्वचित् हिंदु तिथि व महिना घातलेला आहे. कित्येक कागदांवर तर या पैकीं कांहींच नाहीं ! अशी स्थिति असल्यामुळें १७७४ पुर्वीच्या कागदांचा कालनिर्णय ठरविण्यास आम्हांस किती दगदग पडली असेल हें ज्यानें असलें काम केलेलें आहे त्यास मात्र कळेल ! असो. आमच्या मतें आतां ही साल्वारी बिनचूक झाली आहे. तथापि यांत कोणास चूक आढळून आल्यास त्या प्रमाणें त्यानीं अवश्य कळवावें. तसेंच पत्रांतील तिथि किंवा तारीख महिना यांवरून व आंतील मजकुराच्या धोरणानें आम्हीं पत्रें नंबरवारीनें लाविलीं आहेत. त्यांत ही नजरचुकीनें एखादें पत्र पुढें मागें लागलें असल्यास कळविण्यांत यावें.

पत्रांत येणारे कठिण शब्द, स्थळें व व्यक्ति यांविषयीं टिपा द्याव्यास पाहिजेत त्यांत कठिण शब्दांवर आम्हीं टिपा देण्यांत कसूर करणार नाहीं. परंतु व्यक्ति व स्थळें यां संबंधानें मात्र तितकें खातरीनें आश्वासन देववत नाहीं. अशा टिपा देतां याव्या ह्मणून प्रांतोप्रांतांचीं वर्णनें, नकाशे, ग्याझेटिअर, जुन्या घराण्यांच्या वंशावळी व इंग्रजी ऐतिहासिक ग्रंथ वगैरे साहित्य जरी आम्हीं मिळाविलें आहे तरी इतकें करून ही देशांतल्या कोनाकोपऱ्यांत असलेल्या अप्रसिद्ध स्थळांची व शेंदीडशें वर्षांपूर्वी घडलेल्या गोष्टींत ज्यांचीं नांवें आलीं आहेत अशा व्यक्तींची माहिती करून देणें दूरापास्त आहे. या कामीं अनेक अडचणी आहेत. कित्येक घराणीं नाहींशीं झाली आहेत. कित्येक देशोधडीस लागलीं आहेत. कित्येक स्थळांचें पूर्वीचें महत्व नाहींसें होऊन तीं अप्रसिद्ध झालीं आहेत व पुष्कळांचीं नांवें बदललीं आहेत. या करितां असली माहिती त्या त्या ठिकाणच्या लोकांनींच दिली पाहिजे. अशी माहिती आम्हांकडे कोणी पाठविल्यास आम्हीं ती आनंदानें प्रसिद्ध करूं.

आमचा हा उद्योग जो इतक्या स्वरूपास आला आहे तो केवळ आमच्या एकट्याच्याच श्रमानें आलेला नाहीं. दुसऱ्या अनेक लोकांची या कामीं आह्मांस वेळोवेळ मदत झाली आहे व त्यांचा नामनिर्देश करणें हें

आमचें कर्तव्य आहे. श्री० रा० बापूसाहेब कुरुंदवाडकर, श्री० रा० बाळासाहेब कुरुंदवाडकर, श्री० रा० बाळासाहेब मिरजकर, यानीं कृपा करून आपापल्या संस्थानची दप्तरें पहाण्याची आम्हांस परवानगी दिली हे त्यांचे केवढे उपकार! परंतु यांहीपेक्षां मोठे उपकार रावबहादूर गणेश कृष्ण सोहनी. बी. ए. मिरजमळा संस्थानचें माजी जॉइंट आडमिनिस्ट्रेटर यांचे व मेहरबान पोलिटिकल एजंट व असिस्टंट पोलिटिकल एजंट यांचे होत. कारण त्यांच्याच कृपेनें आम्हांस मिरजमळा संस्थानचें दप्तर पहावयास मिळालें. आम्हीं हें सार्वजनिक हिताचें काम हातीं घेतलें आहे हें समजून रावबहादूर सोहनी व त्यांच्या हाताखालची सर्व मंडळी यानीं जणू काय निश्चयच केला होता कीं, आमचें काम ह्मणून कोठें अडूंच द्यावयाचें नाहीं! महाराष्ट्राच्या इतिहासाच्या ज्ञानांत प्रस्तुत मासिक पुस्तकाच्या द्वारें जी काय भर पडणार आहे, तिचें बहुतेक श्रेय वर निर्दिष्ट केलेल्या सर्व गृहस्थांकडे आहे.

महाराष्ट्रदेश, महाराष्ट्रीयांचा इतिहास व महाराष्ट्र भाषा, यां विषयीं ज्या ज्या महाशयांच्या चित्तांत प्रेम व अभिमान वसत असेल, असे सर्व लोक आमच्या या अत्यल्प सेवेचा आदरानें स्वीकार करितील; अशी आशा प्रदर्शित करून आम्हीं हा प्रस्तावना लेख पुरा करितों.

कुरुंदवाड
तारीख १६ माहे मे
सन १८९७

वासुदेव वामन शास्त्री खरे.

वंशावळ*

हरिभट.

- कृष्णभट (दादा उर्फ बापाजी)
  - नारायणराव
  - पुरुषोत्तमराव(दाजी)
  - मधश्यामराव(बापू) — जनार्दनराव
  - बळवंतराव
  - माधवराव(अण्णा)
- बाळंभट — मोरोबा — श्रीपतराव (आबा)
- त्रिंबकपंत (आपा) स्त्री आकाबाई
  - नीलकंठराव स्त्री भवानीबाई
    - रघुनाथराव [दादा] — त्रिंबकराव [आपा]
    - शिवराव (सुभेदार)
  - गणपतराव[बापू] — कोन्हेरराव (रावसाहेब)
- गोविंदपंत (नाना) स्त्री सत्यभामाबाई उर्फ ताई
  - गोपाळराव[दादा](रावसाहेब) स्त्री [दुसरी] सरस्वतीबाई
  - वामनराव [बाबा]
  - स्त्री यशोदाबाई — पांडुरंगराव (तात्या) — स्त्री लक्ष्मीबाई
    - हरिहरराव [बाबा]
    - चिंतामणराव[आपा]
    - विठ्ठलराव [बापू]
  - नारायणराव — गंगाधरराव (बाळ उर्फ बाळासाहेब उर्फ बळवंतराव)
- रामचंद्रपंत(आपा) स्त्री जानकीबाई
  - परशुरामपंत(भाऊ) स्त्री राधाबाई
    - रामचंद्रपंत (आपा)
    - हरीपंत (बाबा)
    - माधवराव (दाजी)
    - गणपतराव (बापू)
- भास्करपंत (आपा)
  - विनायकराव
  - धोंडोपंत — विठ्ठलराव
  - हरबाअण्णा

* पटवर्धनांची ही वंशावळ पूर्ण आहे असें नाहीं. पण ज्यांचीं नांवें या पुस्तकांत आलीं आहेत त्यांचा परस्परांशीं काय संबंध होता हें दाखविण्यास ही पुरेशी आहे.

इ० स० १७३९

चिमाजी आपा वसई कावीज करितो.

फिरंग्यांशीं या सालीं चिमाजी आपानें निकरानें युद्धें करून उत्तर कोंकण सर केलें. त्यांत वसईचा किल्ला घेण्यास त्यास किती मेहनत व पराक्रम करावा लागला, हें सारें त्यानेंच धावडशीकर स्वामींस खालीं दिलेल्या पत्रांत कळविलें आहे. सदरहू सत्पुरुष शाहूमहाराज, बाजीराव व चिमाजी आपा, या सर्वांचे गुरु होते ही गोष्ट प्रसिद्धच आहे.

नं० अ

श्री.

श्रीमन्महाराज राजश्री परमहंस बावा
स्वामींचे सेवेशीं—

अपत्यें चिमाजीनें कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागायत वैशाख बहुल १ पर्यंत मुक्काम वसई स्वामींचे आशीर्वादें करून सुखरूप असों विशेष. स्वामींच्या अभयावरून वसईस [1]मोर्चे माघ शु॥ १० स लाविले. त्या [2]दारभ्य मोर्चे चालविले व [3]धमधमे चार पांच बांधिले. सुरंग चालविले. जे जे उपाय स्थळ हस्तगत करण्याचे ते केले. फिरंगी यांणीं निकराचे मंत्रें पूर्वी युद्ध प्रसंग मोठ्या मोठ्या शूरांनीं केले त्या न्यायें फिरंग्यानीं सुरंगावर व धमधम्यांवर गरनाळा लाविल्या.

---

१ किल्ल्यांतून बाहेर माणूस न फिरकावें व बाहेरील माणूस आंत न जावें ह्मणून चौकी बसवीत ती. २ ल्या दारभ्य [तदारभ्य] ह्म० तेव्हां पासून. ३ उंचीवरून तोफा मारतां याव्या ह्मणून मोठमोठे उंच धक्के बांधून त्यांवर तोफा चढवीत असत. अशा धक्क्यांस हें नांव होतें. ४ मसलत. ५ रुंद तोंडाची तोफ. हिचा उप-

सुरंग विछिन्न केले. पन्हाळे लावून पाणी सोडिलें. आगीचे चौंडे जळके टाकून त्यावर तेल, दारू, राळ टाकून चार चार रोज डोंब राही सारखा कहरी व बरकंदाजी व तोफानीं [मारगिरी] फिरंग्यानीं निस्सीम झणावी तैशी केली. तथापि स्वामींचा आशीर्वाद हें सबळ शस्त्र आम्हांजवळ. त्याचे प्रतापें इकडून तोफा लागू करून फिरंग्यांच्या तोफा मना केल्या. सफेली पाडून लेच्यश [?] केली. चसई जागा बाकाबुलंद. सुरंगाचा उपाय नाहीं. परंतु स्वामींच्या कृपाकटाक्षें सुरंग चालवून दोंही बाजूनीं खांबावरती तक्तपोशी, त्याजवर दोन अडीच हात रेती टाकून दहा सुरंग नेऊन पोंचवून दोनशें पाथरवट लावून मोठमोठे चिरे फोडून सुरंगाचे बुधल्यास जागा करून वैशाख शु॥ ५ स सकल सिद्धता करून लोकांस बाजूस वांटून देऊन नगाऱ्याची इशारत करून, सुरंग उडतांच सर्वांनीं एलगारास उठावें, बुरजावर शिड्या टेंकुन चढावें, ऐसा करार करून वैशाख शुद्ध पंचमी बुधवारीं दोन घटका दिवस प्रातःकाळचा येतांच सुरंगास बत्या दिल्या. डावे बाजूचे सुरंग कांहीं उडाले; कांहीं उडणें होतें; तोंच लोकानीं उतावळी करून कोटावर चालून घेतलें. तों दुसरे सुरंग तेच बाजूचे उडाले, त्याणें लोक दडपले व जायां व ठार जहाले. तसेच उजवे बाजूचे सुरंग एक दोन उडतांच बुरजांस वाट जहाली. खंदकानें लोक वरती चढले तों दुसरे सुरंग उडाले त्याणें वरती लोक चढले होते ते उडून गेले. लोक कचकरले. हिरमोड होऊन काम थंड पडलें. फिरंगी यार्णी सांभाळून हुंके व गरनाळा व रेजेंगिरीचा मार न भूतो न भविष्यति केला त्यानें लष्करचे लोकांत व हशमांत अवसान राहिलें नव्हतें. उजवे बाजूचा मातबर सुरंग, राजश्री मल्हारराव होळकर यांजकडील उडणेंचा होता. त्याचा शोध करून पुन्हां त्यांत बुधले

योग किल्ले कोट यांच्या संरक्षणा करितां होई.

१ तटाच्या माथ्यावरील भिंतीचा भाग. ज्यावरून बाहेरील शत्रूवर मारा करितां येई तो. २ दुर्घट, फार बळकट. ३ हे तोफेच्या जातीचेंच कांहीं हत्यार होतें. कदाचित् ' जेजाल ' झणून लहान तोंडाची खूब पल्ल्याची धाकटीशी तोफ असत्ये तीच ही असेल. ४ रेजगिरी, रंजगिरी, रेजगी, रेजगण=छरे.

घालून रंजक दुरुस्त करून लोकांची निवड केली; आणि सुरंग उडतांच खामखा निशाणें चढवावीं हा इशारा करून वैशाख शु० ७ गुरुवारीं उजवे बाजूचा सुरंग उडविला ते समयीं लोक जाऊन बुरुजावर—अर्धा उडाला त्याजवर—चढले. फिरंगी यानीं सफेलीच्या आंतून वेढा (?) घालून पोतीं[1] भरून तोफा जोडून तयार होते. तेथें फिरंगी बळाऊन हुक्के, गरनाळी व दारूच्या पोत्यांस आग लाऊन मार केला व रंजागिरीचा मार सीमे परता केला. लोकांवर अग्नीचा पर्जन्य करून भाजून काढिले तथापि स्वामीचें अभयआशीर्वादाचें वज्र—कवच लोकांचें अंगीं होतें, तेणेंकरून अग्नीची तमा न धरितां लोकांनीं हत्यार बरें बेंजेनें[2] केलें. फिरंगी यांनीं मर्दुमी शिपाईगिरी म्हणावी तैशी केली. त्याजप्रमाणें इकडील लोकांनीं भारती युद्धा प्रमाणें युद्ध केलें. या मागें युद्धें बहुत जाहलीं, परंतु या लढाईस जोडा नाहीं. सर्व स्वामींचा आशीर्वाद! लोक बुरूज सोडीनातसे जाहले तेव्हां स्वामींच्या दंडप्रहारें करून फिरंगी धर्मद्वेष्टे बहिःपंथ होऊन अष्टमीस प्रहर दिवसास सलोख्यास आले. कौल घेतला. आठा दिवसांत कैबिले[3] सुद्धां झाडून[4] जातोंसे करार केलें. त्याजवरून मार महकूब[5] केला. फिरंगी यानीं कबिले व वस्तभाव गलबतांत भरिली. काल वैशाख शुद्ध पौर्णिमेस फिरंगी झाडून गेले. स्वामींचे पुण्येंकडून जागा फत्ते जाहली. लष्करचे व हर्शमाचे[6] लोक सुरंगानें उडाले व जायां व ठार अदमासें पांच हजार, किंवहुना विषेश होतील. तैसेच फिरंग्यांचे सात आठशें माणूस ठार व जायां जखमी निराळे जाहले. भारती युद्धां प्रमाणें युद्ध जाहले. वसई वांकी जागा. पश्चिमेस समुद्र. दक्षिणेकडे खाडी. पूर्वेकडे खाजणे चिखल. तिहींकडून किमपि उपाय नाहीं; एक उत्तरें कडून उपाय. तिकडे ही रेती, घर नाहीं. स्वामी साक्षात्कार ईश्वराचा अंश! स्वामीनीं वसई दिली! श्रीधर[7] लिहिले ते शब्द अन्यथा कसे होतील! वरकड वसईची गोष्ट मानवी लोकांनीं म्हणावी ऐसी

---

१ खचीत, हटकून. २ पोतीं दारूचीं. ३ पर्वा. ४ उत्तम रीतीनें. ५ बायकामुलें. ६ सर्व निःशेष. ७ पूर्वी कधीं स्वामीनीं पत्र पाठविलें होतें त्यांत श्रीकारखेरीज कांहीं शब्द लिहिले होते ते. ८ हशम = खासनिवतीचें निवडक पायदळ.

नाहीं. वसई स्वामींचे आशीर्वादें फत्ते जाहली. श्रींचें सुदर्शन धर्मद्वेष्टे यांच्या मस्तकीं वज्रप्रहार होऊन टोपीकर म्लानवत् जाहले. अन्यथा वसई होती व फिरंगी आगीचा पुतळा होता ! स्वामींचें कर्तृत्व संपणार नाहीं. स्वामींची महिमा स्वामी जाणत ! आम्हां मानवी लोकांस काय कळे ! वसई फत्ते होतांच सव्वाशें पुतळी पाठवून देणें व श्रीभुलेबास सव्वाशें रुपयेचा मुगुट घातला म्हणून आज्ञा केली; त्याजवरून स्वामींच्या आज्ञे प्रमाणें वसई फत्ते होतांच श्रीनिवास केदार याजबरोबर पुतळ्या सव्वाशें व भुलेबास मुगुट सव्वाशें रुपयेचा घातला ते रुपये सव्वाशें पाठविले आहेत. प्रविष्ट होतील. आह्मीं लेंकरें स्वामींचीं असों. सर्व प्रकारें कृपा करणार स्वामी समर्थ आहेत. स्वामींच्या चरणाव्यतिरिक्त दुसरें दैवत आह्मांस काय आहे ! सारांश स्वामींच्या आशीर्वादें व दंडाच्या प्रतापें कार्य सिद्धीतें पावलें असे. स्वामींची महिमा वर्णावयास आम्हीं सामर्थ्य धरीत नाहीं. श्रीनिवास केदार पुतळ्या व रुपये देऊन रवाना केले आहेत ते लवकरच पावतील. वर्तमान त्वरेनें विदित होण्यास्तव हें पत्र पुढें रवाना केलें असे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

इ० स० १७४७

या सालची हालहवाल

नं० ब

श्री.

राजश्रीया विराजित राजमान्य राजश्री रामचंद्र बाबा गोसावी[1] यांसीं— पौ॥ बाळाजी बाजीराव प्रधान. नमस्कार. विनंती उपरीं येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जावें. विशेष. तुम्हीं पत्रें अधिकें शु॥ १३[2]

१ प्रसिद्ध रामचंद्र बाबा शेणवी. २ इ० स० १७४७ म्हणजे शके १६६९ प्रभवनाम संवत्सर. या वर्षींचा अधिक महिना चैत्र होता. पत्राच्या शेवटीं रवाना तारीख छ० ६ जमादिलावल घातली आहे त्या दिवशींची तिथि वैशाख शु॥ ८ होती.

चीं पाठविलीं तीं छ० २९ रबिलाखरीं पंढरपुरीं पावलीं. सर्व वर्तमान कळलें. त्याचीं उत्तरें अलाहिदा पुरवणीपत्रीं लिहिलीं आहेत. त्याजवरून कळेल. येथील वर्तमान तरी आह्मीं क्षेत्र मजकुरीं आहों. या उपरी पुण्यास जाऊं. चिरंजीव राजश्री भाऊ याजकडील वर्तमान तरी ते सावनूर प्रांतीं आहेत. सावनूरकरांची व त्यांची भेट होणार. उपरांतिक तालामाला पाहून यावे. फार तर तिकडे पंधरा दिवस मोडतील. नाईक[2] शिरें[3] प्रांतीं आहेत. नासेरजंग[4] अर्काटाकडे जाणार. तिकडे छावणी करणार. पहावें. नवाब[5] वाजरानदीचे तीरें जात आहे. औरंगाबादेंत छावणी होणार हें ही वर्तमान आहे. तुम्हांस कळावें ह्मणून लिहिलें असे. सावनूरकरांची व भाऊची भेट जाहलिया उपरी पंधरा दिवसां अलीकडे चिरंजीव येतील. नाईक ना-

---

यावरून 'सांप्रत पर्जन्य काळ जवळ आला व सदाशिवराव भाऊ सावनूराहून पंधरा दिवसांचे आंतच परत येतील,' असें नानासाहेब पेशव्यानीं लिहिलें आहे तें ठीक जूळतें. ग्रांटडफ् तर या विषयीं इतकेंच लिहितो कीं, " बाबूजी नाईक बारामतीकर यानें कृष्णा व तुंगभद्रा या दोन नद्यां मधील मुलखाची चौथ सरदेशमुखी वसूल करण्याचा मक्ता सात लक्ष रुपयांस शाहू महाराजां पासून घेतला होता. परंतु त्या प्रांतींचे जमीदार व देसाई वगैरे बाबूजी नाइकास जुमानीनात, ह्मणून सदाशिवराव भाऊ व सखाराम बापू यांनीं स्वारी करून तिकडे अंमल वसविला. " यांत सावनूर विषयीं उल्लेख नाहीं. पण तो व्हावयास पाहिजे होता. कारण कीं, मराठ्यांस या स्वारींत सावनूरच्या नवाबा पासून पंचवीस तीस लक्षांचा मुलूख मिळाला. इतक्या महत्वाची ही स्वारी होती. ग्रांटडफूचे लिहिण्यांत दुसरी एक चूक आहे ती ही कीं, ही स्वारी १७४६ त झाली असें तो लिहितो. पण त्या सालीं अधिक महिना पडला नव्हता, व तो वर आलेल्या पत्रांत आहे; यावरून हें त्याचें लिहिणें चूकीचें आहे हें स्पष्ट होतें.

१ सुमार. २ बाबूजी नाईक. ३ शिरें ही कर्नाटक बालेघांटच्या सुभ्याची जागा. ४ नासरजंग हा निजामाचा सर्वांत थोरला मुलगा. ५ निजामउल्मुलख. याचे वयास यावेळीं १०३ वर्षें झालीं होतीं तरी तो स्वांऱ्या शिकाऱ्या करीतच होता! त्याच्या वयाची ही गणना मुसलमानी रीतीनें केलेली आहे.

सरजंगाचे आश्रयानें ते प्रांतीं छावणी करून बिदनूर प्रांतीं उत्पात करणार व करितील. सांप्रत बरसात जवळ आली. काय होतें तें पहावें ! छ० ६ जमादिलावल. हे विनंती*.

---

* ह्या पत्रांवर नं० १, २ घालावयास पाहिजे होते. परंतु नंबरवारीचीं पुढचीं पृष्ठें छापून झाल्यावर हीं हातीं आलीं व आरंभीं घालणें तर अवश्य, सबब अ, ब, नंबर घालून छापलीं आहेत.

इ० स० १७५४

सुरत शहरांतील धामधूम.

जंजिऱ्याचा हबशी व पेशवे सरकार यांमध्यें नेहमी युद्ध सुरू असे. औरंगजेबाच्या कारकिर्दीत सुरतेच्या बंदराचे व समुद्रावरील एकंदर व्यापाराचें संरक्षण करण्याचें काम हबशाकडे होते. तेव्हां पासून त्याचा सुरत शहरांत अंमल सुरू झाला, तो पुढें जरी मोंगलबादशाकडून सुरतेस निराळा अंमलदार नेमण्यांत येऊं लागला तरी कमी झाला नाहीं. पेशव्यांनीं हबशास जरी चोंहोंकडून जंजिऱ्यांत कोंडून धरिलें तरी त्याचा हस्तक सुरतेंत असे तो धान्य व इतर सामान व लढाऊ लोक गलबतांत भरून तीं हबशाच्या कुमकेस पाठवी. ती कुमक बंद करण्या करितां प्रस्तुत प्रसंगीं पेशव्यांनीं आपलें आरमार पाठविलें होतें. तेथें सुभेदार होता, त्यास दूर करून आपल्या तर्फेचा त्या जागीं माणूस नेमावा व त्याच्या द्वारें हबशास सुरतेतून काढून लावावें, अशी ही योजना पेशव्यांनीं केली होती, परंतु त्यांनीं पाठविलेला मनुष्य हबशास मिळून त्यांजवर उलट फिरला, यामुळें त्यांचा तो मनोरथ सिद्धीस गेला नाहीं.

नं० १

श्रीवरदा.

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री गोविंदपंत नाना स्वामीचे सेवेशीं—

पोष्य दामोदर रघुनाथ[1] कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल तागायत छ० १६ रबिलाखर जाणून मुक्काम बारा सुरत नजीक डोंबास [?] येथें आरमारासह राजश्री नारोपंत सुभेदार व धुळप सह मंडळी क्षेम असों. विशेष. आम्हांकडील वृत्त तर पेशजी तळ्यांचे

---

१ पत्र लिहिणारा दामोदर रघुनाथ कोण हें ठाऊक नाहीं. पत्र गोविंद हरीस लिहिलेलें आहे.

मुक्कामाहून सविस्तर लिहून पाठविलेंच होतें. त्याजवर रेवदंड्याहून वृत्त लिहिलें होतें. त्या अलीकडील मजकूर तर यजमानांचीं पत्रें आलीं कीं "शामेल[2] सुरतवाला यानें चांच्या सामील करून दोन्ही आरमारें तयार होऊन सर्व सामान भरून जंजिऱ्यास सामान प्रविष्ट करणार; त्यास तुम्हीं आरमारसह जाऊन सुरत बारा बंद करावा, शिद्दी कडील सामान जाईल तें मना करावें, व सुरत शहरांत कांहीं राजकारण ही केले आहे त्याचा उपरौळा[3] करावा." ह्मणोन आज्ञापत्र सादर झाल्याक्षणीं हांकारणी करून वसईस आलों. तेथें लांकूड पाणी सुद्धां सर्व तयारी करून सुरतेच्या बाऱ्यावर आलों. तेथें राजश्री आपाजीराव बाळोसे, दोन गुराब[4] व गलबतें होतीं, त्यांची भेट जाहली. पुढें सुरतेच्या राजकारणास अनुकूल व्हावें तों बाळोसे यानीं सांगितलें कीं, अच्छन[5] नवाब याची हुजुरून[6] सुरतेच्या बंदोबस्ता करितां उभारणी करून सर्व साहित्य करून रवानगी झाली. तेव्हां अल्ली[7] नवाजखान सुरतेंत सुभेदारी करीत होता, त्याणें राजश्री शंकराजी केशव याजकडे सूत्र केलें कीं, अच्छनास माघारें फिरवावें, ह्मण-

---

१ पेशव्यांचीं. २ शामल=श्यामल=काळा. अर्थात् हबशी, मराठी कागद पत्रांत हबशास पुष्कळ ठिकाणीं शामल हें नांव दिलेलें आढळतें. ३ कुमक. ४ एक तऱ्हेचें मोठें लढाऊ गलबत, हा शब्द मूळ आरबी भाषेंतील आहे, हल्लीं कोंकणी फत्तेमारीस ही हा शब्द लाविताता. ५ मचवे, अठराव्या शतकांत यांचा आरमारच्या कामीं उपयोग करीत. तेव्हां बहुधा हे शंभर खंडी सवाशें खंडींचे असत. यांस एक लहान व एक मोठें अशीं दोन शिडें असत. आंत ४०।५० लोक असत. तेच खलाशी आणि तेच लढाऊ शिपाई. प्रत्येक गलबतांत लहान लहान सहा किंवा आठ तोफा असत. लढाईच्या वेळीं गलबतांतील खलाशी झपाट्यानें वल्हीं मारून हं हं ह्मणतां शत्रूंस गांठीत असत ! ६ सुरतेचा नबाब तेगबक्तखान याचा अच्छन हा जांवई होता. यास ज्यांशीं लढावयाचें होतें ते सुरतेचे अम्मलदार निराळेच असून अल्लीनवाजखान हा त्याचा आप्त व मित्र होता असें इंग्रज ग्रंथकार लिहितात. वरील पत्रावरून तर अल्लीनवाजखान हा अच्छनाचा प्रतिस्पर्धी होता असें होतें. मिळ्या अच्छन यानें १७४९ त सुरत बळकाविली होती, परंतु तेथून त्याचें उच्चाटन झाल्यावर पेशव्यांच्या मदतीनें त्याणें पुनः तेथें आपला अम्मल स्थापण्याचा उद्योग केला असें सिद्ध होतें. ७ पेशवे सरकारांतून. ८ हा वसईचा सुभेदार.

जे आपण शिद्दीशीं बिघाड करितों; त्यास तें राजकारण शंकराजी केशव याणीं बळाविलें आणि हुजूर लिहिलें, व आपले तर्फेनें महादजी केशव फडणीस व आपाजीराव खानविलकर सातशां माणसानिशीं रवाना केले. ते सुरतेस आले तों अच्छन नजीक आला. हुजूरून माघारें फिरावयास अच्छनास आज्ञा झाली, परंतु अमान्य करून त्याणें शिद्दीशीं सुत्र केलें, आणि सुरतेनजीक राजेड [?] चें ठाणें होतें तें घेतलें. शिद्दी अच्छन उभयतांचा एकहात जाहला. अल्ली नवाजखानास जुमसे न खात, तेव्हां शिद्दीनें प्रहर रात्रीस अच्छनास शहरांत घेतलें. अल्ली नवाजखानाकडील तमाम लोक व तोफखान्याकडील दरोगे वगैरे तमाम फितवा करून ठीक केलें होतें. आंत शहरांत आल्यावर अल्ली नवाजखानाची व अच्छनाची लढाई भारी झाली. शिद्दीकडील बहुत लोक ठार व जखमी झाले. फितूर भारी, तेव्हां अल्ली नवाजखानास चौगिर्दा केलें. त्याजवर तो कौल घेऊन आपले हवेलींत राहिला. महादाजी केशवावर लढाई पडल्यावर मारामार करितां आपाजीराव खानविलकर यांहीं हत्यारें धरून शर्त केली. लगट चोहोंकडून झाल्यावर आपाजीराव ठार जाहल्यावर वसईकरांकडील मोड जाहला. महादाजीपंताचा मुक्काम अश्विनीकुमारावर झाला. अच्छन शहरास अधिकारी जाहला. असा बखेडा झाला, म्हणोन बाळोशांहीं सांगितल्यावर खाडींत जावयाचे राहिलों. आम्हीं बातमीस पाठविल्यावर याच प्रकारें शोध लागला. राजकारण नासलें, विस्कळीत जाहलें. आपणास कळावें. बाऱ्यावर इंग्रजी तरांडी व फिरंगी व वलंदेज व अफरंदोज असे मिळून मातबर थोर तरांडीं वीस होतीं. त्यांचें आमचें सख्य आहे. आम्हीं बाऱ्यावर खबरदार आहों. हल्लीं इंग्रज व फिरंगी जंबुसराकडे गेले. वलंदेज व अफरंदोर मात्र चार तरांडीं थोर आहेत, आपणास कळावें. राजश्री कृष्णराव बाबूराव दिवाणगिरी अच्छनाची करून ते आले ते हल्लीं नवसरीवर आहेत.

---

१ मिलाफ. २ दाद देईनात. ३ चोंहोंकडून कोंडून धरिलें. ४ अभय वचन. ५ हें स्थळ सुरतेजवळ आहे. ६ तिर्कति तारवें. ७ पोर्तुगीज. ८ दच. हे कोण युरोपियन हें कळत नाहीं.

चरकड इकडे वसई पासून बादला पारडी (?) पर्यंत कोळ्यांहीं मोठा अनर्थ आरंभिला होता, त्यास हुजुरून फौजा आल्या, जन्हार देखील घेऊन तमाम कोळी डोंगांत पिटून लाविले. मुंबईस इंग्रज मातबर तरांडीं तयार करून दहा हजार माणसांनिशीं तरांडियांवर चढला. मातबर सामान तयार जाहलें. कोणीकडे जातो हा मजकूर कळत नाहीं. मागाहून लिहून पाठवितों. आम्हीं सुखरूप आहों, फिकीर न करावी. कसबे रहिमतपुराकडील वर्तमान कळत नाहीं. ऐशियास त्यांजकडील सविस्तर मनास आणून ल्याहावें व हल्लीं पत्र पाठविलें आहे हें तिकडे रवाना करावें. जाबसाल आणून वरचेवर ल्याहावें. चिरंजीव राजश्री गोपाळराव कोणा संस्थानाकडे ? त्यांजकडील मजकूर कळत नाहीं, तर सविस्तर ल्याहावें. तिकडील चिंता सदोदित बाटत्ये, यास्तव वरचेवर ल्याहावें. चिरंजीव राजश्री नीलकंठराव यांजकडील ल्याहावें. चि० सौ० सखुबाई अक्कलकोटीं आहे, त्यांजकडील वर्तमान बहुत दिवस कळत नाहीं. मनास आणावें. वरकड मातोश्री ताईबाईस कैलासवास प्राप्त झाला. मोठें वाईट झालें. वडील पणास होती. सर्वांस मर्यादा होती. असो. राजकीय वर्तमान व नवा राजा आणिला तो व मातोश्री येत आहेत असें वर्तमान आहे, नवल अधिक असेल तें ल्याहावें. आपण लिहिल्याविना चित्तास समाधान वाटत नाहीं यास्तव कृपाकरून ल्याहावया आज्ञा कीजे. राजश्री जानोजी भोंसले येणार होते त्यांचा व मुधोजी भोंसले व बाबूराव कोन्हेर यांचा प्रकार ल्याहावा. कुरुंदवाड, मिरज, कागवाड, व गणेशवाडीचें ल्याहावें. कसबे रहिमतपुरचा परामर्श करीत जावें. सांप्रत निष्ठुर जाहला, निर्ममता जाहली, तर आ-

---

१ किर्र झाडींत. विशेषें करून सह्याद्रीचे माथ्यावरील किर्र झाडीस डोंग म्हणतात. २ ही बहुधा पटवर्धनांचे मूळ पुरुष हरिभट बावा यांची स्त्री व ज्यास हें पत्र लिहिलें आहे त्या गोविंद हरीची आई असावी. ३ रामराजे. ४ ताराबाई. रामराजे व ताराबाई साताऱ्याहून पुण्यास या वर्षी पेशव्यांच्या आग्रहामुळें येणार होतीं. ५ रघोजी भोंसले नुकताच वारला होता. त्याच्या मुला पैकीं जानोजी व मुधोजी यांजमध्यें तंटा सुरू झाला होता. मुधोजीचा बंदोबस्त करून जानोजी सेनासाहेब सुभ्यांचीं वस्त्रें घेण्या करितां पुण्यास यावयाचा होता. बाबूराव कोन्हेर हा भोंसल्यांचा दिवाण.

मांस आधार आसरा कोठें आहे? ये विशीं चित्त आपलें साक्ष आहे. ल्याहावें असें नाहीं. आम्हीं शरीरें खबरदार आहों. श्री लज्जा रक्षील ते खरी! राजश्री आरमार सुभेदारांचे पुत्र आपाजीपंत तेथें आहेत त्यांजवळ पत्रें दिलीं म्हणजे आह्मांकडे रवाना करितील. रहिमतपुरास खर्चास नसल्यास परामर्श करावा. कांहीं खर्चास पाहिजे तर स्वामींही पांचशें रुपये पर्यंत त्यांजकडे पाठवून द्यावे. पेशजी खण पंचवीस पाठविले ते रहिमतपुरास रवाना केले असतील. बहुत काय लिहिणें कृपा वर्धमान करावी हे विज्ञापना.*

समस्त मंडळीस नमस्कार.

इ० स० १७५६

सावनूर प्रांतावर स्वारी.

या स्वारींत व पूर्वीच्या एका स्वारींत मिळून पेशव्यांनीं सावनूरकर नबाबाचें अर्धें राज्य घेतलें. त्यांत पाच्छापूर, कित्तूर, परसगड, मोकाक, यादवाड, बागलकोट, बदामी, नवलगुंद, डंबळ, अनिगिरि, राणीबिदनूर, तोरगल, हल्याळ, हुबळी, मिश्रिकोट, कुंदगोळ वगैरे तालुके होते. हें येथें सांगण्याचें कारण इतकेंच कीं, या मुलखा पैकीं बहुतेक भाग पेशव्यांनीं पुढें रास्ते व पटवर्धन या सरदारांस जहागीर दिला, सबब वरील स्थळांचीं नांवें प्रस्तुत पुस्तकांत वारंवार येणारीं आहेत. खुद सावनुरावर जी मोठी लढाई झाली तिचें वर्णन आम्हांस उपलब्ध झालें नाहीं. मुरारराव घोरपडे सावनूरकरास मिळाला होता त्यास बळवंतराव मेहंदळे व मल्हारराव होळकर वगैरे सरदारांनीं पेशव्यांकडे वळवून आणिलें. त्या संबंधें मुरारराव्याचें पुढें एक पत्र आहे. सावनूरकरांशीं तह झाल्यावर श्रीमंतांनीं गोपाळराव पटवर्धनास सोंदें संस्थानावर रवाना केलें, व तो तिकडील काम आटपून परत

---

* पत्र लिहिणारा कोण होता हें जरी कळत नाहीं, तरी तो पटवर्धनांचा आप्त असून बऱ्याच मोठ्या पदवीचा मनुष्य होता असें त्याच्या पत्रावरून दिसतें.

येई तों आपण तुंगभद्रेच्या दक्षिणतीरीं जाऊन विदनूर व दुसरी संस्थानें यां पासून खंडणी घेऊन पुनः उत्तरतीरीं येऊन पुण्याकडे परत चालले.

नं० २

श्रीमुबराज.

राजश्री गोपाळराव गोसावी यासीं—

अखंडित लक्ष्मी आळंकृत राजमान्य स्ने॥ मुरारजी हिंदुराव घोरपडे मलकत मदार दंडवत. विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय लिहीत जावें. विशेष आपण पत्र पाठविलें तें पावलें. इकडील आगमन पुण्यास व्हावयाची अपेक्षा राजश्री पंतप्रधान यांची, व ते प्रांतें कुफेर[2] आहेत त्यास एकचित्तें शिक्षा करावयाचें, आदिकरून सविस्तर दर्शविलें; ऐशास राजश्री पंतप्रधान आम्हांस बंधु, तेव्हां त्यांची आस्था आमचे ठायीं असणें युक्तच आहे. आम्हांस सकल प्रकारें त्यांचीं प्रीतच करणें, यास्तव पुण्यास जावयाची तयारी पेशजी केलीच होती त्या प्रमाणें तयारी असे. काल राजश्री पंतप्रधान यांचीं व राजश्री मल्हारजी होळकर यांचीं पत्रें चित्ता प्रमाणें आलीं. राजश्री अमृतराव[3] शंकर यांस पुढें पाठविले ते चार पांच रोजांत येतात. कृष्णातीरास राजश्री बळवंतराव[4] गणपत व आपाजी जाधव

---

१ कर्नाटक व बालेघांट प्रांतीं. २ कुफर=लवाड. या शब्दावरूनच झालेला शब्द कुफराणा=लवाडी. ३ अमृतराव हा बळवंतराव मेहंदळ्याचा दिवाण असून पेशव्यांच्या विश्वासांतील मनुष्य होता. या विषयीं इंग्रजांचा वकील जॉन स्पेन्सर असें लिहितो—अमृतराव पूर्वी पेशव्यांचा चिटणीस होता परंतु अलीकडे तें काम आपला भाचा गोविंद शिवराम यांजकडे सोंपवून तो आतां नाना व सदोबा यांचा कौन्सिलर झाला आहे व मुख्य सरदाराची पदवी पावला आहे. त्याचें वजन त्या दरबारांत फार आहे. त्यास विचारिल्या शिवाय नाना व सदोबा कांहीं एक करीत नाहींत. सलाबतजंग, मुरारराव यांजकडील व कर्नाटकांतील सर्व कामें त्याच्या हातीं असतात. कारोमांडल किनाऱ्यावरील उलाढालींची त्यास चांगली माहिती आहे. इ० इ० ४ बळवंतराव गणपत मेहेंदळे हा भाऊ साहेबांच्या विश्वासांतील सरदार पुढें—पानपतच्या एका युद्धांत पडला. ५ आपाजी जाधव हा सरदार फलमामडीचा रहिवासी होता. याचें नांव या पुस्तकांत पुढें कित्येकदां येईल.

व शेटियाजी[1] खराडे यावे. त्यां सहीत जावयाची सिद्धता असे. येथून निघावयाचा मुहूर्त कार्तिक शु॥ २ स केला आहे. या देशीं आपणाकडील फौज व सरदार राहणारास हरएकविशीं एकचित्त होऊन दुतर्फा कामें होऊन येतसें निरोपून जावयाचा उद्योग करावा म्हणोन (लिहिलें) तर राजश्री पंतप्रधान यांच्या व आमच्या प्रयोजनांत इतर भाव काय आहे? जैसा प्रसंग अवलंबूं तैसा सिद्धीस नेऊं यांत संदेह नाहीं. परंतु आपणास व इकडील फौजेस लांब पडतें. त्या ही वर इकडील कसालियाचा[2] जो प्रसंग आहे तो आपण जाणतच आहां. अद्यापि लोकांचे तंटे निवारणांत नाहींत त्यांचा उलगडा व दोन रोज फौजेच्या गुदरानीस रवाना केलें तो ही विचार श्रीदयेनें दूर करण्यांत येतच आहे. त्यास येविशीं त्याहावयाचें तें लिहून पाठविलें आहे. फौज व सामान सकल प्रकारचें घरचें असतां उणें काय असे! सांप्रत आपण कोठें[3] आहां, मनसबा कर्तव्य काय, व पुण्याकडील वर्तमान सविस्तर लिहून पाठवावें. वरकड अर्थ राजश्री विसाजी बाबूराव यांनीं लिहिला आहे त्याजवरून कळेल. रा॥ छ० २५ मोहरम बहुत काय लिहिणें.

नं० ३

श्रीगणराज.

अपत्यें गोपाळानें साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल तागायत छ० २१ साबान पावेतों यथास्थित असे. विशेष. श्रीमंतांचा व आविधाचा तह जाहला तो मजकूर पेशजी लिहिला आहे. वरकड श्रीमंतांनीं

---

१ शेटियाजी [शेटिबा] खराडे हा होळकराचा सरदार पुढें गिलच्यांच्या छाप्यांत पडला. २ संकटाचा. ३ यावरून मुरारराबाची पेशव्यां पासून कांहीं पैका घेण्याची इछा होती असें दिसतें. परंतु तो तसें उघडपणें लिहीत नाहीं. ४ यावरून गोपाळराव पटवर्धन कोणच्या तरी कर्नाटकच्या स्वारीवर गुंतला होता असें दिसतें. ५ गोपाळराव पटवर्धनानें आपला चुलता लिंबक हरि यास लिहिलेलें पत्र. ६ सावनुरच्या नवाबाचा.

आम्हांस सोंद्यांस पाठविलें. बरोबर फौज राजश्री मल्हारराव रास्ते व हरि गोपाळ व गंगाधर[1] बाजीराव यांचें पथक व बेदरखान व तोफा असें रवाना केलें होतें. सोंद्याची खंडणी झाल्यावर देखीले दरबार खर्च ठरल्या पैकीं अडीच लक्ष रुपये रोख व साडेपांच लक्षांत मदनगड[2] किल्ला येणें प्रमाणें बोलीस घेतला. किल्ला हातास येई पर्यंत सोंदेकरांचा मेहुणा बोलीस घेतला आहे. किल्ला ही सत्वरच हातास येईल. वरकड सविस्तर चिरंजीव राजश्री नारायणराव यानीं लिहिलें आहे त्याजवरून विदित होईल. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विज्ञापना.

नं० ४

श्रीगणराज.

अपत्यें नारायणानें व पुरुषोत्तमानें दोन्ही करकमळ जोडून शिरसाष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल लागायत वैशाख वद्य अष्टमी भृगुवार मुक्काम हनगल नजीक बंकापुर येथें वडिलांचे आशीर्वादें करून

---

१ सोंदें हें ठिकाण कारवार जिल्ह्यांत शिरशी पासून दहा मैलांवर आहे. येथील देसाई त्या वेळीं बरेंच प्रबळ असून त्यांचा अंमल हल्लींच्या कारवार जिल्ह्यांत पसरला होता. हल्लीं सोंदें हें एक चार पांच हजार वस्तीचें गांव आहे. २ हा पुरंदऱ्यांचे निसबतीचा सरदार होता असें वाटतें. ३ हा कोण हें कळत नाहीं. ४ हा गारद्यांचा सरदार असावा. ५ सुद्धां. हें अव्यय हल्लीं शब्दांपुढें लावितात. पूर्वी मागें ही लावीत असत व त्यावेळीं त्याचा अर्थ 'सुद्धां' असा होई. ६ हा मदनगड (फोंडा) किल्ला गोंव्याच्या हद्दीवर असल्यामुळें तो मराठ्यांच्या हातीं गेलेला पाहून पोर्तुगीज लोकांस राग आला. त्याच्या गव्हर्नरानें गोरे व काळे मिळून चार पांच हजार शिपाई व तोफा घेऊन येऊन त्या किल्ल्यास वेढा घातला व एक बुरूज सुरुंग लाऊन उडविला. नंतर तो दरवाजा फोडण्याचा यत्न करूं लागला तों आंतून मराठे बाहेर पडले व त्यांनीं पोर्च्युगीज लोकांवर हला करून दोनशें माणसें मारिलीं. तेव्हां पोर्तुगीज लोक पळून गेले. त्यांचा गव्हर्नर मारला गेला व तोफा वगैरे सामान मराठ्यांच्या हातीं लागलें. ७।८ हे दोघे कृष्णंभट पटवर्धन मंगळवेढेकर यांचे मुलगे. त्यांचें हें त्रिवक हरीस [चुलत्यास] पत्र.

बालकांचें वर्तमान यथास्थित असें. विशेष. इकडील वर्तमान तर श्रीमंतांनीं दहा हजार फौजेनिशीं सोंद्यांस रवाना केलें, बराबर तोफाही पांच दिल्या होत्या. तेथें गेलों. मार्गीं झाडी फार. दोन चार चौक्या होत्या, परंतु मारून पेठेंत शिरून पेठ मारिली. उपरांतिक किल्ल्यास मोर्चे लाविले. आठ लक्ष रुपये खंडणी केली. बोला दोन घेतल्या. त्यांनीं मदनगड किल्ला साडेपांच लक्ष रुपयांस आठ महिने गहाण ठेवावा. रोख अडीच लक्ष. येणें प्रमाणें तह जाहला. किल्ल्यावर निशाण चढे तों पर्यंत या बोला आपणाजवळ ठेवाव्या. उपरांतिक यांसीं माघारें लावून द्यावें. वायद्यास किल्ला माघारा द्यावा. या प्रमाणें करार केला. या खेरीज त्यांच्या राज्यांत चौथाई व सरदेशमुखी अंमल बसावा हा करार. व त्यांच्या बंदीस बंदिवान होते ते अगदीं सोडविले. आणि माघारे येऊन येथें मुक्काम केला. यजमानांचें पुण्य समर्थ. यास्तव या दिवसांत निभावून आलों. नाहीं तर दुःख कांहीं लिहितां पुरवत नाहीं. वृष्टि पर्जन्याची. लष्करचीं उंटें व तट्टें झाडींत फार राहिलीं नाहींत, आह्मीं सर्व मंडळीसह स्वस्तिक्षेम आहों. या स्वारी प्रमाणें कोणती स्वारी कठिण पडली नव्हती. माणूस ही २०।२५ पर्यंत ठार झालें. खेरीज जखमी. सारे मिळून शेंदीडशें झालें. परंतु वडिलांचे आशीर्वादें करून कल्याणरूप आलों. अतःपर यजमान दरमजल त्वरेनें देशास येतील. आम्हांस या मुलखांत छावणीस ठेवणार अशी वदंता आहे, परंतु अद्यापि निश्चय नाहीं. बहुधा लक्ष प्रकारें हजार पांचशें स्वार या प्रांतीं ठाण्यानीं ठेवणें प्राप्त आहे. आमची छावणी होणार नाहीं असें दिसतें. यांत दाण्या पाण्याचा ऋणानुबंध! याचा इत्यर्थ आठा दिवसांनीं आमची व यजमानांची गांठ पडल्या नंतर होईल. ठरेल तें मागाहून लिहून पाठवितों. यजमानांनीं तुंगभद्रा दक्षिणतीरास जाऊन तमाम खंडण्या घेऊन उत्तरतीरास येऊन तमाम बिदनूरची खंडणी केली. आतां या प्रांतीं शिरहट्टी वांचून कोणी संस्थानिक राहिले नाहींत. माघारे फिरतांना शिरहट्टीकरांचे पारिपत्य करावें अशी मसलत आहे. समागमें सलबतजंग ही आला आहे. त्याजकडे मुसाभुसी फिरंगी होता त्यास निरोप दिला. तो त्यास भारी,

१ हा प्रस्यांत फ्रेंच सरदार बुसी. हा जरी प्रथम सलाबतजंगाचा नोकर

परंतु यांचा आश्रय झाला ह्मणून त्यांची व्याधि उठोन गेली. पुढें त्यास आमच्या यजमानांनीं चाकरीस ठेवावें असा करार झाला आहे. प्रस्तुत अविंध यांचा आज्ञांकित आहे. मुरारजी व मुजफरखान आपल्या स्थळास जावयासीं गेले. अतःपर त्यां' ..... मात्र तेज राहिलें नाहीं. हतप्राय होऊन गेलीं. सवेशीं विदित होय. बहुत काय लिहिणें लोभ असो द्यावा हे विज्ञापना.

इ०स० १७५७

श्रीरंगपट्टणावर स्वारी.

मिरज वगैरे प्रांतीं दंगा.

या सालच्या फेब्रुवारी महिन्यांत नानासाहेब पेशवे साठ हजार फौजेसह श्रीरंगपट्टणच्या स्वारीस गेले. बरोबर सदाशिवराव भाऊसाहेब कारभारी होते व नाना फडनवीस प्रथमच या स्वारींत आपल्या कामावर रुजू झाले होते. म्हैसूरची खंडणी करून शिरें वगैरे ठाणीं घेण्या साठीं बळवंतराव मेहंदळयां बरोबर बरीच मोठी फौज कर्नाटकांत ठेवून श्रीमंत

ह्मणून मोंगलाईत शिरला होता. तरी त्याचा शिरजोरपणा सलाबतजंग व त्याचे दरबारांतील सरदार व मुत्सद्दी यांस असह्य झाला होता व ही व्याद आपल्या राज्यांतून कधीं एकदांची जाईल असें त्यांस झालें होतें परंतु तो जबरदस्त असल्यामुळें त्यास उघडपणें जा ह्मणून सांगण्याची कोणाची छाती होईना. सावनूरच्या स्वारींत पेशव्यांची कमक करण्या करितां सलाबतजंग आला होता व त्या बरोबर बुसी होताच त्याचा तोफखाना उत्कृष्ट असून त्याचा मारा त्यानें सावनूरावर असा केला कीं, मोंगली व मराठी फौजेंत त्याची फार वाहव्वा झाली. त्या वेळीं त्यानें सावनूरावर सव्वालाख गोळे मारिले अशी त्या प्रांतीं प्रसिद्धी आहे. पेशव्यांचा सलाबतजंगास आधार मिळाल्यामुळें त्यानें बुसीस नोकरींतून काढून टाकण्याची छाती केली व तो या वेळीं निमूटपणें गेला. परंतु पेशव्यांचें लष्कर सोडून सलाबतजंग परत भागानगरास जातांच बुसीनें त्यास पुनः पछाडलें !

१ येथें पत्र फाटून अक्षरें गेलीं आहेत.

आषाढ मासीं परत आले. येताना वाटेंत तिकडील संस्थानिकां पासून खंडणी वसूल करण्या करितां त्यांनीं पटवर्धनांस तुंगभद्रे अलीकडे ठेविलें होतें. श्रीमंत मुलुखगिरीवर गुंतले असतां उदाजी चव्हाण, कोल्हापूरकर, चिकोडीकर व प्रतिनिधीचा मुतालीक यमाजी शिवदेव यांनीं देशीं लुटालूट व दंगा केला.

नं० ९

" राजकी वृत्त तरी चव्हाण, चिकोडीकर व करवीरवासी यांची फौज मिळून तीन चार हजार जमा होऊन मिरज प्रांतीं धामधूम मांडिली. मुलूख सत्यानास केला. लाख पावणालाख पावेतों रुपये मिळविले. मग मिरजकरानें थोडें बहुत द्रव्य कबुल करून सल्ला केला. श्रीमंत कर्नाटकांतून येईत तों कोणाच्या मुलखांत कोणी स्वारी करूं नये. या प्रमाणें होऊन विवेक झाला. राजश्री उदाजी चव्हाण अथणीकडे निघून गेला. चिकोडीकर ही गेले व करवीरवासी यांची फौज ही करवीरास गेली. श्रीमंत राजश्री पंतप्रधान हंपीविरूपाक्षावर आहेत.[२] चिरंजीव राजश्री भास्करपंताचीं पत्रें माघ शुद्ध चीं आलीं. तमाम खंडण्या होतात. श्रीरंगपट्टण पावेतों जावयाचा मनसबा आहे. श्रीरंगपट्टणचे हेजीबे[३] आले आहेत. यांची धमक फार आहे. तेवढी खंडणी झाली म्हणजे सोंदें बिदनूरची खंडणी करून या मार्गे येणार ऐशी वदंता आहे. चिरंजीव राजश्री त्रिंबकपंत व राजश्री शिर्ऱ्येबा

---

१ या पत्राचा पहिला व शेवटचा बंद गहाळ झाला आहे. हें कृष्णंभट मंगळवेढेंकर यांनीं गोविंद हरीस लिहिलें आहे. २ हंपीविरूपाक्ष हें स्थळ तुंगभद्रेच्या तीरावर आहे. पूर्वीचें विजयनगर तें हेंच. किष्किंधा म्हणजे हल्लीची अनागोंदी पलीकडच्या तीरीं आहे. रामायणांत वर्णिलेलें पंपा सरोवर हें म्हणून दाखवितात तें येथेंच लहानसें पुष्करिणी सारखें डबक आहे. त्यांत यात्रेकरू स्नान करतात. ३ वकील. ४ शिवाजी बाबाजी म्हैसकर—हा हुशार व धूर्त कारकून पुढें १७७२ पासून १७८० पर्यंत पटवर्धनांचा पेशव्यांच्या दरबारीं वकील होता. त्या अवधींत त्यानें नारायणरावाचा

व नीलकंठराव व कोन्हेरराव सर्व मंडळी खुशाल आहेत. चैत्र वैशाख मासीं लष्कर माघारें येणार. राजश्री प्रतिनिधी कडेगांवावर तीन चार हजार फौजेनिशीं आहेत. राजश्री आबाजी नाईक साताऱ्याहून हजार दीड हजार फौजेनिशीं किंणी ध्यावयास गेले होते त्यांजवर यमाजी शिवदेव यांनीं जाऊन छापा घातला. एक हत्ती व चाळीस पन्नास घोडे पाडाव करून घेतले. आबाजी नाईक पळोन साताऱ्यास गेले.

नं० ६

श्रीगणराज.

चिरंजीव राजश्री गोपाळराव यांसीं प्रती त्रिंबक हरि. आशीर्वाद उपरी येथील कुशल वर्तमान अधिक शु॥ त्रयोदशी भृगुवार मुक्काम पुणें यथास्थित असे. विशेष. तुमचें पत्र वर्धानदीवरून आलें त्यांत लिहिलें कीं, दोन मुक्काम येथेंच होऊन तिसरे रोज मजल दरमजल येतों. त्यास आज वीस दिवस होत आले. परंतु फार मुक्काम सावनूरचे वसुलामुळें पडला कीं काय न कळे. तुह्मांकडे येथून चिरंजीवांनीं ही जासूद रवाना केला आहे तो पावला असेल. हा काल पर्यंत येथेंच आहों. तुमची भेटी होईल. मग पुढें कोणीकडे पाहिजे तिकडे जावयाचें करूं. चिरंजीव सेडबाँ जवळ आहेत. यंदां फौज नवीन ठेविली. पुढें थोडी बहुत मुलूखगिरी ही केली.

खून, बारभाईचें कारस्थान, दादासाहेबांचें उचाटण व पाठलाग, गुजराथेंतील मोहिम शिंदे, होळकर, भोंसले, गाइकवाड यां संबंधाच्या पुण्यांत नाना फडनवीस व सखारामबापू यांनीं केलेल्या मसलती व उलाढाली, इंग्रजांशीं युद्ध व तह इत्यादि प्रकरणांवर जीं पत्रें लिहिलेलीं आहेत तीं फारच महत्वाचीं व माहितीनें ओतप्रोत भरलेलीं आहेत. पुढें ज्या ज्या साल्चे कागद आह्मीं छापूं लागलों ह्मणजे हीं पत्रें ही छापिलीं जातीलच. सदरहू म्हैसकर याचे वंशज हल्लीं मिरज, इचलकरंजी व रामदुर्ग येथें राहतात.

१ हा गांव कऱ्हाडच्या पूर्वेस अकरा मैलावर आहे. २ आबाजी नाईक बारामतीकर हा बाळाजी विश्वनाथ उर्फ थोरले नानासाहेब पेशवे यांचा जांवई. ३ किन्हई. हें प्रतिनिधींच्या संस्थानांत प्रसिद्ध असून देवाचें स्थान आहे. ४ हा किल्ला व शहर मोंगलाईत आहे. त्यास हल्लीं सेडम ह्मणतात.

आपल्यास (?) जवळ आहेत. पुढें तेथून अक्कलकोटास आले तर न कळे. वरकड मुलें माणसें चिरंजीव बाळ सुद्धां कुरुंदवाडीच आहेत. तुमची त्यांची भेट ही झाली असेल. बहुत काय लिहिणें हे आशी.

चिरंजीव राजश्री नारायणराव यास आशीर्वाद. चिरंजीव राजश्री आबास आशीर्वाद. चिरंजीव वामनराव यास आशीर्वाद. मुलूखगिरीचें सुख कळलें ! बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद. चिरंजीव राजश्री परशुरामपंत यांसीं आशीर्वाद. तुम्हांस आह्मीं बहुताप्रकारें सांगितलें कीं, श्रीमंतांची चाकरी घडेल. चार महिने फिराल. तुम्हीं ही ऐकिलें. परंतु इश्वरें एक स्वस्तिक्षेम आणिलेस लक्षजोडी जाहली ! कळले पाहिजे. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

नं० ७

श्रीगणपतिर्जयति.

चिरंजीव राजश्री दादा व मोरोबा व परशुराम व वामनराव यांसीं प्रति गोविंद हरी. आशीर्वाद उपरी येथील कुशल ता॥ अधिक शु॥ १४ मंदवार पावेतों यथास्थित असे. विशेष. तुम्हीं पत्र पौर्णिमेस येतों ह्मणून पाठविलें त्यास पौर्णिमा ही आली. अद्यापि तुमचें येणें होत नाहीं यांतील अर्थ काय ? याजउपर लांब लांब मजली करून लौकर येणें. चिरंजीव राजश्री श्रीपतराव आले. कळलें पाहिजे. चिरंजीव राजश्री नारायणराव यांस निरोप दिला असेल किंवा बरोबर आणिले असतील न कळे, यास्तव त्यांचें नांव लिहिलें नाहीं. चिरंजीव राजश्री भास्करपंत कोठें आहेत, काय वर्तमान,

---

१ यावरून वामनराव व परशुरामभाऊ यांची ही पहिलीच मुलूखगिरी होय हें स्पष्ट दिसतें. रामचंद्र हरी हा शूर सरदार वारला तेव्हां त्याचा एकुलता पुत्र परशुरामभाऊ हा अगदीं लहान असल्यामुळें आपल्या चारी चुलत्यांचा फार लाडका होता. तो केव्हां एकदां प्रौढवयांत येऊन बापाच्या लौकिकास अनुरूप असें सरदारीचें काम करूं लागेल, या विषयीं जशी त्यांची उत्कंठा फार, तशीच तो या पहिल्या स्वारींतून धडपणें घरीं कसा येतो ह्मणून त्यांस काळजी ही मोठीच ! २ गोपाळराव. ३ श्रीपतराव हा, ज्यांस पत्र लिहिलें आहे त्या पैकीं मोरोबा आबा उर्फ मोरो बल्लाळ याचा मुलगा.

त लिहिणें वरकड नवल विशेष लिहिणेंसें नाहीं. बहुत काय लिहिणें लोभ असों दीने हे आशीर्वाद.

चिरंजीव राजश्री नारायणराव यास आशीर्वाद.

अक्कलकोटकरांच्या जहागिरींत घालमेल.

फत्तेसिंगराजे भोंसले स० १७९७ त वारले. त्यांची जहागीर त्यांचे दत्तक पुत्र शहाजीराजे यांस मिळावी म्हणून अक्कलकोटकरांचे पूर्वीचे सरदार त्रिंबक हरि हे शहाजीराजे यांस बराबर घेऊन पेशव्यांच्या लष्करास गेले. खालीं दिलेलें पत्र त्यांनीं श्रीमंतांच्या लष्करांतून लिहिलेलें आहे. येथें हें सांगणें अवश्य आहे कीं भोंसल्यांच्या जहागिरीची भानगड या पुढें तीन वर्षें पर्यंत पडली होती. बाबूजीनाईक बारामतीकर यांचें अक्कलकोटकरांकडे कर्ज येणें होतें. त्यामुळें बाबूजी नाईकाची इच्छा ती जहागीर आपल्या हातात असावी अशी होती. त्याच्या मना प्रमाणें न वागतां पेशव्यांनीं त्रिंबक हरीच्या म्हणण्या प्रमाणेंच शहाजी भोंसल्यास जहागिरीचा सर्व अधिकार दिला. त्यामुळें पुढें श्रीमंतांचें व बाबूजी नाईकाचें भांडण झालें. या गोष्टी खालील पत्रांत नमुद केलेल्या नाहींत. पण पुढें एक दोन टिकाणीं त्यांचा संदर्भ येईल, यास्तव त्या आधींच सांगून ठेवितों.

नं० ८

श्रीगणपति.

अपत्यें[1] त्रिंबकानें साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल वर्तमान यथास्थित असे. विशेष. वडिलीं पत्र पाठविलें तें पावलें. लिहिलें वर्तमान कळलें. आह्मीं कुरुंदवाडास येणार होतों, परंतु येथील घोरामुळें यावयास नये असें जाहलें, याज करितां राहणें पडलें. काल श्रीमंत उभयता डेऱ्यास

---

१ पत्र त्रिंबक हरीनें वडील बंधु कृष्णंभट यास लिहिलें आहे. या पत्रावर मिती नाहीं. २ नानासाहेब व भाऊसाहेब.

आले होते. सर्वांस वस्त्रें दिलीं. एक अश्व घेऊन नजर भेटीचे समयीं दिला. आज श्रीमंतांनीं राजश्री शहाजी बावांस मेजवानी केली. श्रीमंतांचे पुत्र विश्वासराव आमंत्रणास आले होते. त्यांस ही वस्त्रें दिलीं. आणि आज निरोप आहे. सरकारचे हत्ती तिकडून येणार आहेत. कुरुंदवाडाजवळून जातील. तरी हरएक विषयीं त्यांसी कज्जा पडूं न द्यावा. युक्तीनेंच लावून द्यावे. वरकड प्रसंग पडल्या सारखा येथील धंदा उरकतों. चिरंजीव राजश्री नीलकंठराव यास तो कुरुंदवाडास येतां नयेसें दिसतें. चिरंजीव राजश्री कोनापा[1] मनस्वी आहे. त्याचा विचार अक्कलकोटास राहणें झालें तर त्यांचें बायकोस तेथेंच राहणें करितों, आणि तेथेंच राहील. आणि कुरुंदवाडास आला तर त्याची बायको त्याजबरोबरच येईल. या प्रमाणें आहे. या उपर वडिलांची आज्ञा प्रमाण. आम्हीं तर श्रमी हिंडावयास लागलों. श्री कृपेनें मुक्तता होईल तो सुदिन. बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

इ० स० १७५८

शहानवाजखानाच्या कुमकेस पेशवे निघतात.

शहानवाजखान म्हणून सलाबतजंगाचा दिवाण होता. त्याचें व सलाबतजंगाचें बितुष्ट वाढून सलाबतजंगानें त्यास कैद करण्याचा यत्न केला. तेव्हां तो दिवाण दौलताबादेंत शिरला व सलाबतजंगाशीं लढण्याची तयारी करून पेशव्यांची कुमक मागता झाला. त्यावरून त्यांनीं सेना सिद्ध करून मोंगलाई मुलखावर स्वारी केली. त्या स्वारीचा खालील दोन पत्रांत उल्लेख आहे. या स्वारींत मोंगलांकडून पेशव्यांस पंचवीस लक्षांचा मुलूख मिळाला.

---

१ 'कोन्हेर' या नांवाचा अर्थ किंवा व्युत्पति कांहीं कळत नाहीं. सांप्रत हें नांव व्यवहारांतून गेल्यासारखें झालें आहे तरी पेशवांईत याचा प्रचार पुष्कळ होता. 'कोन्हेर' या नांवाचें लाडकेपणाचें रूपांतर 'कोनापा' व तुच्छता दर्शक 'कोन्या'. २ हट्टी, स्वच्छंदी.

नं० ९

श्रीगणपतिर्जयति.

ती॥ राजश्री कृष्णंभट दादा वडिलांचे सेवेशीं—

अपत्यें गोविंदानें[1] साष्टांग नमस्कार विज्ञापना—तागायत श्रावण बहुल नवमी मंदवार पावेतों मुक्काम पुणें येथें यथास्थित असों. विशेष. वडिलीं मंगळवेढियांहून पत्र पाठविलें तें पावलें. सविस्तर वर्तमान कळलें चतुर्थी करितां कुरुंदवाडास जाणार ह्मणोन लिहिलें, त्यास कुरुंदवाडास जावयासीं निघालांच असाल. सविस्तर लिहिणें. इकडील वर्तमान तरी श्रीमंत यजमान स्वामी कूच करून पुढें गारदौड्याच्या सुमारास गेले. चिरंजीव राजश्री राव[2] मंडळी रात्रौ मुहूर्तें निघोन लष्करास जावयासीं गेले. चिरंजीव राजश्री पुरुषोत्तमराव सोमवारीं निघोन जाणार. वडिलांस कळावें ह्मणून लिहिलें आहे. येथून साडेसात हजार रुपयांची हुंडी सदाशिव आपा नाईक चिपडे यांजकडे केली. त्यांणीं कोल्हापुराहून कुरुंदवाडास रुपये आणून द्यावयाचा करार केला आहे. अर्काट जुनेप्रती पंचमेळ रुपये देतील ते घ्यावे. हुंडीचा तपशील येणें प्रमाणें—

२५०० चिरंजीव राजश्री भास्करपंताचा ऐवज.
६०० नारो अनंत लेले याचे.
२४०० ती॥ लिंबकपंत आपांचा ऐवज.
२००० खासगत आमचा ऐवज.

७५००

एकूण साडेसात हजार रुपये वडिलीं घेऊन ठेवावे. अर्काटप्रतीचे पंचमेळ देतील ते घ्यावे. कुरुंदवाडीच माप घ्यावे. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे. बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

---

१ पत्र गोविंद हरीचें वडीलबंधु कृष्णंभट यांस. २ मुलगे व पुतण्ये मिळून सर्व.

नं० १०

श्रीगणपतिर्जयति.

ती॥ राजश्री आपा वडिलांचे सेवेशीं—

अपत्यें गोविंदानें[1] साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत श्रावण वद्य दशमी पावेतों वडिलांचे आशीर्वादें करून यथास्थित असों. विशेष. चिरंजीवाचा वळ निःशेष बरा झाला नाहीं. श्रीमंतांनीं दर्शनास यावया साठीं दोन चार वेळां आज्ञा केली. त्यास काल नवमी मंदवारीं गेलों होतों. वस्त्रें दिलीं खंजीर जडीत मुठीचा एक दिला. घडीभर बसोन आलों. औरंगाबादस शहानवाजखान दिवाण मोंगलाचा होता. त्यासीं हिशोबाकितेबाचा कज्जा लाविला. याजमुळें त्याणें आपली दोन तीन हजार फौज व मालमालियत कैबिले[2] सुद्धां—दौलताबाद त्याच्याच विद्यमानें हस्तगत केली होती व तेथें त्याचेच निसबतीचा कोणी होता—रात्रौ तयार होऊन उठोन शहरांतून दौलताबादेस गेला. पुढें सभोंवत्या चौक्या बसवून त्यास कैवेसींत[3] आणावा, असा नबाबाचा मतलब आहे. कळलें पाहिजे. चिरंजीव राजश्री नीलकंठराव लोकरच येतील. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे विनंती.

इ० स० १७५९

पटवर्धन व रास्ते यांची कर्नाटकांत रवानगी.

मोहिमेवर नानासाहेब पेशव्यांचे स्वारी औरंगाबाद प्रांतीं हिंडत असतां त्यांनीं माघमासीं गोपाळराव पटवर्धन व रास्ते यांजबरोबर फौज देऊन त्यांची कलबुर्ग्याकडे रवानगी केली. गोपाळरावानें स्वारीस जातांना कोन्हेरराव यास पेशव्यांजवळ कांहीं कामा करितां ठेविलें होतें. तें ही काम त्यानें उत्तम रीतीनें बजाविलें.

नं० ११

श्रीगणराज.

अपत्यें नारायणानें दोनी कर जोडून शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना

---

१ पत्र गोविंद हरीचें वडीलबंधु त्रिंबक हरि यास. २ बायकामुलें. ३ ताब्यांत.

तागायत माघ वद्य पंचमी भौमवार नजीक साकेरखेड जाणोन वडिलांचे आशीर्वादें करून क्षेम असों. विशेष. तीर्थस्वरूप रायांस व रास्त्यांस निरोप देऊन कर्नाटकांत रवानगी केली. यजमान येरुळावरून फिरत जाणार. आमचें वर्तमान तर हिशेब कितेक मामलतीचे अगदीं विल्हेस लाविले. गुदस्तां पेक्षां आंवदां जाजती. येणें प्रमाणें मजकूर झाला. रास्त्यांनीं व रायांनीं मिळोन स्वारींतील कारभार करावा.

रायांकडे येणें प्रमाणें कर्तेपण.	रास्त्यांकडे.
१ शिक्का मोर्तब.	१ कुचाचा नगारा करणें.
१ खर्चाचें ही कलम.	१ संस्थानिकांशीं भाषण करणें.
	१ बोजीस चालणें.

सिद्धांत करणें तो मात्र दोघांनीं करावा. सरकारचे फडणीस, पोतनीस, चिटणीस वगैरे कारकून बराबर दिल्हे. कारभार या प्रमाणें झाला. सालमजकूर कबूल करावें असें कांहीं नव्हतें, परंतु सरकारचा पैसा घेऊन गुंतलों; याज करितां संकट जाणोन कबूल करणें जरूर लागलें. विसाजी पंतांचें व तात्या घोरपड्यांचें पथक वडील गेले असतां शेऱ्याच्या करारास्तव आज यजमानांनीं ठेवून घेतलें आहे. आज उद्यांत गुंता उरकोन देतील. उपरांतिक आह्मीं निघून जातों. चिरंजीव कोन्हेरीस यजमानां समीप ठेवून दिलें. प्रस्तुत त्यास कोठें पाठवूं नये, हुजूर रहावें, या प्रमाणें करार मदार केला आहे. धाकट्या नाना बरोबर गांठ घालून दिली आहे. चिरंजीव नीलकंठरायास आणावयाविशीं अथवा आपणास पत्र यजमानांचें घेऊन पाठविण्याविशीं सर्वांचें मानस होत नाहीं. याज करितां आह्मीं अत्याग्रह न

---

१ हें स्थळ मोंगलाईच्या नकाशांत आह्मांस कोठें सांपडलें नाहीं. पण तें औरंगाबादे पासून पांच चार मजलींवर असावेंसें वाटतें. २ गोपाळरावास. ३ येरूळ –ज्याची लेण्यांबद्दल प्रसिद्धि आहे तें वेरूळ. ४ खर्च काय होतो यावर देखरेख. ५ बाजूस. ६ हा विसाजी कृष्ण विनीवाले नव्हे. विसाजी नारायण नांवाचा दुसराच एक कर्नाटक प्रांतींचा सरदार होता. ७ तात्या घोरपडे इचलकरंजीकर. ८ शिलेदारांस घोडें माणूस मिळून सालिना किंवा दरमहां जें वेतन द्यावयाचें त्याचा दर. ९ धोंडोपंत नाना पुरंदरे.

करितां राहिलों. प्रस्तुत चिरंजीवानीं अक्कलकोटाकडे जाऊन कलबर्गे वगैरे तालुक्यांत उपद्रव करूं नये. येथील स्थिति एक प्रकारची झाली आहे. उभयतांत चित्त शुद्ध नाहीं. सर्व कारभार थोरले यजमानच करितात. भोंसल्यांचा कारभार विल्हेस लाविला. वीस लक्षे रुपयांचा करार त्याजवळून करून घेतला. कांहीं सावकारी निशा, कांहीं किरकोळ त्याजकडील सरदारांनीं द्यावें, असा तह ठरला आहे. त्यास वस्त्रें पात्रें परवां दिलीं. आता मजल दरमजल येरूळावरून नाशिकास जाणार. असा मजकूर आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

चिरंजीव नीलकंठरावास आशीर्वाद.

नं० १२

श्रीगणराज.

ती॥ रा॥ आपा वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें नीलकंठानें साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत फाल्गुन वद्य एकादशी भौमवासर पावेतों यथास्थित असों. विशेष. इकडील वर्तमान तर चिरंजीव रा॥ कोन्हेरराव यास ती॥ रा॥ दादा येते वेळीं धाकटे नानाचे हातीं देऊन आले होते. त्यास ते होते तों पावेतों त्यानीं चिरंजीवांचा परामर्ष उत्तम प्रकारें केला. येरूळाहून कूच करून आल्यावर दुसरे दिवशीं ते जाऊं लागले ते समयीं चिरंजीवांस आपणच होऊन स्मरण पूर्वक बोलावून नेऊन श्रीमंत राजश्री भाऊसाहेब यांचे हातीं देऊन विनंती केली कीं, खर्चाचा परामर्ष करावा आणि लवकरच निरोप द्यावा. त्याजवरून श्रीमंत बोलले कीं, नाशिकास गेल्यावर निरोप देतों, सर्व प्रकारें परामर्ष करितों,

---

१ भाऊसाहेब व नानासाहेब यांत. २ हा भोंसल्यांचा व पेशव्यांचा तह कोणत्या प्रकरणीं झाला व हे वीस लक्ष रुपये भोंसल्यांनीं कशाबद्दल दिले हें समजत नाहीं. इंग्रजी ग्रंथांत किंवा जुन्या बखरींतून वगैरे या विषयीं कांहीं दाखला सांपडत नाहीं. पुढील सालच्या पत्रांत ही या तहा विषयीं उल्लेख आहे, पण तेथें विसांबद्दल एक-वीस लक्षांची रक्कम लिहिलेली आहे.

म्हणून आज्ञा जहाली. तदनंतर तीन चार मजली चिरंजीव श्रीमंतांबरोबर आले. पुणतांब्यांजवळ आले तों महागाई अतिशय जहाली. दोन सवादोन पायलींची धारण- रुपयास दहा पेंढ्या वैरण. ते ही मिळेनाशी झाली. तेव्हां मग महिपतराव चिटणीस यांचे विद्यमानें श्रीमंतांस विनंती केली कीं, निरोप लोकांस देतों, खाण्यापिण्याची निभावणी होत नाहीं. मग श्रीमंत बोलिले जे, तुमच्या यादी आणणें. विल्हे[1] लावून निरोप देतों. मग हे यादी घेऊन गेले, सरंजामी[2] यांचे जाबसाल होते ते विल्हेस लावून दिले. आणि पांच हजार रुपये खर्चास दिले. बावतीच्या वगैरे ऐवजाचा जाबसाल पुण्यांत विल्हेस लावूं म्हणोन आज्ञा जाहली. पांढऱ्यांकडील ऐवज दारीं माणसें बसवून घेणें अशी आज्ञा जाहली. मग यांणीं विनंती केली कीं, ते सुरळीत पणें देत नाहींत. स्वामींनीं सरकारांत निशा करून घ्यावी आणि सरकारांतून दुसरीकडे ऐवज देवावा. त्यास श्रीमंत बोलले कीं, प्रस्तुत ते बरोबरच आहेत. यांचा कारभार विल्हे लागल्यावर निशा करून घेतों ऐशी आज्ञा जाहली तोच नारायणराव पांढऱ्यांकडील ऐवज ही निशा करून घेतों म्हणोन बोलिले. मग चिरंजीवानीं ती॥ रा॥ दादांकडील कारकून आपाजीपंत दरबारीं आहे त्यास श्रीमंतांशीं रुजू करून दिलें आहे. यत्न करून चिरंजीवानीं ठीक केलें आहे. निर्गमांत येईल तेव्हां खरें! तसेंच जानबा निंबाळकर[3] याजकडील अकरा गांवची रुबरू[4] ताकीद केली. मग सर्व सरदारांस व चिरंजीवांस वस्त्रें दिलीं. आणि निरोप दिला. चारशें आंखाची[5] शालजोडी देविली. चिरंजीवांवर बहुत कृपा केली. चिरंजीव श्रीमंतांशीं बहुत धीटपणें बोलले. कामें उरकोन निरोप घेतला. छावणी न होता

---

१ नाना पुरंदऱ्यां प्रमाणेंच महिपतराव चिटणीस ही भाऊसाहेबांच्या मर्जीतला मुत्सद्दी होता. २ निकाल. ३ फौजेच्या खर्चा करितां ज्यांकडे सरकारी जमिनी लावून दिल्या आहेत ते. परंतु ह्लींचें सरकार सरंजाम व जहागीर हे एकाच अर्थाचे शब्द आहेत असें मानीत नाहींसें वाटतें. ४ हे मोंगलाकडील सरदार. ५ समक्ष. ६ चारशें आंखाच्या शालजोडीची किंमत वस्तुतः तितकी असे असें नाहीं. बाजवी किंमती पेक्षां कांहीं प्रमाणानें अधिक आंख कापडावर घालीत.

श्रीमंताची मर्जी राखोन घरास आले हीच मोठी जोडी जाहली. श्रीमंतानीं चिरंजीवांस सांगितलें कीं, वडिलांस आमचा नमस्कार सांगणें. या प्रमाणें बोलिले. पहिली बहुतच निर्दशा केली परंतु येत्ये समयीं सन्मानें करून समाधानानें निरोप दिला. चिरंजीवानें बहुतच श्रम केले आणि एकदांचें आले. आज कल्याणी होया यास्तय चिंचेली परगणे अक्कलकोट येथें राहिले उदईक दोनप्रहरां नंतर येतील. मैराळपंत पुढें आले त्यानीं सर्व वर्तमान सांगितलें. ती॥ रा॥ दादा भालेकींत आले. तेथील कारभार जाहला तो सेवेशीं परवां लिहिलाच आहे. मुख्य गोष्ट कमावीसदारानीं दगाबाजी केली ती तीर्थस्वरूपांस माहिती केली. ती॥ स खट्टे होऊन लिहिलें होतें. तेव्हां त्याणीं लिहिलें कीं, तुमचे कमावीसदार[1] याणींच सांगितलें. आमचा अन्याय काय? आम्हीं रामाजीपंतास लिहीत गेलों. त्याणीं ती॥ स कांहीं न सांगितलें. बरें! ऋणानुबंधानुसार झालें! उपाय काय! ती॥ रा॥ दादानीं उदगिरींत तीन साडेतीन हजार रुपये घांसदाण्यांत साधून दिले. तेथून हुमणाबादेंत आले. तेथून मागडमदलीचा घांट उतरून चिंलोलीची खंडणी करून तिगली पासून दोन कोसांवर उतरले. रा॥ गुंडोपंत समागमें आहेत. परगणे मगलगींतील मोकासा खंडून दिला. कलबुर्ग्याचे गांवांस वडिलानीं रोखे करून राऊत पाठविले आहेत. आणोन गांव खंडोन देणार. आणि 'पिंपलीखेड सरकार ही खंडून देतों. सगरचा ही गुंता बाकीचा उगवितों,' म्हणोन लिहिणें आहे. रा॥ रामाजीपंत हुमणाबाद नारायणखेड लोकांस खंडून आले आहेत. तीर्थस्वरूप सुरापूर खंडून जात तों पर्यंत रामाजीपंत तांडूरकोट, पलीकडे ढोरवाड, आडकीकोंडाकडे गेले होते. फिरोन दहा वीस हजार मिळतील ते मिळवून येतील. या उपरी अतिशय व्यवहार करीत नाहींत. सुरण पक्का दीड मण व द्राक्षें पाठविलीं आहेत. चिरंजीव येऊन वडिलांस भेटले नंतर सविस्तर लिहून पाठवितों. महिपतराव चिटणीस यांणीं चिरंजीवाचें साहित्य उत्तम प्रकारें केलें. पोतनीस व गणपति बाल्यांस (?) पांच सहाशें रुपये दरबार खर्च केला. विदित होय हे विज्ञापना.

---

१ अनास्था. २ हें मोंगलांचे सरदार जाधवराव यांचें जहागिरीचें ठिकाण मोंगलाईत आहे.

इ० स० १७६०

उदगीरच्या लढाई नंतरची हकीगत.
गोपाळराव दौलताबाद काबीज करितो.
अबदालीनें शिंदे होळकरांचा पराजय केल्याचीं वर्तमानें.
भाऊसाहेब पानपतच्या स्वारीस जातात.

या सालीं मोंगलावर स्वारी झाली. उदगीर येथें मोंगलाचा पूर्ण पराजय होऊन त्यानें बासष्ट लक्ष रुपये उत्पन्नाचा मुलूख पेशव्यांस दिला. तह झाला तेव्हां पेशव्यांची स्वारी नगरच्या मुक्कामीं होती. तेथें नीलकंठराव होता त्यानें नवीन मिळालेल्या मुलखापैकीं तीन परगण्यांची मामलत आपणाकडे करून घेतली. वरील तहांत दौलताबाद मोंगलानें पेशव्यांस दिली. परंतु तेथील किल्लेदार किल्ला पेशव्यांच्या हवालीं करण्यास कबूल नव्हता. सबब गोपाळराव पटवर्धनाची श्रीमंतांनीं दौलताबाद घेण्या साठीं रवानगी केली. त्यानें जाऊन त्या किल्ल्यास शह देण्याचें सोडून किल्लेदाराशीं कांहीं पैका घेऊन किल्ला हवालीं करण्या विषयीं बोलणें लाविलें. तेव्हां तो किल्लेदार शेफारून भलभलत्या मागण्या करूं लागला. नानासाहेब पेशव्यांस गोपाळरावाचें करणें बिलकुल आवडलें नाहीं. त्याणीं त्यास लिहिलें कीं, तुम्हीं राजकारणाच्या भानगडींत न पडतां किल्ल्यांत अन्नपाणी न जाईल अशी तजवीज करा व सक्तीनें वेढ्याचें काम चालू करा. अशी सक्तीची ताकीद मिळाल्यावर त्यानें शहर पन्ह्यावर हल्ला करून तो घेतला व किल्ल्यास ही मोर्चे बसविले. तेव्हां किल्लेदारानें घाबरून दौलताबाद त्याच्या स्वाधीन केली.

उत्तर हिंदुस्थानांत अबदालीनें शिंद्याच्या फौजेवर येऊन छापा घातला. तेथें युद्ध होऊन दत्ताजी शिंदे मारला गेला व शिंद्याच्या फौजेची ही धुळधाण झाली. होळकराच्या फौजेपैकीं पांच सहा हजार लोक येऊन शेटिबा खराडे अघाडीस होता त्याजवर ही अबदालीनें अकस्मात् येऊन

छापा घातला. तेथें शेटिबा मारला गेला व त्या बरोबरचे लोक ही बहुत मारले गेले. हीं वर्तमानें दक्षिणेंत येऊन धडकलीं. मग विश्वासरावास बरोबर घेऊन भाऊसाहेब पानपतच्या स्वारीस निघाले. जातांना बऱ्हाणपुरांत ठाणें घालून ते माळव्यांतून खेचीयाड्यांत गेले. तेथून चमेलीपार होळकर होता त्यास मिळवून घेऊन दिल्लीस गेले. तेथें गिलच्यांची चार हजार फौज होती ती मारून व दिल्ली घेऊन पर्जन्यकाळा निमित्त त्यानीं छावणी तेथेंच केली.

नं० १३

श्रीगणराज.

अपत्यें साष्टांग नमस्कार विज्ञापना. आह्मीं नगरच्या तळावर थोरल्या श्रीमंतांपाशीं होतों. त्या उपरी मोंगलांचा व यांचा तह जाहला. जहागीर बासष्ट लक्षांची घेतली. त्या उपरी परभारें श्रीमंत राजश्री भाऊंस थोरल्या श्रीमंतांनीं लिहिलें जे, राजश्री नीलकंठराव येथें आम्हांजवळ उमेदवार आहेत. त्यांस कांहीं धंदा सांगावा लागतो. ह्मणोन लिहिल्यावर त्यानीं उत्तर दिलें जे, त्यांस आम्हांकडे पाठवून देणें. ते उपरी आह्मांस तेच समयीं बोलावून नेऊन लागलाच निरोप दिला. आपल्या हातें पत्र लिहून दिलें कीं, खामेखा मलिखेडे सरकार पैकीं यांस मामला सांगोन पाठवावें. ऐसें लिहून रवानगी करून दिली. आम्हीं मजल दरमजल बिडावरून परेळींच्या मुक्कामीं या लष्करास आलों. येथील श्रीमंतांची भेट जहाली. पत्र दिलें. तदनंतर दुसरे दिवशीं त्यानीं धाकटे नाना व बळवंतराव व महिपतराव चिटणीस यांस मध्यस्थ घालून बोलण्यास सांगितलें जे, श्रीमंत राजश्री बाबा साहेबांकडील कार्यभाग तुम्हीं करावा. फौज आपले जिम्मेस तुम्हीं करून घ्यावी. आम्हीं जहागिरीचे महाल सांगतों ते करावे. असें बोलावयास

---

१ हें नीलकंठराव याचें आपल्या बापास ह्मणजे त्रिंबक हरीस पत्र. २ निश्चय पूर्वक. ३ मोंगलापासून नवीन घेतलेल्या बासष्ट लक्षांच्या जहागिरींत मलिखेड सरकार होतें. हें व या पत्रांतील इतर स्थळें मोंगलाईत आहेत. ४ परळी वैजनाथ. ५ बळवंतराव मेहेंदळे. ६ फत्तेसिंगबाबा भोंसले. ७ कारभार.

सांगितलें. हे त्रिवर्ग आम्हांशीं बोलूं लागले. तेव्हां आम्हीं साफ सांगितलें जे, आम्हांस हें परिछिन्न पुरवत नाहीं. नाइकांचा आमचा पेंच. दिवाणजी[3] चा ही पेंच. आम्हीं कबूल करावें, आणि दोन महिन्यानीं श्रीमंतानीं मागती आपाजीरावास आणून समजावीस करावी. त्याच्या ही चित्तांत यावें कीं, आम्हीं प्रसंगीं नसतां यानीं कारभार केला. असे कित्येक मजकूर त्यांजशीं बोललों, त्यास ही म्हटलें जे, तुमच्या त्रिवर्गाच्या चित्तास ही गोष्ट येती कीं काय ? हें पुतें ध्यानांत आणून सांगावें. त्या उपरी तेच बोलिले जे, आमच्या चित्तास येत नाहीं. याचा परिणाम अशाश्वत दिसतो. तुम्हीं कबूल न करणें. आम्हीं श्रीमंतांशीं याच प्रकारें बोलतों. मग आम्हांस निरोप देऊन श्रीमंतांशीं एकांतीं सर्व मजकूर बोलले जे, तुम्हीं नीलकंठरायास हा कारभार कबूल करा म्हणतां, पुढें आपल्या साडूसें[4] आणून ही फौज त्याजकडे द्याल, मग हे तोंडघशीं पडतील. याचा बंदोबस्त सर्व तुमच्यानें होत असलिया नीलकंठराव कबूल करितील. ऐसें बोलल्यावर श्रीमंत राजश्री भाऊसाहेबच बोलिले जे, आम्हीं हुजूरचीं पथकें नेमून देऊं तीं घेऊन जावीं. मग आम्हीं ही मान्य केलें. मग मलिखेड सरकार पैकीं पंचमहालांत[5] परगणे उठवून व परगणे मंगथळ व परगणे मगलगी हे तिन्ही महाल मिळून दोन लक्षांचे तनख्याचे आहेत. रसंद[6] पावणेदोन लक्ष पहिल्यानें नेमून दिली होती. परंतु आम्हीं रदबदली करून निदान एक लक्ष पसतीस हजार करार केले. तिन्ही महालांचा आम्हीं ही शोध बहुतां प्रकारें केला. त्यास तिन्ही महाल मिळून वसूल तीन साडेतीन लक्ष पर्यंत आहे.

---

१ बिलकूल. २ बाबूजी नाईक बारामतीकर. ३ अक्कलकोटकरांचा दिवाण आप्पाजी राम गाडगीळ. हा पुढें इ० स० १७७० । ७१ च्या कर्नाटकच्या स्वारींत शहाजीराजे भोंसले यांजबरोबर होता. ४ भाऊसाहेबांचा साडू कोण ? आपाजीराम ? ५ पंचमहाल हें त्या भागाचें जुनें गांव आहे. हल्लीं प्रचारांत नाहीं. हा सर्व प्रदेश हल्लीं गुलबुर्गा जिल्ह्यांत मोडत असावा. रायचूर दुआबात पंच महाल होते ते निराळे. ६ बादशाहीच्या वेळचा वसुलाचा अजमास. ७ मामलेदाराच्या हवालीं मामला करण्या पूर्वी त्याचा निम्मे वसूल त्या पासून आगाऊ घेत असत त्यास रसद ह्मणत.

रसदेच्या रुपयांस फिकीर नाहीं. असें होतें तरी आम्हीं कबूल करीत नव्हतों. श्रीमंत राजश्री नानासाहेबांची भेट होईपर्यंत रेंटून नेलें. तेथें गेल्यावर राजश्री गोविंदराव तात्या व हरीपंत व विसाजीपंत सर्व मंडळी होती. त्यास हा मजकूर निवेदन केला. सर्वांच्या विचारें श्रीमंतांची मर्जी तोडूं नये, जाला कारभार हा कबूल करावा; असें झाल्यावर आम्हीं कबूल केलें. कागद पत्र करून घेतले. रसदेची चिठी राजश्री गोविंदराव तात्यांची दिली. त्यानीं भरणां पुण्यांत करावा. त्यास आम्हीं तीर्थरूप राजश्री गोविंदपंत नानांकडे पंचवीस हजार देवितों ह्मणून करार केला. त्या पैकीं साडेबारा हजारांचा ऐवज केला आहे. बाकी साडेबारांचा भरणा वडिलीं पुण्यांत करावा. त्याजकडील पत्राची वाट नं पहावी. सदरहू ऐवज पुण्यांत रवाना करून द्यावा. आम्हीं इतका कारभार होईपर्यंत फाल्गुन अखेर पावेतों श्रीमंतांजवळ होतों. त्या नंतर आज्ञा घेऊन चैत्र शुद्ध प्रतिपदेस निघालों ते आंबें पडदुर्गास आलों. त्या उपरी दुसरे दिवशीं कूच करून मध्यें राहिलों. पुढें तिसरे दिवशीं मनरथास आलों. पुढें दरमजल आंबेच्या घांटें जातों. बरोबर फौज हुजूरची पथकें हजार राऊत पर्यंत आहेत. बारगे व ह्मसाजी सोनवलकर व कृष्णाजी नारायण मिळून आहेत. पोटास तूर्त आम्हांसच द्यावें लागतें. सावनुरावर हत्ती द्यावयाचा करार केला होता, त्यास प्रस्तुत हटकिलेवर आह्मांकडील मामले पैकीं तीन हजार रुपयांची वरात करून देणें ह्मणोन आज्ञा जाहली. वरांत लिहून घेतली आणि वस्त्रें दिलीं, आणि बहुता प्रकारें सांगून निरोप दिला. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं० ११

श्रीगणराज.

अपत्यें साष्टांग नमस्कार विज्ञापना. आंवदां श्रीमंत राजश्री दादा

---

१ गोविंद शिवराम खासगीवाले. पुढले दोन गृहस्थ हरीपंत पोंभुर्लेकर व विसाजी नारायण हे इचलकर्जीकर घोरपड्यांचे कारभारी. २ नं० १३ प्रमाणें हें ही पत्र नीलवंठरावानें त्रिंबक हरीस लिहिलें आहे.

साहेब छावणीस गेले नाहींत. अनमान केला. त्यावर श्रीमंत राजश्री भाऊ साहेब खासा पंचवीस हजार फौजेनिशीं हिंदुस्थानास गेले. थोरले श्रीमंत तूर्त या प्रांतीं आहेत. फौज हुजरात वगैरे दहा हजार आहे. या शिवाय भोंसले दहा हजार आहेत. चार दिवस औरंगाबादे भोंवती राहणार. मोंगल एकीकडे गेल्यानंतर निघून पुण्यास जाणार आहेत. भोंसल्यांकडील तह एकवीस लक्षांवर झाला. दहा लक्ष तूर्त द्यावे, अकरांची निशा द्यावी या प्रमाणें जाहलें आहे. परंतु निशा कैशी होती ती पहावी ! तीर्थरूप राजश्री गोपाळराव दादा दौलताबादेस गेले होते. इतके दिवस दोन कोसांवर होते. प्रस्तुत किल्लाजवळ जाऊन राहिले आहेत. तोफा उडतात. अद्याप हस्तगत होत नाहीं. पुढें किती दिवस लागतात तें पहावें ! बच्याजीपंत बर्वे बऱ्हाणपुरास रवाना केले होतें, परंतु अद्यापि अशेरीचा[1] किल्ला आला नाहीं. बऱ्हाणपुरांत मात्र ठाणें बसविलें. पुढें किती दिवस लागतात पहावें. दिल्लीकडील वर्तमान तरी पेशजी दत्ताजी शिंदे यांचें झूज झालें. ते ठार पडले. हें वर्तमान सविस्तर बडिलांस लिहिलेच आहे. त्या अलीकडे कांहीं अधिकोत्तर वर्तमान आलें नाहीं. होळकर व शिंदे एक जागां होते. अबदालीचें व यांचें एक झूज जाहलें. यानीं त्यास माघारें सारिलें. शेंपन्नास घोडे घेतले. त्यावर तो माघारा दिल्लीस गेला म्हणोन वर्तमान आलें होतें. पुढें श्रीमंत[2] ही लवकरच जाणार होते. काय होईल तें पहावें. त्याचें भय इकडील फौजांवर आहे. यांची सलाबत त्याजवर नाहीं, दिल्लीहून अलीकडे पन्नास कोस अबदाली आला म्हणोन लिहिलीं आलीं होतीं. रोहिले वगैरे दहावीस हजार त्यास मिळाले होते. परंतु अलीकडे पत्रें आलीं कीं, माघारा फिरला. त्यास ऊन फार सोसत नाहीं. दिल्लीचे अलीकडे उन्हाची झळ फार लागती यास्तव फिरला. त्यास दिल्ली सोडून जातो किंवा तेथें राहतो पहावें. श्रीमंत भाऊसाहेबां बरोबर पंचवीस हजार फौज गेली. धाकटे नाना व बळवंतराव व महिपतराव हे कारभारी गेले. पथके सरदार तमाम गेले. गुदस्तांची कर्नाटकची फौज बिन नालबंदीची[3] व

---

१ अशीरगड. २ भाऊसाहेब. ३ स्वारास सालिना जें वेतन द्यावयाचें त्याचा निम्मे किंवा तिजाई भाग आगाऊ देत त्यास नालबंदी म्हणत.

दादासाहेबांकडील त्यांची हुजरात पांचहजार इतकी मात्र राहिली. या खेरीज नाईक. बाकी फार करून गेले. चव्हाण, व्यंकाजी शिवदेव यांची फौज गेली नाहीं. श्रीमंतांजवळ आहे. दमाजी गायकवाड छावणीस गेले. प्रस्तुत दरबारी कारभार दादासाहेबांकडे आहे. दोनप्रहर पावेतों स्नान संध्या. तृतीय प्रहरीं कारभार करणार. लोकांचा परिणाम कसा लागतो? भाऊसाहेब सर्वज्ञ होते. आतां गांठ यांशीं पड़ली आहे. आबाजीनाईक फौज सुद्धां खंदारीजवळ आहेत. ते ही पंचमहालाकडे येणार आहेत. बाबूजी नाईक टोंक्यांस गेले. तेथें महिना दोन महिने राहणार. सवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं० १५

श्री.

पुरवणी. राजश्री गोपाळराव गोविंद स्वामी गोसावी यांस—

नमस्कार. विनंती उपरी, वारंवार लिहिलां कीं, हीं स्थळें दुर्घट आहेत, शहास सुततां येत नाहीं, विचारें कार्यसिद्धि करावी लागत्ये, यास्तव हल्ला राहविली; म्हणोन लिहिलां हें बहुत अपूर्व वाटतें! विचार दूरदेशी तुम्हांस च कळतें हें पूर्ण प्रत्ययास येऊन गेलें! परंतु हें राजकारण प्रथम नरम धरिलेंत, रसद बंद न केली, ये गोष्टीची तारीफ चिरंजीव भाऊ वगैरे सर्व शहाणे तुमची फार करितात! तुम्हांस स्थळें अवघड वाटतात परंतु श्री कृपेनें तृणप्राय आहेत. मल्हारबानीं धोडप हल्ला करून घेतली तें स्थळ हल्ला

१ बाबूजी नाईक बारामतीकर. २ यावरून दमाजी गायकवाड उदगीरच्या लढाईंत होता असें सिद्ध होतें. ३ खंदार हें मोंगलाईंत असून एका रजपूत सरदारास त्यावेळीं मोंगलांकडून जहागीर होतें. खंदारकर राजे यांचें नांव पुढें कित्येकदां येईल. ४ दूरदेशी=दूरदर्शी. ५ हें लिहिणें उपरोधिक आहे. ६ धान्य वगैरे सामग्री. ७ मल्हारराव होळकरानें धोडप कधीं घेतला हें निश्चयानें सांगतां येत नाहीं. परंतु ही गोष्ट इ० स० १७५२–५३ मध्यें घडली असावी. कारण या वर्षी ताप्ती व गोदावरी या नद्यांमधील सर्व मुलुख मोंगलांपासून मराठ्यांनीं घेतला. होळकर ही या साली दक्षिणेंत आला होता.

करून यावयाचें होतें ? कालच्या[1] मोंगलावर उभयता चिरंजीवानीं सफेजंगी केली. एका लढाईंत मोंगल चक्काचूर केला. हें कोणाचे तर्कांत येत होतें? लाखों असाध्य कामें श्रीकृपातेजप्रतापापुढें तृणप्राय आहेत ! परंतु करणारासारखें फल होतें. तुम्हीं सखूत जलद शिपाई असें जाणून मी तुम्हांस पाठविलें होतें. तुम्हींच आम्हांस विचार लिहिणार, इतकें कळलें असतें तर एखादे लहानसान पथके पाठविले असते. तो प्रथम दिवशींच रस्त बंद करिता; कांहींच द्यावयाचें न बोलता, ह्मणजे आज काम जाहलें असतें. तुम्हीं मातबर, तुम्हांस कार्य जाहल्यावांचून आणतां नये, यास्तव तुम्हांस यश यावें म्हणून तुम्हांसच आज्ञा करितों ते तुम्हीं करीत नाहीं, ये गोष्टीस इलाज कोणता करावा ? गोपाळरावजी ! हे दौलताबाद तुम्हांस दुर्घट वाटतें, परंतु दो महिन्यांत सखूतीनें वेढा घालून एक रुपया न देतां घेऊं ! को कीं त्याची कुमक कोणी करीत नाहीं. मोंगलानें कुमक केली तर पुनरपि श्रीकृपेनें पन्नासहजार फौज जमाकरून अगदीं मोंगल दक्षिणेंत होता कीं नव्हतासा करूं ! हें मोंगल समजले आहेत. तुम्हीं समजत नाहीं यास इलाज काय करावा ? तुम्हांस बहुत दूरदेशी समजतें. रागेंभरून लिहिलें म्हणोन तुम्हांस आतां राग येईल. परंतु तुम्हीं वारंवार आम्हांस विचार लिहितां यास्तव लिहिणें प्राप्त जाहलें. या पत्रापूर्वी कार्य जाहलें असेल तर उत्तम आहे. नाहींतर परिछिन्न शहरपन्हा घेऊन वेढा बसविणें. श्रीकृपेनें कार्य होईल. जों जों तुम्हीं राजकारणें करितां तों तों काम नासतें ! या उपर या पत्रावरून जितका राग येईल तितका त्याजवर काढणें. जर कार्य जाहलें असेल तर मग व्यर्थ राग येऊं न देणें. तुमचा स्वभाव रागीट, यास्तव इतके दिवस सखूत लिहिलें नाहीं. आतां वारंवार तुम्हीं विचार लिहूं लागलां तेव्हां लाइलाज[2] जाणून लिहिलें आहे. हें पत्र कोणास ठाऊक नाहीं. लेंकरादाखल सेवकावर एकांतीं रागें भरल्यास वाईट मानूं नये. छ० १४ साबान हे विनंती[3].

---

१ कालचा मोंगल—नुकताच ज्याशीं संग्राम झाला तो निजामअल्ली. २ झपाट्याचा हल्ला. ३ किल्लेदाराची. ४ नाइलाज. ५ हें व पुढील पत्र

नं० १६

श्री.

राजश्री गोपाळराव स्वामी गोसावी यांसीं—

नमस्कार. विनंती उपरी. हल्लाकरून बाहेरील कोट मोठया निकडीनें घेतला, जातीनें बहुत केली, ह्मणून वर्तमान श्रवण होऊन संतोष जाहला. यांउपरी तुमची जरब त्यांस थोडीशी कळली असेल. सत्वरच नरम होतील. न जहाले तरी उत्तम प्रकारें दोन तीन नाके धरून चौक्या बसविणें छ० १७ साबान. हे विनंती.

नं० १७

श्रीगणपति.

तीर्थस्वरूप राजश्री आपा वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें परशुरामानें चरणावरी मस्तक ठेवून शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना येथील वर्तमानतर चैत्र वद्य द्वितीया गुरुवार पावेतों वडिलांचे आशीर्वादें करून मुक्काम दौलताबाद येथें समस्त सुखरूप असों विशेष. वडिलांकडून दोन चार पत्रें आलीं परंतु जाब त्याहावयासीं गांठ पडली नाहीं ह्मणून वडिलीं रागेंभरून लिहिलें, त्यास वडिलांकडून दोन चार पत्रें आलीं. जासूद कांहीं भेटला नाहीं व जाब घेऊन गेला तें ही कांहीं कळलें नाहीं. त्याज वरून अंतर पडलें. या नंतर इकडील वर्तमान तर राजश्री भाऊसाहेब ब-हाणपुरावर आहेत. उत्तरेकडील वर्तमान तरी मल्हारजी होळकर यांजकडील शेटियाजी खराडा दोन चार हजार फौजेनिशीं त्याचे तोंडावर गेला होता. मागें गंगोबा मैशारनिल्हेचे दिवाण होते. त्यांचे मागें खासा मल्हारबा होते. त्या नंतर इराणी यानीं शेटियाजी खराडे याचे फौजेवर पसतीस कोसांवरून येऊन छापा घातला. खासे खराडे ठार पडले. व गंगोबाचा

नानासाहेब पेशव्यानीं आपल्या हातें लिहिलेलें आहे. अक्षर बारीक टांकानें सफाईदार लिहिलेलें असून छान वळणदार आहे.

१ गंगाधर यशवंत चंद्रचूड. होळकराचे दिवाण. २ होळकराचे. ३ इराणी=गिलचे.

पुतण्या त्यांजबरोबर होता तो ही पडला. पांच सातशें माणूस मारिलें. फौज[1] येऊन माघारी मथुरेस गेली. नरवर[2]प्रांतीं खासा मल्हारबा आहेत. हें वर्तमान सेवेशीं कळावें. श्रीमंत राजश्री भाऊसाहेब मजल दरमजल तिकडे जात आहेत. या अंतर आम्हांस नगरावरून किल्ले देवगिरीस[3] रवाना केलें होतें. त्यास कांहीं दिवस अनुसंधान ही बोलत होतों. ते न बोलत तेव्हां चैत्र वद्य द्वितीया सोमवारीं हल्ला करून शहरपन्हा[4] घेतला. त्या उपर मोर्चेबंदी केली. मग दोन रोजानीं फिरोन राजकारण करोन किल्लेदारास पसतीस हजारांची जहागीर व नक्त एक लक्ष पंधरा हजार ऐसे करार करून किल्ल्यावर निशाण चैत्र वद्य अष्टमी मंगळवारीं पहाडावर निशाण चढलें. संतोषाचें वृत्त कळावें. लग्नास यावयाची आज्ञा, तरी श्रीमंतांची आज्ञा जाहलियावर दिरंग नाहीं. सेवेशीं कळावें. सदैव आशीर्वादपत्रीं सांभाळ करावा. विदित होय हे विज्ञापना.

सेवेशीं गंगाधर आपाजी परांजपे साष्टांग नमस्कार. पत्रीं सांभाळ करावा हे विज्ञापना.

नं० १८

श्रीगणपति.

श्रियासह चिरंजीव राजश्री गोविंदपंत यांप्रती कृष्णंभट. आशीर्वाद उपरी येथील कुशल ता॥ वैशाख शुद्ध तृतीया भृगुवार प्रातःकाळ पर्यंत यथास्थित जाणून स्वकुशल लेखन करावें. विशेष. काल गुरुवारीं पुण्याहून चिरंजीव राजश्री आबा व सदाशिवपंत काळे उभयतांचीं पत्रें आलीं त्यांत संतोषाचें वर्तमान कीं, छ० २० साबानीं दौलताबादेवर चिरंजीवांचें निशाण चढलें. फत्ते जाली. महद्यश आलें. पाहिले दिवशीं काळा कोट शहर याजवर हल्ला केली. त्यानीं ही फार मार दिला. लोक जखमी झाले ते कोण कोण तें ठीक कळलें नाहीं. मागाहून लिहिलीं येतील तेव्हां

१ फौज गिलच्यांची. २ नरवर हें शहर माळव्यांत शिंद्याच्या राज्यांत आहे. ३ दौलताबादचें जुनें नांव देवगिरि. ४ शहरपन्हा = शहराचा कोट.

कळेल. परंतु यानीं फार मार सोसून निकड करून काळा कोट शहर घेतलें. घेतांच किल्ल्यावर लोक होते त्यांचीं अवसानें जाऊन बेहिंमत होऊन राजकारण लावून किल्ला दिला. निशाण वरतें चढलें. हल्ल्याच्या समयीं रा॥ धोंडोपंत पटवर्धन नरगुंदकर यांस गोळी लागली. परंतु खैर आहेत. चिरंजीवांस श्रीनें मोठेंसें यश दिलें. हें वर्तमान ऐकून परम संतोष पावलों. त्यांच्या परामर्शाविशीं तुम्हीं लिहिलें होतें, त्यास आज सकाळ माणूस पत्रें देऊन रवाना करावयास सिद्ध केला. तो जाणार तों हें पुण्याकडील वर्तमान लिहिलें आलें. श्रीमंत मुख्य जालनापुरावर आहेत. भाऊ साहेब ब्रह्माणपुरावर आहेत. शहर हस्तगत झालें. पुढें दिल्लीच्या सुमारें जातील असें लिहिलें आलें आहे. यांत घडेल तें खरें. आमचा माणूस पत्रें घेऊन दौलताबादेस गेला आहे. वर्तमान येईल तें लिहून पाठवूं. कळलें पाहिजे. चिरंजीव शहर पन्धाखालीं गेले तेव्हां त्यानीं घरून घोंडा टाकिला तो यानीं ढालेवर सोसून तसेच उभे होते. तो घोंडा पडतां पडतां किंचित्सा पायास लागला. खुशाल आहेत. चिंता न करावी. शहास गुंतले होते परंतु दौलताबाद फत्ते जाली यानें शहांतून सुटले. चिंता परिहार जाली येणें करून समाधान पावलों. कळलें पाहिजे. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

पं० १९

श्रीगणपति.

श्रियासह चिरंजीव राजश्री त्रिंबकपंत यांप्रती कृष्णंभट. आशीर्वाद उपरी येथील कुशल जाणोन स्वकुशल लेखन करीत गेलें पाहिजे. विशेष. दौलताबाद हस्तगत होऊन निशाण किल्ल्यावर चढल्याचें वर्तमान पुण्याहून लिहिलें आलें तें सविस्तर चिरंजीव राजश्री गोविंदपंत यांसीं लिहिलें आहे त्यावरून कळों येईल. अबदाली जयनगरापुढें आला. फौज ऐंशीहजार समागमें आहे. उत्तरेकडे प्रळय जाला आहे. कळावें बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

नं० २०

श्रीगणपति.

पुरवणी. चिरंजीव राजश्री गोविंदपंत यांस आशीर्वाद. उपरी. दिल्लीकडील वर्तमान पुण्याचे पत्रीं लिहिलें आहे जे, राजश्री मल्हारजी होळकर यांजकडील सरदार शेटिबा खराडे व राजश्री गंगोबाचा पुतण्या व आनंद राव रामाजी यादव याचा पुत्र ऐसे तिघे सरदार, सात हजार फौज, ऐसे बेगळेच पुढें यवनाचे तोंडें होते. त्यांजवर यवनानें दिवसा येऊन छापा घातला. तिघेही सरदार मारले व फौज ही अवघी मारली गेली. विरळा कोणी पळोन जाऊन वांचला असला तर असेल. ऐसें वर्तमान लिहिलें आहे. ज्या यवनानें शिंदे यांजवर दंगा केला तोच हा ही मोंगल. श्रीमंत बऱ्हाणपूर घेऊन पुढें जाणार असें ऐकतों. हरिसत्ता प्रमाण! शिंदे होळकर दोन्ही भारी पथके, त्यांचें हें वर्तमान ऐकून असमाधान वाटलें. उपाय काय! बाणी यश ईश्वराधीन! आपणास वर्तमान कळावें म्हणून लिहिलें आहे. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

नं० २१

गोपाळराव गोविंद याचें गोविंद हरीस पत्र—

" श्रीमंत राजश्री भाऊसाहेब चैत्र शुद्ध द्वितीयेस दोन कोस गेले. समागमें राजश्री नाना पुरंदरे व बळवंतराव गणेश मेहंदळे व महिपतराव चिटणीस व नाना फडणीस व हरी शिवराम खासगीवाले वगैरे कारकून मंडळी व फौज दादासाहेबां पैकीं दहाहजार—समशेर बहादर व विठ्ठल शिवदेव विंचूरकर व मानाजी धायगुडे व अंताजी माणकेश्वर व खंडेराव नाईक व सुभानराव माने व महादाजी नाईक निंबाळकर वगैरे मिळून बारा तेरा हजार स्वार, खेरीज देशचे फौजे पैकीं वीसहजार व गाडदी आठहजार व तोफखाना या प्रमाणें सामान आहे. अबदालीनें जयनगराहून वीस कोसांवर वसव (?) शहर होतें तें लुटिलें. गोळी न वाजवितां दिलें यास्तव कतलाम[1] केलें नाहीं. मेवा म्हणोन किल्ला होता तेथें स्वारी गेली.

१ कतलाम=कत्तल.

त्याणीं गोळी वाजविली. चारघटका युद्ध होऊन तें स्थळ घेऊन दोन तीन हजार माणूस कतलाम केलें. अबदालीची फौज पन्नास हजार व नजीबखान रोहिला व आवलेवाले[1] पठाण त्या मुलखींचे जमा झाले आहेत. शिवाय पायदळ पन्नासहजार आहे. या प्रमाणें बातमीचे जासूद सांगतात. होळकर व शिंदे यांच्या फौजा बारा कोसांच्या अंतरानें होत्या. या प्रमाणें सरकारांत श्रीमंतांकडे लिहिलें आलें. म्हणून जिवाजी गोपाळ याणीं लिहिलें आहे."

नं० २२

श्री.

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री गोपाळराव दादा स्वामी गोसावी यांसीं—

पोष्य त्रिंबकराव सदाशिव. कृतानेक नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लेखन केलें पाहिजे. विशेष. आह्मीं तीन चार पत्रें पाठविलीं तीं आपणास पावलीं न पावलीं हें कळत नाहीं. तुमचीं पत्रें तीन पावोन सविस्तर कळोन संतोष जाहला. याजउपर सदैव कुशलोत्तर लिहून आनंदवीत असावें. मागील कर्जाची थोडी बहूत वाट करून देऊन वराता दिल्या व फौजेस रवानगी व रोजमरा व सारें मिळून साठ रुपये दिले म्हणोन विस्तारें लिहिलें तें कळलें. श्रीमंत भाऊस्वामींस[2] पत्र होतें तें प्रविष्ट केलें. उत्तर घेऊन पाठविलें आहे. कृपा उत्तम पूर्ववत् आहे. निष्ठेचा प्रकार सहजांत जेव्हां बोलतों तेव्हां मानतो. वाईट नाहीं. तुमच्या लोकांस ऐवज फार थोडा पावला. बरें. खावंदांची मर्जी! मागील देण्याची वाट जी जाहली ती करून घेतली हें फार उत्तम केलेंत. पुढें पहातच आहेत. इकडील वर्तमान तर श्रीमंत मजल दरमजल खेचिवाडा टाकून पुढें आले. मजल दरमजल याउपरी चमेली उतरून मल्हारबा संनिध जाऊन दोन्नी[3] फौजा व जाट व ही फौज एकगाहा[4] करून मातबर झूज

---

१ आवला हें शहर रोहिलखंडांत असून रोहिल्यांची मुख्य जागा होती. २ निकाल. ३ सदाशिवराव भाऊसाहेबांस. ४ दोनी फौजा शिंदे होळकरांच्या. ५ एकगाहा=एकजीव, एकत्र.

शत्रूशीं करून नामोहरम[1] करावा असें आहे. हें सर्व ज्येष्ठ अखेर निवेडेल[2], होईल वर्तमान तें वरचेवर लेहून पाठवूं. अबदाली अंतर्वेदींत आहे. जहानखान व नजीबखान पंचवीस हजार फौज यमुना उतरून सैरदारांवर[3] आले आहेत. अबदाली पाठी मागून यमुना उतरून येणार ऐसी बातमी आली आहे. माधवसिंग[4] अंतस्थ अबदालीकडे आहेत. बाह्यात्कारें इकडील लक्ष आहे. सुजाउद्दौला श्रीमंतांचे मर्जीत फार करून आहे. अबदालीचीं बोलावणीं बहुत उमेद लावून गेलीं, परंतु (त्याजकडे) येत नाहीं. वरकड लहान मोठे दुचाल्यांत[5] आहेत. तरतें बुडतें पहातात, सर्व ही श्रीमंतांचे प्रतापें उत्तम होईल, शत्रूचें पारिपत्य स्वल्पच कालें श्रीमंत करितील. गुंता पडतोसें नाहीं. अबदाली आपल्या देशास जाण्यास सिद्ध आहे, परंतु नजीबखान जाऊं देत नाहीं, नजीबखानाचीं राजकारणें जाटाकडे व सरदारांकडे आहेत. परंतु जरब यावी यास्तव राजकारण करीत नाहींत. पुढें होईल तें लेहून पाठवूं. सविस्तर तात्यांचें[6] पत्रीं पूर्वी एकदां लिहिलें होतें. आपणास कळलेंच असेल, रवाना ज्येष्ठ शुद्ध अष्टमी मु॥ कलेधार प्रांत खेचीवाडा. लोभ असों दीजे हे विनंती.

नं० २३

श्रीगणराज.

रा॥ बैंगाजीपंत व गुंडोपंत स्वामी गोसावी यांस—

विनंती उपरी. आम्हीं अक्कलकोटास आले उपर पत्रें पुण्यास पाठविलीं आहेत. त्यांचीं उत्तरें येतांच आम्हीं पुण्यास जातों. दरबारचा कारभार विलक्षण फारच आहे. ती॥ रा॥ दादानीं सावनूर प्रांतची मामलत अगदीं टाकून दिली. नित्य किरकीर दरबारची पुरवेना. ऐसा प्रसंग दर-

---

१ नामोहरम=पराजित. २ घडेल. ३ शिंदे होळकरांवर. ४ माधवसिंग हा जयपूरचा राजा. ५ दुचाला=दोन चाली, दुटप्पी वागणूक. ६ तात्यांचे—गोविंदराव तात्या खासगीवाले यांचे ? ७ नीलकंठराबानें पंचमहालांत मामलत केली होती, तेथील हे दोघे कमावीसदार. ८ या वेळीं कारभार रघुनाथराव दादासाहेबांकडे होता.

बारचा. बरें. ईश्वर समर्थ आहे. श्रीमंत राजश्री भाऊसाहेबीं दिल्ली घेतली. चारहजार फौज तेथें होती ती बुडविली. अविंध[1] यमुना पार आहे. परंतु त्यांत धमक आहे. बाजदबरसाद लढाई होत्ये यांत संदेह नाहीं. महागाई फार आहे. पुण्यांत नालबंदीची सावकाशी आहे. दरबारचा कारभार एक प्रकारचा आहे. यास्तव आपलें आपण सावध असावें. यास्तव खर्च वेंच बहुत सावधपणें करीत जावा. बहुत काय लिहिणें हे विनंती.

पै॥ छ० २ रबिलावल.

इ० स० १७६१

अबदाली भाऊसाहेबांस पानपतांत कोंडितो.
नानासाहेब पेशवे कुमकेस जातात.
दादासाहेबांची निजामअल्लीवर रवानगी.

पावसाळा संपल्यावर अबदाली यमुना उतरून आला. भाऊसाहेबांनीं सारें लष्कर पानपतचे मुक्कामीं उतरविलें. अबदाली ही समीप येऊन उतरला. दोहीं पक्षीं मोठमोठीं युद्धें झालीं. भाऊसाहेबांच्या फौजेंतून पुण्यास पत्रें व बातम्या येत, त्यांजवरून त्या लष्कराची आतां धडगत दिसत नाहीं असें समजून नानासाहेब तीस चाळीस हजार फौजेसह उत्तरेस जावयास निघाले. निजामअल्ली फौज जमाकरून दंगा करण्याचे बेतांत होता. त्यास जरबेंत ठेवण्यासाठीं श्रीमंतानीं दादासाहेबांची मोंगलाच्या रोखावर रवानगी केली. हा हेतु अंतस्थ होता. बाह्यात्कारें तर हिंदुस्थानचे स्वारीस बरोबर येण्याकरितां निजामअल्लीशीं बोलून त्यास घेऊन यावें म्हणून दादासाहेब निघाले होते. त्यांच्या फौजेस जाऊन मिळण्याविषयीं पेशव्यांची गोपाळरावास ताकीद झाली असतां ही तो दादासाहेबांकडे गेला नाहीं. पण पुढें नानासाहेब उत्तरेस जावयास निघाले तेव्हां तो त्यांबरोबर तिकडे गेला.

---

१ अविंध=अबदाली. २ पावसाळ्यानंतर.

उत्तरेकडील वर्तमानें निजामअल्लीच्या ही कानीं येत होतींच. दा. दासाहेब समीप आले तेव्हां तो त्यांबरोबर हिंदुस्थानांत जाण्याचें बोलणें मुळींच सोडून देऊन उडवाउडवीच्या गोष्टी सांगूं लागला. तेव्हां दादासाहेब क्रुद्ध होऊन निजामअल्लीवर चालून जाण्यास तयार झाले. परंतु त्यानें तोंड चुकवून लढाई करण्याचें टाळिलें.

नानासाहेब नर्मदा उतरून गेले. त्यांची अघाडी माळव्यांत सुरंज व भेलसें येथपर्यंत पोंचली होती. तों पानपतचें वर्तमान आलें. भाऊसाहेब व विश्वासराव व बहुतेक फौज त्या घोर युद्धांत नाश पावल्याची बातमी ऐकून पेशव्यांच्या जिवास धक्का बसला. ते परत निघून हळूहळू पुण्यास आले व तेथें जून महिन्याच्या अखेरीस मरण पावले.

दादासाहेब निजामअल्लीचा रोंख सोडून घाई घाईनें पुण्यास आले. तिकडे त्यानें सैन्याची सिद्धता करून उदगीरच्या लढाईंत गेलेला मुलूख परत मिळविण्याचा निश्चय केला. त्यानें जाधवराव व उदाजी चव्हाण व लाला ब्रिजदास यांस पेशव्यांच्या मुलखावर स्वारीस पाठविलें. त्यांनीं मलिखेड सरकार, अळंद, गुंजोटी, चितापूर वगैरे सरहद्दीवरील महाल व अक्कलकोट परगणा हे ही लुटून उद्वस्त केले. मोंगल बेदरास लढाईची तयारी करीत आहे हें ऐकून दादासाहेबानीं ही आपल्या सर्व सरदारांस फौज जमविण्याच्या ताकिदी केल्या. पावसाळा संपतांच आपली फौज तयार करून मोंगल पुण्यावर चालून येऊं लागला. तेव्हां त्याच्या मुकाबल्यास दादासाहेब व माधवराव पेशवे फौज घेऊन पुण्याहून निघाले.

नं० २४

श्री.

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेशीं—

विनंती. सेवक गोपाळराव गोविंद कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ० माहे रबिलावल पर्यंत सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. स्वामींचें आज्ञा पत्र सादर जाहलें त्यांत "सांप्रत तुम्हीं दरबारास येत नाहीं. वाजवी ममतेनें निखालस[1] मी सांगत असतां वांकडे

१ खात्रीपूर्वक.

कुतर्कच मनांत आणितां हें योग्य नाहीं. दौलताबादेचें यश तुम्हांस यावें ह्मणोन रुपये[1] जहागीर दिली तें ध्यानांत न आणितां, सरकारांत पैक्याची ओढ यास्तव ऐवज उशिरानें दिला, दहा पांच हजार तोडमोड करविली, तेवढेंच मनांत आणून त्या दिवसापासून आज पावेतों दोन दिवस नीट तर आठ दिवस उदास असे असतां, हें उत्तम नाहीं. सर्व मध्यस्थ तुमचे मध्यस्थींत बोलावयास भितात. तुम्हीं पूर्वी तैनातें मातबर केली तेव्हां बोलिलां कीं, " जशी मर्जी असेल तसें वर्तेन; बळवंत, सखाराम, यांपेक्षां अधिक वर्तेन; आपलें वेगळें, खावंदांचें वेगळें, हे शिलेदारी मनांत आणणार नाहीं. " ते वेळची चिठी लांब तुमचे हातची जतन करून ठेविली आहे. आतां व्यर्थ रुसवा वाढवीत जातां, कुतर्क घेतां, हें कामाचें नाहीं. आम्हांजवळ भाऊनीं सरदार ठेविले त्यांत मातबर तुम्हीं. मोंगलाचा रोंख वांकडा. तुम्हीं मर्जी राखून आपली बाढे मेहनत मर्दुमीची अधिक करावी; हैदरखानानें तुमचें स्वरूप* नेलें आहे तें एखादे कामावर मिळवावें हें मनांत

---

१ दौलताबादेच्या किल्लेदारानें किल्ला दिला त्यावेळीं पेशव्यानीं त्यास कांहीं द्रव्य व जहागीर द्यावयाचें कबूल केलें होतें व या प्रकरणांत गोपाळरावाचें वचन किल्लेदारानें घेतलें होतें. त्या ठरावा प्रमाणें पेशवे वागले नाहींत व त्यामुळें आपल्या वचनास बट्टा लागला ह्मणून गोपाळराव रुसला होता. २ तुम्हांस आह्मीं मातबर तैनात करून दिली त्यावेळीं तुह्मीं बोललां होतां कीं, इ० इ० असा या लिहिण्याचा अर्थ. पेशवे सरकारांतून गोपाळराव गोविंद व गोविंद हरी यांस सालिना कापड सुद्धां ४०००० रुपयांची तैनात होती असें आम्हांस उपलब्ध झालेल्या सु०स० ११६९ च्या तैनात जाबत्यावरून उघड होतें. परशुरामभाऊची १०००० होती. ३ बळवंतराव मेहंदळे. ४ सखारामबापू. ५ भाऊसाहेबानीं पानपतचे स्वारीस जाते वेळीं. ६ बाढे=मोठी. * स्वरूप नेलें आहे. = लौकिकास बट्टा आणिला आहे. ७ मागें लिहिल्या प्रमाणें इ० स० १७५७ त जेव्हां पेशव्यानीं श्रीरंगपट्टणावर स्वारी केली तेव्हां तेथील राजाचा दिवाण नंदराज यानें ३२ लक्ष रुपये खंडणी देण्याचें कबूल केलें व त्यापैकीं कांहीं ऐवज रोख देऊन बाकी रकमेच्या फेडी करितां चौदा महाल पेशव्यां कडे लावून दिले. या प्रमाणें होऊन श्रीमंतांची स्वारी परत फिरल्यावर

आणीत जा. कुतर्क वांकडे घेणें, थोड्केच गोष्टी साठीं वांकडें घेऊं नका. लेंकरादाखल जाणून वारंवार एकांतीं सांगतों, या उपर न ऐकिलें तर मजकडे बोल नाहीं. " ह्मणोन स्वामींचें आज्ञा पत्र सादर झालें. तेथें आज्ञा जे, ' दरबारास न येतां सदैव उदासीनपणा दाखवितां हें उत्तम नाहीं ' ह्मणोन—त्यास बारगीर पेशा, जे वेळेस कांहीं काम असतें ते वेळेस येतों, अगर स्वामी कृपा करून स्मरण करितील ते वेळेस हजर होतच असतों. असें असतां उदासीन स्वामी म्हणतात, स्वामी सर्वज्ञाण आहेत. उदासीन ठेवणें अगर कृपा करून सेवकाचें समाधान राखणें हीं दोन्ही स्वामींपाशींच आहेत. त्यांत कांहीं न्यून जाहलें असेल त्याजवरून स्वामींचें स्वामींस कळत असेल ! दौलताबादेचा मजकूर तर, यश स्वामींचें. धणी यशस्वी, सेवक एकनिष्ठ, हीं दोन्ही एकत्र जाहलीं असतां अपेश कोठून येईल ? 'वोढगस्ती करितां तेथील देण्याघेण्याची तोडजोड करविली यामुळें उदासीनता धरिली '—त्यास दौलताबादेचें यश सेवकास यावें या अगत्यवादास्तव स्वामीनीं किल्लेदार वगैरे यांस जहागिरी दिली व रुपये दिले; एवढें

नुकताच उदयास येऊं लागलेला म्हैसूरच्या राजाचा सरदार हैदरखान याच्या चिथावणीवरून नंदराजानें त्या चौदा महालांतून मराठ्यांस हांकून लाविलें. परंतु पावसाळा संपल्याबरोबर पेशव्यानीं गोपाळराव पटवर्धन यास फौजेसह पुनः म्हैसुरावर रवाना केलें. त्यानें ते महाल पुनः ताब्यांत घेतले व चेनापट्टण काबीज करून बेंगरूळास वेढा घातला. इतक्यांत म्हैसूरकरांची फौज घेऊन हैदरअलीं लढाईस आला. तीन महिने लढाई झाल्यावर तह झाला त्यांत असें ठरलें कीं, मागील बाकी व चालूसालची खंडणी मिळून बत्तीस लक्ष रुपये घेऊन त्या चौदा महालांवरचा हक्क मराठ्यानीं सोडावा. या तहा प्रमाणें रोख रक्कम बत्तीस लक्षांची घेऊन गोपाळराव तेथून निघून अर्काटाकडे स्वारीस गेला. हा हैदरअलीशीं गोपाळरावानें जो तह केला तो पेशव्यांस आवडला नाहीं. युद्ध सुरू असतां हैदरखानानें एकदां छापा घातला व त्या दहशतीनें गोपाळरावानें असा नुकसानीचा तह करून घेतला, असें वरील पत्रावरून पेशव्यांचें ह्मणणें असावेंसें दिसतें. ग्रांटडफनें या स्वारीचें वर्णन कर्नल विल्कच्या इतिहासाच्या आधारें केलें आहे, त्यांत गोपाळरावाचें नांव गोपाळहरी असें लिहिलें आहे तें चूक आहे.

इहसीन सेवकावर असतां दहा पांच हजारां करितां उदासीन कशास असावें ! परंतु खास इमान प्रमाण दिलें त्यांत अंतर आलियावर नुकसान कोणाचें ? बुढें आम्हांस कोण बघेल ! हें स्वामींनीं ध्यानांत आणावें. दौलताबादेचें यश आम्हांस यावें म्हणूनच स्वामींनीं रुपये जहागीर दिली, सरकार किफायती करितां न दिलें, हें ही मोठें इहसान सेवकावर. परंतु अशेरी न आली, त्यास किती खटपट लागली, हें स्वामींनीं ध्यानांत आणावें. ' मध्यस्थ बोलावयास भितात ' — त्यास मजला म्यावें अशी माझी वर्तणूक नाहीं. ' मातबर तैनात केली त्यावेळेस बळवंत, सखाराम, यां प्रमाणें वर्तावें असा करार होता ' म्हणोन आज्ञा—त्यास सेवकापासूनच अंतर ध्यानांत आलें ते समयीं त्या करारास सेवकापासूनच अंतर पडलें, यास्तव स्वकृत दोष मानितों. दुसरें, उभयतां निकटवर्ती सेवक आहेत त्यांपासून अंतर पदोपदीं पडतच आहे. परंतु निकटवर्ती आहेत ते सांभाळून नेतात. आम्हां सारखे आहेत ते त्या गिरेफदारींत मग्न असतात. श्रीमंत राजश्री ' भाऊसाहेब उत्तरेकडे गेले तेव्हां मातबर सरदार आम्हांजवळ तुम्हांस ठेविलें ' म्हणोन आज्ञा—त्यास ज्यास स्वामी मातबर करितील तो मातबर ! ज्यास लहान करितील तो लहान ! पादशहा सारिखे लहान करून आपले पदरचे त्यांस त्यापेक्षां मातबर केलें, स्वामींस लहानाचा थोर, थोराचा लहान करण्यास क्षण लागणार नाहीं ! ' हैदरखानानें स्वरूप नेलें आहे तें एखादे कार्यावर मेळवावें ' म्हणोन आज्ञा—त्यास त्याणें चोरीनें येऊन छापा घातला म्हणोन आमचें स्वरूप नेलें असें नाहीं. ठाणीं सोडिलीं तीं कांहीं छापा पडला म्हणून सोडिलीं असें नाहीं. चार रुपये उणे घेतले तरी एकदांच सारी निशा[3] करून घेणें, तेव्हां चार रुपये उणे ही घ्यावे लागले, सनसमानांत अबिध* पंचवीस लक्षांची जहागीर देत होता. पुढें

---

१ इहसान=अपेक्ष, २ अशेरी=अशीरगड. ३ गिरफदारी=चिंता. ४ निशा=सावकाराची ऐवज पोंचताकरून देण्याविषयीं जामीनकी. * अबिध=मोंगल, ५ सनसमान खमसैन मय्या व अलफ. या वर्षी मोंगल तुम्हांस पुण्यांत पंचवीस लक्षांची जहागीर देत होता ती सोडून एवढी मोठी स्वारी करून ही शेवटीं बेविस लक्षांची जहागीर तुम्हांस घ्यावी लागली,

शिरें बमेरे सुद्धां बेविसांची घ्यावी लागली. राज्यकारभार आहे; दोन अधिक उणे घ्यावेच लागतात. परंतु जबरदस्ती पोंचल्या शिवाय रुपये कसे दिले हें स्वामीनीं मनास आणावें. 'एकांतीं लोकांतीं सांगतों. तुम्हीं ऐकत नाहीं. आपणावर बोल नाहीं' ह्मणोन आज्ञा—ऐशियास जीवेंजाम्यानिशीं[2] लेंकरा बाळांनिशीं स्वामींच्या चरणाजवळच आहें. स्वामींच्या चित्तांत हरएक गोष्ट येईल तेव्हां मजविशीं कोणी विनंती करणार आहे नाहीं हें स्वामींस विदितच आहे. जैशी मर्जी असेल तैशी आज्ञा जाहलिया सिद्ध[3] आहें. सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

नं० २९

एका बखरीचे फुटकळ बंद तीन सांपडले त्यांतील सारांश—

" गोपाळरावानें दौलताबाद घेतली तेव्हां श्रीमंत टोंक्यांस होते. लगेच कूच करून दौलताबादेस गेले. किल्ला पाहून परम संतोष पावले. एवढें दुर्घट स्थळ घेतलें ह्मणून गोपाळरावाची फार तारीफ केली. उधोवीरेश्वर यास तेथें किल्लेदार नेमिलें. सदाशिवराव भाऊसाहेब हिंदुस्थानांत खेचीवाड्यापर्यंत गेले. तेथें कोणी मवासी[4] होता त्याचें पारिपत्य करून दिल्लीस गेले. तेथें नवीन तक्त तयार करून विश्वाससरायास त्याजवर बसवून तमाम लोकांकडून नजरा करविल्या. पुढें हिंदुस्थानांतील महालोमहालींच्या वसुलातीचा ऐवज भाऊसाहेब आपणाकडे मागून घेऊं लागले. तेव्हां सखारामबापू श्रीमंत नानासाहेबांस बोलले कीं, भाऊसाहेबानीं तिकडील वसूल घेतला तर त्यांचें बळ फार वाढेल. या करितां त्यांजकडे ऐवज न

असा लिहिणाराचा भाव.

१ हैदरखानास जर आम्हीं जेर केलें नसतें तर तो आम्हांस खंडणी कां देता ? असा लिहिणाराचा अभिप्राय. २ जीवजाम्यानिशीं = प्राण व शरीर यां सह. ३ ज्यावेळीं तुमच्या मनांत मला शिक्षा करावयाची इच्छा होईल त्यावेळीं खुशाल करावी, आपली कांहीं हरकत नाहीं. असा या लिहिण्याचा अर्थ. ४ मवासी=लुटारू, बंडखोर.

देण्याविशीं मामलेदारांस ताकिदी कराव्या. त्यावरून श्रीमंतांनीं मामलेदारांस त्या प्रमाणें ताकिदी केल्या."

नं० २६

श्रीगणराज

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री गुंडोपंत व बगाजीपंत स्वामी गोसावी यांस—

सेवक नीलकंठराव विनंती उपरी येथील वर्तमान तागायत छ० १ जमादिलाखर पावेतों तुकनीबाव (?) परगणे पडदूर (?) यथास्थित असे. विशेष. या नंतर तुह्मीं एक दोन पत्रें पाठविलीं तीं पावलीं. सविस्तर वर्तमान कळोन आलें. मोंगेल त्या प्रांतें आला हें सर्व वर्तमान आम्हीं श्रीमंतांच्या कानावर घातलें, व सालगुदस्तांचें वर्तमान सर्व निवेदन केलें. लष्करांत येऊन एक महिना जाहला. सर्व मजकूर त्यांस सांगितला. श्रीमंतानीं ही ध्यानास आणिला. त्यास आम्हांस तूर्त श्रीमंत राजश्री रघुनाथपंत दादांकडे रवाना केलें. ते निजामअल्लीस आणावयास आले आहेत. आह्मीं ही निघोन आजच या मुक्कामास आलों. या उपरी तिकडे जातों. श्रीमंत मजल दरमजल बऱ्हाणपुरास जातात. तों पावेतों दादा ही निजामअल्लीस घेऊन जाणार. असा मनसबा आहे. होतां होईल तें पहावें. तुम्हांस पेशजी एक दोन पत्रीं सविस्तर लिहिलें आहे त्याजवरून कळलेंच असेल. मोंगलानें तिकडे दंगा फार केला, त्यास आज पावेतों निघून गेलाच असेल. या उपरी पट्टी करून ऐवज उगवणें. श्रीमंत बाबांस देव आज्ञा जाहली. त्यानंतर बाबूजीनाईक अक्कलकोटास जाऊन सर्व वित्त विषय होता तितका अगदीं घेऊन शहाजी भोंसल्यांस घेऊन येथें आले. श्रीमंतांची भेट जाहली. तीस हजार मोहरा व जवाहीर अगदीं दिलें. वरकड सर्व विप्रमंडळी आली आहे. राजश्री गोपाळपंत आले आहेत. पुढें

---

१ निजामअल्लीचा धाकटा भाऊ मीरमोंगल व त्याचा दिवाण मीर आबास हे मलिखेड सरकारांत शिरून दंगा करीत होते, त्यांस उद्देशून येथें 'मोंगल' शब्द घातला आहे. २ फत्तेसिंगबाबा अक्कलकोटकर.

काय होतें तें पहावें. आम्हीं गोपाळपंतास सांगितलें आहे कीं, तुम्हीं अवसान न सोडणें. बऱ्हाणपूर पावेतों जाणें. पुढें जाऊं लागलिया भलतें निमित्त करून माघारें येणें. तसेंच जोशीबाबांस ही सांगितलें, वरकडांचे सरंजाम सर्व जप्त केले आहेत. पुढें कोणास काय देतात पहावें. प्रस्तुत सर्व मंडळी बरोबर आहे, दिल्लीकडे जावयाचा निश्चय आहे. श्रीमंत राजश्री भाऊसाहेबांवर येऊन बेतली आहे. त्यांच्या कुमकेस हे ही जातात. पठाणांचें[1] व त्यांचें नित्य झूज होतें. अद्याप कोणी कोणास हटत नाहीं. ईश्वर कृपेनें आमच्या फौजेस यश येईलच. चिंता नाहीं. तुम्हीं तिकडे बंदोबस्त करून ऐवज लवकर उगवे तो अर्थ करणें. व्यंकटराव तो माघारा गेलाच असेल. मोंगल[2] गेलियाचें वर्तमान सर्व लिहिणें. मोंगल पंचमहालांत न यावा येविशीं श्रीमंतानीं कागदो पत्रीं बंदोबस्त केलाच आहे. बहुत करून घाटेस न जावा ऐसें आहे. श्रीमंत राजश्री भाऊसाहेबांची व मोंगलांची गांठ पडलियावर बीस दिवस नित्य झूज जाहलियाचें वर्तमान आलें आहे. अद्याप दोन ही समानच आहेत. ईश्वर यश कोणास देतो पहावें! भाऊसाहेबांची हिंमत मोठी जे, साठ कोसांवर यांची फौज उभी राहत नव्हती ती नेऊन झुजावयास लाविली आहे! ईश्वर त्यांस यश देईलच. कांहीं चिंता नाहीं. तुम्हीं या उपरी पत्र पाठवाल तें दादासाहेबांचे लष्करास निर्मळचे सुमारें पाठविणें. हे विनंती.

नं० २७

श्री,

राजश्री गोपाळराव गोविंद यांसीं—

नमस्कार. तुम्हीं शेवट पावेतों खावंदांशीं बोढून व्यर्थ सरदारी तोडितां! पागा लोक जुने घरीं बसवून करितां हें उत्तम नाहीं. इतका दुराग्रह तुझा लोकांस नसावा. अद्याप कांहीं गेलें नाहीं. आतां तुमचें पत्र आलिया लाख दीड़लाख रुपये मोघम देऊं. उरले चिरंजीव दादाकडे देववूं. जाणें. तुमचे मायेचे लोक तुझां समागमें येतील. जाऊन चिरंजीवांची कृपा

१ पठाण=गिलचे. २ मोंगल=गिलचे. ३ पेशव्यांची.

संपादून घेणें. लटकाच वसवसा[1] सखारामपंताचा मानिता ! तिळमात्र तो तुम्हाशीं आकस करणार नाहीं. [2]चिरंजीव तो बहूत कृपा करितील. व्यर्थ सरदारी न तोडणें. तुम्हांस जें करितां तें बरोबर वाटतें परंतु आम्हांस वाईट वाटतें. तुम्हीं म्हणाल कीं, खावंदानींच आमची आड कां न चालवावी ? त्यास चिरंजीव दादानीं भाऊची अमर्यादा केली तरी आम्हीं शिक्षा केलीच पाहिजे. कां कीं, पुढें बहुत दिवस मर्यादा कैद चालली पाहिजे. तसेंच तुम्हांवर मनापासून कृपा वर्धमान होऊन तुम्हांजवळून मोठीं कामें घेतलीं पाहिजेत. यास्तव तुम्हांस मर्जी प्रमाणें वर्तविणें व तुम्हीं वर्तणें हेंच श्रेयस्कर आहे. तिळमात्र या गोष्टी खेरीज तुमचे ठायीं अवकृपेचा भाव नाहीं. खामखां कंबर बांधून जे लोक येतील त्यांनिशीं चिरंजीवांकडे जाणें. इतकें निखालसतेनें लिहिलें असतां न करावें असें नाहीं. विस्तारें लिहिणें नलगे. छ० ११ रबिलाखर. ×

नं० २८

श्रीगणराज.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री बगाजीपंत व गुंडोपंत स्वामी गोसावी यांस–

सेवक नीलकंठराव त्रिंबक सा॥ नमस्कार. विनंती उपरी. येथील कुशल ता॥ छ० १७ जमादिलाखर मुक्काम पाटवलकोड जाणून स्वकीय लेखन करीत जाणें. विशेष. आम्हीं श्रीमंत राजश्री नानासाहेबांचे लष्करांतून

---

१ वसवसा = अविश्वास, भय. २ यावरून रघुनाथराव दादा व सखारामबापू यांशीं गोपाळरावाची चुरस या पूर्वीच वाढलेली होती असें दिसतें. ही चुरस पुढील पेशव्याच्या कारकीर्दीत साऱ्या राज्यास कशी भोवली हें सर्वत्र प्रसिद्धच आहे ! या वेळीं ही पेशव्यानीं इतकें सक्तीनें लिहिलें असतां गोपाळराव रघुनाथरावदादांकडे गेला नाहीं तो नाहींच ! × हें पत्र नानासाहेब पेशव्यानीं रागें भरून लिहिलें आहे. यांत नेहमींच्या संप्रदायानुरूप पत्राच्या प्रारंभीं व शेवटीं 'विनंती' हीं अक्षरें यावयाचीं तीं आलेलीं नाहींत हें वाचकानीं ध्यानांत आणावें.

निघालों. तदनंतर पत्रें तुह्माकडे पाठविलींच आहेत. नांदेडचे मुक्कामीं श्रीमंत राजश्री दादासाहेबांचे लष्करास आलों. भेट जाहली. तदनंतर लष्करें मजल दरमजल येथें आलीं. निजामअल्ली भेटीस येणार हें राजकारण होतें याजमुळें आले. तो हिंदुस्थानचे वर्तमानाची वाट पाहों लागला. मग यानीं जाऊन गांठ घालावयाचा निश्चय करून आले. येथून मोंगल पांच गांवांवर आहे. आजच आम्हीं सडे होणार. कलह होईलसा दिसतो. हें निवडलेवर फौज तिकडे येईल. तों पावेतों येत नाहीं. आम्हीं निसबत वगैरे मिळून तीन चारशें आहों. हिंदुस्थानचें वर्तमान तर श्रीमंत भाऊसाहेबांची व आबिंधाची गांठ पडून अडीच महिने जाहले. दोन चार झुजें मातबर जाहलीं. दोनी फौजा कायमच आहेत. मातबर ह्मणावयास बळवंतराव गणपत ठार झाला. श्रीमंत राजश्री नानासाहेब नर्मदातीरास गेले. मजल दरमजल पुढें जातात. समागमें फौज पंचवीस तीस हजार आहे. तीर्थस्वरूप राजश्री दादा व सर्व मंडळी तिकडे गेली. आम्हीं एकटे येथें उरलों. बरें! ईश्वर समर्थ आहे. येथें ही कलहाचा प्रारंभ झाला आहे. सर्व ईश्वराचे स्वाधीन आहे. बहुत काय लिहिणें हे विनंती.

नं० २९

श्रीगणराज.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री बगाजीपंत व गुंडोपंत स्वामी गोसावी यांस-

सेवक नीलकंठराव त्रिंबक साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल तागायत छ० २१ जमादिलाखर. मुक्काम आगडी रायचूर जाणून स्वकीय लेखन करीत जावें. विशेष. इंदूरचे मुक्कामाहून तुम्हांस पत्र लिहिलेंच आहे. त्यावर गुरुवारीं येथेंच मुक्काम झाला. शुक्रवारीं या मुक्कामास आलों. आज गुडमटकलाजवळ मुक्काम होणार. श्रीमंत राजश्री दादासाहेब काल तांडूरचे आंबराईत राहिले. आज घांट चढोन येणार. राजश्री महिपतराव कवडे, आम्हीं, राघोबापूजी वगैरे मिळून सात आठ हजार फौज पुढें आली आहे. उदईक गुडमटकलाजवळ येतों. बळच धरिलें तर तोफा लावून

हल्ला करून घेणार. लोभ करावा हे विनंती.[1]

नं० ३०

श्रीगणराज.

पुरवणी. राजश्री बगाजीपंत व गुंडोपंत स्वामी गोसावी यांस– विनंती उपरी. आम्हीं श्रीमंत राजश्री दादासाहेबांकडे यावया कारण निजामअल्लीची भेट जाहलियावर राजश्री सखारामपंत बापू व मल्हारराव रास्ते यानीं दहा हजार फौज व तोफा असें घेऊन मलिखेड प्रांतीं यावें; तेथील नीट करून विजापुर प्रांतीं यावें; तेथील चव्हाण वगैरे निर्मूळ करून रास्ते यानीं कर्नाटकांत जावें, सखारामपंतीं देशीं रहावें, या प्रमाणें मनसबा श्रीमंतानीं केला आहे. आम्हांस ही या प्रमाणें सांगून रवाना केलें. निजामअल्लीची भेट होतांच फौजा त्या प्रांतीं येतात. तुमचे मनोदयानुरूपच होत आहे. आह्मां समागमें तूर्त सोनीकर सवाशें दिले त्यांची नालबंदी दिली. गोपाळपंतास छप्पन स्वारांची नालबंदी दिली. ते ही आमचे निसबतीस दिले. आणखी पांच सातशें स्वार निसबतीस द्यावयाचें पत्र श्रीमंत दादा साहेबांस दिलें आहे. फौज तिकडे येणार हें बाहेर कोणास कळूं न द्यावें. दरबारीं कांहीं ताल नाहीं. श्रीमंतांच्या बुद्धीस बहुत विपर्यास ! कोणी राजी नाहीं. शरीर फारच अशक्त जाहलें आहे. असा सर्व ही मजकूर विपरीत आहे. लग्न ही केलें. पैठणची वाखरे देशस्थ यांची मुलगी केली. ताल नाहीं. लिहितां पुरवत नाहीं. कळावें लोभ करावा हे विनंती.

नं० ३१

कृष्णंभट यांचें गोविंद हरीस पत्र पौष महिन्यांत लिहिलेलें–

" चिरंजीव मंडळीकडे जासूद जोडी पाठविली होती ती त्यांस लष्करांत भोपाळास पोंचली. ते जासूद सुरंजभेलशांपर्यंत लष्करा बराबर

---

१ या पत्रांत आलेलीं इंदूर, तांडूर, गुडमटकल हीं शहरें मोंगलाईंत प्रसिद्ध आहेत.

गेले होते. तेथून चिरंजीवानीं पत्रें रवाना केलीं. काळ विपरीत आला आहे. परिणाम लागणें कठीण आहे. श्रीमंत रघुनाथराव फौजे सुद्धां विजापुरावर आहेत. निजामअल्ली आवशाचे मुक्कामीं आहे. त्याचा रोंख कसा आहे कळत नाहीं. परंतु बिघाड म्हणून कोणी कोणी बोलतात. बिघाड जाहल्या परिणाम कठीण आहे ! ''

नं० ३२

पद्माकर जोशी संगमेश्वरकर याचें गोविंद हरीस पत्र. चैत्र शुद्ध ३ चें—

'' यवनाकडून लाला ब्रिजदास नामें सरदार पांच हजार फौज व कांहीं गाडदी घेऊन श्रीमंतांचे अळंद, गुंजोटी वगैरे महालांत स्वारी करून मनु मानेल तशी खंडणी करीत अक्कलकोट परगण्यांत आला. तेथें देशमुखाचे बोरगांवास वेढा घातला. गांवास आग लाविली. त्रिंबकराव देशमुख व नरसो रायाजी नांवाचा लहानसा सरदार हे तेथें होते त्यांस धरिलें. चाळीस हजार खंडणी केली. पांच सातशें मनुष्य जळून मेलें. इतक्यांत श्रीमंतानीं पंचमहालाच्या बंदोबस्ता करितां आबाजी नाईक पांच हजार फौजेनिशीं पाठविले. तेव्हां लाला ब्रिजदास तुळजापुराकडे गेला. त्या मागें नाइकानीं दोन हजार फौज लाविली आहे. परंतु पारिपत्य होतां दिसत नाहीं. ब्रिजदास आवशाचे किल्ल्याचे आसऱ्यास गेला. सारांश प्रांत लुटला गेला. श्रीमंतानीं पंचमहालांतील परगणे नीलकंठरायांचे स्वाधीन केले परंतु देशमुखाचा बंदोबस्त न केला. आतां देशमुख चार हजार प्यादा व पांचशें स्वार बळावून राहिला आहे. नीलकंठराव लोकापल्लींत आहेत. त्यांजवळ ही हजार स्वार, चारशें गाडदी व हजार प्यादा आहे. देशमुखाकडून विवेकाची बोली लागली आहे. यांस कळेल तैसा निकाल काढणें प्राप्त आहे. अक्कलकोटाहून कोन्हेरराव ही चार पांचशें सामान घेऊन गेले आहेत. नागोराम यांची ही कांहीं कुमक गेली आहे. गुडमटकल वगैरे परगण्यांतील देशमुखानीं धुंदी आरंभिली आहे. शिबंदी खालीं मामलेदार बुडाले. वसुलाच्या पैशाचें दर्शन नाहीं. नित्य युद्धाशीं गांठ. निजामअल्ली

बेदरास दहा बारा हजार फौज व पांच हजार गाडदी व मातबर तोफखाना घेऊन आला आहे. निंबाळकरांचें पारिपत्य करणार. सारांश श्रीमंतांचें उत्तरेकडील विस्कळीत जालें या करितां राज्यांत जिकडे तिकडे धुंद जाहली आहे."

पानपतच्या पराजयामुळें व पेशव्यांच्या मरणामुळें झालेली अंदाधुंदी.

नं० ३३

श्रीगणराज.

आशीर्वाद. उपरी. मुख्य यजमान परधामास गेले. भाऊसाहेब ही नाहींत. श्रीमंत राजश्री दादासाहेब याणीं फौजेचा गाहा सेचंतर करून कोट किल्ले जागजागां पत्रें पाठवावीं. दक्षिणेस आतां पासून[1] तरतूद करून फौज पाठवावी. दर वर्षास पहिली इकडून फौज जात होती तेव्हां लोकांत दबाव होता. ते यंदां फौज राहिली आहे, यामुळें काटेक[2] शेर होतील. राजश्री हरीपंत व विसाजीपंत यांस बोलावणें आलें होतें त्यास आतां अमावास्या जाहलिया वर येतील. सर्वांनीं जें आजवर करामत केली त्याचें नवल नाहीं. आतां मोडली बाजू सांवरली तरच कर्तृत्व सर्वांचें! राजश्री बाबूराव[3] आणवावे. गडकिल्ले मजबुदीनें राखावे. सिंहगडची, पुण्याची खबरदारी करावी. आळस न करावा, तुम्हीं ही सांगावें कळेल तसें. चुकों नये. सर्व मंडळी शहाणे आहेत तितक्यानीं लोभ धरूं नये. एकवेळ नाईकीस[4] आव घालावा. राजा नवा करणार तो करावा तेव्हां एकंदर बहुत विचारें करावें. नाहीं तर नवा राजा जाहला ह्मणजे त्या भोंवती आणखी चौघे मि-

---

१ एकीकरण. २ स्वतंत्र. ३ काटक=कर्नाटकचे लोक. ४ बाबूराव=बाबूजीनाईक. ५ नाइकीस आव घालावा=पुढारी होण्याची हिंमत धरावी. ६ यावरून ताराबाई मरतांच रामराजास गादीवरून काढून दुसरा राजा करण्याची मसलत घाटत होती असें होतें.

ळून फितवाफांदडा करितील. आपण होऊन कलह केला ऐसें होईल. राजश्री त्रिंबकरावं व राजश्री नानापुरंदरे ऐसे सर्वांनीं मिळोन एकचित्त असावें. जशी वर्षास दक्षणा देतात तशी द्यावी. चहूंकडे चिठ्या पाठवाव्या कीं, वर्षा प्रमाणें येणें. ऐसें आहे. यांत थोर कर्ते आहेत. आमची बुद्धि काय आहे ? श्रीमंत राजश्री राघोबा सुज्ञ आहेत. तुम्हीं आपणास कळेल ते बुद्धीस अंतर न करावें. यांत ईश्वर फुरसत देईल तो औव धरील. कोण बळावल्यानें अपाय आहे हें ही दृष्टींत असावें. श्रीमंत फत्तेसिंगबाबाची फौज आहे हे गाहीं करून एकगोंठी करावी. दिवाणास ही बोलावावें. होळकरास वडीलपणें लेहून त्याचें पत्रीं बहुत समाधान करून भर भरवावा. दमाजी गाइकवाडास ही पत्रें पाठवावीं. कारकून पाठवावे. तांब्राची बातमी राखावी. ऐसें आहे. बहुत काय लिहिणें हे आशीर्वादं.

नं० ३४

त्रिंबक हरीचें गोविंद हरीस पत्र. ज्येष्ठ वद्य १२ इंदुवासरचें–

" श्रीमंत कैलासवासी जाहलियाचें वर्तमान लिहिलें. बरें ! ईश्वर सत्तेस उपाय काय आहे ! आज प्रसंगीं भाऊसाहेब असते तर चिंता नव्हती. आतां ही श्रीमंत राजश्री दादास्वामी आहेत. श्रीमंत राजश्री माधव राव आहेत. चिंता काय आहे ? स्थळांची बंदोबस्ती करावी. जितके कर्ते माणूस असतील त्यांचें समाधान करावें. उत्तरेस होळकर आदिकरून मातबर सरदार आहेत त्यांचें व जो जो संस्थानिक असेल तितकें राजकारण बंदोबस्त राखावा. चिरंजीव दोघे ही पागां सुद्धां प्रतिपदेच्या आंत घरास

---

१ फितवाफांदडा=फितूर. २ त्रिंबकराव व नानापुरंदरे हे भाऊ साहेबांचे पक्षाचे असल्यामुळें दादासाहेबांशीं त्यांचें सरळ नव्हते. या प्रसंगीं त्यांस ही ममतेंत ध्यावें असा लिहिणाराचा भाव. ३ आव=अवसान. ४ गाहा=जुळवाजुळव केलेली, जथ्थीवलेली. ५ एकगांठी=एकतंत्री. ६ तांब्र=निजामअली. ७ हें पत्र त्रिंबकहरीनें पुण्यास गोपाळराव होता त्यास लिहिलें आहे. ८ दोघे=गोपाळराव व परशुरामभाऊ.

येतील. पंचमहालचा ऐवज श्रीमंतांचे रसदे पैकीं अद्यापि उगवला नाहीं. गुदस्तां पासून शिबंदी भारी पडली. मोंगलें[1] एकवेळ सामान बळावून रायचुरास गेले. फिरोन तिकडून कलबुर्ग्यास आले. जाधवराव वगैरे फौजा गेल्या. श्रीमंत दादासाहेब आले, तेव्हां देशमुखानें येऊन भेटावें तो न भेटतां पळून गेला. श्रीमंत गेल्यावर मागती दंगा करूं लागला. चिरंजीव नीलकंठरायाची त्याची एक चकमक झडली. इकडील तिकडील घोडीं माणसें पडलीं. फिरून त्याणें गुडमटकलास वेढा घातला. तेव्हां चिरंजीवानीं त्याजवर चालून जाऊन पांचशें लोक मारून त्यास उधळून दिलें. नंतर त्याणें सलुकाचें[2] बोलणें लावून तह करून घेतला. परंतु विश्वास नाहीं. आतां श्रीमंतांचें वर्तमान ऐकिल्यावर चोंहोंकडून काटक लोक उठतील. पुढें उत्तरेस भाऊसाहेब[3] आहेत. हें वृत्त काय आहे ? "

नं० ३५

त्रिंबकहरीचें गोपाळरावास पत्र छ० २९ जिल्कादचें—

" तुम्हीं गेलिया तागायत कांहीं वर्तमान कळत नाहीं. दरबारचें वर्तमान काय, पुढें कोणे प्रकारें बंदोबस्त होतो, हें सविस्तर लिहिणें. यवन नळदुर्गास येऊन किल्ला घेतला. अक्कलकोट परगणा मारून ताराज केला. साठ हजार रुपये घेतले. राजश्री शहाजीबावांची फार खराबी जाहली. हजार राऊत ठेवून शिबंदीचा पेंच ही त्यांवर भारी पडला. चार महिने राजश्री आबाजीनाइका बराबर गेले. त्यानें पोटास देखील दिलें नाहीं. मोंगलानें नळदुर्गचा किल्ला चव्हाणास दिला. आळंद गुंजोटींत ही ठाणीं बसवून ठाणीं त्याजकडेच दिलीं. पुढें कोणीकडे जातो पहावें ! "

---

१ मोंगल व जाधव महालांतून आल्या गेल्यामुळें त्या महालांचा नाश झाला असा लिहिण्याचा भाव. २ सलुक, सलोक, सलोका, सलोखा = स्नेह. ३ भाऊसाहेब पानपतांत मेल्या विषयीं लोकांची खात्री नव्हती म्हणून उत्तरेस ते अमुक ठिकाणीं आले, अमक्यास भेटले, अशा त्या वेळीं बातम्या उठत होत्या.

नं० ३६

कृष्णंभट यांस नरसिंह[1] याचें पत्र आषाढ शु॥ ६ चें पंचमहालांतून—

" नबाब सलाबतजंग व निजामअल्ली उभयतां बंधु बेदरीं आहेत. बरोबर दहा पंधरा हजार फौज आहे. यंदां छावणी बेदरींच होणार होती. इतक्यांत श्रीमंत पंतप्रधानांचें वर्तमान आलें हें ऐकून छ० १ माहे जिल्हेजीं बाहेर निघाले. पुढें छ० ११ जिल्हेजीं कूच करून धारूरास जाणार हा निश्चय. आणि जाधवरायास[2] आपले डेऱ्यास आणून वस्त्रें दिलीं. १८ महाल[3] पूर्वी त्याजकडे होतेच. आणखी दोन तीन महाल जाजती दिले. प्रस्तुत अळंद गुंजोटीमध्यें त्याचें ठाणें बसलें. जाधवराव तेथें आले आहेत. दहा हजार फौज ठेवण्याविशीं नबाबाचा हुकूम जाहला आहे. वरचेवर फौज जमा करितात. आज जाधवराव निघून हुमणाबादेस जाणार. आतां कांहीं एक ताल राहिला नाहीं. बरें ईश्वर करील तें प्रमाण ! "

नं० ३७

श्रीहेरंब.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री गुंडोपंत तथा रा॥ बगाजी पंत बावा यां प्रती—

स्नेहाभिलाषी पद्माकर जोशी याचे आशीर्वाद. विनंती उपरी. येथील क्षेम तागायत आषाढ शु॥ १९ गुरुवार जाणोन स्वकुशल लिहीत जावें. प्रस्तुत तुम्हांकडून पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. तरी सविस्तर लिहिणें. इकडील वर्तमान तरी दोन चार पत्रें पाठविलीं आहेत त्यांजवरून कळलेंच

---

१ हा नरसिंह कोण हें कळत नाहीं. त्याच्या पत्रावर " श्रीगणराज " असून प्रारंभी " अपत्यें नरसी यानें " हे शब्द आहेत. २ जाधवराव=रामचंद्रराव जाधव हा मोंगलाचा सरदार, चंद्रसेन जाधवाचा मुलगा व प्रख्यात धनाजी जाधव याचा नातू. ३ हे सर्व महाल आदल्या वर्षींच्या तहांत मोंगलानें पेशव्यांकडे दिले होते. परंतु त्या पूर्वी ते जाधवरावाकडे जहागीर म्हणून होते.

असेल. अलीकडील वर्तमान तरी रा० जाधवराव डोणगोपरें येथें दोनशें स्वारांनिशीं आहेत. श्रीनिवासराव व श्रीपैतराव जाधव व जयसिंग वगैरे घोडे राऊत मिळून हजार बाराशें कल्याणीजवळ आहेत. आणीक फौज कोठें नाहीं. तुम्हांवर कांहीं प्रस्तुत रवाना जाहलेली नाहीं. मुख्य यवन बेदरींच आहे. तुम्ही धीर न सोडणें. प्यादे जवादे ठेऊन खबरदारीनें राहणें. चोंहोंकडील बातमी राखीत जावी. इकडे वर्तमान येईल तें वरचेवर तुम्हांकडे लिहून पाठवूं. पुण्याकडील ही फौज बाबूजीनाईक दों चों दिवसांत सोलापुराकडे येणार. श्रीमंत रायानीं सरकारांत पांच हजार रुपये येथून देविले, त्यास ऐवज तो तुम्हांकडून आला नाहीं. सरकारचा दगादा लागला आहे. यास्तव सरकारचे जासूद आपणाकडे पाठविले आहेत. तरी पांच हजार हुंडणावळ सुद्धां पंढरपूर अथवा पुणें अगर हुमणाबाद या स्थळांमध्यें हुंडी करून पाठवावी. सविस्तर मैराळपंतानीं लिहिलें आहे त्या वरून कळेल. यजमान मनुष्यें येथें ठेवून रविवारीं पुण्याकडे जाणार. समागमें आम्ही ही जाऊं. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे आशीर्वाद.

नं० ३८

बाळाजी नारायण याचें मेघश्यामराव कृष्ण यास पत्र छ० २९ जिल्हेजचें.

" मोंगलाकडील वर्तमान तरी त्याची छावणी बेदरावर आहे. सारे फौजेस निरोप दिला. पांच सात हजार फौजेनिशीं आहे. जाधवरा-

---

१ श्रीपतराव जाधव हा रामचंद्रराव जाधवरावाचा दत्तक पुत्र. २ इ० १७६० च्या तहांत मोंगलानें पेशव्यांस बासष्ट लक्षांचा मुलूख दिला त्यांत सोलापुर दिलें असावें. निदान आम्हांस तरी तें त्या वर्षापासून पेशव्यांच्या ताब्यांत असल्याविषयीं दाखले सांपडले आहेत. मग तें त्या आधीं त्यांजकडे असल्यास न कळे! सोलापूरचा किल्ला बाबूजी नाइकाकडे होता तो पुढें इ० स० १७६७ या वर्षीं माधवराव पेशव्यानें त्याजकडून काढिला. त्यापुढें तो पेशवाईच्या अखेरपर्यंत कोणा जहागीरदाराच्या ताब्यांत दिला असल्याचें दिसून येत नाहीं. ३ हा बहुधा करकंब किंवा मंगळवेढें येथील मनुष्य असावा.

याचा मजकूर तर श्रीमंत देवाज्ञा जाहले हें वर्तमान ऐकून नवाबास विनंती करून एकोणीस महालांची जप्ती करून घेतली. पंचमहाल, इंडी, तांबें, अवजुलपुर, अळंद, गुंजोटी, चितापुर वगैरे देखील अक्कलकोट या प्रमाणें[1] घेऊन भालकीस आले. भालकीहून श्रीपतराव मानस पुत्र व श्रीनिवासराव यांजबरोबर तीन तोफा व हजार स्वार व गाडदी हजार रवाना केले. धोंडो एकदेव अळंदगुंजोटीचा कमाविसदार यानें पळ काढिला. पळोन सोलापुरास आला. ठाणीं रिकामीं पाहोन त्याणीं घेतलीं. नळदुर्गचें वर्तमान तर लच्छीराम करोले[2] त्या गांवांत होता त्यानें फितवा करून तमाम लोक फोडिले. रात्रीस त्याचे[3] स्वार दोनशें व गाडदी पांचशें निमित्तास मात्र आणून शहर घेतलें, राघोपंत सुभेदारास धरावें, इतक्यांत त्याणें जहांबाजी करून किल्ल्यांत पळून गेला. किल्ला बळावला. अशी गोष्ट होतांच गांवकरी लोकांनीं जिवावरी उदार होऊन नदींत उड्या टाकून (?) तिसरे दिवशीं रणमंडळ—किल्ल्यासमीप दुसरा किल्ला होता तो—घेऊन सत्तर माणसांचीं डोचकीं कापिलीं. किल्ल्यांत मावळे व खानदेशी लोक होते त्यांजवळ बंदुखा नव्हत्या. तरवारी होत्या. त्यांणीं आव सोडिला. राघोपंतानें त्यांस उदंड हिंमत दिली परंतु न ऐकत. मग कौल घेऊन बाहेर निघाले. मागोन श्रीपतराव व श्रीनिवासराव किल्ल्यास दाखल जाहले. अक्कलकोटीं चारशें स्वार व प्यादे आठशें जमा आहेत. अक्कलकोट परगण्यांत चिठ्या केल्या आहेत. पुढें या परगण्यांत येणार. पार पाडणार ईश्वर आहे. आणीक पंधरा दिवस फौज पुण्याकडून नये तरी सोलापुर टिकतां मुसकील आहे. आवसें, सेडब वगैरे परगण्यांत फौज आली तर उत्तम. नाहीं तर त्याणीं सारा मुलूख घेतात. अवजलपुर ही घेतलें. इतर ठाणीं ही घेतलीं."

नं० ३९

श्री.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री नीलकंठराव

---

१ या प्रमाणें घेऊन=या परगण्यांच्या सनदा घेऊन. २ बंदूकवाले किंवा कडाबिनीवाले घोडेस्वार. ३ जाधवाचे.

स्वामीचे सेवेशीं–

सेवक सदासिव महादेव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल तागायत छ० १४ जिल्हेज. जाणून स्वकीय कुशल लेखन करीत असलें पाहिजे. विशेष आपण रा॥ आपाजीपंत यांज समागमें पत्र पाठविलें तें पावलें. व कित्येक मजकूर मशारनिल्हेनीं सांगितला त्याजवरून कळला. मुख्य फौज व तोफखाना नदी उतरून द्यावया तरतूद असावी ह्मणून लिहिलें; त्यास मागें कर्नाटकचे स्वारीस बळवंतराव गणपत आले होते ते देशास जाते समयीं पंचवीस हजार फौजेनिशीं नांवेवरून पार करून दिले. तैसेच राजश्री विसाजीपंत बिनी हे ही दहा हजार फौजेनिशीं उतरून गेले. नाव तेरा गजी थोर आहे व टोकरे ही करविले आहेत. सांगडी वगैरे जें साहित्य लागेल तें देऊन तोफां सुद्धां नदी पार करून देऊं. येविशीं काडी मात्र लढा पडणार नाहीं. मुख्य गोष्ट पारिपत्य व्हावें. या उपरी दिवसगत लागलिया उपयोगीं नाहीं. लावणीचा हंगाम. यासाठीं पारिपत्य जाहलिया उपयोगीं आहे. राजश्री विसाजीपंत आपा प्रसंगीं नाहींत ह्मणून संशय न धरावा. येविशींचा सविस्तर मजकूर सांगोन रा॥ आपाजीपंत पाठविले आहेत. सविस्तर निवेदन करितील तें चित्तांत आणून तूर्त यावयाचा योग घडेल तें केलें पाहिजे. करारांची याद अलाहिदा पाठविली आहे. येविशीं अर्थ राजश्री अंताजीपंत तात्यानीं लिहिला आहे त्यावरून कळों येईल. बहुत काय लिहिणें कृपा करावी हे विनंती.*

---

* या पत्रांत कांहीं विशेष हांशील आहे ह्मणून तें येथें दिलें आहे असें नाहीं. तथापि यावरून एका महत्वाच्या मुद्याचा निर्णय होतो. तो असा– कर्नल विल्क यानें आपल्या म्हैसूरच्या इतिहासांत १७६१ सालीं हैदरअल्ली व खंडेराव यांमध्यें जी लढाई चालली होती तिचा वृत्तांत लिहित असतां असें सांगितलें आहे कीं, " खंडेरावानें त्यावेळीं म्हैसूर प्रांतीं मराठ्यांची फौज आली होती, ती आपल्या मदतीस बोलाविली. त्या फौजेवर विसाजी पंडित हा सरदार होता. " मुसलमान व इतर अन्यधर्मी लोक सर्वच ब्राह्मणांस ' पंडत ' ह्मणतात व पूर्वी ही म्हणत. तेव्हां हा विसाजी पंडित कोण ? विसाजीपंत विनीवाले कीं विसाजी नारायण ह्मणून इचल

हैदरअल्लीचा कर्नाटक प्रांतीं दंगा

पानपतच्या पराजयामुळें मराठ्यांच्या राज्यांत चोंहोंकडे दंगेखोर संस्थानिक प्रबळ होऊन वखेडे करूं लागले. त्या सर्वांत हैदरअल्ली प्रमुख होय त्यानें म्हैसूरच्या राजास कैदेंत ठेवून त्याचें सारें राज्य बळकाविलें होतेंच. मराठ्यांचा कर्नाटकांत मुलुख होता तो ताब्यांत घेण्यासाठीं १७६१ च्या जून महिन्यांत तो फौज तयार करून शिरें प्रांतीं आला. त्यास अदवानीचा नबाब व निजामअल्लीचा भाऊ बसालतजंग हा ही येऊन मिळाला. मग त्या दोघानीं शिरें, होसकोटें, बाळापुर वगैरे मराठ्यांचा मुलूख घेतला. मग बसालतजंग अदवानीस निघून गेला तरी हैदरअल्लीची मोहीम सुरूच होती. त्याचा मुरारराव घोरपडे गुत्तीकर याशीं कलह उपस्थित होऊन त्याच्या राज्यावर त्यानें स्वारी केली व त्याचीं कांहीं ठाणीं घेऊन व मुलूख लुटून त्यास जर्जर केलें.

कर्जीकरांचा कारभारी त्यांच्याच पथकाची सरदारी करीत होता तो ? अशा साहजिकपणेंच उद्भवणाऱ्या शंकेस वरील पत्रावरून उत्तर मिळतें कीं, हा विसाजी पंडित ह्मणजे विसाजीपंत विनीवाले. रघुनाथराव दादास निजामअल्लीच्या रोंखावर ठेवून नानासाहेब पेशवे उत्तरहिंदुस्थानाकडे गेले. त्यानंतर दादांच्या फौजेपैकीं दहा हजार लोकांनिशीं विसाजीपंत कर्नाटकावर स्वारी करण्यास निघाला आणि तुंगभद्रा उतरून म्हैसूरच्या राज्यांत शिरून बाळापूर व देवनहळ्ळी हे परगणे लुटूं लागला. त्या खंडेरावानें मदतीस बोलावल्यावरून त्यानें जाऊन हैदरअल्लीशीं युद्ध सुरू करून त्यास जेर केले. पण इतक्यांत पानपतचें भयंकर वर्तमान कळल्यामुळें घाईघाईनें पुण्याकडे परत येण्याचा त्यानें निश्चय केला. खंडेरावापासून कुमक केल्यावद्दल त्यानें द्रव्य घेतलें होतेंच. पानपतची बातमी अजून बाहेर फुटली नव्हती. ह्मणून जातां जातां हैदरापासून तीन लाख रुपये उपटून त्याशीं तह करून विसाजीपंत त्वरेनें माघारा फिरला. तथापि वरील पत्रावरून स्पष्ट होतें कीं, स्वदेशीं तो येई तों पावसाळा सुरू झाला होता. विनीवाल्याच्या या स्वारीचा डफ्साहेबाच्या इतिहासांत उल्लेख सुद्धां नाहीं.

नं० ४०

श्री. पै॥ छ० ९ मोहरम [?]

सेवेशीं गोविंद सखदेव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना उपरी येथील कुशल तागायत छ० ७ सफर पावेतों किल्ले बंकापूर सेवकाचें वर्तमान यथास्थित जाणून स्वकीय कुशल लेखनाज्ञा करीत असलें पाहिजे. विशेष. हैदरनाइकाकडील वर्तमान त्याणें मडकशिऱ्यास वेढा दिला होता, त्यास मडकशिरें त्यानें घेतलें हें तहकीक वर्तमान आलें. ऐशियास पुढें गुत्तीस जाणार किंवा शिऱ्यांकडे येणार ऐशी वार्ता आहे. गुत्तीकडे तिकडील पाळेगारानीं गुत्तीस उपद्रव दिला आहे. राजश्री मुरारराव घोरपडे अर्काटचा सुभा महमदअल्लीखान वेळुरीं आहे त्याजकडे गेला आहे, परंतु त्याची कुमक उपराळा यावयाचा सुमार अद्यापि दिसत नाहीं. घोरपड्याचा मुलूख अगदीं हैदरनाइकाच्या स्वाधीन जाहला. पुढें त्याचें पारिपत्य करणार ऐसें तूर्त या रानांत कोणी दिसत नाहीं. कडपेकर व कर्नोळकर धन्य होऊन आपले स्थळीं बसले आहेत. बसालतजंग अदवानीस दाखल होऊन पंचवीस दिवस जाहले. त्याजबरोबर फौजे दोन अडीच हजार, गाडदी तीन चार हजार आहेत. पुढें अनागोंदीचे मुलखीं कंपलीस येणार

---

१ मडकशिरें हें ठाणें मुरारराव घोरपड्याचें होतें. याशिवाय या वेळीं हैदरानें घोरपड्याचीं पेनकोंडा, कोडिकोंडा व दुसरीं बारीक सारीक ठाणीं घेतलीं. २ पूर्वी ' फौज ' शब्दाचा अर्थ फक्त स्वारांची फौज इतकाच होता. पायदळाचें महत्व त्या काळीं इतकें वाढलेलें नव्हतें. मराठा शिलेदार पायदळाच्या शिपायांस तुच्छ मानी. मावळे लोकांखेरीज पेशवाईमध्यें महाराष्ट्रांतील कोणी ही रहिवासी पायदळांत चाकरी करीत नसे. मावळ्यांस देखील पगार चार पांच रुपये मिळे. यावरून गाडद्यां पेक्षां त्यांचें महत्व किती कमी होतें हें दिसून येईल. ३ गाडदी, गाडद, गारदी= कवाईत शिकलेले पायदळचे शिपाई– हा या शब्दाचा मूळचा अर्थ. परंतु पुढें पेशव्यांच्या वगैरे फौजांतून गाडदी असत ते कवाईत शिकलेले असत असें नाहीं. हे लोक उत्तर हिंदुस्थानांतील रोहिले, पठाण, शीख,

ऐशीं वदंता आहे. सावनूरकर नबाब मासुराहून हावेरीस आला. त्या समागमें स्वांर चार पांचशें, प्यादे हजार दीडहजार आहेत. नवे प्यादे पांचशें ठेविले. अजुनी जे येतील ते शेंपन्नास ठेवीत जातो. कळावें. हैदरनाईक शिरें प्रांतीं आला म्हणजे चित्रदुर्गकराची खंडणी घेऊन त्या उपरांतीक बिदनूरकरांच्या मुलखांत धामधूम करणार असें दिसतें. ऐशियास दुर्गप्रांतीं आला म्हणजे हरिहर, बसवापट्टणास शह पोंचेलसें दिसून येतें. पुढें जें घडून येईल तें खरें ! हैदरनाईक बहुत प्रबल जाहला. त्या समागमें फौज सात हजार, गाडदी नऊ दहा हजार, फिरंगी हजार बाराशें, तोफा शें दीडशें, या प्रमाणें, आहे. बरुदेचा[2] सरंजाम चांगला आहे. या पुढें त्या प्रांतीं तिकडील अविंधांचें[3] अगर जमीदोर[4] पाळेगारांचें चालत नाहीं. त्यास कोणी पुसणार पुरतें त्या प्रांतीं नाहीं, त्यामुळें बळावत चालला. नवी संचणी करीत जातो. निजामअल्लीकडे सूत्र राखिलें आहे. चहूंकडील खबरदारी राखून बंदोबस्ती करितो. त्या सारिखा त्यास काल ही सानुकूल घडून येतो. ऐशियास कोणतें ही प्रमाणांत मानितां येत नाहीं. जे वेळेस जें घडून येईल तें सत्य ! आपणाकडे बातमी वर्तमान हैदरनाइकाकडील येत असेल. आम्हांस कळलें तें सेवेशीं लिहून पाठविलें असे. हैदरनाइकाकडील बातमी वर्तमान आपणाकडे आलें असलें तरी सविस्तर लिहून पाठवावें. पुण्याहून श्रीमंतांकडील आठ चार दिवसांत आपणाकडे कागद

पुरभय्ये वगैरे जातींचे असून यांचें मुख्य हत्यार बंदूक असे. यांस पगार ज्याच्या त्याच्या लायकी प्रमाणें ८ । १० । १२ । १५ पर्यंत मिळे.

१ फिरंगी म्हणजे फ्रेंचलोक. यानींच हैदरअल्लीस तोफखाना तयार करून दिला व पायदळास कवाईत शिकवून पलटणें तयार केलीं. २ बरुद= दारूगोळा. (!) ३ अविंध= कर्नाटक प्रांतांत सावनूर, कर्नोळ, कडपें, व अर्काट येथील नबाबांस अनुलक्षून हा शब्द येथें घातलेला आहे. ४ जमीदार पाळेगार= जमीदार म्हणजे देसाई. पाळेगार म्हणजे संस्थानिक. कर्नाटकचे संस्थानिक यावेळीं होते त्यांत सोंदें, बिदनूर, चित्रदुर्ग, हरपनहळ्ळी, रायदुर्ग, हगलवाडी, व बुद्धिहाळ येथील संस्थानिक बरेच सामर्थ्यवान् होते.

पत्र आले असल्यास तेथील दरबारचें व श्रीमंतांकडील सविस्तर लिहून पाठवणें. सदैव येणाराबराबर पत्र पाठवून सेवकाचा सांभाळ करीत जावें. आम्हांकडील जासूद पुण्यास गेले आहेत. एक दोन दिवसांत येणार ऐसें आहे. आल्यावरी आपणास सविस्तर लिहून पाठवूं. हैदरनाइकाची प्रबलता बहुत जाहली. मडकशिरें घेतल्या उपरी एक मनसबा गुत्तीस जावयाचा, व एक दुर्गाकडे यावें हा आहे. दुर्गाकडे आलिया हरिहर[1] बसवापट्टणास वेध लागेल ऐसें आहे. सारांश गोष्ट श्रीमंतांच्या फौजा या रानीं नाहींत. यामुळें हैदरनाइकाची प्रबळता आहे. या प्रमाणें वर्तमान ऐकतों. आमचे कांहीं जासूद आले नाहींत. परंतु शिऱ्यांकडून लोक येतात ते या प्रमाणें सांगतात. ऐकिलें वर्तमान लिहिलें आहे. शिरटीकर देसाई मुरारारायाकडे होते. मुरारराव अर्काटाकडे गेलेवरी देसाई निघोन हरपनहळ्ळीस यावयास आला. हें ही वर्तमान आहे. कळलें पाहिजे. बहुत काय लिहिणें. लोभ करावा हे विनंती.

मोंगलाशीं लढण्याची तयारी.

नं० ४१

श्रीगणराज.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री रामचंद्रपंत स्वामी गोसावी यांसीं—

सेवक नीलकंठराव त्रिंबक साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल ता॥ छ० ७ मोहरम जाणून स्वकीय लेखन करीत जाणें. विशेष. तुह्मांकडील पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. तर सविस्तर लिहिणें. आम्हीं श्रावण शु॥ ५ स पुण्यास आलों. श्रीमंतांचें दर्शन जाहलें. श्रीमंत ही श्रावण वद्य पंचमीस बाहेर डेरे दाखल होणार आहेत. अविंधानें लबाडी

---

१ हरिहर व बसवापट्टण हीं ठाणीं सावनूरकरा पासून पेशव्यांस मिळालेलीं होतीं.

केली. त्याचें पारिपत्य ईश्वर कृपेनें शीघ्रच घडेल. तुम्हीं सावधपणें राहणें. ऐवज जेथवर वसूल होईल तेथवर करणें. आम्हीं कर्जातून बाहेर पडों ऐसा अर्थ करणें. वरकड सविस्तर रा॥ बगाजीपंत व गुंडोपंत यांचें पत्रीं लिहिलें आहे त्यावरोन कळों येईल. बहुत काय लिहिणें हे विनंती.

गुडमटकलचा ऐवज उलगडून यावा व तैसेंच बाजीपंताकडील रुपये यावे त्याची वाट काय केली ? तुमचे गुजारतीचा कारभार आहे. उलगडून टाकणें. बहुत काय लिहिणें* हे विनंती.

नं० ४२

श्रीगणपतिर्जयति.

तीर्थस्वरूप राजश्री आपा वडिलांचे सेवेशीं—

अपत्यें गोविंदानें साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल तागायत भाद्रपद वद्य पंचमी सह सष्ठी मंदवासर तृतीय प्रहर पर्यंत वडिलांचे आशीर्वादें करून यथास्थित असें. विशेष. वडिलीं शुद्ध त्रयोदशीचें पत्र पाठविलें तें पावलें. सविस्तर वर्तमान कळलें. यादवाडचें पत्रोत्तर पावलें. लुच्चानें कोणे प्रकारें लिहिलें तो भाव कळला. त्याचें पारिपत्य होईल. चिंता नाहीं. वरकड " स्थळें हातास न आलें. कर्ज मिळेना, लोक

---

* नीलकंठरावाच्या पंचमहालांतील मामलतींत मोंगल, जाधव, चव्हाण, व त्या प्रांतींचे देशमुख यानीं बखेडे व दंगे करून त्यास चैन पडूं दिलें नाहीं. त्यानें सरकारांत आगाऊ रसद भरली होती ती देखील वसूल न होतां रात्रंदिवस झुजार्शी प्रसंग पडल्यामुळें फौजेचा खर्च ही त्याजवर फार पडला. या प्रकरणाचीं पुष्कळ पत्रें वाचकांस कंटाळवाणीं होतील म्हणून आम्हीं सोडून दिलीं. येथें घेतलीं नाहींत. या मामलतीच्या धंद्यास कंटाळून त्यानें या वर्षी सरदारी पतकरिली. ज्या प्रांतांत त्यानें मामलती मिळविल्या होत्या ते पंचमहाल ही पुढच्या वर्षी रघुनाथ बाजीराव यानीं मोगलास सत्तावीस लक्षांचा मुलूख परत दिला त्यांत त्याजकडे गेले.

१ मोंगलाशीं लढण्याकरितां दादासाहेब जेव्हां तयारी करूं लागले तेव्हां इतर सरदारां प्रमाणें गोपाळराव पटवर्धनास ही त्यानीं आठ हजार

तमाम निघून तुम्हांकडे गेले. समजाविशीचा मजकूर कसा झाला ? " ह्मणोन आज्ञापिलें; त्यास सर्व गोष्टी संकटाच्या प्राप्त झाल्या ! सरकारांतून पैसा नाहीं. मागील कर्ज तैसेंच राहिलें. पुढें परगणे दिले ते हातास न येतां लोकांस बोलाविलें. समाजाविशीचा तट पडला तर चार माणसें चहूंकडे गुंतलियावर काय करावें ? दुसरी गोष्ट, धन्याशीं आट धरून वर्तत आलों. आज चाकरीचा दिवस. आह्मीं अनमान करून फौज न ठेविली तर पुढें लौकिक बरा दिसत नाहीं. कर्ज तो एकंदर मिळेना. रसदा ह्मणोन घेतल्या महालच्या— कुंदगोळ साठ हजार होन, बेहट्टी पंचवीस हजार होन, शहापूर वीस हजार होन, लक्ष होन करकंबें, व मंगेळवेढची रसद पन्नास हजार होन, किरकोळ कर्ज आज तागायत लाख होन घेतले. येणें प्रमाणें ऐवज झाला, त्यास दीडहजार फौजेचे पदरी नालबंदी पडली. किरकोळ चिठ्या करकंबें व मंगळवेढें येथें पांचशें स्वारांच्या दिल्या. वडिलांकडे शेषोपंतापैकीं बारा हजार, त्यापैकीं चिरंजीव भाऊकडील तीन हजार, ते परभारें चिठ्या करितील. कुंदगोळ बद्दल दहा हजार तेथें देऊं केले आहेत. पन्नास येथें दिले. याखेरीज होन सत्तावीसशें आहेत व गोपाळहरी चुणेकर याजबराबर ऐवज चार हजार आहे. त्याजवर चिरंजीव वडिलांकडे चिठ्या करितात, चिरंजीव भास्करपंतास चिठी दिली आहे त्यास नऊ हजार रोखच ऐवज द्यावा. आणखी कर्जाचे तलासांत आहों. ज्यांचे भरंवसे त्यांणीं पैसा दिला नाहीं. निदानीं हें प्राप्त झालें. मोंगलाशीं लढाई होणार. या प्रसंगीं चुकाविल्यानें नक्षा रहात नाहीं. याजमुळें हरकसें ही करून निकाल काढावा लागला. लज्जारक्षक श्रीपंढरिनाथ कीं वडिलांचा आशी-

---

फौज चाकरीस ठेवण्याची आज्ञा केली. या फौजेच्या उभारणी करितां व मागील दोन वर्षांत त्यानें कर्ज काढून फौज ठेविली होती त्या कर्जाच्या फेडी करितां सरकारांतून त्याजकडे कुंदगोळ, बेहट्टी, शहापूर, करकंबें वगैरे महाल व मिरजेचा किल्ला देण्यांत आला. तो किल्ला माधवराव पेशव्याचा सासरा शिवाजी बल्लाळ याजकडे होता. त्यानें आठ दहा महिनेपर्यंत तेथें पटवर्धनांचा अंमल बसूं दिला नाहीं !

वाद ! या दोन दिवसांत चार दिवसांत तीनं हजारांचा निकाल पडतो. दोन हजारांचा दसऱ्यापर्यंत जसा निकाल पडेल तसा काढितों. श्रीमंत राजश्री दादासाहेब यांचें काल पत्र आलें जे, " तुमचे लोकें समजाविले असतील तितक्यांनिशीं येणें. या उपर पत्र पाठवीत नाहीं. आह्मीं गंगा-तीरास जातों " ह्मणून लिहिलें आहे. समागमें हजार स्वांर नाहींत असा प्रसंग आहे ! उदईक चिरंजीव पंढरिनाथाबरोबर हजार स्वांर देऊन श्रीमंत दादासाहेबांकडे रवाना करितों. नालबंदी घेऊन गेलेले लोक. त्यांस पत्रें पाठवून जे जमा होतील तितके करावे. चिरंजीवांचा मुहूर्त दसऱ्याचा क्षेपें-निक्षेप आहे. त्याच मुहूर्तें पागा हत्ती करकंब्याहून आणविले आहेत. द-सऱ्याकारणें आणविले आहेत. श्रीमंत राजश्री रावप्रधान स्वामी दसऱ्याचे मुहूर्तानें निघणार. त्यां समागमें चिरंजीव जातील. मिरजेचा मजकूर– त्या गृहस्थानें ओढ धरून आपला बदमामलीचा प्रकार दर्शविला. आत लोकांस पुढें कोणे स्थळीं ठेऊं नये असें श्रीमंतांचे अंतःकरणांत आलें. रोजबेरोज पत्रें जात आहेत. काल राजश्री लक्ष्मणपंत बर्वे श्रीमंत राजश्रीकडील रा-माजीपंत व बच्याजीपंत यांचे धाकटे भाऊ यांस रवाना केलें. या उपर हें निदानचें शस्त्र आहे. ऋणानुबंध प्रमाण. चिरंजीव नीलकंठरायाचा मज-कूर– सरंजाम कबूल केला व फौज कांहीं येथें तीन चारशें स्वांरांची भरती त्याणीं केली. भलता हिय्या करावा तेव्हां लौकिक ! रसद देऊन महाल केले तेव्हां दोन कमाविसदार युक्तीचे नव्हते (?) या करितां सरदारी कबूल करावी लागली. बरें ! वडिलांचें पुण्य समर्थ आहे. कोणे गोष्टीची वडिलीं चिंता न करावी. वरचेवर पत्र पाठवीत जावें. दरबारचा प्रकार तर– मनुष्य पाहून करावें तर पक्षपात घडतो. याजकारितां सोईनें कारभारी करितात. असो. धण्याचें प्राक्तन समर्थ आहे. बहुत काय लिहिणें कृपा

---

१ तीन हजार स्वांरांची समजूत होत्ये. २ लोक, भले लोक= म-राठे स्वांर. त्यांस समजाविणें ह्मणजे नालबंदीचा ऐवज त्यांच्या पदरांत घा-लून त्यांची चाकरी करण्याविषयीं कबुली घेणें. ३ गोदावरीच्या तीरीं पैठणाकडे. ४ क्षेपनिक्षेप= निस्संशय. ५ बदमामली= लबाडी.

केली पाहिजे. चिरंजीव परशुरामाकडील हजार बाराशें आजपर्यंत समजले. दीडहजार समजावयाचे आहेत. हे विज्ञापना.

नं० ४३

श्रीगणपतिर्जयति.

अपत्यें गोविंदानें साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल तागायत आश्विन वद्य ७ पावेतों यथास्थित असे. विशेष. वडिलीं पत्रें पाठविलीं तीं पावलीं. त्यांत यथास्थित बुद्धिवाद लिहिला होता यास्तव चिरंजीवांकडे रवाना केलीं. त्यांचीं पत्रें आजच आलीं. मंगळवारचीं पत्रें. तेच दिवशीं श्रीमंत राजश्री रावप्रधान स्वामी कूच करून पेडगांवाहून मांडवगण कातराबादेस गेले. त्यांबरोबर चिरंजीव राव ही गेले. श्रीमंत राजश्री दादासाहेब नागतव्याचा घांट उतरून माहूरच्या रोंखें गेले. त्यांस जलदीनें येणें म्हणोन पत्रें आलीं यास्तव गेले. फौज कांहींच जमा नाहीं. कार्तिकी पौर्णिमा निदान अखेर पावेतों सारी फौज जमा होईल. हल्लीं जमा जाहली व होईल फौज बेरीज तपशील—

१ बाबूजीनाईक यांची	५०००	१ आमचीं दोनी[1] पथकें	८०००
१ रास्ते यांची	३२००	१ रायाजी पवार	१६००
१ महादोबा[2]	३८००	१ कवडे[3]	१५००
१ विसाजी कृष्ण	१५००	१ घोरपडे[4] यांजकडील	१०००
१ शहाजी भापकर	१०००	१ नीलकंठराव सरंजामी	१३००
१ लक्ष्मण खंडेराव	१०००	१ फत्तेसिंग	१६००

१ गोविंदहरी व रामचंद्रहरी यांचे नांवचीं. दोनी पथकांत आठ हजार स्वार होते. परंतु त्यांतले त्यांत गोपाळराव ५०००' परशुरामभाऊ २५०० व नीलकंठराव ५०० या प्रमाणें भरती झाली होती असें नं.३९ च्या पत्रावरून दिसतें. २ महादोबा पुरंदरे. हे वारून पुष्कळ वर्षें झालीं होतीं तरी पथकास त्यांचेंच नांव चालत होतें. हीच गोष्ट पुढें फत्तेसिंग व यशवंतराव पंवार हीं दोन नांवे आलीं आहेत त्यांस ही लागू आहे. ३ कवडे महिपतराव. ४ घोरपडे इचलकरंजीकर.

१ चव्हाण	२०००	१ सरलष्कर[1]	१०००
१ हुजरात	१००००	१ प्रतिनिधि	१०००
१ यशवंतराव पवार	१०००	१ विठ्ठलशिवदेव यांजकडील	३०००
१ गायकवाड यांजकडील	१०००	१ शिंदे यांचे पथके	१२०००
१ भुइंजकर	१०००	१ नारोशंकर त्यांचे [शिंद्यांचे]दिवाण यांची	२५००

येणें प्रमाणें पांसष्ट हजार. आणखी किरकोळ पांच हजार. येकूण सत्तर हजार. शिवाय भोंसले व होळकर जे येतील ते. ऐसा सुमार आहे. परंतु खासा सरदाराचा वचक नाहीं. श्रीमंत दादासाहेबांस ते[3] खातरेस आणीत नाहींत. परंतु श्रीमंत राजश्री माधवराव यांचे दौलतेचा निवाडा येथेंच आहे. अदृष्टाचा मूल आहे. पुढें हें संस्थान रक्षावें अशी श्रीची इच्छा असेल तर यवन फजीत पावतच आहे. विदित होय हे विज्ञापना-

मोंगलाशीं लढाई.

निजामअल्ली स्वारं, पायदळ व तोफखाना असें सर्व सामान तयार करून पन्नास साठ हजार फौजेनिशीं या सालच्या आक्टोबर महिन्यांत पुण्याचा रोंख धरून चालून आला. मराठ्यांची फौज ही जमत चालली होती. तिनें त्यास जागोजाग अडविण्याचा प्रयत्य केला परंतु तो तीस न जुमानतां लढाया घेत घेत पुढें बेधडक चाल करून येऊं लागला. नोवेंबर महिन्यांत मराठ्यांची फौज सत्तर ऐशीं हजार पर्यंत जमा झाली व

---

१ सरलष्कर खंडेराव दरेकर. २ पानपतच्या स्वारीमुळें शिंद्याची फौज अगदीं धुळीस मिळाली होती या वर्षीं निजामअल्लीशीं लढाईचा प्रसंग पडला तेव्हां नारोशंकरानें छाती करून शिंद्याची दिवाणगिरी पतकरिली व पांचपंचवीस लाख रुपये कर्ज काढून त्या फौजेची पुनः उभारणी केली. या संबंधें पुनः उल्लेख सन १७६६ । ६७ च्या पत्रांत येईल. ३ मोंगल. ४ याच युद्धांत.

मोंगल जसा जसा पुण्याजवळ येऊं लागला तशीं तशीं निकराचीं युद्धें होऊन तो पुण्यानजीक उरळी येथें येई तों जर्जर होऊन गेला. त्या ठिकाणीं मराठ्यानीं त्यास कोंडून धरिलें. तेव्हां निरुपाय होऊन त्यानें तहाचें बोलणें सुरू केलें.

या स्वारींत मोंगलानें टोंकें क्षेत्राचा विध्वंस केला. त्यामुळें त्याच्या फौजेंत मराठे सरदार होते ते नाखुष व लढाई विषयीं उदासीन झाले. त्यापैकीं रामचंद्र जाधव आपल्या फौजेसह पेशव्यांकडे निघून आला. पेशव्यांची फौज ही मोंगलाच्या निदान दीडपटीनें अधिक होती. इतकें असून रघुनाथरावाच्या हातून मोंगलाचें पारिपत्य व्हावें तसें झालें नाहीं. याचें कारण सरदार व फौज यांजवर छाप बसवून त्यांच्या हातून कामें करून घेण्याचें जें सेनापतीचें खरें कौशल्य तें त्याच्या अंगीं जितकें पाहिजे तितकें नव्हतें. दुसरें कारण ब्राह्मण सरदार व मुत्सद्दी यांत देशस्थ व कोंकणस्थ असे दोन तट पडून त्यांमध्यें तंटे सुरू झाले होते. हे तंटे मोडून सर्वांचें एकचित्त करून त्यांस एकाच वेळीं मोंगलांशीं युद्ध करण्यास उद्युक्त करण्याची हतोटी रघुनाथरावास साधली नाहीं. निरनिराळ्या सरदारानीं आपण होऊन काय लढाई केली ती केली. मराठ्यांत एक जूट नव्हती ह्मणून मोंगलास पुण्यापर्यंत पल्ला मारतां आला व त्याचा खरोखर पराजय झाला असून ही शेवटीं तह झाला तो ही त्यास फायदेशीरच झाला !

नं० ४४

गंगाधर आपाजी परांजपे याचें गोविंद हरीस पत्र.

मार्गशीर्ष शुद्धांत लिहिलेलें—

" श्रीमंतानीं राजश्री रावसाहेबांबरोबर दोन चार पथकें देऊन यवनाचे उजवे बाजूस ठेविलें, तेणें प्रमाणें चार कोस पांच कोसांचे अंतरें

---

१ या स्वारीचीं दोन पत्रें भारत वर्षांत छापिलेलीं आहेत तीं फार चांगलीं आहेत. तीं वाचकानीं पहावीं. सदरहू पत्रें नारोशंकर राजेबहादर यानीं लिहिलेलीं आहेत. २ रावसाहेब= गोपाळराव.

बुणगें ठेऊन सड्या फौजा घेऊन मोंगलाचा गोळा चुकाऊन उभे राहतात. श्रीमंतांकडील फौज चित्तास आल्यास दोन प्रहरां येऊन दोन कोसांचे तफावतीनें उभे राहतात. काडीचा बंदोबस्त नाहीं. राज्य करणाराचे प्रारब्धीं राज्य असल्यास फत्ते होईल. नाहीं तरी मोंगल आइकत नाहीं. तमाम सरदारांचे कारभारी यांचे फितवे खेळतात हें वर्तमान आहे. परंतु चौकशी नाहीं. सफेजंगीच्या गोष्टी बोलत ते आतां बोलत नाहींत. टोंक्यांची इतिश्री झाल्यापासून फारच हैलके झाले आहेत, श्रीमंतै उभयतांचें स्मरण आतां वारंवार करितात. येणें प्रमाणें मजकूर आहे. मोंगल निंबदेहऱ्याचा घांट चढून जांबगांवावरून पुण्याकडे यावयाचा रोंख होता तो सोडून नगराकडे चालिला आहे. चांभारगोंद्याचा रोंख धरिला आहे. "

नं० ४९

गोविंद हरीचें त्रिंबक हरीस पत्र. पै॥ छ० १८ जमादिलावल.

" श्रीमंतांचें व यवनाचें युद्ध तृतीय प्रहरापासून घटका रात्र पावेतों चांभारगोंद्यां अलीकडे दोन कोसांवर तुंबळ झालें. डावे बाजूनें पिछाडीकडे श्रीमंतानीं तोफा लागू केल्या. तो मार व उजवे बाजूस चिरंजीव सारीं पथकें सुद्धां खडपें होतें त्याच्या आश्रयास गोळीच्या अंतरानें उभें राहून बाणांचा व गोळ्यांचा मार [करीत होते] तो व हुजरातीकडील मार व भोंसले व बाबूजीनाईक वगैरे तमाम सरदार चोंहींकडून एकदम हल्ला केली. तेव्हां मोंगल घटकाभर उभा राहिला. पुढें पाणी कोसभर, निभाव होणार नाहीं, यास्तव पिछाडीकडे फिरोन, तोफा लागू केल्या होत्या त्यांजवर मोंगलाकडील टोळी उठली. शिद्दी व आरब व गणेशविद्दल तोफांजवळ होते. बहुत मारामार जाहली. ते समयीं भोंसल्याकडील मराठे यांणीं बहुत मेहनत करून मोंगलाची टोळी माघारी फिरविली. चोंहींकडून तोफा व बाण व जेजाला व बंदुखांचा मार बराच दिला. घटका रात्र पर्यंत मोंगलानें मार

१ सफेजंगी= पराक्रम. २ हलका होणें= दुर्बळ किंवा उदास होणें. ३ श्रीमंत दादासाहेब. ४ नानासाहेब व भाऊसाहेब यांचें.

तसाच सोशिला. पाणी नाहीं, बाणानीं शर्तच केली, दोन घटका रात्र जाहली, श्रीमंत निघाले, तेव्हां जवळ दोन बाणांच्या टप्यावर ओढा होता त्याजवर मोंगलानें मुक्काम केला.

नं० ४६

श्रीगणराज.

अपत्यें गोपाळानें साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत मार्गशीर्ष शुद्ध १२ बुधवार मुक्काम रुईरातंजन जाणोन वडिलांचे आशीर्वादें करून समस्त सुखरूप असों विशेष. मोंगल नीट घाण्याच्या निंबगांवावर आला. तेथून हा मार्ग टाकून नगर उजवें तीन कोस टाकून चासेवर येऊन राहिला. आज अकूळनेरावर अथवा पुढें एक कोस इतक्यांत मुक्काम करून राहील. काल संध्याकाळीं श्रीमंतांकडील फौजेचें अघाडीस तोंड लागलें. त्याजमुळें आह्मीं या बाजूस उठलों. फौजा आमच्या जवळ आल्या पाहोन पुढील फौज मोंगलाची बेजरब हुजरातीवर उठली होती ती या पायबंदामुळें थबकून राहिली. अघाडीस हत्यार चांगलें लागलें. आम्हीं जवळ गेलों तों त्यानीं लागल्याच ढाला उभ्या करून मुक्काम केला. आमच्या तोंडावर तोफा आणून फार मार दिला. व बाणानीं ही त्या प्रकारेंच. तेणें करून आमच्या या बाजूच्या फौजांतील पंचवीस तीस घोडें माणूस ठार जाहलें. चाळीस पन्नास घोडें माणूस जखमी जाहलें. लाग नव्हता याजमुळें निकड केली नाहीं. मध्यें वोढा ठेवून आराबा[1] पसरून उभे होते. अघाडीचीं निशाणें मोंगलाचीं आमच्या हुजरातीच्या फौजानीं चांगलीं मागें सारून आणून घातलीं. तेथें कोण कोण जायां जाहले हें अद्याप पत्र आलें नाहीं. आल्यानंतर सेवेशीं लिहितों. श्रीमंत नगरावर काल होते. मोंगलानें पहिला मार्ग टाकून घोसपुरीचा मार्ग धरून येतो. आमच्या दोन्ही तिन्ही पथकांतील नामांकित कोणी ठार जाहला नाहीं. काल संध्याकाळीं आमच्या तोंडावर जानोजी निंबाळकराची फौज चालोन आली. त्यांत करोल फार त्यानीं हरी गोपाळें[2]——

---

१ आराबा= तोफखाना. २ हें पत्र इतकेंच अपुरें सांपडलें.

नं० ४७

मोरोबल्लाळ यांजकडून गोविंद हरीस पत्र मार्गशीर्ष शु॥ १२ सौम्यवासरचें

" यवन निंबदेहऱ्याचा घांट चढून पिंपरीवर राहिला. दुसरे दिवशीं घाण्याच्या निंबगांवास राहिला. तिसरे दिवशीं जांबगांवचा रोंख चुकावून नगरचे रोंखें ३।४ कोस येऊन राहिला. काल मंगळवारीं नगर डावे हातें टाकून चासेवर आला. चौगिर्द[1] फौजा आहेत. काल चोंहींकडे ही झूज जाहलें. आज अकूळनेर उजवे हातें टाकून पुढें राहतें ह्मणून गांव आहे तेथें राहलिसें दिसतें. पुण्यास यावें हा अर्थ फार आहे. फौज ही आज तागायत साठ हजार जमली आहे. परंतु वेतरतुदेमुळें सर्व गोष्टी घडतात[2]. यवन मजलीस[3] आलियावर सरकारच्या फौजा तोंडावर येतात. असें वर्तमान आहे. श्रीमंतांचा तो करार आहे कीं, देऊन सल्ला करणें नाहीं. याजमुळें बाका (?) ही करूं म्हणतात. परिणाम काय होईल पहावा ! आम्हांविशीं काळजी न करावी. "

नं० ४८

श्रीगणराज.

अपत्यें गोपाळानें साष्टांग नमस्कार विज्ञापना तागयत मार्गशीर्ष वद्य २ रविवार पावेतों वडिलांचे कृपेनें समस्त सुखरूप असों. विशेष. नित्य एक पत्र पाठवीत नाहीं ह्मणून शब्द ठेवून लिहिलें; त्यास उद्यां चांगलें युद्ध होईल तेव्हां लिहून पाठवावें ह्मणून पत्रें पाठविलीं नाहींत. डांकेच्या जासुदा समागमें संकलितच लिहित गेलों. आतां नित्य मुजरेंद[4] पत्र पाठवीत जाऊं. मंगळवारीं एकादशीस कामरगांवावर निजामअल्लीखान आला त्यावेळेस भोंसले व बाबूजीनाईक बारामतिकर व हुजरात थोडीशी यांचें

---

१ चौगिर्द= चोंहोबाजूनीं. २ ' आमची फौज साठ हजार पर्यंत जमली आहे, परंतु व्यवस्था नसल्यामुळें मोंगलानें पुढें चालून येणें इत्यादि गोष्टी घडतात' असा लिहिणाऱ्याचा भाव. ३ मजलीस येणें = वाट चालूं लागणें. ४ मुजरद= तावडतोब.

डाव्या बाजूस तोंड चांगलेंच लागलें. भोंसल्यानीं फारच केली. भोंसल्याकडील व मोंगलाकडील शेंपन्नास घोडें माणूस जायां जखमी जाहलें. कांहीं शें पन्नास ठार जाहलें. नारोशंकर वगैरे साऱ्या फौजा उठल्या असत्या तरी फारच चांगलें युद्ध होतें. परंतु सारे उठले नाहींत. आम्हांकडील बाजूस मोंगलाचें सामान जथोन होतें. करोल गाडदी ओढा धरून राहिले होते. मल्हारराव रास्ते व हरी गोपाळ व विसाजी कृष्ण यांची गोळागोळी जाहली. तलवारीस तलवार चालली. शें पन्नास घोडीं माणसें गोळ्यानीं ठार झालीं. आम्हीं तलवार[1] चालवावी तोंवर मोंगल मुक्काम करून राहिला. गुरुवारीं त्रयोदशीस आम्हीं तयार होऊन गेलों तों मोंगलाची कैही[2] पसरली होती. तेव्हां आम्हांकडील लोकानीं चाळीस पन्नास तट्टें व उंटें आणिलीं. फौजा जमा व्हाव्या ह्मणून उभे राहिलों. फौज ही जमली. तेव्हां तोफा सोडून जमून पुढें चालून जात होतों. आम्हीं व चिरंजीव नीलकंठ राव व विसाजी नारायण इतक्यांनिशीं लढाईचें तोंड लागलें. तीन चार उलटण्या जाहल्या. दोन घटका पावेतों युद्ध जाहलें. श्रीमंत राजश्री दादासाहेब टेंकडीवर चढून साऱ्या फौजा पहात होते. फारच चांगली लढाई जाहली. शें पन्नास माणूस घोडीं जायां जखमी जाहलीं. हरी गोपाळ[3] यांचें ही तोंड एका उलटणीस लागलें होतें. दहावीस तिकडील जायां जखमी जाहलें. रास्ते व विसाजी कृष्ण यांचीं हत्यारें चाललीं नाहींत. लढाई फारच चांगली जाहली. आणखी दोन घटका दम धरावा तरी माणूस फारच जायां जखमी होईल, ह्मणून तोफा लागू केल्या. मंगळवारीं कामरगांवावरी होतों. बुधवारीं मशिदीच्या रांजणगांवावरी आलों. गुरुवारीं आमची तिन्ही पथकांचीं लढाई सुरू जाहली. आज पंधरा दिवस सारे फौजेची लढाई श्रीमंत करणार. दिवस नेमितात, मग नाहीं ह्मणून पत्र पाठवितात! मंदवारीं लढाई नेमिली आहे ह्मणून शुक्रवारींच आम्हांकडे कारकून पाठ-

---

१ तलवार चालविणें = अंगाशीं भिडून लढाई करणें. २ कही = धान्य, वैरण, सर्पण वगैरे सामान. हा या शब्दाचा मूळ अर्थ. परंतु सामान्यतः असें सामान गोळा करून आणणारी सैनिकांची टोळी व तिजबरोबरील बैल, तट्टें, उंटें, हत्ती या सर्व समुदायास हा शब्द लावण्याचा प्रघात होता. ३ हरी गोपाळ याजकडील.

विला होता. " आम्हांकडे नजर राखून राहणें. आम्हीं लढाई सुरू करितों, तिकडून तुम्हीं ही सुरू करावी. " आम्हीं सामान बांधोन जथेन इकडील बाजूस होतों, तिकडे ही हुजरात, भोंसले वगैरे तमाम फौजा उभ्या राहिल्या होत्या. लढाई सुरू करितील म्हणोन फार वाट पाहिली. श्रीमंतानीं तोफा मात्र लांबून लावून गोळे टाकिले, ते ही मोंगलाच्या फौजेंत पडले नाहींत. आम्हीं इकडोन पांचपंचवीस बाण टाकिले. बाणदार मात्र ठार जाहले. एकंदर फौजा उभ्या राहिल्या तेव्हां तीन अंगानीं फौजा, अघाडी मात्र मोकळी ! फौज ही फार जथली होती परंतु कोणाचे मनांत युद्ध करावेंसें नाहीं. श्रीमंत दादासाहेबांचें आवशीस बोलणें एक आणि पहांटेस बोलणें एक ! कारभारी यांचे मनांत बुडवावें असें दिसतें. भोंसल्यांचा भरंवसा फार आहे. "

नं० ४९

श्रीगणराज.

अपत्यें गोपाळानें साष्टांग नमस्कार विज्ञापना ता॥ मार्गशीर्ष वद्य ३ इंदुवार मुक्काम बांगदरी नजीक इमामगांव जाणोन वडिलांचे आशीर्वादें करून समस्त क्षेम असों. विशेष. काल मोंगल लोणी वरून नीट चांभारगोंद्यांस चालिला तेव्हां आमच्या फौजा तमाम पिछाडी पासोन सभोवत्या उभ्या राहिल्या होत्या. चांभारगोंदें दीड कोस उरले उपर ऐन मोंगल माळावर व्हावयासीं आणि आमच्या तोफा पिछाडीस लागू व्हावया गांठ पडली, तोफांचा पिछाडीवर मार भारी जाहला. अघाडीस सरकारची फौज उठली तिणें पुढील म्होरपें[2] अगदीं माघारी फिरविली. आम्हीं उजवे बाजूस खडपें[3] धरून केवळ जवळ गोळीच्या माऱ्यांत जाऊन उभे राहिलों, तेथून बाणांचा ही मोठा मार दिला, चोंहोंकडून असा ताणून मोंगल उभा केला.

---

१ ' सखारामबापूच्या मनांत राज्य बुडवावें असें आहे. तसें नसतें तर एक" ह्या जानोजी भोंसल्यावरच सर्व भिस्त ठेवून त्याच्या सल्ल्यानें तो वागत आहे तसा न वागता; ' असा लिहिणाराचा अभिप्राय आहे. २ म्होरप = मोहरा, फौजेची अघाडी. ३ खडपें धरून = खडकांच्या आश्रयानें.

सैंध्याकोळच्यां प्रहर दिवसाषासोन एक घटका रात्रपर्यंत आगीनें मोंगल भाजून काढिला. असा मोंगलावर कोणत्या ही कधीं मार जाहला नाहीं. मोंगलास पाणी नाहीं. ताणून उभा केला. मग त्याजला कोसभर चांभारगोंदें उरलें परंतु आटपेना ! तेव्हां उजवे बाजूस पाण्यासाठीं बाणाचा टप्पा सरून जाऊन उतरला. तेव्हां दोन घटका रात्र जाहली. आमच्या तोफा जवळ लागू जाहल्या होत्या त्याजवर उलटेल झणून साऱ्या फौजा जपून होत्या. परंतु काल कांहीं त्यास आवांका जाहला नाहीं. कालच्या प्रमाणें मोंगलास कधीं मार बसला नाहीं. मोंगल ही गार जाहला. पाण्यासाठीं ही हैराण. आमच्या गोळ्यानीं व बाणानीं त्याची फौज व बुनगें सारें हालविलें. आम्हांस ढांसणें चांगलीं सांपडलीं. जवळ फारच होतीं परंतु आमचा सर्वांचा बचाव जाहला. विसाजी नारायण याजकडील चार घोडे, दोन माणूस, व आम्हांकडील दोन तीन घोडे ठार व दहापांच जखमी या प्रमाणें आहेत. ईश्वरें आम्हांस ढांसणें चांगलीं दिलीं त्याणें खैर जाहली. गाडद्यानीं दोंहींकडील फारच चांदरात केली. हुजरातेची व चोंहींकडील फौजेची खैर जाहली. मोंगलास असा मार कधीं जाहला नाहीं. गार जाहला. सेवेशीं विदित होय. मोंगल आज चांभारगोंद्यांस जाऊन पुढें कोणत्या मार्गें येतो पुण्याकडे, हा सुमार पाहोन आम्हीं लिहून पाठवून देतों. बहुत काय लिहिणें हे विनंती.

अपत्यें नारायणानें व नीलकंठानें व पुरुषोत्तमानें व मोरोबानें व बामनानें व परशुरामानें व कोन्हेरीनें साष्टांग नमस्कार विज्ञापना. वडिलीं कुरुंदवाडचीं पत्रें पाठविलीं आहेत हीं खाना करावीं. काल ईश्वर कृपेनें व वडिलांचे आशीर्वादें करून सर्वांची खैर जाहली. मोंगलास आजन्मांत असा कधीं मार जाहला नाहीं. हुजरातीचे समाचारास पाठविले आहेत. आल्यानंतर सेवेशीं वर्तमान लिहून पाठवून देतों. विदित होय हे विज्ञापना.

पोष्य विसाजी नारायण कृतानेक साष्टांग नमस्कार. रुमाल लाबून दिले झणून लिहिलें, उत्तम केलें. येथें वडिलांचे आशीर्वादें करून

---

१ गार जाहला = घाबरला, भिऊन स्तब्ध राहिला. २ ढांसण = माऱ्याची जागा.

आजपर्यंत सर्व क्षेमरूप आहोंत. उतावळी करून नाहक जायां होत नाहीं. हे विनंती.

सेवेशीं गंगाधर आपाजी व शिवाजी बावाजी साष्टांग नमस्कार विनंती. सदैव पत्रीं सांभाळ करीत असलें पाहिजे. हे विनंती.

नं० ५०

गोपाळराव गोविंद यांचें गोविंद हरीस पत्र. मार्गशीर्ष वद्य ९ सौम्यवासरचें–

" मोंगलानें कालच्या इंदुवारीं दीड प्रहर दिवसानंतर अघाडीची पिछाडी करून मुक्काम केला. इकडील तोफानीं व बाणानीं फार नाश केला. त्याचें घोडें माणूस आठशें पर्यंत ठार, या खेरीज जखमी हजार दोन हजार पर्यंत झालें. ते दिवशीं आगीनें फार जेर केला. माघारा तोफांवर चालून घेणार होता. आम्हीं अर्धे गोळीचे टप्यावर उभे राहिलों. तेथून करोलांकरवीं उड्या टाकवून मार करविला. बाण सोडिले. आम्हीं जवळ आलों पाहून थवकून राहिला. आमच्या बाजूच्या सुमारें ओढा गेला होता, त्याच तर्फे खाशांच्या अंबाऱ्या होत्या. त्या ठिकाणीं तोफेच्या गोळ्यांचा मार बहुत, या करितां या कडेस येऊन उभ्या राहिल्या. आम्हांस जवळ पाहून त्यांकडील लोकानीं घोड्यांवरून उड्या टाकून उभे राहिले. आम्हांवर बाणांचा, तोफांचा व बंदुखांचा कांहीं वर्षाव केला तो लिहितां न पुरवे! वडिलांच्या व श्रीमंताच्या पुण्यप्रतापें राखिलें. एरवीं कांहीं बरा विचार नव्हता. पुढें ही आमच्या फौजा बाजूस होत्या सबब तोफांवर त्याचा लगट न जाहला. यजमानास वकिलांनीं[1] लिहिलें त्यांत उजवे बाजूस गोपाळराव यांणीं जबरदस्त पायबंद बसविला याजमुळें मोंगलाचा तोफांवर चालून घेणेंचा मनसबा राहिला; [असें लिहिलें आहे.] मोंगल मंगळवारीं कूच करून चांभारगोंद्यांनजीक येऊन उभा राहिला. आम्हीं ही तयार होऊन

---

१ यजमानास वकिलानीं लिहिलें = पेशव्यांचे कारकून बातमी लिहून पाठविण्या करितां पटवर्धनांच्या फौजेंत होते त्यानीं लिहिलें.

आलों हें पाहून व पाणी जवळ नाहीं हे दोन्ही मनसबे ध्यानांत आणून तेथेंच राहिला. मोंगल भिवरेच्या पाण्यास मिळून मग पुण्याचे सुमारें येईल तों पर्यंत आठ पंधरा दिवस पाहिजेत. त्यास संधि पाहून आणखी तोफा लागू केल्या तर मग पुण्यास जाणार नाहीं. आमच्या फौजा भारी जमा जाहल्या आहेत. श्रीमंत खाशांचें प्रालब्ध उत्तम आहे. मोंगल खामखां तह करीलसें दिसतें. परवांचे मारानें मोंगलाचे लष्करांतील माणूस फार गडबडलें आहे. "

नं० ५१

रघुनाथ बाजीराव यांचें गोपाळराव गोविंद यास पत्र. (बिन मितीचें)

" मोंगलाचा मनसबा असा दिसतो कीं, चांभारगोंद्यांस बुनगें ठेवून सडे होऊन आह्मांवर चालून यावें; असा भाव दिसतो. उदईक बुधवारीं अगर दुसरे दिवशीं कूच करीलसें दिसतें. यास्तव उदईक मोंगलाचा मुक्काम असला तरी तुह्मी पेडगांव अगर सिद्धटेंक या अजमासें राहून आह्मांवर तुमची नजर व तुम्हांवर आमची नजर असों देणें. पुण्याच्या रोखें फौज अगदीं नाहींसी होती यास्तव सातशें राऊत मात्र अघाडीचे गांव जाळावयास ठेवणें. येणें प्रमाणें तरतूद करणें. तुह्मीं व होळकर व हरीगोपाळ व विसाजी कृष्ण मिळोन हें काम जरूर जरूर करणें. हाच कागद तुह्मीं तिघांस दाखविणें. सरकारचे फौजेंत घोडीं माणसें जखमी फार आहेत. "

नं० ५२

आपाजी शामराव याचें शिवाजी बल्लाळ यास पत्र. पौष शुद्ध अष्टमी रविवारचें—

" राजश्री महिपतराव कवडे बालेघांटावर आले आणि तिकडील ठाणीं तमाम घेतलीं. जोगाईच्या अंब्यास वेढा घालून आंबें घेतलें. रातंजनकाठीकडे येणार. पुढें नळदुर्गास जाणार. त्यांच्या कुमकेस नारो शंकर

ही येणार. राजश्री बहिरजी पांढरे श्रीमंतांकडे बदलून मोंगलांच्या सनदा घेऊन भिवरे पलीकडे एक दोन ठाणीं घेतलीं. पुढें कासेगांव, सांगोलें इकडे येणार तों पाळत राखून धरून आणून करकंबेंत कैदेमध्यें ठेविला आहे. मोंगलानें टोंक्यांचें लिंग फोडिलें, गोवध केले, ह्मणून त्यावर मराठे मंडळी खट्टे होते. चांभारगोंद्यांची ही खराबी केली ह्मणून फार उदास आहेत. मोंगलाची फौज पन्नास साठ हजार. शिवाय तोफखाना आहे. श्रीमंतांची ही फौज सव्वा लाख पावेतों जमा जाहली आहे. राजश्री जानोजी भोंसले मनापासून स्वामिकार्यास झोंबतात. त्यांची फौज मागें रघोजी करांडा राहिला होता तो देखील आणिला. श्रीमंत राजश्री दादासाहेब तो लोकांस ताकीद करितात कीं, " कोणी घोडीं घालूं नका. मोंगलाचीं जोंवर उमेद असेल ते पुरव्या. यंदाचे सहा महिने त्याचा पिच्छा सोडित नाहीं ! " परंतु लोक आपले उमेदीनें लढाई करितात. गुरुवारीं खानापुरास वर्तमान आलें कीं, राजश्री जाधवराव यांचे मार्फत श्रीमंतांचा वकील मोंगलाकडे गेला त्याची बेअब्रू मोंगलानें केली ह्मणून रामचंद्र जाधवराव रुसून मोंगलाकडून इकडे आले. त्यांस सेनापति[1] द्यावी हा करार जाला. या प्रमाणें वर्तमान भगवंतराव प्रतिनिधि यांचे घरास आलें. मोंगल पैहिलीं ठाणीं मागतो त्याबद्दल पेशवे नवी जहागीर मागतात. सध्यां भुलेश्वरावर अवघेच आहेत. आज आठ रोज रविवारीं मोठीशी लढाई जाली. मोंगलाची खराबी फार जाहली. भोंसल्याचीं व पिराजी नाइकाचीं व गमाजी पंताचीं माणसें पांच सातशें पडलीं. दादासाहेब फार सबावास (?) आले आहेत. श्रीमंत राजश्री माधवराव पेशवे तमाम लोकांचा दिलासा[2] करितात. सर्वांची ममता त्यांच्या पायांशीं फार आहे. "

नं० ५३

गोपाळराव गोविंद यांचें गोविंद हरीस पत्र. छ० ३ जमादिलाखर बधवारचें—

१ सेनापतीचें पद. २ उदगीरच्या लढाई नंतर मराठ्यांकडे तहानें आलेलीं.
३ दिलासा करणें = समाधान करणें, धीर देणें.

" आज ही मोंगलाचा मुक्काम उरळीसच आहे. तोफा श्रीमंतानीं नदी आलीकडे आणिल्या होत्या. कूच होतें तरी तोफा लाविणार होते. कूच न जाहलें याजकरितां तोफा लावावयाचा मनसबा राहिला. सलूख्याचा ही संदर्भ लागला आहे ह्मणून वर्तमान ऐकतों. "

इ० स० १७६२.

चुलत्या पुतण्याचें भांडण.
देशस्थ व कोकणस्थ यांमध्यें चुरस.

पुण्याजवळ उरळीचे मुक्कामीं मोंगल आला तेव्हां मराठ्यानीं त्या समोंवती चोंहोंकडून गराडा घालून अगदीं जर्जर केलें, तेव्हां त्यानें तहाचें बोलणें लाविलें. त्यावेळीं बाबूजी नाईक बारामतीकर, गोपाळराव पटवर्धन, रामचंद्रराव जाधवराव इत्यादि सरदारांचें ह्मणणें पडलें कीं, या प्रसंगीं मोंगल आयता हातीं सांपडला आहे तर याचा समूळ नाश करावा. तहच करणें झाला तर निदान त्याजपासून पुष्कळ मुलूख तरी घ्यावा. परंतु त्यांचें ह्मणणें न ऐकतां दादासाहेब व सखारामबापू यानीं तह केला त्यांत उलट सत्तावीस लक्षांचा मुलूख मोंगलासच परत दिला ! सखारामबापू कपटी व लोभी मुत्सद्दी होता. हा दरबारांत एकटाच देशस्थ मुत्सद्दी—आणि तो ही दिवाणगिरीच्या मुख्याधिकारावर असल्यामुळें—दुसरे कोकणस्थ मुत्सद्दी व सरदार त्रिंबकरावमामा, बाबूराव फडणीस, गोपाळराव पटवर्धन, बाबूजीनाईक, रास्ते वगैरे होते ते त्याचा द्वेष करीत असत. माधवराव बल्लाळ उर्फ रावसाहेब पेशवे व त्यांची आई गोपिकाबाई. यांस ही बापूच्या कृत्रिमाविषयीं शंका आलेली होतीच. रघुनाथराव दादासाहेब यानीं पेशवे लहान आहेत तों राज्याचा सर्व कारभार मुखत्यारीनें चालवावा असें जरी ठरलें होतें तरी वर निर्दिष्ट केलेली सर्व मंडळी दादासाहेबांच्या हातांत फार दिवस अधिकार टिकूं देणारी नव्हती. दादासाहेबानीं हें सर्व आधींच ओळखून मोंगलाशीं मैत्री करून त्याच्या जोरावर वेळ पडेल तेव्हां आपल्या

प्रतिस्पर्ध्यांस चिरडून टाकावें ही दुष्ट इच्छा केली. त्यांस ही मसलत शिकविणारा सखारामबापू. या दोघांनीं मोंगलाशीं युद्ध चाललें असतां हलगर्जी पणाचें व कपटाचें वर्तन केलें तेव्हांच हा त्यांचा हेतु सरदार व मुत्सद्दी यानीं ताडिला होता. मुलूख देऊन तह करण्याचा प्रकार जेव्हां दादासाहेब व बापू यानीं घडवून आणिला तेव्हां लष्करांत फारच गवगवा झाला. मोंगल परत गेल्यावर बाबूजी नाइकानें साफ सांगितलें कीं, सखारामपंत जेथ पर्यंत दिवाणगिरीच्या जागीं असेल तेथपर्यंत आपण मुळींच नोकरी करणार नाहीं. इतकें सांगून तो आपल्या फौजेसह लष्करांतून निघून चालता झाला. गोपाळराव पटवर्धनानें दादासाहेब व सखारामबापू यांस तगादा लाविला कीं, फौज ठेवण्याबद्दल मला आजपर्यंत कर्ज झालें आहे त्याचा निकाल करून द्या, आणि कबूल केल्या प्रमाणें मिरज माझ्या हवालीं करून द्या. याच प्रमाणें आणखी कित्येक सरदारानीं आपापलीं कामें करून देण्याविषयीं तगादा लाविला तेव्हां दादासाहेब आपला मुख्य अधिकार सोडून देऊन रागाऊन स्वस्थ घरीं बसून राहिले व सखारामपंतानें ही दिवाणगिरीचा राजीनामा दिला. मग गोपिकाबाईनें असें ठरविलें कीं, त्रिंबक राव मामा व बाबूराव फडणीस यांणीं दिवाणगिरीचें काम करावें व दादा साहेबानीं या दोघा दिवाणांस सल्ला मसलत देत जावी. तें दादासाहेबानीं मान्य केल्या सारखें दाखविलें. नंतर दक्षिणप्रांतीं स्वारी करण्याचा निश्चय झाला. पटवर्धनांस मिरज द्यावी व सोंदें, बिदनूर वगैरे कर्नाटकांतील संस्थानांकडून खंडणी घ्यावी ह्मणून रावसाहेब पेशवे व दादासाहेब लष्कर घेऊन निघाले. तों मामा व फडणीस यांस सखारामपंत व दादासाहेब यां विषयीं भय उत्पन्न होऊन ते लष्करांतून परत आले. नंतर गोपिकाबाईनें पुनः त्यांस धीर देऊन बाबूरावास पुण्यास ठेविलें व मामास पेशव्यांच्या फौजेस जाऊन मिळण्याविषयीं आज्ञा केली. मामा तिकडे जाई तों लष्करें कृष्णातीरास जाऊन पोंचलें होतें व मिरज पटवर्धनांचे हवालीं करण्यांत आली होती. नंतर त्रिंबकराव व पेशवे व सारी फौज दक्षिणेस तुंगभद्रेपर्यंत गेली व दादासाहेब परत पुण्यास आले. ते तेथें आल्यावर त्यांच्या व स. खारामपंताच्या खटपटी पुनः सुरू झाल्या. त्या संधीस मल्हारराव होळकर

देशीं आला होता, त्यास आपणाकडे ओढण्यासाठीं या दोघांचे यत्न चालूच होते. पेशव्यांची स्वारी पावसाळ्याचे सुमारास परत आली तेव्हां दरबारांत पक्की दुफळी झाली होती.

नं० ५४L

श्री.

पै॥ छ० १० जमादिलाखर.

सेवेशीं विज्ञापना. तीर्थरूप राजश्री दादासाहेबांचे विचारें स्नानसंध्या करावी, एका कारभाऱ्यावर अखत्यार सांगावा, हा विचार मेहनत होत नाहीं ह्मणून मनःपूर्वक आहे. सखारामपंतानें ही अंग काढून घेतलें आहे. कारभार करीत नाहीं ह्मणतात. पण अंतःकरणा पासून नाहीं. पेंचामुळें ह्मणतात. सारे कोकणस्थ एकीकडे होऊन फशीं पाडितील यास्तव अंगा निराळें टाकितात. आम्हांस वेडिलीं आज्ञा केली कीं, 'राजश्री बाबूराव फडणीस यांजवर अखत्यारी देऊन ते व तुह्मीं कारभार करणें.' त्यावरून आम्हीं प्रत्युत्तर केलें कीं, आपण वडील. आपण कारभारांतून अंग न काढावें. दोन तीन वर्षे कारभार करावा. पुढें आम्हीं ओझें घ्यावया जोगे दोन तीन वर्षांनीं जाहल्यानंतर जशी आज्ञा कराल त्या प्रमाणें वर्तन करूं. या प्रमाणें बोललों. परंतु अद्याप ठराव झाला नाहीं. ठराव जाहल्यानंतर उदईक लिहून पाठवूं. आणीक कितीएक बारीक बारीक मजकूर आहे त्यासीं कृष्णाजीपंत गोरे यासीं पाठवावें. ते विनंती करितां विदित होईल. आपल्या विचारास येईल त्या प्रमाणें वर्तणूक करीन. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं० ५५L

श्री.

सेवेशीं, आम्हीं कारभारी नव्हों, बहुता दिवसांचे सेवक. कैर्ते

L ज्या पत्रांच्या नंबरांवर ही खूण असेल तीं सर्व पत्रें आह्मांस रा० वामन विष्णु लेले, वकील, पुणें, यांजकडून मिळालेलीं आहेत असें समजावें. हीं गोपिकाबाई, रावसाहेब व दादासाहेब यानीं एकमेकांस लिहिलेलीं असून फार महत्त्वाचीं आहेत. हीं पत्रें छापावयास दिल्याबद्दल आह्मीं रा० लेले यांचे फार आभारी आहों. १ दादासाहेबानीं. २ हा कृष्णाजीपंत व याचा भाऊ रामचंद्रपंत गोरे हे गोपिकाबाई समीप नेहमी राहणारे विश्वासू कारकून होते. ३ हें त्रिंबकरावमामाचें पत्र. ४ भाऊसाहेब.

होते ते गेले. सरकारी दौलत मातबर वेढणार मायेचा आणि कर्ता पाहिजे. दादासाहेब सर्वांस वरिष्ठ. आज सात महिने झाले. त्यांची कर्तेपणाची स्थिति कळली पाहिजे, कळोन गेली ! आतां कोठें थांग लागेना. सव्वा क्रोड दीड क्रोड मागील या दौलतीवरील कर्ज. पुढें ही होतच आहे. घरांत दहा[1]विसांचें सोनें रूपें होतें. खर्चोन गेलें. परंचक्र[2] आलें तें श्रीमंत माधवराव यांच्या प्रारब्धें करून पराभव पावलें. पंधरा दिवस मोंगलाशीं बोली लागून झाले. आठ[3] दिवस जाऊन झाले. अद्यापि एक ही गोष्टीचा निकाल नाहीं. " आमच्यानें कारभार होत नाहीं. तुम्हीं करा. बाबूराव यास अखत्यारी देतों. करा. " ह्मणतात. परंतु कोणास विश्वास पुरत नाहीं. यामुळें करणार मागें पुढें घेतो. रावबा[4] थोर असते तरी कांहीं चिंता नव्हती. त्यांचें वय लहान. त्यांचें भय कोणास वाटत नाहीं. दादासाहेब आपल्याच्यानें होत नाहीं ह्मणून ह्मणतात, तें चित्ता पासून नाहीं. आणि समुद्र वलयांकित पृथ्वीचें वडीलपण अनायासें आलें तें कोणास सोडवेल कीं काय ? सखारामपंतानें शिकविल्या प्रमाणें वोलतात. सखारामास एवढें दिवाणगिरीचें पद आलें तें नकोसें आहे कीं काय ? कृत्रिमेंकरून तो नको ह्मणतो. बाबूजी नाईक वगैरे यांचें मत सखाराम कारभारी असला तर आपण चाकरी करीत नाहीं. या गोष्टीमुळें ह्मणतात कीं, तुमच्या चित्तास जो येईल तो कारभारी करा. चौघानीं बाबूरावाचें नांव घेतलें, परंतु या विषयीं दादासाहेबांस संतोष नाहीं. बाबूराव परम निष्ठ. दादासाहेबांचा खर्च साठ सत्तर लक्षांचा, किंबहुना ऐशीं लक्षांचा साल संबंधें आहे. नानासाहेब महाराज गरीब नव्हते ह्मणून कळोन तितकें ही चालवीत होते. आतांचा प्रकार कसा घडेल ? नानासाहेबां मागें पंधरा दिवसांत हरणें पांखरें वगैरे सर्व तमाम दूर करून आपण संसार करणार असें दर्शविलें. परंतु आपला खर्च काय, हा कशास पाहिजे, हें ध्यानांत येत नाहीं. आयत्या पिठावर पोट भरून दहा वीस लाख कर्ज करून येत होते. सखाराम

---

१ दहावीस लाखांचें. २ नुकतीच झालेली मोंगलाची स्वारी. ३ आठ दिवस झाले हे मोंगलाकडे तह ठरविण्या करितां वकील जाऊन, कीं तह होऊन मोंगल परत गेल्यानंतर ? ४ राव = माधवराव पेशवे.

पंत दरसाल दहा पांच मिळवून आणीत होते. नानासाहेब पुसत, " कर्ज कां ? " तेव्हां सांगत कीं, " दादासाहेब धनी, ते जें करितील तें प्रमाण. आम्हीं काय करावें ? " असा जावसाल करीत. तेव्हां उगेच रहात. बटीक राख आवडती झाली म्हणून तिला धन्याचा संसार नीट करावा, सोयरीं आप्त यांजवर कृपा करावी, हें तिला अगत्य नाहीं. चार आपले वटीक दास मिळवून नाश केला, बुडाले, तरी तिचें काय गेलें ? धन्याचे मायेची एखादी हिताची गोष्ट सांगूं लागलें तर भलतेंच धन्यास समजावून त्याजवर रागें भरवावें. ऐसा सखारामाचा मजकूर. गरत धनीण नावडती झाली ! तिजवर धन्यानें अखत्यारी दिली तर ती धन्याचें हित करील. तुम्हीं धनी आणि एकासीं वाईट होऊन दौलत राखावी. निष्ठुरता दाखवूं नये. कारभारी करून, तो बरें करो, वाईट करो, असा तुम्हीं निश्चय करावा. तें तुम्हीं करीत नाहीं. दोंहीं दगडींवर हात ठेवून तमाशा पहातां, परंतु परिणामीं कळेल ! दादासाहेब वडील, लोक काय म्हणतील म्हणून भिऊन रहाल, (तर) दौलत बुडत्ये. दादासाहेब कर्ते असते आणि तुम्हांसीं विरुद्धाचरण करिते तरी चिंता नव्हती. आतां परिछिन्न बाबूराव यासच कारभारी करणें मनापासून, तर चित्त कठोर करून दादासाहेबांचें भय न धरितां सखारामास चार दिवस एकीकडे ठेवावा. व सखाराम कारभारी करणें मनापासून, तरी दादासाहेब जाणोत, दौलत सखाराम जाणो, रावसाहेबांस आपणापाशीं आणवावें. मनापासून रावसाहेब व सखाराम यांचें चित्त शुद्ध नाहीं. तो एखादे प्रसंगीं दगा करील. आमचा हेतु कीं, तुमचें कल्याण व्हावें. यामुळें लिहिलें म्हणून राग न करावा. सुचवावें म्हणून लिहिलें. ऐशीं हजार फौज, मुलखाचा सत्यानाश जाहला ! डोळे झांकून आंधळे होऊन आडांत पडूं नये. त्वरेनें दोंहोंतील एक करणें. लष्करांत आपापले विऱ्हाडीं सारे बसले आहेत. हे विज्ञापना.

नं० ५६L

श्रीशंकर.

तीर्थरूप मातोश्री वहिनी वडिलांचे सेवेशीं—

अपत्यें रघुनाथानें साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल तागायत छ० १२ जमादिलाखर पावेतों वर्तमान यथास्थित असे. विशेष. गोपाळ रायाचे मजकुराचें पत्र पाठविलें तें पावलें. सविस्तर अर्थ कळला. ऐशियास कारभाराचा सर्व मुखत्यार आम्हांकडील व सखाराम भगवंताकडील चिरंजीवावर व बाबूराव फडणीस याजवर दिला आहे. ज्या तऱ्हेनें निकाल निघेल तैसा ते काढितील. आम्हांस बरचेवर जें सुचेल तें सांगून निर्गमांत येईल. प्रस्तुत मोंगलाचे पेंचामुळें खर्चाची ओढ बहुत, यास्तव घरचें सोनें रुपें मोडून खावें लागलें. बाकी राहिलें असेल तें ही खावें लागेल. हें सर्व आह्मांस ठाऊक आहे. येवढेस गोपाळरायानीं ओढूं नये. समजून निकाल करून ध्यावा. या प्रमाणें त्यानीं केल्यास उत्तम आहे. सर्व होऊन येईल. चिंता नाहीं. पुण्याचे मुक्कामीं सात लक्ष रुपये नालबंदी देत असतां त्यांनीं न घेतली. सरंजामाची आड[1] घालून सरंजाम घेतला. त्याची सात लक्ष रसद मिळत होती ती न घेतली. मिरज आली[2] नाहीं यामुळें सरंजाम ही टाकिला. सर्व प्रकारें ओढिलें. यास्तव कर्जाचे पेंचांत आले. ऐसे यांचे मजकूर! कारभाराची रीत, जसा निकाल निघेल तसें करून घेतलियास सर्व होईल. तूर्त बिदनूरचा ऐवज सालबाद खंडणीचा दहा बारा लक्ष येत असतो तो यांजकडे द्यावा, व मिरज व लक्ष्मण कोन्हेर याचा तालुका पेशजी सरंजाम करून दिला तो याचा यांणीं घेऊन निकाल काढलियास उत्तम असे. सारांश, जसें बनेल तसें करून निकाल काढिला जाईल. हे विनंती.

नं० ५७

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद[3]. उपरी कालचे बुधवारचीं प्रतें अस्तमानीं गुरुवारीं चिरंजीवांचीं आलीं. त्यांत लिहिलें जे, बाबूजी नाईक याचे समाधानास्तव पुढें चिरंजीव नारायणराव व आबा यांस पाठविले आहेत. ते करार करून

---

१ आड घालून = हट्ट धरून, नडवून. २ मिरज आली नाहीं = मिरज हातीं आली नाहीं. ३ पत्र त्रिंबक हरीनें लिहिलेलें.

ऑलियाउपर कौणी तरी जाऊन घेऊन येतील. श्रीमंत मुख्य प्रधान दक्षिणप्रांतें जावयास बुधवारीं निघोन डेरे दाखल जाहले म्हणून लिहिलें होतें. चिरंजीवास श्रीमंत राजश्री दादासाहेबां बरोबर जावयाचें कारभारी यांचे मतें जरूर आलें, यास्तव त्यांची नेमणूक तिकडे जाहली. दक्षिणप्रांतीं विसाजी हरी याचे नांवें बिदनूरचा ऐवज आमचे रदकर्जास देवविला व तालुका ही देवविला. त्याचे बंदोबस्तीस आम्हांकडील फौज व चिरंजीव भाऊ व तुमचें पथक व विसाजीपंत व चिरंजीव नारायणराव यांणीं जावें. या खेरीज आणखी ही फौज नेमून देतात. मुख्यानीं कृष्णातीरापर्यंत यावें, करारा प्रमाणें स्थळ द्यावें, असा करार आहे. यांत काय घडेल तें पहावें, होईल वर्तमान तें वरचेवर लिहून पाठवीत जाऊं. पंधरा हजार रुपये येथें आले त्याचें वर्तमान तीर्थरूपांचे पत्रावरून कळेल. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

नं० ५८L

श्रीशंकर.

पुरवणी. मातोश्री वहिनी वडिलांचे सेवेशीं—

विनंती उपरी. चिरंजीव तरी खावंद आहेत परंतु लेकरूं आहेत. सखाराम गेले तेव्हां बाबूराव व त्र्यंबकराव या उभयतांस कारभार अगदीं सांगितला. तेव्हां तीन दिवस त्यांणीं केला. मग म्हणूं लागले कीं, " स्वामी उदास दिसतात, यामुळें आमचें लोकांवर वजन पडत नाहीं. तरी स्वामीनीं उदास नसावें. आह्मांस मसलत सांगत जावी. आम्हीं स्वामींस सांगत जाऊं. असा परस्परें ठराव करून मग जें करणें तें करीत जावें. केवळ आम्हींच करितों असें जाहिराण्यांत आल्यास तें काम शेवटास जाणार नाहीं. " असें कबूल करविलें. त्यावर सिद्धटेकावर[2] मिरज ध्यावयास चिरंजीवांची रवानगी केली. ते कोसावर उतरले. आमचें जाणें गुजराथ व हिंदुस्थान या रोखें व्हावेंसें ठरलें. तेव्हां आम्हीं उभयतां कारभाऱ्यांस पुसलें कीं, " हिंदुस्थान गुजराथ पर्यंत मुलुख अगदीं अमली[3] आहे. आम्हीं वाटेनें काय खावें ?

१ इचलकरंजीकरांचा कारभारी विसाजी नारायण. २ सिद्धटेकच्या मुक्कामीं.
३ अमली = सरकाचे अमलांतील. अर्थात् जेथून खंडणी घेतां येणार नाहीं असा.

रोजमरियास ऐवज कोठें आहे ? दरमहा तीन चार लक्ष रोजमरियास पा-हिजेत. यास ऐवज कोणता ? " त्यावर मामा बोलले कीं, " आम्हांस गुजराथचे सुमारें जावें हेंच बरें दिसतें. " बाबूराव कांहीं स्पष्ट बोललेच नाहींत. मग घटिकाभरानें दोघे ही बोलूं लागले कीं, " ऐवज परिछिन्न मिळत नाहीं, ते पक्षीं कर्नाटकासच जावें. " असें बोलले. गोपाळराव मात्र रात्रीं येऊन बोलले कीं, " साऱ्या फौजेनें कर्नाटकास जाऊं नये. " परंतु उभयतां कारभारी यानीं कर्नाटकचेंच संमत दिलें. मनांत उभयतानीं आणिलें कीं, " हे आमचें ऐकत नाहींत. तेव्हां यांजपाशीं कशास रहा-वें ? " असें मनांत आणिलें असेल. परंतु बोलून दाखविलें नाहीं. आम्हीं कांहीं कर्नाटकास जावयाचा आग्रह केला नाहीं. विचार सुचला तो मात्र सांगितला. सेवटीं बाबूराव ऐवजाची तरतूद करितों ह्मणून पुण्यास मोरोबा सुद्धां गेले. त्र्यंबकराव बाबूजी नाइकाची समजावीस करून लष्करास येतों असें कबूल करून चिरंजीवा बरोबर गेले. तेथून चिरंजीवांचा निरोप घेऊन पुण्यास गेले. आम्हीं विचार सांगितला इतका मात्र आम्हांकडे दोष. वर-कड ओढकपण[1] आम्हीं तिळमात्र केलें नाहीं, व पुढें ही करावयाचें नाहीं. आम्हीं दरकूच कृष्णातीरास आलों. वडिलीं त्या उभयतांस समजावून त्र्यं-बकरावास आम्हांकडे पाठवावें. आमचा भार सांप्रत त्या उभयतांवरच आहे. आम्हांस ते दगा देऊन गेले. आम्हीं कांहीं अखत्यार काढिला ना-हीं. रामचंद्र गणेश, कृष्णराव वल्लाळ, कृष्णराव पारसनीस, विसाजी कृष्ण, असे आम्हांजवळ दहा कारभारी आहेत. परंतु आमचा भार उभयतांवरच आहे. वडिलीं जशी पाहिजे तशी त्यांची खातरजमा करावी. या गोष्टीस आळस कदापि करूं नये. कृष्णागोऱ्या अथवा रामचंद्र, हर कोणी येथें राहिला तरी त्याचे प्रत्ययास येईल. उभय कारभारी हशाणे, मेहनती, तर-तुदी आहेत. परंतु संशय फार बाळगितात. आम्हीं भोळे, जें मनास येतें तें बोलतों. त्यानें बिघडतें. असो. जाहलें तें जाहलें. पुढें बोलणार नाहीं. उभयतां कारभारी यांणीं व चिरंजीवानीं दौलत करावी हेंच आमचें मानस आहे. आम्हांस करावयाची हौस तिळमात्र राहिली आहे नाहीं तें सर्व व-

१ ओढकपण – द्वाडपण.

डिलांस विदित आहे. हे विनंती.

नं० ६९L

पै॥ छ० १० रजब.

श्री.

अपत्यें माधवरायानें चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. पांडूवरोवर आज्ञा आली कीं, " कारभारी यांस सर्व प्रकारें विश्वास देऊन त्यांची निशा पुरवून त्यांसच कारभारास लावून काम चालवावें. " ह्मणून आज्ञा. त्यास लिहिलें हें उत्तमच. परंतु त्यास विरोध या प्रमाणें पडतो. उभयतां कारभारी ह्मणत आहेत कीं, " आम्हांस कर्ज द्यावें लागतें. तरी दादासाहेव यांचे बुद्धीचा विश्वास येत नाहीं. तरी तुम्हीं शपथपूर्वक निश्चय करावा कीं, जर दादासाहेव यांसीं ही विरोध प्राप्त जाहला तरी कबूल करूं; पण तुमच्या पक्षांत आहों. या प्रमाणें शपथपूर्वक विश्वास द्यावा. " ह्मणून आड घातली; त्यास आम्हीं बोललों कीं, तीर्थरूप मातोश्रीस निवेदन करून दोन तीन दिवसांत याचें उत्तर देऊं. त्यासीं त्यानीं धीर न धरितां बाबूराव गेले व मामा ही न पुसतां गेले. ऐशियास या प्रमाणें शपथ दिधलियावरी कारभारी यांसीं व तीर्थरूप यांसीं कांही एक निमित्तामुळें विरोध प्राप्त होईलच. त्यानंतर घरांतच कलह जो पूर्वी नाहीं जाहला तो होईल. यास्तव शपथ करणें उचित नाहीं. जरी असें केलें नाहीं तरी कारभारी कारभार करीत नाहींत. बंदोवस्त होत नाहीं. लटकें बोलावें हें उचित नसे. यास्तव तीर्थरूपांकडे जावें. तेथेंच त्यांच्या मर्जी प्रमाणें जें योग्य होईल तें करावें, असें मनांत आणून मजल दर मजल जातों; आणि कारभारी यांचे मध्यस्थ यांशीं बोलतों कीं, तीर्थरूप स्वच्छ अंतःकरण स्फटिकवत् आहेत. संगदोषें करून मात्र बुद्धि चांचल्य होतें. यास्तव विचारें विचारें करून दुःसंग दूर करावा; ह्मणजे उत्तम होईल. असें बोलतों. कळलें पाहिजे. त्यास या विषयीं कसें करावें हे आज्ञा करावी. मजकूर कोणास विदित न होय तें करावें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना. रवाना शुक्रवार प्रातःकाळ.

नं० ६०L

पै॥ छ० २७ रजब.

श्रीशंकर.

तीर्थरूप मातोश्री वाहिनीबाई वडिलांचे सेवेशीं--

अपत्यें रघुनाथाचे व माधवाचे साष्टांग नमस्कार विनंती उपरी. वडिलीं कृपापत्र पाठविलें कीं, " लिंबकराव यांणीं मान्य केलें आहे कीं, आम्हीं कारभार करितों. ऐशियास तुमच्या लिहिल्यावरून आम्हीं त्यांसीं कबूल केलें आहे कीं, तुम्हीं जे मसलत कराल व बंदोबस्त चौकशी कराल ते उभयतां चिरंजीव मान्य करितील. " असें वडिलीं तपशिलें लिहिलें तें कळलें. ऐशियास या गोष्टीस आम्हीं पहिले ही मान्य होतों, व पुढें ही वडिलांचे मर्जी शिवाय नाहीं. परंतु वडिलीं तूर्त त्यांस सांगावें कीं, यंदां चार महिने ज्येष्ठ पर्यंत कळेल तसें निभावून पुण्यास यावें. परस्परें द्वैतभाव न दाखवावा. साऱ्यानीं एक विचारें राहून चार रुपये मेळवून शिबंदी जोडून पुण्यास यावें. पुणियास आल्यावरी वडिलांची व आम्हा उभयतांची व त्या उभयतां कारभारी यांची एक जागीं भेट होईल, व तेथें वडिलां समक्षच त्यांची निशा आम्हीं करूं. तूर्त विसकटा विसकट जाहली आहे. कारभारांत फार पेंच पडले आहेत ते लिहितां विस्तार आहेत. वडिलांस तिकडे पेंच पाच विना दर्शन जाहल्या उमजणार नाहींत. यास्तव हर कसा मामानीं आम्हीं मिळोन चार महिने हा गाडा लोटून पुण्यास यावें. तों पावेतों आम्हीं चुकलों तरी त्याणीं वांकडें न दाखवावें. ते चुकले तरी आम्हीं दाखविणार नाहीं. पुढें पुण्यास आलियावरी पक्की निशा वडिलां देखत होईल. त्या प्रमाणें अमलांत ही येईल. यांत जशी मर्जी असेल तसें त्याहावें. आतां रिकामे दिवस घालवावयाचे नाहींत. एक एक दिवस लक्षाचा जातो. यास्तव दरकूच जातों, चार रुपये मिळवितों. मामांस ही पाठवावें. त्यांस चार दिवस उशीर लागला तरी आम्ही वाट पाहून दिवस घालवीत नाहीं. तडका[1] काम चालवितों. आम्हांस वडिलांचे मर्जी पेक्षां अधिक

---

१ तडका = झपाट्यानें.

नाहीं. तूर्त चार महिने कोठें काहीं वेडें वांकडें वाटलें तरी त्याचा तपशील रुबरू[1] बोलूं. हे विनंती.

नं० ६१L

श्री.

चिरंजीव राजश्री दादासाहेब यांसीं प्रती गोपिकाबाई. आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत छ० २६ रजब पावेतों यथास्थित असे. विशेष. राजश्री त्र्यंबकराव येथें आले होते, त्यास " दादासाहेबांचे आज्ञे प्रमाणें कारभार करितों, " असें मान्य करून आपणाकडे गेले. आम्हीं त्यांस चार गोष्टी सांगितल्या त्या त्याणीं मान्य केल्या. त्यांची यादी येणें प्रमाणें——

चिरंजीव दादासाहेबांची मर्जी राखून कारभार करावा. एकनिष्ठपणें व इतबारानें करावा. देशस्थ लोक असोत अथवा कोंकणस्थ. विना अन्याय पेंचांत आणूं नये. द्वेष करूं नये.

राजश्री त्रिंबकरायाजवळ आम्हीं मान्य केलें आहे जे, उभयतां चिरंजीव तुम्हीं जी मसलत सांगाल व सरकारच्या बंदोबस्ता करितां जो जो मजकूर सांगाल तो ते ऐकतील. कोणेविशीं संशय न धरितां कारभार करावा.

येणें प्रमाणें मान्य करून गेले आहेत. आपणास कळावें म्हणून लिहिलें आहे. आपलें पत्र चिरंजीव बाळास[2] दाखवावें. पूर्वी राजश्री महादबा[3] व रामचंद्र बाबा यांचा मान राखण्यांत येत असे. त्या प्रमाणेंच उभयतांचा मान राखून यांजवर पूर्ववत् विश्वास ठेवून कारभार घ्यावा. बहूत काय लिहिणें हे आशीर्वाद.

नं० ६२L

पैा॥ छ० ३० रजब.

श्री.

वडिलांचे सेवेशीं विज्ञापना तागायत छ० २७ रजब. मुक्काम येडूर,

---

१ रुबरू=समक्ष. २ माधवराव पेशव्यांस. ३ महादबा=महादाजीपंत पुरंदरे.

कृष्णातीर, येथें वडिलांचे आशीर्वादें करून यथास्थित असे. विशेष. वडिलीं आह्मां उभयतांचे नांवें पत्र पाठविलें तें पावलें. अभिप्राय अवगत जाहला. वडिलीं लिहिलें कीं, " मामा यांसीं तुम्हीं लिहिल्या प्रमाणें निशा करून तुम्हांकडे रवाना केलें आहे. अतःपर यांच्याच हस्तें कारभार घ्यावा आणि मनसबा जो सांगतील त्या प्रमाणेंच करावा. एकत्रच भार असलिया वर उत्तम होतें. " ह्मणून लेखन केलें. आपण लिहिलें हें अति उत्तम आहे. येथें तीर्थरूप राजश्री दादासाहेबांचा विचार क्षणक्षणा पृथक् पृथक् होत आहे. याज करितां मात्र कसें होईल हें कळत नाहीं. प्रस्तुत आपणास तीर्थरूपानीं पत्र लिहिलें आहे. त्र्यंबकराव येथें आलियावर लिहिल्या प्रमाणें च करूं. परंतु " आम्हीं येथें नवे कारभार केले आहेत ते मोडूं नयेत. गोपाळराव याचा जो कारभार केला आहे तोच करावा. मध्यें रदबदली करूं नये. व मजमु व खानदेश व गुजराथ या कारभारांत मोडामोड करूं नये. त्यामध्यें गोपाळराव याची तर रदबदली करूं नयेच. आणि दोन तीन महिन्यानीं आपले समक्ष आलियावर सर्वांनीं प्रांजल करून आज्ञे प्रमाणें करावें " या प्रमाणें लिहिलें आहे. आम्हीं विनंती केली कीं, या प्रमाणें लिहूं नये. मामांस संशय वाटेल, व मातोश्रीचें मनोगत आहे कीं मामानींच कारभार करावा. आणि आपली आज्ञा " ते सांगतील त्या प्रमाणें वर्तूं. " यास्तव बाईनीं त्यांस सत्यपूर्वक आश्वासन दिलें, ह्मणून ते आले. आतां संदिग्ध लिहिलियानें उत्तम नव्हे. मग " लिहित नाहीं. तुम्हीं पत्र लिहाल त्याजवर हवाला घालून लिहितों " ऐसें मान्य करून ही पुनरपि असें लिहिलें ! याजकरितां एक्या ही गोष्टीचा भरंवसा वाटत नाहीं. त्यासीं मामा येथें येतील, सर्व कारभार पहातील, त्या समयीं आम्हांपाशीं शपथ मागूं लागतील. शपथ द्याल तेव्हां कारभार करूं असें ह्मणतील. यास पूर्वी बोलायाची याद पाठविली आहे त्या प्रमाणें बोलोन शपथ देणें जाहलें तर द्यावी, अथवा ते मागतील त्या प्रमाणें द्यावी, ही आज्ञा करावी हें सविस्तर लिहावें. त्या प्रमाणें करूं. राजश्री गोपाळराव यांचा मजकूर ठरला नाहीं. ठरल्यावर लिहून पाठवीन. सेवेशीं श्रुत होय. आम्हीं तीर्थ-

१ मुजुमदारीच्या दरकांत आपण कांहीं घालमेल केली आहे तिजविषयीं.

रूपांची मर्जी तिळप्राय मोडीत नाहीं. कळलें पाहिजे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं० ६३L

श्री.

सेवेशीं विज्ञापना तागाईत छ० २२ साबान पर्यंत मुक्काम हल्याळ-सांबराणी नजीक प्रांत सोंदें. सुखरूप असों. विशेष. वडिलांचे आज्ञे प्रमाणें राजश्री त्रिंबकराव लष्करांत आले. मी ही आज्ञे प्रमाणें सर्व प्रकारें यांची खातरजमा करून निशा पुरविली. तीर्थरूपांस ही वडिलीं सांगोन पाठविलेंच होतें. त्यावरून कारभाराचा भार मजवर ठेविला. यानीं ही एक वडिलांचे वचनाचा भरंवसा मानून कबूल केलें. परंतु तीर्थरूप पुण्यास गेले. समीप राहणार नाना प्रकारचें भासवितात. हें आमचे ही प्रत्ययास आलें आहे. हे गोष्टीचें संरक्षण वडिलीं शोध करून कांहीं केलें तर होईल. नाहीं तर बाबूराव फडणिसाची प्रकृति एक प्रकारची. त्याचे विचारें सर्व कारभार तीर्थरूपीं कांहीं केला तर हे ही मन बालून करितील. नाहीं तर सर्व सोडून घरीं बसतील. वडिलानीं या प्रमाणें यथास्थित चालविल्यानें श्रीकृपेनें उत्तमच होईल. आपलें जाणें पुण्यास न जाहलें तर बाबूराव यांस भरंवसा पुरणार नाहीं. आपण सांगाल तेव्हां पुरेल. होळकर देशीं आले. कितीएक मंडळी घरीं रुसून बसली आहे. बहुतांचे चित्तांत तर बरें. आपण रक्षितील तर नीट चालेल. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं० ६४L

श्री.

विनंती. तीर्थरूपानीं माझी रवानगी कर्नाटकप्रांतें केली, त्यास आजपर्यंत इकडील सविस्तर वृत्त लिहून पाठविलें त्यावरून विदित जाहलेंच असेल. दौलतीस या कालीं पेंच फार पडले असतां जर कारभारी उमेदीनें उत्साह पूर्वक न करीत असल्यास मग दौलतीचा परिणाम मला कळतच आहे. राजश्री त्र्यंबकराव समंजस सर्व प्रकारें चांगले, एकनिष्ठ, त्यांचें आ-

मचें मन मिळून गेलें. परंतु यांचा निश्चय कीं, जर राजश्री बाबूराव फडणीस कारभारांत नाहींत तर यांस ही करण्याची उमेद नाहीं. असें आहे. तीर्थरूपांची मर्जी एक प्रकारची. बाबूराव एक रोखी. त्याचे चित्तास सर्व प्रकारें भरंवसा पुरून त्याचे विचारें सर्व कारभार चालला पाहिजे. ही गोष्ट न केली तर केलेलें सर्व फुकट जाऊन पुढें दौलतेचा परिणाम काय? त्यास याच अन्वयें बहुता प्रकारें समंजसपणें फारच चांगलें असें पत्र त्र्यंबकरायानीं लिहून बाबूराव फडणिसास व बहुत मर्यादापूर्वक तीर्थरूपांस एक, एकूण दोन पत्रें पाठविलीं तीं मजला दाखविलीं. फारच चांगलीं लिहावया जोगीं लिहिलीं आणि रवाना केलीं. परंतु तो मजकूर वडिलांस कळावा ह्मणून दोंहींच्या नकला युक्तीनें करून घेऊन सेवेशीं पाठविल्या आहेत. त्यावरून अर्थ विदित होईल. त्र्यंबकराव याची रीत, शहाणपण, निखालसता, खावंदांचे कार्या करितां जपणें, मेहनत करणें, युक्तीस मनसब्यास न चुकणें, हें आमचे अनुभवास येऊन निशा पुरली, व त्यांची ही पुरविली. यांचे सोबती बाबूराव यांची निशा पडोन ते व हे मिळोन उमेदीनें काम कारभार करूं लागले आणि वडिलीं यांचेच विचारें सर्व विचार ऐकून केल्यास चांगलेंच होईलसें दिसतें. मग ईश्वराची इच्छा न कळे! ही गोष्ट आपण पुण्यास लौकरच जाऊन तीर्थरूपांची मर्जी रक्षून बाबूराव यांची खातरजमा करवून सोय करितील तरच होईल. बहुतांचे मतें सोय पडूं देऊं नये असें आहे. राजश्री मल्हारबा होळकर आले. बहुतांचे मनांत तिकडे शिरोन पेंच पडावयास जागा आहे. या गोष्टीस चुकणार नाहींत. परंतु वडिलीं मल्हारबाचा व बाबूरायाचा एक विचार एक मसलत होय असें अगोदरच जपून करावें. नासल्यावर मग नीट होणार नाहीं. मी लेंकरानें युक्ति मनसबा काय लिहावा? परंतु सूचकप्रकारें लिहिला आहे. लिहिलें प्रविष्ट होय. ऐसें जरूर करवावें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं० ६५

पै॥ छ० १३ रमजान.

श्रीशंकर.

राजश्रिया विराजित माजमान्य राजश्री बाबूराव

स्वामीचे सेवेशीं—

पोष्य त्रिंबकराव विश्वनाथ कृतानेक नमस्कार. उपरी. येथील कुशल तागाईत छ० २५ सावान पर्यंत मुक्काम नजीक मुरगोड प्रांत सोंदें. सुखरूप असों विशेष. आजपर्यंत जाहलें वृत्त सविस्तर पूर्वीच लिहून पाठविलें आहे, त्यावरून कळलेंच असेल. मुख्य गोष्ट श्रीमंतांचे दौलतीचें ओझें या कालीं घेणें, कारभाराचा लोभ (?) मनांत आणोन कारभार करणें. त्यास या गोष्टीचीं कारणें दोन. कोणतीं तीं ह्मणाल तर एक, कारभार करणारानें लाख दोन लाख सरकार नुकसानी करून आपण मिळवावें. व दुसरा विचार कीं, सर्व प्रकारें कारभाराची, दौलतीची, खजिन्याची, मनसब्याची, सोय आहे. कारभार मात्र करावा. या गोष्टीनें प्रतिष्ठा किंवा सुख व्हावें. प्रस्तुत दौलतीचे कारभारांत पोटाचें संकट. खजिना कोठील ! कारभाराची सोय ह्मणावी तर हल्लीं या दौलतीस ज्या अनुपती प्राप्त झाल्या आहेत तशा मागें ही झाल्या नाहींत व पुढें ही होणार नाहींत ! असें असतां जातीनें मजला लोभ कारभारामध्यें आहे नाहीं या गोष्टीची निशा तुम्हांस आहे. एक गोष्ट खरी कीं, श्रीमंतांचें अन्न फार दिवस भक्षिलें; थोडेंसें शहाणपण अक्कल तुम्हांस आम्हांस दिली असतां आम्हीं असून या दौलतीचें सुख सोपें असतां सर्वांनीं घेतलें. कठिण काळीं सोडिली तर आम्हीं अन्न भक्षिल्याचें सार्थक करावें हेंच आम्हांस व आमचे लौकिकास उचित. खावंदांचे ही कार्या कारितां झालें तरी होऊन (?) परंतु स्वामिकार्यास यावत् सामर्थ्य अंतर करूं नये. परंतु इतके प्रकार अनुकूल स्वामीचे ठायीं सेवकास करणें योग्य, एवढी गोष्ट प्रमाण. त्यास स्थायिभावें करून परिछिन्न द्वेषच करावा, या प्रकारचा विचार असता तरी कारभारांत शिरणें ही मूर्खता खरी ! ज्येष्ठ श्रीमंतांची प्रकृति

जातीनें विपरीत नाहीं. क्षणिक स्वभाव, संगतीचे दोषें करून. त्यास मुख्यत्वें युक्तीनें हिऱ्याची रीम काढिली आणि निघाली तरच कारागिरी ! पोट भरून शहाणे उदंड आहेत ! त्यांमध्यें मुख्यत्वें तुमचें माझें भाषण. " आपण होऊन कदापि कारभार करूं नये. जर करितां या काळानुरूप दौलत सिद्धदशा टाकून साधनदशेनें करितील, मोठमोठे मनस्वी खर्च दौलतीचे, खासा जातीचे देखील, आपण होऊन सोडून सांगूं त्या प्रमाणें ऐकतील, तर मग या कारभारांत पडावें. दुसरें, ज्येष्ठांचा भरंवसा नाहींच. मुख्य श्रीमंत राव व बाई हीं जर शपथ सत्य पूर्वक तुमची निशा करितील, आणि सर्व गोष्टी मनापासून लहान वा थोर आम्हीं सांगूं त्या प्रमाणें ऐकून संतोषें करून आम्हांवर भार ठेवितील, जुने कारभारी, सोयरे धायरे, यांचे पेंचांत आम्हीं न यावें या विषयीं आम्हांस अनुकूल असून आमचेंच केलें चित्ता पासून कबूल करून शेवटास नेतील, तर कबूल करूं. " याच गोष्टीनीं मी फार फार तऱ्हेनें बोललों असतां मातोश्री बाईचा भरंवसा सत्यपूर्वक दिसला. त्याच प्रमाणें श्रीमंत रायांचें वचन प्रमाण निशा पडेसें घेऊन " सिद्धदशा टाकून सर्व लोभास सोडून सांगाल त्या प्रमाणें साधकदशेनें चालूं; यामुळें दौलतेचें बरें अगर वाईट होणारें अनुरूप होईल तसें होईल; " या प्रमाणें भरंवसा उभयतांचा सत्यपूर्वक वचनाचे विश्वासावर पुरवून घेतला, ह्मणून मान्य होऊन सर्व विस्तरें लिहून पाठविलें. या उपर तुम्हीं मुख्यत्वें करून थोडीशी झीज ज्येष्ठ श्रीमंतांपाशीं सोसून युक्तीनें आपल्या पलग्यावर आणोन एखादे गोष्टींत थोडेसें रगडून ही याच प्रमाणें परिछिन्न केलेंच पाहिजे. जरूर प्रकारीं बोलून कांहीं वहात वाटोळ्या [?] खालीं घेऊन लौकिकांत तर त्यांचे खावंदगिरीचें स्वरूप वाढवून हो हले वाणीनें (?) वर्ष सहा महिने निभावलियानें कुचोद्य कर्ते फजीत पावून सर्व ही उत्तमच होईलसें दिसतें. वचनें करून शपथ पूर्वक सर्व गोष्टी ही श्रीमंतीं आह्मांजवळ कबूल केल्याच आहेत. परंतु प्रकृत एक प्रकारची, यास्तव बाहेर तर वजन दाखवून अंतस्थ आपलेंच केलें शेवटास न्यावें. या गोष्टींत मातबर पेंच पहातां एक मल्हारबाचा. तो तर प्रकार

आपण बोलले होते कीं, " विष्णुपंताचे[1] हातें जसा पाहिजे तसा अनुकूल घेऊन कसें करितों तें पहा ! " त्याचाच मुख्य समय आतां आहे. इतके ही श्रम करून करीत असतां ईश्वराचीच इच्छा आणखीच असली तर तुह्मां आम्हांकडे कुकर्माचा अभिशाप तर येणार नाहीं ! सर्वतोमुख खावंदांचें बरें हित करीत असतां खावंदानेंच न समजून न ऐकिलें, त्यामुळें बरें वाईट होणें तें झालें, तर त्यांत ऐहिक पारलौकिक दोष नाहीं. तुमचे भरंवशाबर आम्हीं करितों. तुम्हीं नाहीं तेव्हां मी नाहीं, असें स्पष्ट आहे. परंतु दुर्लौकिक, नाकर्तेपण इत्यादि दोष न केल्यामुळें येतील इतकें रक्षावें. करीत असतां इतके ही दोष येऊन होणार तसें होईलच ! तर भरंवशाचें, साफ, सरळ उत्तर लौकर पाठवावें. बहुत काय लिहिणें लोभ असों देणें हे विनंती.

नं० ६६

पै॥ छ० १३ रमजान.

श्रीशंकर.

श्रीमंत राजश्री दादासाहेब स्वामीचे सेवेशीं—

विनंती सेवक त्र्यंबकराव विश्वनाथ. कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल तागायत छ० २९ साबान मुक्काम मुरगोड प्रांत सोंदें, सुखरूप असों. विशेष. येथील सविस्तर वृत्त श्रीमंतीं सेवेशीं लिहिलें त्यावरून विदित होईल. सर्व मनुष्य मात्रांचें जीवन अन्न निष्ठेंत [2] कृपानिष्ठ आहे. त्यास त्याचा अनुभव दर्शन—भाषण—पत्रादिक—प्रेषणें करून होतो. स्वामी ईश्वरांश. स्वामीस स्मरण देणारे कोण ! स्वामी सर्वज्ञ. ज्या कालीं जी गोष्ट उचित, सेवक लोकांचें स्वरूप पाहोन उत्साहभंग न होतां ज्या गोष्टीनें स्वामिकार्यास उपयोगीं पडोन स्वामींचे कृपेंत, ममतेंत, वचनांत अंतर न दिसे तें करावें. मी तर अज्ञानरूपेंच वर्तेन, ही निशा स्वामीस. परंतु मजला ही मुख्य विनंती कर्तव्य ते जातेसमयीं केली आहे कीं, सर्व प्रकारें राजश्री बाबूराव यांस उमेदवार करून त्यांची निशा पाडून

१ विष्णुपंत गद्रे सावकार. २ पत्र फाटून येथील अक्षरें गेलीं आहेत.

ते उपयोगीं पडत तें जरूर करावें. स्वामीनीं ही गोष्ट मान्य केली. प्रस्तुत मनसब्याचे डौलास मुख्यत्वें करून ऐकणें जरूर राजश्री मल्हारबा होळकर यांचें. त्यास प्रथमच त्यांचें बोलणें ऐकणें, खलबत करणें, निराळें घरांतून, बाबूरायासीं निराळें, या प्रमाणें झाल्यास भेद पडत पडत पडेल. यास्तव बाबूराव व मल्हारबा पहिलेच एक करावे. मनसुबा घडणें वा मोडणें तो उभयतांवर भार ठेवून त्यानींच बोलून येऊन निश्चयरूप विनंती करणें ती करावी; या प्रमाणें जाहलिया हिंदुस्थानचे मनसुब्यास सोय निघणें तशी निघेल. वरकड सर्व मजकुराचा अखत्यार बाबूरायावर स्वामीनीं दिलाच आहे. त्यांचें पत्र श्रीमंत रायांस व मजला यावें तें मात्र आज्ञा करून पाठवून द्यावें. आम्हीं एकनिष्ठपणें स्वामींचेंच हित करीत असतां आम्हांस संकट ईश्वर पाडणार नाहीं. स्वामींचे चित्तांत कोणत्या ही काळीं अन्यथा भाव उत्पन्न होणारच नाहीं. मग ईश्वरेच्छा न कळे ! सूर्यापुढें आम्हीं खद्योत ! काय ह्मणून विनंती लिहावी ! सर्वज्ञ स्वामी. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं० ६७

गोविंद हरीचें नरसीपंत गोडबोले यांस पत्र चैत्र व॥ १०

रविवारचें--

" लष्करचीं पत्रें चैत्र शुद्ध पक्षींचीं येळवंतीचे मुक्कामाहून चिरंजीवांचीं आलीं. श्रीमंत पुढें हरपनहळ्ळीचे मुलखांत गेले. हे येळवंती घेऊन मागून गेले. वैशाख मासीं माघारे फिरतीलसें दिसतें. मुलुखगिरी थोडक्यांत बरीच जाली. मुख्य श्रीमंत राजश्री रावसाहेब यांचे प्राक्तन विचित्र आहे. "

चुलता व पुतण्या यांमध्यें भांडण.
दादासाहेब रुसून मोंगलाकडे निघून जातात.
कोंकणस्थ व देशस्थ यांमधील तंटे विकोपास जातात.

माधवराव पेशवे स्वारी करून परत आल्यानंतर पुण्याच्या दरबारांत पूर्वीचीं भांडणें पुनः ज्यारीनें सुरू झालीं. कोंकणस्थ मुत्सद्दी व सरदार यांस सखारामबापू कारभारांत नको होता. दादासाहेबांच्या हुकमतींत सारें राज्य चालावें व आपला पुत्र माधवराव यानें गादीचा मालक असून निर्माल्यवत् रहावें ही गोष्ट गोपिकाबाईस कधीं आवडण्यासारखी नव्हती हें उघडच आहे. तिनें कोंकणस्थ सरदार व मुत्सद्दी यांच्या नादीं लागून दादासाहेब व सखारामबापू यांचें महत्व अगदीं नाहींसें करण्याचा प्रयत्न आरंभिला. माधवराव पेशव्यास या गृह–कलहाचा तिटकारा आला होता. परंतु तो वयानें लहान असून सर्व सत्ता त्याची आई व तिचे कारभारी यांच्या हातीं असल्यामुळें त्याचें कांहींच चालेना. भांडणें होतां होतां भाद्रपद महिन्यांत एके दिवशीं दादासाहेब रुसून पुण्याजवळ वडगांव आहे तेथें जाऊन राहिले. तेथें गोपिकाबाई, माधवराव, बाबूराव फडणीस, त्रिंबकराव मामा, गोपाळराव पटवर्धन, मल्हारराव होळकर, यानीं जाऊन त्यांस समजावून परत आणण्याची खटपट केली. परंतु तीस यश न येतां ते वडगांवाहून निघून प्रथम अहमदनगराकडे जाण्याचा रोंख दाखवून गोदावरीच्या तीरीं गेले. सखारामबापूनें आज कित्येक महिने जो यूह गुप्तपणें रचिला होता त्याचा कांहीं कांहीं भाग आतां दृष्टोत्पत्तीस येऊं लागला. दादासाहेबांबरोबर आबापुरंदरे, महिपतराव चिटणीस, कृष्णराव पारसनीस व रामचंद्र गणेश कानडे हे गेलेच होते. विठ्ठलराव विंचूरकर, नारोशंकर, अंताजी माणकेश्वराचा पुत्र व दुसरे कांहीं देशस्थ सरदार यानीं दादासाहेबांच्या व सखाराम बापूच्या सांगण्यावरून सैन्य जमविण्याची तयारी केली. ही तयारी त्यानीं दादासाहेबांपासून मोठमोठ्या जहागिरी, इनामें, किताब व अधिकार यांच्या सनदा मिळाल्या तेव्हां केली. सखारामबापू पुण्यांत

राहिला होता तो आतां दादासाहेबांस जाऊन मिळाला. लढाईवर प्रसंग येतो असें पाहून इकडे गोपिकाबाईच्या कारभाऱ्यानीं ही फौजा जमविण्याची सिद्धता केली. मल्हारराव होळकर, रायाजी पंवार, रामचंद्र जाधव, पिराजी नाईक निंबाळकर या सरदारानीं माधवरावाच्या पक्षास न सोडण्याचें वचन दिलें. परंतु होळकर व जाधव हे लढाईस वरकरणी उत्सुकता दाखवीत. आंतून त्यांचा ओढा प्रतिपक्षाकडे होता. विसाजीपंत विनीवाले यांची ही तीच स्थिति. आनंदराव रास्ते, तात्या घोरपडे, नरसिंगराव घायगुडे इतके मात्र माधवराव पेशव्यांचा पक्ष स्वीकारण्यांत मना पासून पुढारी होते. त्या सर्वांजवळ फौजेची तयारी तादृश नसल्यामुळें त्यांची काय ती भिस्त गोपाळराव पटवर्धनावर होती. तो व त्याचें घराणें मात्र दादासाहेब व सखारामबापू यांचा पक्का द्वेष करणारें होतें! तेव्हां या प्रसंगीं लढाईची तयारी करण्यास गोपाळरावाकडून बिलकुल कसूर होणार नाहीं हें गोपिकाबाईस व दरबारांतील लोकांस माहीत होतें. गोपाळराव स्वतः व नीलकंठराव, वामनराव, परशुरामभाऊ, कोन्हेरराव, नारायणराव, मोरोबा, विनायकराव, धोंडोपंत हे सर्व पटवर्धन सरदार यावेळीं पुण्यास युद्धाची तयारी करण्यांत तत्पर होते. सर्वांस हरएक गोष्टींत मसलत सांगणारा व युद्धसामग्री व सैन्य जमा करून पुण्याकडे रवाना करण्यांत मदत करणारा गोविंद हरी मिरजेस होता.

पुण्यांत बाबूराव फडणीस व त्रिंबकराव मामा या दोघानीं हुजरात दहा बारा हजार पर्यंत जमा करण्याची व्यवस्था केली होती. शिवाय होळकर वगैरे सरदारांचीं पथकें. गोपाळरावानें पटवर्धनांच्या तिन्ही पथकांतील आठ हजार फौजेस नालबंदी देऊन पुण्यास दसरा झाल्याबरोबर निघून येण्याविषयीं ताकीद केली होती. परंतु तितकी फौज पुण्यास वेळेवर जाऊन पोंचली नाहीं व कित्येक शिलेदार तर घरींच बसून राहिले. या वरून सखारामबापूचा फितूर पटवर्धनांच्या फौजेंत ही त्यावेळीं शिरला होता, असा तर्क करण्यास जागा आहे. पटवर्धनांची फौज वेळेवर हजर न होण्याचें दुसरें एक कारण चमत्कारिक आहे व त्यावरून फलज्योतिषाचा

राजकीय गोष्टींवर त्या काळीं केव्हां केव्हां किती विलक्षण परिणाम घडून येत होता हें दिसून येतें. दादासाहेबांची फौज जमा होत असून ती कार्तिक महिन्यांत पुण्याकडे चाल करून येणार असें पाहून पेशव्यानीं गोपाळरावास पुढें शत्रूच्या मुकाबल्यास जाण्याविषयीं हुकूम केला. परंतु गोपाळरावास त्या व पुढील महिन्यांत ग्रह प्रतिकूळ होते हें गोविंद हरीस माहीत असल्यामुळें त्यानें मिरजेहून फौज पाठविण्याची मुद्दाम दिरंगाई केली. त्यांत त्याचा हेतु इतकाच होता कीं, फौज न गेली ह्मणजे तरी गोपाळराव शत्रूची गांठ घेण्याकरितां पुढें जाण्यास धजणार नाहीं.

पुण्यास पेशव्यांचें सैन्य जेव्हां बरेंच जमत चाललें तेव्हां दादासाहेबांच्यानें त्या सैन्याशीं लढवणार नाहीं, असें पाहून सखारामबापूनें आपल्या पक्षाचा जय व्हावा ह्मणून दोन उपाय योजिले. एक पेशव्यांच्या फौजेंत फितूर उत्पन्न करण्याचा व दुसरा मोंगलाची फौज कुमकेस आणण्याचा. दादासाहेबानीं औरंगाबादेस जाऊन मोंगलाची फौज मदतीस आणिली. त्या फौजेवर विठ्ठल सुंदर व मुरादखान हे मुख्य सरदार होते. मागाहून निजामअल्ली ही आणखी फौज घेऊन आला. दादासाहेबानीं मोंगलाईंतून परत येतांना पैठण क्षेत्र लुटून फस्त केलें ! त्यांची कांहीं फौज घेऊन अंताजी माणकेश्वराचा पुत्र साताऱ्यास आला. तेथें महाराजांच्या व किल्ल्याच्या रक्षणार्थ पुण्याच्या दरबारांतून गोविंदराव गोळे या नांवाचा गृहस्थ पूर्वीच पाठविण्यांत आला होता. दादासाहेबांची फौज तेथें आलेली पाहून पेशव्यानीं प्रथम कोन्हेरराव व मागून मोरोबाआबा या पटवर्धन सरदारांस गोविंदराव गोळ्याची कुमक करण्याचा हुकूम केला होता.

नं० ६८

श्रीगणपतिर्जयति.

श्रियासह चिरंजीव राजश्री राऊसाहेब यांसीं प्रती—

गोविंद हरी आशीर्वाद उपरी येथील क्षेम तागायत भाद्रपद शुद्ध पौर्णिमा भृगुवार पावेतों यथास्थित जाणोन स्वकीय लेखन केलें पाहिजे. विशेष.

तुम्हीं दशमी मंदवारचीं पत्रें चार बंद पाठविलीं तीं बुधवारीं चतुर्थ प्रहरीं पावोन लिहिलें वर्तमान कळलें. " श्रीमंत राजश्री दादासाहेब रुसोन तृतीयेस वडगांवास गेले. त्यां समागमें सखारामपंत ही मागाहून गेले. तेथें तीन दिवस होते. पहिले दिवशीं श्रीमंत राजश्री राऊ[1] प्रधान समेत तुम्हीं आदिकरून होळेकर[2] व नाईक[3] व बाबूं[4] राऊ व मामा[5] सहवर्तमान समाधानास्तव गेलां, परंतु न आले. दुसरे दिवशीं श्रीमंत मातुश्री बाई[6] भोजनोत्तर त्यांजपर्यंत[7] गेली. त्या दिवशीं तेथें राहून सखारामाचेच[8] करवीं दादांस बोध करविला. ते तिकडे काय सांगत, इकडे काय सांगत, हें न कळे! परंतु " येतों असें ह्मणतात " ह्मणोन निश्चय सांगितला; आणि दुसरे दिवशीं स्नानसंध्या करून सांगोनें[9] पाठविलें कीं, " ब्राह्मण अनुष्ठानास आहेत त्यांस दक्षिणा देऊन येतों " ह्मणोन भोजन न करितां निघोन गेले. तेच नदीपार होऊन कोरेगांवचे मार्गें गेले. त्यावरून मातुश्रीनीं सखारामपंतास निषेध केला. तो " घेऊन येतों. नाहीं तर आपण जात नाहीं. " ह्मणोन बोलून गेला व मातुश्रीनीं इकडे सांगोन पाठविलें. त्यावरून मामा पर्वतीस गेले. होळकरास व नाईकास घेऊन पुला पावेतों गेले. त्यांची[10] गांठ पडली नाहीं. मग वडगांवास जाऊन मातुश्रीस घेऊन पुण्यास आले. ' पळत्याच्या पाठी लागल्यानें परिणाम नाहीं ' ऐसें बोलिले. त्यावरी होळकरास आणून ममतेनें भाषण करितां त्याणीं शपथ दिली कीं, ' चालता गाडा चालों द्यावा. मी सर्व प्रकारें साह्य आहें. ' ह्याच प्रमाणें नाईक ममतेंत आले. सरदार कोणी त्यां बरोबर गेले नाहींत. सामान[11] नाहीं. सेंड व सासवड[12] मंडळी सहित निघोन गेले ते निंबदेव्हा[13]ऱ्याचा घांट उतरोन गेले ऐसें वर्तमान. " ह्मणोन तपशीलवार लिहिलें त्यावरून सविस्तर कळों आलें.

---

१ राऊप्रधान = माधवराव पेशवे. २ होळकर मल्हारराव. ३ नाईक = बाबूजी नाईक. ४ बाबूराव = बाबूराव रामचंद्र फडणीस. ५ मामा = त्रिंबक विश्वनाथ पेठे हे मुळचे रत्नागिरी जिल्ह्यांत गुहागर ह्मणून गांव आहे तेथील राहणारे होते. ६ गोपिकाबाई. ७ त्यांजपर्यंत = दादासाहेब वडगांवास गेले होते त्यांजकडे. ८ सखारामाचे = सखाराम भगवंत उर्फ सखाराम बापू बोकील यांचे. ९ सांगोन पाठविलें दादासाहेबानीं. १० त्यांची = दादासाहेबांची. ११ सामान = लढाऊ सामान फौज तोफखाना वगैरे. १२ सासवड मंडळी = पुरंदरे. १३ निंबदेव्हाऱ्याचा घांट नगराजवळ आहे.

त्यास – दादांची[1] बुद्धि शाश्वत, ते दौलत करतील, – हा भरंवसाच नव्हता. त्या प्रमाणें त्यानीं केलें. त्यांस बुद्धिप्रद सासवडची मंडळी. कोणा ही प्रकारें दौलत विलयास न्यावी हें त्यांचे चित्तीं. त्यास नाना प्रकारें उपाधि रचतात. ज्यास दौलत रक्षणें त्यास सर्व ही सांभाळून करावें लागतें. महिपतराऊ चिटणीस मागाहून गेले, तैसेच आबा पुरंदरे ही गेले, ह्मणोन लिहिलें; त्यास गेले यांत पदरचा पैसा वेंचून कोणता फौज ठेवणार ! इभ्रतीचा मनुष्य कोण त्यांत आहे ! कोणेकडून ही अपाय करावा इतका मात्र त्यांचा मतलब. त्यास यांणीं[3] कार्यभाग चालता केला आहे या प्रमाणें चालवोन हिम्मत धरावी. लबाडकी करतील त्यांतील एक दोघांस ठिकाणीं[4] ठेऊन अवसान बसविल्या सर्व ही ममतेंत येतील. होळकर व नाईक यांणीं शपथ दिली, व सध्यां निखालस दिसतात ह्मणोन लिहिलें; हें काम तर मातबरच आहे. दुसरें " जाधवराऊ[5] तेथें आले त्यांस दोन लक्ष रूपये मिळाले शिवाय सरदारीची उभारणी नाहीं; तेव्हां नाईकांचे[6] तर्फेनें नरसिंग राऊ धायगुडे यांस दिवाणगिरी दिली. त्याणीं कर्ज करून फौज ठेवावी. फडणिशी राऊ चित्रगुप्ताची[7] आहे. " ह्मणोन लिहिलें, तेव्हां हें ही पथक आपल्याच लगामीचें जहालें. मामा व राऊ व तुम्हीं व होळकर व नाईक व जाधवराऊ—अवघे एकमतें–तेव्हां सारेच तुमच्या लगामीं जहाले. धनी[8] तिकडे दौलत. जे गेले त्यांच्यानें काय होणार ! आज पावेतों द्विधेमुळें निखालसपणें कार्य भागास भंदता होती. ते निघोन गेले, या उपरी कांहीं संशय राहिला नाहीं. अतःपर नेट धरून चालतें केल्याविना दुर्ग्ध्यांत पडतील तरी परिणाम नाहीं. श्रीमंत राजश्री दादा निंबदेव्हाऱ्याचा घांट उतरोन कोणीकडे गेले हें वर्तमान लिहावें. इकडे जनवार्ता कीं, आमदानगरास जाऊन दाखल जहाले. तत्रापि तेथें गेलेच असल्यास काय विशेष आहे !

---

१ दादाची – रघुनाथ बाजीराव उर्फ दादासाहेब यांची. २ यांणीं ह्म० बाबूराव व त्रिंबकराव मामा यांणीं. ३ कार्यभाग ह्म० राज्य कारभार. ४ ठिकाणीं ठेवून ह्म० जरबेंत किंवा अटकेंत ठेवून. ५ जाधवराऊ ह्म० रामचंद्रराव जाधव. ६ नाईकांच्या ह्म० बाबूजी नाईकांच्या. ७ राऊ चित्रगुप्त ह्म० बाबूराव फडणीस. ८ धणी ह्म० माधवराव पेशवे.

" गायकवाड[1] शिवाय करून पन्नास लक्षां पावेतों भरणा सरकारांत मामलतीवरी जाहला आहे " ह्मणोन लिहिलें तें कळलें. इकडील वर्तमान यंदां या प्रांतीं पर्जन्य नाहींसा जाहला आहे. पागेस वगैरे मिरजेचें कुरण आज महिनाभर पावेतों चारलें. पुढें सांगलीच्या कुरणास प्रारंभ करणार. पागेची दागदुजी ही फार करून जाहली. बाकी करणें तें करवितों. गांवगन्नाचें आकाराचें काम चालीस लाविलें आहे. सनइसन्नेत[2] लष्करामुळें तुडवण पडली त्याची पायमल्ली व पडजमिनीचे रुपये ह्मणतां सूट पडत चालली आहे. न देतां परिणाम नाहीं. शिवाजीपंतानीं[3] पडजमिनीचे रुपये गांवकरी यांस वजा न देतां गांवांकडे बाकी ओढत आणिली, ते रुपये सनइसन्नेचा वसूल आला त्यांत वजा करून घेऊन चालतें साल बाकीकडे वोढून ठेविलें. त्याणीं पक्की कारकुनी[4] केली. हे दाद न ध्यावी तरी पुढें अवघीच पायमल्ली होणार, यास्तव विचारें विचारें ज्यांत गांवकरांचा संतोष तें करीत आहों. कळलें पाहिजे. रसदेच्या ऐवजावरी शिलेदारांस तुम्हीं वराता आम्हांवरी देतां; त्यास आह्मीं दर्शनी हुंडी प्रमाणें तेचक्षणीं रुपये पदरीं घालोन रवाना करितों. घटकाभर त्यांस ठेवीत नाहीं. या प्रमाणें वराता घेऊन आले तितक्यानीं रुपये नेले. मागाहून येतील त्यांस ही रुपये देऊं. चिंता नाहीं. कर्जाच्या ऐवजीं ह्मणोन वराता करितां तैसें न लिहिणें. मिरजेच्या रसदेच्या ऐवजीं ह्मणोन लिहीत जाणें. तेथें जमाखर्च ही ' मिरजेच्या रसदे पैकीं ' ह्मणोन करविणें. वेदमूर्ती राजश्री योगीबावा वगैरे ब्राह्मण येथें आले त्यांची रवानगी आम्हीं करितों. दोन वेळ पत्रें आलीं. तुमचें स्वदस्तुरें तुम्हांस ल्याहावया अनुकूल पडत नाहीं ! सारा वेळ दरबारास

---

१ गायकवाडां शिवाय करून ह्म० गायकवाडांकडून खंडणी यावयाची ती खेरीज. २ इसन्ने सीतैन मय्या व अल्लफ [सु० स० ११६२]. ३ शिवाजीपंत ह्म० पेशव्यांचा सासरा व मिरजेचा पूर्वीचा मामलेदार. ४ चालतें साल ह्म० सल्लास सीतैन (सु.स.११६३) ५ शिवाजीपंताच्या या पक्क्या कारकुनी पासून पटवर्धनांचें नुकसान झालें. तें असें कीं, फौजेचें कर्ज फेडण्यासाठीं त्यांस मिरज वगैरे तालुक्यांचा मामला पेशवे सरकारांतून मिळाला तेव्हां त्या तालुक्यांतील गांवोगांव सरकारच्या बाक्या थकल्या होत्या ती रक्कम देखील पटवर्धनांच्या कर्जाच्या फेडी करितां लावून देण्यांत आली ! परंतु त्या रकमे पैकीं वसूल त्यांस कांहीं एक मिळाला नाहीं.

जातां, फावत नसेल ! तथापि एक तरी पत्र लिहीत जाणें. पहिले चिरंजीव नारायणराव वर्तमान लिहीत होते. त्यांस ही अलीकडे शरीरीं स्वस्थ नाहीं. काली नवमीचीं पत्रें चिरंजीव नारायणराऊ व नीलकंटराऊनीं मिळोन दोन बंद लिहिले. परंतु संकलित[1] वर्तमान लिहिलें. श्रीमंत दादासाहेब कोण्यास्थळास गेले ? समागमें क्षेपनिक्षेप[2] मुत्सद्दी कोण गेले ? जाणार कोण, त्या पक्षींचे कोण, या पक्षीं कोण, इकडे सरदार कोण ठरले, त्यांस नालबंदी देऊं लागले कीं नाहींत ? ते[3] गेले तर चिंता काय ! दुही तुटली. एकतत्वीं जालें हें बरें. हे[4] दगा व्हावयाचे होते, अनायासें अरिष्ट चुकलें ! पुढें श्रीसत्तेनें होणें तें होईल. या उपरी नेट धरून कामकाज करावें. तमाम स्थळांची बंदोबस्ती करावी. त्या पक्षींचे (जे आहेत) त्यांस नजरेंत राखावें. एक दुसऱ्यावरी जरब द्यावी. धास्त पाडावी. समागमें गेले त्यांच्या घरीं चोरपाळतीनें वातम्या ठेवाव्या. कदाचित् त्या खेळांतील माघारे आले तरी त्यांचा विश्वास धरूं नये. परिछिन्न एकदोघे—मुख्यत्वें जे खेळ करणार—ते पछाडावे. कर्नाटकांत फारच हैदर नाईकानें शोखी[5] केली, मडकशिऱ्यांस[6] मोर्चे लाविले आहेत. घेतलें असेल किंवा घेईल. मुरारजी बाहेर पडला. एकवेळ हैदरावर चालून गेला होता, परंतु हतप्रभ होऊन पळाला. या उपरी तुंगभद्रा-तीरास येणार. तमाम संस्थानिकांस हैदरअल्लीचीं पैत्रें[7] आलीं आहेत. दक्षिण प्रांतीं किरकोळ फौजेचें काम नाहीं आणि रुपये प्राप्त होणें नाहीं. जावें तेव्हां पन्नास हजार फौज तोफखाना भारी घेऊन जावें. हैदरअल्लीचें पारिपत्य झालें तरी प्रांत सुटेल. नाहीं तरी सुटत नाहीं. पन्नास लाख रुपये पदरीं बांधून घेऊन जावें तेव्हां जावें. मोहिमेची चाकरी तुम्हांस सांगतील. त्या प्रांतीं धान्य देखील नाहीं. भारी फौज देखिली तर हैदर जागा बळकावून बसेल. श्रीरंगपट्टणापासून पैसा येणें नाहीं. बाळापुर गेलें. कडपें, कर्नूळ, अर्काट पावेतों त्याणें मु-

---

१ संकलित ह्म० संक्षिप्त. २ क्षेपनिक्षेप ह्म० निस्संशय. ३ ते ह्म० दादासाहेब. ४ हे ह्म० माधवराव पेशवे. ५ शोखी ह्म० शेखी. ६ मडकशिरें हें ठाणें गुत्तीकर मुरारराव घोरपड्याचें. (दुसऱ्या अंकांत नं० ४० चें पत्र पहा.) ७ खंडणी देण्या बद्दल पत्र.

लखाची खराबी केली. पोटास मुख्य धान्य मिळणार नाहीं. अशी अवस्था. तुंगभद्रातीरास आवई घालावयास दहा हजार पंधरा हजार फौज मात्र गेली तरी आवई मात्र पडेल. अलीकडील स्थळांस वळ पडेल. चित्रदुर्ग व बिदनूर हीं संस्थानें बळ धरितील असा प्रकार आहे. तुमच्या चित्ता प्रमाणें ऐवज पदरीं घालितों. कृष्णाबाईकडील ऐवज आज उद्यां परवां इतक्यांत यावासा आहे. राहिल्याचे ही तरतुदेंत आहोंत. राजश्री शेषोपंत आले आहेत. त्यांचें चित्त मनोळी आपणांकडे करून घ्यावीसें फार आहे. वरकड ही परवां लिहिलें आहे. शेषोपंताचा आपणाशीं विपर्यास नाहीं. त्याची तुमची भेटी होईल तेव्हां सविस्तर कळेल. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे आशीर्वाद.

चिरंजीव राजश्री नारायणराऊ व नीलकंठराऊ व आबा यांस आशीर्वाद. चिरंजीव भाऊस आशीर्वाद.

चिरंजीव राजश्री वामनरायास आशीर्वाद. राजकीय वर्तमान स्मरण–पुरस्सर लिहित जाणें. लोभ असों दीजे. हे आशीर्वाद.

पै॥ छ० १७ सफर भौमवार.

नं० ६९

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी. आजी पंधरा दिवस तुम्हांकडील पत्र येत नाहीं. वराता मात्र येतात. परंतु राजकीय वर्तमान कांहींच नाहीं. काली पत्रें आलीं त्यांत श्रीमंत दादासाहेब शुद्ध तृतीया रविवारीं वडगांवास गेले. त्यांचे समजाविशीचे प्रकरणीं तुम्हीं आहां ह्मणून लिहिलें, त्यावरून विस्तारें कळलें; ऐशास तेथील प्रसंग सारा अव्यवस्थित, तुम्हीं मध्यस्तीस श्रीमंताच्या जावें हे बुद्धि कोण? तुम्हांस इतकें कळोन मागती अशा प्रसंगांत मन घालितां हा कोण विचार! उभयतां कार्यभागी माया करितात व मुख्य श्रीमंत मातुश्री व यजमान स्वामींची पूर्ण कृपा, यास्तव त्यांचें कल्याण तें करावें, फौज ठेवावी, प्रसंगीं पडली सेवा करून दाखवावी हें (तुमचें) कर्म. राजकी

कार्यभागांत आपण शिरावें, तेथें चार क्षुल्लक, एखादा दगा केला तरी धण्याचे दौलतेस अपाय आणि आपली हाणी. काली पत्र आल्यापासून चिंतार्णवीं पडलों. सारी रात्र निद्रा नाहीं. तुमचें स्वदस्तुरचें पत्र देखील नाहीं ! पत्र लिहावया पुरता अवकाश नाहीं किंवा कसा प्रकार नकळे ! तुम्हांस मागणें हेंच— अतःपर. तरी जाण्या येण्याचे मध्यस्तींत न पडावें. त्यांचा[1] विचार एक दोन वेळां कळला. या उपरी हे[2] तरी कशास त्यांच्या आर्जवांत पडतात न कळे ! दोन वेळ गेले, हलकेपण यांचें किती झालें ! वजन काय होतें ! एवंच होणारा सारिखी बुद्धि ! ते बाहेर अनायासें गेले. शहरच्या वाडियाभोंवता बंदोबस्त करावा. पक्षच्छेद[3] करावयाचा मजकूर केला ह्मणजे सहजच कुंठित होऊन पडतील ! कर्तृत्व कळलेंच आहे. करितात काय ! बुडत्याचे पाय खोलीं ! एक मूल, एक मातुश्री, तिचें नेट त्या प्रमाणें कारभारी हिय्या करीत नाहींत ! एकूणीस[4] हरएक प्रकारें दौलतेस अपाय ! एक दोन कुफेर[5] तोडले ह्मणजे सर्वांवरी दर्बा[6] बसेल. भारीपणा होईल. शत्रूस भय प्रदर्शन होईल. फौज जथेल. सरदार हुकमांत राहतील. कळेचना तेथें काय सांगावें ! रुपयाँ मिळेल. सर्व गोष्टी होतील. संनिध श्रीमंतांच्या वेळेचे[7] खिजमतगार व खासबारदार वगैरे माणूस हजार दोन हजार आहे तितकें हाताखालीं घेऊन बरकडांची मातबरांची आस्था सोडून वाडियाची बंदोबस्ती आंतून करावी. बाहेरून मावळे, किल्लेकरी व कांहीं गाडदी ठेऊन वाडियांतील मनसबा बाहेर न कळे [असें करावें.] कार्यभागी यांनीं वाडियांत बसोन रात्रदिवस नेट धरून तमाम राज्यभाराचा बंदोबस्त करावा. ते[8] बाहेर गेले काय, आंत राहिले काय, कांहींच होणें नाहीं ! मुख्य गोष्ट तुम्हीं आपला जीव रक्षून राहणें, ह्मणजे कोटीजोड

---

१ त्यांचा ह्म० दादासाहेबांचा. २ हे ह्म० गोपिकाबाई, माधवराव व कारभारी वगैरे. ३ येथें 'पक्ष-छेद' शब्दांतील श्लेष वाचकांच्या लक्ष्यांत येईलच. ४ एकुणीस ह्म० एकंदरीस. ५ कुफार ह्म० फितूर, लबाड्या. ६ दबा ह्म० दाब. ७ दादासाहेबांकडे जे फितुरी मिळाले आहेत त्यांस पकडून कैद करावें व दंड घेऊन सोडून द्यावें हाच द्रव्य मिळण्याचा मार्ग. ८ श्रीमंतांच्या वेळचे ह्म० नानासाहेब पेशव्यांचे वेळचे. ९ ते ह्म० दादासाहेब.

पावली. मध्यस्तींत न पडणें. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

नं० ७०

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी. तुम्हीं पुरवणी पत्रीं श्रीमंत राजश्री दादासाहेबांचें वर्तमान लिहिलें तें सविस्तर कळलें. त्याणीं पत्र लिहिल्याची क्षीत काय आहे! सर्व कर्ते श्रीमंत उभयतां[2]. त्यांची आज्ञा असतां कांहीं फिकीर नाहीं. सांप्रत ते[3] कोठें आहेत, काय वर्तमान – त्यां समागमें राजश्री सखारामपंत गेले म्हणोन वर्तमान आहे – सांयत वर्तमान लिहून पाठवावें. " लोकांची समजाविशी तीन हजारांची होऊन गेली. बाकी राहिले ते ही आठा रोजांत समजावितों " म्हणोन लिहिलें, उत्तम आहे. तुम्हीं बाहीरें[4] निघालां आहां सारे लोकांस झाडून निरोप देऊं नये. दसरा जाहलियावरी नालबंदी घेतलेले लोक येतील; परंतु सूचना दर्शविली. करकंबच्या वरातांचा ऐवज लोकांचे पदरीं पडला असेल. मंगळवेढ्याचे ही (लोकांच्या) पदरीं पडेल. चिंता नाहीं. भालेकाठया निम्मे तुम्हांकडे पाठवितो. निम्मे येथें राहतील त्या धुरावरी बांधोन जतनाईनें ठेवितों. " श्रीमंत बाहेर निघाले, सासवड मंडळी फिरोन आली, त्यामुळें मामलेदार वगैरे बोलूं लागले " म्हणोन लिहिलें, त्यास वचक न धरितां धीटपणें कार्यभाग चालों लागला म्हणजे सहजच अवसान बसतें. श्रीमंतानीं कांचे चांगलें दोन आणवणें म्हणोन सांगितलें, त्यास ऐनापुरी कांचे दोन चांगले पसंतीस पडेत ऐसे करविले आहेत. मागाहून चौरोजीं कांचे दोनी पाठवितों. पिराजीनाईक[5]

---

१ या वरून " तुह्मीं आह्मांशीं विरोध करितां, भावजय व पुतण्या यांचा पक्ष धरून आम्हाशीं लढण्याच्या इराद्यानें फौज जमवितां हें बरोबर नाहीं " अशा अर्थाचें गोपाळरावास दादासाहेबांकडून पत्र आलें होतें हें उघड होतें. २ उभयतां म्ह० गोपिकाबाई व माधवराव. ३ ते म्ह० दादासाहेब. ४ बाहीर निघालां म्ह० डेरे दाखल झालां. ५ पिराजी नाईक निंबाळकर—हा सरदार मोहोळ व करमाळें या दोन ठिकाणीं जीं निंबाळकरांचीं घराणीं होतीं त्यां पैकीं कोणच्या घराण्यांतील हें कळत नाहीं. परंतु त्याची जहागीर मोंगलाईच्या हद्दीवर होती हें खचीत.

आले त्यांस श्रीमंतानीं ठेविल्याचा मजकूर लिहिला तो कळला. इकडे आज पावेतों पर्जन्य नव्हता त्यामुळें रयत दिलगीर होती. या चौरोजांत वळवाचा पाऊस गांव खेडियानीं पडला. कसबेच्या रानांत कालीचे रात्रीं थोडा बहुत जाहला. आणखी पडेलसा भरंवसा दिसतो. पर्जन्य जाहला ह्मणजे रयत खुशाल होईल. वाड्यांत नवी विहीर खाणविली. त्यास पाणी लागलें. बाहीर रानांत खासबागेच्या ऐलेकडे नवी विहीर काढविली. त्यास ही काल पाणी लागलें. तुम्हांस कळावें ह्मणून लिहिलें आहे. आमचे शरीरीं आज आठ दिवस समाधान नाहीं. डोई दुखती. नेत्र दुखतात. ज्वर येतो. खोकला फार लागला आहे. चार प्रकारचें दुखणें जाहलें त्यामुळें फार श्रमीं आहों. निद्रा देखील येत नाहीं. उपाय करणें तो करितों. तुह्मीं चिंता न करणें. तीर्थरूप राजश्री दादांस[1] दिवसें दिवस उतार आहे ह्मणोन मंगळवेढ्याहून पत्रें येतात. तिकडे ही तुम्हांस पत्रें येत असतील. तीर्थरूप राजश्री आपा[2] व चिरंजीव भास्करपंत तेथेंच आहेत. कळावें म्हणोन लिहिलें आहे. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे आशीर्वाद.

चिरंजीव राजश्री नारायणराऊ यास आशीर्वाद. उपरी तीर्थरूपांस किंचित् उतार——————समाधान आहे. तीर्थरूप आपा व चिरंजीव भास्करपंत तेथेंच आहेत. चिरंजीव मेघश्यामाचीं पत्रें चिरंजीव भाऊ[3]च्या लखोट्यांत आहेत. आम्हांस चार व्यथा एकदांच जाहल्या त्यामुळें श्रमी. हे आशीर्वाद.

नं० ७१.

श्रीगणपतिर्जयति.

श्रिया सहस्रायु चिरंजीव राजश्री राऊसाहेब यांसीं प्रती गोविंद हरी. आशीर्वाद उपरी येथील कुशल तागायत आश्विन शुद्ध नवमी रविवार प्रातःकाल. यथास्थित जाणून स्वकीय लेखन करीत जाणें. विशेष. तुम्हीं शुद्ध चतुर्थी मंगळवारचें पत्र सूर्याजी जासुदाबरोबर पाठविलें तें काली

१ थोरले बंधु कृष्णभट यांस. २ त्रिंबक हरी. [थोरले बंधु] ३ परशुराम भाऊच्या.

मंदवारीं दोनप्रहरां प्रविष्ट होऊन वर्तमान कळलें. श्रीमंत राजश्री दादा साहेबांकडील मजकूर कळला. मुख्य गोष्ट—त्यांच्या योगें नाश व्हावा—असेंच असलिया उपाय काय! सखाराम सर्व नाश करावया निर्माण जाहला आहे! त्यास ठिकाणीं ठेवावयाची बुद्धि कोणासच जाहली नाहीं. एक तेवढी गोष्ट केली असती तर इतके खेळ कशास होते? आतां ही हर इलाज करून तेवढें कार्य केलेंच तरी बरें आहे. नाहीं तर तो केवळ श्रीमंतांची दौलत लयास न्यावी या कारणास्तव निर्माण झाला आहे! उत्तर प्रांतें लयास जावयास कारण तोंच. गुदस्तां यवन येऊन प्रांताची खराबी सर्व प्रकारीं दौलत सारजवारीस (?) यावया तोंच. सालमजकुरीं श्रीमंतांस वेगळें नेऊन इतकें करावयास मूळ तोंच! श्रीमंत मुल्ह्यांचें प्राक्तन विचित्र आहे. सर्व ही फजीत पावतील. श्रीमंत दादासाहेबांची अंगेजणी, कर्तृत्व, साहसकर्म करतील न करतील, हें सर्व कळोनच गेलें आहे; परंतु प्रस्तुत निमित्तास त्यांस करून हे डोहवण [?] करितात. परंतु परिणाम शुद्ध नाहीं. कळलेंच आहे. तुम्हीं रुसलां होतां ह्मणून परस्पर ऐकिलें. ऐशास, कोणी कांहीं ह्मणोत; ये प्रसंगीं सर्व प्रकारें तुमचा भरंवसा सर्वांस आणि तुम्हांमुळेंच तूर्त दौलतीस आब आहे. कार्यभागी यांस भरंवसा तुमचा. तुमच्या आधारें ते भलतें एक करणें तें करितात. परंतु तुम्हीं कोणे रीतीनें वर्तणूक करितां, स्वल्पकार्या साठीं तुम्हांशीं विनाभाव न दाखवावा, हें कांहीं त्यांच्या मनांत येत नाहीं. वरकाडांशीं जसें औटें धरून करितात तसें तुम्हांशीं करितात. परंतु तुम्ही अंत कोटींत, सर्वस्वें तुम्हांवरी कृपा करावी, भीड बाळगावी, (या प्रमाणें मनांत आणीत नाहींत). तुम्हीं कांहीं चौघां पेक्षां जाजती मागत नाहीं. परंतु ऋणानुबंधास उपाय नाहीं! तुह्मीं रुसल्यानें ह्मणतात कीं, 'हे रागीट यांस क्षमा नाहीं. सर्वस्वें यांच्या आधारावरी आपण आणि हे तेव्हांच निराळे होतात. यांचा भरंवसा कसा धरावा?' असें ह्मणतात. परंतु हे काय गैर ह्मणतात,

---

१ पानपतचे स्वारींत. २ दादासाहेबांस. ३ माधवराव पेशव्यांचें. ४ पराक्रम. ५ औट ह्म. तोरा. ६ पेशव्यानीं आम्हां प्रमाणें मानिलेले.

यांजकडे वसूल काय, गुदस्तां पासून धारिष्ट यांणीं काय केलें, कोणे प्रकारें स्वामिकार्यावरी एक चित्त, हें चित्तांत आणीत नाहींत ! तस्मात् आपला लाभकाल ह्मणावा ! असो. ते कांहीं ह्मणोत. आपण एक निष्ठेनें सेवा केलीया फलदाता ईश्वर आहे; हें चित्तांत आणावें. ज्या न्यायें वर्तणूक करितां तशी करावी. द्वैतार्थ न दाखवावा. एरवीं मिरज तुह्मांकडे हें सर्वांस असह्य आहे. परंतु ' ये प्रसंगीं कांहीं न बोलावें, पुढें सुभतां झालियावरी युक्तीनेंच स्थळ ध्यावें, ' अश्या ही कित्येकांच्या बुद्धि आहेत. असो ! आम्हांस दुसरें दैवत नाहीं. स्थळाचा हिसाब नाहीं. आमची फारशी सलतनत नासावी, बुडावी, (असें) नाहीं. गतवर्षीं इतकी राज्यक्रांति झाली. सर्व आपलाले थांगेमाजी गेले. आम्हांस कोठें ठिकाण नाहीं ह्मणोन सर्व वांचले, आम्हीं बुडालों, असा अर्थ नाहीं. आम्हीं मागें ही एकनिष्ठेनें सेवा केली. पुढें ही दुसरा अवलंब नाहीं. हें प्रमाण आहे तरी श्रीपंढरीनाथ कल्याण करील. तुह्मीं कांहीं तिळमात्र चिंता न करणें. मिरजेचा ही हिसाब नाहीं. जे समयीं (मिरज सोडा असें) ह्मणतील ते समयीं हजीर आहों. प्रस्तुत कालें सारें राज्य एकसरलें आहे. एक कर्तृत्व व फौजेविषयीं तुमचाच भरंवसा धणी यास. किंवा रास्ते. तुम्हांत घोरपडे देखील आले. यां शिवाय आपले ह्मणावयास कोणी नाहीं. बरें ! यांचे देटीं सर्व ही आम्हीं एकनिष्ठ. पुरतें मनन करितां कोठें थाक नाहीं. खामखां फौजा जमा करून चळ द्यावा ह्मणजे आपणच वारा पाणी होतात. एक दोघां तत्पक्षीयांस युक्तीनें साधून जरबेंत आणिलें ह्मणजे दवा बसेल. परंतु तुमचे कार्यभागी ढिसाळ ! कर्म करावया भितात जे, धणी पुढें एकच लगामीं असतील नसतील नकळे ! फिरोन त्यांकडे माया धरिली तरी ते ' सह-

---

१ स्वस्थता. २ जिकडे तिकडे शांतता झाल्यावर मिरज तुह्मांकडून काढावी असें कित्येकांच्या मनांत आहे, असा लिहिणाराचा अभिप्राय. ३ सलतनत ह्म. मूळ अर्थ-फौज. प्रचारांतील अर्थ-वैभव, दौलत. ४ हिसाब = पर्वा. ५ एकसरलें आहे=फितुरी झालें आहे. ६ माधवराव पेशव्यांस. ७ घोरपडे = इचलकरंजीकर. ८ यांचे देटीं सर्व ही आह्मीं ह्म. पेशवे खुशाल असतील तर आह्मीं सर्व खुशाल. ९ खामखां ह्म. निस्संदेह. १० चळ द्यावा ह्म. चालून जावें. ११ वारा पाणी होतात ह्म. पळून जातात. १२ त्यांकडे ह्म. दादासाहेब व सखारामबापू यांकडे.

मूल विनश्यति [1] करितील हें भय (त्यांस) मोठें आहे. विचारें पहातां प्रमाणच आहे. धण्याचा भरंवसा नाहीं. इतकें अनिष्ट त्यांनीं केलें. पुढें ही करणार असें असोन त्यांचे ठायीं विषमता नाहीं ! पुरंदरे त्यांचे [2] बहुता दिवसांचे. त्यांची धास्त सर्वांस आहे. प्रस्तुत श्रीमंत मातुश्रीस आजी पांच सात महिने पुरतें उमजलें; यामुळें त्यांचा [3] नेट भारी. एतन्निमित्य या थरास गोष्ट आली. नाहीं तरी सखारामानें आज पावेतों सर्व झाँती बुडविलीं असती. श्रीमंत मुख्याजवळी त्यां ज्ञातीचे निकटवर्ती आहेत. अपसव्य [4] केवळ आप्तवर्गांत. तैशींच एकबोट्याचीं [5] वंसें निकटवर्ती. खंडोपंत पानसी कोणे समयीं व्यामोह करितील न कळे. चिकित्सक [6] ही त्याच पक्षीं. यास्तव मुख्याची बुद्धि आतां आहे हे आणखी पुढें याच प्रकारें ज्ञातीकडे स्थिर राहील हा भरंवसा येत नाहीं. सखारामाच्या मतें ज्ञाती एकवेळ क्षयास न्यावी. उत्तरेच्या युद्ध [7] प्रसंगीं सारे त्यांस [8] भरीस देऊन सारे एक कूट होऊन सावधतेनें निशाणें पूर्व सूचनेनें काढून मुख्यांस [9] भरीस देऊन निघाले. त्यांमध्यें फार करून देशास आले. अंताजी [10] माणकेश्वर आणि बाजी हरी आयुष्यमर्यादेनें लयास गेले. त्यास उपाय नाहीं. आतां ही एकवेळ अगदीं ज्ञाती क्षयास न्यावी (असा सखारामाचा हेतु आहे.) पुणें [11] मोडिलें (असतें) ह्मणजे सहजच बारा वाटा लागलेच होते. परंतु मुख्ये [12] श्रीमंतांचें प्राक्तन विचित्र, यामुळें लज्जा भगवंतें रक्षिली. पुढें ही रक्षणार तोच आहे. मुख्य, आपण सर्वस्वें अनकूल होऊन धण्याच्या हिताच्या ठायीं एक निष्ठेनें वर्तता यांतच कल्याण आहे. त्यांस [13] बुद्धिप्रद तोच होणार ! आपलें

---

१ त्याणीं = सखारामबापूनें. २ त्यांचे = सखारामबापूचे (बापू पूर्वी पासून पुरंदऱ्यांचे पदरचे कारकून होते.) ३ त्यांचा = गोपिकाबाईचा. ४ ज्ञाती कोंकणस्थांची. ५ त्या ज्ञातीचे = देशस्थ जातीचे. ६ अपसव्य = आबा (नीलकंठ महादेव) पुरंदरे ७ कोन्हेर त्रिंबक एकबोटे (फांकडे) यांचे मुलगे. ८ चिकित्सक = बाबा वैद्य. ९ पानपतचे लढाईत. १० सदाशिवराव भाऊंस युद्ध करण्याच्या भरीस घालून. ११ सदाशिवराव भाऊसाहेबांस. १२ निघाले = पळून आले. १३ अंताजी माणकेश्वर पानपतांतून परत येत असतां वाटेंत गांवढळ लोकानीं लुटीच्या आशेनें मारिला. बाजी हरी कोण हें कळत नाहीं. १४ पुणें मोडिलें असतें = पुण्याची धुळधाण केली असती. १५ मुख्य श्रीमंत ह्म. माधवराव पेशवे. १६ त्यांस ह्म. पेशवे व गोपिकाबाई यांस.

कर्म प्रालब्ध प्रमाण आहे. ऐनापुर[1] अगर वरकड त्यांच्यां अथवा कार्यभागी यांच्या चित्तीं नसेल तर तिळमात्र आग्रह न करणें. श्रीकृपा असली तर तेच धणी, तेच कार्यभागी, परिणामीं आपली क्रिया, शेवट लावणार. कांहीं नको. कर्ज—भले[3] लोकांच्या नरकांत जावयाची गती झाली आहे—तेथें ही श्री निर्वाह करील. आमचें जन्मांतर असेल तदनुसार होईल. तुम्हीं काळजी कराल अगर धण्यास कार्यभागीयांस वाईल दाखवाल तर शपथ आहे. सरळ पूर्ववत् वर्तणें. फलदाता ईश्वर आहे. लोभ कीजे हे आशीर्वाद. आमचे शरीरीं श्रीकृपेनें उतार उत्तम प्रकारें पडला. हे आशीर्वाद.

नं० ७२

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी. करवीरवासी राजपत्नी इणें आपल्या राज्यास अधिकारी करावा ह्मणोन अंडुरकर (?) भोंसले यांचीं दोघें मुलें आपणाजवळ आणविलीं. एक नऊ वर्षांचा. एक सहा वर्षांचा. त्यां पैकीं विजयादशमीच्या मुहूर्तें एकास पट्टाभिषेक करणार होती. केलें असेल. पैलेकडील[5] सरदार लोकांस पत्रें पाठविलीं होतीं. परंतु कोणी गेलें नाहीं. वर्तमान तुम्हांस कळावें ह्मणून लिहिलें आहे. दसऱ्याचे दिवशीं राज्याभिषेक एक मुलास केला. पन्हाळ्यावरी तोफा झाल्या ह्मणून वर्तमान तहकीक[7] आहे. कोणाचा मूल, किती वर्षांचा आहे, हें ठीक कळलें नाहीं. कळलियावर लिहून पाठऊं. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

---

१ ऐनापुर हें गांव मिरजे पासून आठ दहा कोसांवर दक्षिणेस कृष्णातीरीं आहे. हें यावेळीं पेशवे व त्यांचे कारभारी यां जवळ गोपाळराव मागत असतां त्यानीं दिलें नाहीं. ह्मणून तो रुष्ट झाला होता. २ त्यांच्या ह्म. पेशव्यांच्या. ३ भले लोक ह्म० मराठे शिलेदार. ४ श्रीमन्मातोश्री जिजाबाई साहेब. ५ खानवटकर भोंसल्यांचीं मुलें जिजाबाईनें या वेळीं आणविलीं होतीं व त्यांतूनच एक मुलगा दत्तक घेतला, त्याचें नांव 'शिवाजी महाराज' असें ठेविलें. ६ पैलेकडील ह्म० कृष्णे पलीकडील. ७ तहकीक ह्म० निश्चयात्मक.

नं० ७३

श्रीगणपतिर्जयति.

आशिर्वाद उपरी. तुम्हीं वद्य चतुर्दशीचीं पत्रें आवजी जासुदाबरोबर पाठविलीं तीं कालीं[1] शुद्ध चतुर्थी मंगळवारीं पावलीं. लिहिलें वर्तमान विस्तारें कळलें. सरकारच्या तरतुदेचा[2] प्रकार लिहिला तो कळला. प्रमाणच[3] आहे. ओढगस्त कारभार. त्यामध्यें खेळें[4] झाले. कोणी कांहीं ह्मणोत; या प्रसंगीं तुमच्या भरंवशावरी मुख्य अगर कारभारी. दुसरा विचार नाहीं. ये समयीं तुम्हीं अंतर करितां नये. आज दोन वर्षें जातीवरी[5] झीज सोसून एकनिष्ठेनें सेवा केली आहे. फलदाता ईश्वर! वरातेचा मजकूर लिहिला तो कळला. दीड लाखाच्या वराता करितां ह्मणोन लिहिलें. बहुत उत्तम आहे. कलकेरी[6] बरोबरचे होन भरीस घालूं म्हटलें तरी कोणी घेत नाहींत. जसे आले तसे देऊन पहातों. न घेत तरी उपाय नाहीं. कर्ज मिळवावया अंतर करीत नाहीं. दीड लाखाच्या वराता कबूल केल्या. चिंता न करणें. श्रीमंत दादासाहेबांकडील प्रकार लिहिला तो विस्तारें कळला. ते राज्य बुडवावें[7] या अर्थांत आहेत. बहुतवेळ गतवर्षा पासून सांगत आलों. तेवढीं[8] एक अटकेंत असता तर दादासाहेब उगेच असते. परंतु त्याच्या निमित्तें करून उत्तरप्रांतची फौज, दौलत लयास गेली. आणखी किती नाश होणार तो कसा चुकेल! शकुनी आहे! कार्यभागी[9] यांस तरतूद करणें नाहीं. (दादासाहेब) गंगातीर प्रांतीं आहेत. रात्रीचा शेदोनशें माणसांनीं उचलूनच किल्ल्यावर नेऊन घालावा अगर एखाद्या राजकारणास ह्मणोन गांवा बाहेर कोस दोन कोस नेऊन तेथून उडवावीं[10]. साहस कर्म करणें, करवणें,

---

१ काली ह्म. काल. २ राघोबादादाशीं लढण्याची पेशव्यानीं तयारी केली तिचा. ३ प्रमाणच आहे ह्म. तुह्मीं लिहिता तें खरेंच आहे. ४ खेळ ह्म. फितूर, दगे. ५ जातीवरी ह्म. स्वतःवर. ६ कलकेरी हें एका सावकाराचें आडनांव. ७ तेवढा एक ह्म. सखारामबापू. ८ त्याच्या निमित्तें करून उत्तरप्रांतची फौज इ० इ० ह्म. सखाराम बापूनें दुष्ट कारस्थानें खेळविल्यामुळें पानपतच्या स्वारींतील पेशव्यांची फौज नाश पावली. ९ कार्यभागी ह्म. कारभारी बाबूराव व त्रिंबकराव मामा. १० 'सखाराम बापूस दादासाहेब दूर आहेत तों पकडून किल्ल्यावर कैदेंत ठेवावें' असा अभिप्राय. ११ उडवावा ह्म. पळवावा.

भलत्यास कसें होईल? ही तरतूद करावया चुकों नये. 'हुजरात बारा हजार ठेवणार' ह्मणोन लिहिलें, त्यास हें गैर! फौज हुजरात पंचवीस हजार पावेतों कनिष्ट पक्ष असावी. चित्तास येईल तें करूत! विसाजीपंत विनीवाले करार[1] केले, तीन हजार फौज काय ह्मणून? असो. एक तुम्हीं किंवा रास्ते. यां खेरीज कोणाचा ही विश्वास पुरत नाहीं. बळ पडत चाललें तरी सारेच मायेचे. नाहीं तर कोणाचा कोणी नव्हे! श्रीमंत दादासाहेब गंगातीर प्रांतें आहेत. पुढें तुम्हीं जमा होत होत तिकडे गेलां ह्मणजे शह पडत जाईल. ते[2] तिकडेच पुढें जातील. एखादा जागा अडचणीचा पाहून लांब मजल करून धांवलेत तर बारा वाटेनें पळतील! मुख्य[3] हातास लागतील. असा ही प्रकार घडों सके. एक 'सैं'कार नामक हस्तगत झाला ह्मणजे गुंजे मोडलीं. एवढें राज्य! दौलतेस अपाय त्यामुळें. तो कांहीं आमचा द्वेष्टा नव्हे. परंतु बहुतांचें वाईट इच्छितो. त्याचें कल्याण कधीं होणार नाहीं! कृष्णाबाईकडील[6] फार भरंवसा होता. परंतु त्यांणीं फारच कनिष्टपण केलें. असो, कालपरत्वें बुद्धि! पन्नास हजार[7] [त्यांनीं] रवाना केले ते कधीं येतील पहावें. तुमच्या चिठ्या घेऊन आले ते गाडदी गलग्राहक! "मनोळीस न जाऊं" म्हणतात. याजबद्दल कालीं मंगळवारीं ताबडतोबीनें पत्रें लेहून माणकोजी जासूद रवाना केला तो तुम्हांजवळ कोणेवारीं पावेल न कळे. दीडलक्षापैकीं पन्नास हजार रवाना केले. ते सिंदी[9] अंबर या कडील लोकांच्या स्वाधीन करितों. बाकीस चिठ्या देऊन मनोळीस लाऊन देतों. नच जात, आह्मांशीं कटकट करूं लागले, तरी त्यांचा मुलाजा करणार नाहीं. नाहक लौकीक विरुद्ध होणार. प्रसंग पडल्यास उपाय नाहीं. ती॥ राजश्री आपा[10] व चिरंजीव भास्करपंत आदितवारीं

१ 'विसाजीपंत विनीवाल्यांकडे तीन हजार फौज ठेवण्याचें ठरलें, तर इतकी फौज त्यांच्या ताब्यांत काय ह्मणून देणार?' असा अभिप्राय. २ दादासाहेब यांजकडील सरदार व लोक. ३ दादासाहेब. ४ सखारामबापू. ५ बळ नाहींसें झालें. ६ कृष्णाबाई शिंदे मनोळीकर. ७ पन्नास हजार रुपये. ८ काल. ९ शिंदी अंबर हा पटवर्धनांकडील गारद्यांचा सरदार. १० त्रिंबकहरी वडीलबंधु. भास्करपंत हा धाकटाबंधु.

मंगळवेढ्याहून निघून काली मंगळवारीं दोन प्रहरां चिरंजीव येथें आले. ती॥ परभारें गणेशवाडीस गेले. या प्रकारचें वर्तमान. एकवेळ तीर्थरूपांची खैर श्रीनें केली. आम्हांस बारा तेरा दिवस खोकला व ज्वर व मस्तक दुखणें व डोळे दुखणें याणें श्रमी केलें. प्रस्तुत उतार आहे. पर्जन्यानें अतिशय केला तो लिहितां पुरवत नाहीं. परंतु थोडक्यांतच आटोपिलें. कृष्णराव पारसनीस कोठें आहेत त्यांचें वर्तमान लिहिणें. गोपाळ बर्वे याचें वर्तमान लिहिलें तें कळलें. श्रीमंत सौभाग्यवती आनंदीबाई गेली, बरें झालें! श्रीमंत मातुश्री बाई न गेली, उत्तम गोष्ट झाली. सासवडकर समजाऊन आणिले, उत्तम केलें. निदानीं ते ते एक. कार्याकारण सर्व. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे आशीर्वाद.

नं० ७४

[अजमासें आश्विन शुद्ध १४ आक्टोबर १.]

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी. उंटांविषयीं लिहिलें, तरी उंटें पेशजीच रवाना करून दिलीं. दसऱ्यास अगर दुसरे दिवशीं तुम्हांजवळ पावलीं असतील. पागा दसऱ्याचे मुहूर्तें बाहेर काढिली. सरंजाम बाहेर लावावयास एक दिवस लागला. द्वादशी सौम्यवारीं प्रातःकाळीं राजश्री कान्हो माणकेश्वर या समागमें [पागा] रवाना केली. मौजे बिसूरच्या मुक्कामास गेले. मजल दर

---

१ सर्वांत थोरले बंधु कृष्णंभट यांची. २ रघुनाथराव दादासाहेब यांची पहिली बायको जानकी बाई ही जालगांवच्या बर्व्यांच्या घराण्या पैकीं होती. वरील पत्रांत आलेला गोपाळराव गणेश व या शिवाय वाजीराव गोविंद व बच्याजीपंत हे पेशवाईंत बर्व्यांच्या घराण्या पैकीं नामांकित सरदार होते. ३ आनंदीबाई ही रघुनाथराव दादासाहेबांची दुसरी बायको. हिचें माहेर गुहागरच्या ओकांकडे. ४ गोपिकाबाई. या वरून दादासाहेबांशीं समेट करण्या करितां अजून ही त्यांस जाऊन भेटण्याचा गोपिकाबाईचा विचार होता असें दिसतें. ५ पुरंदरे. ६ " पुरंदरे व सखारामबापू हे प्रसंग पडल्यास एक व्हावयाचेच. एरवीं मात्र ते तुह्माशीं मिळून मिसळून राहतील. " ७ गोविंद हरीनें मिरजेहून पुण्यास गोपाळरावास हें पत्र पाठविलें आहे. ८ बिसूर हें गांव

मजल येऊन पोहोंचतील. बांका[1] हत्ती ठेऊन घेतला. सविस्तर मशारनिल्हे सांगतील त्यावरून कळेल. भालेकाठ्या सुमार ५०० बुधवारींच रवाना करून दिल्या. समागमें खासबारदार व प्यादे चौघे देऊन हाजेरीनें रवाना केले आहेत. त्यां बरोबर तुम्हांस पत्र ही अलाहिदा लिहून दिलें आहे. राजश्री कान्होपंता बरोबर सरंजाम नाहीं, यास्तव आम्हीं आपली राहुटी व उंट एक दिला आहे. हे तुह्मांजवळ पोंचलियावरी उंट राहुटीसुद्धां सारवाना बरोबर पुण्यास रवाना करून द्यावा. तेथोन सणगें कांहीं आणविलीं आहेत. तीं घेऊन सारवान मिरजेस येईल. पागेची रवानगी सर्व साहित्य तयारी करून काल रवाना केली. या उपरी मजल दरमजल येऊन पावेल. उंटें बुधवारीं षष्टीस रवाना केलीं, तीं दसरा झालियावरी बुधवारीं पावलीं असतील. कलकेरी[2] याकडील ऐवज तीस हजार पैकीं साडेतीन हजार होन एकेरी पंधेरांचा[3] ऐवज कान्होपंतावरोबर पाठविला. पंधरांचा राहिला त्या पैकीं तुमच्या होनांच्या बराता आल्या त्यास दिला. कांहीं आह्मांकडे बरातांच्या भरीस पडला. या प्रमाणें त्याचा जमाखर्च. तमाम लोकांस दोन दोन ताकीदपत्रें रवाना केलीं. आणखी ही पाठवितों. आळस करीत नाहीं. हे लोक त्वरेनें काळजी धरून निघावयाचे नव्हेत. तथापि जे आधीं निघतील ते आधीं पावतील. आपणच कळेल. करारास कोण आला न आला. वरकड, " श्रीमंतानीं पुढें त्वरेनें जावयाची आज्ञा केली " ह्मणोन लिहिलें. याचा अर्थ न कळे. दोन हजार चार हजार फौज जमा झालियावरी आज्ञा करावी, त्यास पांचशें स्वार तयार होऊन आले असतां स्वारीची जलदी, याचा अर्थ काय? त्यांत कार्य ही स्वल्प नव्हे. मातबर कार्य. आपली इभ्रत भारीपणाची व फौजेची सलावत पडत जावी, त्यार्णीं खबरी ऐकोनच विचारांत पडावें असा प्रकार (व्हावयास पाहिजे). फौज

मिरजेपासून तीन कोसांवर आहे.

१ ' बांका ' हें हत्तीचें नांव. २ कलकेरी हें कोणा सावकाराचें आडनांव. ३ पंधरा हजार रुपयांचा. ४ दादासाहेब व त्यांजकडील सरदार यार्णी.

भारी जथल्याविना (घाई) करूं नये. तुम्हीं त्याणीं सांगितलें ह्मणोन गडबड न करणें. लोक दोन हजार जमा होतील तेव्हां भीमा पार होणें. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे आशीर्वाद.

नं० ७९

(९ आक्टोबर)

श्रीगणपतिर्जयति.

श्रियासहे चिरंजीव राजश्री नारायणराव नाना यां प्रती गोविंद हरी आशी-

---

१ हें पत्र गोविंद हरीनें मिरजेहून पुण्यास नारायणराव कृष्ण (थोरल्या भावाचा मुलगा) यास लिहिलें आहे. पेशवाईत युद्धकलेचें व राज्यकारभाराचें ज्ञान अनुभवानें प्राप्त होत असे. दरबार व समरभूमि याच त्या वेळच्या शाळा! सरदाराचा मुलगा पंधरा सोळा वर्षांचा झाला कीं, त्यानें तो घरांतून बाहेर काढून स्वांच्या शिकारी करण्या साठीं आपणा बरोबरच घेतलाच! मुत्सद्याचा मुलगा प्रौढ वयांत येतो न येतो तोंच कारभाराचें ओझें त्याच्या शक्ति प्रमाणें त्याच्या डोक्यावर लादलें जाई! अशा रीतीनें त्या काळचे योद्धे व मुत्सद्दी तयार होत. गोविंद हरी सरदारी करीत होता तेव्हां गोपाळरावास त्यानें युद्ध कलेंत तयार केलें. पुढें ह्मातारपणामुळें गोविंद हरी घरीं बसून सरदारीचा कारभार पाहूं लागला व सरदारीचें ओझें गोपाळरावानें सांभाळिलें. गोविंद हरीच्या हाताखालीं नारायणराव व मोरोबा हे कारभारांत तरवेज झाले. गोपाळरावाच्या देखरेखी खालीं वामनराव, नीलकंठराव व परशुरामभाऊ हे सरदार तयार झाले होते. लष्करांत गोपाळराव मुख्य सरदार व नारायणराव त्याचा कारभारी या दोघांच्या धोरणानें बाकीच्या भावानीं चालावें अशी पद्धत पडली. त्यावेळीं पटवर्धनांचें घराणें तेजस्वी होतें. प्रत्येक स्वारींत सोळा सत्रा पुरुष घरचे असत. हे सर्वच लहान मोठ्या योग्यतेचे व इतमामाचे सरदार होते. पण कधीं कोणांत कुरकूर देखील होत नसे. मग तकरारी, भांडणें व फितूर यांचें नांव कशाला! वडिलां विषयीं मर्यादा, आपसांत एकजूट, आणि पुढाऱ्यावर पूर्ण विश्वास या तीन गोष्टींचें बाळकडूंच सर्वांस मिळालें होतें! सर्वांच्या प्रीति व द्वेष, ग्रह व आग्रह, मसलतीचीं धोरणें व बागणुकीच्या तऱ्हा एकच! अशा संघशक्तीच्या जबरदस्त जोरावर कसें ही संकट पडलें तरी ते डगमगत नसत व पाहिजे ती मसलत पार पाडण्याचें सामर्थ्य त्यांमध्यें होतें यांत नवल काय? एक मेला कीं, त्याच्याच तालमींत तयार झालेला दुसरा त्याचें काम बजाविण्यास तयार आहेच! इ. स. १७६५ त नारायणराव मेला तों त्याच्या जागीं मोरोबा कारभारी झाला. १७७१त गोपाळराव मेला तेव्हां वामनराव मुख्य सरदार झाला. १७७४

वर्तमान उपरी. येथील कुशल तागायत आश्विन बहुल षष्ठी भृगुवार पावेतों वर्तमान यथास्थित असे. विशेष. तुम्हीं शु० चतुर्दशी गुरुवारचें पत्र पाठविलें तें पावलें. लिहिलें वर्तमान श्रवण जाहलें. अक्षरेंसा[1] कळलें. मुख्य गोष्ट वारंवार लिहिणें हेंच कीं, सावध असावें. उतावळी न करावी. "घरासें[2] जावया निरोप न देत, मर्जी तोडून जातां नये, यास्तव राहिलों." ह्मणोन लिहिलें तें कळलें. प्रसंगीं तुम्हीं व चिरंजीव नीलकंठराऊ उभयतां सावध आहां. हरएकविशीं रात्रीं दिवसा सावध राहणें. गाडदी यांचा समागम फारसा न करणें. शिंदी[3] अंबर आदिकरून एकंदर सूचना लिहिली आहे. लोकांस तमाम ताकीद केली. कोणी आजी निघाले,; कोणी चौदिवसां निघतील. कोणी दिपवाळी करून निघतील. " चिरंजीव वामनराऊ आपल्या पत्रा पूर्वीच सरेंळ[4] आले होते. त्यांत आपलें पत्र ही आलें. ते ही तयारी करितात " ह्मणोन लिहिले वरून समाधान झालें. उत्तम आहे. अपसव्य[5] दरबारास जातो येतो त्याचा विश्वास धरितात. कार्य भागी केवळ मामेदील [?] से दिसतात. त्याचा विश्वास परिच्छिन्न न धरावा.

त मोरोबा वारला तेव्हां त्याच्या हाताखालीं तयार झालेला पांडूरंगराव कारभारी झाला. १७७६ त वामनराव मरण पावला तेव्हां परशुरामभाऊ मुख्य सरदार झाला. पांडुरंग राव १७७८ च्या प्रारंभीं मरण पावला, तेव्हां त्यानें शिकवून तयार केलेला गंगाधरराव कारभार पाहूं लागला. वामनराव व परशुरामभाऊ यांच्या शिक्षणानें युद्धकलेंत रघुनाथराव प्रवीण झाला. पुढें परशुरामभाऊ व रघुनाथराव यानीं पुढील पिढीचे मुलगे रामचंद्रराव, चिंतामणराव, हरीपंत, नारायणराव, त्रिंबकराव वगैरे सरदारींत अर्धेमुर्धे तयार केले तोंच ते दोघे ही सरदार वारले व पुढें रावबाजींचा उदय होऊन पटवर्धनांची सरदारी लयास गेली!

१ अक्षरशः. २ ' घरीं मंगळवेढ्यांस जाण्यास श्रीमंत पेशवे यानीं निरोप दिला नाहीं ह्मणून राहिलों. ' असा नारायणरावाचा अभिप्राय. अशा धामधुमीच्या वेळीं घरीं जाण्याचें कारण, त्याचा बाप कृष्णंभट (गोविंद हरीचा सर्वांत थोरला भाऊ) मंगळवेढ्यास फार आजारी होता. (नं० ७० च्या पत्रांत या विषयीं उल्लेख पहा.) ३ शिंदीअंबर हा गारद्यांचा सरदार जरी पटवर्धनांचे निसबतीचा होता तरी त्याचा देखील विश्वास धरूं नये, असें गोविंद हरी लिहितो. ४ मध्यें न थांवतां. ५ आवा पुरंदरे.

तसाच तांबेकर[1] अद्याप पोतदारी करितो. त्याचा विश्वास न धरावा. लाख पन्नास हजार घेऊन धंदा[2] दूर करून कवडीचा माल करावा. बरकड कित्येक तत्पक्षीय आहेत. "कनिष्ठ[3] तुमच्या विचारें समजाविले ते यांच्यांत मायेंत. त्या प्रकरणांत नाहींत" म्हणोन लिहिलें तें सर्व मिथ्या! प्राण घातक! परिच्छिन्न विश्वास धरूं नये. धंदा त्यांजकडे देऊं नये. घरबुडवे कार्यभागी कां समजत नाहींत! इतकें डोईस लागलें, तरी विश्वास धरितात! अपूर्व आहे! आम्ही दूर आहों. आम्हांस सारें कळतें, परंतु स्वाधीन काय! तुम्हांस लिहितों, लिहून सार्थक नाहीं! तथापि राहवेना. लोकांनीं वेडें म्हणावें या अर्थें लिहितों! 'गें'कार नामकाचा मजकूर— त्याचा समजच हा. त्याणीं संतोषचित्तें रहावें. त्या पक्षींचें अगत्य त्यास. परिच्छिन्न मध्यस्तीस पाठवूं नये. दालभ्यास[6] पाठवूं नये. विश्वास ही धरूं नये. वारंवार किती लिहावें! बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे आशीर्वाद.

नं० ७६

[अजमासें आश्विन वद्य. अक्टोबरचा पहिला पंधरवडा.]

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद[7] उपरी. श्रीमंत राजश्री दादासाहेब यांजकडे पुरंधरे व विठ्ठल शिवदेव व अंताजी माणकेश्वराचे पुत्र व नारो शंकर व कृष्णराऊ पारसनीस आदिकरून मुत्सद्दी व सरदार जितके गेले त्यांचे सरंजाम बंद करावे.

---

१ गोपाळनाईक तांबेकर हा त्या वेळचा एक प्रसिद्ध साहुकार, दादासाहेबांचा बहुत अभिमानी व सखारामबापूचा विश्वासू मित्र होता. याजकडे सरकारच्या पोतदारीचे काम होतें. २ पोतदारीचा. ३ धाकटे नाना उर्फ धोंडोपंत नाना पुरंदरे. ४ माधव राव पेशव्यांच्या. त्या प्रकरणांत ह्मणजे दादासाहेबांच्या फितुराच्या प्रकरणांत. ५ गंगाधर यशवंत चंद्रचूड. [होळकराचा दिवाण.] ६ दालभ्य कोण? 'बकदालभ्य' या नांवावरून कदाचित् या मनुष्याचें नांव 'बगाजीपंत' असें असावें. ७ गोविंद हरीनें गोपाळरावास हें पत्र (मिरजेहून पुण्यास) लिहिलें आहे.

पांच लक्षां पावेतों गेले त्यांचा सरंजाम होईल तो जप्ती करून ऐवज सरकारांत ध्यावा असें कार्यभागी यांस व श्रीमंत मुल्यांस सांगावें. या उपरी करुणा कार्याची नाहीं. चिरंजीव सौभाग्यवती भवानीबाई कारणें मूळ[1] तीर्थरूपानीं पाठविलें आहे. रवाना करणें. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

कागद फाडून टाकणें.

चिरंजीव नारायणरायास आशीर्वाद. तुम्हीं चिरंजीव नीलकंठरायाच्या माणसाबद्दल लिहिलें तें कळलें. निरोप न देत तर उपाय नाहीं. परंतु उतावळी न करणें. बहुत धीरेकरून वर्तणूक करणें. मार्गशीर्षी पौर्णिमे पावेतों त्यांची[2] उत्कृष्टता आहे. मग यश यजमान स्वामीकडे. ते[3] वारापाणी होतील, फजीत पावतील. त्रिंबकाचा किल्ला घेतला म्हणून कार्य जाहलें. बहुत काय लिहिणें. कागद फाडून टाकणें. हे आशीर्वाद. चिरंजीव राजश्री नीलकंठरायास आशीर्वाद. लिहिलें परिसिजे. चिरंजीव राजश्री आबास व वामनराऊ व भाऊसाहेब यांस आशीर्वाद. पत्रें, पाठवीत जाणें. लोभ कीजे हे आशीर्वाद.

नं० ७७ (अजमासें आश्विन वद्य. अक्टोबर पहिला पंधरवडा.)

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी. तुम्हीं माणकोजी बरोबर पत्रें पाठविलीं तीं पावोन

१ बोलावणें. अर्थात् पालखी, तट्टें, शागीर्द, गडी, वगैरे माणसें. भवानीबाई ही नीलकंठरायाची बायको. तीर्थरूपानीं ह्मणजे त्रिंबकहरीनें. २ दादासाहेब व तत्पक्षीय लोक यांची. ३ दादासाहेब व तत्पक्षीय लोक सैरावैरा पळून जातील. ४ दादासाहेब नाशीकप्रांतीं आहेत त्यानीं त्रिंबकच्या किल्ल्यांत आसरा धरिला असता तर तेथून त्यांस बाहेर काढण्यास तुम्हांस जड जातें. परंतु हें ओळखून तुह्मीं आधींच तो किल्ला घेतलात हें उत्तम झालें, असा लिहिणाराचा अभिप्राय. ५ मोरोवल्लाळ उर्फ मोरोबा आबा. ६ परशुराम भाऊ. ७ हें पत्र गोविंद हरीनें मिरजेहून पुण्यास गोपाळराव यास लिहिलें आहे.

विस्तारें आद्यंत वर्तमान श्रुत जाहलें. श्रीमंत दादासाहेबांकडील प्रकार कळला. तीन पिढ्या थोरल्या— श्रीमंत नानासाहेबांपासून दौलत मिळविली तेवढी बुडवावी, ये विषयीं साहित्यास सखाराम होऊन यश मातबर घेणार! बरें! श्रीची इच्छा! तमाम स्वज्ञाती[1] एक जाहली आहे. आमचे ही ज्ञातीचे कृतघ्न त्यांत मिळाले. परंतु तो सर्वांस बुडविणार हें ठाऊक नाहीं! असो. प्रारब्ध प्रमाण. श्रीमंत मुख्य यांचें पुण्य समर्थ आहे. सर्व ही लयास जातील. तूर्त महिना दोन महिने फौज जमा होय तों उतावळी न करावी. पुरती फौज जमा होती, मार्गशीर्ष मास येतो, सर्व ही चित्तानुरूप घडोन येईल. तुम्हीं स्वतः जातीनें बहुत सावध राहणें. तुम्हांवरी सारा इतबार, यांजमुळें तुमचें अनिष्ट ते[3] कृतघ्न इच्छितात. यास्तव रात्रीचे सावध, दिवसाचे सावध, राहत जाणें. वावगें माणूस जवळी येऊं देऊं नये. गाडदी यांचा विश्वास धरूं नये. छद्म करावया चुकणार नाहींत. फौजेस तमाम ताकीद केली. गांवोगांव पत्रें पाठविलीं. रामजी साळोंखे शुक्रवारीं आजी पंचमीच्या मुहूर्तें निघोन जातों म्हणून बोलोन गेले. चिमाजी हजारीनें ही आजी निघावेंसा करार केला. चिरंजीव कोनेरराऊ आजी कुरुंदवाडाहून निघून कागवाडास येणार. त्यांणीं ही लोकांस ताकीद केली. आम्हीं त्रिवर्गांच्या ही लोकांस पत्रें पाठविलीं. सिंगाडे राणोजी, मुरारजी याणीं प्रत्योत्तर दिलें नाहीं. लवकर निघतों म्हणोन बोलिले. वरकड नदी पलीकडील लोकांचीं प्रत्योत्तरें पाठविलीं आहेत. त्यांवरून कळेल. कांहीं आजींच्या मुहूर्तें निघतील, कांहीं प्रतिपदेच्या निघतील. चिरंजीव वामनं

---

१ बाळाजी विश्वनाथ. गोविंद हरीस सरदारी या पहिल्या पेशव्याच्या कारकीर्दीतच मिळाली. २ सखारामबापूची स्वज्ञाती [देशस्थ]. ३ दादासाहेबाकडील लोक. ४ दादासाहेबांची फौज पुण्याकडे येत्ये असें पाहून गोपाळराव काय जमले होते तेवढेच स्वांर बरोबर घेऊन पुण्याहून निघून शत्रूच्या रोंखावर घोडनदी पर्यंत गेला. त्याचे भाऊ वामनराव, नीलकंठराव, परशुरामभाऊ हे पटवर्धनांची बाकीची फौज जमे पर्यंत पुण्यास होते ते ही आतां गोपाळरावास मिळण्या करितां तेथून निघाले, या हकीगतीस अनुलक्षून हें गोविंद हरीचें लिहिणें.

राऊ नवमीस निघतात म्हणोन लिहिलें, उत्तम आहे. आम्हीं वरातदारांचा पैका ठेविला नाहीं. तमाम पैका दिला. चिरंजीव गणेश कृष्ण जोशी यांचा ही पैका दिला. चिरंजीव भाऊकडील लोकांचा दिल्हा. वराते पैकीं चिरंजीव नारायणराऊ या शिवाय कोणाचा पैसा देणें नाहीं. केंचापा सलगर याचें चारशें देणें तो नेत नाहीं. " चिरंजीव नीलकंठराऊ निघाले, चिरंजीव भाऊ निघाले, " म्हणून लिहिलें, बहुत उत्तम. सर्वांस एकच आज्ञा. बहुत सावधपणें राहणें. फौज जमा जाल्याविना पुढें जाऊं नये. उतावळी युद्धाची कार्तीकमासीं न करावी. मार्गशीर्षमासीं तुमची फत्ते आहे. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

नं० ७८

(१८ आक्टोबर)

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत कार्तिक शु० १ सोमवार यथास्थित असे विशेष. तुम्हीं जासुदाबरोबर पत्रें छ० २५ तेरखेचीं गुरुवार अडीच प्रहर दिवसा रवानगी केली ते काली अस्तमानीं येथें पावलीं. वर्तमान विस्तारें कळलें. बरें! ईश्वर इच्छा! कालचक्र कोणीकडे फिरतें न कळे? एकूण हरएक प्रकारें ज्ञातीचा नाश करावा हें सखारामाचे मनांतं. [त्यानें] बाहेरें जाऊन पाहिलें. तिकडून मागती राजकारण करून

---

१ सर्व. २ गोविंद हरीचें मिरजेहून गोपाळरावास पत्र. ३ छ० २५ रविलावल (आश्विन वद्य द्वादशी) रोजीं तिसरे प्रहरीं पुण्यापलीकडे दहा पंधरा कोसांच्या अंतरावरून लिहिलेलीं पत्रें, मिरजेस २०० मैलांवर येण्यास पूर्ण तीन दिवस व दीड प्रहर लागला. जासूद रात्रीचे चालत नसत. सकाळपासून संध्याकाळपर्यंत चालत. त्यांत ही त्यांस विश्रांती करितां दररोज दोन तास या प्रमाणें तीन दिवसांचे सहा तास वजा केले तर ते ३४ तासांत २०० मैल आले असें दिसतें. शिवाय आश्विन कार्तिकाच्या महिन्यांत कित्येक नद्यांस उतार नसतो व कित्येकांस अकस्मात् पाऊस पडून पूर येऊन वाटसरांची खोटी होत्ये हें ही ध्यानांत ठेविलें पाहिजे. ४ कोंकणस्थांचा. ५ राज्याबाहेर. ६ दादासाहेबांची व पेशव्यांची लढाई होण्यापूर्वी दोहीं पक्षीं समेट हो-

मुख्यच लगामीं लाऊन घेऊन ज्ञातीचा क्षय करावा, मग सहजच लयास गेले असें होऊन त्याचा संकल्प सिद्धीस गेला (असें होईल.) तो कार्य भागी जालियावरी फिरोन वरकडांचा टिकाव होतो असा अर्थ नाहीं. तेव्हां पुढें काय काय होणार न कळे ! लज्जारक्षक श्रीभगवान आहे. तुम्हीं स्वदस्तुरें पत्र लिहिलें त्यांत लोक न आले यामुळें फारच श्रमी व आम्हांवर ही झडे गेलां; ऐशास आमचा उपाय काय ? तुम्हीं पुढें जाल या अर्थे आम्हीं लोक राहाविले असतील तर आम्हांस शपथ आहे ! ते आपलाले गांवीं न निघत तेथें आमचा उपाय काय ? ग्रहेण, अमावास्या, दिपवाळीची संधी आली. चिरंजीव भास्करपंताकडे अंतर नाहीं. असो. तुम्हीं लिहिलें त्यास आमचा इलाज नाहीं. रागें भरलां तरी चिंता नाहीं. श्रीनें स्वस्ति कल्याणरूप रक्षावें हे मात्र इच्छा. दिवसें दिवस अधिक चिंता प्राप्त होत चालली ! कोण्या थरास जातें न कळे. आजी प्रातःकाळीं माणसें पिटलीं. पत्र दिलें नाहीं. " जाऊन दरकोंड करून बाहेर काढा, दुराई द्या, ऐसें सांगत गांवोगांव जाणें; " म्हणोन जासूद नदी अलीकडे पलीकडे रवाना केले. चिमाजी हजारी बेडगेहून गेला. दोन चार दिवस जाले म्हणोन ऐकिलें. रामजी साळोंका गेला न गेला न कळे ! कोडग व झांबरे गेले न गेले न कळे ! कोणती गोष्टी करावी ! सारीं संकटें एकावरी एक. लटिक चिंता. कर्जदार होऊन ठिकाण नाहीं. एकनिष्ठ

ण्याचें घाटत होतें. पेशवे व गोपिकाबाई यांची अर्धीमुर्धी कबुली ही झाली होती. सखारामबापूस पुनः कारभाऱ्याची जागा प्राप्त व्हावी असें ठरत होतें. या गोष्टी पटवर्धनांस अर्थातच रुचल्या नाहींत. गोविंद हरीनें हें व या पुढील नंबर ७९ चें पत्र इतक्या उदासीनपणें लिहिलें आहे त्याचें कारण हेंच होय.

१ माधवराव पेशवे. २ कारभारी. ३ रागें भरलां. ४ यावरून इ० स० १७६२ शके १६८४ या वर्षी दिवाळीचे अमावास्येस सूर्य ग्रहण होतें असें झालें. त्या नंतर पंधरा दिवसानीं कार्तिकी पौर्णिमेस चंद्रग्रहण ही होतें. त्याविषयीं उल्लेख पुढें नं० ८४ चें पत्रांत पहा. ५ अन्याय. ६ घरांतील माणसांस तसदी देण्या करितां दारांत बसून त्यांचें आंत बाहेर जाणें येणें बंद करणें. ७ शपथ. ८ कृष्णानदीचे अलीकडे पलीकडे. ९ बेडग हें गांव मिरजेच्या पूर्वेस तीन कोसांवर आहे.

सेवा करून त्याचा फलात्कार[1] हा ! पुढें तो[2] कार्यभागी जाहला ह्मणजे आमचे गळे कापावयास सिद्ध. हें धण्यास न कळे तेव्हां फिरोनें गोष्टी सांगावी, निमकहरामी पदरीं घ्यावी अथवा अब्रूसाठीं मरावें ! तो ही लौकिक ऐक प्रकार. ' धण्यांणीं आपल्या चित्तास आलें तें केलें. चाकर लोकांस झुझावयास कारण काय ' [असें लोक ह्मणतील.] त्या[3] निसबतीस गेले त्यांस आम्हीं लबाड म्हणत होतों. परंतु त्यांस एकाचा तरी आधार होता. आम्हांस दोघांचा[4] ही नाहींसा झाला ! बरें ! श्रीपंढरीनाथें नेमिलें असेल तसें होईल ! आम्हीं सावध आहों. तुमचें सर्वांचें कल्याण तें आमचें. आम्हींच सावध असोन कर्तव्य काय ! बरें श्रीसत्ता प्रमाण ! रात्रीं पत्र-पावल्यापासून निद्रा नाहीं. काली ग्रहणास श्रीकृष्णा स्नानास गेलों. तेथून अस्तमानीं उपवासी (घरीं येऊन) बसलों तों तुमचें पत्र आलें. अन्न देखील गोड लागलें नाहीं. आजी पहांटेस कुरुंदवाडास तीर्थरूपांकडे पत्रें रवाना केलीं. तुम्हीं धीर धरणें. वर्तमान घडीघडीचें लिहिणें. मार्तुश्रीस आपली गति काय ह्मणोन पुसणें. हे आशीर्वाद.

पैवस्ती चंद्र ९ रबिलाखर.

नं० ७९

[कार्तिक शुद्ध १ आक्टोबर १८.]

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी. तुम्हीं आदिअंत वर्तमान बंद सात व कित्ता बंद चार एकूण अकरा बंद वर्तमान विस्तारें लिहिलें तें अक्षरशः वाचून विश्रांती वाटली. आधींच ग्रहण. सारावेळ उपवासी (होतों.) अस्तमानीं श्रीकृष्णे-

१ परिणाम. २ सखारामबापू. ३ माधवराव पेशव्यांस. ४ वे इमानी होऊन. ५ वाईट, विरुद्ध. ६ दादासाहेबांच्या. ७ माधवराव व रघुनाथराव हे एक झाल्यावर दोघांचा ही आधार आह्मांस नाहींसा होईल. ८ गोपिकाबाईस. ९ हें पत्र गोविंद हरीनें मिरजेहून गोपाळरावास लिहिलें आहे. गोपाळरावाचा मुक्काम पुण्यापलीकडे सुरूरखोकडी येथें होता.

हून आलों. बसलों, तों तुमचीं पत्रें जासूद घेऊन आले. पत्रें पाहतां पाहतां अंतर भेदत चाललें. उपवासाचे श्रम. दुसरे पत्रार्थाचे श्रम. सर्वांग तप्त जहालें. भोजन गोड लागलें नाहीं. सारी रात्र निद्रा नाहीं. चिंतार्णवीं मग्न जाहलों. कोणे प्रकारचा मनसबा! ते[1] गेले काय, तुम्हीं पुढें कल्पना काय करितां, आणि त्यांणीं अंतर्यामीं बोध करून [श्रीमंतांचें] चित्तच तिकडे फिरविलें! धन्य त्या लोकांची! आमचे (जातीचे लोक) कौळोन[2] त्यांस वश्य! त्याचें हित ते आपलें मानितात, परंतु बकरें खाटिकाचे घरचें! आजी एकास मारिलें, उद्यां एकास मारील, हें ज्ञान नाहीं! असो! भवितव्यतानुसार होणार तें होतें. तुम्हीं तो हिम्मत पाहिजे तशी बाळगितां. आम्हीं निकामीं घरीं राहून कोणास खात्रेस आणीत नाहीं! त्या पांजीनें[3] कर्तव्य काय! त्या पाशीं वित्त काय! येथें आले तर जे तुम्हीं चार जथले हेच तेथें निराळे गेले तरी पाण्यांतून मासोळी फांसरीं[4] लागोन जातात ऐशी गती जाहली. पुढें परिणाम काय? धणी मनसबेबाज कळलेच आहेत! द्रव्याचा प्रकार कळलाच आहे! सारें राज्य तुम्हांकडे. त्यांचीं पोरेंबाळें इकडें. 'पुढें तेथें हर तजवीज करून तेथेंच जावें, नाहीं तर आपला परिणाम नाहीं;' हें जाणून गंगाधरभटास[5] कांहीं देऊं करून त्याजकडून (त्यांनीं श्रीमंतांकडे व मातुश्रीकडे) राजकारण करविलें! दुसरें अपसव्यानें अंतर्यामीं अजापाळकाला[6] वेडें केलें! गतवर्षा पासून तो सदैव समागमीं [राहून] नाना प्रकारचे कुतर्क त्यास शिकवून त्याची बुद्धि फिरविली तरी होणें काय! ज्याचा त्याणें नाश आपला आपण करून घेतला! पुढें भवितव्यार्थच तसा. ये गोष्टीस कोणी काय करावें? तुमचें कोणें काय करावें? तुम्हीं कोणाजोगे[7] आहां? झक मारितात पाजी! आपल्या आपण फजीत पावतील. त्याचा केला मनसबा लक्ष प्रकारें ये

---

१ सखारामबापू वगैरे. २ गुप्तरीतीनें. ३ समजून उमजून. ४ सखारामबापूस. ५ ही शेलकी शिवी सखारामबापूच्या वांट्यास! ६ फांसांत. ७ दादासाहेबांकडील लोकांचीं. ८ पुण्यास पेशव्यांकडे. ९ गंगाधरभट कर्वे हे पेशव्यांचे उपाध्ये. १० धनगर मल्हारराव होळकर. ११ तुमची बरेबरी करणारा कोण आहे?

समयीं सिद्धीस जात नाहीं. महिनाभर पाहिजे. तत्रापि मनसबा सिद्धीस गेला तर पुढें परिणाम होणें कठीण आहे. मागती घाण होईल. श्रीमंत मातुश्री मोठी मनसबेबाज आहे ! सर्व प्रकारें त्यांकडे विश्वास देऊन आपणास पटकी[1] त्याणीं दिली आहे, त्यांस आपण पटकी द्यावी; ये मसलतीस चुकणार नाहींत. रास्ते दोहींकडे. तुम्हांकडे सारखे, मातुश्रीकडे सारखे. तिकडे[2] सारखे ! त्यांचा गुंता नाहीं. आम्रपल्लव कोठें ही सारखेच आहेत. नारा नाचूं लागला यामुळें सर्व राज्यांत बदबेक हलकेपण (होईल) कोणी भय मानणार नाहींत. सर्व दौलत क्षयास न्यावयाचा प्रकार योजिला आहे ! चि० आबास तुम्हीं त्यां[3] गृहस्थाकडे पाठविलें त्याचा ही विश्वास पुरत नाहीं. असो. कोणाचा हिसाब[4] न धरणें. स्वतः जातीनिशीं व मंडळी सारी आपली एक दिल. झक मारितात ! कोणे काय करणें ! कोणी जाहला तरी तुम्हांस भयभीतच होईल. तुमचें भय वागवील. तुम्हांस कोणापासून भय नाहीं. [ही] खातरनिशा असों देणें. श्रीपंढरीनाथ समर्थ आहे. बहुत सावधपणें राहत जाणें. चिंता न करणें. वरचेवर लिहित जाणें. आम्हीं येथें सावध आहों. पहिले हर्जाराची भरती बाहेरील ठाणीं देखील लोक होते. आणखी पांच सातशें ठेवितों. शिबंदी पुरवेल, परंतु आपला नक्ष[9] दुसऱ्यावर असावा. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

नं० ८० (२० आक्टोबर)

श्रीगणपतिर्जयति.

चिरंजीव राजश्री राव[5]साहेब यासीं प्रती गोविंद हरी आशीर्वाद उपरी येथील

---

१ गोपिकाबाईस भरीस देऊन पटवर्धनानीं आपला नाश केला आहे तर आपण ही त्याच मार्गे त्यांचा नाश करावा असें सखारामबापू वगैरे मनांत आणितील, असा लिहिणाराचा अभिप्राय. २ दगा. ३ गोपिकाबाईकडे. आनंदराव रास्ते हे गोपिकाबाईचे सख्खे बंधु. ४ दादासाहेबांकडे. ५ ढिलाई. वक्र ह्मणजे कुर्रा. ६ गमाजी बावा [प्रतिनिधीचे मुतालीक] यांजकडे. ७ पर्वा. ८ 'मिरज व भोंवतालचीं तासगांव, कागवाड, कुरुंदवाड वगैरे ठाणीं मिळून एक हजार प्याद्यांची भरती होतीच. आणखी पांचशें लोक ठेवून ठाण्यांचा पक्का बंदोबस्त करितो.' असा लिहिणाराचा अभिप्राय. ९ नक्षा, दरारा. १० गोपाळराव.

कुशल तागायत कार्तीक शु० ३ बुधवार यथास्थित जाणोन स्वकीय कुशल लिहित जाणें. विशेष. तुम्हीं पत्रें पाठविलीं तीं (गुरुवारीं अडीच प्रहरां रवानगी) रविवारीं अस्तमानीं येऊन पावलीं. सव्वातीन दिवसांत येऊन जासूद दाखल जाहला. स्वहस्ताक्षरें एक बंद लोक त्वरेनें न आले म्हणोन लिहिलें तें प्रमाण. सर्व प्रकारें अंतर आम्हांकडून पडलें. प्रथमतः बेमुरवत आम्हीं ताकीद करून हातीं धरून बाहेर घालवितों तर (शिलेदार) गेलेच असते. परंतु आम्हांकडूनच आळस जाहला. परंतु तुम्हीं ' तूर्त पुढें जाऊं नये, लोक त्वरेनें गेले तर जाल, या अर्थें कृत्रिम चित्तांत आणून अनमान रवानगीचा केला ' असा भाव नाहीं. येथें ब्राह्मणांनीं सांगितलें त्यावरून " तुम्हीं न जावें " असें लिहिलें होतें. परंतु धण्याची आज्ञा प्रमाण. जावेंच लागलें. तथापि ऋणानुबंध प्रमाण. जाणें घडलें नाहीं. दुसरी गोष्ट, योजिला मनसबा एकीकडे राहून ' मुरारस्तृतीयःपंथः ' हा कल्प कोणें केला होता ? तस्मात् भावी होणार तें प्रमाण ! कोणावरी शब्द ठेवावा असा अर्थ नाहीं. इतके दिवस श्रम साहस—कल्याण धण्याचें व्हावें या अर्थें—केलें तें सर्व एकीकडे राहिलेंसें जालें. अधांतरीं गळा कापिल्यासारिखें केलें. तस्मात् दीर्घाभिमानी ! मुख्य गोष्ट काल एक प्रकार [चा] आला, तदनुसार बुद्धि होते ! लोकांस दोन दोन पत्रें पाठविलीं कीं त्वरेनें जाणें. परंतु माणूस एकाचा आपोड. (?) दुसरियाचा आपोड. (?) तिसरा त्याची वाट पाहूं लागला. चौथ्यास आणखीच गुंता पडला. पांचव्यास फलाणें निमित्य. एकास एकच निमित्य नाहीं. सारे यांस एकच नाहीं. भिन्न प्रकारें निमित्यें करून राहिले. आतां निघोन ते ही तुम्हांपाशीं येतील, तुम्ही ते एक व्हाल, त्यामुळें सारी इतराजी आम्हांवरीच आली ! बरें. चिंता काय ! श्रीकृपेनें लोक येऊन पावत तों कामकाज न पडावें. लोक जमा जालियावरी होणार तें सुखें हो ! बुद्धीच्या विचारें पाहतां तुम्हांशीं

---

१ चूक झाली. २ ' मुरारस्तृतीयः पंथः ' या अपभ्रष्ट संस्कृताचें मूळ स्वरूप मुरारेस्तृतीयःपंथाः ! ३ विलक्षण. ४ कामकाज अर्थात् लढाईचें ! ५ होवो.

कोणी धसत नाहीं. सर्वस्व सारे एकसरले,[१] त्यांवरी तुम्हीं धण्यापाशीं राहिलेत. तुमचें बळ सर्वांस. आधींच तुमचा ते[२] दावा करीत होते. आतां तो सर्व प्रकारें तुम्हीं द्रोही जाहलांच आहां. ह्मणोन एकाएकी तुम्हांशीं विरुद्धाचरण करणार नाहींत. कदाचित् त्यांणीं मनांत आणिलें तरी त्यांस तुम्हीं कोठें खातरेंत आणितां! त्यांपाशीं तरी जमाव कोठील होणार? नालबंदी देऊन लोक जमा केलेले थोडकेच आहेत! ते[३] चार हजार असिले आणि तुम्हीं आपली मंडळी समेत हजार असिलां तरी त्यांच्यानें तुम्हांवरी येववत नाहीं! तुमचा लौकिक भारी. त्या मशकांच्यानें तुम्हांकडे येववणारच नाहीं, ही खातरनिशा आमची आहे. श्रीमंत मातुश्री बाईसाहेबांस एकांतीं पुसावें. कीं, " पाहिल्या पासून सखाराम आमचा द्वेषी. त्या मध्यें तुमचे कश्यपीं आम्ही. तुम्ही ते एक जाहलां. पुढें आम्हांस आज्ञा काय? आमचा निभाव कोणे प्रकारें? पहिले कर्जदार होतों तें कर्ज तसेंच (राहिलें आहे.) गतवर्षीं कर्जदार. यंदां कर्ज करून फौज ठेविली. या उपरी आम्ही कोणाचे? [आमचा] धणी कोण? आमची गती काय? ते[४] उद्यां आले ह्मणजे आम्हांस देशधडी करतील. आमचा रक्षक कोण? नाना प्रकारें वैषम्य आमचें त्यास [आहे.] आमचा बचाव कोणे प्रकारें? तुम्हीं यक्तियारी[५] त्यांजवरी दिली, तेव्हां ते जें करतील तें प्रमाण! आमचें तुमचें दर्शन कोठून होईल? जिकडे तिकडे त्यांची बंदोबस्ती होईल. लोक त्यांच्या निसबतीचे (तुम्हांजवळी राहतील.) आमचें आगमन वाडियांत होऊं देणार नाहींत. तुमचे पाय दृष्टीस पडणार नाहींत. यास्तव आम्हांस आज्ञा काय करितां ते करणें. [आम्हीं] बहुत दिवस सेवा केली. निमकहरामी करितां नये. सर्व प्रांत स्वामींचा. कोठें जाऊन काल हरण करावें? आम्हांस त्राता कोण? कोणाचा आश्रय धरून रहावें?

---

१ अगदीं सर्व. २ एकझाले. ३ सर्व फितुरी झाल्यानंतर. ४ सखारामबापू वगैरे. ५ दादासाहेब, सखारामबापू व तत्पक्षीय लोक. ६ गोविंद हरीचा हा अजमास अगदींच चुकला असें पुढील हकीगतीवरून कळून येईल. ७ गोपिकाबाईस. ८ दादासाहेब व सखारामबापू. ९ अखत्यारी.

परराज्य सोडवावयाचें अगत्य सखारामास नाहीं. आधीं ज्ञातीचें पारिपत्य करावें, त्यांत आधीं आमचें. [असा त्याचा हेतु आहे.] त्याच्या बापास आम्हीं भीत नाहीं. परंतु तुमचा अवश्यक होईल. " तो ह्मणेल तें तुम्हीं ऐका " ह्मणाल, तेव्हां मरावें कीं देशांतरास जावें ? काय गति करावी तें एव्हांच सांगणें. अगर मारावया वेअब्रू करावया येतील तेव्हां अब्रूसाठीं मारावें मरावें लागेल. त्यामुळें स्वामिद्रोह पदरीं पडणार, ते तुम्ही आपल्या संतोषेंच आम्हांस विष द्या; ह्मणजे तुमचे तुम्हांपाशीं प्राण ठेऊं. अगर " कळेल तें करा, झुझा, आपला प्राण वांचवा, " म्हणाल तर आश्रय पाहिजे. किंवा आपली पागा घ्या, दौलत घ्या, कर्जाची वाट करा. आम्हीं हरएक सुस्थळीं जाऊन राहूं अगर द्वीपांतर लंघून जाऊं. काय आज्ञा करणें ते करा. " ह्मणोन विज्ञापना करावी. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे आशीर्वाद.

नं० ८१

(अक्टोबर २३)

श्रीगणपतिर्जयति.

चिरंजीव राजश्री रावसाहेब यांसीं प्रती गोविंद हरी. आशीर्वाद उपरी येथील कुशल तागायत कार्तिक शु० ६ सह सप्तमी मंदवासर छ० ५ रबिलाकर जाणून स्वकीय लिहिणें. विशेष. चिरंजीव कोनेरराऊ काली येथून वसगडें याचे मुक्कामास गेले. आजी राजश्री विरूपाक्ष शामराऊ व बाबूराऊ जगजीवन वसगडें याच्या मुक्कामास गेले. उद्यां अगर परवां चिरंजीवांची

१ ' सोडवावयाचें ' हा शब्द ध्यानांत ठेवण्या जोगा आहे. इतर राजे शत्रूचें राज्य जिंकावयाचें असें ह्मणतात. परंतु मराठे लोक शत्रूचा मुलूख ' सोडवावयाचा, प्रांत सोडवावयाचा, ठाणीं व किल्ले सोडवावयाचे, ' असेंच नेहमीं ह्मणत. याचा अर्थ असा कीं, सारा हिंदुस्थान देश आपलाच पूर्वीपासून आहे. मात्र त्यापैकीं जो भाग बलात्कारानें शत्रूनीं आपणांपासून घेतल्यामुळें परराज्यांत गेला आहे तो आतां सोडवून पुनः आपलासा करावयाचा ! २ कोंकणस्थांचें. ३ बापास. ४ आवडता. ५ गोपाळराव. ६ कोन्हेररावाची.

श. १६८४ दादासाहेबांशीं लढण्याची तयारी. इ.स. १७६२

त्यांची गांठी पडेल. राजश्री शामराऊ यांणीं घरपागा[1] वगैरे साहित्य करून

---

१ पागा दोन प्रकारच्या. घरपागा आणि सरकारी पागा. सरकारी पागांतील घोडे सरकारी असून त्यांवरचे स्वांर असत त्यांस वारगीर ह्मणत. वारगिरांस पगार दरमहां नक्त आठ, दहा, वारा रूपये पर्यंत ज्याच्या त्याच्या लायखी प्रमाणें मिळे. सरकारांतून बहुतेक पागा सरदार लोकांच्या हवालीं करण्यांत येत. मग वारगिरांस दरमहां पगार पोंचविण्याचें काम सरदाराचें. ही रक्कम त्यास साल दरसाल हिशेब होत तेव्हां सरकारांतून मिळे. घरपागा तयार होत त्या अशा—कोणी सधन मनुष्यानें पदरचा पैसा खर्चून अथवा ज्याच्या अंगांत हिंमत व कर्तृत्व असेल त्यानें कर्ज काढून घोडे खरेदी करावे व वारगीर नोकरीस ठेवावे. दर वर्षास लढाया व मुलुखगिऱ्या असतच, तेव्हां अर्थात अशा तऱ्हेनें सजलेल्या घरपागेच्या मालकास आपली पागा घेऊन मोहिमेंत हजर होण्याविषयीं सरकारांतून बोलावणें येई. मग पागेचा मालक किंवा त्याच्या घरचे मुलगे किंवा जवळचे आप्त अथवा कोणी विश्वासू कारकून पागा घेऊन मोहिमेवर जाई. या नोकरी बद्दल मालकास सरकारांतून पागे पैकीं प्रत्येक स्वांरास तीनशें रुपये या हिशेबानें पैका मिळे. लुटीवर घोड्यांचें पोट व वारगिरांचे पगार भागवावे व सरकारी तनखा अजीबात खिशांत टाकावा, असा पागेच्या मालकाचा हेतु असे. या पैकीं त्यास साधेल तितकें तो साधी! असल्या पागांतून वीस पंचवीस पासून पांच पांचशें घोडे असत. यंदां बरकत आली तर पुढील वर्षीं त्यानें आणखी घोडे खरेदी करावे, असा क्रम चाले. हा एक त्या काळचा प्रतिष्ठित धंदा असून महत्वास चढण्याचा मार्ग होता. पांच पन्नास घोडे पागेंत जमत तों पाग्या सरकारांतून एखाद्या नदीच्या कांठीं कुरणें व दोन चार खेडीं बहुधा इनाम मिळवी. मग त्यांतूनच एखादें बरेसें खेडें पाहून त्यास तटबंदी करी. मग हा पाग्या दुष्ट असला ह्मणजे बहुधा या स्थितींत वाटा मारणें शेजाऱ्यांचे गांव लुटणें व गुरें वळवून नेणें, असलीं कुकर्में करून गबर होई. पागा जों जों मोठी होई तों तों सरकारास तिची अधिक अधिक जरूर लागे, पैक्याची तर पेशवे सरकारांत नेहमीं टंचाई. अर्थात् पागेच्या मालकास वेळेवर मोठमोठ्या रकमा देण्याचें सरकारास सामर्थ्य नसे. मग पागेचे मालकास पागेच्या खर्चा करितां निराळा तालुका तोडून जहागीर देण्यांत येई. इतकें झालें ह्मणजे पागेस 'पथक' ही संज्ञा आली. पुढें या पथक्यानें सरकारच्या अधिक अधिक कामगिऱ्या बजावाव्या व अधिक अधिक जहागीर संपादन करावी. या प्रमाणें होतां होतां पांच चार घोडीं प्रारंभीं बाळगणारा यःकश्चित् मनुष्य आपल्या हिमतीच्या व कर्तृत्वाच्या जोरावर वाढत वाढत शेवटीं सालिना पन्नास लाख रुपये उत्पन्नाच्या जहागिरीचा मालक झाल्याचीं उदाहरणें घडून आलीं आहेत! असलीं उदाहरणें फारच क्वचित् दृष्टीस पडावयाचीं हें तर खरेंच. कारण हा जो त्या काळच्या धाडशी लोकांचा वैभवास चढण्याचा मार्ग

श.१६८४ दादासाहेबांशीं लढण्याची तयारी. इ.स.१७६२

चिरंजीवांस आपणाकडे पाठविलें आहे. यांणीं कधीं मुलुखगिरी केली नाहीं अगर शिलेदारीवळण यांस ठाऊक नाहीं. सर्व प्रकारें सांभाळ करावा. आम्हीं त्याहावेंसें काय! सर्व तुह्मांस कळतच आहे. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे आशीर्वाद. अन्नाजी माने तुम्हांशीं बोलोन आले एक, येथें कोणें प्रकारें वर्तणूक केली तें सविस्तर बाबूराव सांगतां कळेल. हे आशीर्वाद.

पैवैस्ती छ० १९ रबिलाकर.

नं० ८२

[२७ अक्टोबर.]

श्रीगणपतिर्जयति.

चिरंजीव राजश्री रावसाहेब[1] यांसी प्रती गोविंद हरी. आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत कार्तिक शु० १० बुधवार यथास्थित असे. विशेष. तुम्हीं सुरूरखोकडीच्या मुक्कामींहून पत्र पाठविलें तें काली मंगळवारीं अस्तमानीं पावलें. लिहिलें वर्तमान विस्तारें कळलें. काली राजश्री बाळाजी वामन याजबरोबर पत्र पाठविलेंच आहे. काली चिरंजीव सौभाग्यवती भवानीबाई व मुलें व चिरंजीव सौभाग्यवती मथुराबाई व मुलें कुरुंदवाडास राजश्री अंताजी सखदेव घेऊन गेले. चिरंजीव कोनेरराऊ श्रीमंताचें व तुमचें पत्र होतें यास्तव सातारियाकडून जावेंसा करार होऊन एथून गेले. बरोबर लोक होते. जाण्यामुळें गुंता पडेल यास्तव खर्चास आम्हांकडून

सांगितला, यांत धोके पदोपदीं येणारे होते. एखादी भली मोठी ठोकर लागली कीं, पागा गेली आणि सगळेंच गेलें! पानपतच्या स्वारींत अशा शेंकडों पागा नाहींशा होऊन त्यांचा मागमूस ही राहिला नसेल!

१ शामराव याचा मुलगा विरूपाक्ष यानें. २ गोपाळरावाच्या हातीं हें पत्र जाऊन पोंचावयास दहा दिवस लागले. यावरून हें जासुदा बरोबर दिलें नसून मिरजेहून पागा वगैरे गेल्याचें या पत्रांत लिहिलेलें आहे त्या बरोबरच रवाना झालें होतें हें उघड आहे. ३ गोपाळराव.

रुपये ४०० दिले आहेत. गोविंदराऊ गोळे यांच्या पत्रा प्रमाणें वर्तावें, त्यास तुमचें पत्र कालीचें आलें. त्यांत चिरंजीव कोनेरराया[स] लिहिलें कीं "सातारियाच्या कामास न गुंततां लौकर येणें." त्यावरून ते दुरधेंत पडले. पुढें गेले. सातारियाकडे जातील किंवा परभारेंच येतील न कळे! तुमचे त्यांचे भेटी नंतर कळेल. लोक वरचेवर निघोन तुम्हांकडे येतात. हल्लीं भांडवलकर आले आहेत. कितेक निर्लज्ज अद्याप घरींहून निघाले नाहींत. पोळ निघाले नाहींत. डोंगर सोनीकर निघोन परवांगेले ह्मणून माणूस आला. गायकवाड निघाले नाहींत. हाजीखान यास घेऊन जाणें, ह्मणोन बाबूराव जगजीवन यास सांगितलें; परंतु गेला नाहीं. सर्व येतील तेव्हां कळेल. पुढें मनसबा कोणे प्रकारचा? श्रीमंत दादासाहेब कोणे ठिकाणीं आहेत हें लिहावें. विठ्ठल शिवदेऊ यांची नालबंदी लोकांनीं[1] आणिली. त्यांचीं बलावणीं लोकांस आलीं. त्यांत "पंढरपुराकडे येणें आम्हीं तिकडे येतों" ह्मणून लिहिलें होतें. सखारामपंत निवडूनच ज्ञातीचे परगणे विल्हे लावीलसें दिसतें! त्याची धमक श्रीकृपेनें एकवेळ परिहार होईल. चिंता नाहीं. मुख्य गोष्ट, तुम्हीं वरचेवर वर्तमान ल्याहावया आळस न करणें. सावध राहत जाणें. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे आशीर्वाद.

चिरंजीव राजश्री नारायणराऊ व नीलकंठराऊ यांस आशीर्वाद. लिहिलें परिसिजे. बहुत सावधपणें राहणें. पत्रें वरचेवर पाठवीत जाणें. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे आशीर्वाद.

चिरंजीव राजश्री भाऊस आशीर्वाद.

चिरंजीव राजश्री वामनरायास आशीर्वाद. तुम्हीं कोरेगांवचे मुक्कामींहून कूच केलें आणि पत्र पाठविलें तें काली मंगळवारीं पावलें. पुढें वर्तमान

---

१ दादासाहेबांच्या तर्फे फौज जमा करणाऱ्या सरदारांत विठ्ठल शिवदेव विंचूरकर प्रमुख होता. त्यानें मिरज प्रांतीचे देखील शिलेदारांस नालबंदी देऊन त्यांनीं पटवर्धनांकडे न जावेंसा बंदोबस्त केला होता! २ कोंकणस्थांचे. करकंब, मंगळवेढें व पंढरपुर हे परगणे पटवर्धनांचे होते.

लिहीत जाणें. हे आशीर्वाद.

पैवस्ती छ० १८ रबिलाखर.

नं० ८३

[अजमासें कार्तिक शु.द्ध.
नोवेंबरचा प० पंधरवडा.]

श्रीगणपतिर्जयति.

चिरंजीव* मंडळीस समस्तांस आशीर्वाद. तुम्हीं पत्र पाठविलें तें पावलें. गंजिफा खेळतां हें अनुचित. लष्करांत गंजिफा खेळों नये. एवढें माफ करणें. सावध रहात जाणें. हे आशीर्वाद.

नं० ८४

(अजमासें कार्तिक शुद्ध.
नोवेंबरचा प० पंधरवडा.)

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद* उपरी. कार्तिकीचे पौर्णिमेस चंद्रग्रहण मेष राशीस आहे. त्यास तुमची मेषराशी आणि ग्रह गुरु, शनि,. राहु, भौम, असे चार दुष्ट आहेत. त्यांस सुष्ट-फल-प्रीत्यर्थ आम्हीं येथें कांहीं जप करविला. तुम्हीं ही तेथें कांहीं करवणें. चंद्रग्रहण राशीस आहे त्याचा दानधर्म करणें. जप आम्हीं ब्राह्मणापासून करवितों. तुम्हीं ही करवणें. दोन महिने श्रीमंत दादासाहेबांकडे कार्तीक मार्गशीर्ष. पुढें श्रीमंत मुख्याची फत्ते. जोशियापासून प्रश्न लग्नावरून वर्ताळा केला आहे. हरएकविशीं तुम्हीं दोन महिने उतावळी न करणें. बल्के मार्गशीर्ष पौर्णिमे पावेतों. पुढें जय आहे. हे आशीर्वाद.

---

* नं० ८३ चें पत्र गोविंद हरीनें मुलगे व पुतण्ये लष्करांत जितके होते त्या सर्वांस लिहिलें आहे व नं० ८४ चें गोपाळरावास लिहिलें आहे. १ कार्तिक मार्गशीर्ष हे दोन महिने दादासाहेबांचा जय आहे. २ माधवराव पेशव्यांची.

श.१६८४ दादासाहेबांशीं लढण्याची तयारी. इ.स.१७६२

नं० ८५

[नोव्हेंबर ४]

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत कार्तिक वद्य ३ गुरुवार जाणून स्वकीय लिहिणें. विशेष. तुमचें पत्र वद्य १३ चें आश्विन मासीं लोकांबद्दल आलें होतें त्यास तीन वार जाले. त्या आलीकडे पत्र देखील नाहीं. आम्ही निंबाजीस कान्होपंताबरोबर दिला होता. त्यास सुरूर खोकडीचे मुक्कामींहून शुद्ध ३ चीं पत्रें देऊन चिरंजीव नारायणरायानीं रवाना केला. त्या अलीकडे पत्र येत नाहीं. याचा अर्थ काय? आमचेकडून अंतर काय? तुमचे लोकांचे बोलीचालींत तरी आम्हीं होतों? आमचे विद्यमानें मुदत येतों ह्मणून करार करून गेले. त्यास न आले ह्मणोन तुम्हीं आह्मांवरी खेट्टे. यांत आमचा अपराध काय? तुम्हीं पत्र न पाठविलें आम्हांस अहो निरंतर काळजी तुम्हांकडील. स्मरण पुरस्कर वर्तमान पत्र ल्याहावें. तेणेंकरून चित्त स्वस्थ होत जाईल. छ० १० रबिलाखरचें पत्र—जोत्यापा देसाई याचेकडील लोकांचे नालबंदीची चिट्ठी तुम्हीं दिली—त्याजवळीं चार वोळी वर्तमान लिहावें होतें. बरें! मर्जीस येईल तें प्रमाण! प्रस्तुत श्रीमंत मुख्य प्रधान दशमीस निघाले ह्मणोन ऐकतों. ते कोठें आहेत? मनसबा स्नेहाचा आहे किंवा विरोधाचा आहे? श्रीमंत मातुश्रीचा व मुख्यांचा भावार्थ कसा आहे? रामचंद्र गणेश व कृष्णराऊ आले होते. त्यांस काय सांगोन रवाना केलें? कृष्णराऊ पारसनीस रदबदली करीत

---

१ हें गोविंद हरीनें गोपाळरावास पत्र मिरजेहून लिहिलेलें. हें बहुधा गोपाळरावाच्या हातीं पडे तों घोडनदीची लढाई होऊन दादासाहेब व रावसाहेब पेशवे यांच्या भांडणाचा निकाल लागला असावा! सदरहू लढाई कार्तिक वद्य षष्ठीस झाली. २ रागावलेले. ३ माधवराव पेशवे. ४ दादासाहेब- ५ हा कृष्णराव वल्लाळ काळे बारामतीकर. खर्ड्याचे लढाईचे वेळीं निजामअल्लीकडे पेशव्यांचा वकील गोविंदराव काळे ह्मणून होता त्याचा हा बाप. रामचंद्र गणेश कानडे हा प्रख्यात सरदार पुढें सत्रा अठरा वर्षां नंतर जनरल गाददार्‍याच्या फौजेशीं लढतांना एका लढाईत मरण पावला.

होते. गंगाधरभट[1] उपाध्ये व शास्त्रीबावा यांचे जाबसाल काय झाले? पुढें विरोध किंवा संधान? दुरधा नसावी. भलता[2] एक प्रकार असावा. होळकरांचे मतें संधान करावेंसें आहे ह्मणोन ऐकतों. याचा विचार काय? राजश्री त्रिंबकराऊ मुर्‍ह्या[3] जवळी आहेत. राजश्री बाबूराव बाबा श्रीमंत राजश्री नारायणरायां समागमें आहेत. तुम्ही सारी मंडळी आहां. तुमचा त्यांचा मनसबा कोणे प्रकारचा आहे? श्रीमंत दादासाहेब कोणे मुक्कामीं आहेत? त्यांपासीं फौज किती आहे? त्यांचा विचार कसा आहे? यवनाकडील[4] विठ्ठलसुंदर[5] त्यांकडे येणार किंवा आले, त्याचे ही तो कांहीं दिसत नाहीं. तुम्हांकडे पुष्कळ फौज जमा होईल असें असोन मनसब्यावरी घातल्यानें फितवा होऊन बेबंक होऊं सके. बहुत सावधपणें राहणें. त्यां[6] पाशीं दोन तीन हजार फौज ह्मणोन ऐकतों. चौर[7] हजार, फार जाली तरी पांच हजार असेल. त्यांणीं कर्तव्य काय! विस्तारें वर्तमान लिहिणें. मनोळीचा पैका आला नाहीं. गाडदी यांचा गुंता उरकिला ह्मणोन दोन तीन पत्रीं लिहिलेंच आहे. हें पत्र पावलियावरी मुजरद माणसा बरोबर विस्तारें वर्तमान लिहिणें. वरकड राजश्री भिकोबा सांगतां कळेल. लोभ कीजे हे आशीर्वाद.

चिरंजीव राजश्री नारायणराऊ व नीलकंठराऊ व आबा व वामनराऊ व कोनेरराऊ व भाऊ यांस आशीर्वाद. लिहिलें परिसिजे. पत्र पाठवावया

---

१ गंगाधरभट कर्वे हा पेशव्यांचा उपाध्या. २ हे बहुधा प्रसिद्ध रामशास्त्री असावे. ३ कोणचा तरी एक प्रकार. (लढाईचा किंवा तहाचा.) ४ माधवराव पेशव्यांजवळ. ५ बाबूराव फडणीस. ६ निजामअल्लीकडील. ७ विठ्ठलसुंदर राजेबहादर हा निजामअल्लीचा दिवाण. ८ तह करण्याचा घाट घातल्यास. ९ सैलपणा, निरुत्साह. १० दादासाहेबांपाशीं. ११ यावेळीं दादासाहेबानीं पंचवीस हजार फौज जमा केली होती. शिवाय खासा निजामअल्ली व जानोजी भोंसले त्यांच्या कुमकेस येण्या करितां निघाले होते. इतकें असून त्यांच्या फौजेचा अजमास गोविंद हरी पांच हजारांपर्यंत करितो! यावरून या प्रसंगीं सखाराम बापूच्या कारस्थानाचे पेंच त्यास अगदींच उमगले नाहींत असें दिसतें!

श. १६८४ दादासाहेबांशीं लढण्याची तयारी. इ.स. १७६२

आळस न कीजे. लोभ कीजे हे आशीर्वाद.

पैवस्ती छ० २३ रबिलाखर.

नं० ८६

(८ नोवेंबर)

श्रीगणपतिर्जयति.

चिरंजीव राजश्री रावसाहेब यांसी प्रती गोविंद हरी. आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत छ० २१ रबिलाखर कार्तीक वद्य ७ सोमवार यथास्थित जाणोन स्वकीय लिहिणें. विशेष. तुम्हीं पूर्णिमा सोमवारचीं पत्रें सुरूरखोकडी घोडनदीचे मुक्कामचीं पाठविलीं तीं पावलीं. लिहिलें वर्तमान विस्तारें कळलें. मुख्य श्रीमंतांनीं व मातुश्रीनीं करार शपथपूर्वक कारभारी यांसीं वचन दिल्हें, येणेंकरून निखालसपणें कार्यभागी स्वामीकार्यावरी तत्पर झाले. मोठी गोष्टी जाहली. मुख्य श्रीमंत भीमातीरास आले होते. वद्य द्वीतीयेस दाखल जाले असतील. तुमचे लोक वरचेवर या मार्गें जातच आहेत. फार भरंवसा त्वरेनें निघावयाचा म्हसके यांचा, ते साऱ्यां मागें निघाले ! तैसेच हाजीखान वसगडेकर यांचा दंडक [?] मागून जावें. खेत्रोजी सिंदे व माने यांची रीत कळलीच आहे. गायकवाड सर्वां मागून नालबंदी घेऊन आले त्याणीं माघमासीं निघावें, परंतु कार्तिक वद्य पक्षीं निघाले. आटेपडीवर होते. पुढें कधीं चालतील पहावें. वरकड चिरंजीव कोनेरराया[1]च्या पाठीमागें वरचेवर लोक गेलेच आहेत. पावतील तेव्हां खरें! अद्याप ही घरीं असतील त्यांस उपायच नाहीं ! आम्हीं माणसें पाठवावया आळस केला नाहीं. आजी पावेतों पांच हजार फौज तुम्हांपासीं जाली असावी. अमावास्ये पावेतों झाडून जमा होईल. श्रीमंत दादासाहेबीं पैठणचें शिष्ट[3] कृत्य केलें ! उत्तम गोष्ट केली ! ते पुण्याहून गेल्यापासून श्रेयस्कर

---

१ गोपाळराव. २ आटपडी हा औंधकर प्रतिनिधीच्या ताब्यांतील गांव आहे. ३ संभावितपणाचें काम. दादासाहेबानीं पैठण क्षेत्र लुटलें हें फार संभावितपणाचें

कर्मेंच होत चाललीं. थोरच आहेत ! दुष्टमैत्रीचें फल त्यांणीं भोगावें लागलें. " फार जलदीनें घांटें चढोन उतावळीनें आले. युद्धाची उमेद ही फार दिसती " ह्मणोन लिहिलें, अपूर्व आहे ! त्यांचे चौपट सामान तुम्हांपासीं जथलें. एकादिल मात्र असावें. त्याही मध्यें श्रीकृपा आणि धण्याचें प्राक्तन विचित्र [आहे], तरी फितुरी असतील ते फजीतच पावतील, यश येतच आहे. " सातारियास जाणार " ह्मणोन तुम्ही लिहितां; सातारियाचा बंदोबस्त मामासाहेबांचा पहिल्या पासून असतां प्रस्तुत सातारियांत बखेडा जाहला ह्मणोन ऐकतों, त्याचा अर्थ काहीं कळत नाहीं ! अंताजी माणकेश्वराचा लेंक फौज घेऊन दादासाहेबांकडून सातारियास आला म्हणतात. याचा मजकूर काय ? अगोदर फौज [सातारियास तुम्हीं] पाठवावी कीं नाहीं ? इकडे नाना प्रकारच्या खबरी लटक्याच लोक उठवितात. काली तुमचीं पत्रें आलीं त्यावरून समाधान जालें. बेजरब ते चालोन येतात (तर) आपण नीट तोंडें फौज़ा बाजूच्या बाजूस वांटून देऊन चालोन हातास हात लागे पावेतों जावें. हिरिरी[२] एकंदर करूं नये. तेव्हांच वारापाणी होतील. श्रीमंत राऊ व आपा कैलासवासी यांनीं दाभाड्यासीं युद्ध केलें तसें करावें. आतां समागमें तोफा, आरब, बाण, जेजाला,

---

काम केलें, असें गोविंद हरी लिहितो. हें उपरोधिक आहे हें सांगावयास नकोच!

१ बालेघांट. टोळी टोळीनें हल्ला करणें यासच ' हिरिरी ' ही संज्ञा होती. मराठ्यांची नेहमींची हल्ला करण्याची रीति बहुधा हिरिरीचीच असे. साऱ्या फौजेचा एकदम हल्ला फारच क्वचित् होई. याचें कारण उघडच आहे. तें असें कीं असा सर्व फौजेनें हल्ला केला आणि जर का तो शत्रूनें माघारा फिरविला तर साऱ्या फौजेचा धीर सुटून पळ सुटावयाचा ! या साठीं शत्रूस जिंकूं अशी पक्की खात्री असल्या शिवाय सारी फौज शत्रूवर घालण्यास सरदार तयार नसत. ३ थोरले बाजीराव व थोरले चिमाजी आपा. त्या दोघा भावानीं त्रिंबकराव दाभाड्याशीं इ. स. १७३१ [श० १६५३] या वर्षी केली. तींत दाभाड्याचा पराजय होऊन तो मारला गेला. ही प्रसिद्ध लढाई गोविंद हरीनें आपल्या ऐन अमदानींत पाहिलेली असून तींत ज्या प्रमाणें बाजीराव व चिमाजी आपा एकदम दाभाड्यावर चालून गेले, त्याच प्रमाणें प्रस्तुत प्रसंगीं करण्या विषयीं तो गोपाळरावास सांगत आहे. ४ यावरून बाजीराव व त्रिंबकराव दाभाडे यां-

सामान पोक्तें [आहे]. चिंता काय ! सरदार गाढे – होळकर, जाधवराऊ, नाईक, तुम्हीं, रास्ते, रायाजीपवार, पिराजीनाईक निंबाळकर, हुजरात वगैरे असतां त्यांची कुवत काय आहे ! तुम्हांस टाकून सातारियास येतील तेव्हां अपूर्व आहे ! आपण पाठीमागें येऊन गायकवाडाची गति करावी. " पुणें फुटलें " ह्मणोन वर्तमान कळलें. पुण्यास चिंता काय ? लोक भितात त्यांस ' चिंता न करणें ' ह्मणोन कोणी अभय देणारा नाहीं ! हजार दोन हजार पायींचें लोक, हजार पांचशें स्वार [पुण्यास] असावे. कोणी पुण्यावरी येत नाहीं. [दादासाहेबानीं] पैठणचा पैका मिळविला हें अनुचित केलें. बरें ! थोर आहेत ! बातमी फार राखीत जावी. तुम्हीं ही खबरदारींत आहां. वारंवार काय लिहिणें ! सर्व तुम्हांस कळतच आहे. पुण्याची बंदोबस्ती व किल्लेकिल्ल्यांची बंदोबस्ती करावी. पत्रें आम्हांकडे पाठवावया आळस न करावा. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे. हे आशीर्वाद.

पत्रें पावतांच विठोजी जासुद यास जाब देऊन रवाना करणें.

ची लढाई झाली, त्यावेळीं बाजीरावाजवळ तोफा, आरब, बाण वगैरे सामान नव्हतें हें सिद्ध झालेंच.

१ दमाजी गायकवाडाची. इ० स० १७५१ (श० १६७३) या वर्षीं पेशव्यांचें वर्चस्व कमी करून आपण मराठी राज्याचे मुख्य अधिकारी व्हावें, या हेतूनें ताराबाईच्या चिथावणीवरून दमाजी गायकवाड साताऱ्यास आला व त्यानें तेथें असलेल्या पेशव्यांच्या फौजेचा पराजय केला. परंतु पेशव्यांच्या त्या फौजेनें त्याशीं पुनः युद्ध करून त्याचा मोड केला व त्यानें गुजराथेंत परत जाऊं नये ह्मणून ते रस्ते अडविले. इतक्यांत नानासाहेब पेशवे प्रचंड सेना घेऊन लांब लांब मजली करून गायकवाडासमोर अचानक येऊन ठेपले. या प्रमाणें दोन्ही फौजांच्या कचाट्यांत सांपडून पुरता कोंडला गेला. त्यावेळीं गोपाळराव तेथें हजर होता व त्यानेंच मारामार करीत गायकवाडाच्या गोटांत शिरून त्यास कैद करून पेशव्यांपुढें आणिलें. त्या गोष्टीचें स्मरण देऊन गोविंद हरी लिहितो कीं, याच प्रमाणें दादासाहेब साताऱ्यास जातील तर त्यांस कोंडून कैद करावें ! २ " पुणें फुटलें " या शब्दांचा अर्थ यंदां ' प्लेग ' ची पळापळ ज्यानीं पाहिली आहे त्यांस सहज कळून येईल !

श.१६८४ दादासाहेबांशीं लढण्याची तयारी. इ स.१७६२

नं० ८७

(अजमासें कार्तिक वद्य.
नोवेंबरचा प० पंधरवडा.)

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद[1] उपरी. मनोळीस सरकारचे कारकून व जासूद जाऊन बसले आहेत. फौज पाठवून देणें ह्मणोन त्यांचा तगादा त्यांस भारी पडला. चहूंकडून त्यांजवरी उठले. खेडियांसीं कजिये करितात. आजी लोकांस चाळीस पन्नास हजार रुपये द्यावे तेव्हां लोक जमा होणार. त्यां[3] पासीं पैसा नाहीं. ये विशीं तुमची आज्ञा होईल त्या प्रमाणें वर्तणूक करणार. त्यास काय तें लिहिणें, (ह्मणजे तेंच) आम्हीं लिहून पाठवूं. तदनुसार वर्ततील. उत्तरें लौकर पाठवणें. श्रीमंत दादासाहेब श्रीक्षेत्राकडे येणार ह्मणोन वर्तमान आहे. करकंबेची वाट काय? कर्वेंड्या तीन हजार फौजेनिशीं दादासाहेबांकडे गेला. बहिरेजी[5]पांढरा (यानें) भोसल्या[6]कडे जातों ह्मणोन दोन हजार लोक ठेविले. त्याचा दावा[7] (करकंबकरांशीं) आहे. करकंबेंत सामान[8] पाहिजे. तिकडील बंदोबस्त करावयाचा तो करणें. आम्हांस आजीच त्यांचीं पत्रें येणें प्रमाणें आलीं. तुम्हांस कळावें ह्मणोन लिहिलें आहे. येळूरकर जाधव इसलामपुरावरी कालीं आले. पुढें तुम्हांकडे येणार. कधीं येतील पहावें! किती सांगावें, ल्याहावें! रुपयांसें[9] एक दिवस गुंता पडूं दिला नाहीं. आजी तुळाजी शिंदे कडलगेकर व संकरराऊ मुढे याच मार्गें गेले. आमची चिठ्ठी मागितली. भिडे करितां दिली आहे. लोकांनीं तो लबाडी खरीखुरी केली. परंतु हा समय रागें भरावयाचा नव्हे. मान

---

१ गोविंद हरीनें गोपाळरावास हें पत्र मिरजेहून पाठविलें आहे. गोपाळराव पेशव्यांच्या लष्करांत घोडनदीजवळ तेव्हां होता. २ मनोळीकर शिंद्यांस. ३ मनोळीकर शिंद्यांपाशीं. ४ महिपतराव कवडे. ५ हा एक त्यावेळचा मोठा उत्पाती सरदार होता. ६ जानोजी भोंसल्याकडे. ७ पांढऱ्याचा दावा करकंबकरांशीं होता, यामुळें तो या अंदाधुंदीच्या वेळीं त्यांस पीडा देईल असा लिहिण्याचा भाव. ८ सामान लढाऊ. ९ शिलेदारांच्या नालबंदीच्या रुपयांस.

श.१६८४ दादासाहेबांशीं लढण्याची तयारी. इ.स.१७६२

मार्ग पाहून कर्तव्य तें करावें. चिरंजीव आबाचें पत्र प्रतिपदेचें पुण्याहून आलें तें आजीच पावलें. तीर्थरूप सौभाग्यवती काशीबाई औंजी येथें आली. मग पत्रें रवाना केलीं. कळावें. आम्हीं चातकन्यायें मार्ग पहातों. दोन दिवसां तीन दिवसां एक पत्र, येणें प्रमाणें पाठवावया आळस कराल तर शपथ असे. सातारा फांवेड [?] जाहल्याचा पुर्तो मजकूरच कळेना ! गोविंदराव गोळा पळाला म्हणतात. दादासाहेबांकडील फौज तेथें आली म्हणतात. अंताजी माणकेश्वराचे लेंक आले म्हणतात. सातारियावरील मजकूर कसा आहे कळत नाहीं. सविस्तर लिहिणें. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे. हे आशीर्वाद.

चिरंजीव राजश्री नारायणरायास आशीर्वाद. लिहिलें परिसिजे. पत्र पाठवावया आळस कराल तर शपथ आहे. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद. श्रीमंत क्षेत्राकडे गेले तर करकंबें मंगळवेढ्याचा बंदोबस्त नाहीं. खबरदारी करणें. लोक पाठवणें. सातारियाकडे आले तर इकडील स्मरण असों देणें. इतक्या फौजा तुम्हीं असतां सातारियास आले तर अपूर्व आहे ! काय मनसवा करितात न कळे. रसातळास जाणार पृथ्वी कीं काय न कळे ! चहूंकडे मार्ग पहातात. हे आशीर्वाद.

नं० ८८

[१६ नोवेंबर]

श्रीगणपतिर्जयति.

चिरंजीवे राजश्री मोरोबा आबा यांसी प्रती गोविंद हरी. आशीर्वाद. उपरी

---

१ आज. २ पंढरपुराकडे. ३ दादासाहेबांची कांहीं फौज घेऊन अंताजी माणकेश्वराचा पुत्र साताऱ्यास आला. त्यांस तेथून घालवून देण्याकरितां पेशव्यांकडून मोरोबल्लाळ उर्फ मोरोबा आबा (गोविंद हरीचा पुतण्या.) याची रवानगी झाली. त्या बरोबर पटवर्धनांची फौज होतीच. शिवाय मानाजी फांकडे, शहाजी भापकर व प्रतिनिधीचा मुतालीक गमाजी यमाजी या तिघांचीं पथकें ही याच कामावर नेमिलीं गेलीं होतीं असें या पत्रावरून दिसतें. मोरोबाची कुमक करण्या करितां पेशव्यांच्या थोरल्या

श.१६८४ दादासाहेबांशीं लढण्याची तयारी. इ.स.१७६२

येथील वर्तमान तागायत मार्गशीर्ष शु० १ भौमवासर यथास्थित जाणून स्वकीय लिहिणें. विशेष. तुम्हीं प्रस्तुत कोठें आहां? खांबटकीचा घांट चढोन चंदनवंदना नजीक येणार होतां. आलां किंवा येणार? तुम्हां समागमें शिंदीअंबर (आहे) त्यामुळें खातरजमा आहे. मानाजी शिंदे यांचें पथक आहे; परंतु समागमें लोक किती आहेत न कळे. त्याच्या पथकांत इकडील वेळेकर व शिंदे असतात ते इकडेच आहेत. वेळेकर भोसले यांचे स्वांर सरंजामी होते ते आम्हीं येथें चाकरीस ठेऊन घेतले. इतलेखी लोक त्यांस नालबंदीविना कसे येतील? लष्करांतून राजश्री हरीपंतें, विसाजीपंत व भापेकर येणार होते. आले किंवा येणार? मुख्य, श्रीमंतांकडील वातमी राखीत जावी. बहुत सावध राहत जावें. सातारियांत राऊत आहेत. तुम्हीं आल्यावरी त्यांणीं कांहीं चळवळ मांडली किंवा स्वस्थ आपले स्थलीं आहेत? त्यांत सरदार कोण कोण? किल्लेकरी यांचे अनुसंधानें असतील. उगेच कसे येतील? मामासाहेबांचा बंदोबस्त होता आणि (हें) जालें कसें? राजश्री गोविंदराऊ गोळे कोठें आहेत? प्रथमता श्रीमंत मुख्यांचें पत्र चिरंजीव कोनेरराया‌स होतें कीं "तुम्हीं दूर राहून आपली फौज आली हें कळों न देतां गोविंदरायास पत्र पाठवणें. त्याचें 'येणें' म्हणून उत्तर आलें म्हणजे लागलेंच अचानक जाऊन कार्य करून येणें." त्या वरून जिरंजीवानें मशारनिल्हेस लिहिलें. त्याणीं उत्तर पाठविलें कीं तुम्हीं माहुली संगमीं येऊन मुक्काम करणें. मग जें कर्तव्य तें करूं. तेव्हां मनसब्यावरी गोष्ट पडली, पुढें जाणें जरूर, तेथें फौज नाहीं, चिरंजीव राऊ-

---

लष्करांतून ही कांहीं फौज या कामावर यावयाची होती, असे 'मुख्यांकडील फौज आल्याविना हरएक विशीं उतावळी न करणें' यावर यावरून सिद्ध होतें.

१ खात्री खुशाल असण्याविषयींची. २ प्रसिद्ध मानाजी फांकडे. ३ हंगामी. ४ हरीपंत पोंभुर्लेकर व विसाजीपंत [विसाजी नारायण]. ५ शहाजी भापकर. याचें पथक १००० स्वारांचें होतें. (दुसऱ्या अंकांत नं० ४३ चें पत्र पहा.) ६ हे दादासाहेबांकडील स्वांर. ७ दादासाहेबांकडील फौज साताऱ्यास आली होती तिजवर छापा घालून ती लुटण्याचें. ८ पेशव्यांच्या लष्करांत गोपाळरावाजवळ. ९ गोपाळरावाचीं.

साहेबांचीं पत्रावरी पत्रें, [येत होतीं] यामुळें गेले. असो. जाहलें तें जाहलें. तुम्हांकडे चिरंजीवांनीं[1] कांहीं लोक मायेचे पाठवावे. तुम्हीं लिहिलें असेल, परंतु तेथें लढाईचा प्रसंग; यामुळें पाठवावया अनुकूल पडलें नाहीं. तुम्हांपाशीं राजश्री गमाजीबावा आले कीं नाहींत ? ते आले म्हणजे भारी जमाव होईल. जेथें राहाल तेथें सावध राहणें. अंतर्यामीं सावध. लौकिकांत घाबरेपण दाखऊं नये. मुख्यांकडील फौज आल्याविना हरएकविशीं उतावळी न करणें. लष्करचें वर्तमान तुम्हांकडे येईल तें लिहीत जाणें. तुमचें पत्र कुरुंदवाडास मातुश्रीस[2] प्रविष्ट केलें. त्याचें उत्तर आलें तें पाठविलें आहे. बहुत सावधपणें असावें. हे ऐक दुसरी काळजी लागली आहे. श्रीसमर्थ ! कांहीं चिंता नाहीं. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे. हे आशीर्वाद.

पिराजी जासूद पावला किंवा हरोलीचा घांटें गेला हें न कळे. हे आशीर्वाद.

इ. स. १७६२ श. १६८४.

चुलता पुतण्याचें युद्ध.

मोंगलांची फौज मदतीस आणिल्यानंतर दादासाहेब पुण्याच्या रोखें कूच करून चालून आले. इकडे माधवराव पेशवे ही आपले सरदार व सर्व फौज घेऊन मुकाबल्यास निघाले. दोन्हीं फौजांची घोडनदीवर गांठ पडली व लढाई झाली. तींत दादासाहेबांच्या फौजेनें हल्ला केला होता तो पेशव्यानीं मोठ्या शर्थीनें परत फिरविला. नंतर समेट होण्याचें बोलणें

---

१ गोपाळरावानें. २ मातुश्रीस मोरोबाच्या. ३ थोरल्या लष्करांत चिरंजीव मंडळी आहे त्यांजकडील काळजी आहेच. शिवाय तुमची साताऱ्याकडे नेमणूक झाली, पुढें तुमची मसलत कशी काय सिद्धीस जाल्ये, ही दुसरी काळजी लागली असा लिहिण्याचा भाव.

सुरू झालें. परंतु दादासाहेबांचा एकच आग्रह कीं, पेशव्यानीं आपले कारभारी व सरदार दूर करून हस्तगत व्हावें. पेशव्यांची फौज थोडी असल्यामुळें दादासाहेबांपुढें आपला निभाव लागणार नाहीं हें त्यांस माहीत होतें व घरांतल्या घरांत कलह माजविण्या पेक्षां चुलत्याच्या स्वाधीन व्हावें हेंच बरें असा त्यांचा अभिप्राय होता. परंतु त्यांचे सरदार व कारभारी यानीं आणखी लढाई करण्याचा हिय्या केला. कार्तिक वद्य षष्ठी रविवार (७ नोवेंबर) रोजीं घोडनदीची लढाई झाली. पुढें चार दिवस तेथेंच मुक्काम होता. पांचवे दिवशीं शुक्रवारीं पेशव्यांची फौज मागें हटत आळेगांव पर्यंत आली. तों मागून दादासाहेब सज्या फौजेनिशीं पाठलाग करीत आले. पुनः आळेगांव मुक्कामीं सायंकाळच्या प्रहर दिवसापासून अस्तमानपर्यंत युद्ध निकराचें झालें. आपल्या फौजेचा पराजय होतोसें पाहून माधवराव पेशवे अठरावर्षांच्या वयाचे असतां ही त्यानीं स्वतः सैन्याचे पुढारी होऊन पराक्रम व मेहनत बहुत केली. त्याच प्रमाणें पिराजीनाईक निंबाळकर व पटवर्धन मंडळी जिवावर उदार होऊन शेवटपर्यंत झुजत होती. पटवर्धनांपैकीं नीलकंठरावास गोळीची जखम झाली, नारायणरावास तरवारेची जखम लागली व भास्करपंतास डोक्यावर वार लागला. या लढाईंत पटवर्धनांचे अडीचशें घोडे पडले व लोक ही बहुत मेले. पेशव्यांच्या फौजेंत सखारामबापूनें आधींच फितूर पेरून ठेविला होता. त्या फितुरी सरदारानीं या आणीबाणीच्यावेळीं पळ काढिला ! नंतर पेशव्यांचा पराजय होऊन त्यांच्या सैन्याचा ही धर सुटला. ते रातोरात भीमा पार होऊन अलीकडे आले तों दुसरे दिवशीं शनवारीं पुनः दादासाहेबानीं त्वरेनें येऊन त्यांस गांठिलें. साऱ्या फौजेस दोन दिवसांचा उपास. तोफांचे बैल थकले. बहुतेक सरदार आपापली फौज घेऊन पळून गेले. स्वतः पेशव्यांची प्रकृति ही ज्वरामुळें हैराण. अशा या स्थितींत पेशव्यानीं जवळ काय सरदार राहिले होते त्यांस विचारिलें कीं, पुढें काय करावें ? तेव्हां सर्वांनीं सांगितलें कीं, आतां दादासाहेबांशीं समेट करून त्यांच्या स्वाधीन व्हावें. हीच मसलत कायम ठरली तेव्हां गोपाळराव आपल्या फौजेसह मिरजेकडे

निघून आला. बाबूराव फडणीस आधींच पळून बारामतीस गेला होता. तेथें आतां त्रिंबकराव मामा ही गेला. बाकी फौजेसह पेशवे लक्ष्मणराव रास्त्यांचे विद्यमानें दादासाहेबांचे स्वाधीन झाले. सर्व राज्याचा मुख्य अधिकार पुनः दादासाहेब व सखारामबापू यांस प्राप्त होऊन त्यांच्या सांगण्या बाहेर पेशव्यानीं काडीमात्र वागूं नये असें ठरलें.

इतकें होई तों निजामअल्ली येऊन पोंचला. त्याची व दादासाहेबांची भेट होऊन त्यानें कुमक केल्याबद्दल त्यास एकावन लक्षांचा मुलूख द्यावयाचा करार होता त्यापैकीं कांहीं देण्यांत आला. आतां आपलें काम झालेंसें पाहून दादासाहेबानीं बाकीचा मुलूख त्यास दिला नाहीं. मोंगलाची फौज परत गेल्यावर स्वपक्षीयांस बक्षीस देण्याचें व पुतण्याच्या पक्षाच्या लोकांस शिक्षा करण्याचें काम सुरू झालें. गोपिकाबाई सिंहगडावर होती ती रास्त्यांच्या सांगण्या वरून खालीं पुण्यांत येऊन राहिली. ती शनवारच्या वाड्यांत रहात होती तेथें व पेशव्यांच्या डेऱ्या भोंवती गारद्यांचे पहारे बसले. बाबूराव फडणिसाच्या घराण्याकडून फडणिशी निघून चिंतो विठ्ठल रायरीकर यास देण्यांत आली. नानाफडणीस व दादासाहेब यांच्या द्वेषास खरोखर प्रारंभ येथ पासूनच झाला. भवानराव प्रतिनिधीचें पद आपला अल्पवयी पुत्र भास्करराव याच्या नावें सातारच्या महाराजांकडून करून घेऊन त्याची मुतालिकी दादासाहेबानीं नारो शंकरास दिली. त्या योगें भवानराव व त्याचा मुतालीक गमाजीबावा यांचा व दादासाहेबांचा अर्थात् द्वेष पडला. पुरंदर व सिंहगड हे किल्ले पुरंदऱ्यांच्या हवाली झाले व विठ्ठलराव विंचूरकर यांस न्यायाधिशीचें पद व फार मोठी जहागीर मिळाली. बाबूराव फडणीस व त्रिंबकराव मामा हे बारामतीस बाबूजी नाइकाच्या घरीं होते ते ही दादासाहेबांच्या हातीं आले. इतकें झाल्यावर पटवर्धनांचें पारिपत्य करण्याची मसलत दादासाहेबानीं करण्याचा निश्चय केला. त्या विषयीं पुढें लिहूं.

नं० ८९

(कार्तिक वद्य ६ नोवेंबर ७.)

श्री.

पै॥ छ० २२ रबिलाखर.

अपत्यें माधवरायानें[1] साष्टांग नमस्कार विनंती तारीख छ० २० रबिलाखर पर्यंत वर्तमान उत्तम असे विशेष. तीर्थस्वरूप दादा फौजेसह[2] आम्हांवर चालोन बेजरब गोटावर आले. घोडनदीमध्यें पलीकडे ते, अलीकडे आम्हीं, या प्रमाणें गांठ पडली. उपर आम्हीं कूच करून बुनगें लावून पाठीमागें उभें केलें. आणि तमाम फौजा तयार—करवून सरदारांसी सरदार फौजे सुध्धां उभे राहिलों. त्याजवर त्यांणीं बेजरब गोळे टाकिले आणि उतारावर बेजरब चालोन घेतलें. त्याजवर वडिलांचे आशीर्वादें करून आमची फौज अनिवार मार खाऊन जागाच धरून उभे राहिली. जेजाला बाण वगैरे यांचा मार दिला त्यानें त्यांचीं माणसें, घोडीं कांहीं ठार, कांहीं जखमी होऊन माघारें तोंड केलें आणि सारी फौज एकत्र करून गट केला आणि तोफा, बाण यांचा मार दिल्हा, यावर आम्हीं ही आपल्या दोन तोफा सुरू केल्या. त्याणें फार काम केलें. सहा घटका झुंज होत होती तों तीन चार घटका दिवस राहिला. उत्तम प्रकारेंचें[3] मोडून गोटावर चालोन आले होते ते माघारे दीड कोसावर मुक्कामास गेले. दिवस मावळे तों आमच्या फौजा उभ्या होत्या. दिवस मावळल्या उपर तेच ठिकाणीं मुक्काम तळावरच केला. इतक्यांत दादासाहेबांकडून बातमी आली कीं वीस पंचवीस माणूस ठार, दीड दोनशें जखमी, घोडे वीस जखमी, पंधरा पर्यंत ठार. येणें प्रमाणें बातमी आली. कांहीं उणें अधिक असेल; परंतु माणूस फार मेलें जखमी झालें असेलसें वाटतें. आम्हांकडील पांच, सात, दहा ठार झालें. वीस पर्यंत जखमी झाले. घोडे ही पांच सात ठार. दहा बारा ज-

---

१ पत्र माधवराव पेशव्यानें गोपिकाबाईस लिहिलें. २ दादासाहेबानीं. ३ ता-ठा, खुमखूम.

खमी झाले. येणें प्रमाणें लढाई झाली. कळलें पाहिजे. गोपाळराव, पिराजी नाईक, रास्ते यांणीं वगैरे सरदारांनीं फौर[1] केली. होळकराची ही फौज फार झटली. येणें प्रमाणें झालें. पुढें होईल तें वर्तमान लिहीत जाईन. हे विनंती.

अपत्यें लक्ष्मणाचे साष्टांग नमस्कार विनंती. आपला हेत एकवेळ लढाई व्हावी. उपर सल्ला होणें तर व्हावा. तोच ईश्वरें आपला आब राखोन[2] शेवटास नेला. पुढें ईश्वर आहे. हे विनंती.

नं० ९०

(कार्तिक वद्य ११ शुक्रवार.
१२ नोवेंबर.)

श्री.

पै॥ २९ रबिलाखर.

अपत्यें माधवराव याचे साष्टांग नमस्कार विनंती. आम्हीं बहुत प्रकारें तूट खाल्ली परंतु तितकी ही त्यांनीं एकीकडे ठेऊन दंगाच करावा हाच मानस केला. 'आमचे विचारें करणें तें करावें चौघांचें चालवावें कारभार यानींच करावा' हे प्रकार कबूल केले तें सारें कृत्रिमसें[3] नजरेस पडलें. तेव्हां करार सरदारांचे वगैरे मतें सल्ला करूं नये (असा ठरला.) सर्व मुलखाची आशा सोडून त्यांचे हस्तगत आपण व्हावें दुसरा विचार नाहीं. बोटाराहून [?] कूच करून आळेगांवचे सुमारें आलों. पुढें जसा मनसबा योजेल तसा करून लिहून पाठवूं. इतक्यावर पुण्याची आशा सोडली.

---

१ फार पराक्रम केला. शर्थ केली. २ लक्ष्मणराव रास्ते. गोपिकाबाईचा बंधु. ३ हें पेशव्यांचें गोपिकाबाईस पत्र. ४ 'आमच्या सल्लामसलतीनें कारभार करीत जावा. आमच्या बाजूचे लोक आहेत त्यांचा छळ करूं नये. हल्लीं बाबूराव व त्रिंबकराव कारभार करीत आहेत असाच त्याणीं या पुढें ही करावा.' असें दादासाहेब प्रथम बोलत होते ती लबाडी आहे असें दिसून आलें. ५ सर्व राज्याची मालकी सोडून तुम्हीं आमच्या स्वाधीन व्हावें हें दादासाहेबांचें ह्मणणें. दुसरा विचार करण्यास त्यानीं जागाच ठेविली नाहीं.

तर आपण सिंहगडावर वस्तवानी घेऊन जावें. किल्याची बंदोबस्ती करून सावध रहावें. ता० छ० २४ रविलाखर. हे विनंती.

अपत्यें लक्ष्मणाचे साष्टांग नमस्कार विनंती. मर्यादा फार केली परंतु ते चढीं लागोन केवळच अमर्यादेस प्रवर्तलेसें जाणून रावसाहेबांनीं कूच करून आळेगांवचे सुमारें आले. पुढें काय मजकूर होत आहे तो पहावा. मल्हारबा बरोबर आले. कळलें पाहिजे. फौज एकदील होऊन झुंजली आणि ते आहेत त्यापेक्षां दुप्पट असल्यास गुंता नाहीं. यशच रावसाहेबांस ईश्वर देईल. इतक्यावर एक दील व्हावयासीं अनमान करीत नाहीं. कळावें हे विनंती. रोज शुक्रवार हे विनंती.

नं० ९१

(कार्तिक वद्य द्वादशी शनिवार.
१३ नोवेंबर.)

श्री.

पै॥ छ० २८ रविलाखर.

अपत्यें माधवरायानें साष्टांग नमस्कार विनंती. घोडनदीवरून कूच करून आळेगांवनजीक आलों. तों मागून त्यांच्या फौजा सज्या होऊन आल्या. आळेगांवावर बुनगें पोंचलें. पाठीमागें फौजा सज्या होत्या त्यांची व या फौजांची गांठ पडली. उपरी आम्ही ही फौजांचे पाठीवर [उभे राहिलों] त्याजवर प्रहर दिवसापासून झुंज होत होतें दिवस मावळे तों. शेवटीं उराशीं ऊर मी केलें. उपर कांहीं फौजेंत फितूर याजमुळें आमच्या फौजांनीं माघारें घेतलें. रात्र ही जाहली. सरासरी घोडें माणूस आम्हांकडील चारशें तीनशें पडलें. बहुत ठार, थोडे जखमी, या प्रमाणें त्यांजकडील. परंतु ईश्वरें यश तिकडे दिल्हें. उपरी आमच्या फौजेचा धर सुटला. रातोरात भीमा उतरून अलीकडे आलों तों फौजेस उपास. दुसरे दिवशीं भीमेवरून कूच जाहलें तों फौजेचा धर सुटला. तोफांचे बैल थकले. इतक्यांत

यांनीं बेजरब गांठलें. तेव्हां सर्वांच्या मतें सल्ला करावासा जाहला. मामा वगैरे यांचे मतें सल्लाच करावा. दुसरा अर्थ नाहीं. तेव्हां भेटी जाहल्या. मामा आपणाकडे सिंहगडास गेले. येथें तिकडे जातोंसें बोलोन गेले. तेथें पोंचले किंवा नाहीं तें न कळे. बाबूराव मोरोबा सुध्धां झुंजाचे वेळेपासून दोन दिवस कोठें ही ठिकाण लागलें नाहीं. आतां एक जागां आहेत असें वर्तमान आलें आहे. ठिकाण लागेल तेव्हां खरें. गोपाळराऊ मिरजेकडे गेले असें आहे. आम्हीं राहिली फौज सरदार यां सुध्धां येथें आहों. पुढें ईश्वर इच्छा. होईल तें लिहीत जाऊं. मोठे सरदार कोणी ठार नाहींत. कळलें पाहिजे. हे विनंती.

नं० ९२

[अजमासें कार्तिक वद्य द्वादशी
किंवा त्रयोदशी. नोवेंबर १३ किंवा १४.]

श्री.

तीर्थरूप मातुश्री बाई[1]
वडिलांचे सेवेशी.

अपत्यें रघुनाथ बाजीराव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जावें. विशेष. चिरंजीव राजश्री राव[2] घोडनदीवरी होते तों आम्हीं येऊन पोहोंचलों. प्रथम गोळागोळी जाहली. तदोत्तर राजश्री मल्हारजी होळकर, बाबूजीनाईक व पिराजीनाईक आले. चिरंजीव भेटीस येतात म्हणून सांगितलें त्यास " चिरंजीव लेकरूं त्याजबिसीं चित्तांत दुसरी गोष्ट नाहीं " या प्रमाणें बोलोन आणावयास त्रिवर्गास पाठविले. असें असतां मागैती[3] सरदारानीं व कारभारी यानीं झुंजावयाचा प्रकार करून शुक्रवारीं घोडनदीवरून कूच करून चालिले. आम्हीं कूच करून पाठीवरी चालिलों. तिसरे प्रहरीं गांठ पडोन झुंज झालें. समयास

१ गोपिकाबाई. २ माधवराव पेशवे. ३ पुनः.

श.१६८४ पेशवे चुलत्याच्या स्वाधीत होतात. इ.स.१७६२

सरदारांनीं घालविलें. लोक पळोन मोड जाला. दुसरें रोजीं मागती पाठीवरी चालिलों तेव्हां कारभारी यांचे व सरदारांचे बुद्धीस लागतां परिणाम नाहीं हें समजोन चिरंजीव येऊन भेटले. चिरंजीवाविशीं आमचे चित्तांत दुसरा अर्थ नाहीं. हें लेंकरूं. याजकडे गुंता काय? होणारानुरूप जालें. आम्हीं जें करीत होतों तें यांचे दौलतेस अपाय न व्हावा याज करितां. दुसरा प्रकार नाहीं. आपण वडील आहेत. झाले गोष्टीचा किंतु चित्तांत नसावा. या उपरी आपले आशीर्वादें सर्व बंदोबस्त ही उत्तम होईल. कारभारी यांचे बुद्धीनें या थरास गोष्ट आली. असो. भगवत्सत्तेनुरूप होणार तें होतें. अतःपर श्रीकृपेकरून आपले आशीर्वादें सर्व यथास्थित होईल. बहुत तपशील लिहावा तर बहुधा वडिलांस विषाद वाटेल. यास्तव लिहीत नाहीं. परस्परें श्रवण होत असेल. सारांश ईश्वरसत्ता प्रमाण आहे. त्या पुढें कोणाच्यानें कांहीं होत नाहीं. ज्ञानी आहेत त्यांनीं संतोषच मानीत जावा. मी ही लेंकरूं. दुसरा कोणी नाहीं. वडिलीं मला, निराळें टाकिलें तरी तें वडिलांस उचित नाहीं. बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

नं० ९३

[मार्गशीर्ष शुद्ध ३
१८ नोवेंबर.]

श्री.

पै॥ छ० ४ जमादिलावल.

अपत्यें गोपाळानें कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ता० छ० १ जमादिलावल बुधवार वडिलांचे आशीर्वादें करून सुखरूप असों विशेष. झुंजाचें वर्तमान आपण ऐकलेंच असेल. आमचे कैस्तीस चुकलों नाहीं. फौजेंत फितवेखोरांनीं पळ काढिला त्यामुळें मोड झाला. दुसरे दिवशीं

१ हें पत्र गोपाळराव पटवर्धनाचें गोपिकाबाईस. यावर 'गणराज' कां नाहीं हें कळत नाहीं. २ मेहनतीस.

उभयतां श्रीमंतांचे भेटीचा निश्चय जाहला. ते समयीं आम्हीं श्रीमंत राजश्री राव प्रधान यांचा निरोप घेऊन निघालों. त्यांनीं आज्ञा केली जे, 'आपण तेथें[1] जाऊन आपली खातरजमा झाली ह्मणजे तुम्हांस बोलावूं पाठवूं. ते समयीं तुम्हीं येणें.' ह्मणून आज्ञा केली. आम्हीं नीरातीरीं राहणार होतों. परंतु बुणगें पुढें आलें. आम्हांजवळ डेरा दांडा भांडीं कांहीं नव्हतें. याज मुळें बुणगें आटोपीत आलों तों निंबसोड मायणीवर बुणग्याची गांठ पडली. आजी येथून खानापुराजवळ वेसराज आहे तेथें मुक्कामास गेलों. तेथें मुक्काम करून राहतों. श्रीमंतांची[2] आज्ञा येईल त्या[3] प्रमाणें वर्तणूक करूं. विदीत व्हावें हे विज्ञापना.

नं० ९४

(मार्गशीर्ष शुद्ध ९
२० नोवेंबर.)

श्रीशंकर.

पै॥ छ० ९ जमादिलावल.

वडिलांचे सेवेशीं विज्ञापना. येथील वर्तमान ता० छ० ३ जमादिलावल पावेतों यथास्थित असे. विशेष. छ० १ जमादिलावलीं तीर्थरूप डेऱ्यास आले. बहुता प्रकारें समाधान केलें कीं, "दौलत सारी तुमची आहे. मजला दौलतीची आशा नाहीं. परंतु कारभारी यांमुळें इतका प्रकार परस्पर झाला. दौलत मोठी. दौलती मध्यें द्वेष फार झाला; यामुळें दौलतीस पेंच भारी पडत चालले, ह्मणून इतका अर्थ करणें आला. त्यामुळें मन माने तैसा सरंजाम सरदारांस व मोंगलास कबूल करणें प्राप्त झाला. परंतु या उपर संभाळून देणें तो देतों. निजामअल्लीचा निकाल प्रस्तुत स्नेहाच्या रीतीनें काढून माघारा लावितों. उपरांत फौजेचा बंदोबस्त करून हिंदुस्थानांत जाऊं. कांहीं फौज कर्नाटकांत रवाना करूं. निजामअल्लीच्या स्ने-

१ दादासाहेबांकडे. २ गांठीत. ३ आज्ञा पेशव्यांची. दादासाहेबांची नव्हे. ४ हें पेशव्यांचें गोपिकाबाईस पत्र.

हामुळें देशीं पेच रहाणार नाहीं. यामुळें हिंदुस्थानचा व कर्नाटकचा बंदोबस्त होऊन येईल. वर्षा दोन वर्षांनीं दौलतीचा बंदोबस्त झाल्यानंतर सर्व गोष्टी अनुकूल फिरून होतील. मोंगलावर पेंच पडला तेव्हां त्यानें ६० लक्षांची जहागीर व किल्ले जे मागितले ते सरकारांत देऊन [तह करून घेतला.] मसलत काबूस[1] आली त्यास आम्हांस देणें[2] प्राप्त झालें. या गोष्टीस चिंता नाहीं. राजनीति अशीच आहे. तुम्हांखेरीज व तीर्थरूप मातुश्री खेरीज मला दुसरा अर्थ किमपि नाहीं." या प्रमाणें डोळ्यांत पाणी आणून बहुत ममतेनें भाषण करून संतोषविलें. तीर्थरूपांचे मनांत विकल्प किमपि नाहीं. राजश्री आबा पुरंदरे व सखाराम बापू उभयतांचें चित्त चार दिवस (आम्हांशीं) ठीक नव्हतें. उपरांत राजश्री अंतोबा रास्ते यांचे मार्फतीनें साफ चौकशी करून बोलले कीं, सारी दौलत तुमची आहे. द्वेषामुळें इतका प्रकार झाला. या उपर स्वामीनीं व बाईसाहेबांनीं कृपा करून दौलतीचे कारभाराचा भार आह्मांवर द्यावा ह्मणजे सर्व बंदोबस्त होऊन मर्जी प्रमाणें वर्तणूक होईल. यांत अंतर होणार नाहीं. अशा कित्येक गोष्टी निखालसपणें बोलले. त्यांचें बोलणें चालणें पहातां निखालसता फार चांगली आहे. दिवसें दिवस पुढें निखालसता होत जाईल. रा० त्र्यंबकराव मामा व बाबूराव या उभयतांस भेटी समयीं तीर्थरूपांस भेटावयासीं धीर न पुरवे तेव्हां उभयतांस सांगितलें कीं, सिंहगडास मातुश्री बाईसाहेबांकडे जाणे. तेथें राहणें. ते गोष्ट त्यांनीं न करतां बारामतीस राजश्री बाबूजीनाईक याजकडे गेले. त्यानीं आपले जिमेस करून तीर्थरूपांस विदित केलें. तीर्थरूपांचे मनांत त्यांची अब्रू घ्यावी ऐसें नाहीं. दौलतींत पैशाची ओढ फार आहे. उभयतांनीं कारभार पुण्यांत केला परंतु आपला

१ पानपतची लढाई झाल्यावर रोहिले, पठाण, अयोध्येचा नबाब, दिल्लीचा बादशहा, जाट व बुंदेलखंडांतील संस्थानिक इतक्या सर्वांनीं मराठ्यांचे तिकडील राज्य बळकाविलें होतें तें पुनः सोडविण्याची व्यवस्था. २ कर्नाटकांत हैदर अली प्रबळ होऊन त्यानें मराठ्यांचें तिकडील राज्य ग्रासिलें होतें. त्याचें पारिपत्य करण्याची व्यवस्था ३ नडली. ४ मुलूख. ५ दादासाहेबांस.

श.१६८४ पेशवे चुलत्याच्या स्वाधीन होतात. इ.स.१७६२

पदरचा पैसा दौलतीस लाविला नाहीं. शिलकी चाकर बहुतां दिवसांचे. यामुळें कांहीं पैका घ्यावा लागेल ऐसें मानस आहे. निजामअल्लीच्या भेटी होत तों पर्यंत बारामतीस राहतील. उपरांत लष्करांत आणितील. अब्रूस धक्का वगैरे नाहीं. अस्थिर भाव आहे. आम्हांकडील लोकांचा द्वेष तीर्थरूप करीत नाहींत. सर्व मंडळीचें समाधान करितात. आमचे भेटीचे समयीं उभयतां भेटते तर इतका प्रकार फारसा होताना. राजश्री गोपाळराव मिरज प्रांतीं गेले, उत्तम केलें. या उपर त्याणीं राजश्री गोविंद हरी व त्रिंबक हरी यांचीं पत्रें तीर्थरूपांस पाठवावीं कीं, ' राजश्री गोपाळराव चुक्कले. या उपर कृपा करावी. अभय पत्र सादर झाल्यानंतर गोपाळरावास घेऊन सेवशीं येतों. ' हा प्रकार झाल्यास तीर्थरूप कबूल करतील. तीर्थरूपांचीं पत्रें गोविंद हरी व त्रिंबक हरी या उभयतांस सदर्हू मजकुरांचीं गेलींच आहेत. नाना प्रकारचें वर्तमान मनस्वी लोक सांगतात, व लिहितात. तो प्रकार येथें किमपि नाहीं. बडिलीं चित्तांत दुसरा अर्थ आणूं नये. तीर्थरूपांचें चित्त बहुत कोमल आहे. समाचार वरचेवर घेतात. दिवसेंदिवस अधिकोत्तर चित्त कोमल होईल व कारभारी यांचें चित्ताची साफी होत जाईल. येणें करून दौलतीची वृद्धि होत जाईल. बडिलीं तीर्थरूपास समाधान पत्रें वारंवार पाठवीत जावीं. सलूख करते समयीं कारभारी उभयतां व गोपाळराव यांचे विचारें केला. तेव्हां त्रिवर्गांनीं आपण होऊन सांगितलें कीं, या उपर ओढून धरूं नये. आमचा प्रयत्न राहिला नाहीं. सलूख करून भेटावें. ऐसें सांगितल्यावर राजश्री रास्ते यांस तीर्थरूपांकडे पाठवून भेट घेतली. रवाना छ ३ जमादिलावल. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

१ जुने. फारदिवसांचे. २ बाबूराव व त्रिंबकराव. ३ सखारामबापू. ४ बाबूराव व त्रिंबकरावमामा. ५ रास्ते लक्ष्मणराव.

श.१६८४ पेशवे चुलत्याच्या स्वाधीन होतात. इ.स.१७६२

नं० ९६

(२७ नोवेंबर)

श्री.

पे ॥ छ ११ जमादिलावल.

वडिलांचे सेवेशीं विज्ञापना. येथील क्षेम तागाईत मार्गशीर्ष शु० ११ पावेतों मुक्काम गणेशगांव भिवरातीर येथें सुखरूप असों. या नंतरी इकडील मजकूर पूर्वी पांडुरंग कृष्ण पाठविला होता त्यानें विदित केलेंच असेल. पत्रें ही पाठविलीं होतीं त्यावरून श्रुत जाहलेंच असेल. त्या अलीकडे तीर्थरूप राजश्री दादासाहेब विठ्ठलसुंदर[1] याचे डेरियास भोजनास गेले होते. तसेच मोंगलाचेही डेरियास गेले होते व मोंगलही गुरुवारीं आमचे डेरियास आला होता. आमची ही भेट जाहली. जहागीर मोंगलास द्यावयाच्या यादी करार होऊन ठराव झाला नाहीं. परंतु साठी लक्षांवर द्यावी लागेल असा डौल दिसतो. निश्चय जाहल्यावर लिहून कळवूं. या नंतर वडिलीं आशीर्वाद पत्र पाठविलें तें पावलें लिहिला मजकूर कळोन आला. तेथें आज्ञा कीं, " ज्वर अद्याप सोडीत नाहीं. आमच्या वैद्याचें औषध द्यावें म्हणजे ज्वर जाईल. " ऐसी यासी सांप्रत ज्वराच्या पाळ्या चुकल्या. प्रस्तुत ज्वर येत नाहीं. वडिलांस कळावें. द्राक्षें व साखरेचे कंद पाठविले ते पावले. वडिलीं बालकाचा निरंतर पत्रीं सांभाळ करावा. या नंतरी इकडील प्रसंग एकें प्रकार जाहला म्हणोन वडिलीं चित्तीं उदास वृत्ति धरिली म्हणोन ऐकिलें; त्यास सदैव काळ सारखा असतो असा अर्थ नाहीं. ज्या

---

१ हें माधवराव पेशव्यांचें गोपिकाबाईस पत्र. या अंकांत छापिलेल्या पत्रां पैकीं वरींच माधवराव व रघुनाथराव यानीं गोपिकाबाईस लिहिलेलीं आहेत; तीं सर्व रा० रा० वामन विष्णु लेले, वकील, पुणें,यांजकडून आह्मांस मिळालेलीं आहेत. असल्या पत्रांवर मागील अंकांत L अशी खूण केली होती ती या अंकांत करावयाची राहिली; सबब ही सूचना लिहिली आहे. २ विठ्ठल सुंदर राजेबहादर हा निजामअल्लीचा दिवाण. ३ मार्गशीर्ष शुद्ध नवमी गुरुवार तारीख २५ नोवेंबर रोजीं दादासाहेबांकडे निजामअल्ली परत भेटीस आला होता. ४ चमत्कारीक, अतार्कित.

समयीं जें होणार तें होतें. यास इलाज काय? प्रस्तुत वडिलीं समय प्राप्त झाला आहे त्यासच बरें म्हणून गोड दिसे तें करावें. वाईट न दाखवावें. उदास न व्हावें. आम्ही ही कालावर दृष्टि देऊन उत्तम दिसे सारिखा डौल धरिला आहे. वडिलीं कोणे गोष्टी विषयीं उदास वृत्ति धरून लौकिकांत वाईट न दिसे तें करावें. आम्हीं ऐकितों कीं, आपण एखादे स्थळीं चार दिवस जाऊन राहणार. त्यास ही गोष्ट वडिलीं एकंदर न करावी. असें झालियासी येथील प्रसंगास ठीक पडणार नाहीं. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना. सखारामपंत व आंबा येत असतात. आम्हांसीं ही बरेच आहेत. परंतु गुंतले आहेत. हे विज्ञापना.

नं० ९६

(अजमासें कार्तिक वद्य चतुर्दशी
१४ नोवेंबर)

श्री.

पै॥ छ- २९ रा॥खर.

तीर्थरूप मातुश्री बाईसाहेब
वडिलांचे सेवेशीं.

अपैत्यें माधवराव यानें चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान तर वरचेवर पत्रें झाल्या वर्तमानाचीं सेवेशीं लिहिलींच आहेत. परंतु एका ही पत्राचें उत्तर न आलें. यास्तव कृपा करून पत्राचें उत्तर पाठवावया आज्ञा केली पाहिजे. वरकड वर्तमान तर रोज उठोन बोलणें होतच आहे. अद्यापि एके गोष्टीचा ठराव नाहीं. कधीं उठोन जाणार कधीं लढणार अशा तजवीजा करीत आहेत. एक निश्चय ठरवून

---

१ आबा पुरंदरे. २ दादासाहेबांकडे कांहीं वचन देऊन गुंतले आहेत. ३ या पत्रास ९६ नंबर चुकून लागला आहे. हें खरें झटलें तर कांहीं नंबर मागें लागलें पाहिजे.

बोलत नाहींत. मजकडील बोलणें हेंच आहे कीं, " आपल्या मर्जी प्रमाणें थोडक्या लोकांनिशीं आलों. मर्जी प्रमाणें वर्तणूक आज पावेतों केली. असें असतां मर्जीस गोष्ट येत न असल्यास निरोप द्यावा. " असेंच बोलणें इकडून होत आहे. कारभाऱ्यांचीं मतें एक एकांचीं निरनिराळीं आहेत. सारांश कोणी चढीं देत नाहींत. कां कीं चढ दिला तरी मला कळतें आणि त्या चढावर कायम राहून वडील करीत ही नाहींत. कोणते वेळेस काय करतील हा भरंवसा कोणास ही नाहीं आणि लगामीं ही कोणाच्या नाहींत हें खरें आहे. वैरण मिळत नाहीं. लष्करची खराबी आहे. वडिलांस कळावें. श्रुत होय हे विज्ञापना.

नं० ९७

(अजमासें मार्गशीर्ष शुद्ध.
नोवेंबरचा दुसरा पंधरवडा)

श्री.

पै० छ० ९ साबान.

राजश्री रामचंद्र नारायण गोरे गोसावी यांसी.

सु।। सलास सितैन मया बअलफ येथील सविस्तर वर्तमान तीर्थरूप मातुश्री बाईंच्या पत्रीं लिहिलें आहे त्यावरून कळेल. तीर्थस्वरूप राजश्री दादासाहेबांचा व आमचा विचार एक झाला. कारभारी सर्व आपले लगामीं लागले. कोणे गोष्टीचा गुंता राहिला नाहीं. या उपरी कोणे गोष्टेची

१ दादासाहेबांचे कारभारी सखारामबापू, आबा पुरंदरे व महिपतराव चिटणीस. २ नंबर ९७ व ९८ या पत्रांत रवाना छ० ४ साबान व रवाना छ० ७ साबान, तसेंच पै॥ छ० ९ साबान व पै॥ छ० ४ रमजान या तारखा लिहिल्या आहेत परंतु आंतील मजकुरावरून हीं पत्रें रबिलाखरच्या शेवटीं किंवा जमादिलावलच्या प्रारंभीं [सु. स. ११६३] लिहिलेलीं असावींत असें वाटतें. पत्रांच्या नकला मात्र आह्मांस मिळाल्या. अस्सल पत्रें पहावयास मिळतीं तर या गोष्टीचा तत्काळ निकाल लागता. नं० ९७ चें पत्र माधवराव पेशव्यानीं रामचंद्र नारायण गोरे यास लिहिलेलें आहे. हा मनुष्य गोपिकाबाईचा विश्वासू कारकून होता हें मागें सांगितलेंच आहे. नं० ९८ चें पत्र पेशव्यानीं गोपिकाबाईस लिहिलेलें आहे.

कल्पना चित्तांत नसावी. मातुश्रीची मर्जी कशी आहे हें सर्व तुम्हीं ध्यानांत आणून आम्हांस वरचेवर लिहून पाठवीत जाणें. बरकंड तुम्हांस हा सुचेल त्या रीतीनें समय पाहून त्यांची मर्जी यथास्थित राहील ती गोष्ट करीत जाणें. छ० ४ सावान.

नं० ९८

(अजमासें मार्गशीर्ष शुद्ध
नोवेंबरचा दुसरा पंधरवडा.)

श्री.

पै॥ छ० ४ रमजान.

सेवेशीं विज्ञापना. तीर्थरूपांचे भेटी झाल्याचें वर्तमान अलाहिदा पत्रीं लिहिलें आहे त्यावरून कळेल. वडिलांची मर्जी प्रस्तुत बरीच आहे. वडिलांशीं एकांतीं बोलणें झालें त्यावरून दिसतें कीं वांकडा भाव नाहीं. परंतु सांगणार आपले तर्फेनें लबाडी करावयास चुकत नाहीं. परंतु वडिलांची ही मर्जी प्रस्तुत बरीच आहे. सखारामपंताचें ही लक्ष प्रस्तुत बरकंड मंडळी सारखें नाहीं. वडिलांचें आमचें नीट असावें हेंच लक्ष प्रस्तुत दिसतें. विस्तारें वर्तमान मागाहून लिहीन त्यावरून कळेल. रवाना छ० ७ सावान हे विज्ञापना.

नं० ९९

(अजमासें मार्गशीर्ष शुद्ध.
नोवेंबरचा दुसरा पंधरवडा.)

श्री.

पुरवणी. तीर्थरूप मातुश्री बाई
वडिलांचे सेवेशीं.

विज्ञापना. कारभारी यांचे पेचामुळें आमचे दौलतेच्या तणावा तुटत चा-

१ हें पत्र माधवराव पेशव्यानीं गोपिकाबाईस लिहिलेलें आहे. पेशव्यांचें

लल्या. पहिल्यापासून राखिलें असतें तर सर्व ही आपआपला कारभार करून लगामीं राहते. तें न झाल्यामुळें सर्व मुलूख बुडाला. पतयातेज उडाली. (?) लोक फितूर फार झाले. धन्याचें वजन राहिलें नाहीं. शत्रु बलवत्तर झाले. तथापि पैसा असता तरी सर्व ही गोष्टी इतके ही पेच संभाळून नीट होत्या. त्यास पैसा नाहीं. पैसा नाहीं तेव्हां फौज कशावर ठेवावी? फौज नाहीं, दौलत कशी राहणार? असें बारीक बारीक पाहतां सारें अवघडच आहे. प्रस्तुत तीर्थरूप राजश्री दादासाहेब व आम्हीं एक झालों हींच गोष्ट एका करोडीची जाहली. त्यांची आमची एकवाक्यता झाली. ममताही परस्परें पाहिल्या पेक्षां अधिकोत्तर मिळाली. कारभारी ही आपले लगामीं उत्तम प्रकारें लागले. आमची दौलत पूर्वी प्रमाणें करावी हेंच मानस अंतर्यामापासून [त्यांचें] आहे. या उपर त्यांचा दुसरा संकल्प नाहीं. जें करणें तें आपले व आमचे विचारें करावें. दौलतीस ज्या गोष्टीनें कल्याण तींच गोष्ट साऱ्यानीं करावी. हींच बुद्धि आहे व प्रस्तुत या प्रमाणेंच चालत आहे. आतां गोष्टी जाहल्या आहेत, याच गोष्टी दृष्टीस असाव्या. येणें कडून पार लागेल तो लागेल! नाहीं[1]सलें त्यास दुसरें झालें तरी अगदींच नासेल. यास्तव झालें तें उत्तम आहे. एक विचार असावा तो आहेच. परिणाम लाविणार परमेश्वर समर्थ आहे व वडिलांचें पुण्य आहे. रवाना छ० ३ साबान बहुत काय लिहूं हे विज्ञापना.

वय यावेळीं अठरा वर्षांचें असून ही त्यांचे विचार किती पोक्तपणाचे होते हें या व मागील अंकांत त्यांचीं पत्रें छापिलीं आहेत तीं जो वरवर वाचील त्यास सुद्धां सहज कळून येईल.

१ एक दादासाहेबानीं बेडेपणानें मोंगलास मदतीस बोलावून राज्यांत बखेडे केले तेणेंकरून हानि झालीच आहे. आपण ही तसेंच करूं लागलों तर आणखी हानि होईल; असा या लिहिण्याचा अभिप्राय आहे.

श.१६८४ पेशवे चुलत्याच्यास्वाधीन होतात इ.स.१७६२

नं० १००

(१९ नोवेंबर)

श्री.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
गोपाळराव यांशीं.

प्रती सौभाग्यवंती[1] पार्वतीबाई[2] मुक्काम पुणें नमस्कार विनंती उपरी येथील कुशल तागायत मार्गशीर्ष शु० ४ जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत असावें. विशेष, युद्धप्रसंग झालियावर सडे स्वारीनिशीं निघोन मिरज प्रांतें गेलेत ह्मणोन वर्तमान आहे. परंतु कागदीं पत्रीं लेख कांहींच नाहीं. याजकरितां येथून मुजरद जासूद पत्रें देऊन रवाना केला आहे; तर आपलें वृत्त साकल्य ल्याहावें व चिरंजीव लक्ष्मणराव[3] कोलटकर आपले बरोबर गेले ह्मणोन ऐकतों. ह्यास त्यांचें वृत्त; साकल्य ल्याहावें. चिरंजीवाबरोबर माणसें कोण आहेत किंवा सडे एक असामीनें आहेत तें कांहींच कळत नाहीं, तर सविस्तर लिहून पाठवावें. बहुत काय लिहिणें हे विनंती.

नं० १०१

[अजमासें मार्गशीर्ष शुद्ध.
नोवेंबरचा दुसरा पंधरवडा]

श्री.

सेवेशीं विज्ञापना[4]. उभयतां श्रीमंतांची भेटी जाहली. भेटीस चालिले ते

---

१ हें पत्र गोपाळराव पटवर्धनास लिहिलेलें आहे. लिहिणारी पार्वतीबाई ही सदाशिवराव भाऊसाहेब पानपतांत पडले त्यांची बायको. भाऊसाहेब मरण पावल्याविषयीं हिची खात्री नव्हती व ते पुनः कधीं तरी परत येतील असें हिला वाटत असे. यामुळें ही मरेपर्यंत सौभाग्य चिन्हें धारण करीत असे. २ पार्वतीबाई ही पेणच्या कोलटकरांची मुलगी होती. अर्थात् या पत्रांत आलेला हा लक्ष्मणराव कोलटकर तिचा भाऊ किंवा भाचा असावा. ३ हें पत्र गोपाळराव पटवर्धन यानें गोपिकाबाईस लिहिलेलें आहे.

समयीं आम्हीं आज्ञा घेऊन स्वस्थलास आलों. तेथें राहिल्यानें परिणाम नाहीं. मग उगेच बेअब्रूचें राहणें काय कामाचें? यास्तव निघालों. श्रीमंत राजश्री रावप्रधान तेथें[1] गेले परंतु तिकडून चित्त शुद्ध नाहीं. दोहीं डेरिया भोंवत्या चौक्या दोन हजार गाडद्यांच्या आहेत. श्रीमंत राजश्री राव प्रधान यांचे डेरियास कोणी माणूस जाऊं पावत नाहीं. दोहीं डेरियां भोंवतीं चौकीचें कारण काय? तरी एका डेरियास चौकी ठेविल्यानें लौकिक[2] होतो यास्तव दोहींकडे[3] चौकी ठेविली आहे. आपण किल्ल्यांवर[4] गेलीं आहेत तीं पुण्यास हर तजविजीनें आणावीं. मग आपणाकडील ही बंदोबस्ती करावी या विचारांत आहेत. यास्तव आपण किल्ल्याची बंदोबस्ती करून वरच रहावें. खालीं एकंदर[5] येऊं नये. हे[6] कारभारी राज्य नांदों देत नाहींत! उभयतां धण्यास दिगंबर एक दिवशीं करतील. त्यांचे चित्तीं सारी मोंगलाई करावी हें आहे. तूर्त नबाब परांडियावर आला. श्रीमंतांची त्याची भेटी होणार. ते[7] बलिष्ट. फौज मातबर. उभयतांस ही कैद केलें तरी नको कोण म्हणतो! असा ही दगा होऊं सके असें आहे. यांत ईश्वरें जें निर्मिलें असेल तें होईल. चिंता करून काय होणें? परंतु आपण दूरदेशीं[8] चित्तांत आणून श्रीमंत राजश्री नारायणराव[9] सुध्धां खालीं उतरूं नये. किल्ल्याची बंदोबस्ती करून राहावें. हे दिवस फार दिवस राहणार नाहींत. मोंगलाची यांची भेट होऊन तो माघारा गेला आणि पुढें सुरळीत दृष्टीस दिसलें तरी सुखरूप उतरावें. तों पर्यंत कदापि कोणाचा विश्वास धरून खालीं येऊं नये. उभयतां कारभारी[10] ही हस्तगत झाले म्हणून वर्तमान ऐकिलें. सत्य मिथ्या न कळे. मी लिहिलें हें पुर्ते[11] दूरदेसीनें चित्तांत आ-

---

१ दादासाहेबांकडे. २ दुर्लौकिक. ३ दादासाहेबानीं आपल्या व पेशव्यांच्या डेऱ्या भोंवती दोन हजार गारद्यांच्या चौक्या ठेविल्या आहेत, असा पत्र लिहिणाराचा अभिप्राय. ४ सिंहगडावर. ५ अगदीं. ६ सखारामबापू. ७ पेशवे व दादासाहेब. ८ मोंगल. ९ पेशवे व दादासाहेब यांस. १० दूर दृष्टीचा विचार. ११ ज्यांस पुढें सुमेरसिंग वगैरे गारद्यानीं ठार मारिलें ते दुर्दैवी नारायणराव पेशवे. या वेळीं यांचे वय सात आठ वर्षांचें होतें. १२ बाबूराव फडणीस व त्रिंबकरावमामा.

णून कर्तव्य तें करावें. विदित होय हे विज्ञापना.

नं० १०२

(अजमासें मार्गशीर्ष वद्य.
दिसेंबरचा पहिला पंधरवडा.)

श्री.

समस्त ब्राम्हण वास्तव्य पुणें यांचे वेदोक्त आशीर्वाद. तुम्हीं यंदा मनसबा कोणे प्रकारचा केला ! सर्व अनकूल असतां घरांत विषमता दाखवून बाहेर जाऊन यवनास आणून सर्व दौलत क्षयास नेली ! पुण्यास मातुश्रीच्या वाड्यांत गाडदी यांच्या चौक्या ! तेथें बायकामुलें ! त्यांच्या चित्तांत अन्य प्रकार असता तर गडावर जाऊन बसती. चिरंजीव मुख्य प्रधान यांच्या मतें परिच्छिन्न वडिलांशीं स्पर्धा न करावी, हें पुण्यांतच म्हणत होते. त्या उपरी घोडनदीतीरीं भेटण्याचा प्रकार करार झाला तो मोडून अकस्मात् मार्गीं चालतां (तुम्हीं) युद्धाचा प्रकार केला ! अगोदरच सैर्व वचनास गुंतले होते. मंजलीस पुर्ते न येतां मार्गीं युद्धाचा प्रकार ही थोडा बहुत घडला. दुसरे दिवशीं चिरंजीव भेटले त्या दिवसा पासून त्यांचे फौजेची चर्चा नाहीं ! त्यांचे निसबतीस होते त्या सर्वांवरी इतराजी केली ! पुण्यांत दिवाणखान्यांत गाडदी राहिले ! कांहीं मर्यादा ठेविली नाहीं. मातुश्री उगीच घरांत आहेत. श्रीमंत नारायणराव आहेत. तुम्हीं ईश्वर दयेनें सलामत असतां श्रीमंत पेशव्यांच्या घरांत बायकांस चौ-

---

१ रघुनाथराव दादासाहेबांस ' समस्त ब्राह्मण वास्तव्य पुणें ' यांच्या नांवें जरी हें पत्र लिहिलेलें आहे तरी यांत कोकणस्थांची मात्र बाजू दाखविली आहे. याची नकल आह्मांस मळादसरींत मिळाली. अस्सल पत्र तेथें मिळावयाचें नाहीं हें उघडच आहे. २ भांडण करून. ३ गोपिकाबाईच्या. ४ गोपिकाबाईच्या. ५ आयत्यावेळीं तुह्मांस अनुकूल होण्याविषयीं पेशव्यांच्या सरदारानीं आधींच तुह्मांस वचन दिलें होतें. ६ मुक्कामास. ७ जेथें पेशव्यांचीं बायकां मुलें रहात होतीं त्या शनवारच्या वाड्याच्या दिवाणखान्यांत. ८ खूशाल.

श.१६८४ पेशवे चुलत्याच्या स्वाधीन होतात इ.स.१७६२

क्या हें ही अपूर्व जाहलें ! तुमचे कार्यभागी[1] यांनीं तुम्हांस नाना प्रकारचे कुतर्क शिकवून बाहेर नेलें. सर्व मंडळ[2] भेदकरून इंद्रजाल करून तुम्हांस यश दाखविलें. तीन पिढ्या दौलत मिळविली ती [तुम्हीं] क्षयास नेली! खासगीकडील[3] किल्ले लोकांस दिले. तमाम सरंजाम ह्मणोन खुलासा (?) माहाल वांटून टाकिले. बाकी मुलूख यवनास दिला. एकनिष्ठ सेवक, सरदार व कारकून यांस देशधडी केलें. कित्येक अज्ञातवास राहिले. कित्येक कारागृहीं घातले. हित करून तुम्हास (सखारामपंतानें) दाखविलें परंतु तुमचें घर बुडविलें हें तुह्मांस ठाऊक नाहीं ! परिणामीं कळेल. सातारियास नेऊन प्रतिनिधीचीं वस्त्रें मुलाच्या[4] नांवें करून तुम्हांकडून घेवविलीं. तुमचे सरदार होते ते सरकारांतून तुमचे बरोबरीचे केले. सातारा किल्ला राजधानी. त्याजवरील लोक उतरून [तुम्हीं] गाडदी वर चढविले. किल्ला व राज्य संपदा होती ते गमाविली. परभूं[5] कार्यभागी केले. थोडक्यांत सर्व लयास नेलें ! कांहीं तुम्हांस कळतें किंवा नाहीं ? प्रस्तुत तुम्हांस यवनास एक करून दक्षिणेंत[6] प्रांतें नेऊन तुम्हांस (सखारामबापू) फसविणार हें ही तुम्हांस कळेना ! एवंच चित्तपावनांचें नांव देशांत नाहींसें करावयाचा (सखारामपंताचा) मनसबा होता तो (त्यानें) सिद्धीस नेला ! तुम्ही महाराज भोळे ! राजाई तुम्हांस कांहीं कळेना ! त्यां पाशीं

---

१ कारभारी सखारामबापू. २ पेशव्यांच्या बाजूची मंडळी होती तींत फितूर उत्पन्न करून. ३ पुरंदर व सिंहगड हे दोन किल्ले परचक्र आलें असतां पुण्यांतील लोकांस आसरा घेण्यास अत्यंत उपयोगीं आहेत. यामुळें हे नेहमीं पेशवे सरकारच्या खासगीकडे ठेविलेले असत. हल्लीं दादासाहेबानीं हे किल्ले पुरंदरे व सखारामबापू यांच्या हवालीं केले. त्यास अनुलक्षून वरील लिहिणें आहे. ४ दादासाहेबानीं आपला अल्पवयी पुत्र भास्करराव याचे नावें सातारकर महाराजांपासून प्रतिनिधीचीं वस्त्रें घेऊन त्या पदाची मुतालिकी नारोशंकरास दिली. अर्थात् हें पद खरोखर नारोशंकरासच मिळालें. तेणें करून तो ' पंतप्रधानांचा ' सरदार असून आतां ' पंतप्रतिनिधि ' झाल्यामुळें त्यांच्या बरोबरीचा झाला. ५ महिपतराव चिटणीस. ६ कारभारी. ७ पटवर्धनां पासून मिरज घ्यावी व कर्नाटकांत हैदरअल्लीचा दंगा चालला होता त्याचा बंदोबस्त करावा ह्मणून. ८ राज्य करण्याची अकल. ९ सखारामबापूपाशीं.

द्रव्य पुष्कळ आहे. गड किल्ले रहावयासीं झाले. राजा स्वाधीन झाला. कारकुनीची (त्यानें महाराजांपासून) यादी घेतली. बाजूत बरसात स्वतंत्र सरदारिया करून राज्यभार चालवितील. तुम्हांस समूळ बुडविलें हें तुम्हांस न कळे! त्याचीं वशीकरणें सिद्धीस गेलीं! तुम्हीं त्यांचे स्वाधीन जाहलेत. हा उमज तुम्हांस अद्याप पडेना! रास्ते बाईचा बंधु. त्या मूर्खास कळेना कीं पुढें पाणी घालावया लावतील! त्याणें मातुश्रीचे बुद्धीस भेद केला. 'शालकोगृहनाशाय' हें खरें केलें! जे मातुश्रींच्या व मुख्यांच्या पदरीं मिळाले त्यांसी तोंडघसीं दिलें आणि कार्यभागी यांचे हितकर्ते होऊन मागुती तुम्हांजवळी कार्य भागांत पडले. तुम्हांस कांहींच न कळे! आम्ही तुमच्या राज्यांत बहुत दिवस आश्रयानें अन्न भक्षून सुखी होतों. पुढें आमची गति काय? या प्रकारें निभावणी कशी होईल न कळे! मातुश्रीस चौगीर्दा चौकी ठेवणें तरी तुमचे विश्वासू असतील ते मराठे ठेवावे. गाडदी ठेवावे हें तुम्हांस युक्त नव्हे. अगर पर्वताधरी बंदोबस्ती करून ठेवावी. हा दुर्लौकिक तुमचा होतो. यास्तव आम्ही समस्त ब्राम्हण मिळोन पत्र लिहिलें. एकाचें नांव त्याहावें तरी तोच द्रोही होतो. या उपर चित्तास येईल तें करणें. सुचलें तें लिहिलें म्हणोन विषाद न मानावा. पत्र वाचून फाडून टाकावें. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

---

१ सिंहगड व पुरंदर. २ सातारकर महाराज. ३ पावसाळा झाल्यावर पुढील वर्षी. ४ लक्ष्मणराव रास्ते यानीं गोपिकाबाई व दादासाहेब यांची एकी करून दिली. लक्ष्मणरावा शिवाय गोपिकाबाईचे आणखी बंधु होते त्यांचीं नांवें—मल्हारराव, गणपतराव, आनंदराव, गंगाधरराव, रामचंद्रराव व जीवनराव. मिळून एकंदर हे सात बंधु व यांची बहीण एकच गोपिकाबाई ही होय. मल्हारराव व गणपतराव हे वयानें तिज पेक्षां वडील होते. हे सर्व भिकाजी नाईक रास्ते यांचे पुत्र होत. ५ कारभारी सखारामबापू. ६ पुनः. ७ चोहोंकडून. ८ गाडदी लोक रोहिले, पठाण, शीख, पुरभय्ये वगैरे अन्यदेशीय असत हें पूर्वी सांगितलेंच आहे. ९ किल्ल्यावर.

श.१६८४ पेशवे चुलत्याच्या स्वाधीन होतात इ.स.१७६२

नं० १०३

(अजमासें मार्गशीर्षशुद्ध
नोवेंबरचा दुसरा पंधरवडा)

श्री.

सेवेशीं विनंती. राजश्री बाबूराव[1] व त्रिंबकराव[2] व मोरोबा[3] व त्रिंबकराव यांचे पुतणे असे बारामतीमध्यें आहेत. त्यांस आणावयास दोनतीनशें राऊत गेले होते. राजश्री आबाजी नाईक यांणीं जबरदस्तीनें वाड्यांत ठेऊन घेतले आहेत. तीन चारशें प्यादे जमा करून वाडा खबरदार केला. राऊत गेले ते पेठेंत राहिले आहेत. उभयतांस राउतांचे हातीं देत नाहींत. " कदाचित् राउतानीं जबरदस्ती केली तरी बारामतीचा वाडा झुजवूं, इतकें असोन धीर न धरवे तेव्हां त्रिवर्गांनीं मरावें, येणें प्रमाणें करार झाला आहे. व राजश्री बाबूजीनाईक यांणीं याच प्रमाणें करार करून लष्करांत राहिले आहेत. कळलें पाहिजे. राजश्री गोविंद शिवराम लष्करांत गेले. धोंडोपंत पुरंदरे या-

---

१ हें पत्र गोपाळरावास लिहिलेलें आहे. पण कोणी लिहिलें हें कळत नाहीं. २ बाबूराव फडणीस. ३ त्रिंबकराव मामा पेठे. ४ मोरोबादादा फडणीस हा बाबूरावा चा मुलगा. ५ बाबूराव, त्रिंबकराव मामा व आबाजी नाईक यानीं. घोडनदी व आळेगांव येथें लढाया होऊन पेशवे दादासाहेबांच्या स्वाधीन झाल्यानंतर त्यांचे कारभारी बाबूराव व त्रिंबकराव हे बारामतीस बाबूजी नाइकाचा भाऊ आबाजी नाईक याच्या आश्रयास गेले. ती वातमी कळतांच त्यांस आणण्या करितां दादासाहेबानीं दोन तीनशें स्वार बारामतीस पाठविले. परंतु आबाजी नाइकानें त्या दोघांस स्वारांच्या हवालीं करण्याचें साफ नाकारिलें. स्वार जबरदस्ती करितील तर आपण लढून मरून जावें असा त्यानें निश्चय केला. दादासाहेबांच्या लष्करांत बाबूजी नाईक आपल्या पथकासह होता त्याचा ही निश्चय तसाच दिसला. त्यावरून दादासाहेबानीं जबरदस्ती करण्याचा बेत सोडून बाबूजी नाईक व आबाजी नाईक यांजला आश्वासन दिलें कीं, बाबूराव व त्रिंबकराव यांच्या अंगास आपण धक्का लावणार नाहीं. इतकें झाल्यावर पेशव्यांचे माजी कारभारी बाबूराव व त्रिंबकराव दादासाहेबांस जाऊन भेटले. ६ धोंडोपंत नाना पुरंदरे हा कैलवासी भाऊसाहेबांचा कट्टा अभिमानी असल्यामुळें दादासाहेबांच्या डोळ्यांत सलत होता. प्रस्तुत त्यास हद्दपार होण्याची शिक्षा यावद्दलच झाली असावी.

णीं राज्यांत राहूं नये, अन्यत्र स्थलास जावें, असा करार झाला. रास्ते व कवडे व आपला सरंजाम[1] सरकारांत लिहून आणविला आहे. राजश्री नाना फडणवीसें[2] यांस पत्रें आलीं आहेत. हे विज्ञापना.

नं० १०४

(अजमासें मार्गशीर्ष वद्य,
दिसेंबरचा पहिला पंधरवडा.)

श्री.

सेवेशीं वासुदेव[3] धोंडदेव साष्टांग नमस्कार विज्ञापना. श्रीमंतांनीं व कारभारी यांणीं मुलुखाची बंदोबस्ती येणें प्रमाणें केली. सिंहगड सखारामपंतास, रुद्रमाळ[4] नीलकंठ[5] महादेव [यास], चिटणिसांस लोहगड, मुरादखा[6]नास दौलताबाद, निंबाळकरांस नगर द्यावें, पिराजी नाईकास नेवासें वगैरे महाल द्यावे, मोंगलास अशेरी व साठीची जहागीर देतों म्हणत होते परंतु तो ऐकत नाहीं. आमची आजपर्यंत जहागीर घेतली आहे ते तुम्हीं अगोदीं

---

१ रास्त्यांचा, कवड्यांचा व तुमचा [पटवर्धनांचा] सरंजाम जप्त करावा या हेतूनें दादासाहेबानीं ज्या ज्या सरंजामाच्या यादी मागविल्या आहेत. २ नाना फडणिसांस पत्रें या प्रसंगीं दादासाहेबांकडून आलीं हीं त्यांचा सरंजाम जप्त करून तो चिंतो विठ्ठल रायरीकर यास दिल्याची ताकीद पत्रें असावीं ३ वासुदेव धोंडदेव उर्फ वासुदेव काका पटवर्धन शीळकर हा हुशार कारकून होता एवढेंच नाहीं, तर हा मोठा योद्धा ही होता. गोपाळराव, वामनराव व पांडुरंगराव यांचा याजवर पूर्ण इतबार असे व परशुरामभाऊ ही यास फार मान देत असे. पांडुरंगरावास (स.१७७७ श.१६९९) हैदरानें सांवशीच्या लढाईत पाडाव करून श्रीरंगपट्टणास नेऊन वर्षभर कैदेंत ठेविलें त्या वेळीं हा ही पाडाव होऊन कैदेंत सांपडला होता. याचीं कर्नाटकचे स्वांऱ्यांचीं पत्रें फारच मनोवेधक आहेत. तीं पुढें छापिलीं जातील. हें नं० १०४ चें पत्र त्यानें गोविंदहरीस लिहिलें आहे. ४ दादासाहेब व त्यांचे कारभारी सखारामबापू यानीं ५ किल्ला पुरंदर. ६ नीलकंठ महादेव उर्फ आबा पुरंदरे. ७ महंमद मुरादखान हा औरंगाबादेस मोंगलांचा सुभेदार होता. हा दादासाहेबांचा मित्र होता. ८ जानराव निंबाळकर हा मोंगलांचा सरदार, हा दादासाहेबांचा मित्र होता. ९ अशीरगड व साठ लक्षांची जहागीर. १० सर्व.

द्यावी, येणें प्रमाणें त्याजमध्यें गवगवा पडला आहे. नाना पुरंदरे यांची मामलत काढोन घेतली. त्याणीं देशत्याग करून जावें. बाबूजी नाईकास शिव्यागाळी करून त्यांस ही बारामतीस जाणें म्हणून सांगितलें. आपणास स्वदेशची विसांची[1] जहागीर ठेविली आहे त्याज पैकीं ही मोगलास देणार. येणें प्रमाणें त्यांचा मजकूर आहे. आम्हांस अद्यापि रायाचें[2] ठीक लागलें नाहीं. किल्ल्यांनीं जती गेली. भांडीं वगैरे आमचीं तेथेंच आहेत. कांहीं भांडीं व दुकानचीं दिंडें व किरकोळ बासनें खासगी पैकीं ऐसीं आणिलीं. कांहीं राहिलीं तीं आणों देत नाहींत. चार हजार रुपये पैकीं दोन हजार दिले. बाकी देत नाहींत. बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

पटवर्धनांचे बेत व हालचाली.
मिरज झुंजविण्याची तयारी.

गोपाळराव पेशव्यांच्या व दादासाहेबांच्या भेटी होण्यापूर्वी तेथून आपल्या फौजेसह निघून मिरजेकडे दरमजल कूच करून आला. तिकडे पेशवे, गोपिकाबाई, नारायणराव साहेब, पार्वतीबाई, सगुणाबाई [विश्वास रावाची बायको] हीं सर्व दादासाहेबांच्या ताब्यांत आलीं. माजी कारभारी त्रिंबकराव व बाबूराव हे ही त्यांच्या हस्तगत झाले. रास्ते, बाबूजी नाईक, पिराजी नाईक यानीं होईल त्या रीतीनें त्यांशीं समेट करून घेतला. होळकर, जाधवराव व इतर लहान सान सरदार प्रथम पासूनच तिकडे फितूर होते. तेव्हां आतां राहतां राहिले पटवर्धन. दादासाहेब व सखारामबापू यांचें आपलें अत्यंत वैर, ते आतां यशस्वी झाले आहेत, सर्व पेशवाई त्यांच्या हातीं आली आहे, तेव्हां ते आतां आपलें सर्व सामर्थ्य आमचा निःपात करण्याच्या कामीं खर्च करतील; हें पटवर्धनांस कळूनच चुकलें होतें. तथापि

---

१ वीस लक्षांची नाशीक प्रांतीं. २ गोपाळरावाचें वर्तमान बरोबर कळलें नाहीं.

गेल्या तीन वर्षांत पटवर्धनांस पंचवीस लक्ष रुपये कर्ज काढून फौज ठेवावी लागली, त्या रकमेची फेड करून त्यांशी सलोख्यानें वागण्याचा दादासाहेब व सखारामबापू यानीं मनसबा केला असता तर तो सिद्धीस न जाता असें नाहीं. परंतु त्यानीं पूर्व वैरास अनुसरून पटवर्धनांवर सूडच उगविण्याचा निश्चय केला व गोविंद हरीस पत्र लिहिलें कीं, गोपाळराव इकडून त्या प्रांतीं पळून गेले आहेत. ते तिकडे जाऊन कांहीं दंगा धोपा करतील तर कामास पडणार नाहीं. तुह्मांकडे मिरजेचा किल्ला व सरंजामाचा मुलूख ठाणीं, गड, कोट, पागा, हत्ती वगैरे सरकारी दौलत आहे ती इकडून जो मनुष्य पाठविण्यांत येईल त्याच्या हवालीं विन तकरार करावी. या राज्यांत रहावयाचें असल्यास बखेडे न करितां सांगूं त्या ठिकाणीं रहावें. या प्रमाणें पत्र येतांच पटवर्धनही बिथरले. पुढें काय करावें, कसें वागावें, ही जी त्यांस एवढा वेळ पंचाईत पडली होती तिचा निकाल होऊन तेही आतां कलह करण्यास प्रवृत्त झाले. कांहीं झालें तरी दादासाहेबांच्या हवालीं मिरज करावयाची नाहीं हा त्यानीं निश्चय केला. आपलीं मुलें माणसें एखाद्या सुस्थळीं कोणाच्या तरी आसऱ्यास ठेवावीं, गोविंद हरीनें मिरजेंत राहून किल्ला झुजवावा व गोपाळरावानें फौज घेऊन मुलखावर पोट भरावें, या प्रमाणें त्यांची मसलत ठरली. मुलें माणसें ठेवण्यासाठीं स्थळ त्यांस पाहिजे होतें त्याबद्दल त्यानीं करवीरकर राणी जिजाबाई, विशाळगडकर प्रतिनिधि, कित्तूरकर देसाई व मनोळीकर शिंदे यांस विचारून पाहिलें, परंतु पेशव्यांच्या भयानें त्यांस कोणीच आसरा देईना. हैदरअल्लीकडे ही त्यानीं राजकारण करून पाहिलें परंतु तें ही सिद्धीस गेलें नाहीं. तेव्हां शेवटीं त्यानीं आयत्या वेळीं कुटुंबाचीं माणसें मिरज व कुरुंदवाड येथून काढून बंकापुर म्हणुन कर्नाटकांत सावनुराजवळ त्यांजकडे एक ठाणें होतें त्या ठिकाणीं नेऊन ठेविलीं. तेथें त्रिंबक हरी जाऊन राहिला. माधवराव कृष्ण (गोविंद हरी व त्रिंबक हरी यांचा पुतण्या) शिदापुरच्या ठाण्यांत येऊन राहिला. त्याचा थोरला भाऊ पुरुषोत्तमराव कृष्ण (दाजी) व भा-

स्कर हरी हे गोविंद हरी जवळ मिरजेंत येऊन राहिले. नीलकंठराव जखमी असल्यानें त्यास मिरजेंतून हालवितां येईना. बाकीचे सरदार नारायणराव, वामनराव, परशुरामभाऊ, व कोन्हेरराव, वगैरे व फौज बरोबर घेऊन गोपाळराव मिरजे पासून कांहीं अंतरावर तळ देऊन राहिला.

दादासाहेबांची फौज मिरजेस वेढा घालणार व बहुत दिवस युद्ध चालणार हें समजून गोविंद हरीनें किल्ल्यांत धान्य, लांकूड व दारूगोळी वगैरे सर्व सामान भरलें. कर्नाटकी प्यादे व शिलेदार व उत्तम उत्तम बरकंदाज असे लोक किल्ल्याच्या रक्षणार्थ ठेऊन घेतले.

इकडे दादासाहेब व निजामअल्ली यांच्या भेटी होऊन निजामअल्ली परत गेल्या नंतर दादासाहेबांचें लष्कर दक्षिणप्रांतीं यावयास निघालें. मल्हारराव होळकर चांदवडास जाऊन राहिला व रामचंद्रराव जाधव पंढरपूर मंगळवेढें या पटवर्धनांच्या तालुक्यांत येऊन खंडणी घेत फिरूं लागला. विठ्ठलराव विंचूरकर, नारोशंकर, खंडेराव दरेकर सरलष्कर, आबा पुरंदरे, रामचंद्र गणेश वगैरे सरदार व सखारामबापू हे सर्व दादासाहेबांबरोबर होते. खुद्द पेशवे ही स्वारींत होतेच. गेल्यावर्षींची स्वारी पटवर्धनांस मिरज देण्या करितां होती व यंदांची त्यांपासून तो किल्ला घेण्याकरितां होती! मिरज काबीज झाल्यावर हें सारें लष्कर पटवर्धनांच्या सरंजामाचा मुलूख ताब्यांत घेण्या करितां व हैदर अल्लीचें पारिपत्य करण्या करितां कर्नाटकांत जावयाचें होतें.

खरोखर, आपणावर संकट कोठून व केव्हां येणार हें ओळखण्याच्या कामांत त्या काळची रयत फार धूर्त असली पाहिजे! दादासाहेब ज्या दिवशीं रूसून पुण्यांतून निघून गेले त्याच दिवसा पासून धनाढ्य लोकांनीं मिरजेंतून आपलीं माणसें व पैसा लांबविण्याची सुरवात केली! आळेगांवच्या लढाईंतून जखमी होऊन ज्या दिवशीं सायंकाळीं नीलकंठराव मिरजेस आला त्याच रात्रीं ' मिरज फुटली, ' सर्व प्रकारचे लोक वाट फुटेल तिकडे धूम पळत सुटले! तीन रात्रींत व दोन दिवसांत सारें मिरज शहर खलास होऊन गेलें.

नं० १०५

(१७ नोवेंबर)

श्रीगणपतिर्जयति.

चिरंजीव राजश्री रावसाहेब[1] यांस प्रति गोविंद हरी. आशीर्वाद उपरी येथील कुशल तागायत मार्गशीर्ष शु० २ बुधवार प्रातःकाल. यथास्थित असे. विशेष. घोडनदीतीरचे मुक्कामचें सोमवारचें पत्र रविवारीं युद्ध जालियाचें पाठविलें तें पावलें. तों कालीं मंगळवारीं अस्तमानीं अकस्मात् चिरंजीव नीलकंठराऊ जखमी आले त्यावरून सविस्तर कळलें. ईश्वरें युद्धप्रसंगीं मोठी खैर केली. थोर लाभ हाच जाहला. वरकड होणें जाणें ईश्वरसत्तेनें होईल. कोणेविशींची फिकीर न करावी. प्रस्तुत तुम्हीं कोठें आहां, बुनगें तुम्हांस मिळालें किंवा पुढें आहे, अंतर किती आहे, हें सविस्तर लिहिलें पाहिजे. चातकन्यायें मार्ग पाहतों. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे आशीर्वाद.

नं० १०६

[अजमासें मार्गशीर्ष शुद्ध.
नोवेंबरचा दुसरा पंधरवडा]

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी. तुम्हीं पत्रीं लिहिलें कीं " येथील[2] विचार एक प्रकारचा जाहला यास्तव येथें[3] मनुष्यें ठेवावयाचा मनसुबा ध्यानास न ये. यास्तव तिन्ही वाडियांतील मनुष्यें डेरियास आणिलीं. दोन चार दिवसांत कोणे प्रकारें येथील प्रसंग होतो तो पाहून रवाना करितों. " म्हणोन लिहिलें तें कळलें. रवाना करावीं हें तो खरें. परंतु लौकिक होईल कीं मनुष्यें पु-

१ गोपाळरावास कुटुंबांतील व पदरचीं माणसें ' रावसाहेव ' ह्मणत. २ पत्र गोविंद हरीनें गोपाळरावास मिरजेहून लिहिलें. गोपाळरावाचा मुक्काम पुण्याच्या आसपास असावा. ३ पेंढ्यांच्या दरबारच्या मसलतीस भलतेंच स्वरूप आलें. ४ पुण्यांत. ५ पटवर्धनांच्या कुटुंबांतील माणसें.

ण्याहून झाडून गेलीं. तस्मात् जाण्याचा प्रकार केला. ऐसा लौकिक होईल. 'मिरज बळाऊन राहतील' (असें लोक) म्हणतील. आपल्या मनांत संशय नाहीं. मिरजेंत वसोन धण्यासीं झुजावयाची हिम्मत धरीत नाहीं. रहावयास[1] स्थळ दिलें तेथें राहणार. लोक काय दर्शवितील न कळे! पुर्तें बिघडलेंसें झालें तरी रवानगी करावी. केली असली तर उत्तमच झालें. काय चिंता आहे? वेदमूर्ति नरहरिभट जमदग्नी यांणीं सांगितलें कीं, चतुर्दशप्रणव महामृत्युंजय जप चव्वीस सहस्र करावा. एक म्हैसी दान करावें. हरिश्चंद्राख्यान श्रवण करावें. त्यास 'कुरुंदवाडीं अनुष्ठान चालत आहे त्यांत आणखी ब्राम्हण लावून चतुर्दशप्रणव महामृत्युंजय जप करणें' म्हणोन वेदमूर्ति रामचंद्रभट उपाध्यांस लिहिलें आहे म्हैसदान तुम्हीं करणें व श्रवण आख्यान तुम्हींच करणें. वरकड अनुष्ठान चालत आहे. कांहीं चिंता न करणें. श्रीनें जे कालीं जें निर्मिलें असेल तें घडोन येईल. सावधपणें राहणें. वरचेवर वर्तमान लिहीत जाणें. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे. हे आशीर्वाद.

नं० १०७

(अजमासें मार्गशीर्ष शुद्ध
नोवेंबरचा दुसरा पंधरवडा)

श्रीगणराज.

चिरंजीव विजयीभव राजश्री मोरोबा आबा यांसीं त्रिंबक हरी. आशीर्वाद उपरी. तुम्हीं स्वस्तिक्षेम आलां, येणें करून बहुत संतोष जाला. रक्षिणार

---

१ सर्व. २ पेशवे सरकारांतून आह्मांस मिरज फक्त रहावयास मिळाली आहे. सोडा ह्मणतील तर सोडिली पाहिजे, असा लिहिण्याचा अभिप्राय. ३ रामचंद्र दीक्षित वाटवे हे पटवर्धनांचे उपाध्ये. हे विद्वान् व धार्मिक होते. पटवर्धनांचें सर्व घराणें यांस पूज्य मानीत होतें. ४ मोरो बल्लाळ पटवर्धनांच्या व इतर कांहीं फौजेसह पेशव्यांच्या लष्करांतून साताऱ्याकडे आला होता व त्यानें गमाजी बावास मिळवून घेऊन दोघानीं मिळून साताऱ्यास दादासाहेबांकडील कांहीं फौज आली होती तिचा पराजय करावा अशी मसलत ठरली होती. (चवथ्या अंकांतील नं० ८८ चें पत्र पहा.)

या कल्पांतांत ईश्वर आहे. तुम्हीं व राजश्री गमाजीबावा एकत्र होतां. हे मनसबा करितात हा प्रतिनिधी भोंवता करितात. या करितां त्यांणीं सावध होऊन असावें या करितां त्यांकडेस विश्वासू शाहणे (माणसा) बरोबर सांगून पाठवून ते सावध करावे. जाधवराऊ (व) मोंगलअल्ली हे

पेशव्यांचा पराजय होऊन ते दादासाहेबांच्या स्वाधीन झाले व गोपाळराव पटवर्धन मिरज प्रांतीं निघून आला तेव्हां अर्थातच ही मसलत सिद्धीस गेली नाहीं. मोरोबा व गमाजी बावा कांहीं दिवस एकत्र राहिल्यावर मोरोबा मिरजेस येऊं लागला तेव्हां वाटेंत त्यास धरण्याची दादासाहेब व सखारामबापू यांकडून कांहीं खटपट झाली असावी असें पुढील नं० १०८ च्या पत्रांतील एका वाक्यावरून दिसतें.

१ पटवर्धनांवर या वेळीं चोंहोंकडून जें संकटाचें काहूर उठलें होतें त्यांत. २ गमाजी बावा हा भवानराव प्रतिनिधीचा मुतालीक. ३ दादासाहेब व सखाराम बापू. ४ प्रतिनिधीची जहागीर घेऊन ती नारो शंकरास द्यावयाचा मनसबा. ५ प्रतिनिधी व त्याचा मुतालीक याणीं. ६ मोंगलअल्ली हा निजामअल्लीचा भाऊ व निजामउल्मुलुख याचा सर्वांत धाकटा मुलगा. सलाबतजंग, निजामअल्ली, बसालतजंग व मोंगलअल्ली यांत नानासाहेब पेशव्यांच्या मध्यस्थीनें वांटण्या झाल्या त्यावेळीं असें ठरलें होतें कीं, सलाबतजंग याजकडे राज्याची मालकी, निजामअल्लीकडे त्याची दिवाणगिरी, बसालतजंगाकडे अदवानी संस्थान व मोंगलअल्लीकडे विजापुर कर्नाटकचा सुभा या प्रमाणें असावें. पुढें सारें राज्य आपणच बळकावून बसावें अशी निजामअल्लीस वासना झाली. आपल्या भावांचा पक्ष स्वीकारून नानासाहेब पेशवे कदाचित् आपणास अडथळा करितील ह्मणून त्यानें त्यांस मोंगलअल्लीचा हिस्सा देऊन टाकिला! नंतर त्यानें सलाबतजंगास कैद करून साऱ्या मोंगलाईचा मुख्य अधिकार आपणाकडे घेतला. त्या दिवसा पासून बसालतजंग व मोंगलअल्ली यांचें व निजामअल्लीचें वांकडें पडलें. पेशव्यांचें भय निजामअल्लीस होतें यामुळें मात्र त्यानें त्या दोघांचा नाश केला नाहीं इतकेंच. आदल्यावर्षी व मराठ्यांची मोंगलांची लढाई झाली तींत मोंगलअल्ली व रामचंद्र राव जाधव हे निजामअल्लीस दगा देऊन पेशव्यांकडे पळून आले होते ही गोष्ट वाचकांच्या स्मरणांतून गेली नसेलच. आतां निजामअल्लीनें दादासाहेबांचें चित्त आपणाकडे पूर्णपणें मिळवून घेतलें व पुतण्यास कावीज करण्याचे कामीं त्यांस मदत केली तेव्हां आतां बसालतजंग व मोंगलअल्ली यांस आजपर्यंत पेशव्यांचा आधार होता तो तुटल्या सारखा झाला. जाधवावर आदल्या वर्षा पासून निजामअल्लीचा राग होताच. शिवाय अलीकडे दादासाहेब व सखाराम बापू यांशीं त्याचें नीटसें पटत नव्हतें. दादा

विना बसालतजंगास मिळाले वाचून त्यांचा अतःपर परिणाम नाहीं. या करितां त्यांणीं तें राजकारण करावें. त्रिवर्ग एक जागां भारी जाहले आणि विजापुरा पावेतों नदी पैलेकडून आले म्हणजे निजामअल्लीस शह बसतो हा मनसबा जाहला (तर) मोंगलास पायबंद बसतो. वरकड बहुत शहाणपणें चौकशीनें रहावें. हें आम्हांस सुचलें आहे या तरतुदेस आले विचारास करणें तरी करावें. वर्तमान ऐकिलें कीं राजश्री रघुनाथपंत तांब्राकडे गेले. तेव्हां श्रीमंत राजश्री माधवराव कोठें आहेत ? वरकड राजश्री बाबूजी नाईक वगैरे कोणी कोठें आहेत ? हे तुम्हीं लष्करास गेलेवर तरतूद करणें. बहुत सावधपणें सर्वांविशीं राहत जाणें. राजश्री गोविंदपंत करवीराहून आले आहेत हे ही सांगतील वर्तमान तें मनास आणणें. चिरंजीव राजश्री नानां व चिरंजीव नीलकंठराव सारे मिळोन मनसबा करून लष्करास जाऊन सविस्तर चिरंजीव राजश्री दादा व चिरंजीव राजश्री नारायणराऊ सारे मिळोन जें करणें तें करावें. ' मंगळवेढेंची बंदोबस्ती असों देणें ' म्हणोन चिरंजीव राजश्री पुरुषोत्तमराऊ यांस लिहावें. बहुत काय लिहिणें. इकडील सविस्तर राजश्री गोविंदपंत सांगतां कळों येईल. हे आशीर्वाद.

साहेब व निजामअल्ली दोघे ही मिरजेस वेढा घालण्या करितां येणार अशा त्यावेळीं अफवा उठूं लागल्या होत्या. त्यावरून हें लिहिणार त्रिंबक हरी याच्या मनांत असें राजकारण घोळूं लागलें होतें कीं, आपण सारे पटवर्धन, भवानराव प्रतिनिधि, कोल्हापूरकर राजमंडळ, बसालतजंग, मोंगलअल्ली व रामचंद्रराव जाधव, या सर्वांचें एक कूट होऊन त्यानें निजामअल्ली व दादासाहेब या दोघाशीं ही सामना करावा.

१ कृष्णे पलीकडून. बागलकोट तालिकोटच्या रस्त्यानें. २ दादासाहेब. ३ मोंगलाकडे. ४ ही तरतूद आह्मीं सुचविलेल्या कारस्थानाची. ५ लष्करास गोपाळ रावाच्या. ६ हें एका कारकुनाचें नांव. ७ गोविंद हरी. ८ नीलकंठराव हा त्रिंबक हरी चा मुलगा. हा आळेगांवच्या लढाईत जखमी होऊन मिरजेंत येऊन राहिला होता. ९ गोपाळराव. पुढें प्रसिद्धीस आलेले सरदार; वामनराव, परशुरामभाऊ व कोन्हेरराव यांस अजून या पटवर्धनांच्या ' कौन्सिलां'त मत देण्याचा अधिकार आला नव्हता !

नं० १०८

(अजमासें मार्गशीर्षशुद्ध
नोवेंबरचा दुसरा पंधरवडा)

श्रीभवानीप्रसन्न.

विनंती[1] उपरी. आपण गेलिया तागायत वर्तमान कळत नाहीं. तरी सविस्तर लिहिणें. लष्करेनें[2] आमचें कारकुनाचें लिहिलें आलें जें, " मिरजेवरी नारो शंकर व विठ्ठल शिवदेव व बर्वे[3] तोफखाना देऊन रवाना केले. आपण[4] मोंगलाचे भेटीस जाणार. " ऐसें वर्तमान आलें आहे. आपणास सूचना कळावी याज कारितां लिहिलें आहे. आपण वचन दिलें होतें त्या प्रमाणें सनदा ताकिदी [तयार] करून विठ्ठल मल्हार याज पाशीं द्याव्या. कळलें पाहिजे. बहुत काय लिहिणें. लोभ कीजे. वरकड कागदपत्र पाठविले ते आम्हीं विठोबाबरोबर पाठवूं. ते आपणास निवेदन करितील. तुम्हीं ही जाबसाल त्याज पाशीं देत जावे. बहुत काय लिहिणें. लोभ केला पाहिजे हे विनंती.

नं० १०९

(अजमासें मार्गशीर्ष शुद्ध.
नोवेंबरचा दुसरा पंधरवडा.)

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी. लोक मागून राहिलेले आतां येतील. आले असतील. येतात. त्यांजकडून अंतर[5] पडलें खरें; परंतु हा प्रसंग बोलावयाचा नव्हे. क्षमा धरावी. त्यांणीं तो लबाडी केली खरी. तथापि मानमार्ग पहावा लागतो. सुचना लिहिली आहे. उतराजी गोडसे याणीं जाणून लबाडी करून

---

१ हें भवानराव प्रतिनिधीचा मुतालीक गमाजी बावा याचें मोरो बल्लाळ यांस पत्र. २ दादासाहेबांच्या लष्करांतून. ३ बर्वे लक्ष्मणपंत. ४ स्वतः दादासाहेब. ५ चूक झाली.

राहिले. प्रसंगास न आले. फार दूर ही नव्हते. गमाजीपंताचे मागें फिरत होते. परंतु चिरंजीव आवास आणावया गेले यामुळें चिरंजीव शावुतीनें आला, हाच लाभ जाणोन–कर्तृत्वाचे अगर प्रामाणीक कळोन गेले–तथापि क्षमा धरावी. न्यून पूर्ण कांहीं न बोलावें. मिष्ट भाषण करावें. हे दिवस फार कठीण आहेत. पुढें प्रसंग कोणे रीतीचा पडतो न कळे! सर्वांसीं गोडी गोष्टी बोलोन सर्वांसीं संतोषें रहावें. राग सोडावा. युद्धीं [तुम्हांवर] प्रसंग पडला, निदान जातीवर सोसून निघालां, व फितुरामुळें मोड जाहला, तरी ये गोष्टीचें दूषण तुम्हांवरी नाहीं. सारे सरदार उगेच न झुंजतां पळाले. तुम्हीं झुंजोन टक्कर देऊन 'सारे पळाले तरी गोपाळराऊ शर्त करून निघाला' हे कीर्ति जालीच आहे. धण्याचाच मोड जाहला तरी तुम्हांवरी अपेशाचा मजकूर नाहीं. समाधान मानून राहणें. दिलगीर न राहणें. हिम्मत धरणें. हे आशीर्वाद.

नं० ११०

(अजमासें मार्गशीर्ष शुद्ध
नोवेंबरचा दुसरा पंधरवडा.)

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी. राजश्री विसाजी नारायण याणीं तीर्थरूपांसं[2] पत्र लिहिलें तें त्याणीं येथें पाठविलें. वाचून पाहिलें. आणि तुम्हांकडे पाठविलें आहे. याचा कयास करून पाहणें, आणि उत्तर जें लिहिणें तें लिहून परस्पर त्यांकडे पाठवणें, आणि काय लिहिलें तें आम्हांस लिहिणें; त्या प्रमाणें तीर्थरूप उत्तर देतील. आमच्या मतें त्यांणीं भय घालून लिहिलें आहे.

---

१ गमाजी बावा हे भवानराव प्रतिनिधींचे मुतालीक. २ विसाजी नारायण हा इचलकरंजीकरांचा कारभारी त्यांचेंच पथक घेऊन दादासाहेबांच्या स्वारी बराबर हिंडत होता. याच्या द्वारेंच दादासाहेबानीं आपलें मनोगत पटवर्धनांस लिहून कळविलें होतेंसें वरील पत्रावरून दिसतें. ३ त्रिंबक हरीस. ४ दादासाहेबानीं.

सर्व त्यांचे कार्यभागीं यांचें राज्य ! लिहिलें त्यांत स्थळें माव द्यावें. वरकड विवेकाचा प्रसंग नाहीं. कोणी नजरेंत नाहीं असें (त्यानीं) लिहिलें. तेव्हां ते आमचे नजरेंत कोठें आहेत ? हे जिवास उदकच सोडून बसलों आहों ! निदानी किल्ल्यांत कोण लोक तुमचे येणार तें ठीकं करून ठेवणें. (नाहीं तर) आइते वेळीं नाहीं म्हणतील. चिरंजीव भास्करपंत गांवांतील झुंजाच्या कामास पुर्ते खबरदार आहेत. त्याणीं आम्हांजवळी असावें. आम्हांजवळ ते असिले म्हणजे आम्हांस श्रम पडणार नाहींत. चिरंजीव पंढरीनाथ नेणता आहे. वरकड किल्ला आम्हीं आहों. ईश्वर सत्तेनें होणें तें होईल. श्रीपंढरीनाथ आम्हांकडे आहे (ही) तुमची खातरनिशा असो देणें. ये समयीं गांगरल्यानें कांहीं होणें नाहीं. त्याणीं कौवळे सोडून लिहिलें आहे. फौजा तोफा आठा दिवसां येणार त्या आज येऊत; परंतु घाबरेपण करीत नाहीं. ईश्वरें नेमिलें असेल तें भविष्य होईल. आजीपर्यंत श्रीनें लज्जा रक्षिली. पुढें या कालीं ही रक्षील या प्रमाणें भरंवसा आहे. चिंता न करावी. सावध राहवें. बातमी राखावी. लोकांसीं समाधानें बोलावें. समाधानें रहावें. मुख्य, श्रीनें तुम्हांस यश दिलें, फितुरियांस अपेश दिलें. ये विसींचें मनांत तुम्हीं कांहीं न करणें. धण्यासीं एकनिष्ठ सेवा केली, धण्याहुंजूर दादासाहेबांसीं झुंजलां, येथें झुंजलों म्हणोन अंतर काय ? आम्हांकडे तिलमात्र दोष नाहीं. कळलें पाहिजे. हे आशीर्वाद.

---

१ दादासाहेबांचे कारभारी सखारामबापू यांचें. २ पत्रांत मिरज हवालीं करण्याविषयीं माव दादासाहेबानीं लिहिलें परंतु आमचे कर्जाचा निकाल करण्या विषयींचा मजकूर त्यांत कांहीं नाहीं, असा लिहिण्याचा अभिप्राय. ३ कायम. नंबर १०७ व १०८ हीं पत्रें गोविंद हरीनें गोपाळरावास लिहिलेलीं. ४ पांडुरंगराव तात्या गोविंद हरीचा तिसरा मुलगा. ५ भय दाखवून. ६ पेशव्यां समक्ष.

श.१६८४ **मिरज झुजविण्याची तयारी** इ.स.१७६२

नं० १११

(अजमासें मार्गशीर्ष शुद्ध
नोवेंबरचा दुसरा पंधरवडा.)

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी. तुम्हीं अण्णाजीपंता बरोबर पत्र पाठविलें तें पावलें. आजी भृगुवारीं पावलें. लिहिलें वर्तमान कळलें. 'हत्तीस रतीब मिळत नाहीं. मिरजेचे वाणी दुकानें सुद्धां पाठवणें' म्हणोन लिहिलें, ऐशास जे दिवशीं चिरंजीव नीलकंठराऊ येथें आले ते दिवशीं मंगळवारीं रात्रीं मिरज तमाम पळाली. घरोघर एक एक माणूस आहे. हे अवस्था जाली. मंगळवार रात्र, बुधवार दिवस रात्र, व काली गुरुवार दिवस रात्रीमध्यें झाडून गेलीं. घरास माणूस मात्र रखवालीस आहे. जधीं पासून दादासाहेब पुण्याहून गेले तधीं पासून पळ सुटला आहे. चिरगुटपांघरूण कांहीं पहिल्या पासून (आम्हांजवळ शिलक) नाहीं. जोट एकंदर नाहीं. मुंडासें नाहीं. सनंग आणविणें तरी श्रीक्षेत्रीकडून आणवावें. खसखसी शेले बापूचीं दोन गांठोडीं अमृतरायानीं आणिलीं त्यांत एक आंखें शेले खसखसी आहेत. या खेरीज सनंग नाहीं. राजश्री विसाजीपंताची चिट्ठी पाहिली. वर्तमान कळलें. त्यांच्यानें कांहीं होणें नाहीं. बकवा मात्र आइकाव्या! यद्यपि ओले तरी वरीस भर दीड वरीस बल्के खातरेस आणीत नाहीं. मिरजेचा किल्ला व आम्हीं जिवंत आहों तों फिकीर न करावी. श्रीपंढरीनाथ आम्हाकडे आहे. आम्हीं कोणास खातरेस आणीत नाहीं. त्यांचे त्यासच [संकट] येऊन पडेल. मोगल भारी. हे थोडे. हेच मोगलाच्या संकटांत पडतात. त्वरेनें उलगडून त्याची फौज लोंविली तरीच यांची स्थीत राहील. नाहीं तर फसलेच जाणावें. मुख्याचें ज्ञान कळलेंच आहे. कार्यभागी

१ पत्र गोविंद हरीचें गोपळरावास. २ पंढरपुराहून. पंढरपूर ही त्यावेळीं कापडाची मोठी पेठ होती. ३ दादासाहेबांच्या हातून. ४ दादासाहेब फौज घेऊन आले तरी. ५ लावून दिली तर.

आकाशास हात लावितील कीं काय, तो ही परिणाम आठ पंधरा दिवसां महिन्यांत आइकाल. कित्येक बोलणें चालणें चिरंजीव आबासीं बोलिलें आहें. हे सांगतील तें सर्व आइकणें. करणें तें विचारें करणें. प्रसंग मोठमोठयांस पडले आहेत. तुम्हीं नवे लोक जे येतील ते ठेवीत जाणें. आवई पडूं देणें. ज्याचे पदरीं फौज त्याची पृथ्वी. त्याणीं कांहीं कजिया केला तरी तमाम मुलूख आमचा आहे. खातरजमा असों देणें. करवीरास कारकून पाठवणें राजकारणास्तव गुप्त मार्गे, व यवनाकडील राजकारण सां[1]गितलें व आणखी ही कित्येक गोष्टी. श्रीमंत राजश्रीकडे हरकोणी पाठवावा. राजश्री चित्रगुप्त[2] व मामा यांजकडे समाधानाचीं पत्रें पाठवीत जाणें. खुलासिया[3]नें असत जावें. चिंता तिलमात्र न करावी. हे आशीर्वाद.

नं० ११२

[मार्गशीर्ष शुद्ध चतुर्थी
१७ नोवेंबर.]

श्रीगणराज.

श्रियासह चिरंजीव राजश्री गोपाळराव यांस प्रती त्रिंबक हरी. आशीर्वाद उपरी येथील वर्तमान तागायत छ० २ जमादिलावल भृगुवार पर्यंत यथास्थित असे विशेष. अलीकडे पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. सविस्तर लिहीत जाणें. तुम्हीं लष्कर सुध्धां तासगांवचे[4] सुमारें आलां म्हणोन चिरंजीव राजश्री नाना[5]नीं लिहून पाठविलें त्यावरून कळलें. बरें! होणार ती गोष्ट जाहली. मुख्य गोष्ट तुम्हीं स्वामिकार्यावर कस्त मेहनत केली. ईश्वरें यश न दिलें. तुम्हीं सर्व मंडळी क्षेम राहिलां हाच एक लाभ जाहला. याज उपरी चहूंकडील राजकारण राखून हिम्मत धरून मनसबा करणें तो केलियानें परिणाम आहे. आणि श्रीमंत मातु[6]श्रीस पुण्यास लिहून पाठवणें

१ माधवराव पेशव्यांकडे. २ बाबूराव फडणीस. ३ आनंदी मनानें. ४ तासगांव हें मिरजे पासून सहा कोसांवर आहे. ५ गोविंदपंत नाना [गोविंद हरी.] ६ गोपिकाबाईस.

कीं, " आपण वचन दिलें व क्रिया प्रमाण दिली त्या प्रमाणें स्वामिसेवेवर एकनिष्ठपणें सादर होतों. असें असतां विश्वासघात करणारानीं केला होता परंतु श्रीमंतांचे पुण्यें करून आम्हीं आजीचे प्रसंगीं वांचलों. पुढें ही श्रीमंतांचें पुण्य समर्थ आहे. कोणे गोष्टीची चिंता आहे असें नाहीं. श्रीमंतांनीं[1] आम्हांवर फौज पाठवावी, मिरजेस कजिया करावा, ऐसें योजिलें आहे, त्यासीं आजी पर्यंत आम्हांस मिरजच होती कीं काय ? [आपली] कृपा होती तों सर्व ही होतें, मिरजेचा अभाव सर्वांस आहे; परंतु आम्हांस अगाध[2] आहे असें नाहीं. आमचे कर्जवामाची बाट जाहालियानें मिरज ही आपणा पासींच आहे. आम्हीं आजीवर बेइमानी कोणासीं केली नाहीं. पुढें ही करणें नाहीं, हाच निश्चय आपले पायांसीं आहे. " असें त्यांस लिहून पाठविणें. बातमी राखणें. सावधपणें जें करणें तें करावें. श्रीमंतांनीं फौज रवाना केली तरी त्यांसीं कोण भीतो ! कांहीं फिकीर न करणें. बातमी फौजेची मात्र राखणें. तोंवर तुमची ही फौज जमा होती. आम्हीं ही फौजेंत येतों. आतां हिम्मत धरणें हें अगत्य. तुम्ही शाबूत तर दिनदुनयेचें भय नाहीं. कळलें पाहिजे. राजश्री जाधवराव कोठें आहेत ? तें राजकारण करून ते व आपण एक व्हावें. मोगलअल्ली हा कोठें आहे ? तेथें ही पत्रें पाठवावीं. बसालतजंग यांत व निजामअल्लींत (मन) शुद्ध नाहीं. ये समयीं ते व मोगलअल्ली व जाधवराऊ सारे एक व्हावें आणि ते ही सगरचे सरदेनें तालिकोट सुमारें यावे. तालिकोट ही हस्तगत त्यांकडे असला ह्मणजे राजकारण बळावेल,—होईल. असें राजकारण यथामती करून सुचलें तें लिहिलें. तुम्हीं घोडेस्वारीं उडी टाकितां हें काम घर बुडवें! आधीं शंभर जण उडी टाकितील, मग तुम्हीं उडी टाकणें. हें बरें नव्हे

---

१ दादासाहेबानीं. २ मिरज सोडून देणें आह्मांस कठीण आहे असें नाहीं. ३ आपले लोकानीं पळून जाऊं नये ह्मणून लढाईच्या आवेशांत गोपाळराव घोड्यावरून उडी टाकून रणांगणांत उभा राही व त्या प्रमाणें आळेगांवच्या लढाईंत त्यानें घोड्यावरून उडी टाकिली होती त्याविषयीं त्रिंबक हरी निषेध करितो.

या करितां लिहिलें आहे. बहुत काय लिहिणें. हे आशीर्वाद.

नं० ११३

[मार्गशीर्ष शुद्ध.
नोवेंबरचा दुसरा पंधरवडा]

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी. कुरुंदवाडाहून काली तीर्थरूपांचीं पत्रें आलीं व राजश्री गोपाळपंत फडके आले. तेच करवीराहून आले. सर्व गोष्टी त्याणीं सांगितल्या. निदानीं[1] स्थल रहावया एक द्यावें हे मात्र बोली त्यांस सांगितली नव्हती. अगोदर रवाना केले होते. प्रस्तुत हे ही गोष्टी सांगितली. तुमचें पत्र श्रीमंत करवीरवासी यांस पाहिजे म्हणजे त्यांची खातरजमा होईल; यास्तव पत्र त्याहावें कीं " आम्हीं एकनिष्ठ सेवक प्रधानपंतांचे परंतु साहेबांसी[2] करार आमचा ऐसाजे आमचा व धण्याचा पूर्ववत सलूख झाला तरी आम्हीं साहेबांच्या पायांपासीं अंतर करणार नाहीं. धण्यांचें व साहेबांचें ही मनापासून सख्य करूं. त्या प्रमाणें निभावणी करूं. कदाचित् धण्यानीं अविवेक केला तरी आम्हीं बेइमानी हरामखोरी करणार नाहीं. परंतु कर्जदार जाहलों, [त्यानीं] आमच्या कर्जाची वाट करावी——त्यांचें स्थल त्यांस देऊन निखालसपणें साहेबांची सेवा करूं. अगर साहेबांच्या राज्यांत एखादें खेडें मागोन घेऊन सुखरूप राहूं. साहेबीं मेहेरबानी केली तरी चाकरी करून दाखऊं. सर्व गोष्टीस हाजीर आहों. निदान प्रसंग जाहलिया मुलेंमाणसें कोणें स्थलीं ठेवावीं? आम्हीं साहेबांच्या कश्यपीं लागलों म्हणजे आम्हांमुळें मातबर[4] द्वेष पडेल तो सोसिला पाहिजे. ये विशींचें दृढीकरण चित्ताचे ठाईं करून उत्तर पाठवावें. सविस्तर मशारनिल्हे सांग-

१ गोविंद हरीचें हें गोपाळरावास पत्र. २ प्रसंग पडल्यास. ३ सातारचे व कोल्हापुरचे महाराज यांच्या कुटुंबांतील पुरुष असोत अगर स्त्रिया असोत, त्यांस उद्देशून त्याहावयाचें झाल्यास ' साहेब ' हा शब्द लावण्यांत येत असे. ४ मातबर द्वेष पेशव्यांसीं पडेल.

तील. तीर्थरूपांनीं साहेबांस पूर्वीच विनंती केली आहे. आम्हीं ही तीर्थरूपांस लिहिलें आहे. ते ही विनंती लिहितील. दुसरा अर्थ नाहीं." ऐसें पत्र लिहावें. आपले मतें 'इतकें पत्रीं लिहूं नये, जबानीवर व तीर्थरूपांच्या लिहिल्यावरच घालवावें, ऐसें जाहलिया तैसेंच आपल्या व चिरंजीव नारायणराऊ (व) आबा यांच्या मतें होईल तसें ल्याहावें. उत्तर टाकोटाक डांकेच्या स्वांराबरोबर पाठवावें. झणजे मैशारनिल्हेची रवानगी कुरुंदवाडास करूं. तेथून परवां प्रातःकाळीं करवीरास जातील. तुमचें उत्तर आलें झणजे रविवारीं कुरुंदवाडास लाऊन देऊं. दीर्घसूत्री करतां नये. चिरंजिव आबाचे विचारें राजकारण आहे तें ही उत्तमच आहे. हें ही करून पहावें. तें ही तोडूं नये, हें ही तोडूं नये. यांत सर्वांच्या विचारें येईल तें करणें. रामचंद्र जाधवराऊ याजकडे एक पत्र पाठवावें. त्याचा मजकूर चित्तांतील कळेल. आपलें काय गेलें ? एक जोडी[४] जाऊन येईल. करवीरच्या राजकारणाचें दृढीकरण जाहलें झणजे यजमानांस वर्हमा पडेल कीं यैंस भारी आसरा जाहला. असा प्रकार होतो. यास्तव पत्र त्वरेनें पाठवणें. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

रवाना मंदवार दोन प्रहर.
पै॥ छ० ३ जमादिलावल.

नं० ११४

(अजमासें मार्गशीर्ष शुद्ध.
नोवेंबरचा दुसरा पंधरवडा.)

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी. गांवांत गडबड करून दाणा किल्ल्यांत भरावा असें

१ या पत्राच्या प्रारंभीं ज्याचें नांव आलें आहे तो गोपाळपंत फडके. २ मसलत लांवणीवर टाकून उपयोगीं नाहीं. ३ मोरोबा आबाचें राजकारण हें बहुधा प्रतिनिधीचा मुतालीक गमाजी; बाबा याशीं चाललेलें असावें. ४ जोडी जासुदांची. ५ पेशवे व दादासाहेब यांस. ६ भय. ७ पटवर्धनांस. ८ हें पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास.

तुम्हांपाशीं लोक सांगतात; परंतु एकाएकीं उतावळी करूं नये. केल्यानें प्रांत अगदीं हातचा जातो. बाजार मांडेल. कोणी येणार नाहींत. कैद तुटेल. फिरोन शहरची वस्ती होणार नाहीं. बेबंद होईल. यास्तव सबुरीनें करावें लागतें. गांवांत धान्य पुष्कळ आहे. फौजे[1] वीस कोसीं तीस कोसीं आली, खामखां येतात, असाच प्रसंग होईल तेव्हां " दाणा माफ. ज्यास पुरवेल त्याणें किल्लयांत जमा करावा. " ह्मणोन सांगितलें ह्मणजे प्यादेच दाणे नेतात. संकट तिलमात्र पडत नाहीं. लांकूडफांटें, कणिंगें, जातीं हा जिन्नस सारा दो चौरोजांत जमा होईल. आजी घाई केल्यानें परगण्यांती * राहील. लौकिक फटकळ होईल. प्रसंगच पडला तर करावया उशीर नाहीं. रोखे[2] पत्रें चालतात. गांवगन्नाचा गल्ला येतो. तुमची तरतूद केली आहे. होतां होईल तें पहावें लागतें. उतावळी एव्हांसी करीत नाहीं. तुम्हांशीं सांगतात त्यांस या प्रमाणें ह्मणावें. हे आशीर्वाद.

नं० ११९

(अजमासें मार्गशीर्षशुद्ध
नोवेंबरचा दुसरा पंधरवडा)

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी. आजी तिसरे प्रहरीं श्रीमंतांकडून जासूद जोडी आली ती तुमच्या लष्कराकडूनच आली. आणखी बातमीच्या जोड्या [तिकडून]

---

१ फौज पेशव्यांची. २ गांवचे पाटील कुळकर्णी वगैरे ग्रामाधिकारी यांजकडे सरकारांतून रोखे पत्रें लिहून जात कीं, अमुक अमुक इतका जिन्नस पाहिजे, हा पाठवून द्यावा. मग गांवकरी तो जिन्नस तितका पाठवून देत व सरकार देण्यांत किंमत वजा घालीत. एखादा जबरदस्त लुटारू पुंड पाळेगार ही फौजेच्या जोरावर गांवकरांकडे अमुक जिन्नस द्या, अमुक पैका द्या, अशा अर्थाच्या रोखे चिठ्या पाठवी, व गांवकऱ्यांची ही छाती रोखेचिठी परत टाकण्याची होत नसे. ते बिचारे निमूटपणें हा भुर्दंड भरून एवढ्यावरच आपण सुटलों यांतच आपणास सुखी समजत ! ३ हें पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास.

तुम्हांकडे रवाना झाल्या आहेत. आम्हांस दोन लाखोटे व तीर्थरूप आपांच्या नांवें दोन या प्रमाणें होते. तीर्थरूपांचे फोडून पाहिले. आमचे वाचून पाहिलें.अर्थ एक ! तुम्हांकडे पाठविले आहेत. (त्यानीं) भय प्रदर्शन केल्यास पुढें दुसरा अर्थ नाहीं. एक गोष्ट. जें होणें तें ऋणानुबंधानसार घडेल ! याचें उत्तर आम्हांस सुचलें आहे. तुमचे सर्वांचे मतें कसें लिहावें तें लिहणें. आमचे मतें लिहावें जे, " आम्ही स्वामिसेवा एकनिष्ठपणें आजी तागायत केली. दोन पक्ष जाले तेव्हां मुख्यांच्या पक्षीं जाहलों. ते[1] स्वामीसीं झुजावया आले तेव्हां त्यांचेच आज्ञेनें झुजलों. पुढें त्यांची व स्वामीची भेट होणार, आम्हीं त्यांकडे जाहलों यामुळें स्वामींची वक्रता (आम्हांवर,) यामुळें मुख्यांस नमस्कार करून आलों. स्वामीनीं लिहिलें कीं ' पळोन गेले ! ' बरें ! खावंद आहां ! कयास करून पहावें. धण्याची अवकृपा दिसलियावरी अब्रूच्या सेवकानें चार पाउलें दूर व्हावें. पुढें स्वामीनीं लिहिलें कीं, " गड, कोट, किल्ले, पागा, ठाणीं हिशेबकितेब द्यावा. तिकडे जाऊन गडबड कराल तरी परिणाम शुद्ध नाहीं. तुम्हीं समजाऊन सांगावें. या राज्यांत राहणेंच तरी वर्तणूक यथास्थित करावी. " ह्मणोन आज्ञा, त्यास आम्हीं कांहीं हरामखोरी केली नाहीं. एका धण्याकडे होतों. स्वामी व धणी एक जाहले. सेवकास समाधान पत्र पाठवून सेवा घ्यावी तें न करतां वक्रतेचें लिहिलें; ऐशास पंचवीस तीस लक्षांस कर्जदार जाहलों, स्वामींची दौलत, ठाणीं स्वामींस सोंपून दिल्हीं तरी तेच समयीं कर्जदार अब्रूवरी उठतील. स्वामीनीं कर्जाची वाट करावी आणि पागा, गड, कोट, किल्ले आज्ञे प्रमाणें स्वाधीन करूं. तें नसतां स्थळ दिलियानें कर्जदार स्थिति राखीत नाहींत. स्वामींचें राज्य समुद्रवलयांकित पृथ्वी, आम्हीं राज्य सोडून कोणीकडे जावें ? श्रीमंत कैलासवासी नानासाहेबांनीं पुण्यांत सेवकांवरी वक्रता धरिली ते समयीं अब्रूसाठीं संकल्प केला होता. आतां

---

१ माधवराव पेशवे. २ दादासाहेबांशीं. ३ गोविंद हरीनें. ४ मागें बाळाजी बाजीराव पेशव्यांचे वेळीं गोविंद हरीचा व त्यांचा कांहीं कामांत वेवनाव होऊन गोविंद

ही तोच प्रकार. भलता एक प्रकार जाहल्या उपरी कर्जदार ही वारले, लोकांचा ही गुंता वारला, हिसेवाचाही वारला ! आम्हांस (स्वामींच्या) पायांविना दुसरें दैवत नाहीं. महाराज धर्मशील पुण्यपरायण आहेत. सारासार विवेक करून अंतर्यामीं पहावें. सेवकाकडून कसें अंतर पडलें ? एका पक्षीं होतों. शेवट धणी व स्वामी एकत्र जाहले आणि सेवकावरी अंतर ठेविलें तरी महाराज समर्थ आहेत ! जें स्वामीस उचित दिसेल तें करावें. एक निष्ठेनें सेवा केली आहे. स्वामी व ईश्वर दोन नाहींत. थोरले कैलासवासी महाराज नानासाहेब यां पासीं सेवा केली त्या तागायत आजी पावेतों सेवा केली. दुसरें दैवत जाणत नाहीं. महाराजांची कीर्ति भूमंडळीं विस्तारली आहे. त्या कीर्तीस लांछन न लागे तें करावें ! आम्हीं तो सर्वस्व अपराधी, परंतु दुसरा पदार्थ जाणत नाहीं. सेवेशीं श्रुत होय." या प्रमाणें लिहावें. तुमचे मतें कसें त्याहावें तें मसुदा करून पाठविणें. चिरंजीव आबास गमाजी बाबाची चिट्ठी आली ती पाठविली आहे. हे आशीर्वाद.

हरीचें पारिपत्य करण्याचा विचार त्यांचे मनांत आला. तेव्हां तो जिवावर उदार होऊन लढून मरून जाण्यास तयार झाला होता, असें त्याच्या वरील लिहिण्यावरून दिसतें. त्याच प्रसंगाची आतां तो दादासाहेबांस आठवण देणार !

१ लढतां लढतां मरण पावलों तर. २ शिलेदारांचा. ३ मरून गेलों तर सावकारांचें व शिलेदारांचे देणें द्यावयास नको व सरकारांत हिशेब ही द्यावयास नकोत ! ४ हें विशेषण दादासाहेबांस लाविलेलें आहे. यावरून पेशव्यांचे सरदार त्यांस ' महाराज ' शब्दानें संबोधीत होते हें उघड होतें. ५ बाळाजी विश्वनाथ उर्फ थोरले नाना साहेब पेशवे.

श.१६८४ **मिरज झुजविण्याची तयारी** इ.स.१७६२

नं० ११६

(मार्गशीर्ष शुद्ध सप्तमी
२२ नोवेंबर.)

श्री.

श्रीमंत राजश्री[1] दादासाहेब
स्वामीचे सेवेशा.

विनंती सेवक गोविंद हरि कृतानेक[2] नमस्कार विनंती. येथील वर्तमान तागायत छ० ९ जमादिलावल स्वामीचे कृपावलोकनानें सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. स्वामीनीं कृपा करून आज्ञा पत्र सादर केलें तें छ० ३ तारखेस पावलें. पत्रीं आज्ञा जें, "गोपाळराऊ याणीं बखेडा करून पळोन गेले. सरकार सरंजाम, गड, कोट, किले, पागा, हिशेब, सरकारचे आज्ञे प्रमाणें जो गृहस्थ रवाना होईल त्याच्या स्वाधीन करावे. मर्जी शिवाय वर्तल्यास कार्यास येणार नाहीं. तुम्हीं त्यांस सांगोन कोंते अंदेशानें न वर्ततां पेशअंदेश पाहून वर्तत ऐसें करणें." ह्मणोन आज्ञा, त्यास चिरंजीवानीं ज्या धण्याचा पक्ष अंगीकार केला त्या पक्षीं एकनिष्ठपणें सेवा केली. स्वामी व ते[3] दोन नव्हेत. परंतु विपरीत भाव आला असतां त्यां समागमें स्वामीसीं झुजले. दहाजण उभे राहिले. बरोबर हे ही राहिले. पुढें स्वामी समर्थ, धर्मपरायण, केवळ ईश्वर स्वरूप, स्वामींचें तेज प्रताप विशेष जाहला. स्वामी पुढें सर्वांचीं तेजें हीन जाहलीं. तथापि जीवोंदारभ्य

---

१ दादासाहेबानीं गोविंद हरीस दरडावून पत्र पाठविलें होतें, त्याचें उत्तर कसें त्याहावें याचा मसुदा गोविंद हरीनें नं० ११३ च्या पत्रांत गोपाळरावास सुचविला आहे. तोच मसुदा सर्वांच्या मतें कायम ठरून त्या प्रमाणें हें नं० ११४ चें पत्र लिहिलें गेलें. याची आह्मांस मळादप्तरांत नक्कल मिळाली. अस्सल पत्र पुण्यास पेशवाईच्या दप्तरांत (असल्यास !) मिळेल. २ या ठिकाणीं 'शिरसाष्टांग' किंवा निदान 'साष्टांग' हा देखील शब्द घातलेला नाहीं. हा चुकून घातला नसेल असें कोणी समजूं नये. हें पत्र ज्या समयीं लिहिलें गेलें तो समय व पत्रांतील भावार्थ ध्यानांत आणिला असतां हा शब्द कां गाळला हें समजून येईल. ३ माधवराव पेशवे. ४ जिवापाड.

श्रम करून युद्धीं कमी केली नाहीं. युद्धप्रसंग[1] होऊन माघारे आलियावर दुसरे दिवशीं उभय पक्षीं करार मदार होऊन श्रीमंत पंतप्रधान यांचा व स्वामींचे भेटीचा करार जाहला. तेव्हां चिरंजीव निघण्याची आज्ञा घेऊन निघोन आले. त्याणीं परराज्यांत जाऊन नाश केला नाहीं. स्वामींचे चिरंजीव आणि स्वामी एक जाहलियावरी सेवक लोकांस गौरवाचें पत्र पाठवून घेऊन जाऊन सेवा ध्यावी; तेथें इतका पेंचपाच क्रूरता दाखवून गड, किल्ले, स्थळें द्यावीं ह्मणोन भय प्रदर्शन करून आज्ञा केली ! त्यास आजी दोन तीन वर्षें नालबंदी पावली नाहीं. पडले प्रसंगीं धण्याची सेवा करावी पुढें कर्ज फिटेल, ह्मणोन जेथ पावेतों कस्त जाहली तेथ पावेतों करून कर्जदार जालों. स्वामींनीं मिरज प्रांत मुकासा गुदस्तां दिल्हा तेव्हां आज्ञा केली जे, तुमच्या कर्जाची वाट करूं तेव्हां मिरज व सरंजाम घेऊं. सेवेकानें कबूल केलें. त्या कर्जाची वाट नाहीं. कर्जदार सरंजामाच्या आधारावरी उगेच आहेत ते सर्व सोंपून सरकारांत दिल्या उपर लागलेच गळां पडणार. अब्रूसीं संबंध. अब्रू गेल्या उपरी लौकिक कोठें राहिला ? एक धण्याची अवकृपा. कर्जदारांचे तगादे. कोणत्या सुखें सेवकानें दिवस घालवावे ? त्या पेक्षां धण्या पुढेंच श्रमाचें सार्थक करावें. मागें दौलत, पागा, गड, किल्ले स्वामीचे स्वामीच घेतील. कर्जदार झक मारीत राहतील. परलोकीं कर्जाचा उपद्रव चुकेल. सर्व गोष्टी यथास्थित होतील. मुलेंमनुष्यें राहतील त्यांचें पालग्रहण स्वामीच करतील. ' इतके अतिशयास कारण काय ' ह्मणोन स्वामी ह्मणतील; तरी आजी तागायत सेवा एकनिष्ठेनें केली. त्यांत किमपि अंतर नाहीं. झुंज भांडण प्रधान पंतांबरोबर स्वामीसीं झुंजलों. तिलमात्र मनांत संशय आणिला नाहीं. दोन अडीचशें घोडे ठार पडले. लोक पडले. घोडीं लोक जायां झाले. चार सोबतां होते ते निघोन गेले, पिराजी नाईक निंबाळकर व सेवेक[2] स्वामीचा (मिळून) निदान पर्यंत कस्त मेहनत केली. चिरंजीव नीलकंठराव यास गोळीची जखम ला-

१ युद्ध प्रसंग आळेगांवचा. २ मी गोविंद हरीनें. ३ गोपाळराव.

गली. चिरंजीव नारायणरायास तरवारेची जखम लागली. चिरंजीव भास्करपंतास डोईंत वार लागला. वरकड चिरंजीव मंडळीनें स्वामींचें अन्न भक्षिलें तितक्यांनीं यथाशक्त्या सेवा केली. पुढें महाराज व चिरंजीव एक जाहले, (तेव्हां) आपले मेहनतीचें सार्थक होईल ह्मणोन फार आशा धरिली होती. जिकडून अमृत यावें तिकडून विषप्रयोग जाहल्या उपरी कोण्या सुखें पुढें जिंदगानी करावी ? स्वामीनींच लौकिकास चढविलें. सेवकांनीं मेहनत करून संपादिला लौकिक अवकृपा जाहली तेव्हां कोठें राहिला ? स्वामी धर्मपरायण भले सारासार सर्व (जाणते आहां) सेवकाची अनास्था केली तेव्हां त्राता कोण ? कोणाचा आश्रय करून पुढें कालाचे दिवस घालवावे ? स्वामीनीं लिहिलें कीं ' या राज्यांत राहणें असेल तर मर्जी रक्षावी; ऐशास समुद्रवलयांकित पृथ्वी स्वामींची असतां अन्यत्र कोण स्थलीं जावें ? ज्यावरी स्वामींची इतराजी त्यास स्थल कोण रहावयास देतो? हा विचार पहावा. सर्व कुटुंबानें जाऊन समुद्रांत जीव द्यावा तरी तेथ पावेतों निभाव होणार नाहीं. महाराजानींच कृपा करून मिरज किल्ला स्वाधीन केला. हा किल्ला हरामखोरी करून दुसरियास देऊन जीव वांचवावा (असा हेतु धरिला नाहीं.) आजी नबाब निजामअल्लीकडे राजकारण केलें तरी ते उपराळा करतील; परंतु जन्माचें लांछन लागून घ्यावें त्या पेक्षां स्वामींच्या फौजा येतील तेव्हां निशाण स्वामींचें व सेवका जवळील ही निशाण स्वामींचें, दोहीं निशाणांपाशीं मनापासून मेहनत करून—फार फौजे पुढें निभाव होणार नाहीं, आधीं कर्ज स्वामींकडे लागलें—ह्मणोन उदक सोडून संकल्प करून युद्धीं वांचलों तरी पुढें स्वामीच कृपा करतील. खर्च जाहलों तरी जन्मवरी अन्न भक्षिलें त्याचें सार्थक होईल, असा चिरंजिवींचा पुरता विचार दिसोन आला. आम्हीं लहानपणा पासून थोरल्या कैलासवासी यांजपासीं सेवा केली. त्या अलीकडे परंपरेनें सेवा करीत आलों. कृपाच करीत गेले. आमचा वग वशिला पायांखेरीज नाहीं. कित्येक

---

१ दादासाहेब. २ कुमक. ३ गोपाळरावाचा. ४ बाळाजी विश्वनाथ पेशवे यांपाशीं.

आमचा द्वेष करीत होते, परंतु धणी जणत होते ह्मणोन निभावलें. आतां महाराज कार्यभागी यांच्याच अनुमतें वर्तों लागलियावर सेवकाचा निभाव कसा होईल ? वृद्धपणीं अवकृपा महाराजांची हें अनुचित आहे. कृपाळू होऊन सेवकावरी व चिरंजीव मंडळीवरी कृपा करून संरक्षण करावें. एखादे शब्दूचे—[२]

नं० ११७

(मार्गशीर्ष शुद्ध अष्टमी
२४ नोवेंबर.)

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी. तीर्थरूप आपांस शहाजी भोंसले यांचें पत्र आलें. तेंच (त्यानीं) बजिन्नस[३] आम्हांकडे पाठविलें तेंच तुम्हांकडे पाठविलें आहे, व तीर्थरूपांचें ही पाठविलें आहे. वाचून दोन्हीं माघारीं पाठवणें. उदाजी चव्हाण ठार जाहला ह्मणोन काली चिरंजीव दाजीनें लिहिलें होतें तें प्रमाणें. होणार तदनुसार घडोन आलें. चांगला लौकिकाचा सरदार होता. ईश्वर सत्तेस उपाय नाहीं. कळावें. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद. आम्हीं साहित्यास[४] अंतर करीत नाहीं. आजी गांवगन्नाचा पुष्कळ गल्ला आला. तूप आलें. सोरमीठ घेतलें. बरकड तरतूद होतच आहे. किल्ल्यांत ठेवावयाचे (लोक) होते परंतु ते लक्ष्मेश्वरीं गुंतले. लिंगोजी जाधव वगैरे मंडळी, गंगाजी सलगर, अर्जुनसिंग, भीमसिंग, असे मायेचे पुरातन—से-

१ कारभारी सखारामबापू. २ पत्राची नक्कल इतकीच अपूरी सांपडली. ३ तेंच. जसें आलें तसें. ४ त्रिंबक हरीचें. ५ उदाजी चव्हाण वारल्याचें काल दाजी नें लिहिलें होतें, आज आपांच्या पत्रांत ही तेंच वर्तमान लिहून आलें, सबब ही बातमी खरीच होय. असा लिहिण्याचा अभिप्राय. ६ किल्ल्यास वेढा बसणार, त्या अर्थी आंत लढाईचें व पोटगीचें सामान पाहिजे त्यास. ७ येथें किल्ल्यांत ठेवण्या सारखे लोक विश्वासू होते ते हल्लीं लक्ष्मेश्वरास अडकून राहिले आहेत, असा अभिप्राय. लक्ष्मेश्वर हा मिरज संस्थाना पैकीं एक तालुका आहे. ८ शेवटीं मिरजेचा किल्ला दादासाहेबांच्या हातीं जाण्यास ही जाधव मंडळीच कारण झाली हें पुढें वाचकांस कळून येईल.

कोजी बारकडा [वगैरे]—असे निवडून त्यां पैकीं नेमून पाठवणें. चिरंजीव भास्करपंतास पाठवीतच आहां. तिनी पतकांतील मायेचे असे पाहून पाठवणें. हे आशीर्वाद.

पै॥ छ० ७ जमादिलावल.

नं० ११८

(मार्गशीर्ष शुद्ध नवमी
२९ नोवेंबर.)

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद[1] उपरी. तुम्हीं येथें भले लोक पाठविणार त्यांत आपल्या सतोषें करून येतील त्यांस मात्र पाठवणें. येथें येण्याविशीं ज्यांचा अनमान असेल त्यांस बलजबरी करून लाऊन न देणें. बळजोरीनें आला तो शिपाई कार्याचा नाहीं. संतोषें येईल त्यासच पाठवावें. कितेक बहुभाषणी आणि हिम्मत आइते समयीं कमी करावयाचे असे असतील ते एकंदर[3] न पाठवणें. बारगीर हो[4], सिलेदार हो, संतोषें येईल तो कार्याचा. खर्चास पाठवणें म्हणोन लिहिलें, त्यास हुकेरी रुपया एकंदर नाहीं. होन उदईक पाठवून देतों. कळलें पाहिजे. हे आशीर्वाद. होन दुर्गी पाठवावे कीं धारवाडी पाठवावे तें डाकेबरोबर लिहावें. त्या प्रमाणें पाठवूं. कळलें पाहिजे. हे आशीर्वाद. जमखिंडीहून दारूगोळी आतां सहा बैल भरून आली कळलें पाहिजे. सहा हजार गोळी, दारू कच्ची खंडी एक येणें प्रमाणें आली. हे आशीर्वाद. चिरंजीव बाळ आजी राहिला असला तर उद्यां मुलाजा न

---

१ हें पत्र गोविंद हरीनें गोपाळरावास लिहिलेलें. २ मराठे शिलेदार. ३ अगदीं. ४ असो. ५ दुर्गी होन कर्नाटकांत चित्रदुर्ग संस्थान होतें तेथें पाडिले जात असत. त्यांची किंमत प्रायः साडेतीन पासून पावणेचार रुपयां पर्यंत बाजार भाव चढता उतरता होई त्या मानानें असे. ६ गंगाधरराव गोविंद उर्फ बाळासाहेब. हा गोविंद हरीचा सर्वांत धाकटा मुलगा यावेळीं बहा बारा वर्षांचा असावा. गोपाळराव लढाईत पराजित होऊन परत आल्यावर या खेपेस मिरजेस आला नाहीं हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. तो लष्कर घेऊन मिरजेपासून तीन चार कोसांवर राहिला होता. घरची

करतां लावोन देणें. पायगोंवा कामाचा नाहीं. उंट आपल्या जवळी असों देणें.

पै॥ छ० ८ जमादिलावल.

नं० ११९

[मार्गशीर्ष शुद्ध दशमी
२६ नोवेंबर.]

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वादें उपरी. चिरंजीव दाजीनीं तुम्हांस पत्रें लिहिलीं आहेत तीं पाठविलीं आहेत. त्यासीं उत्तर पाठवावें कीं, " तुम्हीं एव्हां न येणें. मिरजेस फौजचें आली तरी मग येणें; " ह्मणोन लिहिणें. जाधवरायास पत्रें पाठविणें. कांहीं लटकी आवई आलियाची माणसांस सांगोन पाडावी. त्याणीं (जाऊन त्यास) सांगावें कीं, " इकडे एक मजल आले. येतात. " ह्मणोन सांगावें. (आपण तर) जाऊं नये. कळलें पाहिजे. करकंबेहून

सारीं माणसें व मंगळवेढें व कुरुंदवाद येथील माणसें व आप्त इष्ट व पदरचे लोक सारे लष्करांत येऊन त्यास भेटून परत गेले. गंगाधरराव साऱ्यांत लहान व सर्वांचा लाडका ह्मणून गोपाळरावानें त्यास चार दिवस जवळ राहून घेतलें असावें किंवा तो हट्टानें राहिला असावा.

१ पायगुंतविणारा. लष्करांत वायका, मुलें व ह्मातारीं माणसें असलीं, व अकस्मात् कांहीं भय उत्पन्न झालें तर पळून जावयास अडचण पडल्ये. कारण लष्करी माणूस घोड्यावर बसण्यांत नेहमींचें सराईत असल्यामुळें पंचवीस कोसांची दौड मारणें त्यास अवघड नाहीं. परंतु मुलें माणसें बरोबर असलीं ह्मणजे अशा प्रसंगीं केवढा धोका ! येथें हें सांगितलें पाहिजे कीं, सरदार लोकांच्या वायकांस घोड्यावर चांगलें बसतां येत असे. ती कला त्यांस अवगत असणें त्याकाळीं अवश्यकच होतें. असें जरी होतें तरी शत्रूपासून पांच पन्नास कोसांच्या अंतरावर फौज आली ह्मणजे वायका मागें एखाद्या सुरक्षित स्थळीं बुणगें राहिलेलें असे त्यांत रहात असत. सध्या स्वारींत त्या कधीं बरोबर नसावयाच्या. २ पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास. ३ दाद्रासाहेबांची फौज वेढा घालण्यास आली तर. ४ भीति घालण्या करितां जाधवरावास पत्रें पाठवावयाचीं कीं, तुझें पारिपत्य करण्या करितां आह्मीं निघून येत आहों ! ५ पंढरपुराकडे.

आलेलीं पत्रें माघारीं पाठविलीं आहेत. कळलें पाहिजे. हे आशीर्वाद. बेलदार[1] कामाठी पावले. राऊत वरचेवर (आले ते) पावले. पागेचे बारगीर पावले. कळलें पाहिजे. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

पै॥ छ० ९ जमादिलावल.

नं० १२०

[मार्गशीर्ष शुद्ध. दशमी
२६ नोवेंबर]

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी. तुम्हीं डाके बरोबर पत्र पाठविलें तें पावलें. लिहिलें वर्तमान कळलें. तेथून कूच करून यावें असें सर्वांचे मतें आहे म्हणोन लिहिलें, बहुत उत्तम गोष्ट. आमच्या ही चित्तीं तसेंच आहे. उदईक मंदवारीं--गुंडेवाडी मालगांवच्या दरम्यान ओढ्यावरी पाणी पाहून रहावयास जागा आहे यास्तव--विनीघाले पाठवून द्यावे. परवां रविवारीं कूच करून तेथें यावें. जवळ ही पडेल. चिंचणीकर चौगुले यांस वसगडेंकर कुलकर्णी मल्हारपंत जिमा झाला आहे, त्यास पाटील येथें आला आहे. कुलकर्णी चौगुला येत नाहीं. जमा वसुलाचें काम तटलें आहे. हजार दीड हजार बाकी त्याजकडे आहे. दगाबाजी करून फिरतो. गांवची लावणी संचणी त्याचे हातची आहे. यास्तव त्यास बरोबर माणसें देऊन लाऊन देणें. जासूदा बरोबर होन दोन हजार पाठविले आहेत. आणखी हजार रविवारीं पाठवूं. चिरंजीव यामनरायाचा मजकूर लिहिला, त्यास पुढील आदितवार ही समीपच आहे यास्तव ठेऊन घेतला. वरकड मुलांमाणसांचा मजकूर लिहिला तो ही प्रमाण आहे. श्रीकृपेनें सर्व ही चित्तानुरूप घडोन येईल. तूर्त कांहीं संकट पडतच नाहीं. तथापि सावधतेस अंतर नाहीं. मंगळवेढ्याहून दारूगोळी, तूप, तेल आलें. जमाखिंडीचें आलें. मनोळीकडील आजी तेल,

१ वेलदार व कामाठी किल्ल्याच्या दुरस्ती करितां.

तूप. दारूगोळी रवाना करितों." ह्मणोन पत्रें आलीं. तीर्थरूप आपा आजी प्रातःकाळीं आले. चिरंजीव नारायणराऊ व भास्करपंत व तीर्थरूप आपा बंदोबस्ती करितात. तीर्थरूप दादा मंगळवेढ्याहून काली रात्रौं आले आजी किल्ल्यांत आले. कळलें पाहिजे. तरतुदीस अंतर नाहीं. चिरंजीव बाळ सुखरूप पावला. लौकर पावला. अल्लीमहमद ढालाईत पाठवून देणें. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

पै॥ छ० ९ जमादिलावल शुक्रवार दीड प्रहर रात्रौं (हें पत्र) आलें.

नं० १२१ (मार्गशीर्ष शुद्ध दशमी
२६ नोवेंबर)

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वादें उपरी. तुम्हीं पत्रें पाठविलीं तीं पावलीं. करकंबेकडील मजकूर कळला. ऐशास, जाधवरावाचा मुक्काम श्रीक्षेत्रास जाहला. क्षेत्रीं उपद्रव केला व करितो. मंगळवेढें परगण्यांत चार पांच हजार रुपये वसूल घेतले. श्रीक्षेत्रीं ही घेईल. पुढें करकंबेकडे जाणार. येथून तुम्हीं जावें हें आमच्या कोणाच्या ध्यानास येत नाहीं. आजी जमाना (?) एक प्रकारचा आला आहे. लटकीच बदलामी घ्यावी. न कळे कालाची गति! यश अपेश ईश्वराधीन आहे. त्याजपाशीं गाडदी वगैरे सरंजाम आहे यास्तव जाऊं नये. करकंबेंत बंद नाहीं. प्यादे थोडे आहेत. कदाचित् तिकडून गेला

---

१ लिंबक हरी. वडील बंधु. २ नारायणराव कृष्ण (पुतण्या.) ३ भास्कर हरी (धाकटा बंधु.) ४ कृष्णंभट [सर्वांत वडील बंधु] वडील बंधु मंगळवेढ्याहून भेटावयास आले ते रात्रीं आले ह्मणून गांवांत राहिले. उजाडल्यावर किल्ल्यांत आले. हें स्वाभाविकच झालें कीं, 'किल्ल्यांत रात्रौं कोणी ही मनुष्य येऊं द्यावयाचें नाहीं', या नियमाची अम्मल बजावणी इतक्या सक्तीनें झाली हें समजत नाहीं! ५ हें पत्र गोविंद हरीनें गोपाळरावास लिहिलेलें. ६ पंढरपुरास. ७ जाधवरावाचें पारिपत्य करण्याचें गोपाळरावाच्या मनांत आलें होतें त्यावरून गोविंद हरी त्याचा निषेध करितो. ८ दुर्लौकिक. जाधवराव हे पेशव्यांचे सरदार. त्यांशीं तुम्हीं आपण होऊन कलह करूं लागलां तर तुमचा दुर्लौकिक होईल, असा लिहिण्याचा अभिप्राय.

तरी करकंब प्रांतीं रुपये घेईल यास्तव तेथें राऊत दोनशें इकडील वळणचें पाठवावे. करकंबेंत जाऊन बसले ह्मणजे इभ्रत पडेल. त्वरेनें जाईल. होतां होईल तितकें साहित्य करावें. त्यांचे वळणचे लोक पाठविले तर आपलाले घरास जातील, यास्तव गैर वळणी लोक पाठवावे. जेव्हां बलावावें तेव्हां येतील. असा प्रकार आहे. चिरंजीव दौजीचीं पत्रें मंगळवेढ्याहून आलीं तीं पाठविलीं आहेत. कळलें पाहिजे. कालच्या दिवसांत पत्र नाहीं ह्मणोन लिहिलें, त्यास काली पत्र पाठविलें. आजी पत्रें पाठविलीं आहेत. लष्करचें वर्तमान फडतरे यांणीं सांगितलेलें लिहिलें तें कळलें, परंतु तथ्य नाहीं. बिघाड यवनाचा होणें तो कठिण. तो उगाच जावयाचा नव्हे. आपला मुद्दा करून घेईल तेव्हां जाईल, हें समजावें. उदईक शनवार व्यतिपात, यास्तव मुक्काम करावा. जागा पाहून येतील. परवां कूच करावें. तुम्हीं समीप आलां ह्मणजे तीर्थरूप आपा भेट घेऊन जातील. तीर्थरूप दादांची ही भेट होईल. सर्वांच्या मतें एक जागां न रहावें ते ही गोष्ट होईल. लष्करची बातमी ही उद्यांच्या दिवसांत येईल. तीर्थरूप आपा आल्यावरी त्यांणीं सांगितल्या प्रमाणें तरतूद करितों. सामान ही येत चालिलें. चिरंजीव आबा आजी सायंकाळीं आले. कळलें पाहिजे. आजी बातमी न आली. उद्यांच्या दिसांत येणार ती येईल. सावध असत जाणें. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

---

१ या प्रांतांतील राहणारे. २ करकंब परगण्याच्या रखवालीस इकडून स्वार गेले ह्मणजे जाधवराव तेथून लवकर निघून जाईल. ३ ज्यांचीं घरें ला ह्मणजे करकंब, मंगळवेढें, पंढरपूर वगैरे तालुक्यांत आहेत असे. ४ पुरुषोत्तमराव कृष्ण मंगळवेढकर. ५ पेशव्यांच्या लष्करचें. ६ निजामअल्लीचा. ७ अमुक मुक्कामास लष्कर जावयाचें ह्मणजे आदले दिवशीं बिनीवाल्यानीं तेथें जाऊन जागा पाणी सोयीचें पाहून ठेवावें व लष्करचे निरनिराळे भाग कोणकोणच्या ठिकाणीं उतरावे तें मुकरर ठरवून त्या त्या ठिकाणीं खुणांचीं निशाणें लाऊन ठेवावीं, या प्रमाणें शिस्त असे. ८ खिंवक हरी कुरुंदवाडकर. ९ कृष्णंभट मंगळवेढकर.

श.१६८४ **मिरज झुंजविण्याची तयारी** इ.स.१७६२

नं० १२२

(मार्गशीर्ष शुद्ध द्वादशी
२८ नोवेंबर)

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी. तुम्हीं मंदवारीं आजी दहा घटिका दिवसाचें पत्र व पुण्याकडील पत्रें पाठविलीं तीं घटका रात्रीस पावलीं. लिहिलें वर्तमान कळलें. ऐशास उदईक रविवार आहे. दग्धयोगाचा मजकूर कुच मुक्कामास कांहीं नाहीं. आठवे रोजीं नववे रोजीं कूच करूं नये असें आहे, यास्तव उदईक रविवारींच कूच करावें. मंगळवेढ्यांकडे स्वार रवाना केले त्यांची नांवनिशी कळली. रामाजीपंतास मंगळवेढ्यांस रवाना केलें म्हणोन लिहिलें तें कळलें. फेरियास पडला. परस्पर बरोबर स्वार देऊन लावावयाचा होता. बरें असो. तेथून तिकडे जाईल. त्याचा कयास पहातां भयें करून गेला किंवा कशास्तव हें लिहावें. पुण्याकडील पत्राचा मजकूर— श्रीमंत मातुश्रीसं अद्याप कांहीं कळलें नाहीं. कळेल तेव्हां डोळे उघडतील ! बरकड, त्यांची मान्यता कोण करितो ? ते दुर्जन मंडळी निंदक ! त्यांस मातुश्रीची अगर मुख्यांची मर्यादा कोठें आहे ? आतां त्यांचें पंचायतन बरे कृतकर्मे झाले आहेत ! त्यांचे नजरेंत विश्व नाहीं ! मातुश्रीस कोण पुसतो ? आपण पंधरा दिसां आठ दिवसां एक चिट्ठी पाठवावी. वर्तमान कळत जाईल. बरकड त्यानीं रदबदली करून त्यांच्या योगें कामकाज होणें कळतच आहे. एकनिष्ठ सेवक तुम्हीं. सर्व संकट श्रीस आहे. कांहीं चिंता नाहीं. सर्व प्रकारें श्री कल्याण करील. श्रीमंत माधवराऊ प्रधान यांचें लष्कर फितुरानें मोडलें परंतु तुम्हीं झुंजोन फितूर न करितां निघोन

---

१ गोविंद हरीचें हें गोपाळरावास पत्र. २ त्याचा कोणाचा ? जाधवरावाचा ? ३ गोपिकाबाईस. ४ सखारामबापू व तत्पक्षीय यांची. ५ पेशव्यांचीं. ६ सखारामबापूचें (या वेळचें !) दादासाहेब, स्वतः बापू, आबा पुरंदरे, विठ्ठलराव विंचूरकर व नारो शंकर हें असेल ! ७ चिठी गोपिकाबाईकडे पाठवावी, असा लिहिण्याचा भावार्थ दिसतो.

आलेत हे कीर्ति सर्वत्र झाली आहे. एक खाशाखेरीज कोणी सरदार इकडे पाय घेतात असा अर्थ नाहीं. खाशानीं मिरजेस येऊन बसतील [तर त्यानीं] पुढें कर्तव्य काय? सूक्ष्म दृष्टीनें पाहिल्यास त्यांचें येणें दुर्घट आहे. लज्जा रक्षक श्रीपंढरिनाथ समर्थ आहे. मुलें माणसें लावावयाचा[1] मोठा एक तुम्हांस घोर आहे, त्याची चिंता किमपि न करणें. पालखा तुमच्या आजी आलेल्या नेहमी येथें आहेत. या खेरीज आणखी पांच आहेत. दहा पालख्या आहेत. श्रीमंत इकडे मिरजेकडे परिछिन्न येतात असा निश्चय जाहल्या नंतर लाऊन देवूं. चिंता काये? सर्व होणें जाणें ईश्वराधीन आहे. जाधवराऊ यानें मोगलाई मांडली! हिंदुधर्म सोडून यवनांचा धर्म प्रारंभ मांडला. याचें कल्याण कोणे रीतीनें होणार! [त्याजवळ] फौज म्हणावी तर फार नाहीं. पारिपत्य तुम्हीं गेल्यानें होईल. परंतु धण्याची बदलानी मातबर येणार. आधींच आहे. हें जाहल्यावरी मोठें निमित्य आणितील. नाहीं तर [जाधवरावास] जाऊन बुडवावें असें चित्तांत येतें! आणखी कोठें कोठें जातो न कळे. वरचेवर वातमी क्षेत्राकडील[3] राखावी. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद. लोक खर्चाना केले त्यांची याद पाहिली. दोन तीनशें यादी पैकीं गेले तरी पांच सातशें लोकांची आवई पडेल. सातांऱ्यांत रोज आवया तुम्हीं येतां म्हणून पडतात. किल्लेकरी गोळे मारितात राजवाड्याकडील ब्राह्मण खबरीस चिरंजीव नारायणरायाकडे आला त्याणें सांगितलें. कळलें पाहिजे. हे आशीर्वाद.

पै॥ छ० ११ जमादिलावल.

---

१ दादासाहेबां खेरीज. २ मिरजेंतून एखाद्या सुरक्षित स्थळास लाऊन देण्याचा. ३ पंढरपुराकडील. ४ मंगळवेढ्यांकडे तुम्हीं स्वार पाठविले. ५ सातारा शहर लुटण्यास गोपाळराव येणार अशा अफवा तेथील लोकांत दररोज उठत.

श.१६८४ मिरज झुजविण्याची तयारी. इ.स.१७६२

नं० १२३

(मार्गशीर्ष शुद्ध द्वादशी
२८ नोवेंबर.)

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद[1] उपरी. तुम्हीं पत्रें डांकेबरोबर पाठविलीं तीं पावलीं. वर्तमान कळलें. स्वांर मंगळवेढ्याकडे रवाना केले. उत्तम केलें. ऐशास जाधवराऊ हा कोण उत्पात निर्माण झाला! श्रीक्षेत्रास[2] [त्यानें] कहर केला त्याचें फल त्वरेनेंच पावेल. तुम्हीं श्रीमंतांस[3] ये विशीं पत्र लिहावें कीं, " या प्रकारें जाधवरायानें उत्पात केला. मंगळवेढें[4] परगण्यांत पांच हजार चार हजार रुपये गांवगन्ना घेतले, मागती कसब्याशीं[5] कजिया करणार, श्रीक्षेत्रास राहून ब्राम्हणांस उपद्रव केला, हें वर्तमान सेवेशीं कळावें; " म्हणोन लिहावें. बातमीची बातमी. कागदाचा जाव दिला तरी जासूद घेऊन येईल. नाहीं तर बातमीच आणील. जोडी पत्रें देऊन रवाना करणें. वरकड वर्तमान कितेक स्वकीय लिहिलें तें कळलें. त्याचा ही विचार करणें तो सर्वांच्या विचारें केला पाहिजे. करूं. शेला तिवट पाठविलें तें पावलें ध्रुवावया परटाकडे उदईक टाकितों. चिरंजीव दाजीस आणवावयाचा मजकूर लिहिला तो कळला. त्यास आणवावें हें उचित. प्रस्तुत तुम्हीं स्वांर रवाना केले आहेत हे जाऊन येतात. जाधवराऊ काय करतो न कळे. मोठें संकटच प्राप्त जाहलें आहे. काळजी पडली आहे. श्रीपंढरीक्षेत्रास चांडाळानें अरिष्ट केलें! मोगला पेक्षां अधिक जाहला! मंगळवेढ्याकडील स्वांर प्रातःकाळीं लष्करास येतील. आजी चिरंजीव नारायणरायास पाठवणें ह्मणोन लिहिलें, त्यास आजी व्यतिपात होता, पत्र सायंकाळच्या प्रहर दिवसा आलें, यास्तव राहिले. उदईक तुमचे मुक्काम

---

१ हें गोविंद हरीचें गोपाळरावास पत्र. २ पंढरपुरास. ३ दादासाहेबांस. ४ कसबे मंगळवेढ्यादरी. ५ जोडी जासुदांची.

मालगांवाजवळी[1] आले म्हणजे येतील. कळलें पाहिजे. आतांच पत्रें लिहिलीं ते समयीं पुण्याहून पत्रें आलीं तीं तुमचीं[2] पाठविलीं आहेत. वरकडांचें लाखोटे पाठविले आहेत. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

पै॥ छ० ११ जमादिलावल.

नं० १२४

(मार्गशीर्ष शुद्ध त्रयोदशी
२९ नोवेंबर.)

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद[3] उपरी. तुम्हीं पत्रें बारामतीचीं[4] पाठविलीं तीं वाचून पाहिलीं. त्या गृहस्थासि[5] आम्हीं पत्र लिहून पाठविणार. तुमचें माणूस कोणे समयीं पाठविणार तें लिहावें. पत्र पाठऊन देऊं. चिरंजीव दाजीचीं[6] पत्रें पाठविलीं तीं पावलीं. यवनाचें[7] प्राबल्य मागें झालें होतें, परंतु ऐसी गत त्यानें केली नव्हती ! जाधवाचा काल समीप आला, तदनुसार त्यास बुद्धि झाली ! हा केवळ यवनच चांडाळ आहे. काय काय गति कोणाची झाली असेल न कळे ! बरें ! काळच विपरीत आला, तदनुसार जाहलें ! चिरंजीव दाजी मंगळवेढ्यांत[8] होता म्हणोन अभु राहिली. कुरोली करकंबेस गेला आणि [त्या ठाण्यांतील लोकानीं] दम धरून मार दिला तर झक

---

१ मालगांव हें मिरजेपासून सात मैलांवर आहे. २ तुमचीं पत्रें आलीं तीं फोडून वाचून पाहून पाठविलीं आहेत. बाकीच्या मंडळीचे लाखोटे जसेच्या तसेच पाठविले आहेत. ३ पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास. ४ बारामतीचा हा गृहस्थ कोण ? बापूराव फडणीस किंवा त्रिंबकराव मामा या दोघांतून एक जण असेल ! ५ पुरुषोत्तम राव कृष्ण याचीं पत्रें मंगळवेढ्यांहून. ६ औरंगजेब बादशाचें. तो बादशहा दक्षिणेंत आला होता तेव्हां गोविंद हरीचें वय फार झालें तर दहा बारा वर्षांचें असेल. तथापि हिंदूंचा त्या बादशहानें छळ केल्याचीं उदाहरणें त्यानें पाहिलेलीं नसलीं तरी लहानपणापासून पुष्कळच ऐकिलेलीं असलीं पाहिजेत. ७ जाधवरावानें पंढरपूरक्षेत्र लुटलें या बद्दल सर्वांपेक्षां गोविंद हरीस विशेष क्रोध येण्याचें कारण त्याचें उपास्य दैवत पांडूरंग हें होतें, अर्थात् पंढरपूर क्षेत्रावर त्याची भक्ति ही निस्सीम होती.

मारीत जाईल ! न गेला तरी नरसिंहपुरास[1] जाईल तेथें ही असेंच करील. पुढें कुरकुंबाची[2] गति अशीच करील. पुढें होणार तें होतें. असो. इतक्यांत यवनांस[3] कळलें ह्मणजे तो मारून टाकील. याणें गुर्दस्तां[4] त्याचा घात केला आहे, त्याचें पारपत्य (त्यास) करणें आहे. सखारामपंतास[5] न कळत आला, त्यास ही राग आहे. जाधवरायाचें भविष्य आलें यास्तव त्यास बुद्धि ऐशी झाली आहे ! कळलें पाहिजे. आम्हीं उद्यां येत नाहीं. श्राद्ध जाहलियावरी एक दिवशीं येऊं. उदईक कोण येणार तीं येतील. ढालाईत पावला. अंगरखियांचा मजकूर लिहिला तो कळला, परंतु कशाचे करावे ? इकडील छिटें उणाख. एक रुपयाचा माल तो कवडीचा[6]. तीं छिटें कामाचीं नाहींत दुसरा जिन्नस कांहीं अंगरखेयां योग्य दिसत नाहीं. याचें उत्तर आलियावर (?) करणें तें करावें. बहुत काय लिहिणें. हे आशीर्वाद. चिरंजीव दाजीचें प्रत्योत्तर पाठविलें आहे, व पत्रें माघारीं वाचून पाठविलीं आहेत. हे आशीर्वाद.

नं० १२९

[मार्गशीर्ष शुद्ध त्रयोदशी
२९ नोवेंबर.]

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी. चव्हाण[9] येतो हा कोण्या मतलबावरी न कळे ! जरी

---

१ निरा नरसिंगपूरक्षेत्र भीमा व नीरा यांच्या संगमावर आहे. २ कुरकुंबा हें देवीचें स्थान आहे. ३ निजामअल्लीस. ४ ' गुदस्तां श०१६८३ इ. स. १७६२ त मराठ्यांशीं निजामअल्लीचें युद्ध सुरू असतां जाधवरावानें पेशव्यांकडे फितुरी होऊन निजामअल्लीची हानि केली आहे, ' असा अभिप्राय. ५ सखारामबापूस न विचारितां लष्करांतून निघून पंढरपुराकडे आला ह्मणून त्याचा त्यावर राग. ६ हरभटबुवांची पुण्यतिथी. ७ ज्या कापडास रुपया किंमत पडत्ये तो देखील कवडीचे मोलाचा आहे, असा अभिप्राय. ८ हें पत्र गोविंद हरीनें गोपाळरावास लिहिलेलें आहे. ९ चव्हाण कोण ? उदाजी चव्हाण ह्मणावा तर तो यापूर्वी महिना पंधरा दिवस एका लढाईत ठार पडल्याविषयीं गोविंद हरीनें एका पत्रांत उल्लेख केला आहे. येथें हें सांगितलें पाहिजे

यवनाकडे गेला तरी जातानां मुलूख लुटीत जाईल. इकडे राहिला तरी त्याची बातमी राखिली पाहिजे. शिवाजी केशव व तो एक जागां आहेत. असो. सुचलें (तें) लिहिलें. श्रीमंतांच्या लष्करांतून परदेशी काली चवथे दिवशीं मिरजेस आला त्याणें सांगितलें कीं, " माधवरायाकडील फौज दाहा पंधरा हजार आहे त्यांस पोटास नाहीं. उपाशीं मरतात. कोणी धणी नाहीं. ऐसी गत ! गवत घोड्यांस मिळेना. चारा मिळेनासा झाला आहे. मोगलाकडील यांजकडील मिळोन स्वांर कातवार देखील साठ सत्तर हजार होईल लांकूड फांटें वैरण दाणा (मिळण्याचें) मोठें संकट. लोकांस पोटास नाहीं. मोगलाचें यांचें ठीकसें नाहीं. आणखी आठ चार दिवस लागतील. मोगल भारी, हे त्याच्या आहारीं, " म्हणोन सांगितलें. राजश्री महादेवभट नातु याणीं घोडी विकत घेतली होती, त्यास ते पळणीस गेले. घोडी तैती. रामचंद्रास बसों न दे, यास्तव त्याणीं हवालीं केली ती तुम्हांकडे पाठविली आहे. हरकोणास देणें. फार तती आहे. दोनशें रुपयांस त्याणीं विकत घेतली होती. खर्चवेंच लागला आहे. कळेल तें करणें. हें आशीर्वाद. पै॥ छ० १२ जमादिलावल.

नं० १२६

(मार्ग० शु० दशमी किंवा एकादशी
२६ किंवा २७ नोवेंबर.)

कृष्णाजी अमृतराव प्रतिनिधि विशाळगडकर

कीं, गोविंद हरीनें या वर्षी लिहिलेलीं अजमासें दीडशें पत्रें आह्मांस मिळालीं आहेत. परंतु तीं सर्वच छापण्या जोगीं नाहींत. पुष्कळ केवळ घरगुती मजकुराचीं आहेत. अशीं पत्रें एकीकडे काढून जीं उपयोगीं वाटलीं तेवढींच छापिलीं आहेत.

१ निजामअल्लीकडे. २ माधवराव पेशवे स्वाधीन झाल्यावर त्यांच्या निसबतीच्या फौजेची दादासाहेब हेळसांड करीत आहेत असा एकंदर या बातमीचा सारांश. ३ बाजार बुणगे. ४ निजामअल्लीची समजूत होऊन तो परत जाण्यास आठ दिवस लागतील. ५ दादासाहेबांचा सैन्यसमुदाय थोडा असल्यामुळें ते निजामअल्लीच्या आहारीं आहेत. ६ तापट ? ७ रामचंद्र हा कोणी नातू भटजींचाच आप्त असेल.

श.१६८४ **मिरज झुजविण्याची तयारी** इ.स.१७६२

यांचें गोपाळरावास पत्र—

" राजश्री रघुनाथ पंडित व राजश्री माधवराव या उभयतांत कलह होऊन लढाई बहुत जाहली. उभयतांच्या भेटी ही जाहल्या. त्यामुळें आपणावरी राजश्री रघुनाथ पंडित यांचा कटाक्ष बहुत आहे. या करितां मनुष्यें पोक्त्या ठिकाणीं ठेऊन स्वस्थ रहावें आणि पुढें उद्योग करावा, ये विशींचा अर्थ लिहिला व ये विशीं ती० राजश्री भगवंतराव दादा स्वामीनीं लिहिलें तें सर्व कळलें. हें स्थळ जागा आपलाच आहे. दुसरा प्रकार किमपि आहे ऐसें नाहीं. परंतु श्रीमंत महाराज मातुश्री बाईसाहेब धणी. त्यांजकडील विचार एक प्रकारचा. त्यांस भलती गोष्ट कळविल्याविना परिणाम नाहीं. या करितां धण्याचे सेवेशीं लिहिलें आहे; तिकडील उत्तर आल्या नंतर या गोष्टीचा विचार होईल. "

पै॥ छ० १३ जमादिलावल.

नं० १२७*

[मार्गशीर्ष शुद्ध चतुर्दशी
३० नोवेंबर.]

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी. मौजे आरग व कसबे बेडग हे दोनी गांव श्रीमंत मातुश्री अनुबाईकडील आहेत. लष्कर समीप उतरलें आहे. ताकीद करून हरदूं गांवांस उपद्रव न लागे तें करावें. बेडगेस कुरण आहे तेथील ही रखवाली करावी. हे आशीर्वाद. पै॥ छ० १३ जमादिलावल.

---

१ रघुनाथ बाजीराव उर्फ दादासाहेब. पेशवे व प्रतिनिधि हे बरोबरीचे असल्यामुळें लिहिणें ही बरोबरीच्या नात्याचें आहे. * नं० १२७ । १२८ । १२९ हीं सर्व गोविंद हरीचीं गोपाळराव गोविंद यास पत्रें. २ अनूबाई ही थोरले बाजीराव पेशवे यांची कन्या नारायणराव घोरपडे इचलकरंजीकर यांस दिली होती. ही बहुधा नानासाहेब पेशवे व दादासाहेब यां पेक्षां वडील असावी. गोविंद हरीनें तिला 'श्रीमंत' हें उपपद देण्याचें कारण एक तर ती पेशव्यांची कन्या, व दुसरें कारण असें कीं पटवर्धन हे इचलकरंजीकर घोरपड्यांचे उपाध्याय होत. ३ सदरहू.

नं० १२८

(मार्गशीर्ष शुद्ध चतुर्दशी
३० नोवेंबर.)

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी. आजी घोडीं हत्ती रवाना केले. केवडे २ पाठविले आहेत. घेणें. हरिश्चंद्राख्यान प्राकृत आम्हीं पुण्याहून पांच अध्याय गुदस्तां लिहून आणिले होते. संग्रहीं होते. तुम्हांस वाचावया पाठविले आहेत. पांच सातवेळ पारायण करणें. संस्कृत मिळाल्यावरी ते ही वाचावे. चिरंजीव कोन्हेरीचा लाखोटा पावता करावा. गुरुवारीं तीर्थ[1], यास्तव तीर्थरूप आपांसें दोन रोज राहविलें. कळलें पाहिजे. बहुत काय लिहिणें. भोजनोत्तर येणार येतात त्यांची रवानगी आजीच करावी. हे आशीर्वाद. सटवोजी शिंतोळे[2] यांच्या डेऱ्यास जावें. (त्यांचा) संतोष रक्षावा. तो ही बरा माणूस, बऱ्याचा पुत्र, कृष्णाबाईचा[3] भाऊ. अगत्य समाधान रक्षावें. हे आशीर्वाद. पै॥ छ० १३ जमादिलावल.

नं० १२९

(मार्गशीर्ष शु॥ १४
३० नोवेंबर.)

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी. तुम्हीं तासगांवचें पत्र पाठविलें तें पावलें. लबाड खबर!

---

१ समाधिस्थ झाल्याची तिथि. पटवर्धनांचा मूळ पुरुष व गोविंद हरीचा बाप हरिभट बावा हा तपस्वी सत्पुरुष मार्गशीर्ष वद्य प्रतिपदा शके १६७२ या दिवशीं समाधिस्थ झाला. मरणापूर्वी त्यानें बरेच वर्षे चतुर्थाश्रम धारण केला होता. २ वडील बंधु त्रिंबक हरी यास. ३ हें गोविंद हरीचें लिहिणें आपली स्त्री सत्यभामाबाई उर्फ ताई हिला अनुलक्षून असावेंसें वाटतें. ४ शितोळे हे मांजरी ह्मणून मिरजेपासून सात आठ कोसांवर गांव आहे तेथील रहाणारे. पुढील वर्षी राक्षसभुवनचे लढाईत पराक्रम केल्यामुळें यांस मांजरी गांव पेशवे सरकारांतून इनाम मिळाला. ५ कृष्णाबाई शिंदे मनोळकिर.

भोवरेवरच आहेत म्हणावें ते नीरेवर आहेत म्हणोन लिहिलें आहे! त्यांत कांहीं जीव नाहीं. मोगलाचा उलगडा होऊन मोगल एकीकडे गेल्यानंतर येतील तर येऊत! हवेरीकर जानरांव[1] याची आवई. तासगांव त्याकडे होतें तें आवई घालून घ्यावें असा मजकूर त्याचा! श्रीमंतांचा मनसबा होणें त्यास कितेक लढे आहेत. अशा बदहेवई[2] आवया उठवितील त्यांत जीव नाहीं. तेथून[3] लष्कर कूच झालें तरी चौथे रोजीं खबर येईल. उडत्या खबरीवर जाऊं नये. वरकड होणें जाणें ईश्वराधीन आहे. सर्व विश्व—ब्राम्हण आदिकरून—आबालवृद्ध यानीं प्रतिज्ञा केली आहे कीं, मिरजेस वेढा येत नाहीं. आपली खातरनिशा असों द्यावी. तरतूद करणें ती करीतच आहों. तिलमात्र अंतर नाहीं. कळलें पाहिजे. बातमीची सावधगिरी असावी. हजारों माणूस येत आहे. खबर राहणार नाहीं. तासगांवची बातमी लग्नाड. बाबूराव येथें काली आला होता त्यास आजी रवाना केला. कळलें पाहिजे. हे आशीर्वाद.

पै॥ छ० १३ जमादिलावल.

नं० १३०

[मार्गशीर्ष वद्य प्रतिपदा
२ दिसेंबर.]

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वादें उपरी. तुम्हीं चिठी पाठविली ते पावली. चिरंजीव नारायणरायास प्रविष्ट केली. ते ही लौकरीच निघोन येतात. वरकड तयारी करून

---

१ जानराव हवेरीकर याजकडे पूर्वी तासगांवचें ठाणें होतें तें त्याजकडून काढून पेशव्यानीं पटवर्धनांस दिलें. सांप्रत दादासाहेब फौज घेऊन पटवर्धनांचें पारिपत्य करण्याकारितां निरेपर्यंत (तासगांवापासून अजमासें पस्तीस चाळीस कोसांवर) आले अशी खोटीच कंडी पिकवून पटवर्धनांस घाबरें करावें व त्यांची माणसें पळून गेल्यावर आपण तें ठाणें पुनः घ्यावें असा जानरावाचा हेतु होतासें दिसतें. २ खोट्या बातम्या. हवई व आवई या शब्दांचा अर्थ एकच दिसतो. ३ दादासाहेब मिरजेपासून सवाशें कोसांवर भीमेच्या तीरीं आहेत तेथून. ४ हें पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास.

मार्णसें[1] लावून द्यावयाचा मजकूर लिहिला, ऐशास निघावयास पळाचा उशीर नाहीं. आजी मृत्युयोग होता. तीथ ही होती. काली सौभाग्यवती आकाबाई[2] ही आली. आजी तिथीचा गुंता उरकला. उदईक तीर्थरूप आपा जाणार. आजी रात्रीं निघावयाचा निश्चय करून लिहितों. चिरंजीव नारायणराऊ ही येतील. सटवोजी शितोळे यास घर राहावया देविलें. देवरायाचे घरीं मेजमानीस आले होते त्यांस तमाम लावून दिलें. चिरंजीव भाऊस ही लोक लावून द्यावयाविशीं सांगितलें. श्रीमंत दादासाहेबांकडील बातमीस आले तरी चिंता काय? त्यांसी[3] विषमें बोलावया गरज नाहीं. सुखरूप लष्करांत आले तरी राहून बातमी घेऊन जाऊत. त्याणीं मनेराजुरीस तुमचा इलाखा नव्हे ह्मणोन रहावया सांगितलें असेल! आम्हीं कांहीं गनीम[4] नव्हे! जासूद[5] आढळले तरी त्यांस सांगावें कीं, "चोरून बातमी कां नेतां? उघड बातमी घेऊन जाणें," ह्मणोन समाधानें बोलावें. चाकराची जाती! भलतेंच जाऊन सांगतील. आल्यासुं[6] पोटास द्यावें. "येऊन राहत जाणें, जात जाणें," ह्मणोन सांगावें. चोरी काय आहे! तुम्हीं धण्याच्या पायांसीं विरुद्धाचरण केलें नाहीं. नाहक त्यांचें शस्त्र तुह्मांवरी चालणार नाहीं. खातरजमा असों देणें. खंडेराजूरी व गुंडेवाडी दोहीं गांवचे वेठे[7] कुदळीं खोरीं पांच्या सुद्दां तुम्हीं पाठविले ते पावले. बहुत

---

१ कुटुंबांतील माणसें. २ आकाबाई ही त्रिंबक हरीची बायको. ३ दादासाहेबांकडून जासूद बातमी काढण्या करितां तुमच्या लष्करांत आले आहेत त्यांस. ४ वांकडें. ५ दादासाहेबानीं. मनेराजुरी हा गांव इचलकरंजीकर घोरपड्यांचा असून तेथून जवळच गोपाळरावाचें लष्कर उतरलें होतें, पण तें पटवर्धनांच्या सरंजामास जो मुलूख दिलेला होता त्या हद्दींत होतें. दादासाहेबानीं जासूद बातमी करितां पाठविले होते त्यांस ताकीद केली होती कीं, तुह्मीं दिवसभर पटवर्धनांच्या लष्करांत फिरत रहावें, पण रात्रीं त्यांच्या हद्दींत न राहतां मनेराजुरीस जाऊन रहावें. ६ शत्रू. गनीम हें नांव मोंगलानीं मराठ्यांस दिलेलें होतें. मराठ्यांची जी कांहीं एक विशेष तऱ्हेची लढाईची शिस्त होती तिला मोंगल 'गनीमी कावा' असें ह्मणत. ७ दादासाहेबांकडील जासूद येतील त्यांस. ८ पुढें मिरजेच्या किल्ल्यास पेशव्यांचा वेढा बसणार, त्या आधीं किल्ल्याची कांहीं दुरुस्ती करण्या करितां हे वेठे बोलाविले होते.

श.१६८४ मिरज बुजविण्याची तयारी. इ.स.१७६२

क्काय लिहिणें हे आशीर्वाद.

पै॥ छ० १९ जमादिलावल.

नं० १३१

(मार्गशीर्ष वद्य प्रतिपदा
२ दिसेंबर.)

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद[1] उपरी. राजश्री नरहर[2] जिवाजीकडील पत्र पाठविलें तें पावलें. लिहिलें वर्तमान कळलें. तुम्हीं त्यास उत्तर लिहून पाठवावें कीं " आम्हीं जें लिहिणें तें पहिलेंच लिहिलें आहे. दुसरा विचार नाहीं. आम्हीं श्रीमंतांचे पदरीं बहुत दिवस एकनिष्ठपणें सेवा केली. आजी पर्यंत कोणास ही पत्र न लिहिलें व दुसरा भाव ही चित्तांत न आणिला. आतां ते[3] होऊनच आमचा नाश करणार झाले, तरी तुम्हीं मातबर आहां; तुम्हांस ज्यांत आमचें कल्याण दिसेल तें करावें. " असें लिहून पाठवावें. " तुम्हीं प्रसंगीं आहां. सर्व तुम्हांस कळेल. जे गोष्टीनें तुम्हांस युक्त दिसेल तें करणें. आम्हीं तुमच्या भरंवशावर आहों. मुख्य सहस्र गोष्टींची गोष्ट ज्यांत आमचें बरें दिसेल तें करणें. " असें लिहावें. यांत तुम्हांस कळेल तसें आम्हीं लिहिल्यापेक्षां युक्त दिसेल तें लिहिणें. चिरंजीव दाजीचीं पत्रें पावलीं. विसाजीपंतांचें[4] पत्र पावलें. दिवसेंदिवस त्यांस कळों लागलें, यामुळें ते ही

---

१ हें पत्र गोपाळरावास गोविंद हरीनें लिहिलेलें आहे. २ नरहर जिवाजी हा जानोजी भोंसल्याचा सरदार, हा या वेळीं दादासाहेबांच्या लष्करांत असून पटवर्धनांच्या तर्फेनें त्यांजवळ मध्यस्थी करीत होता असें दिसतें. पुढें इ० स० १७६९ (श० १६९१) यावर्षी जानोजी भोंसल्यावर माधवराव पेशव्यानें दुसरी स्वारी केली तींत पेशव्याचे सरदार बाळाजीपंत सप्रे व नरसिंगराव धायगुडे यांचें व या नरहर जिवाजीचें तुमुल युद्ध होऊन त्याचा पराजय होऊन तो मारला गेला व याच्या सोबतीस भोंसल्याचा दुसरा सरदार रघोजी करांडा ह्मणून होता त्याचा ही पूर्ण पराजय होऊन तो पळून गेला. ३ दादासाहेब. ४ हा इचलकर्जीकरांचा कारभारी विसाजी नारायण, हा " आम्हीं अद्यापि दादासाहेबांशीं विरोध करितों ह्मणून प्रत्येक पत्रांत आ-

यथास्थित लिहूं लागले. हे आशीर्वाद. प्रातःकाळीं मंगळवेढियाचीं पत्रें पाठवून देतों. तेथें शंभर दीडशें पर्यंत लोक चिरंजीव दाजीजवळ ठेववे. बाकी लोक चव्हाण शह टाकोन गेले नंतर आणवावे. तेथें ठेववयाचा गृहस्थ योजून लिहून पाठविणें. हे आशीर्वाद. चिरंजीव भाऊ संध्याकाळीं घटका दिवसास येऊन पोचले. नरूच्या पत्रीं लिहावें जे, " तेथें तुम्हीं आहां. तेथील भाव सर्व बातमी वरचेवर पाठवून देणें. " ऐसें लिहीत जावें. हे आशीर्वाद.

पै॥ छ० १५ जमाजिलावल.

नं० १३२

(अजमासें मार्गशीर्ष शुद्ध पौर्णिमा
१ दिसेंबर.)

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद[2] उपरी. तुम्हीं लष्कर[3]चीं पत्रें पाठविलीं तीं दहावे तासीं रावी पावलीं. सविस्तर वर्तमान कळलें. शंभर गोष्टी लिहिल्या तरी एकच निश्चय. नवद तोफ जाहली, शंभर पुरी तोफ [जाहली तरी व] नऊ हजार गाडदी (ठेवणार ते) आणखी सहा हजार ठेविले तरी तोच निश्चय. अशा भयास भिऊन दुसरा मजकूर कोणता करणें आहे? श्रीपंढरीनाथ लज्जारक्षक आहे. नाहीं तरी मरण्यास धरणें घेतलेंच आहे. जें प्राक्तनीं अ-

---

ह्यांस दोष देत असे. परंतु आतां त्यांचें कपट त्यास कळूं लागलें तेव्हां यांत आमची चूक नाहीं ही त्याची खात्री झाली व त्या प्रमाणें तो लिहूं लागला, " असा गोविंद हरीच्या लिहिण्याचा अभिप्राय.

१ परशुरामभाऊ. २ हें पत्र गोविंद हरीनें गोपाळरावास लिहिलें. ३ गोपाळरावाच्या कोणी स्नेह्यानें दादासाहेबांच्या लष्करांतून त्यास तेथील हकीगतीचीं पत्रें पाठविलीं होतीं तींच गोपाळरावानें मिरजेस पाठविलीं होतीं. ४ सदरहू पत्रांत लिहिलें होतें कीं, ' मिरज काबीज करण्याकरितां दादासाहेब व सखारामबापू यांणीं नव्वद तोफा जमविल्या आहेत व नऊ हजार गारदी चाकरीस ठेविले आहेत. ' त्या मजकूरास अनुलक्षून गोविंद हरीचें लिहिणें.

सेल तें याच जागां होईल. आमचा मानस हे घडीस एकच आहे. त्याणीं लिहितां लिहिलें कीं, 'रायांचें पक्षीं होते तितक्यांचें पारपत्य करणार.' संतोषें जाऊन भेटेल त्याजवरी देखील निकर्ष. आम्हांसाठीं तो त्याणीं अवतार घेतला आहे! निमित्यास पात्र दादासाहेब [होऊन] सर्व क्षयास नेणार! पेशवे यांची दौलत बुडवून सर्व तत्पक्षी क्षयास नेऊन मग तो अवतार संपूर्ण करणार; असा त्याचा मनोदय आहे! श्रीभगवान त्याच्याच मनोदया प्रमाणें करूं लागल्यास इलाज नाहीं. मुलांमाणसांचा गुंता येथें नसावा हें प्रमाण. परंतु कोठें ठेवावीं हा करार होतो. सर्वांच्या मतें स्थल योजना केली पाहिजे. विशाळगडचे राजकारणास तुम्हीं ही कारकून पाठविले आहेत तेथील प्रत्योत्तर येतें. करवीराकडील ही येतें. तदनंतर कर्तव्य तें करावें. मनोळीकडे मुलेंमाणसें लाऊन दिल्यास आमचे मतें चिंता नाहीं. परंतु त्यांजकडील ऐवज आला नाहीं. त्यांचीं मुलें आम्हांजवळ, हे आशंका भारी आहे. दोन पत्रें पाठविलीं. गडबडीचा प्रसंग, तुमचीं मुलें येथें नसावीं. ऐवज पाठवणें. मुलें पाठवितों." परंतु तूर्त "ऐवज मिळत नाहीं. गडबडीचा प्रसंग यामुळें साक्कार बघत नाहीं. तलास करितों." ह्मणोन लिहितात! त्यास वरचेवर बातमी येतच आहे. परिछिन्न गळां पडणार, असा प्रकार जाहल्यास त्यांचीं मुलें ही पाठवावीं व येथील ही पाठवावीं. त्यांचीं खेडीं बहुत आहेत. फौज त्यांचे संग्रहीं प्यादे आहेत. हरएक स्थलीं जतन करतील. निदान जाहल्यास तेथून स्थलांतर करितील. कित्तूरकरास पत्रें पाठवावीं. त्याचा ही शोध घ्यावा. [तो ही] जमीदार

---

१ दादासाहेबांच्या लष्करांतून ज्यानें पत्र लिहिलें त्यानें. २ माधवराव पेशवे यांचे. ३ जुलूम. ४ आमचा नाश करण्यासाठीं. ५ सखारामबापूनें. ६ माधवराव पेशव्यांच्या पक्षाचे सरदार व मुत्सद्दी. ७ व्हावयाचा आहे. यापुढील एक वाक्य टाकून पुढच्या वाक्यांत 'येतें' असें क्रियापद आहे त्याचा ही अर्थ 'यावयाचें आहे' असा होय. ९ मनोळीकर शिंद्यांकडील ऐवज वसूल होईतों गोविंद हरीनें त्यांचीं मुलें ओलीस अडकवून ठेविलीं होतीं. १० पत्रें पाठविलीं मनोळीकरांस. ११ दादासाहेबांची फौज येऊन गांठ घेणार. वेढा घालणार.

आहे. पुढें ईश्वर करील तें खरें! सारा मुलूख फिरावयास त्यांचें आयुष्य किती! पैर्जन्य काल पावेतों मिरजेचे किल्ल्यास तोफा लाऊन सैफेलीपासून भुई पावेतों साफ करावयास फार मेहनत पाहिजे! किल्ला करणारानें केला आहे तो असा केला नाहीं. भुई व सफेली बराबर आहे. किती मारितील! जितकें माणूस किल्ल्यांत राहील तितकें ईश्वरावर भार घालून राहील भावी असेल तें चुकणार नाहीं. मरणें खरें. दुसरा विचार नाहीं. येथें ईश्वरें (मरण) निर्मिलें असेल तर सुखरूप असो! आणखी कांहीं सुचत नाहीं. त्याच्या लिहिल्यांत कांहीं बाकी आहे कीं काय? ईश्वर आजीच बुडाला असा भाव नाहीं! आम्हीं कांहीं हरामखोरी केली नाहीं. जन्मवरी ज्याचें अन्न भक्षिलें त्याची सेवा एकनिष्ठेनें केली. असें ही करितां सार्थक झालें तरी परलोकीं वाईट नाहीं. मान्नागमनी! ज्यांनीं एवढे धर्मराज्याचा उच्छेद करून क्षयास नेलें त्यांची गति काय होईल? कोठवर काळजी करावी! एक बुद्धि केली ते बुद्धीस दुसरीकडे फिरावया कोठें ठिकाण नाहीं. मिरज किल्ला आम्हीं आग्रह करून घेतला. येथेंच आमचा परिणाम ईश्वरें निर्मिला असेल तरी सुखें असो! एवढे मार्गशीर्ष मास पंधरा दिवस वीस दिवस तुम्हीं श्रीकृष्णे अलीकडे कैर्मणा करावी पुढें पार होऊन जावें. समागमें सर्व न्यावीं. जेथें आश्रय लागेल तेथें ठेवावीं. कोणीकडे गेलीं हा ही लौकिक होणार नाहीं. लष्करावरोबर असों द्यावीं. श्रीपंढरीनाथ उपेक्षीत नाहीं. असा आमचा मनोदय. इतक्यांत रोज बे रोज खबरी ही येतात. वर्तमान कळतें. एवढें राज्य सारें एकीकडे एकले तुम्हीं

---

१ आम्हीं जर इकडे तिकडे धांवपळ करूं लागलों तर त्यांच्यानें आमचा पाठलाग कितीसा होणार? २ गोविंद हरीनें हें गोपाळरावास पत्र लिहिलें त्यावेळीं मार्गशीर्ष अर्धा झाला होता व पावसाळा सुरू होण्यास अजून सहा महिने अवकाश होता, तेथपर्यंत दादासाहेवांच्या पन्नास हजार फौजेशीं मिरजेंत राहून झुजण्याची गोविंद हरीची हिंमत होती! ३ तदबंदीच्या भिंतीचा वरचा भाग. ४ तटाची भिंत खालपासून वरपर्यंत एक सारखी भक्कम आहे. ५ मरण पावून सार्थक झालें तर. ६ सखारामबापूची. ७ कालक्षेप. ८ दररोज.

सरदार फक्त एकीकडे; हा लौकिक सर्वत्र झाला. युद्धप्रसंगीं तुमचा नाश व्हावा ऐसी त्यांची कल्पना होती. त्या उपरी श्रीमंत माधवराऊसाहेब भेटले. तुम्हीं भेटाल त्या प्रसंगीं सहजच सांपडाल (असें त्यांस वाटत होतें.) तो ही प्रकार ईश्वरें घडविला नाहीं. आतां त्याचा[1] मनोदय[2] संधि करून भेटावें आणि सिद्धीस न्यावा हें कांहीं श्लाघ्य नाहीं! संधान करून भेटून किल्ला देऊन पुढें त्याणीं आमचें बरें करणें कळतच आहे. लौकिक मात्र फटकळ होईल. एक संकल्प सिद्धीस नेणार श्रीभगवान आहे. मजला तो दुसरें कांहीं सुचत नाहीं. तीर्थरूप राजश्री बापाजी[3] आले आहेत. आंपा[4] आले आहेत. सर्व चिरंजीव मंडळी आहे. उद्यां तुम्हीं समीप आलां ह्मणजे भेटी होईल. मग काय विचार करणें तो करावा. बहुतांचा[5] वैरी कसा जगेल? त्यास निमित्य करून ईश्वरच संहाररूपी जाहला तरी हो[6]! वरकड रास्ते बोलताती अगर दुसरे बोलतील तितकें मायावी बोलणें. लबाड. त्यांत तिलमात्र जीव नाहीं. ज्याचें नांव सखाराम त्याचा मनोदय-क्षय करावा,-हर तजविजीनें करावा! आम्हीं योजिला मनसबा ही सिद्धीस न्यावा असी ईश्वर इच्छा ह्मणोनच एवढ्या युद्धप्रसंगीं बुद्धिप्रद होऊन ते भेटीस गेले तेव्हां निघावयाची (ईश्वरानें तुम्हांस) बुद्रि दिल्ही. पुढें ही तिलमात्र भय नाहीं. आडंबर दिसेल परंतु कांहीं होणें नाहीं. नाईकांच्या[7] आसऱ्यास गेले त्यांची गत काय (ती) जाहलीच आहे. मग त्यांच्या[8] भयें करून भेटीचा योग केल्यास परिणाम उत्तम होणें कठीण, हें सर्वांस समजतें. विसाजीपंतीं[9] लिहिलें आहे कीं, मोगलाचा गुंता उरकला ह्मणजे उभयतांस[10] आणावे. वरकडांपासून ही द्रव्य घ्यावें, अब्रू घ्यावी, निर्माल्य करून सो-

---

१ सखारामबापूचा. २ तह. ३ वडीलबंधु कृष्णंभट. ४ दुसरे वडीलबंधु त्रिंबक हरी. ५ बहुतांचा वैरी सखारामबापू. ६ होवो. ७ आळेगांवच्या लढाईत. ८ बाबूजी नाईक बारामतीकर यांच्या आश्रयास बाबूराव फडणीस व त्रिंबकराव मामा गेले होते. ९ सखारामबापू वगैरे यांच्या. १० विसाजीपंत हा इचलकरंजीकर घोरपड्यांचा कारभारी. ११ माजी कारभारी फडणीस व पेठे यांस बारामतीहून लष्करांत आणावे.

डावे, [असा सखारामबापूचा हेतु आहे.] मुख्य निर्माल्य भेटीस गेले तेव्हां च जाहले. मातुश्री पुण्यांत राहिली. असा प्रकार जाहल्यावरी किल्ल्यावर न गेली. कनिष्ठ व पार्वतीबाई खालीं पुण्यास आणिलीं तेव्हां तीं निर्माल्य. रास्ते त्याचे बंधु ह्मणोन प्रतिष्ठा. ते प्रथमच दुखविले. जागां जागां आहेत ते देखिली बुद्धि करितील, यास्तव साऱ्यांचें मर्दन करून मग रास्ते यांचें करितात. दादासाहेब कैदेंत त्यांचे स्वाधीन ऐसें पुर्तें जाणावें. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद. ' रामाजीपंत करकंबकर पांच सा कोसांवरी आले ह्मणोन जासुदानें सांगितलें ' ह्मणोन लिहिलें, अपूर्व आहे ! आल्यावरी कोठें गेले होते हा शोध करून लिहावें. हे आशीर्वाद. लष्करची कैंही, पागांची कही येऊन करनाळचे कुरणचें गवत कापून काली नेलें. आजी बोभाटा आला. आजी आले तर नेतील. उद्यां कूच जाहलें ह्मणजे राहिले गवताची खरावी जाहली. कळावें हे आशीर्वाद.

नं० १३३

[मार्गशीर्ष वद्य ३
४ दिसेंबर.]

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी. तुम्हीं पत्र पाठविलें तें पावलें. लिहिलें वर्तमान कळलें. ऐशास आपण कोणे गोष्टीची फिकीर न करावी. केवळ तुम्हीं होऊन आम्हांस संकटांत टाकून जातां असा अर्थ नाहीं. आम्हींच स्वसंतोषें राहिलों.

---

१ पेशवे माधवराव. २ रावसाहेब पेशवे दादासाहेबांच्या ताब्यांत गेले हा प्रकार झाल्यावर. ३ पेशव्यांचे कनिष्ठबंधु नारायणराव. ४ पार्वतीबाई ही पानपतांत पडलेल्या भाऊसाहेबांची बायको. ५ ' आपला मोड झालेला पाहून पेशव्यांचे सरदार समयोचित वैरभाव दाखवितील या करितां त्यांस विश्वास यावा ह्मणून त्यां पैकीं रास्ते यांस सखारामबापूनें सध्या अनुकूल करून घेतलें आहे, पण बाकीच्यांचा नाश केल्यावर तो रास्त्यांचा ही करणार, ' असा अभिप्राय. ६ सखारामबापूच्या. ७ लांकूड फांटें व वैरण जमा करून नेणारी टोळी.

निमित्त जे. इतके दिवस श्रीपंढरीनाथें अबरूनें रक्षिलें. याकालीं[1] लष्करांत राहून घोड्यावर बसावयाची हिम्मत नाहीं. गांवोगांव पळत फिरणें या पेक्षां किल्ल्यांत राहणें श्रेष्ठ मनसबा जाणूनच राहिलों. तुम्हीं बाहेर शाबूत रहावें आम्हीं संतोषें करून किल्ल्यांत राहूं. त्यांच्यानें[2] आमचें कांहीं होणें नाहीं. गोळ्याचें भय मानावें तरी या किल्ल्यास गोळ्यानीं करणें काय ! (गोळे मारणारे) आपणच श्रमी होऊन राहतील. आह्मी गोळी देखील न चालवितां सुखरूप किल्ल्यांत राहिलों तरी ते काय करणार ! खंदकाजवळी अगर[3] आंत उतरले ह्मणजे वरून दगड टाकिले तरी मरोन जातील ! त्यांच्यानें × × होणें नाहीं. (आंतून) गोळ्यांचा मारा व जेजालांचा व तोफांचा बसेल तेव्हां बाहेरील ही कच्चे पक्के होतील ! तुम्हीं ऐकून ध्याल कीं किल्लेकरी यांनीं कोणे रीतीनें हिम्मत धरिली !!! श्रीकृपेनें [आतां किल्ल्यांत] सामान पुष्कळ जाहलें. आजी चिकोडीहून दारू दीडखंडी, शिसें दहा मण, तूप दहा मण, तेल पंधरा मण, तांदूळ बारा मण, येणें प्रमाणें आलें. हुबळीहून दोन खंडी शिसें आलें. मीठ पुष्कळ घेतलें. वरचेवर घेतच आहों. आजी मीठ, तांदूळ आणखी घेतों. माणसें रवाना करण्याचा मजकूर स्वार देऊन योजिला तो ही बराच आहे. उद्यां सारीं तुम्हांपाशीं जमा होतील. परवां सोमवारीं रवाना करावीं. कार्यास येईल. अगर दोन तीन मुक्काम नरवाडीवरीच[5] करून मंगळवारीं कूच अगर बुधवारीं कूच करून श्रीकृष्णापार व्हावें; ह्मणजे तेथून एक मजलीनें सिद्दापुरास जातील. वाटेस मुक्काम पडणार नाहीं. जो मनसबा कराल तो हातीं आहे. उभयतां चिरंजीव ही उद्यां येतील. त्यांच्या तुमच्या विचारें होईल तसें तेथें करावें. चार पांच मुक्काम या स्थलीं जाहले ह्मणोन चिंता नाहीं. कागवाड समीप

---

१ या वर्षांत. गोविंद हरीचें वय यावेळीं अजमासें पांसष्ट वर्षांचें असावें. २ दादासाहेब वगैरे प्रतिस्पर्धी यांच्या हातून. ३ खंदकांत. ४ घरचीं मुलें माणसें वरोवर स्वार देऊन रवाना करण्याचा मजकूर. ५ नरवाड हें मिरजे पासून सात आठ मैलांवर आहे.

आहे उत्तम प्रकारें रखवालीं करूं. कुरुंदवाडचें सारें कुटुंब आजी गणेशवाडीस आलें. आजी चौथी[2] आहे [ती] तेथें करून उदईक लष्करांत दाखल होतील. मग सोमवारीं अगर मंगळवारीं सारियांनींच कूच करून कृष्णा अलीकडील तीरीं अगर पलीकडील तीरीं मुक्काम करावा. तेथून एक मजली लांब करून सिद्दापुरास जावें. तुम्हीं तिलमात्र ये विशीं चित्तांत श्रम न मानावे. संतोषरूपें रहावें. तुम्हीं संतोषी [असलां] म्हणजे आम्हीं कोणाचा हिसाब धरीत नाहीं. वरकड लिहिले प्रमाणें बंदोबस्ती करितों. गैर माणूस वाडियांत घेत नाहीं. आम्हींच सारा वेळ बाहेर बसत जाऊं. वाडियांत*—

नं० १३४

(मार्गशीर्ष वद्य ४
५ दिसेंबर.)

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वादें उपरी. तुम्हीं पत्रें पाठविलीं तीं तीन तास रात्रीस पावलीं. तीर्थरूपांची आपली भेट जाहली व चिरंजीव उभयतांची जाहली; या उपरी जो मनसबा पोक्ता कर्तव्य तो करावा. त्रिंबकराऊ मामाच्या पत्रांत अवसान नाहीं. बाबूरावाच्या पत्रांत भय आणि धैर्य दोन्ही लिहिलीं आहेत. परंतु तुम्हांस एकच बुद्धि. दुसरी बुद्धि करितां नये. ईश्वरें योजिलें असेल तें खरें. ते[6] होऊन संधीचा प्रकार करतील तरी त्यांचा विश्वास नाहीं. आ-

१ पटवर्धनांचे मूळ पुरुष व गोविंद हरी वगैरे वंधूंचे वडील हरीभट बावा यांस शाहूमहाराजानीं कृष्णानदीच्या तीरीं कांहीं जमीन इनाम दिली. तेथें सदरहू भटजी बावा यानीं गांव वसवून त्यास गणेशपूर किंवा गणेशवाडी असें नांव ठेविलें. हें गांव मिरजेपासून वारा चवदा मैलांवर आहे. २ ज्या दिवशीं हें पत्र लिहिलें गेलें त्या दिवशीं तृतीयायुक्त चतुर्थी होती. ३ पर्वा. * हें पत्र इतकेंच अपूर्ण सांपडलें. शेवटचा बंद गहाळ झाला आहे. ४ नं० १३३ व १३४ हीं पत्रें गोविंद हरीचीं गोपाळरावास. ५ त्रिंबक हरीची. ६ नारायणराव व मोरोबा यांची. ७ दादासाहेब, सखाराम बापू वगैरे.

पण होऊन करणेंच नाहीं. यांत लज्जारक्षक श्रीपंढरीनाथ आहे. भानापास आजी निरोप देऊन लाऊन दिला. सर्व उभयतां चिरंजीव सांगतील त्या वरून कळेल. सावध राहणें. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

नं० १३९

(अजमासें मार्गशीर्ष शुद्ध
नोवेंबर दु० पंधरवडा.)

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी. तुम्हीं जासुदा बरोबर पत्र पाठविलें तें आजी मंदवारीं पांच घटिका रात्रीस पावलें. लष्करचें पत्र पावलें. आह्मीं ही पत्रें पाठविलीं आहेत. साहित्याचा मजकूर लिहिला तरी रात्र दिवस तोच ध्यास दुसरा विचार नाहीं. आजी गल्ला दहा खंडी किल्ल्यांत आणिला. या शिवाय बाजारांतून तांदूळ बीस बेचाळीस गोणी व मीठ चार गोणी व कुरुंदवाडाहून तांदूळ ददा गोणी व मीठ सात गोण्या असें आले. निजध्यास तोच आहे. लोखंड घेतों. आजी पांच मण पक्का घेतलें. दारूगोळीची तरतूद केली आहे. येईल तेव्हां खरें! गल्ला कोठून बाहेरून आणावयाचा नाहीं. मिरजेंत गांवांत घरोघर पेवें आहेत तीं आमचींच आहेत. घरें मोडून लांकडें आणूं. तूप, तेल पाहिजे त्याची तरतूद करीत आहों. तुपाच्या जोड्या[3] या मुलखांत मिळत नाहींत. मिरज प्रांतीचीं खेडीं तमाम पळालीं. एक एक गांवास चार चार माणसें पाठविलीं. मिरच्या, भांग, तमाकू, गूळ हा जिन्नस किल्ल्यांत आणिला आहे. जो येतो तो ह्मणतो "दाणा जकेरी[4] आधीं भरावा!" त्या त्यासीं घाबरेपणें "नाहीं संग्रह" म्हणत नाहीं. "चिंता

---

१ हें गोविंद हरीचें गोपाळरावास पत्र. यांतील मजकूर पुनः वाचून पाहिल्यावर या पत्राची नंबरवारी चुकली असून हें कांहीं नंबर मागें पाहिजे असें या पूर्वीचीं पत्रें छापून झाल्यावर उमगलें. २ धान्य व दारूगोळी वगैरे सामान किल्ल्यांत भरावयाचें त्याचा. ३ तुपाच्या बुधल्यांच्या जोड्या. ४ सर्व. ५ धान्य व दारूगोळी वगैरे सामान.

काय ? पुष्कळ आहे, " म्हणतों. या मुळें लोक ही (तसेंच) बोलतात! आजी प्यादे यांस ताकीद केली [कीं] " दर असामीस दोन दोन मण दाणे घेऊन ठेवणें. " त्यापैकीं दोनशें असामीनीं दर मण प्रमाणें घेतला. एक जिन्नस दहा खंडी गल्ला किल्ल्यांत आला. या खेरीज एरंडोलीचा[2] गल्ला पन्नास बैल व किरकोळ दहा बैल एकूण साठ बैल–सरासरी बारुलें दहा खंडी–गल्ला. येकूण वीस खंडी आला. शिवाय तांदूळ दोन खंडी. साराच प्रसंग निकडीचा आला. पैसा खर्चास संग्रह नाहीं. होन नाणें आहे त्यास काय करावें ! येथें होन घेऊन रुपया द्या म्हटलिया मिळत नाहीं. ऐसी अवस्था आहे. शंभर गोष्टी भयाच्या लिहिणार[3] मायेनेंच लिहितात, परंतु घडी घडी बुद्धि केल्यानें परिणाम नाहीं. कपाळास आलें तें खरें ! त्यांत जिणें मरणें ईश्वर इच्छेनें होणार तें होऊ ! एक मुख्य येत नाहीं आणि सरदार येणार त्यांस ही भय आहे. बातमी फार राखावी. बातमीस अंतर करूं नये. बरे पुढें आलेसे जाहले म्हणजे रोज त्यांवरी आवया घालाव्या. बाण सोडावे. गोळ्या माराव्या. माणसें मारावीं. वेड * * करावीं ! आधींच तुमच्या नांवाचा धाक इभ्रत ईश्वरसत्तेनें भारी आहे. ' बारामतींतील गृहस्थ[4] धरून दिले ' म्हणोन लिहिलें, त्यावरून परम चिंता लागली. तुम्हांस खबर आहे कीं नाहीं ? हें जर खरें असिलें तरी घरच बुडविलें ! मग नाईक थोर म्हणावे ! मारावें कीं मरावें. या उपरी भय

१ घेतलेला. २ एरंडोली हें मिरजेजवळचें एक खेडें आहे. ३ हे लिहिणारे लोक दादासाहेबांच्या लष्करांत असून तेथून गोपाळरावास बातमीचीं पत्रें पाठवीत असत. ४ मिरज घेण्याकरितां दादासाहेब स्वतः येत नसून त्या कामावर विंचूरकर, नारो शंकर व वर्वे हे तोफखान्यासह रवाना झाल्याची पूर्वी गमाजी बाबाची चिठी छापली आहे तींतील मजकुरास अनुलक्षून हें गोविंद हरीचें लिहिणें आहे. ५ दादासाहेबांकडून कोण सरदार येतील त्यांवर. ६ बाबूराव फडणीस व लिंबकराव पेठे हे बारामतीस बाबूजी नाईकाच्या आश्रयास गेले असतां नाइकानें त्यास धरून दादासाहेबांच्या हवालीं केल्याची खोटीच बातमी या वेळीं गोपाळरावास कोणी कळविली होती, तीस अनुलक्षून हें गोविंद हरीचें लिहिणें.

धरून काय होणें ? एक दोन राजकारणें केलीं आहेत. एखादें साधलें तर माणसें मात्र ठेविण्या स्थल मिळालें ह्मणजे क्षीत नाहीं. तेवढें संकट आहे. कुरुंदवाडाचा बंदोबस्त आहे ईश्वर लज्जारक्षक. तोच क्षोभला तरी उपाय नाहीं ! मातुश्री[1] पुण्यास आली ह्मणजे कैदेंत पडली ! परिच्छिन्न बुडोन मुख्य कैद जाहले. दादासाहेब[2] नांवाचे मात्र. त्यांणीं आपल्या घरास पेशवाई आणिली. परंतु त्यांच्यानें रक्षवत नाहीं. मोगल[3] भारी. हे त्याच्या आहारीं. त्याच्या नजरेंत कोणी नाहीं. फौजा मिरजेस आल्या उपरीं आसपास तुह्मीं राहून कस्त मेहनत आठ पंधरा दिवस करून पाहणें. नाहीं तेव्हां हर कोठें पोट भरावया फौज घेऊन जाणें. आम्हीं जाणों ते जाणो ! किल्ल्याचें कोणें काय करणें ? गोरेंगरीबें असलीं तरी एकदिल असावीं ! तुम्हीं शें दोनशें शिपाई कोण ठेवणार ते नेमून ठेवणें. चिरंजीव भास्कर पंत येथें असावे. श्रीपंढरीनाथ समर्थ आहे. किल्ला आम्हीं जिवंत (आहों) तों दुसरियाच्या हातास जाणार नाहीं. घोड्याचा खर्च फारसा नलगे. दहा वीस घोडे फार झाले तरी असावे. हजार दीड हजार माणूस फक्त असिलें ह्मणजे झालें. दारूगोळीचा प्रयत्न केला आहे. ते येणारच खरे, तरी यावयास एक महिना पाहिजे. उडोन येतात असें नाहीं ! तुम्हीं आह्मांस घाबरें न करणें. विचारें विचारें सर्व ही साहित्य करितों. ' येतात, घांटे[6] चढले, ' अशी बातमी आली ह्मणजे शहरांतील गल्ला–लुटीस हुकूम

---

१ ' गोपिकाबाई सिंहगड सोडून पुण्यास आली तर कैदेंत पडेल, ' असा लिहिण्याचा अभिप्राय. २ सखारामबापूनें. ३ ' दादासाहेब व निजामअल्ली हे सांप्रत एकत्र आहेत. त्यांत निजामअल्ली बलाढ्य असल्यामुळें तो यांस खातरेस आणीत नाहीं. अर्थात् हल्लीं सखारामबापूच्या हातीं पेशवाईचा जो सर्व अधिकार आला आहे तो त्याजकडे नसावा असें निजामअल्लीच्या मनांत आल्यास तो त्याजकडून अधिकार काढून दुसऱ्याच्या हातीं देईल किंवा आपणच बळकावून बसेल, ' असा लिहिण्याचा अभिप्राय. ४ ' आम्हीं गरीब असलों म्हणून काय झालें ? एकदील असल्यावर आम्हांस कोणाची भीति नाहीं. ' असा भाव. ५ दादासाहेबांकडील सरदार आह्मांपासून मिरज घेण्याकरितां येणार असले तर. ६ घांट खांबटकीचा किंवा साल्प्यांचा.

देऊं. तमाम किल्ल्यांत नेऊं. चिंता काय? आठ दिवसांत गल्ल्याची रेलै[1] करूं! दारूगोळी यावी. "सानेकूलो जगन्नाथ विप्रीत: सुप्रीतो भव." जरी श्रीपंढरीच्या नाथाचे मतें आमची लज्जा रक्षणें आहे तरी सर्व ही अनुकूल होईल. प्रतिकूल काल असिला तर उपाय नाहीं. मग मरणें. दुसरा विचार नाहीं. (ही) खातरजमा असों द्यावी. आजी सखारामाचे मनोरथ पूर्ण करावे, फिरोन जाऊन तेथें सेवा करावी, त्याच्या लाता सोसाव्या, हें तो होणेंच नाहीं! तो तरी किती दिवस वांचणार! त्याचें भरतें आलें. इतक्या विश्वाचें वाईट, घण्याचें वाईट, (त्यानें) केलें. त्याचें बरें कसें होईल? ते[4] आजी कृतकर्मे जाहले. निर्लज्जपणें त्या कचेरींत कोण जाईल? आम्हीं कांहीं निमकहरामी त्या सारखी केली नाहीं! परलोकीं तरी देवाचे घरीं खरे. तुम्हीं सावध असावें आणि कल्याणरूप असावें, हेंच ईश्वरापाशीं मागतों. दुसरी आशा तिलमात्र नाहीं. आणखी दौलत मागत नाहीं. तुम्हीं जातीनें व आपली सर्व मंडळी हर एक स्थलीं संतोषरूप असावें हेच वासना! [तुमचें लष्कर] तासगांवापाशीं आल्यानें मुलखाचा सत्यानाश होईल. लोकांचा अपवाद आपणच घ्यावासा होतो. ते[5] चालोन आलिया-

---

१ रेलचेल, विपुलता. २ या अशुद्ध श्लोकार्धाच्या भरतीचें श्लोकार्ध काय आहे या विषयीं शोध करितां करितां ऐशीं वर्षांच्या एका बहुश्रुत गृहस्थानें आह्मांस खालीं लिहिल्या प्रमाणें संबंध श्लोक ह्मणून दाखविला.

अंधक:कुब्जकश्चैव राजकन्या त्रयस्तनी ॥
सानकूलो जगन्नाथो विप्रीत:सुप्रीतोभवेत् ॥ १ ॥

हल्लीं पंचतंत्राच्या उपलब्ध प्रतींत हा श्लोक सांपडत नाहीं हें खरें, पण गोविंद हरीच्या वेळीं हा श्लोक असाच ह्मटला जात असेल यांत संशय नाहीं. यावरून ध्यावयाचें काय, कीं ज्यावेळीं छापण्याची कला कोणास माहीत नव्हती, अशा ही वेळीं पंचतंत्रांतील गोष्टी हल्लीं प्रमाणेंच लोकप्रिय होत्या! ३ पटवर्धन शरण गेले ह्मणजे सखारामबापूचे मनोरथ पूर्ण झाले. ४ सखारामबापू वगैरे. ५ 'शत्रू चालोन आल्यावर त्यांशीं लढाई करण्यांत आपल्या मुलखाची नासाडी होईल तर होवो, परंतु त्या शिवाय आपण होऊन न करूं नये.' असा लिहिण्याचा अभिप्राय.

वरी जें होणें तें होऊ ! सर्वांचे मतें असलिया लक्ष प्रकारें यावें. अगर आमचे मतें आधींच निघोन गोकाक प्रांतें डोंगर कठाडियानें रहावें. तेथून सडे होऊन रोज फौज येत चालली ह्मणजे त्यांजवरी हवाई करावयास येईल. भूपाळगडाकडे जाऊं नये. तेथून रोज तिकडील जवळ अगर काकलेयाकडे [?] यावें. जत जवळ. पलीकडे मंगळवेढें. अलीकडे बारा कोस मिरज. येथें रहावें. अगर ऐनापुराकडे यावें. आम्हांसीं (आमच्या वैऱ्यानीं) दगाबाजी केली आहे, परंतु आपण उतावळी आधीं करूं नये. चार दिवस तासगांवच्या सुमारें लक्ष प्रकारें यावें. सर्वांच्या मतें आलें तेंच बरें. लष्करांत ताकीद करावी. कांहीं चिंता नाहीं. ' रुपये पाठवा ' म्हणोन लिहिलें, त्यास नीलकंठराई रुपये आहेत. ' पाठवा ' म्हणाल तर पाठवून देऊं. बातमीविशीं आळस करूं नये. बहुत काय लिहिणें. लोभ असों दीजे. हे आशीर्वाद.

नं० १३६

[१२ दिसेंबर.]

श्रीगणपतिर्जयति.

चिरंजीव राजश्री माधवरावु[3] यासीं प्रती गोविंद हरी. आशीर्वाद उपरी येथील कुशल तागायत मार्गशीर्ष वद्य १२ रविवार यथास्थित असे. विशेष. तुम्हीं ' विड्याचीं पानें पाठवितों ' ह्मणून लिहिलें होतें, त्यास (तु-

१ छापा घालण्याची हूल. २ भूपाळगड हा सातारा जिल्ह्यांत खानापुरापासून पंधरा मैलांवर आहे. ३ माधवराव हा कृष्णंभट मंगळवेढेकर यांचा मुलगा व गोविंद हरीचा पुतण्या. हा या वेळीं सिदापूरचे ठाण्यांत होता. याचे वडील बंधु नारायण राव व पुरुषोत्तमराव यांचीं नांवें या पुस्तकांत पूर्वी अनेकदां आलीं आहेत. दुसरे दोघे बंधु मेघश्यामरावबापू व बळवंतराव यांचीं नांवें ही पुढें या पुस्तकांत पुष्कळ वेळां येतील. इ. स. १७७० (श० १६९२) या वर्षी माधवराव पेशव्यांची हैदरअल्लीवर तिसरी स्वारी झाली तींत पटवर्धनांवर हैदरअल्लीनें एके प्रसंगीं छापा घातला. त्या गर्दीत या माधवरावाच्या पायास तोफेचा गोळा लागून तो त्या जखमेनें पुढें थोड्क्याच दिवसांत मरण पावला.

म्हांस) स्मरण न झालें ! या उपरी अवकाश नाहीं. श्रीमंत[1] सातारियाहून निघाले म्हणजे येथें येतात. येथें ही सर्व तरतूद आहे. लज्जारक्षक श्रीभगवान् ! पानें व वांगियाच्या काचऱ्या पाठवून देणें. जलदीनें पाठवाल तर पाठवणें. बहुत काय लिहिलें लोभ असों दीजे. तुम्हीं सावध राहणें. वरचेवर आमचा परामर्ष करीत जाणें. आम्हांविशीं चिंता किमपि न करणें. हे आशीर्वाद.

पै॥ छ० २८ जमादिलावल.

नं० १३७

[१७ दिसेंबर.]

श्रीगणपतिर्जयति.

चिरंजीवे[2] राजश्री माधवराऊ यासीं प्रती गोविंद हरी. आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत पौष शु० २ भृगुवार. यथास्थित जाणून स्वकीय लिहिणें. विशेष. तुम्हीं पत्र पाठविलें तें पावलें. विड्याचीं पानें पाठविलीं तीं पावलीं. पानांबद्दल आम्हीं दोन पत्रें तुम्हांस पाठविलीं परंतु पावलीं नसतील. चिरंजीव राऊसाहेब[3] मंगळवारीं कुरुंदवाडास आले. काली गुरुवार पावेतों हेरवाड[4] तेरवाड नजीक मुक्काम होता. आजी कूच होऊन कोणीकडे येतात पहावें. श्रीमंत[5] सातारियाहून निघाले. मंगळवारीं[6] माहुली संगमास आले. परवां बुधवारीं जासूद निघाला तो काली येथें आला. बुनगें पिलवाकडे [?] सरकारचें होतें तें ही त्याणीं आणविलें. मिरजेस

---

१ दादासाहेब व रावसाहेब पेशवे. हे त्यावेळीं साताऱ्या पर्यंत येऊन पोंचले होते. २ नं० १३७ व १३८ हीं गोविंद हरीनें माधवराव अण्णास एकाच दिवशीं परंतु निरनिराळ्या वेळीं लिहिलेलीं पत्रें आहेत. ३ गोपाळराव. ४ हीं दोन्हीं गांवें कुरुंदवाडाजवळच आहेत. ५ रावसाहेब पेशवे व दादासाहेब. ६ मंगळवार मार्गशीर्ष वद्य चतुर्दशी तारीख १४ दिसेंबर रोजीं उभयतां श्रीमंत साताऱ्याहून निघून माहुली संगमास आले.

येणार. येथें ही सामान तरतूद जाहली आहे. चिरंजीव दाजी मेहनतीस कमी करीत नाहीं. एकनिष्ठ सेवक आहों. श्री कृपाच करील. कांहीं फिकीर बागवीत नाहीं. तुम्हीं वरचेवर समाचार घेत जाणें. सर्व बंदोबस्ती शिदापुरीं असों द्यावी. खासा श्रीमंत येतील तेव्हां शिदापुरीं लढाई द्यावी. सर्व सामान सरंजाम तरतूद असों देणें. तो ही जागा बिकट आहे. आधीं तो कोणी तेथें येत नाहीं. आले तर चुकों नये. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे. हे आशीर्वाद.

नं० १३८

१७ दिसेंबर.)

श्रीगणपतिर्जयति.

चिरंजीव राजश्री माधवराऊ यांसी प्रती गोविंद हरी. आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत पौष शु० २ भृगुवार चतुर्थ प्रहर. यथास्थित असे. विशेष. तुम्हीं पत्र पाठविलें तें पावलें. लिहिलें वर्तमान कळलें. विद्याचीं पानें पावलीं. चिरंजीव राऊसाहेब आजी कुर्डेची जवळी मुक्कामास गेले. चिरंजीव नारायणराऊ थोडी फौज घेऊन (येथें) प्रहर दिवसास आले. सायंकाळीं उद्यांचा दिवस राहून परवां जातील. तुम्हीं बहुत सावधपणें राहणें. सातारियाकडील बातमी—बुधवारचा मुक्काम माहुली संगम, गुरुवारीं काली कूच केलें असेल तो न कळे. तुम्हीं प्यादे मेळवीत आहां, इकडे पाठविणार, ह्मणोन चिरंजीवानीं सांगितलें; त्यावरून कळलें. ऐशास

---

१ पुरुषोत्तमराव दाजी हा ज्यास पत्र लिहिलें आहे त्या माधवरावाचा वडील बंधु. २ शिदापूरचें ठाणें. ३ लढाई देण्यास चुकूं नये. ४ कुडची हें गांव मिरजे पासून २५ मैलांवर असून कृष्णेच्या तीरीं आहे. येथें सदर्न मराठा रेलवेचें स्टेशन आहे. हा सारा गांव मुसलमान शिलेदारांस इनाम बादशाही पासून चालत आहे. येथील पुष्कळ मुसलमान शिलेदार पटवर्धनांच्या फौजेंत होते. ५ ज्यास हें पत्र लिहिलें आहे त्या माधवरावाचा हा सर्वांत थोरला बंधु. ६ मुक्काम पेशव्यांच्या लष्कराचा.

भले बरकंदाज मिळाले तर अगत्य पाहून पाठवणें. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

नं० १३९

(मार्गशीर्ष वद्य त्रयोदशी
१३ दिसेंबर.)

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद[2] उपरी. सातारियाकडून रामाजी[3] केशवाचा पुतण्या तुमच्या नांवें लाखोटा घेऊन आला तो आजी आम्हांजवळी आला होता. आम्हीं लाऊन दिला. कल्याणी मंगळवारीं चोवीस घटिकांत आहेत. सिंदे[4] यांचीं मुलें सायंकाळीं लाऊन देऊं, अगर बाहेर राहतील; परंतु तुम्हांजवळी येतील. तुम्हीं उद्यांचा दिवस मुक्काम करावा. सारें कुटुंब तुम्हांजवळ जमा झालें तें कल्याणी मुहूर्तावरी न्यावें असा विचार नाहीं. उद्यांचा दिवस तेथेंच मुक्काम करावा. परवां बुधवारीं कूच करून कृष्णापार व्हावें, असें आमच्या विचारास येतें. चिरंजीव दाजीस येथें सायंकाळीं अगर परवां इकडे रवानगी करावी. चिरंजीव आले. उत्तम गोष्ट झाली. आजी उद्यांच्या दिसांत बातमी ही येते. वर्तमान कळेल. असें आमच्या विचारास येतें. यांत आपल्या सर्व मंडळीच्या विचारें होईल तें करावें. हे आशीर्वाद.

---

१ बंदुकीचें निशाण मारणारे. २ हें गोविंद हरीचें गोपाळरावास पत्र. हें चुकून पुढें लागलें आहे हें आंतील मजकुरावरून व वर दिलेल्या मितीवरून ध्यानांत येईलच. ३ हा कोण हें कळत नाहीं. ४ मुलें मनोळीकर शिंद्यांचीं, ऐवजाच्या फेडी करितां पटवर्धनांकडे ओलीस होतीं.

गोविंद हरि मिरज झुजवितो.

श. १६८४ इ. स. १७६३

निजामअल्लीची भेट होऊन तो आपल्या मुलखाकडे परत निघून गेल्यानंतर दादासाहेबांचीं स्वारी पटवर्धनांपासून मिरज घेण्याकरितां निघाली. त्यां बरोबर चाळीस पन्नास हजार सैन्य होतें. विठ्ठल शिवदेव विंचूरकर, नारो शंकर राजेबहादर, आबा पुरंदरे, विसाजी कृष्ण बिनीवाले, खंडेराव दरेकर सरलष्कर हे त्या सैन्यांत मुख्य सरदार होते. रावसाहेब पेशवे ही समागमेंच होते. इतउत्तर झालेल्या सर्व मसलती दादासाहेब व सखारामबापू यानीं पेशव्यांचें नांव पुढें करून केल्या व रावसाहेब पेशवे यानीं ही त्यांस प्रत्येक प्रकरणीं मना पासून मदत केली. या करितां आतां यापुढें अमुक अमुक गोष्ट दादासाहेबानीं केली असें म्हणण्या ऐवजीं ती पेशव्यानीं केली असें आम्हीं लिहित जाऊं.

श्रीमंतांचें लष्कर कांहीं दिवस साताऱ्यास मुक्काम करून तेथून श्रीक्षेत्र माहुलीवरून येत येत रामापूर कमळापूर पर्यंत आलें. तों गोपाळराव आपली पांच सात हजार फौज होती ती घेऊन मिरजेच्या दक्षिणेस पंचवीस मैलांवर कुडची श्रीकृष्णातीर येथें जाऊन राहिला. श्रीमंत मिरजेस आल्यावर प्रथम गोपाळरावानें किल्ला आपणाकडेच राहूं देण्याविषयीं दादासाहेबांस विनंती पत्र पाठविलें. परंतु त्यांच्या मनांत किल्ला हरएक प्रकारें घ्यावयाचा असल्यामुळें त्यानीं गोपाळरावास कपटानें सांगून पाठविलें कीं, तूर्त तुम्हीं स्वस्थपणानें कृष्णातीरीं रहा, तुमच्या विनंतीचा विचार करून कांहीं तडजोड काढण्यांत येईल. इकडे गोविंद हरीशीं त्यानीं बोलणें लाविलें कीं तुमच्या कर्जाची तीन वर्षांत फेड करूं. परंतु तुम्हीं आतांच्या आतां किल्ला हवालीं केला पाहिजे ! हें बोलणें त्यानें अर्थातच साफ नाकारिलें. तेव्हां बलात्कारानें किल्ला घेण्याचा निश्चय होऊन किल्ल्यास फौजेचा वेढा बसला व मोर्चे सुरू झाले. मोर्चे सुरू होण्याच्या आधीं दोन

दिवस दादासाहेबानीं आबापुरंदऱ्या बरोबर दहा हजार फौज देऊन त्यास गोपाळरावास 'लुटण्या' करितां पाठविलें होतें. त्यानें जमखिंडीजवळ गोपाळरावास गांठिलें. तेथें घटकाभर लढाई होऊन गोपाळरावाचा पूर्ण पराजय झाला. त्याचें सबंध लष्कर लुटलें गेलें. त्या गर्दीत तो व नारायणराव पन्नास पाउणशें स्वारांनिशीं निजामअल्लीकडे पळून गेले व वामन राव, परशुरामभाऊ व दुसरे पटवर्धन सरदार यादवाडाकडे पळून गेले. या प्रमाणें विजयी झाल्यावर आबा पुरंदरे गोपाळरावाचीं कर्नाटकांत ठाणीं होतीं तीं काबीज करीत चालला. ही बातमी पेशव्यांच्या लष्करांत येतांच किल्ल्यांतील लोकांची गोपाळरावाच्या पराजयानें हिंमत खचली असेल असें समजून श्रीमंतानीं किल्ल्या बाहेर 'जिभी' झणून. चौकी होती ती हल्ला करून घेण्याचा यत्न केला. परंतु तेथें गोविंद हरीचा पुतण्या पुरुषोत्तमराव होता त्यानें मर्दुमी करून हल्ला माघारा फिरविला. तेथें चार घटका तुमुल युद्ध झालें. त्यांत श्रीमंतांकडील पन्नास पाउणशें माणूस ठार व दोन तीनशें पर्यंत जखमी झालें. नंतर आपल्या हातून जिभीचें नेहमीं रक्षण होणार नाहीं, असें समजून किल्लेकरी ती चौकी सोडून देऊन व खंदकावर पूल होता तो जाळून टाकून किल्ल्यांत गेले.

मिरजेच्या किल्ल्या भोवती तिहीं बाजूनीं सखल प्रदेश असल्यामुळें शत्रूचा मारा त्या बाजूनीं चालत नाहीं. एक उत्तरेकडून व उत्तर आणि पूर्व यांच्या मधील कोंपऱ्याकडून मारा करण्यास जागा आहे. या प्रसंगीं त्याच बाजूनीं किल्ला काबीज करण्याचा पेशव्यांचा सर्व एलगार चालला होता. एकंदर मोर्चे तेरा चवदा होते. त्यांत विंचूरकर, नारो शंकर, विसाजी कृष्ण, व रामचंद्रराव जाधव यांचे मोर्चे भारी होते. मोठमोठाले उंच धक्के बांधून त्यांजवर तोफा, गरनाळा, व जेजाला चढवून त्यांचा सारखा भडिमार किल्ल्यावर चालू ठेवण्यांत आला होता. किल्लेकरी ही हिमतीनें व आवेशानें झुंजत होते. यामुळें एक एक पाऊल पुढें टाकण्यास पेशव्यांच्या फौजेस महा प्रयास पडत.

गोपाळराव मोगलाकडे गेल्याचें पूर्वी लिहिलेंच आहे. तेथें विठ्ठल सुंदर [मोंगलाचा दिवाण] व स्वतः निजामअल्ली यानीं गोपाळरावाचा बहुमान करून त्यास आश्वासन दिलें कीं, तुझ्या कुमकेस फौज देऊन मिरजेचा वेढा उठविण्या करितां तुझी लवकरच रवानगी करितों. त्यावरून गोपाळराव ही मिरजेस पत्रें पाठवूं लागला कीं, आम्हीं जलदीनें फौज घेऊन तुमच्या कुमकेस येत आहों. आम्हीं येऊं पर्यंत हर प्रयत्नानें किल्ला रक्षावा. त्याबरून किल्ल्यांतील लोकांस दुप्पट हुरूप चढला. त्यानीं निराश न होण्याचीं दुसरीं ही कांहीं चमत्कारिक कारणें होतीं त्यांचा उल्लेख येथें केला पाहिजे. गोविंद हरीची ज्याच्या ठायीं निस्सीम भक्ति, असे कोणी स्वामी वेढा बसण्या पूर्वी दोन दिवस किल्ल्यांत येऊन राहिले होते. तुमचें अरिष्ट निरसन करण्यासाठीं मी आलों आहें असें ते सांगत, लढाई करण्याविषयीं ते किल्ल्यांतील लोकांस हिंमत देत व बुद्धिवाद सांगत ! वेढा उठावा ह्मणून देवास संकट घालण्यासाठीं सदरहू स्वामी निरशन उपोषणें करीत होते! त्या शिवाय 'ग्रामाधिपति' पीर, नरसोबा, ग्रामदैवत ह्मसोबा हे सर्व आपणास अनुकूल आहेत असा किल्ल्यांतील लोकांचा बळकट ग्रह झाला होता ! गोविंद हरीच्या पत्रांत या विषयीं जागोजाग उल्लेख आहेत व तो दर पत्रांत लिहितों कीं, ' बाहेरून तोफा, गरनाळा, जेजाला, बाण, बंदुका यांच्या माराची सारखी वृष्टि होत आहे, परंतु किल्ल्याभोंवतें श्रीपंढरीनाथाचें सुदर्शनचक्र फिरत असल्यामुळें आंत कोणास फारशी इजा होत नाहीं ! ' हे विचार वाचून ते लिहिणाऱ्याच्या देवभोळेपणा बद्दल आमच्या वाचकांस हसूं येईल हें आम्हांस ठाऊक आहे. पण त्यानीं असा विचार करावा कीं, अशा या देवभोळेपणाच्या बळावर हजार बाराशें लोकांस पन्नास हजार फौजेशीं सव्वा महिनापर्यंत टक्कर मारितां आली ! पौष शुद्ध त्रयोदशीस किल्ल्यास मोर्चे बसले, ते खंदकाच्या पाळीवर येण्यास चवदा दिवस लागले. तेथें मोर्चे येतांच दुसरे दिवशीं ह्मणजे पौष वद्य द्वादशीस रात्री किल्ल्यांतील लोक बाहेर येऊन मोर्च्यांवर तुटून पडले व हिलाल चं-

द्रव्योती लावून त्यांच्या उजेडांत शें पन्नास माणूस कापून काढून पुनः सुरक्षितपणें किल्ल्यांत गेले! त्यानंतर तीन दिवसानीं पुनः तोच प्रकार झाला. नंतर रावसाहेब पेशवे स्वतः दर रात्रीस मोर्च्यांत येऊन बसूं लागले व त्यामुळें सर्व सरदार ही लाजून दररोज आपापल्या मोर्च्यांत राहूं लागले. त्या नंतर किल्लेकरी पुनः मोर्च्यांत आले नाहींत.

भवानराव प्रतिनिधि व त्याचा मुतालीक गमाजी यमाजी व गोपाळ राव पटवर्धन व दुसरे कित्येक मराठे सरदार निजामअल्लीस मिळाले होते व जानोजी भोंसल्याचें ही त्याजकडे सूत्र लागलें होतें. परंतु पेशव्यांशीं कलह करण्याचा त्याचा अद्यापि निश्चय झाला नव्हता. त्यामुळें गोपाळरावाच्या मदतीस कबूल केल्या प्रमाणें त्यानें फौज दिली नाहीं. तो पेशव्यांस बदकावणीचे निरोप मात्र पाठवी, पण त्याचें लष्कर तर मिरजेकडे न येतां उलट दक्षिणेस रायचुराकडे दरमजल चाललें होतें! कुमक करण्या विषयीं जानोजी भोंसल्याची गोपाळरावानें विनवणी केली पण तिचा ही या वेळीं कांहीं उपयोग झाला नाहीं. त्या नंतर ही गोपाळरावाचीं मिरजेस 'एवढा माघ महिना कसें तरी करून' दम धरा तों फौज घेऊन तुमची मुक्तता करण्यास येतों.' अशा अर्थाचीं पत्रें येतच होतीं. पण किल्ल्यांतील लोकांस त्याजकडून मदत मिळण्याची आशा राहिली नाहीं. तथापि ते निराश न होतां पूर्वी प्रमाणेंच उत्साहानें व आवेशानें लढत होते. किल्ल्याच्या रक्षणाची सर्व व्यवस्था पुरुषोत्तमराव व भास्कर हरि यांची होती. त्यांवर देखरेख स्वतः गोविंद हरीची असे.

इकडे बाहेरील लोकांचे ही किल्ला घेण्याचे प्रयत्न अव्याहत चालू होते. ते तोफा मारून किल्ल्याच्या तटबंदीची जागोजाग भिंत पाडीत, व किल्लेकरी त्याच रात्रीं तेथें नवी भिंत बांधन काढीत! गोविंद हरि लिहितो कीं, "तमाम डेरे, राहुट्या फाडून पिशव्या करून आंत माती भरून त्याजवरी पाणी ओतून भिजवून पिशव्या लाविल्या. त्यांजवर तोफेच्या गोळ्यांचा काट चालत नाहीं." श्रीमंतांच्या फौजेपैकीं शें पन्नास माणूस

आंतील गोळ्यानीं दररोज मरत होते. तथापि त्यांचे मोर्चे खंदकावर येऊन पोंचले तेव्हां त्यानीं खंदक उतरून किल्ल्याच्या एका बुरुजास तीन सुरुंग लाविले. परंतु त्यां पैकीं दोन व्यर्थ झाले. एक मात्र उडाला परंतु त्यानें बाहेरीलच माणूस फार मेलें ! नंतर उत्तरेच्या बाजूस एक बुरूज आहे तेथें नारो शंकराचा मोर्चा होता, त्या बुरुजास सुरुंग खोदण्यास सुरुवात झाली. तें काम पूर्ण होतें न होतें तों आंतून सुरुंग तयार करून तो आपल्या सुरुंगास आणून मिळवून आपला सुरुंग व्यर्थ करण्याची किल्लेकऱ्यांची खटपट सुरू असल्याचा श्रीमंतांस सुगावा लागला ! तेव्हां माघ वद्य प्रतिपदेस त्या सुरुंगास बत्ती देऊन बुरूज उडवावा व त्या गर्दीत हल्ला करावा असा मनसबा ठरला. त्या प्रमाणें त्या दिवशीं सुरुंगास बत्ती देण्यांत येऊन हल्ला ही झाला. सर्वांपुढें निशाण व त्या मागें श्रीमंतांची अंबारी होती. हल्ला मोठ्या निकराचा झाला. पण आंतील लोक ही तयारच होते. त्यानीं जिवावर उदार होऊन अशा शौर्यानें युद्ध केलें कीं, बाहेरील दोन तीनशें माणूस ठार व जखमी होऊन हा ही हल्ला माघारा फिरला ! श्रीमंत हतप्रभ होऊन गोटास परत आले. त्या रात्रीं त्यानीं रागानें व दुःखानें उपवास केला!

त्या रात्रीं किल्लयांत जाधव मंडळी शंभर असामी शिलेदार होते ते व इतर शिलेदार व शिबंदीचे बहुतेक प्यादे यानीं गोविंद हरीकडे येऊन त्यास सांगितलें कीं, " इतःपर आमच्यानें लढवत नाहीं. तुम्हीं काय पाहिजे तें करा. " गोविंद हरी लिहितो कीं, या लोकांपुढें " आम्हीं पदर पसरिला, दाढी वोठीं धरिलें, पण न ऐकत ! चांडाळानीं घर बुडविलें!!!" मग निरुपायानें गोविंद हरीनें दुसरे दिवशीं श्रीमंतांशीं तहाचें बोलणें लाविलें. दोहीं पक्षीं शर्ती ठरतील त्या बरोबर अमलांत याव्या याविषयीं विठ्ठलराव विंचूरकर व नारो शंकर जामीन झाले. नंतर असें ठरलें कीं, गोविंद हरीनें मिरज श्रीमंतांच्या हवालीं करावी. ज्या सावकारांचें कर्ज पटवर्धनानीं देणें होतें त्या सावकारांच्या कर्जाचा निकाल श्रीमंतांनीं करावा. इतःपर

या बद्दल पटवर्धनांस तसदी न लागावी. कागवाड व कुरुंदवाड हीं दोन ठाणीं पूर्वी प्रमाणें पटवर्धनांकडे असावीं. गोविंद हरीनें आपली चीज वस्त व मुलें माणसें घेऊन मंगळवेढ्यांस जाऊन रहावें. या प्रमाणें ठराव झाला तेव्हां पेशवे सरकारचें निशाण घेऊन विंचूरकर व खंडेराव दरेकर सरलष्कर यांचे पन्नास लोक किल्ल्यांत येऊन चांदबुरुजावर उभे राहिले. नंतर गोविंद हरी आपलें सर्व खटलें किल्ल्याबाहेर काढून विजापुरवेशी बाहेर ओढ्यावर मुक्काम करून राहिला व तेथून दहा बारा दिवसानीं मंगळवेढ्यांकडे कूच करून गेला. त्या बरोबर शिवाजी विठ्ठल विंचूरकर यांचशें स्वारानिशीं पोंचवावयास गेला होता. मिरजेस नारो कोन्हेर यास किल्लेदार नेमून श्रीमंत माघ वद्य षष्ठीस मिरजेहून कूच करून आठ कोसांवर कृष्णा तीरीं येडूर मांजरी येथें गेले.

नं० १४०L

(पौष शुद्ध सप्तमी
२२ दिसेंबर)

श्री.

तीर्थरूप मातुश्री बाई[1] वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें माधवरायानें[2] चरणावरी मस्तक ठेऊन शिरसाष्टांग नमस्कार विनंती येथील क्षेम तागाईत छ० ६ जमादिलाखर पर्यंत वडिलांचे आशीर्वादें वर्तमान यथास्थित असे. विशेष. इकडील वर्तमान तर छ० मजकुरीं मौजे रामापूर व कमळापुराहून कूच होऊन मौजे नांदरें मिरजे अलीकडे सहा कोसांवरी मुक्काम झाला तों गोपाळराव यांणीं मिरजेचा बंदोबस्त करून कुरुंदवाडावरी एका दो दिवसां मागें होते. मिरजेस स्वारी पोंचल्यावरी बहुता प्रकारें करून गोपाळराव याची बोला चाली होऊन कांहीं एक विचार[3] ठरेल असें आहे. मोर्मेल ही मिरजेपासून चौ पांचां मजलीवरी मंगळ-

१ गोपिकाबाई. २ माधवरांव पेशवे. ३ तह होण्याचा विचार. ४ निजामअली. हा यावेळीं पंढरपुराजवळ पटवर्धनांचा मंगळवेढें महाल आहे त्यांत धामधूम

वेढ्यावरी आहे. कदाचित् मिरजेचा झुंजावयाचा प्रकार ठरला तरी यवनास ही मिरजेस बोलाविला आहे. वरकड सविस्तर मजकूर राजश्री अंतोबा नाईक रास्ते याणीं पत्र लिहिलें आहे त्यावरून सविस्तर वडिलांस विदित होईल. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

पै॥ छ० १० जमादिलाखर.

नं० १४१L

(पौष शुद्र त्रयोदशी
२८ दिसेंबर.)

श्रीशंकर.

तीर्थरूप मातुश्री बाई वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें रघुनाथानें[1] चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विनंति. येथील क्षेम तागाईत छ० १२ जमादिलाखर पर्यंत मुक्काम ठाणें मिरज येथें वडिलांचे आशीर्वादें क्षेम असों. विशेष. वडिलांकडून पत्र आलें तें पावलें. लिहिला मजकूर सविस्तर कळला. वडिलांचे आज्ञे प्रमाणें वर्तणूक करीत असों. चिरंजीव नारायणरायाच्या व्रतबंधास यावें हें ही मानस आहे. तिकेडे[2] लौकरच येणें होईल. बनल्यास आम्हींच येऊन करूं. नाहीं तर वेदमूर्ति गंगाधरभटाकडून[3] करवावा. त्यांत वडिलांची मर्जी प्रमाण! येथील वर्तमान तरी परस्परें आपल्यास कळतच असेल. आम्हीं तीन वर्षांनीं ऐवजाचा निकाल करीत असतां गोविंद हरी न ऐकत, तेव्हां निदान लाचार होऊन मिरजेस मोर्चे लाविले. ईश्वरदयेनें लवकरच पारिपत्य होईल. चिरंजीवें[4] आबा पुरंदरे यांस गोपाळरायावर दहा हजार फौज देऊन पाठविले. त्याणीं गोपाळरायास लुटिलें. ते पन्नास पाऊणशां रावतांनिशीं पळून

करीत फिरत होता.

१ रघुनाथ बाजीराव उर्फ दादासाहेब. २ पुण्यास. ३ गंगाधरभट कर्वे हे पेशव्यांचे उपाध्ये. ४ पुरंदरे व पेशवे यांच्या घराण्यांत इतका घरोबा असे कीं, पेशव्यांच्या घराण्यांतील पुरुष पुरंदऱ्यांस 'चिरंजीव' ह्मणत असत.

गेले. चिरंजीव कर्नाटक प्रांतीचीं ठाणीं वसवीत चालले आहेत. श्रीइच्छा प्रमाण ! हे विज्ञापना. रवाना बुधवार.

नं० १४२

(पौष शुद्ध एकादशी
२६ दिसेंबर.)

गोपाळराव गोविंद यांचें गोविंद हरीस पत्र—

" शुक्रवारीं कुडचीहून खेमलापुरास आलों. आम्हांवर फौज येणार म्हणोन बातमी आली. त्याजवरून आमचें बुनगें जमखिंडीस लाऊन दिलें आणि आम्हीं सडे तळावर राहिलों. दोन चार घटका रात्र राहिल्यावर चालते झालों. चार कोस गेल्यावर फौज दिसूं लागली. आम्हीं पुढें असून ते पाठीमागें, या प्रमाणें जात असतां जमखिंडीस अवघड ठिकाणीं जाऊन राहिलों. आज प्रातःकाळीं श्रीमंतांची फौज आम्हांवर चालून आली, परंतु आमचे मतें आमचेच गांवकरी. परंतु आज निदर्शनास आलें ! गांवकरी यांणीं गोळी मारिली नाहीं. तरी ही आम्हीं चालोन गेलों तों फौज भारी. तरी ही आमचे फौजेनें प्रथम बहुत केली. ईश्वरसत्तेस इलाज नाहीं. घरची मंडळी सर्व शाबूत निघाली. तीर्थरूप आपा शिदापुरास निघोन गेले. झुंज जाहल्या नंतर चिरंजीव वामनराव व भाऊ डोंगर कठाडियानें

---

१ आवा पुरंदरे. २ ज्या दिवशीं (छ० १२ जमादिलावल) हें पत्र लिहिलें त्या दिवशीं मंगळवार होता, पण तें बुधवारीं रवाना झालें. ३ फौज पेशव्यांची छापा घालण्या करितां. ४ ' जमखिंडीच्या ठाण्यांतील लोक आमच्या बाजूचे असून शत्रू चालून आल्यास ते आम्हांस मदत करितील असें वाटलें होतें, ' असा गोपाळरावाच्या लिहिण्याचा अभिप्राय. ही जी पेशव्यांच्या फौजेशीं गोपाळरावाची लढाई झाली तींत त्याचा मोड होण्याचीं कारणें दोन. पहिलें, तो जमखिंडीच्या ठाण्याच्या आसऱ्यास निर्धास्तपणें येऊन वसला असतां जमखिंडीकरानीं त्यास आयत्या वेळीं दगा दिला; व दुसरें, त्याची फौज पेशव्यांच्या फौजे पेक्षां थोडी. ५ फौज पेशव्यांची. ६ चुलता लिंबक हरि कुरुंदवाडकर. ७ डोंगराच्या कडेकडेनें.

यादवाडचे सुमारास गेले. तेणें करून चुकामूक जाहली. नंतर मोगलाकडे जावें म्हणोन सिद्धांत ठरोन [आह्मीं] घोड्यावर जीन ठेविलें. होणें जाणें ईश्वराधीन ! शिदापुर एकाएकीं येत नाहीं यामुळें यादवाडाहून लक्ष्मेश्वरास जातील[1]. आह्मीं मोगलाकडे जाऊन त्यास निदानची गोष्ट सांगून घेऊन येतों. नच येईल तर आपणास लिहितों. त्या प्रमाणें करावें. भगवंतानें हिंमत दिली तर झुजवेल तेथवर झुजावें ! जमाखिंडीच्या प्याद्यांवर विश्वास ठेऊं नये. आह्मांविशीं काळजी करूं नये. अवसान सोडिल्यानें सर्व माणसें श्रमी होतील. "

नं. १४३

[३० दिसेंबर.]

श्रीगणपतिर्जयति.

पै॥ छ० १९ जमादिलाखर.

आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत पौष शु० १५ गुरुवार दीड प्रहर रात्र अवशीची. यथास्थित जाणून स्वकीय लिहिणें. विशेष. सांप्रत तुम्हांकडील आठ दिवस पत्र येत नाहीं. एक पत्र रामतीर्थाच्या मुक्कामचें पावलें चौंयाबराबरील[2]; त्यावरून सविस्तर कळलें. ऐशास तुम्हीं पुढें कोणीकडे गेलां, काय वर्तमान, हें कांहीं कळत नाहीं; यामुळें चित्त स्वस्थ नाहीं. ज्या गृहस्थाकडे[3] गेलां तिकडील वर्तमान लिहिणें. येथें थाणीं तड-

---

१ गोपाळरावाचा मोड केल्यावर त्याच्या कर्नाटकांतील जहागिरीचीं ठाणीं कावीज करण्या करितां आबा पुरंदरे फौजेसह तिकडे जात होता, त्यास अनुलक्षून गोपाळराव लिहितों कीं, वाटेनें शिदापुरचें ठाणें लागतें तें घेण्याच्या भरीस न पडतां आबा पुरंदरे थेट यादवाडावरून लक्ष्मेश्वराकडे जाईल. लक्ष्मेश्वर हें धारवाड जिल्ह्यांत आहे. २ हें जासुदाचें नांव ३ निजामअल्लीकडे. ४ पेशव्यानीं. मिरजेस वेढा घालण्याचा मुख्य हेका जरी दादासाहेब व सखरामबापू यांचाच होता तरी ते या पुढें जी जी मसलत करीत होते ती सर्व पेशव्यानींच केली असें दाखवीत होते व त्यास पेशव्यांची ही संमति होती. या करितां इतःपर आह्मीं ही दादासाहेब व सखारामबापू यानीं अमुक केलें, तमुक केलें, असें न लिहितां तें सर्व पेशव्यानींच केलें असें लिहीत जाऊं.

काफडकी काम दवावणीनें उरकावें ह्मणोन पहात होते. (यांणीं) बोली चाली लाविली, परंतु आम्हीं परिछिन्न ऐकिलें नाहीं. त्या उपरी मोर्चे सुरू जाहले रविवारीं. ते दिवशीं तुमची व लष्करवाले यांची गडबड जाहली. तें वर्तमान येतांच सोमवारीं यांणीं गडबड केली. परंतु कांहींच न चाललें. पीर[1] सर्व प्रकारें मदतीस. नरसोबादेव[2] सर्वस्व अनुकूल. थैळ[3] ही अनुकूल, या मुळें पराभव पावले! गोळे बाण फटकेंडीची वृष्टि होते, परंतु श्रीपंढरीनाथाचें सुदर्शनचक्र फिरतें; यामुळें (शत्रूच्यानें आमचें नुकसान) कांहींच होत नाहीं! युद्धाचें वर्तमान शिंदापुरास[5] लिहून पाठविलें (तें) तेथून तुम्हांकडे आलें असेल. मंगळवारीं रात्रीं बहिरजी जासूद व हणगोजी जासूद यांज बरोबर पत्रें रवाना केलीं आहेत तीं ही पावलीं असतील. येथील चिंता किमपि न करणें. वेढा बसला ह्मणोन घाबरेपणें गैळां[6] पडोन बजीदें[7] व्हाल तर यांणीं किल्ल्याचें कांहींच करणें नाहीं. आम्हीं [यांस]

कांहीं विशेष कारण येईल तेव्हां तेथें या दोघांच्या नांवाचा उल्लेख करूं हें सांगावयास नकोच.

१ मिरज येथें शम्नामीर नांवाच्या पिराची कबर असून तीस मिरासाहेबाचा दर्गा असें म्हणतात. हा दर्गा इ. स. १४९१ [श० १४१३] या वर्षीं बांधिलेला आहे. पिरास विजापुरच्या बादशहाकडून पांच गांव इनाम होते. त्यां पैकीं आतां धामणी नांवाचा एक गांव मात्र इनाम चालतो. हा पीर मिरज येथील हिंदु व मुसलमान लोकांस पूज्य वाटत असून सर्व जातीचे लोक यास नवस करितात. मिरजेच्या हद्दींत जितकी जागा आहे तीस ' मिरासाहेबाची पांढरी ' असें ह्मणण्याचा संप्रदाय आहे. २ या नरसोबाचें जुनाट देवळ मिरजेच्या किल्ल्यांत आहे. ३ ग्रामदैवत. गांवांत महामारी, देवी, किंवा असाच कांहीं भयंकर सांथीचा धडाका सुरू झाला ह्मणजे तो ग्रामदेवतेचा क्षोभ झाला असें समजत असत. असे रोग गांवांत सुरू झाले ह्मणजे त्यांचें वर्णन ' थळ उठले ' या दोन शब्दांत होत असे! मिरजेचें ग्रामदैवत ह्मसोबा हें असून त्याचें स्थान हल्लीं किल्ल्याबाहेर आहे त्यास ' ह्मसोबाची चौकी ' ह्मणतात. ४ बदुकीची. ५ शिंदापुरास त्रिंबकहरी होता त्याजकडे. ६ निजामअल्लीस शरण जाऊन. ७ दीनवाणे. ८ पेशव्यानीं. ' पेशवे मिरजेचा किल्ला घेतील या भीतीनें तुह्मीं निजामअल्ली पुढें दीनवाणे होऊन करुणा भाकाल, तर तसें करण्याचें कारण नाहीं. पेशव्यांच्या हातून मिरज घेववत नाहीं. ' असा गोविंद हरीचा अभिप्राय.

खा रेस आणीत नाहीं. एकच संकल्प आमचा श्रीपंढरीनाथ शेवटास पारिछिन्न नेतच आहे. तुम्हीं लौकिकां प्रमाणे भेटोन महत्वा सारखें–बहुमान, पुढें जहागीर–या प्रमाणें होईल तरी करावें. नाहीं तर गेल्या सारखें आठ पंधरा दिवस रहावें. त्याणीं मदत उपराळा मात्र करावा, इतकें जरी झालें तरी फार! केवळ पायांपड केल्यानें प्रतिष्ठा नाहीं. लज्जारक्षक श्रीभगवान् समर्थ आहे. येथें तुम्हीं तिकडे गेलां (हें) ऐकोन यांच्या आंगास अग्न लागली! परम संतप्त जाहले आहेत. परंतु विचार करून अंतर कोणीकडे हें पहात नाहींत! तडका मोर्चे चालवितात. रोज लष्करचें दहा वीस माणूस ठार शें पन्नास जखमी होत आहे. मातबर लष्कर, या मुळें कळत नाहीं. मुख्य गोष्टी याणीं आमचें कांहीं करणें नाहीं, हे खातरनिशा असों द्यावी. परंतु तुम्हीं ज्या गृहस्थाकडे गेलां त्याणें साहित्य न केलें तरी त्याचा व तुमचा उभयतांचा लौकिक जाईल. महिनाभर राहून खाणार काय! असो. राहिले चार महिने तरी भीत नाहीं! मोर्चे मारांत आलियावरी तुडवावे हे लोकांची धमक आहे. शेणा, मेणा, लोखंडाचे तीन दिवस पहिले गेले. दिवसें दिवस लोकांस तेज बल अधिक वाढतें. कोणी भीत नाहीं. तुम्हीं गेल्या सारखें खास भेटोन त्याणें साह्य केलें तर उत्तमच

---

१ निश्चय पूर्वक. २ ' तुम्हीं मोंगलाकडे गेलां आहां, तर तुमच्या योग्यते प्रमाणें बहुमान व जहागीर त्याजकडून मिळत असेल तर त्याचा आश्रय संपादावा. ' असा अभिप्राय. ३ मदत व उपराळा या शब्दांचा अर्थ एकच. ४ निजामअल्लीच्या पायां पडल्यानें. ५ पेशव्यांच्या दरवारांत. ६ गुन्हा. ७ झपाट्यानें. ८ ' तुह्मांस तुमच्या योग्यते प्रमाणें बहुमान व जहागीर मिळाली तर बरें; नाहीं तर तेथें गेल्यासारखे महिनाभर राहून निघून या;' असें मी लिहिलें आहे, पण तेथें तुह्मांजवळ द्रव्य नसल्यामुळें वरोवरच्या लोकांचा निर्वाह कसा होईल? असा लिहिणाराचा अभिप्राय. ९ पावसाळ्यास अजून चार महिने आहेत तेथपर्यंत किल्ला पेशव्यांच्या हातीं देत नाहीं, पावसाळा सुरू झाल्यावर पेशवे आपोआप वेढ्याचें काम वंद करून निघून जातील, असा लिहिणाराचा अभिप्राय. १० किल्ल्यांतील लोकांची. मिरजेच्या वेढ्याचीं पत्रें या उपर गोविंद हरीचीं जितकीं येतील त्यांत ' लोक ' ह्मणजे ' किल्ल्यांतील लोक ' असें समजावें.

आहे. शेटी[1]रणदिव्यास पाठविला व चांदखान [तुम्हांकडे] पाठविला आहे. कळलें पाहिजे. सारी मंडळी सुखें आहों. लढाईचा प्रसंगच आहे. रोज एक दुसरें जायां होतच आहे. फटकडीनें दगा एकां[2] दोघांस केला, त्याची फिकीर नाहीं. पत्र पाठवावया आळस न करणें. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे आशीर्वाद.

नं० १४४

(२ जानेवारी.)

श्रीगणपतिर्जयति.

पै॥ छ० २३ जमादिलाखर.

आशीर्वाद[3]. उपरी येथील कुशल तागायत पौष व॥ ३ रविवासर दीड प्रहर[4] रात्र यथास्थित असे. विशेष. तुम्हीं रविवारचें रामतीर्थाचे मुक्कामचें पत्र पाठविलें. त्या अलीकडे पत्र येत नाहीं. या कारितां चित्त स्वस्थ नाहीं. वरचेवर लिहीत जाणें. रविवारीं आजी आठ दिवसां मोर्चे सुरू झाले. तेच दिवशीं तुमची खटखेट जाहली. सोमवारीं वर्तमान[5] येतांच सायंकाळीं

---

१ हीं दोन जासुदाचीं नांवे. [शेटी रणदिवे व चांदखान]. २ 'बंदुकीच्या गोळ्यानीं एक दोघे मेले' असा अभिप्राय. हें व या पुढील पत्रें वाचिलीं ह्मणजे वाहेरील मारानें आंतील लोक किती मेले या विषयीं गोविंद हरी लिहित असतां मेलेल्या व जायां जहालेल्या लोकांची संख्या तो मुद्दाम फारच कमी लिहित आहे असें वाटूं लागतें! ३ पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास. त्यावेळीं गोपाळराव मोंगलाचे लष्करांत होता. ४ मागचें नं० १४३ चें पत्र आवशीच्या दीड प्रहर रात्रीस लिहिलें आहे. त्याच प्रमाणें हें नं० १४४ चें. मिरजेच्या वेढ्यांतून गोविंद हरीनें जितकीं पत्रें लिहिलीं आहेत तीं सर्व रात्रीं लिहिलेलीं आहेत. याचें कारण उघडच आहे. तें असें कीं पन्नास हजार फौजेच्या परिघांतून पत्रें घेऊन जासुदांस दिवसास कधीं ही जातां आलें नसतें. ते तत्काळ पकडले गेले असतें. रात्रीं मात्र ते लपून छपून चोरवाटेनें पत्रें बाहेर घेऊन जात व बाहेरचीं आंत आणून पोंचवीत! ५ पेशव्यांच्या फौजेशीं तुमची लढाई झाली. ६ वर्तमान तुमच्या पराजयाचें यतांचे.

एकाएकीं जिभीवरी[1] हल्ला केली. चिरंजीव दाजी व लोक होते. एकाएकीं येऊन खंदकास जिभीच्या लागले. कांहीं खंदकांत उतरोन वर चढूं लागले. ते समयीं चिरंजीव दाजीनें मोठी हिम्मत धरून लोकांस उठविले. कानडे[4] प्यादे तमाम बंदुका टाकून पळाले. ते समयीं जिभीवरी मारा ही बहुत केला. परंतु लोकांनीं[6] अंगेजणी[7] करून उड्या टाकून बेजरब जाऊन मिसळले. ते समयीं मारामारी फारच केली. वैरील मारा ही जाहला. रेवणींतील[10] दोहीं बाजूचा मारा व कांहीं किरकोळ प्यादे ही उठले[11]. जिभींतून पंचवीस चाळीस शिपाई लोक व पंचवीस चाळीस ठाणें[12] मजकूरचे मिळोन बाहेर निघाले. मारामारी मोठी झाली. ते समयीं तिकडील दोन

---

१ 'जिभी' ही एक किल्ल्याबाहेरची मोठी चौकी होती. हिच्या भोंवती खंदक होता. किल्ल्याचा थोरला दरवाजा पूर्वाभिमुख [विजापुर मिरजेच्या पूर्वेस आहे व मिरजेचा किल्ला विजापुरच्या बादशहाच्या एका सरदारानें बांधला होता ह्मणून] होता. तेथ पासून दोन अडीचशें पावलांवर 'जिभी' होती. किल्ला व जिभी यांमध्यें किल्ल्याचा थोरला खंदक होता व त्यावर जिभी व किल्ला यांचें दळणवळण राखण्या करितां लांकडांच्या ओंडक्यांचा एक ओवड धोवड पूल असे. जिभीचें रक्षण आतां आपल्या हातून होत नाहीं असें किल्लेकऱ्यांस वाटलें ह्मणजे ते तें स्थळ सोडून देऊन व वाटेंतील पुलास आग लावून देऊन किल्ल्यांत जात. जिभीवर पेशव्यांच्या फौजेची फारच निकड झाली तेव्हां या प्रसंगीं ही गोविंद हरीस जिभी सोडावी लागली, हें याच पत्रांत पुढें लिहिलेलें आहे. २ पुरुषोत्तमराव कृष्ण उर्फ दाजी हा गोविंद हरीचा पुतण्या. ३ हल्ला करण्यास प्रवृत्त केलें. ४ कानडे प्यादे पेशव्यांकडचे. जिभीवर चालून आले होते ते. ५ मारा केला पेशव्यांच्या फौजेनें. ६ किल्ल्यांतील लोकानीं (मागच्या पत्रांत याच शब्दावरची टीप पहा.) ७ पराक्रम. ८ किल्ल्यांतील लोक चालून जाऊन वेधडक पेशव्यांच्या फौजेंत मिसळले. ९ किल्ल्यांतून. १० किल्ल्याबाहेर खंदक होता त्याच्या दोहीं बाजूंस चौक्या होत्या त्यांच्या समुदायास 'रेवणी' हें नांव होतें. या रेवणीवरील चौक्या पन्नास वर्षांपूर्वी शाबूत होत्या. तेथें लहानपणीं दांडपट्टा शिकावयास गेलेले लोक अद्यापि हयात आहेत. 'रेवणी' हा शब्द Ravelin या इंग्रजी शब्दावरून निघाला असावा, असा कित्येकांचा तर्क आहे तो संभवनीय दिसतो. ११ चालून गेले. १२ किल्ल्याच्या नेहमींच्या नेमणुकीचे लोक. ज्यांस किल्ल्याची शिबंदी ह्मणत ते. 'शिपाई लोक' या वाक्यांत आले आहेत ते गोपाळरावानें आपल्या फौजेंतून शूर व विश्वासू असे शिलेदार निवडून किल्ल्याच्या रक्षणार्थ पाठविले होते

तीनशें माणूस जखमी व पन्नास पाऊणशें ठार असें जाहलें. हल्ला मोडून माघारी घातली. चिरंजीव दाजीच्या धारिष्टास जोडा नाहीं ! त्यामुळें यश आलें, आणि श्रीनें त्याची खैर केली. मेले त्यांची नावनिशी व विस्तारें वर्तमान लिहिलें होतें. सोमवारींच पत्रें रवाना केलीं. तो[2] बुधवारीं जम खिंडीस गेला. 'तेथें कोणी नाहीं, शिदापुर ही गेलें,' ह्मणून त्याणें सांगितलें. पत्रें मार्गीं टाकून प्यादा पाठविला होता तो आजी सायंकाळीं आला. पुढें तुम्हीं कोठें गेलां ? नबाब कोठें आहेत ? तुमची त्यांची भेट जाहली कीं नाहीं ? यांच्या[3] मतें त्वरेनें कार्य उरकोन जावें, परंतु (आम्हीं) हिम्मत धरिलिया या स्थलाचें कांहींच होणें नाहीं ! श्रीकृपेनें साहित्य पुष्कळ आहे. लोक एकदिल आणि एकच निश्चय. यामुळें कांहीं तिलमात्र काळजी नाहीं. त्यां[4] उपरी दोन पत्रें रवाना केलीं. एक बहिर्जी, हणगोजी जासूद व एक चांदखान व सेटीरणदिवा यांज बरोबर (अशीं) रवाना केलीं. पावलीं असतील. जितके जासूद होते तितके रोज बेरोज रवाना करीत गेलों. परंतु माघारे कोणी आले नाहींत. येत हीं नाहींत. तुम्हांसं[5] किती दिवस लागतील न कळे ! हे जितका उपाय तितका करितात. आह्मी खातरेस आणीत नाहीं. मुख्य गोष्ट, तुम्हीं गेल्या सारखे त्याणीं अभिमान धरून साहित्य केलें ह्मणजे जाहलें. लौकिक राहील. आमचा तो संकल्पचं[6], तथापि तुम्हीं गेलां, फार दूर देश ही नव्हे, तुम्हीं त्वरेनेंच याल, ह्मणून सर्वांस धमक आहे. त्या सारखें घडोन आलें ह्मणजे बरें ! वरकड तुम्हीं त्वरेनें जावें ते न गेलेत. फौज आली तरी मुक्काम

---

१ पुरुषोत्तमरावाची. २ शिपाई. ३ पेशव्यांच्या. ४ कार्य मिरज घेण्याचें. ५ मागें तुम्हांस पत्रें पाठविलीं त्या नंतर. ६ बहिरजी व हणगोजी हीं जासुदांचीं नांवें. पत्रें देऊन जासूद पाठवावयाचे ह्मणजे त्या काळीं बहुधा जासुदांची जोडी पाठविण्यांत येत असे. ७ 'तुह्मीं मोंगलाची कुमक आणून मिरजेचा वेढा उठविणार, त्यास किती दिवस लागतील न कळे !' असा अभिप्राय. ८ संकल्प प्राण आहे तों किल्ला न सोडण्याचा ! ९ 'पेशवे मिरजेस येण्यापूर्वीच तुह्मीं मोंगलाकडे पळून जावें ते गेलां नाहीं, त्यांची फौज आली तरी मुक्काम करून राहिलां, या वरून त्यांशीं विरोध करण्याचा तुमचा वि-

केलात, आणि राहिलां; [असें असतां श्रीमंतांनीं] आपण होऊन फौज तुम्हांवरी पाठवून तुम्हांस राज्यांतून बाहेर घातलें असें जाहलें. कितेक ' अनुचित केलें ' म्हणतात, कितेक तत्पक्षी आहेत ते संतोषी आहेत ! विचारें पहातां तुम्हीं कोणास उपद्रव न दिला, लष्करचें कहीकबाड मारलें नाहीं, गांव लुटिले नाहींत, वाट मारिली नाहीं, (तुम्हांकडे) किमपि अंतर नाहीं. 'धणी आहेत. कृपावंत होऊन समाधान करतील.' ह्मणून मार्ग पहात असतां तुम्हांवरी फौज पाठवून तुम्हांस (श्रीमंतानीं राज्यांतून) घालविलेंसें जाहलें ! आम्हीं जिभी सोडिली. पूल जाळून टाकिला. बाहेरील काळजी किती वहावी, ह्मणून सोडून सुखरूप बसलों. बाण, जेजाला, तोफा, बंदुका, गरनाळा, इतके मार होतात. परंतु श्रीचें सुदर्शन चक्र फिरतें. कोणास लागत नाहीं. ईश्वरें फार करून खैर केलें. दहा पांच प्यादे आजीतागायत मेले. आणि पांच भले लोक. त्यांची नांवनिशी मागेंच लिहिली [आहे.] दहावीस प्यादे जखमी आहेत. वरकड खैर [आहेत] तुम्हीं येथील कांहीं काळजी न करावी. तुम्हीं गेलां, समागमें चाकर देखील नाहीं, दुसरें धोतर नाहीं, अशे अवस्थेनें गेलां. परकी दरबार ह्मणून काळजी ! बरें ! त्यांचें त्याणींच केलें. तुम्हांवरी दोष कोणी ठेवीत नाहीं. श्रीइच्छेनें तुम्हांवरी आरोप कोणी ठेवीत नाहीं. निर्दोन जाणून चंदो गिरमाजी यास पाठविला आहे. या बरोबर आपणांकडील संतोषाचें वर्तमान लिहिणें. गोविंदा तुम्ही पाठविला तो येथें आंत येतो बाहेर जातो. खबर बखर कळते. वकिलाचें लिहिणें ही ' तुम्हीं तेथें गेलां, तुमचा अभिमान (नबाबानीं) धरिला, ह्मणोन आलें, या मुळें फारसे श्रमी आ-

---

चार नव्हता; असा लिहिण्याचा अभिप्राय.

१ ' श्रीमंतांचे लष्कराचें कहीकबाड तुह्मीं लुटिलें नाहीं, ' असा लिहिण्याचा अभिप्राय. ' कही ' किंवा ' कहीकबाड ' ह्मणजे धान्य, वैरण व लांकूडफांटें आणणारी फौजेची टोळी. २ मराठे शिलेदार. ३ पेशव्यानीं आपण होऊन आगळीक केली. ४ कठिण प्रसंग. ५ श्रीमंतांचा वकील मोंगलाचे लष्करांत आहे त्याचें. ६ मोंगलाकडे. ७ दादासाहेब व सखारामबापू वगैरे फार कष्टी आहेत.

हेत. दाबून दबावून भयप्रदर्शन करून पहातात. परंतु हें स्थळ कसें, कोणा प्रकारचें, हें ध्यानांत आणीत नाहींत ! मोर्चे चालवितात. पुढें येत येत आठ दिवस जिभीस रेवणीस यावया पाहिजेत. रेवणीस येऊन काय करितात ! आम्हीं [1]जो मारील त्यास रुपये पांच इनाम द्यावेसा करार केला. आजी दोन दिवस जाहले. त्यामुळें कांहीं ताकीद करावी लागत नाहीं. प्यादे [2]तैकोन वसतात. प्रत्यहीं पंधरा, वीस, दहा ठार करितात. पंचवीस चाळीस जखमी (करितात.) या प्रकारचा मजकूर आहे. यां[3]च्यानें त्वरेनें न येववे तरी दुसरीं खबरदार माणसें दोन चार रवाना करणें. एक नाहीं तर एक तरी येऊन पावेल. निदानीं यांसच पाठवून देणें. सारी मंडळी सुद्धां चिरंजीव भास्करपंत व नीलकंठराऊ, दाजी, पंढरीनाथ, देखी[4]ल सर्व ही सुखें आहोंत. आमची चिंता न करणें. काल पर्यंत ऐसा जे, (तुम्हांजवळ) माणूस देखील नाहीं ! यामुळें चिंतार्णवीं पडलों. खेचीं ही गेली. या करितां विस्तारें लिहून चिंता वारे तें करणें. गोविंदास पत्र पावलें तरी तो घेऊन येईल. बहुत काय लिहिणें. घरकड कोण कोणी[5]कडे गेले हे खबर तिलमात्र आम्हांस ठावूक नाहीं. कळलें पाहिजे. (तु[6]म्हांस) शतु फार. तेथें[7] ही दगा करावयाचा प्रकार करावया चुकणार नाहीं ऐसा चांडाल आहे ! सावध राहणें. हे आशीर्वाद.

---

१ पेशव्यांच्या फौजेपैकीं कोणास ही ठार मारिल्यास पांच रुपये इनाम त्या मारणाऱ्यास मिळेल, असें गोविंद हरीनें फर्माविलें होतें ! २ टपून. ३ हल्लीं जासूद पाठविले आहेत त्यांच्यानें, ४ हें पांडुरंगराव ताल्याचें दुसरें नांव. हे गोविंद हरीचे तृतीय पुत्र व हल्लींचे सांगली संस्थानाचे अधिपति श्रीमंत राजश्री ताल्यासाहेब यांचे आजे होत. ५ आबा पुरंदऱ्याशीं लढाई होऊन गोपाळरावाचा पूर्ण पराजय झाल्यावर लूट झाली तींत कांहीं रोकड होती ती लुटली गेली. ६ ' तुम्हीं मोंगलाकडे गेलां, पण तुमच्या फौजेंत त्रिंबकपंत आपा, वामनराव, परशुरामभाऊ, कोन्हेरराव, विनायकराव हे होते त्यांची वाट काय झाली, ते कोणीकडे गेले, हें आम्हांस माहीत नाहीं, ' असा लिहिण्याचा अभिप्राय. ७ मोंगलाच्या लष्करांत. ८ हें उपपद सखारामबापूस !

श.१६८४ गोविंद हरि मिरज मुजविती इ.स.१७६३

नं० १४९

(पौष वद्य चतुर्थी
३ जानेवारी.)

गोपाळराव गोविंद यांचें गोविंद हरीस पत्र
छ० १८ जमादिलाखरचें—

" आमचीं व नबाबांची भेट झाली. श्रीमंतांचा व नबाबाचा बिघाड झाला आहे. दोन दिवसांत त्यांची यांची गांठ पडेल. (नवाब) विजापूर उजवें घेऊन कृष्णेच्या पाण्यानें येतात. लोकांस दिलासा देऊन किल्ला रक्षावा. त्यांचे हातीं सांपडून बेअब्रू करून घेऊं नये. आम्हीं हरामखोरी करून मातोन आलों नाहीं. पिटून लाविले असतां आमचा इलाज काय ! उभयतांचे बिघाडांत कांहीं बाकी राहिली नाहीं. श्रीमंत परत जातील तर उत्तम. नाहींतर या समयीं सारें राज्य घेण्याची [नवाबाची] कर्त आहे. ईश्वराचे कृपेनें या समयीं (नवाबाचे बाजूस) मराठी फौज चाळीस हजार आहे. शिवाय बारा हजार गाडदी व प्यादे. शिवाय मोंगली फौज म्हणतां ऐशीं हजारांचा भरणा आहे. तूर्त चढती दिसत आहे."

---

१ गोपाळरावानें हें पत्र मोंगलाचे लष्करांतून लिहिलें आहे. श० १६८५ च्या श्रावण वद्यापर्यंत आतां गोपाळरावाचीं जितकीं पत्रें छापिलीं जातील तितकीं सारी त्यानें मोंगलाच्या लष्करांतून लिहिलीं आहेत असें समजावें. २ नवाब निजामअल्ली याची. ' नवाब ' हा बहुवचनीं शब्द आहे. याचें एक वचन ' नायब. ' ३ ' दोन दिवसांत ' या शब्दांचा अर्थ येथें ' लवकरच ' इतकाच ध्यावयाचा. ४ पूर्वी मोठमोठालीं लष्करें मुलखांतून हिंडूं लागलीं ह्मणजे कोणच्या तरी मोठ्या नदीच्या कांठा कांठानें त्यांस जावें लागे. कारण लाख दोन लाख लोकांस पुरेसें पाणी दर मुक्कामास नदी तीर असल्या शिवाय कोठून मिळणार ! ५ हुरूप. ६ सखारामबापू वगैरे प्रतिस्पर्ध्यांचे. ७ पेशवे व मोंगल यांचे. ८ या ठिकाणीं ' कस्त ' शब्दाचा अर्थ ' उमेद ' असा आहे. परंतु नेहमींचा अर्थ ' मेहनत ' ' खटपट ' असा असतो.

नं० १४६

[अजमासें पौष वद्य
जानेवारीचा पहिला पंधरवडा.]

बाबूराव* सदाशिव याचें गोपाळरावास पत्र--

" तूर्त येथील वर्तमान मिरजेस [श्रीमंतानीं] मोर्चे लाविले आहेत. तुम्हांवर फौज रवाना झाली होती, त्यास तुम्हीं कोणीकडे गेलां हे वर्तमान कळत नाहीं. त्यास आपण प्रस्तुत कोणे ठिकाणीं आहेत, मनसबा पुढें कर्तव्य कोणता, हें सविस्तर वर्तमान वरचेवर लिहीत गेल्यास उपयोगींच पडेल. येथील विचार जो आहे तो आपल्यास परस्परें कळतच असेल. अवघ्यांचा मार्ग एकच आहे. दुसरा विचार नाहीं. आपल्याकडील वर्तमान वरचेवर लिहीत जावें म्हणजे परस्परें वृत्त कळेल. काल एकरूप कोणाचा ही रहात नाहीं. धैर्य सोडूं नये. जो विचार कराल तो वरचेवर लिहीत जावा. राजश्री बाबूरावै बारामतीस आहेत. त्रिंबकरावँ [येथें] लष्करांत सुखरूप आहेत. "

नं० १४७

[अजमासें पौष वद्य
जानेवारीचा प० पंधरवडा.]

गोपाळरावाचें गोविंद हरीस पत्र–

खंदारेकर राजे मध्यस्त दरम्यानगिरींत उभय पक्षीं, त्यांचा का-

---

१ या दरबारांतील. म्हणजे अर्थात् दादासाहेब व सखारामबापू यांचा. २ एक सारखा. ३ बाबूजी नाईक. ४ त्रिंबकराव मामा पेठे. ५ खंदार हें स्थळ मोंगलाईंत आहे. येथील रजपूत जहागीरदार राजे गोपाळसिंग यानें निजामअल्लीचे दरबारांत गोपाळरावा विषयीं रदबदली केली. हा उपकार पटवर्धन विसरले नाहींत. असें त्यांच्या वेळोवेळच्या कागदपत्रांवरून दिसतें. गोपाळसिंग राक्षसभुवनचे लढाईत मारला गेला.

* हा बाबूराव कोण हें कळत नाहीं. पण तो बऱ्याच मोठ्या पदवीचा असून दादासाहेब व सखारामबापू यांच्या प्रेमांतील नसावा इतकें उघड दिसतें.

रकून मातबर व नरोबा[1] असे दोन तीन रोजांत येणार. विठ्ठलदास[3] आह्मांसीं पदरीं घेणें विषयीं फार आर्त आहेत. आम्हीं खैरगसिंगास रुबरू पुसोन त्याच्या तोंडें नबाबाशीं बोलविलें कीं, " आपण आजपर्यंत श्रीमंतांची चाकरी केली ती एकनिष्ठपणेंच केली. आतां तेथील ऋणानुबंध तुटला, यास्तव तुमच्या पदरीं पडतों. आह्मां पासून अंतर पडणार नाहीं." असें बोलल्यानंतर (नबाब) बहुत खुशाल झाले, आणि " तुम्हांवर ते[6] कांहीं येत नाहींत. आणि आलेच तर आपण पिराँजी नाईकाबरोबर फौज देऊन तुमचे कुमकेस पाठवून देतों. " या प्रमाणें ममता पुरस्कर भाषण जाहलें. " मंगळवेढें, करकंबें, (ही) तुमची जहागीर हें पहिल्यानेंच कळविलें असतें तर रक्षण केलें असतें. आतां ही आपण तुमच्या वाटेस जात नाहीं. " या प्रमाणें सांगितलें. कूच होऊन गेले. आबाजी नाईक यांचें सूत्र त्यांजकडे लागलें आहे.

नं. १४८

[अजमासें पौष वद्य
जानेवारीचा प० पंधरवडा]

पेशव्यांच्या[7] लष्करांतून गोपाळरावास पत्र—

" तेरा चवदा मोर्चे आहेत. त्यांत हुजरातीचा व विठ्ठल शिवदेव, नारो शंकर, विसाजी कृष्ण व जाधवराव हे मोर्चे भारी आहेत. खंदकास भोंकें

---

१ नरोबा कोण ? जानोजी भोंसल्याचा सरदार नरहर जिवाजी ? २ 'आह्मांशीं मोंगलाकडून करारमदार ठरविण्याकारितां येणार.' असा अभिप्राय. ३ विठ्ठल सुंदर राजेबहादर हा निजामअल्लीचा दिवाण. ४ हा खंदारकर गोपाळसिंगाचाच कोर्ण आप्त असावा. ५ निजामअल्लीशीं. ६ पेशवे. ७ यावरून गोपाळराव मोंगलाकडे जाण्यापूर्वीच पिराजी नाईक निंबाळकर तेथें गेला होता हें सिद्ध झालेंच. ८ ' या प्रमाणें निजामअल्ली बोलला. ' ९ आबाजीनाईक बारामतीकर. यानें यावेळीं कदाचित् मोंगलाकडे राजकारण करून पाहिलें असेल. परंतु हा किंवा याचा बंधु बाबूजी नाईक हे मोंगलाकडे गेले नाहींत. १० हें नं० १४८ चें पत्र कोणी लिहिलें हें कळत नाहीं.

पाडिलीं. आंतून [?] सुरंग चालवितात. धमधमा एक तयार झाला त्या वरून मार देतात. आणीक ही दुसरा धमधमा रचितात. धोंकटे यजमान गांवांत जाऊन राहिले आहेत. नीलकंठ महादेव त्यांजपाशीं आहेत. थोरले यजमान जातात येतात. कार्यभागीं जातत येतात. खामखा निकड करून (स्थळ) घ्यावें हाच अर्थ आहे. आंतील अद्यापि गडबडले नाहींत. आणीक आठ पंधरा दिवस अवसान सोडीत नाहींत. परंतु परिणाम काय ! अवसान आहे तों हरएक उपरांळ्याची गोष्ट जाहली तर उत्तम !"

नं० १४९L

(पौषें वद्य ९
जानेवारी ८.)

श्री.

सेवेशीं विज्ञापना. मोंगलाच्या लष्करांतून बातमी आली कीं, " गोपाळराव मोंगलास जाऊन भेटले. रोज मोंगलास चढीं देतात कीं आतांच बिघाड करणें. मोंगलाचे मनांत ही आहे. * * परंतु तीर्थरूपांस संदेह ही असतो. * * * * करून उडविल्यास उडतो. असें ही ह्मणतातं कीं, " लटके गोपाळराव मात्र " रांयाचे (व) बाईचे नांवें सूत्रें आहेत, "

---

१ माधवराव पेशवे. २ आबापुरंदरे. ३ दादासाहेब. ४ सखारामबापू. ५ खचीत, हटकून. ६ कुमकेची. ७ हें नं० १४९ चें पत्र पेशव्यानीं गोपिकाबाईस लिहिलेलें आहे. या पत्रांत दोन ठिकाणीं फुल्या दाखविल्या आहेत तेथें नक्कल करणारा नें जागा सोडिली आहे. त्यांचें कारण मूळ पत्र ज्या ज्या ठिकाणीं फाटलें असल्यामुळें अक्षरें गेलेलीं असावींत. ८ पेशव्यांशीं युद्धाची सुरवात. ९ दादासाहेब ह्मणतात- १० माधवराव पेशव्यांच्या. ११ गोपिकाबाईच्या. " गोपाळराव मोंगलाकडे गेला आहे, तो तेथें त्यास सांगतो कीं, खुद्द पेशव्यांच्या व गोपिकाबाईच्या सांगण्या वरून दादासाहेबांचें पारिपत्य करण्या करितां तुमची कुमक मागण्या साठीं मी आलों आहें. पण हें गोपाळराव खोटें सांगतो. कारण, ही पेशवाईची सारी दौलत माधवराव. व गोपिकाबाई यांचीच आहे. त्यांस असलीं राजकारणें करण्याचें काय कारण आहे ?" असें दादासाहेब बोलतात.

अशा वलगना आपल्या प्रतिष्ठेस्तव राजे विठ्ठल सुंदराजवळ सांगतात. वस्तुतः हे दौलत यांचीच[1]. हे कशास राजकारणें करतील ? " असें ही ह्मणतात. एकूण[2] एक गोष्ट करार नाहीं. या प्रमाणें येथील[3] वृत्त. दुसरा प्रकार, मोंगल बिघाडाची गोष्ट तो बोलतो; परंतु कर्नाटकांत जातो, या वरून असें ही वाटतें कीं दबाव[4] मात्र दाखवितो. यंदा बिघाड करीत नाहीं. इकडील सरदार पिराजी नाईक, गोपाळराव, सयाजी बोरगे वगैरे मोंगलाकडे गेले. हे अवघे त्यास चढीं देतात त्यामुळें दबावाच्या गोष्टी बोलतो. असा प्रकार आहे. केवळ बिघाड[5] केला तर मिरजेचे मोर्चे उठवून मोंगला भोंवतें फिरावें ऐसें[6] ही आहे. मिरजेचे खंदकावर मोर्चे गेले. पुढें सुरुंग करावयाची तरतूद आहे. वरकड येथील प्रसंग बराच आहे. कारभारी निखालसता दाखवितात. (त्या प्रमाणेंच) वर्ततात. पुढें जसे वर्ततील तशी विनंती करूं. सविस्तर अवगत व्हावें ह्मणोन लिहिलें असे. तीर्थरूपांशीं[7] नीटच आहे. उदासीनता आपली, मात्र नसावी. शरीरप्रकृति तूर्त बरीच आहे. बाबां[8] औषध देतात. आपले आशीर्वादें आतांशीं प्रकृति फार उत्तम आहे. स्वाना छ० २३ जमादिलाखर -सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना. पै॥ छ० ३० जमादिलाखर

नं० १९० (पौष वद्य ८
जानेवारी ७)

श्रीगणपतिर्जयति.

पै॥ छ० २९ जमादिलाखर.

आशीर्वाद[9] उपरी. तुम्हीं रविवार छ० १७ तेरखेचें पत्र पाठविलें तें आजी

१ पेशव्यांचीच. २ एकंदरींत. ३ दादासाहेबांकडील. ४ भीति. ५ हा कोण सरदार हें ठाऊक नाहीं. ६ मोंगल लढाईसच प्रवृत्त झाला तर. ७ अशी मसलत आहे. ८ सखारामबापू. ९ दादासाहेबांच्या मर्जी प्रमाणेंच वागत आहों. १० बाबा वैद्य. हे दादासाहेब व सखारामबापू यांच्या विश्वासांतील गृहस्थ होतें. ' चिकित्सक ' या नांवानें यांचा उल्लेख पूर्वी झालेला आहे. [पहा अंक ३ पृष्ठ १०४] ११ हें गोविंद हरीचें गोपाळरावास पत्र.

भृगुवारीं अस्तमानीं पावलें. लिहिलें वर्तमान कळलें. पत्रावलोकनें बहुत संतोष जाहला. रामतीर्थचे मुक्कामचें पत्र (तुमचें) रविवारचें. त्या वरी आठा दिवसांचें हें पत्र सहावे दिवशीं पावलें. ऐशास आम्हीं तुम्हांस रविवारीं पैरिघ आला ते दिवशीं पत्र पाठविलें. त्या उपरी सोमवारीं युद्ध जाहलें ते दिवशीं पत्र पाठविलें तें पावलें नाहीं. माघारें माणूस आलें. त्या उपरीं मंगळवारीं रात्रीं पत्रें लिहून बहिरजी जासूद रवाना केला तो रविवारींच तुम्हांला पावला असेल. सिदूस तुमच्या लष्कराअलिकडे सा कोसांवरी भेटला. त्या उपरी चांद्या व शेटी पाठविले. त्या उपरी चंदो गिरमाजी पाठविला. पावला असेल. आह्मां विषयीं तुम्हीं चिंता न करावी. सहा महिन्यांची उमेद. त्यांत चौदा दिवस मंदवारीं आजी झाले. मुख्य गोष्ट तुम्हीं प्रसंगास गेलां, त्याणीं आदरपुरस्कर [तुमचा] लौकिक रक्षिला. यवनी दरबार. चार दिवस अधिक उणे लागतील, त्याची फिकीर नाहीं. जो विचार करणें तो पोक्तपणें करावा. येथें किल्ला आहे, आम्हीं आहों ! एकाएकीं त्याणीं कांहीं कर्तव्य नाहीं. लोक मायेचे एकदिल. मेहनत करणार चिरंजीव उभयतां आहेत. आम्हांस कोणे गोष्टीचे श्रम पडत नाहींत. सर्व साहित्य श्रीकृपेनें आहे. दाबूनदबावून पाहतात; परंतु त्यांस कोणी भीत नाहीं. तुम्हीं तेथें गेलां परंतु हरतजविजीनें तोंडघसीं पडसें करावें या मनसब्यांत आहेत. परंतु तो दरबार चिकारा नव्हे. खोल, स्वतः सावध. कौंर्यभागी मनापासून अनुकूल. मग काय होणें ! तेथील तेथें दगा करावया चुकणार नाहींत. बहुत सावधपणें रहावें. अगोदर हींच आमची रदबदली

---

१ पेशव्यांच्या फौजेचा वेढा. २ या पत्रांत आलेलीं बहिरजी, शिदू, चांद्या, व शेटी हीं जासुदांचीं नांवें. चंदो गिरमाजी हें कारकुनाचें नांव. ३ उमेद किल्ला झुजविण्याची. ४ प्रसंग पडला ह्मणून. ५ निजामअल्लीनें. ६ पेशव्यानीं. ७ पेशवे भीति घालून बघतात. ८ ' सखारामबापू वगैरे तुमचे प्रतिस्पर्धी तुह्मी मोंगलाकडे गेलां तेथें तुह्मांस तोंडघसीं पाडावें या विचारांत आहेत. ' ९ बेफाम. ' खोल, स्वतः सावध, ' हें वर्णन निजामअल्लीचें. १० राजे विठ्ठल सुंदर. ११ ' नवाबाच्या लष्करांतच तुह्मांवर

जे, तुम्हीं दूर देशीं गेलां तरी चिंता नाहीं, परंतु कल्याण असावें. त्यास होणार तें कालपरत्वें झालें. कालास मान द्यावा लागला. मुख्य त्याणीं केलें येणें करून सर्व त्यांजवरी दोष ठेवितात कीं, "तो[२] दूर राहिला होता; नाहक फौजा पाठवून त्याजवरी छापा घातला. सर्वास्वापहार करून राज्यांतून बाहेर लाविला तेव्हां गेला! त्याजकडे अंतर नाहीं." असें म्हणतात. परंतु मुख्यांस इतकें कोठें सुचतें! पराधीन! आबा पुरंदरे परवां आले. पुढें काय मनसबा करणार ते सुखें करूत. येथील कसें काय होईल हे चिंता सर्वथा न करावी. दर पत्रीं हेंच लिहीत गेलों आहों. काली चिरंजीव दाजीनें आपला खिजमतगार [तुम्हाकडे] पाठविला आहे त्या जवळी पत्र नाहीं, परंतु तुम्हीं कोठें आहां हें कळावें, मागें माणसें पाठविलीं तीं पावलीं नाहींत, येथील चिंता तुम्हीं कराल, यास्तव त्याणें मुजरदें माणूस रवाना केला. चिरंजीव दाजी जीवाभ्य श्रम करितो. चिरंजीव भास्करपंत ही श्रम करितात. सारी रात्र जागणें, खबरदारी, या उभयतांची. आम्हीं तिलमात्र श्रम करीत नाहीं. जेजाला, बाण, तोफा, फटकडी, इतके मार; खेरीज गोळीची वृष्टि होते; परंतु श्रीचें सुदर्शन फिरतें यामुळें कोणास ही उपद्रव नाहीं. एक दो दिसां आड एखादें माणूस जायां होतें. एखादें मरतें. श्रीकृपेनें खैर आहे. बाहेरील रात्रीचें किती माणूस जायां होत असेल श्री जाणें! दिवसास दर × ×[६]× रुपये पांच देत असतों. त्यामुळें प्यादे जपोन फिरतात. तीस पंचवीस चाळीस इतकें माणूस नित्यानीं दिवसाचें जायां होतें. त्यांत किती मरतात, किती जखमी, श्रीभगवान जाणें! श्रीस्वामी शुक्रवारीं आले. त्या दिवसा पासून येथेंच आहेत मोठी खबरदारी त्यांची. उपास करितात. "एकंदर जात नाहीं. तुमचें

मारेकरी वगैरे घालण्यास सखारामबापू चुकणार नाहीं,' असा लिहिण्याचा भाव!

१ 'पेशवे आपण होऊन तुमच्या वाटेस गेले. पहिल्यानें कुरापत त्यानींच काढिली.' २ गोपाळराव. ३ दादासाहेबांस. ४ ताबडतोब. ५ जिवापाड. ६ फुल्या घातलल्या ठिकाणीं एक अश्लील शब्द मुळांत आहे तो येथें गाळला आहे. ७ अगदीं, साफ.

अरिष्ट निरसन जालियावरी जाऊं," म्हणतात ! साक्षात् भगवान् स्वरूप! त्यामुळें चिंता नाहीं. ग्रामाधिपति पीर सर्व प्रकारें अनुकूल. रोज दोन स्वप्नें एक स्वप्न नाहीं असा दिवस नाहीं ! सर्व प्रकारें रक्षण करितो. मोठा चमत्कार[1] पाहिला ! येथें आम्हीं निर्भय आहों. काडीमात्र चिंता वागवीत नाहीं. तुम्हीं आमची काळजी न करणें. चिरंजीवांची[2] जखम बरी होत आली, परंतु पाय बरा नाहीं. युद्धांतील[3] जखमी सारे बरेच आहेत. जखमा बांधतात. बरे आठ चार दिवसांत होतील. चार मात्र मेले. आजी तागायत प्यादे पहिल्या दिवसा पासून आजी पावेतों दहा बारा असामी[4] होतील. यांत जखमी गोळा, बाण, फटकडी [यानीं] एक दोघे. दारूनें जळून मेले ते देखील यांतच. वीस पंचवीस पावेतों प्यादे जखमी आहेत. खैर आहेत. चिंता नाहीं. शिदूस[5] आजीच पत्र शुक्रवारीं रात्रौ लिहून दिलें. शनिवारीं पहांटेस निघोन येईल. गोविंदा बरा श्रम करितो. तुम्हांस कळावें म्हणोन लिहीलें आहे. पत्र पाठवीत जाणें म्हणजे समाधान वाटत जातें. लोभ कीजे हे आशीर्वाद.

नं० १५१

[१० जानेवारी.]

श्रीगणपतिर्जयति.

पै॥ छ० १ रजब.

आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत पौष वद्य ११ सोमवार प्रथम प्रहर रात्र यथास्थित जाणून स्वकीय लिहिणें. विशेष. तुम्हीं छ० १७ जमादिलाखर मंगळवारचीं पत्रें पाठविलीं तीं काली छ० २४ तेरखेस रविवारीं पावलीं. संतोष जाहला. पत्रार्थ विस्तारें श्रवण जाहला. ऐशास येथील निश्चय एक मारावें किंवा मरणें. दुसरा नाहीं. तुम्हीं आपली खा-

१ हा उद्गार किती भाविकपणाचा आहे ! २ नीलकंठरावाची. ३ आळेगांवच्या व घोडनदीच्या लढाईतील. ४ ही संख्या वेढा बसल्यापासून किल्ल्यांतील लोक मेले त्यांची. ५ पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास.

तरजमा असों देणें. परवां शिदू बरोबर (तुम्हीं) लिहिलें आहे कीं, ' त्वरेनें येऊन पोंहचतों. ' बहुत उत्तम आहे. ' भिवरेच्या पाण्यानें विजापूर उजवें टाकून कृष्णेच्या पाण्यास नवाब येतात. पुढें त्यां रोखें मजल दर मजल येतात. ' ह्मणोन लिहिलें तें कळलें. बिघाडाचा[2] मजकूर कळला. हे[3] कशास बिघाड करतील ! मुरादखान[4] याचे विद्यमानची बोली आहे. असो त्यांच्या आवईनें [हे मिरजेहून] निघाले तर बरेंच झालें. न निघत तरी सहजच बिघाड होईल. येथें तरतूद कोणे विषयीं कमी नाहीं. लोक सामान, सरंजाम सर्व आहे. तमाम लोकांस रामराम पांविले. प्यादे यांस हिम्मत देतों. त्यांचे मोर्चे रेवणीवरी आले. पुढें त्यांचा उपाय नाहीं. यद्यपि तेथेंच खळी घेऊन खंदकांत उतरावयाचा मजकूर करितील तरी त्याचीं वर्में बहुत आहेत ! त्याणें कांहींच होणें नाहीं. जो विचार कराल तो पोक्ता करणें. पुढें आलियावरी खार्सा मागें, फौजा पुढें, असें ही जाहलें तरी कैंहीवरी गांठी पडेल. तो ही मजकूर एक प्रकारें युक्तीस पडेल. आम्हीं काय लिहावें ! कळेल ते रीतीनें सावधपणें करावें. दुष्ट फार आहेत.

---

१ मिरजेकडे. २ मोंगल व पेशवे यांमध्यें लढाई होण्याचा संभव असल्याचा. ३ दादासाहेब व सखारामबापू. ४ महमद मुरादखान हा दादासाहेबांचा व सखारामबापूचा मित्र होता, ' त्याच्या विद्यमानें मोंगलाची पेशव्यांशीं बोली सुरू झाली आहे कीं, तुह्मीं मिरजेचा वेढा उठवून चालते झालांत तर बरें आहे; नाहीं तर तुमची आमची लढाई होईल. ' या प्रमाणें बोलणें होत आहे तरी मुरादखान दोंहीं पक्षीं लढाई व्हावी या पक्षावर गोष्ट येऊंच देणार नाहीं, असा गोविंद हरीच्या लिहिण्याचा अभिप्राय. ५ मोंगलाच्या. ६ मोंगलाच्या लष्करांतून गोपाळरावानें गोविंद हरीस पत्रें पाठविलीं त्यांत किल्ल्यांतील सर्व शिपाई लोकांस रामराम लिहून पाठविले होतें ते गोविंद हरीनें सर्वांस प्रविष्ट केले. ७ पेशव्यांचे. ८ निजामअल्ली. ९ वैरण व लांकूडफांटे मिळवून आणणारी फौजेची टोळी. ' मोंगलास घेऊन तुह्मी मिरजे जवळ जवळ आलांत ह्मणजे त्यास मागें एखादी मजल ठेऊन त्याची फौज घेऊन तुह्मीं पुढें आलेत तर श्रीमंतांच्या कहीची व तुमची गांठ पडेल. ' असा लिहिण्याचा अभिप्राय. १० ' पेशव्यांच्या व मोंगलाच्या लष्करांत तुमचे द्वेषी फार आहेत. ते दगा करितील. या कारितां सावध असावें. ' असा लिहिण्याचा अभिप्राय.

दगाबाजी करावया चुकणार नाहींत. हैदरनाईकाकडे चिरंजीव आबा गेले ते ही येणार किंवा यांचें लिहिलें त्यांस कोणे प्रकारें गेलें असेल तसें करितील. येथील मनसबा परस्परें तुम्हांस कळेल. येथील फिकीर न करावी. चिरंजीवांची जखम बरी होत आली. चिरंजीव भास्करपंत व दाजी सर्वाविषयीं खबरदारी मेहनत करावया अंतर करीत नाहींत. जेजाला, बाण, तोफा, फटकडीया, यांचा मारा नित्य होतच आहे. परंतु श्रीचें सुदर्शन फिरतें यामुळें सर्वांचा बचाव आहे ! चिंता न करणें. तीर्थरूप आपा व चिरंजीव वामन व भाऊ व माधवराऊ व धोंडोबा सुखरूप पावलियाचें पत्र आलें. चिरंजीव विनोबा जखम लागलियामुळें पाय उतारा जाहला तो कोण्या ऐका स्थळास सुखरूप गेला. तेथून तो तिकडे जाईल. त्या विशीं चिंता न करणें. तुम्हीं गकार नामकास पत्र लिहिलें तेंच त्याणीं आम्हांकडे पहावया पाठविलें होतें, त्यावरून विस्तारें कळलें. नवाबानीं (तुमचा) सन्मान केला, अभिमान पुर्ता धरिला, ऐशास ते थोर आहेत. त्यांस ये विषयींचा अभिमान पडेल. संदेह नाहीं. तुम्हीं लिहिलें कीं, " श्रीमंत थोर, सत्यवचनी, त्यांची आज्ञा कीं कृष्णातीरींच रहावें; त्यावरून राहिलों. आणि [त्यानीं आम्हांवर] फौज पाठविली ! विश्वासघात केला ! ये गोष्टीनें त्यांचाच लौकिक " (झाला.) ह्मणोन लिहिलें तें प्रमाण.

१ हैदरअल्लीस. २ नीलकंठरायाची. ३ आपा [त्रिंबक हरि] हा गोविंद हरीचा वडील बंधु. वामनराव हा मुलगा. भाऊ (परशुरामभाऊ) व माधवराव कृष्ण व धोंडोभास्कर हे पुतण्ये. ४ विनायक भास्कर हा गोविंद हरीचा पुतण्या. यास जखम नुकतीच आबा पुरंदरे व गोपाळराव यांची जमखिंडी जवळ लढाई झाली तींत लागली होती. ५ विनोबा अमुक स्थळास गेला आहे हें पत्र लिहिणारास माहीत असून तो तें स्थळ पत्रांत लिहित नाहीं, याचें कारण चाणक्ष वाचक ताडतीलच. तें असें कीं, पत्र जर दुर्दैवानें शत्रूच्या हातीं गेलें तर ते त्या ठिकाणाहून विनोबास पकडून नेतील. ६ त्रिंबक हरी, वामनराव, परशुरामभाऊ वगैरे ज्या ठिकाणीं आहेत तेथें. हें ही स्थळ कोणचें हें मागील टिपेंत लिहिलेल्या कारणास्तव नमूद केलेलें नाहीं. ७ भवानराव प्रतिनिधीचा मुतालिक गमाजी यमाजी यास. ८ निजामअल्लीनें. ९ दादासाहेब. १०दुर्लौकिक.

थोरास कोण वाईट झणेल ! व तुम्हीं अशा अवस्थेनें गेलां असतां त्यांणीं आदरमान केला, हत्ती, शिरपेंच दिला, पुढें अभिमान धरिला, हें थोरांसच उचित. तुम्हीं उतोन मातोन गेलां नाहीं. कर्जदार जाहलां, घोडीं युद्ध प्रसंगीं पडलीं त्याची वाट नाहीं, पुढें स्थैलें घेऊन भिक्षा मागावया लावावें हा मना पासून सखारामपंताचा संकल्प ! त्या पेक्षां मृत्यु बरा झणोन कबूल करावें लागलें. लज्जारक्षक श्रीभगवान् ! धण्यांस कांहींच समज नाहीं. तो करील तें प्रमाण. ते ही बुडावयास आले. बुडविले झणजे त्यांचा संकल्प सिद्धीस गेला. मग वांचो थां कांहीं हो ! या प्रकारचें संकट कोणास ही प्राप्त जाहलें नसेल. बरें ! श्रीची इच्छा प्रमाण ! दुष्टाचा संकल्प सिद्धीस जात नाहीं. बहुतांचें वाईट करावें (हा त्याचा हेतु.) जन्मवरी ज्याचें अन्न भक्षिलें त्याची दौलत समुळीं बुडविली या पेक्षां श्राप [सखारामपंत] कोणते घेणार ! श्रीकृपेनें तुमचीं पत्रें येऊं लागलीं (त्यामुळें) दुप्पट हिम्मत लोकांस झाली. कोणी खातरेस आणीत नाहींत. तुम्हीं ही त्वरेनेंच याल. चिरंजीव पंढरीनाथ व चिरंजीव बाळ आदिकरून सर्व कुटुंब आम्हीं सुखें आहों. चिरंजीव नीलकंठरायाची जखम बरी होत आली. चिरंजीव भास्करपंत व दाजी उभयतां सर्व बंदोबस्ती करितात. आम्हांवरी तिलमात्र कल्लोळ नाहीं. मंडळीचे सोबती सर्व अनुकूल. शिपाई अनुकूळ. प्यादे अनुकूळ. कांहीं चिंता न करावी. तुम्हीं व नारायणराऊ उभयतां बहुत सावधपणें असत जावें. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे आशीर्वाद. श्रीस्वामी येथें आहेत. कळलें पाहिजे. हैणगोजी वर्त-

---

१ निजामअल्लीनें. २ मिरज वगैरे ठाणीं. ३ मोंगलाच्या आश्रयास जावयाचें कबूल करावें लागलें. ४ माधवराव व दादासाहेब यांस. पुढील वाक्यांत 'तो' हें सर्वनाम सखारामबापूचें वाचक आहे. ५ धण्याचें राज्य बुडविण्याचा सखारामपंताचा संकल्प. ६ अथवा. ७ कष्ट, संकट. ८ हे स्वामी पटवर्धनांचें कल्याण इच्छिणारे असून आपल्या तपश्चर्येच्या बळानें त्यांचें अरिष्ट निरसन करण्या करितां मुद्दाम मिरजेच्या किल्ल्यांत या प्रसंगीं येऊन राहिले होते. या विषयीं पुढील पत्रांतून उल्लेख आले आहेत ते पहा. ९ हें जासुदाचें नांव.

मान सांगतां कळेल. वरचेवर पत्रें पाठवावीं. हे आशीर्वाद.

त्वरेनेंच यावें.

अपत्यें नीलकंठानें व दाजीनें व पांडूनें व बाळानें साष्टांग नमस्कार विज्ञापना. हेच पत्रीं भास्कर हरीचे आशीर्वाद.

नं० १५२L

(अजमासें पौष वद्य द्वादशी किंवा त्रयोदशी
११ किंवा १२ जानेवारी.)

श्री.

सेवेशी सखाराम भगवंत. साष्टांग नमस्कार विज्ञापना. आपण पत्र श्रीमंतांस लिहिलें, त्यांत अर्थ कीं, " माझी कृपा पुत्रा प्रमाणें आहे. तुम्हीं निर्मळ चित्त असावें; " तरी ही गोष्ट आपल्यास उचित तेच लिहिली. व मी ही वर्तणूक कशी करितों हे सर्व श्रीमंतांस माहितगिरी आहे. ते लिहितील तें प्रमाण मानावें. सर्वांशीं गोड रहावें, कालानुरूप थोडें थोडें चालवावें, या रीतीनें करीतच आहों. तथापि माणूस थोडें चालविल्यास श्रमी होतें. दुसरें, श्रीमंत रा० दादासाहेबांच्या मर्जीचा प्रकार (कसा आहे.) तो ही (आपल्या) ध्यानांत आहेच. जेथवरी संभाळायाचें तेथवरी चुकत नाहीं. वरकड सर्व थोड्या बहुतानें मेळवून घेतले. गोपाळरायाचा निर्गम होत असतां (त्यानीं) ओढूनें फार वाईट दाखविलें, यास आमचा इलाज नाहीं. मिरजेस फौज गुंतली यामुळें हैदरनाइकानें शेखी शौकी केली आहे; तथापि आठा चोहों दिवसानीं फौज हैदरनाइकाकडे ही रवाना होईल. सर्व भार ईश्वरावर आहे. त्याचे कृपेनें जें होणें तें होईल ! हे विज्ञापना.

पै॥ छ० ३० जमादिलाखर.

---

१ हें पत्र सखारामबापूनें गोपिकाबाईस लिहिलें आहे. २ माधवराव पेशव्यांस. गोपिकाबाईनें पेशव्यांस पत्र लिहिलें त्यांतच सखारामबापूस मजकर लिहिला होता त्याचें त्यांनें हें निराळें उत्तर पाठविलें. ३ हट्ट धरून. ४ ऐटीनें, गर्वाने वागणें. कर्नाट-

श.१६८४ गोविंद हरि मिरज झुजाविती इ.स.१७६३

नं० १९३

(१३ जानेवारी)

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत पौष वद्य अमावास्या गुरुवार अस्तमान प्रहर रात्र. यथास्थित असे विशेष. तुम्हीं छ० १८ जमादिलाखर मंगळवारचें पत्र एका गृहस्थाच्या माणसा समागमें पाठविलें तें काली बुधवारीं अस्तमानीं पावलें. येथील वर्तमान वरचेवर पत्रीं लिहीतच आहों. सोमवारीं रात्रीं मोर्च्याबरी लोकें गेले होते. आवई केली. मोर्चे उधळले. ते समयीं चंद्रजोती, हिलाल लाविले आणि मार दिला तेव्हां मोर्चातील माणूस फार जायां झालें व कांहीं ठार ही जाहलें. पीर मोठी जागती ज्योत! स्वप्नीं प्रत्यक्ष सांगितले प्रमाणें सांगतो! श्रीस्वामी नेहमीं धीर देतात. श्रीची कृपा परिपूर्ण (आहे.) जागृत स्वप्नें सर्वांस पडतात. कांहीं फिकीर नाहीं. दिवसें दिवस येथील मनुष्य तैजगी अधिक धरीत चालिलें. बाहेरील लोकांची निराशा झाली; तथापि यत्न करितात, परंतु निर्फळ! त्या ही मध्यें तुम्हांकडील आवई 'आले' ह्मणोन येत आहे, येणें करून आपलें माणूस फारच उत्साह धरितें. तुम्हीं लिहिलें कीं, आंव न सोडणें; ऐशियास आंव सोडावया कारण काय? लोक एकदिल. तरतूद करणार उभयतां चिरंजीव निपूण. कोणेविशीं प्रतिकूलता नाहीं यामुळें काळजी नाहीं. तुम्हीं गळबटोन नवाबाकडे गेलेत. तेथें लौकिका प्रमाणें बहुमान होऊन

कांत हैदरनाईक यावेळीं पेशव्यांच्या ताब्यांत असलेल्या चित्रदुर्ग व विदनूर या संस्थानांच्या राशीस लागला होता.

१ हें पत्र गोविंद हरीनें गोपाळरावास लिहिलें आहे. २ या गृहस्थाचें नांव गोविंद हरीस माहीत असून ही त्यानें लिहिलें नाहीं याचें कारण काय तें मागें नंबर १५१ च्या पत्रावरील एका टिपेंत लिहिलेंच आहे. ३ किल्ल्यांतील लोक. ४ प्रत्यय येणारीं. ५ ताजेपण, दम. ६ 'गोपाळराव मोंगलास घेऊन मिरजेचा वेढा उठविण्या करितां आले.' अशी येथें दररोज आवई उठत आहे. ७ अवसान. ८ पुरुषोत्तमराव दाजी व भास्कर हरी.

(त्यानीं) अभिमान धरिला हाच संतोष जाहला. त्यांत तुम्हीं दर पत्रीं लिहितां कीं " कृष्णेच्या पाण्यास येऊन जलदीनेंच मजल दर मजल येतों" ह्मणोन लिहितां याहून विशेषोत्कार कोणता ह्मणावा ! मुख्य श्रीची कृपा. (तुम्हीं धण्याची) एकनिष्ठ सेवा केली आणि धणी अज्ञ होऊन निष्ठुरता धरिली तरी श्री यवनाच्या चित्तांत संचरोन त्याजकडून कृपा केली हें समजावें ! वरकड कितेक मजकूर लिहिला तो प्रमाण. हे यजमान निमित्यास पात्र करून कार्यभागी याणीं यजमानाची दौलत क्षयास नेली ! राहिलें तें ही दो चौ महिन्यांत लयास नेऊन यांस ' भिक्षांदेहि ' करावयास लाऊन आपण किल्ल्यांवरी बसोन राज्य करणार ! [त्यांच्या] संग्रहीं द्रव्य पुष्कळ आहे. वरचेवर एक एकास बक्षाची गति करून विल्हे लाविणार ! उभयतां कार्यभागी विल्हेस लाविले. आतां धाकटे चिर्त्रगुप्त यांजवरी आली! त्यांस आणावया गेले ह्मणोन ऐकतों. श्रीइच्छा प्रमाण. तुम्हीं येथील काळजी न करणें. जें कर्तव्य तें सलाबतीनें मातबरीनें आपली इभ्रत शह यांजवरी पडोन नक्ष होय तें करावें. आम्हांस वर्तमान कळेत नाहीं परंतु आपणांस परस्पर कळत असेल. श्रीचें सुदर्शन चक्र फिरत आहे ! श्रीनें फार बचाव केला आहे. आमचा अभिमानी समर्थ श्रीपंढरीनाथ आहे. चिंता न करणें. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे आशीर्वाद.

नं० १९४ (पौष वद्य ८
जानेवारी ७)

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वादः उपरी. तुम्हीं पत्रीं लिहिलें कीं, " महिना पंधरा दिवसांत आ-

---

१ विशेष गोष्ट. २ पेशवे व दादासाहेब. ३ सखारामबापू. ४ नवीन मिळालेले किल्ले सिंहगड व पुरंदर यांजवर. ५ बाबूराव फडणीस व त्रिंबकराव मामा पेठे. ६ नाना फडणीस. ७ वेळ येऊन बेतली. ८ पेशव्यांवर. ९ पेशव्यांच्या लष्करांतील वर्तमान आह्मांस कळत नाहीं पण तुह्मांस परस्पर कळतच असेल. १० हें पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास लिहिलेलें आहे.

म्हीं येतों तों तुम्हीं दम धरणें," ह्मणोन लिहिलें; त्यास तुम्हीं लिहिलें त्यांत भाव जे, " भिवरेच्या पाण्यानें संगमास जातों. संगमानें कृष्णेच्या पाण्यानें वरते येतों " ह्मणून लिहिलें, त्यावरून अपूर्व वाटलें. आठ चार दिवस अधिक लागले तरी चिंता नाहीं, परंतु समीप आहां. पूर्वेकडे भिवरेच्या पाण्यानें पंचवीस गांव लांब जाऊन मग इकडे माघारे फिरणें, तेव्हां एकप्रकार मनसबा दिसतो. अगदींच दूर गेलां. मग येथील येण्याचा मजकूर लांबीवरी पडला ! मोर्चे रेवणीवरी आले आहेत. त्यांचा[1] इरादा जे खंदकांत उतरून सुरुंग लावावे. आठ चौ दिवसांत काम उरकावें. त्वरेनें कार्य सिद्धीस नेऊन पुढील कर्तव्यार्थ करावा. त्यास तुम्हीं तिकडे गेलांच तरी अगदींच आस्था सुटलीसी झाली. न कळे कालाची गत ! यांस ह्मणेंतील कीं " आम्हीं तूर्त येत नाहीं. तिकडे पुढें जातों. तुम्हीं आपलें कार्य करणें. " ह्मणतील; ह्मणजे कार्यनाश व्हावयाचा प्रकार ! आम्हीं तो भीत नाहीं. परंतु बुद्धीस युक्त मनसबा दिसत नाहीं. इकडे यावयाचें अगाध काय ! जतेकडून जागां जागां पाणी पुष्कळ आहे. या मार्गें यावे.

---

१ निजामअल्लीचें लष्कर या वेळीं मंगळवेढ्यापलीकडे तीन चार मजली होते व मिरजेपासून सत्तर पाऊणशें कोसांवर होतें. गोपाळरावास वचन दिल्या प्रमाणें त्याच्या मनांत जर खरोखर कुमक करावयाची असती तर तो सरळ पश्चिमेकडे दर मजल येता ह्मणजे दहा दिवसांत मिरजेस पोहोंचता. परंतु तो तसें न करितां भीमेच्या पाण्यानें पूर्व व दक्षिण दिशांच्या रोखानें रायचुराच्या उत्तरेस आठ कोसांवर भीमा व कृष्णा यांचा संगम होतो तेथपर्यंत शंभर दीडशें कोस जाऊन नंतर कृष्णेच्या पाण्यास मिळून पुनः दीडशें कोस वर मिरजेपर्यंत येणार, असें जेव्हां गोविंद हरीस कळलें तेव्हां त्यास साहजिकच वाटलें कीं, पेशव्यांचें निजामअल्लीशीं आंतून ठाकठीक सूत्र असून तो गोपाळरावास कुमक करण्याच्या फक्त थापा देत आहे ! कृष्णा व भीमा यांचा संगम रायचुरच्या उत्तरेस आठ कोसांवर होतो हें वर सांगितलेंच आहे. या संगमास ' कपाटसंगम ' किंवा ' काडलूर संगम ' असें पेशावाईत नांव होतें. हल्लीं हेंच नांव कायम आहे कीं नाहीं हें माहीत नाहीं. २ चमत्कारीक. ३ पेशव्यांचा. ४ निजामअअल्ली पेशव्यांस सांगून पाठवितील कीं, आह्मीं कर्नाटकांत जातों. तुह्मीं मिरजेचें कार्य उरकून घ्यावें.

पुढें कृष्णे भीमेच्या संगमास जाऊन तिकडून इकडे यावया एक मास कनिष्ठपक्षीं पाहिजे. उत्तम पक्षीं दोन मास पाहिजेत. हरएक विशीं यांची तरतूद जलदीची दिसते. तुमचा कार्यभाग दीर्घसूत्री पडेल. यवन गेला पुढें असें झालिया यांसी सुखावह होईल. (नबाब) पुढें जाऊं लागलें (आणि त्यानीं) मागें दबावणीचीं पत्रें पाठविलीं त्याणें काय होणें ! निदर्शनास आलें पाहिजे. कदाचित् ते गेले तरी त्यांची फौज मागोन द्यावी आणि आपण मंगळवेढ्याच्या सुमारें यावें. अगर जत प्रांतीं पाणी पाहून रहावें. लोक ही जमा होतील. त्यांची फौज (व) तुम्हीं मिळोन राहिलां तरी यांस ही वहिमा पडेल. तुमची जुनी फौज जमा होईल. नवे ही (लोक) तुम्हीं ठेविले ते कार्यावरी पडतील. नाहीं तर ' इदंचनास्ती परंचलभ्यते ' असें करूं नये ! गत वर्षीं येवतांकडील वाटेचें पाणी पुरलें आणि यंदांच जलशोष पडला असा अर्थ नाहीं. अगर भिवरेच्या पाण्यानें माघारा माणेस आणावा. माणेच्या पाण्यानें आणावा म्हणजे पाण्यास उणें नाहीं. हें पत्र तुमचें रविवारचें पाहोन संदेह प्राप्त जाहला. आमची तैवकल श्रीवरी ! कोणे ही गोष्टीची फिकीर नाहीं. परंतु तुम्हीं गेलेले (त्याचें) सार्थक नाहीं. व्यर्थ होईल. यास्तव सूचना लिहिली आहे. वारंवार लिहिणें नलगे. श्रीचें सुदर्शन फिरतें. सर्व प्रकारें आम्हीं सुखीं आहों. तुम्हांस कळावें हे आशीर्वाद.

---

१ घाईघाईनें आल्यास. २ ' किल्ला कावीज करण्याचे कामीं पेशव्यांच्या फौजेचीं तरतूद जलदीची दिसत्ये. ' ३ कर्नाटकचे रोखें. ४ पेशव्यांस मिरज घेणें सुलभ होईल. ५ पेशव्यांकडे. ६ नबाब निजामअल्ली. ७ भय. ८ गोविंद हरीच्या लिहिण्यांत संस्कृत वचनें पुष्कळ येतात, पण सारीं अशुद्ध ! वरील वचन ' इदंचनास्ति परंच न लभ्यते ' असें पाहिजे हें सांगवयास नकोच ! ९ येवत हें गांव पंढरपुराजवळ आहे. १० माण व भीमा यांचा संगम पंढरपुरच्या दक्षिणेस दहा मैलांवर सारकोली येथें होतो. मिरजेस येण्या करितां वाटेंत पाणी मिळण्याची अडचण असेल तर नवाबाचें लष्कर सुरापुराजवळ भीमातीरीं आहे तें तसेंच वर त्याच नदीच्या कांठानें माणेच्या संगमापर्यंत आणावें व तेथून माणेच्या तीरानें आठपाडी व सांगोलें या तालुक्यांतून मिरजेकडे आणावें; असें गोविंद हरी गोपाळरावास सुचवीत आहे. ११ भार, विश्वास.

श.१६८४ गोविंद हरि मिरज झुजवितो इ.स.१७६३

याचें उत्तर अति सत्वर पाठवावें.

पैा॥ छ० २९ जमादिलाखर. पौष मास.

नं: १९९

[अजमासें पौष वद्य
जानेवारीचा प०पंधरवडा]

श्रीगणराज.

चिरंजीवें राजश्री त्रिवर्गास आशीर्वाद उपरी सविस्तर तीर्थरूपांचे पत्रावरून कळलें. धन्वंतरी सत्वरीच येऊन रोग निरशन होईल. तिलमात्र चिंता न करणें. दिलासा देणें. ज्याणीं मेहनत केली त्यांचें कल्याण होईल. आमचे शत्रुपक्षास उन्मादवात झाला आहे तो ही थोडेच दिवसांत दूर होईल. त्याणीं खंदकावर येऊन ही कांहीं होणें नाहीं. लष्कर उद्यां कूच होऊन त्याच रोखें येत आहे. दोन मजली या रोखें फिरल्याची खबर ऐकतांच पलायन करतील. येथील यजमानाचे चित्तीं ही गोष्ट शेवटासच न्यावयाची आहे. फारसें बाहेर निघत न जाणें. तों आम्हीं अविलंबें पुढें सडे फौजेनिशीं येतों. आलोंच असें समजणें. हे आशीर्वाद. कृष्णराव बल्लाळ यास नबाबानीं निरोप दिला. " गोपाळराव यांचें कर्ज व्याज सुध्दां सावकारी निशा करून द्या, स्थळें तुमचीं देवितों. हे गोष्ट तुह्मांपासून होत नाहीं तेव्हां आह्मांस तो त्याचा उपराळा जरूर करावा लागतो. " या प्रमाणें भर कचेरींत सांगोन निरोप दिला. मुरादखानाची फौज

---

१ हें पत्र गोपाळरावानें मोंगलांचे लष्करांतून मिरजेस ज्या त्रिवर्गास लिहिलें आहे ते पुरुषोत्तमराव दाजी, नीलकंठराव व पांडुरंगराव हे होत. २ गोविंद हरीच्या पत्रावरून (तीर्थरूपांस पत्र पाठविलें आहे त्यावरून.) ३ उत्साह, धीर. ४ लष्कर मोंगलाचें. ५ पेशवे मिरजेचा वेढा उठवून पळून जातील. ६ निजामअल्लीचे. ७ हे पेशव्यांकडून मोंगलाच्या दरबारीं वकील होते. यांचें चिरंजीव गोविंदराव काळे यांजकडे ही तेंच काम होतें. ८ मिरज वगैरे. ९ कुमक. १० मुरादखानावर निजामअल्लीची इतराजी होण्याचें कारण तो पेशव्यांशीं बिघाड करूं नये असें सांगत होता हें होय. जानबा निंबाळकरावर निजामअल्लीची इतराजी होण्याचें ही तेंच कारण.

अगदीं बरतर्फ केली. चारशें पर्यंत ठेविले. नबाबानीं राजे विनायकदास यां समागमें पंचवीस हजार फौज सडी देऊन आमची त्यांची गांठ घालून पुढें रवाना करितात. जानबा निंबाळकराचे चिरंजीव व मुरादखान नबोबे [आपल्या] बरोबर ठेवणार. एक मजल ते[2] मागून येणार. पुढें नेमीत नाहींत. गमाजी बाबा आले ते विठ्ठल सुंदर यांचे आप्त. तें ही काम उपयोगीं पडेल. गमाजी बाबा व आम्हीं एकत्रच राहतों. त्यांचे हातीं राज्यांतील राजकारणें व पैंवत आहेत. एकास एक बळ मनसब्याचें पडेल. आम्हीं आलों ज्या दिवशीं त्याच दिवशीं मुरादखानाची मसलत राहिली. आजी चार दिवस परिच्छिन्न ' बिघाड ' असें ठराऊन मरली (?) च्या पाण्यानें तालिकोटानजीक कृष्णेस मिळोन तडका येतों. काळजी न करावी. चार दिवस दम मात्र धरावा. माणूस जायां[4] होऊं देऊं नये. त्यांच्यानें कांहीं खंदकावर येऊन होणें नाहीं. ही खबर पोंचल्यानंतर त्यांच्यानें दम धरवत नाहीं. अवसान धरून जायां न होतां खबरदार रहावें. तों आठा दहा दिवसांत येऊन पोहोंचतों. चिंता न करावी. हे आशीर्वाद. मंगळवेढ्यांहून सुभाना जासूद पाठविला, त्याज उपरी शिदूस रवाना केला, तो मजकूर कळला. आमची काळजी न करणें. सत्वर येतों. हे आशीर्वाद.

नं० १९६ [१६ जानेवारी.]

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत माघ शुद्ध द्वितीया सह तृतीया

---

१ विठ्ठल सुंदर व विनायकदास हे भाऊ भाऊ होते कीं काय न कळे ! दोघांस ही ' राजे ' हा किताब होता. २ गोपाळरावाच्या लिहिण्याचा भाव असा कीं, नबाब एक मजल मागें राहणार. पंचवीस हजार फौजेनिशीं राजे विनायकदास यांस आह्मां बरोबर अघाडीस नेमिणार. निंबाळकर व मुरादखान यांस नबाब आपणा बरोबर ठेवितात, अघाडीस पाठवीत नाहींत, याचें कारण, ते पेशव्यांचे मित्र असल्यामुळें अघाडीस राहून कांहीं दगा करितील ! ३ मराठी राज्यांतील, सातारच्या राजमंडळांतील. ४ किल्ले सातारा वगैरे. ५ मसलत पेशव्यांशीं सलोखा राखण्याची. ६ निस्संशय. ७ पेशव्यांच्या फौजेनें. ८ पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास.

रविवार प्रहर रात्र. यथास्थित असे. विशेष. तुम्हीं वद्य दशमी रविवारचें पत्र चंदो गिरमाजी बरोबर पाठविलें तें आजींच प्रातःकाळीं तास रात्रीस पावलें. लिहिलें वर्तमान विस्तारें कळलें. पत्रावलोकनानें फार संतोष झाला. चालगनुराहून लिहिले प्रमाणें पुढें [तुमचें व मोंगलाचें] आगमनच होईल. येथील वर्तमान यथास्थित आहे. हा काल पाघेतों लोक एकदिल [आहेत.] दिवसें दिवस लोकांस उमेद भारी ! कोणे ही गोष्टीची प्रतिकूलता नाहीं. आपण येथील चिंता न करावी. अवसान लोकांस बरें आहे. सर्व खटपट करणार उभयतां चिरंजीव आहेत. येथील वर्तमान मोर्चे रेवणीवरी आले आहेत. सुरुंगाचा ही यत्न करितात परंतु लाग चालत नाहीं. परवां गुरुवारीं रात्रौ मोर्च्यावरी लोक गेले होते. पांच सात माणसें तोडिलीं आणि शाबूतीनें आले. त्या दिवसा पासून मोर्च्याची ही बंदोबस्ती व्हावी ह्मणून मुख्यांस मोर्च्यास पाठविलें. स्वैतः व कार्यभागीं डेरांचें आहेत. मुख्य आल्या पासन तमाम सरदार मोर्च्यांस नेहमीच बसले आहेत. माणूस ही दाट मोर्च्यास बसतें. आपण लिहिले वरून या उपरी आम्हीं मोर्च्यावरी लोकांस पाठवीत नाहीं. दिवसास वीस पंचवीस तीस माणूस मोर्च्यांतील जखमी व ठार मिळोन होतात. रात्रीचे या शिवाय ! तोफा, जेजाला, गरनाळा, फटकडीचे गोळे व बाण पडतात, परंतु श्रीचक्र फिरतें त्या मुळें फार खैर होत आहे. किल्ल्याचीं पैनें गोळे लाऊन पाडितात. चिरंजीवें मागती रात्रींत तेथें भिंत घालितात ! तमाम डेरे राहुट्या फाडून पिशव्या करून आंत माती भरून त्यांजवरी पाणी वोतून भिजवून पिशव्या (चिरंजीवानीं) लाविल्या. त्या जागां गोळ्यांचा काट होत नाहीं. जितकी तरतूद करावयाची ते करितात. लढाईच आहे. किरकोळ एक दुसरें माणूस किल्ल्यांतील जायां होत आहे गोळी लागोन. अगर गोळा लागतो

---

१ माधवराव पेशव्यांस. २ स्वतः दादासाहेब व त्यांचे कारभारी सखारामबापू, महिपतराव चिटणीस वगैरे. ३ आपापले डेऱ्यांत. ४ तटबंदीच्या भिंतीचे वरचे भाग. ६ पुरुषोत्तमराव व भास्कर हरि.

भिताडास, [आणि मग] भिताडाचा भेडा अगर धोंडा लागतो. मुख्य श्रीची कृपा, यामुळें खैर होत आहे. श्रीपीर व किल्ल्यांतील स्वामी, नरसोबा हे अनुकूल. या खेरीज थळ हसोबा अनुकूल. कोणी बाहेर गेला नाहीं तरी चावळूनच " आले ! आले ! " ह्मणून पळावया लागतात. श्रीस्वामीस आपली विज्ञापना प्रविष्ट केली. ते ही नेहमीं बुद्धिवाद लढाईची हिम्मत देतात. उपवास करितात. आजी बावीस रोज मोर्चे बसोन जाहले. स्वामीस येऊन चोवीस रोज जाहले. अन्नाचा लेश नाहीं ! मोठा अभिमान त्यांस पडला आहे !!! स्वप्नें ही जागरूक उत्तम प्रतीचीं शुभदायकें होत आहेत. श्रीची कृपा हेच जाणावी कीं, तुम्हीं पर दरबारीं गेलेत, त्याणीं अभिमान धरिला हेंच अपूर्व ! तेथें बोल्या चाल्या झाल्या त्याचीं पत्रें वरचेवर येत असतील किंवा नाहीं न कळे ! अद्यापि मोर्च्यांचे तरतुदींत लौकिक दर्शवितात अंतर्यामींचें श्री जाणें ! तो कृतघ्न नेहमीं कार्यभागी डेरां असतो. बाहेर येत नाहीं. शंकर शिवदेव, तोफ व खासा (या) चौघांचा मंत्र फुटत नाहीं. अन्यत्र सर्व आहेत त्यांस तो मंत्र कळत नाहीं. मुख्यांस कोण्या मतलबें मोर्च्यांत आणिलें हें न कळे ! शिवदेव शंकर आणि कार्यभागी त्यांत जवळी या प्रमाणें एका वाडियांत नेहमीं आहेत. शुक्रवारा पासून भोजन देखील तेथेंच करितात. " राजश्री गमाजीबावा व त्याचे मुख्य आले आहेत. ते आम्हीं एकत्र राहतों. त्यांचा ही सन्मान उत्तम प्र-

१ ग्रामदैवत. २ ' आमचे लोक किल्लयाबाहेर गेले नसले तरी मोर्च्यांत पेशव्यांचे लोक रात्री असतात ते भीतीनें ' किल्लेकरी आले ! आले !! ' असें ह्मणत पळून जातात. ' ३ निजामअल्लीनें. ४ ' तुमचें व निजामअल्लीचें बोलणें जें तेथें झालें आहे त्याची बातमी येथें पेशव्यांचे लष्करांत येत असेल कीं काय न कळे ! ' ५ कार्यभागी सखारामबापू. तो डेऱ्यांतच नेहमीं असतो, बाहेर पडत नाहीं, मोर्च्यांत किंवा अन्यत्र कोठें किल्ल्यांतील लोकांच्या माऱ्यांत सांपडत नाहीं; याबद्दल गोविंद हरीस फार वाईट वाटतें ! ६ नारो शंकर व विठ्ठल शिवदेव विंचूरकर ! ७ सखारामबापू. ' विठ्ठल शिवदेव, नारो शंकर, सखारामबापू, व स्वतः दादासाहेब हे काय खलबत करितात तें बाहेर फुटत नाहीं. ' ८ पेशव्यांस दादासाहेब व सखारामबापू यानीं पेशव्यांच्या जिवास अपाय व्हावा या बुद्धीनें त्यांस मोर्च्यांत रहावयास पाठविलें, अशा अर्थाचा कांहीं कुतर्क हें पत्र लिहिणारा वरील वाक्यांत सुचवीत आहे. ९ दादासाहेबांजवळ. १० गमाजी

कारें जाहला आहे." ह्मणोन लिहिलें तें कळलें. वरकड पुढील कर्तव्यार्थाचा मजकूर नवाबाच्या चित्तांतील लिहिल्यावरून ध्यानांत आला. बरें! श्री इच्छा प्रमाण! चिरंजीव नीलकंठराऊ बरे होत आले. चिरंजीव पंढरीनाथ बरे आहेत. चिरंजीव भास्करपंत व दाजी ही बरे आहेत. श्रम फार करितात. (त्यास) सारी रात्र निद्रा नाहीं. श्रमाचें सार्थक करणार श्री भगवान् समर्थ आहे. "त्वरेनें या" ह्मणोन लिहावें तरी येतच आहां. चिरंजीव दाजीनीं आपला खिजमतगार पाठविला आहे तो सांगतां कळेल. येथील चिंता न करणें. बहुत काय लिहिणें. तमाम शिपाई लोक सुखरूप आहेत. लोभ कीजे. हे आशीर्वाद.

अपत्यें गंगाधरानें नमस्कार.

पै॥ छ० ७ रजब. माघ मास.

नं० १५७।

(माघ शुद्ध षष्ठी
२० जानेवारी.)

श्री.

वडिलांचे सेवेशीं विज्ञापना तागायत छ० ५ रजब मुक्काम मिरज येथें वडिलांचे आशीर्वादें करून सुखरूप असों विशेष वडिलांकडून बहुत दिवस पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं, तर असें न व्हावें. सदैव आशीर्वाद पत्रीं सविस्तर वर्तमान लिहावयास आज्ञा केली पाहिजे. इकडील वर्तमान तर मिरजेस मोर्चे लाविले आहेत. रोज बेरोजे तोफांचा व नालांचा मार होतो. मोर्चे खंदकावर जाऊन बुरजास सुरुंगाचा प्रारंभ दो जागां झाला आहे. निकड केल्यास लौकरच येईल. मोंगलाकडील पत्रें आलीं त्यांत विघाडाचा

वावा व त्यांचे यजमान भवानराव प्रतिनिधि. हे होघे ही गोपाळरावाच्या पाठोपाठच मोंगलाकडे आश्रय मागण्यासाठीं गेले होते.

१ पुरुषोत्तमराव व भास्कर हारि किल्ला रक्षण करण्याचे कामीं फार श्रम करितात. २ हें पत्र पेशव्यानीं गोपिकाबाईस लिहिलेलें आहे. ३ दररोज. ४ गरजांचा. ५ किल्ला हातीं येईल.

भाव लिहिला होता. त्याचें कारण हेंच कीं गोपाळराव जाऊन [मोगलास] म्हणतात कीं, " तुम्हीं पुढेंच चालावें, म्हणजे सर्वांचीं राजकारणें मजपाशीं आहेत ! " मशारनिल्हे आमचें ही नांव तेथें घेतात त्यावरून ऐसा भ्रम आहे. आज पर्वे छ० १ रजबचीं आलीं त्यांत लिहिलें आहे कीं, विघाडाचा भाव नाहीं. गोपाळराव यांचा जाबसाल बोलावयासीं महमदमुरादखान येणार, नबाबाचा मुक्काम सुरापुरच्या[3] जवळ आहे. सवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं० १५८

[माघ शुद्ध दशमी
२४ जानेवारी.]

राजश्री जानोजी भोंसले सेनासाहेब सुभा
गोसावी यांसीं.

स्नेहांकित सकल गुणालंकरण अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहा गोपाळराव गोविंद. आशीर्वाद. विनंती उपरी येथील क्षेम तागायत छ० ९ रजब मुक्काम फत्तेबाद नजीक कलबुर्गे जाणोन स्वकीय कुशल लेखन करावयासीं आज्ञा केली पाहिजे. विशेष. आपले पत्र छ० २ रजबचें गंगेच्या[3] मुक्कामींचें आलें तें काल अस्तमानीं पावलें. वर्तमान कळलें. प्रथम पत्रें पाठविलीं तीं आम्हांस पावलीं नाहींत. आम्हीं, व राजश्री गमाजी बावा आपल्या यजमानांसह[4] नबाबाच्या लष्करांत आपली मार्गप्रतिक्षा करीत आहों. मिरजेस परीघ पडोन एक महिना आठ रोज झाले. आतां मोर्च्याची फार निकड श्रीमंतांच्या कारभारियांनीं[5] मांडली आहे. या संधींत लांब लांब मजली करून शीघ्रतेनें आलियास सर्व कामाचें यश आपले पदरीं

---

१ मोंगलास. २ हीं पत्रें मोंगलाकडे पेशव्यांचा वकील होता त्याजकडून आलेलीं. ३ गोदावरीच्या [गोदावरीतीरच्या.] ४ गमाजीबावाचे यजमान भवानराव प्रतिनिधि हें पुनः पुनः ल्याहावयास नकोच. ५ श्रीमंत दादासाहेबांचे कारभारी सखारामबापू वगैरे यांनीं.

श्रीकृपेकरून पडतें. एतद्विषयींचा भाव राजश्री गमाजीबाबा यांच्या पत्रावरून श्रवणारूढ होईल. जलदीस मोल आहे. स्थल त्यांचे हातीं गेलें नाहीं. तोंच सर्व कारस्थानी आहे. सेवेकानें फार लिहावें असें नाहीं. बहुत काय लिहिणें लोभवृद्धि करावी हे विनंती.

नं० १९९L

(माघ शुद्ध एकादशी
२५ जानेवारी.)

श्री.

सेवेशीं विज्ञापना. गोपाळराव गोविंद यांचें पत्र आलें तें पाहून त्याची नक्कल व उत्तर पाठविलें त्याची नक्कल [अशी] दोन्हीं आपणाकडे पाठविलीं आहेत. पहावी. सारांश पैहिलें बंड झालें तेव्हां दौलत गेली. पुढें तरी गोपाळरायानीं न करावयाची ती गोष्ट करून मोगल आम्हांवरी घेऊन येतात. त्यास भिऊन आणीक दौलत द्यावी तेव्हां मोगलाची चाकरी करणें प्राप्त होईल! हें समजून स्पष्ट उत्तर केलें. तोडून लिहिलें. येथील सरदार (व) तीर्थरूप व आम्हीं एकाचित्त आहों. एक दोन सरदार थोडेसे उदास आहेत त्यांची ही समजावणी करितात. कवर्ज्यास आणविलें. जानोजी भोसैंल्यास ही बळकट करून वकील गेले. वडिलांचे पुण्यें बरेंच

---

१ दादासाहेबांचे. २ नेहमींच्या मायन्या प्रमाणें पाहिलें असतां नागपूरकर भोंसल्यांस लिहिलेल्या पत्रांत पटवर्धनानीं आपणास 'सेवक' ह्मणविल्याचें आढळ्यवयाचें नाहीं. परंतु प्रस्तुत गोपाळरावावर जें संकट आलें होतें त्यांतून आपणास सोडविण्यासाठीं जर तो मोंगलाचा देखील खरोखरीचा सेवक झाला, तर कागदोपत्रीं त्यानें आपणास जानोजी भोंसल्याचा सेवक म्हणविलें यांत वावगें नाहीं! ३ दादासाहेबानीं आह्मांशीं भांडून मोंगलास मदतीस आणिलें तेव्हां त्यास मुलूख द्यावा लागला. ४ मोंगलास. ५ दादासाहेब व सखारामबापू रुसलेल्या सरदारांची समजूत करीत आहेत. ६ महिपतराव कवड्यास. ७ " आपण पेशव्यांचींच बाजू धरून रहावें कीं मोंगलाकडे जावें, अशी जानोजी भोंसल्याच्या मनाची आजपर्यंत चलविचल झाली होती; परंतु आतां त्याचे वकील आह्मांजवळ इमान प्रमाण देऊन गेले आहेत कीं, त्याचा धनी

होईल. या उपर मोगलास दबल्यानें परिणाम नाहीं. जें ईश्वर करील तें होईल. तूर्त बिघाड कैरितो असें दिसत नाहीं. रा॥ छ० १० रज्जब बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

पै। छ० १४ रज्जब.

नं० १६०

(माघ वद्य प्रतिपदा
३० जानेवारी)

श्रीगणराज.

राजश्री चंदोगिरमाजी गोसावी यांसी.

विनंती[2] उपरी. अलिकडे तुह्मांकडून पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं, तर वरचेवर पत्र पाठऊन वर्तमान कळवीत जावें येथें वकीलांचें लिहून आलें होतें जे, "तीन सुरुंग व्यर्थ जाहले. अतःपर नवे तयार करतील तेव्हां खरे! तूर्त तयार झालेले (सुरुंग) कामांतून गेले. धमधमे तयार होतात. त्यांत एक तयार झाला. त्याजवर गरनाळा चढवून कुलपी गोळे आंत मारितात. आंतील दम भारी आहे. एकाएकीं आयां येत नाहींत." या प्रमाणें लिहोन नबाबाचें आलें. सुरुंग लागू झाले होते. तेथें माणूस बाहेरील फारच जायां झालें म्हणोन (नबाबाच्या वकीलानें) लिहिलें होतें. त्यांनीं पत्रेंच आम्हांकडे पाठऊन दिलीं होतीं. वाचून माघारीं दिलीं. छ० ६ व सातवे

मोंगलास मिळणार नाहीं." असा पेशव्यांच्या लिहिण्याचा अभिप्राय आहे. वस्तुतः हा त्यांचा समज चुकीचा होता. पेशव्यांच्या लष्करांत जानोजीचे वकील इमानाविषयीं शपथा घेत होते व तिकडे तो याच वेळीं मोंगलास मिळावया करितां फौजेसह निघाला होता !

१ मोंगल कलहास प्रवृत्त होतोसें दिसत नाहीं. २ हें गोपाळरावाचें चंदोगिरमाजीस पत्र. सदरहू मनुष्य पटवर्धनांचा एक कारकून होता. ३ 'मोंगलाचा वकील मिरजेस पेशव्यांच्या लष्करांत आहे त्यानें येथें मोंगलास लिहून पाठविलें.' गोपाळरावाचीं पत्रें मोंगलाच्या लष्करांतून लिहिलेलीं आहेत हें वाचकानीं विसरूं नये. ४ नवाब निजामअलीनें.

रजबचीं होतीं. अलीकडील वर्तमान लिहून पाठवून देणें. गमाजीबावा गेले, त्यांस आज चार दिवस झाले. आज उद्यांत त्यांजकडील सांडणीस्वार येईल व ते ही जलदीनेंच भोंसल्यास घेऊन येतात. ते तेथून " भेटी जाहली. एक मजल घेऊन आलों. तुम्हीं अतःपर सडे होऊन विजापूरचे रोखें चालावें. " म्हणोन पत्र येतांच बुनगें कलबर्ग्यांत ठेऊन माघारे सहा रोजांत मिरजेनजीक येऊन पोहोंचतों. फार गुंता नाहीं. या प्रमाणें सिद्धांत जाहला. गमाजीबावाचा मार्ग लक्षीत बसलों आहों. त्यांनीं करारच करून गेले (कीं,) " आठवें दिवशीं माघारे त्यांस घेऊन येतों. " त्यास आजच चार दिवस झाले. सत्वरच येतील. तुम्हीं आंत खबर वरचेवर देऊन माघ पंधरवडा दम धरवणें. तों आम्हीं येऊन पोंचतों काळजी न करणें. जाणिजे. रा॥ छ० १५ रजब रविवार दोन प्रहर. मुक्काम नीरबेळ [?] प्रांत कलबर्गे. भीमातीर. आंतील वर्तमान बाहेरील सविस्तर लिहून पाठवून जलद देत जाणें. मुख्य गोष्टी सारा माघ आंतल्यांनीं दम धरावा. त्या पूर्वीच आम्हीं दोन दिवस येतों. सर्व भार श्रीवरी आहे. भगवंत कल्याण करणार ! ते[४] ही दम धरितील. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे. हे विनंती.

नं० १६१

(अजमासें माघ वद्य
फेब्रुवारीचा पहिला पंधरवडा.)

भवानराव प्रतिनिधीची गोपाळरावास चिठी—

भोंसले यांची व राजे विनायकदास यांची भेट झाली. काल पत्रें मिरजेहून आलीं त्यांत " तीन सुरुंग लाविले होते त्यां पैकीं दोन निःकारणी झाले. एक मात्र थोडासा बुरूज उडाला, त्याणें बाहेरीलच माणसें जायां झालीं." म्हणोन वर्तमान आहे. परंतु थोडासा पडला. त्याणें कांहीं होणें नाहीं !

१ गमाजीबावानीं. २ जानोजी भोंसल्यास. ३ माघाचा एक पंधरवडा राहिला आहे एवढा. ४ किल्ल्यांतील लोक.

नं० १६१

(२८ जानेवारी.)

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वादें उपरी. येथील कुशल तागायत माघ शुद्ध १४ भृगुवासर प्रातःकाळ दोन तीन घटिका रात्र. यथास्थित असे विशेष. येथील वर्तमान नरसीपंता बरोबर लिहिलें त्यास आजी आठ नव दिवस झाले. पत्र पावलें असेल, व त्याणें ही सांगितलें असेल. अलीकडील वर्तमान तरी त्याणीं जे प्रकार केले तितके व्यर्थ गेले. श्रीकृपेनें फजीत पावले. हल्लीं तुम्हीं छ० ६ रजबचें पत्र हणगोजी बरोबर पाठविकें तें कालीं गुरुवारीं प्रातःकाळीं पावलें. विस्तारें वर्तमान कळलें. ऐशास येविशीं तुम्हांवरी शब्द नाहीं. परकी दरबार. जे कालीं जसें घडेल तसें कराल! येथें तुमची चित्तवृत्ति लागली असेल, अन्न अंगास लागत नसेल, चिंतार्णवीं पडले असाल, तरी कांहीं फिकीर न करणें! आमचें सर्व संकट श्रीस आहे. त्याजवरी आमचा भार आहे. तो आपलें ब्रीद रक्षील. उणेंपण येऊं देणार नाहीं. तमाम लोक एकदिल (आहेत.) कोणे ही गोष्टीची प्रतिकूलता नाहीं. पार पाविणार श्री समर्थ आहे. तुमचा यत्न असेल तितका कराल. घडणार काल येईल ते समयीं घडेल. आम्हीं कोणास खातरेस आणीत नाहीं. (आमची) तक्कर्लें श्रीवरी आहे. तुम्हीं एकंदर फिकीर न करणें. मारतां मारतां जें घडणें तें श्री घडवील. बहुत काय लिहिणें. तुम्हीं उघड पर्याय लिहिले तितके कळले. लोभ असों दीजे हे आशीर्वाद. गकार[1] नामक गेले ते येतील, तदनंतर कर्तव्य तें करावें, असें ध्यानांत आणाल तरी ते दीर्घ-

---

१ पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास. २ पेशव्यांच्या लोकानीं. ३ ' मोंगलास बरोबर घेऊन मिरजेचा वेढा उठविण्या करितां त्वरेनें येतों; ' अशीं आजपर्यंत वारंवार पत्रें पाठविलींत, परंतु तुमचें येणें झालें नाहीं, या विषयीं. ४ भार, भरंवसा. ५ अगदीं ६ ' गमाजीबावा जानोजी भोंसल्यास आणावयास गेले आहेत ते त्यास घेऊन येतील, नंतर मिरजेकडे चाल करावी, असा तुमचा बेत असेल तर ती आशा धरूं नये. ' असा लिहिणाराचा अभिप्राय.

सूची ! त्यांची दुराशा न धरावी. होईल तितकें त्वरेनें करावें. श्रीसत्ता प्रमाण ! हे आशीर्वाद. या उपर परस्पर कोणेविशीं आशा न धरावी.

पै॥ छ० २० रजब माघमास.

नं० १६३

(३१ जानेवारी.)

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत माघ वद्य २ सोमवार यथास्थित असे. विशेष. येथील वर्तमान तरी–रविवारीं प्रतिपदा उजाडतां–रात्रौ पडक्या बुरुजास सुरुंग लागू केला[1]. अगोदर दोन दिवस आम्हांस कळतांच बुरुजांत टाळें पाडावया लागले. यामुळें [त्यानीं] सुरुंगाची त्वरा केली आणि बत्ती लाविली. आमचे ही लोक सावध होते. सुरुंग उडतांच तिकडून हल्ला–खासा श्रीमंत[2]. मागें अंबारींत, पुढें निशाण–चालोन आले. तमाम मोर्च्याचे लोक व निशाणें एक जागां रात्रौच [श्रीमंतानीं] जमा केले होते, त्यांस ' उठा !!! ' म्हणोन मागून चोपदार खिजमतगार काठ्या घालूं लागले. लोक (व) निशाणें रेवणीवरी उभे राहिले तों किल्ल्यांतील मारा जाहला. (श्रीमंतांकडील) दोनशें पावेतों माणूस जखमी, पन्नास पाऊणशें ठार झाले असतील. हल्ला माघारी मुरडोन गोटास श्रीमंत खासा गेले. सुरुंग बुरजाचा उडाला तेथें बुरजास मोठी घळ पडली. बुरुज तसाच तीन हिस्से उभा राहिला. आदितवारीं बरीच झाली. हतप्रभ

---

१ सुरुंग लागू केला अर्थात् बाहेरील लोकानीं. २ शत्रू बाहेरून ज्या बाजूनें सुरुंग खोदीत असेल त्याच सुमारें किल्लेकरी आंतून सुरुंग खोदीत जाऊन बाहेरच्या सुरुंगास मिळवीत. असें झालें म्हणजे बाहेरच्या सुरुंगास ' टाळें पडलें ' असें म्हणण्याचा त्या काळीं प्रघात होता. ' टाळें पडलें ' म्हणजे दोहीं सुरुंगांचा एकजीव होऊन आरपार हवा खेळूं लागल्यामुळें सुरुंगांतील दारूचे बुधले पेटले तरी त्यांच्या भयंकर धक्यानें बुरुज वगैरे इमारतींस इजा होण्याचा संभव नाहींसा होई. ३ श्रीमंत कोणचे? दादासाहेब कीं रावसाहेब ? बहुधा दादासाहेब.

होऊन माघारें गेले.

रात्रौ रविवारीं तमाम भल लोक एकत्र होऊन आह्मांकडे आले. आणि बोलिले जे, 'या उपरी तुम्हीं काय करणें तें करा. आपण भुजत नाहीं!' ह्मणोन बोलोन गेले. तमाम ऐकसरले. कोणाचें ह्मणून नांव घ्यावें! आजी सवा महिना झूज भांडण होत होतें. श्रीनें कोणे ही गोष्टीची कमी केली नाहीं. मुख्य—मानाजी घाटगे, नाथाजी जाधव, लिंगोजी जाधव, सुलतानजी जाधव, समस्त जाधव मंडळी वगैरे शंभर—एकसरले! आणि आजी सोमवारीं श्रीमंतांसें सांगोन पाठवून तयार करवून आणविलें! आम्हीं पदर पसरिला, दाढी बोटीं धरिलें, परंतु [या फितुरी लोकानीं] ऐकीलें नाहीं!!! राणोजी पवार, येशवंतराऊ निगडे, देखील एक मंडळी झाली. चांडाळानीं घर बुडविलें!!! श्रीमंत तयार होऊन येतांच (हे) बोलिले कीं, 'तुम्हीं पालवा, नाहीं तर आम्हीं पालवितों!' ह्मणोन पालविलें. या प्रमाणें झालें. याउपरी कोण्या थरास जाईल तें लिहितों. दुसरे पुरवणींत लिहिलें आहे. जोत्यापा देसाई, बारकडे, व गंगाजी सलगर, कदम, लुगडे सुलतानजी, चंदनसिंग, व तुळाजी सिंदे यांची मंडळी व जिवाजी भोंसले व सुलतानजी भोंसले व सिंगाडे, चिमाजी हजारी, धुळोजी गाढवे व किरकोळ[1] एवढे मात्र त्यांजकडे मिळाले नाहींत. ते शंभर, या खेरीज प्यादे[2] त्याणीं फितविले. आजी पंधरा रोज त्यांचीं खलबतें होत होतीं. त्यांणीं हें कर्म केलें. ईश्वरसत्तेस भविष्यानुसार जें घडणार तें घडलें. तुम्हांस कळावें ह्मणून लिहिलें आहे. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे आशीर्वाद. मालोजी फराटे, जगदळे, मलोजी जाधव, हे व सुभानजी मुरूमकर व कंचापा सलगर, मन्याजी म्हसके, हे त्या मलईत[3] नाहींत. आम्हांकडे होते. कळलें पाहिजे. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद. शिदोजी

---

१ मराठे शिलेदार. २ एक झाले. ३ दादासाहेब. ४ किल्ला ताब्यांत घेण्याचे तयारीनिशीं श्रीमंतांस आणविलें. ५ शरण आल्याची खूण करणें. ६ किल्ल्याच्या शिवंदी पैकीं कर्नाटकी प्यादे. ७ मसलतींत.

सलगर सर्वथैव आह्मांकडे. हे आशीर्वाद.

पै॥ छ० २६ रजब गुरुवार.

नं० १६४L

(माघ वद्य २
३१ जानेवारी.)

श्री.

तीर्थरूप मातुश्री बाई वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें माधवरायानें चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विनंती येथील क्षेम तागायत छ० १६ रजब पर्यंत वडिलांचे आशीर्वादें समस्त सुखरूप असों विशेष. इकडील वर्तमान तर छ० मजकुरीं ठाणें मिरज कौलास आलें. गोविंद हरि यांजकडील कारकून बोलावयास आला आहे. आंतील प्याद्यांनीं दम टाकिला, या मुळें बोलीस लागले आहेत. काल सकाळचे प्रहरीं सुरुंग लाऊन एक बुरूज नारोशंकर यांचे मोर्च्याकडील उडविला. आज या प्रमाणें मजकूर झाला. वडिलांस कळावें. हे विज्ञापना.

पै॥ छ० २० रजब.

नं० १६५L

(माघ वद्य चतुर्थी
२ फेब्रुवारी.)

श्री.

तीर्थरूप मातुश्री बाई वडिलांचे शेवेशीं.

अपत्यें रघुनाथानें चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल तागायत छ० १८ रजब पावेतों यथास्थित असों. विशेष. गोपाळ-

---

१ हें पेशव्याचें गोपिकाबाईस पत्र. २ हें दादासाहेबांचें गोपिकाबाईस पत्र. पटवर्धनांची या प्रमाणें दुर्दशा केल्या विषयींचें दादासाहेबांचे हातचें पत्र पाहून गोपिकाबाईच्या मनास काय वाटलें असेल बरें!

राव गोविंद निमकहरामी करून पळून गेले, त्यांचे बाप गोविंद हरि मिरजेचें ठाणें बळाऊन होते. त्यांचें पारिपत्य करणें जरूर, सबब मोर्चे लाऊन सुरुंग चालविले. तोफा जेजालांचा मार देऊन सुरुंग लाविले. जेर केले. हल्ला करून किल्ला घ्यावा, तों परिणाम बरा नाहीं हें ध्यानांत आणून अन्याय माफ करून घेऊन गोविंद हरि भेटले. (किल्ला) छ० १७ रजबीं फत्ते झाला. हें वर्तमान वडिलांस कळावें यास्तव लिहिलें आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

पै॥ छ० २५ रजब.

नं० १६६

(२ फेब्रुवारी.)

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद. उपरी येथील वर्तमान तागायत माघ कृष्ण चतुर्थी बुधवार प्रातःकाल. यथास्थित जाणून स्वकीय लिहिणें विशेष. तुम्हीं शेटी बरोबर पत्र पाठविलें तें कालीं मंगळवारीं सायंकाळीं पावलें. सोमवारचें पत्र अलाहिदा लिहिलें आहे. श्रीमंतांकडे[1] सांगोन पाठविलें कीं, " नारो शंकर व विठ्ठल शिवदेव यांस पाठवून देणें. " तेव्हां (त्यानीं) त्यांस आज्ञा केली कीं, " जाणें " त्यावरून ते उभयतां आले. चिरंजीव दाजी बाहेर जाऊन त्यांसीं भेटले. वर्तमान सांगितलें. तेव्हां ते उभयतां व चिरंजीव श्रीमंत दादासाहेबांकडे घेऊन जाऊन भेटविले.[2] (चिरंजीवास) श्रीमंत बोलिले जे, " कित्येक बोलणें तें उभयतां[3] बोलतील. त्या वरून कर्जाची गोष्ट काढिली तेव्हां त्यांणीं[4] उडविली. मग मध्यस्थ बोलिले कीं, " तुम्हीं किल्ल्यांत जाणें. गोळी वाजवणें. उदईक काय तें बोलूं. " त्या उपरी मंगळवारीं दोन प्रहरां त्यांची चिठ्ठी आली कीं, " येणें." त्या वरून चिरं-

१ दादासाहेबाकडे. २ ' नारो शंकर व विठ्ठल शिवदेव यानीं चिरंजीवास श्रीमंताकडे नेऊन भेटविलें. ' ३ विंचूरकर व नारो शंकर. ४ मध्यस्थानीं कर्जाची रक्कम देण्याचें नाकारलें. ५ लढाई सुरू आहे अशीच सुरू ठेवावी. तह झाला असें उभयपक्षीं समजूं नये.

जीव दाजी गेले. आम्हीं सारे एकत्र बसोन करार केला जे, " या उपरी कर्जाची चर्चा न करावी. आम्हीं चित्तास येईल तिकडे जाऊं- मध्यस्थांस सांगावें कीं, तुम्हीं जें कराल त्यांत आम्हीं आहों. तुम्हीं जाऊन मुख्यांशीं बोलावें. " तेव्हां त्यांचा अर्थ दिसोन आला कीं, कर्जाची चर्चा न करावी. तेव्हां जाऊन चिरंजीव उभयतांसीं बोलिले कीं, " आम्हांस कांहीं रदबदल करणें नाहीं. आम्हीं जेथें जाऊं तेथें पोंहचाऊन द्यावें. करोड रुपयांची बिसादे पुण्यांतील साउकार लोकांची आम्हांजवळ आहे, याचे जाऊन पुसोन येणें. ते जाऊन पुसोन आले. (उत्तर झालें) कीं, " आम्हीं धणी आहों. चिंता नाहीं. " या प्रमाणें जाबसाल झाला. लागलेंच निशाण सरकारचें व खंडेराऊ दरेकर व विठ्ठल शिवदेव यां कडील पन्नास लोक आणोन चांदबुरुजावरी उभे केले. मोर्चे उठोन गोटास गेले. मंगळवारीं रात्री मुहूर्तानें राहुटी बाहेर दिली. बाडबिसाद राहुटीस नेतों. उद्यांच्या दिसांत सारी बिसाद बाहेर नेऊन शुक्रवारीं निघोन जातों. मध्यस्थ " राऊसाहेबांस आणवावें, " म्हणून म्हणत होते. आम्हीं सांगितलें कीं, " त्यांस धण्यांनीं लुटून घेऊन लाऊन दिलें. ते गेले. आणवणें जरूर असतें तर मिरज कां घेते ? आम्हीं ते चर्चा करीत नाहीं. तीर्थरूप आपांचे गांव—कुरुंदवाड, कागवाड, रेणदाळ—तीन गांव द्यावे. चित्तास येईल तरी पुसावें. म्हणोन बोलिलों. " मुख्य गोष्ट, आम्हीं दर्शनास न जावें. कर्ज बुडालें. जिकडे वाट फुटेल तिकडे जावें. तूर्त मंगळवेढ्यांच्या सुमारें जावें. हरिसत्ता प्रमाण ! तुम्हीं पत्र शेटी बरोबर पाठविलें तें पावलें. लिहिलें वर्तमान विस्तारें कळलें. मुख्य गोष्ट सव्वा महिना दिवसें दिवस अधिक प्रताप लोकांमध्यें वाढत चालला होता. आदितवारींच्या हल्लेस मारून

१ मध्यस्थ विंचूरकर व नारो शंकर यांचा. २ जिनगी. ३ त्या, जिनगी विषयीं. ४ चांदबुरूज हा किल्ल्यांतील सर्व स्थळां पेक्षां उंचीवर आहे. चांदरातीच्या रात्रीस येथून चंद्रदर्शन झाल्या बरोबर दर महिन्यास तोफेच्या आवाजाचा इशारा होत असे, त्या प्रमाणें अद्यापि ही होत असतो. ५ गोपाळराव. गोपाळराव मोंगलाकडे गेला आहे त्यास परत आणवावें असें विठ्ठल शिवदेव व नारो शंकर म्हणूं लागले. ६ वडील बंधु त्रिंबकपंत आपा यांचे. ७ दर्शनास पेशव्यांच्या.

काढिलें. हल्ला माघारली. कृष्णमुखें सर्वांचीं होऊन गेलीं होतीं. परतु या लोकांनीं उतावळी केली. नाहीं तर ते आपण होऊन मध्यस्त पाठविणार होते. तें सर्व राहिलें. आम्हीं निघोन अकलकोटच्या सुमारें येत आहों. पुढें स्थळांची पैरवी करवावी ही चिंता आहे. श्रीमंत यांणीं अगोदर कर्नाटकांत फौज रवाना करावयाची योजिला होती. रामचंद्र गणेश सरदार, विसाजी कृष्ण व रास्ते वगैरे पंधरा सोळा हजार फौज नेमिली होती. तों हा प्रकार जाहला. याउपरी सारेच कर्नाटकांत खासा स्वारी (सुद्धां) जाणार. तिकडे गेल्यानंतर सरंजामींत काय काजिये करतील न कळे. तुम्हांस कळावें म्हणोन लिहिलें आहे. त्या प्रांतीं मुलें माणसें आहेत तेथें उपद्रव करूं लागतील याची तरतूद कोणती करावी ? आम्हीं येथून सत्वरच अकलकोटचे सुमारें येतों. तुम्हीं स्थलाची तरतूद करणें. अकलकोट मंगळवेढेस टिकावें तर यांचा विश्वास नाहीं. यास्तव मध्यस्थांचें सामान घेऊन अकलकोटचे सुमारें येतों. जवळ नलदुर्ग ही आहे. प्रसंग बनल्यास तेथें जाऊं, नाहीं तर तुमचें उत्तर येई पावेतों. युक्तीचें ठिकाण पाहून अकलकोटचे आसपास ठरतों. तोंपावेतों जलद पत्र पाठवावें. त्या सुमारें कां येतों म्हणाल तर, तुम्हीं जवळ, दुसरीकडे जावयाचा धीर दिसेना, यास्तव त्या सुमारें येतों. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

पौ॥ छ० २६ रजब गुरुवार.

नं० १६७

[३ फेब्रुवारी.]

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी. आजी माघ वद्य ६ गुरुवारीं आम्हीं किल्ल्यांतून निघोन

१ किल्ल्यांतील जाधव वगैरे शिलेदार लोकानीं कौल मागण्याची. २ आम्हांस रहावयास स्थळ पाहिजे त्याची. ३ मिरज पेशव्यांच्या हवालीं होण्यापूर्वी. ४ आमचा [पटवर्धनांचा] कर्नाटकांत जहागिरीचा मुलूख आहे त्यांत. ५ मंगळवेढें व अकलकोट येथें रहावें तर पेशव्यांचा विश्वास नाहीं. तेथें येऊन तीं ही स्थळें घेतील.

श.१६८४ गोविंद हरि मंगळवेढ्यांकडे जातो इ.स.१७६३

वेढ्या अलीकडे विजापुरवेशीच्या मार्गे बाहेर निघोन आठ[1]ळासुध्दां राहिलों. श्रीमंतांचें लष्कर आजी कूच होऊन पुढें कृष्णातीरीं आठ कोशीं रहावया गेले. कोणा मुक्कामास गेलें न कळे. श्रीमंत राव प्रधान येथेंच होते. विठ्ठल शिवदेव यांच्या मतें भेटी घेऊन जावें, त्यावरोन निघालों ते तसेच गेलों. नमस्कार करून डेरियास आलों. विठ्ठल शिवदेव आजी आह्मांसवें रहावयास आले. आमची रवानगी करून ते ही उदईक लष्करास जातील. आम्हीं सर्व मंडळी सुद्धां वस्तभावेंनिशीं बाहेर आलों. पुढें पार करणार श्री समर्थ आहे. तुम्हीं या उपरी आम्हांविशीं चिंता न करणें. आपाजी कानडे जासूद तुम्हीं पत्र देऊन रवाना केला तो आम्हांजवळी आजीच येऊन पोंहचला. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद. सर्व चिरंजीव दाजीनें युद्धाची व पुढील निर्गमाची व्यवस्था केली. हे आशीर्वाद.

पै॥ छ० २६ रज्जब. माघ मास.

नं० १६८

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी. श्रीमंत कर्नाटक प्रांतीं चालिले. त्या प्रांतीं मुलें माणसें हत्ती व स्थलें (आहेत,) याजमुळें मोठी फिकीर ! तुम्हांकडील प्रकार केवळ आबिंधें[2] श्रीमंतांसी बिघडून गांठ घालितो हा ही प्रकार दिसत नाहीं. हैदरनाईक कुमक करितो हा ही भरंवसा नाहीं. तैसेंच काली बंकापुराहून चिरंजीव भाऊंचा खिजमतगार भवानजी आला त्याचे सांगणेंत तेथें दमें[3] धरावयाचा प्रकार नाहीं. याजमुळें कोठें ही धीर दिसेना, तेव्हां आम्हीं एक विचार योजिला. काली विठ्ठल शिवदेव व सखारामपंत आम्हांसीं बोलूं

---

१ खटलें. २ किल्ल्यांतून बाहेर निघालों ते तसेच. ३ निजामअली. ४ परशुरामभाऊचा. ५ श्रीमंतांची फौज बंकापुरास गेली तर तेथील लोक दम धरणार नाहींत. किल्ला श्रीमंतांच्या हवालीं करितील.

लागले कीं, " तुमचे कर्जाची वाट काढितों. रायांस ही आणवावयाची तरतूद बोलतों. त्या प्रमाणें ऐकोन त्यांस आणावें. " तेव्हां आह्मीं उत्तर सांगितलें कीं, " तुम्हीं बोलतां या प्रमाणें रायांस लिहून त्यांनीं मान्य केल्यास लक्षवेळ ऐकून करारांत आणावयास येईल. " तेव्हां ते बोलिले कीं, " त्यानीं कबूल केलिया तोडमोड बोलावयास कोणी असवा. " तेव्हां आम्हीं सांगितलें कीं, " दाजीस देतों. परंतु बनलें तर उत्तम. न बने तर दाजीस उभयतां मध्यस्तानीं आम्हांजवळ पोंहचावून द्यावा. " तेव्हां त्यानीं कबूल केलें. त्यास आह्मीं हें कबूल करून दाजी त्यांज बराबर कां दिला ह्मणाल, तर तुमचा भरंवसा नाहीं. हैदरनाइकाचा भरंवसा नाहीं. त्याचा ही दम दिसेना. तेव्हां हा प्रकार बोलून उगाच लबाड लँग लाऊन चिरंजीवास पाठवितों ह्मणून कबूल केलें. बराबर असावें. तुमची कुमक झाली तर बरें. नाहीं तर याच मध्यस्थांचे विद्यमानें बोलून सर्वांचा बचाव करून व दरम्यान हे घेऊन सर्वांस काढावें. यास्तव पाठवावें हा निश्चय [केला.] आजी विठ्ठल शिवदेव व चिरंजीव श्रीमंतांच्या लष्करास जाणार. तेथें या प्रमाणें बोलून करारांत आणून दरम्यान उभयतांस घेऊन चिरंजीव येथें येतील. आह्मीं येथून परवां कूच करूं. चिरंजीव तिकडे जातील. तुम्हांस कळेल ते रीतीनें सावधता करणें. काल एकप्रकार आला आहे. आमची लज्जा श्रीनें रक्षिली. नक्ष झुजाचा चार खंडांत झाला. धण्यास यश आलें. श्रीनें चारी गोष्टी घडविल्या. पुढें परिणाम लाविणार श्री समर्थ आहे. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे आशीर्वाद.

पै॥ छ० २६ रजब गुरुवार.

---

१ गोपाळरावास. २ तुमचें बोलणें गोपाळरावानें मान्य केल्यास लक्ष प्रकारें आम्हीं ही मान्य करून. ३ त्याचा कोणाचा ? मोंगलाचा कीं हैदराचा ? ४ राजकारण. ५ दाजीनें श्रीमंतां बरोबर असावें. ६ कुमक मोंगलाच्या हातून झाली तर. ७ विठ्ठल शिवदेव व सखारामबापू. सखारामबापूच्या बोलण्यावर गोविंद हरीचा यत्किंचित् तरी विश्वास कसा वसला न कळे ! ८ अडचणींतून आपणा सर्वांस मोकळें करावें. ९ दाजीस श्रीमंतांच्या लष्करांत पाठवावें. १० विलक्षण. ११ कीर्ति. १२ मिरजेचा किल्ला घे.

श.१६८४ गोविंद हरि मंगळवेढ्यांकडे जातो इ.स.१७६३

नं० १६९

[१० फेब्रुवारी.]

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद[1] उपरी. येथील कुशल तागायत माघ वद्य त्रयोदशी गुरुवार चतुर्थ प्रहर मु० कवठेंमहांकाळ. यथास्थित असे. विशेष. आम्हीं मिरजेहून निघालियाचें वर्तमान विस्तारें शेटी रणदिवा याज बरोबर भृगुवारीं पाठविलें आहे, त्यावरून कळलें असेल. अलीकडील वर्तमान तरी सर्व बाडबिसाद[2] आटाळी[3] वस्तभाव फार करून कुरुंदवाडास रवाना केली. कुरुंदवाड, कागवाड दोनी गांवीं ठाणीं बसलीं, या मुळें फार उपयोगी झालें. श्रीमंत मिरजेहून आज आठ दिसां गुरुवारीं कूच होऊन येडूरमांजरीवरी गेले. परवां मंगळवारीं मुहूर्त करून आबा पुरंदरे व विठ्ठल शिवदेव वगैरे पंचवीस तीस हजार फौज दक्षिणप्रांतें रवाना झाली. खासा उभयतां देशांस[4] जाणार. नारो शंकर पांच हजार व हुजरात पांच हजार हिंदुस्थानांत रवाना होणार. ते पुण्यापावेतों श्रीमंतांसमागमें जाऊन पुढें जाणार. पंधरा हजार फौज श्रीमंता संनिध राहिली. पंचवीस हजार रवाना झाली. परंतु पंचवीस हजार फौज दक्षिण प्रांतें बाबूजी नाइकाची फौज[5] (सुद्धां) रवाना झाली. खासा मात्र माघारे श्रीमंतासमागमें जातात. बंकापुराकडे जाँणार. तिकडील काळजी लागली. कोण्या प्रकारें त्याचा प्रसंग घडेल न कळे! चिरंजीव दाजी आजी लष्करास[8] रवाना केले. त्याणीं विठ्ठल शिवदेव यांज बरोबर जावें असें केलें आहे. परंतु पहिल्यानें आम्हांसीं चांगलेंच बोलत होते. परंतु क्षणभंगुर बुद्धि, या मुळें गोष्टी[9] घडोन न आली. हजार का-

---

ण्यांत पेशव्यांस यश आलें या बद्दल ही गोविंद हरी समाधान झाल्यासारखें दाखवितो!

१ हें पत्र गोविंद हरीनें गोपाळरावास लिहिलेलें आहे. २ जिनगी. ३ खटलें. ४ रावसाहेब पेशवे व दादासाहेब. ५ पुण्यास. ६ बाबूजी नाईक. ७ पेशव्यांची फौज बंकापुराकडे जाणार. ८ लष्करास श्रीमंतांच्या. ९ किल्ला हवालीं केल्यावर प्रथम दादासाहेब आह्मांशीं नीट बोलत होते. १०तुह्मांस मोंगलांच्या लष्करांतून समजूत करून आणण्याची.

रभारी ! जितका लष्करांत दरवारी गृहस्थ तितका आमच्या वाईटावरी ! कालाची गति विपरीत ! जे आमची माया धरीत होते ते चोर ! त्यांसी कोणी बोलतां नये असा प्रकार ! आम्हांस पावावयास[1] राजश्री विठ्ठलराऊ यांचे पुत्र बापू[2] व नारो शंकर यांजकडील पांचशें स्वार इतके आहेत. पंढरपुरपावेतों[3] आम्हांस पौंऊन[4] त्याणीं लष्करास जावें, [असें ठरलें आहे] विठ्ठलराऊ यांचे पुत्र नरसीपुरास[5] जाऊन तेथून विंचुरास जाणार. आह्मीं श्रीक्षेत्रींहून[6] पुढें कोण्या ठिकाणास जावें हे चिंता लागली आहे. राजश्री जानोजी निंबाळकर यांस पत्र लिहिलें आहे. त्याणीं आगाऊ घेतला जागा जुगा दिली तरी एखादे गांवीं राहूं. नाहीं तर बालेघांटाकडे जावें कीं कसें करावें [या विषयीं] इतक्यांत तुमचें पत्र येईल. श्रीपंढरीनाथें जेथें नेमिलें असेल तेथें राहणें होईल ! एवढें महोर्णव[7] ! पन्नास साठ हजार फौज. दीड महिना लढाई दिवसें दिवस अधिकच या प्रमाणें जाहली. सारी फौज श्रीमंतांची आश्चर्य करून राहिली. त्यांच्या मतें मिरज इतकी झुंजेल असें नव्हतें. इतकी मारगरी होत होती. परंतु किल्ल्यांत फार खैर झाली. श्रीनें बहुत बचाव करून अब्रू नक्ष राखोन बाहेर निघालों. पुढें परिणाम लावि[8]णार श्री समर्थ आहे. आम्हांविशीं चिंता न करणें. हे आशीर्वाद. खंडोजी फराटे ही आह्मां बरोबर आहे. हे आशीर्वाद.

पै॥ छ० १ माहे सावान फाल्गुन मास.

नं० १७०

(१० फेब्रुवारी.)

श्रीगणराज.

अपत्ये नीलकंठानें व पांडूनें व बाळानें साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील

---

१ पोंचविण्यास. २ शिवाजी विठ्ठल विंचूरकर. ३ पोंचवून. ४ निरानरसिंगपुर क्षेत्र भीमा व नीरा यांच्या संगमावर आहे. तेथें विंचूरकरांचें कुलदैवत नृसिंह याचें देवालय प्रसिद्ध आहे. ५ घोर अनर्थ. ६ हें पत्र गोपाळरावास लिहिलेलें आहे. पत्र लिहिणाऱ्या तिघां पैकीं नीलकंठराव लिंबक हे गोपाळरावाचे चुलत बंधु व बाकीचे

वर्तमान तागायत माघ वद्य त्रयोदशी गुरुवार पावेतों कवठेमहांकाळ (येथें) वडिलांचे आशीर्वादें यथास्थित असे. विशेष. इकडील सविस्तर वडिलांनीं लिहिलें आहे त्या वरून विदित होईल. नीलकंठ महादेव मजल दरमजल ते प्रांतीं चालिले. त्यास त्यांनीं चांगला दम धरला तर यांचे हातून ही कांहीं गळां पडवत नाहीं. परंतु हें[४] स्थल गेलें याजमुळें तेथील लोक अवसान धरीत नाहींसे दिसतें. त्यास विना तुमचीं कुमक जाहलियाखेरीज परिणाम दिसत नाहीं. परंतु तुम्हांकडून कुमक व्हावयाचा भरंवसा दिसत नाहीं. तेव्हां परिणाम कठीण दिसतो. याचा विचार करणें तो त्वरेनें करावा. चिरंजीव राजश्री दाजी गेले आहेत तो मजकूर वडिलांनीं लिहिला आहे त्यावरून कळेल. मुख्य गोष्ट या उपर त्वरा झालेनेंच तिकडील ठाणीं आहेत त्यांचें क्षेम. नाहीं तर कळतच आहे. आम्हीं मजल दरमजल क्षेत्रावरून भिवरापार होतों. तंवपावेतों वडिलीं स्थलाचा[६] विचार त्याहावा, ह्मणजे तेथें वडिलांस ठेऊं; आणि तीर्थरूप राजश्री भास्करपंत आपा व मी वडिलांकडे जमावसुद्धां येऊं. तूर्त पांच सहाशें आहेत. क्षेत्रावर हजार बाराशें होतील. या उपर तिकडील[७] काळजी लागली आहे. वडिलीं तरतूद करावी. अविंध[८] कृष्णेस बागलकोटचे सुमारें आला, आणि बीस हजार फौज त्यांजवर रवाना झाली तर सहजांतच ते[९] बुडतात. किंवा श्रीमंत आहेत यां[१०] सुमारें फौज आली तरी मग कार्यच झालें. हे[११] बिल्हे

दोघे पांडुरंगराव (हल्लींचे श्री० तात्यासाहेब सांगलीकर यांचे आजे) व गंगाधरराव हे गोपाळरावाचे धाकटे बंधु होत. हल्लींचे श्री० बाळासाहेब मिरजकर हे सदरहू गंगाधररावाच्या नातवाचे पणतू होत.

१ गोविंद हरीनें (नं० १६९ चें पत्र.) २ आबा पुरंदरे. ३ कर्नाटकांत आमच्या जहागिरींत वंकापुर वगैरे ठाणीं आहेत त्यांतील लोकांनीं. ४ मिरज. ५ पुरुषोत्तमराव दाजी श्रीमंतांचे लष्करांत गेले आहेत. ६ श्रीक्षेत्र पंढरपुरावरून भीमापार होतों. ७ या उपर कोठें रहावें त्या स्थळाचा. ८ गोविंद हरीस. ९ तुह्मांकडे. १० सध्या पांच सहाशें स्वार जमले आहेत. ११ बंकापुराकडील. १२ निजामअल्ली. १३ आबा पुरंदरे. १४ पेशव्यांचा मोड होऊन धुळधाण होईल. १५ मिरजेच्या आस

लागतात. तिकडे त्यांचे हातून कांहीं होत नाहीं. ऐसें आहे. खामखा सूड घ्यावा. सखाराम शेर जाहला. याचें पारिपत्य व्हावें ह्मणजे सर्व श्रम परिहार होतील. त्या खेरीज जेवण गोड लागत नाहीं. वडिलांस कसें गोड लागत असेल न कळे ! त्यांत महद् आश्चर्यास गेलां आणि उसनें न उगवे ह्मणजे प्रारब्धास आमच्या जोडा नाहीं ! सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना. अप्पोजी माने यांचीं माणसें पाठविलीं आहेत. हे विज्ञापना.

देवजीस पाठविला आहे. रेणकोजी व देवजी दोघांस रुपये दोन दिले.

पै॥ छ० १ साबान फाल्गुन मास.

नं० १७१

[अजमासें फाल्गुन शु॥ फेब्रुवारीचा दु०पंधरवडा]

दौलतराव घोरपडे गजेंद्रगडकर यांचें गोपाळरावास पत्र.

" राजश्री जानोजी भोसले यांस बोलावूं गेले आहेत. आल्या नंतर माघारे फिरणार असें लिहिलें, उत्तम. मिरजेकडील वर्तमान आपणाकडे आलें असेल. राजश्री नारो शंकर व विठ्ठल शिवदेव यांचे मध्यस्तीनें ठाणें दिलें. या उपरी मुख्यें कर्नाटकाच्या मसलतीस येणार अशी मसलत झाली आहे ह्मणोन राजश्री बाबूराव यांचीं पत्रें आलीं. स्वल्प दिवसांत येतात. बंकापूर आदीकरून आपला तालुका घेऊन हैदरनाईकावर जावें अशी योजना आहे. "

पै॥ छ० १ साबान फाल्गुन मास.

पास श्रीमंतांचें लष्कर आहे त्या सुमारें मोंगलाची फौज आली तर.

१ आबा पुरंदरे आमचीं ठाणीं घ्यावयास कर्नाटकांत गेला आहे तिकडे त्याचे हातून कांहीं उपद्रव होणार नाहीं. २ हटकून, खचित. ३ श्रीमंतांच्या लष्करावर मोंगल चाल करून येणार. ४ पेशवे.

श.१६८४ गोविंद हरि मंगळवेढ्यांकडे जातो इ.स.१७६३

नं० १७२

(माघ वद्य त्रयोदशी
१० फेब्रुवारी.)

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी. चिरंजीव विनाजी करंजगे[1][2] यांत होता तो आणिला. चिरंजीव भास्करपंत आपा व विनाजी उभयतां त्यांचे कांहीं शिलेदार व पागा मिळोन वीस पंचवीस आहेत. मानसिंग, रामसिंग, खंडोजी थोरात श्रीमंतांनीं खोळंबून ठेविले होते ते दमाजी गौयकवाड[3] याच्या गोटीं होते ते दोनशें समागमें आहेत. मुळजी पाटील वगैरे पन्नास साठ आहेत. किरकोळ लोक तमाम कोणी दहा, कोणी पांच, कोणी जातीनिशीं, ह्मणतां पांच सहाशें स्वार थोरात देखील आह्मां जवळी आजी जमा आहेत. हजार स्वारांची भरती होईल. रोजमरा देतों. पागेचे बारगीर घोडे सुद्धां चिरंजीव भाऊकडील तीन चार व तुम्हांकडील तीन चार आले आहेत. आणखी ही आसपास असतील ते येतील. आदितवारीं सुरुंग उडाला ते दिवशीं जावजी कदम यास गोळा लागोन पाय उडाला होता. त्यास पालखी देऊन गंगाराम कदम देखील रवाना केला होता. तो मिरजेहून एक मजल जाऊन मेला. पालखी माघारी आली. आपाजी अवधूतराऊ कोळी जिभी वरील हल्लेचे दिवशीं जखमी होता तो एका महिन्यानें माघ शुद्ध एकादशीस मेला. कळावें. मिरज आम्हीं सोडिली, कांहीं नामर्दी केली नाहीं! श्रीमंतांनीं आदितवारचा सुरुंग व्यर्थ झाला, हल्ला फिरली, त्या दिवशीं फारच अतिशय केला. उपवास केला. असा प्रकार झाला होता. परंतु श्रीच्या इच्छेस आलें त्या प्रमाणें झालें! लाख रुपयांस मिरजेच्या वेढ्यामुळें

---

१ भास्कर हरीचा मुलगा विनायकराव (गोविंद हरीचा पुतण्या.) २ करजगें किंवा करजगी हें ठाणें धारवाड जिल्ह्यांत आहे. ३ मिरजेस वेढा घालण्यांत पेशव्यांची फौज गुंतली होती तींत दमाजी गायकवाडाची ही फौज होती हें यावरून सिद्ध होतें. परंतु खुद्द दमाजी हजर होता कीं नाहीं हें स्पष्ट होत नाहीं. ४ स्वतः ५ अकांडतांडव.

कर्जदार झालों. खर्चवेंच भारी पडला. कर्जदारांनीं निघते समयीं कजिये केले. ईश्वरें आम्हांस लज्जा रक्षून त्यांजवरी इभ्रत बसोन अब्रूनें काढिलें. त्यांचें स्थल त्यांच्या हातास गेलें. सर्व गोष्टी उत्तमच झाल्या. कांहीं असो. चारी खंडांत लौकिक मिरजेच्या झुजाचा बरा झाला. पुढें श्रीभगवान् समर्थ आहे. ऋणानुबंधानुसार घडोन आलें. ओईयास उंट देऊं केले ते दिले नाहींत. छकडे देऊं केले त्या पैकीं दोन आले. आह्मीं उंटें विकत घेतलीं. भूकणजी, हरीपंत[3] याणीं चार विकत घेऊन पाठविलीं. कुरुंदवाड, कागवाड येथील बैल काढिले. कांहीं हजीरीहजीर असें करून निघालों. सा मुक्काम तेथें झाले. काली बुधवारीं मालगांवचा मुक्काम केला. आजी येथें[4] आलों. उद्यां पांच सात कोस जाऊं. आदितवारीं सांगोलें याच्या सुमारें. सोमवारीं श्रीक्षेत्रास[5] जाऊं. तुम्हांस कळावें. या उपरी तुम्हीं आमची काळजी न करणें. मोंगली दरबार, त्यांचे मर्जी माफक वर्तणूक करणें. श्रीमंतांच्या फौजा बंकापुराकडे गेल्या, त्यामुळें चिंतार्णवीं पडलों आहों. रक्षारक्षक श्रीभगवान् आहे. हत्ती, घोडीं, बाजार बुनगें, फौज, मुलें माणसें, तिकडे आहेत. तिकडील तरतूद तुम्हीं केलीच असेल. बहुत काय लिहिणें. लोभ असों दीजे. हे आशीर्वाद. आपाजी कांडेकर व केदारजी जासूद यांजबरोबर पत्रें पाठविलीं तीं पावलीं. वर्तमान कळलें.

पै॥ छ० १ साबान फाल्गुन मास.

नं० १७३ (अजमासें फाल्गुन शुद्ध
फेब्रुवारीचा दुसरा पंधरवडा,)

श्रीगणराज.

आशीर्वाद[6] उपरी. चिरंजीव राजश्री दाजीकडे आजी पत्र रवाना केलें.

---

१ पेशव्यांवर. २ पटवर्धनांचें खटलें नेण्यास पेशव्यानीं कांहीं उंटें व छकडे देऊं केले होते. ३ हरीपंत पोंभुर्लेकर हा इचलकर्जीकरांचा कारभारी. भूकणजी हा कोण हें ठाऊक नाहीं. ४ जितक्यास तितकी तयारी. ५ कवठेमहांकाळ येथें. ६ पंढरपुरास. ७ नं० १७३ व नं० १७४ हीं पत्रें गोविंद हरीनें गोपाळरावास लिहिलेलीं आहेत. पण ध्यांत आश्चर्य हें कीं नं० १७३ च्या पत्रावर नेहमीं प्रमाणें त्यानें 'श्रीग-

श.१६८४ गोविंद हरि मंगळवेढ्यांकडे जातो इ.स.१७६३

नारो शंकर गेले तेव्हां चिरंजीव लष्करांत राहणार नाहीं. निघाला असेल. तुम्हांकडील[1] गडबडच आढळली तर तो क्षणभर तेथें गुंतणार नाहीं. आह्मीं वरचेवर त्यास सावधतेचीं पत्रें पाठविलींच आहेत. तो ही सावध आहे. मायाजी त्रसके आम्हां बरोबर आहेत. कोडग, झांबरे आजी उदिया येतील. बहिरजी सेडगे ही एक दो दिवसांत येतील. हजार बाराशें स्वार

णपतिर्जयति ' हीं अक्षरें न लिहितां ' श्रीगणराज ' हीं अक्षरें लिहिलीं आहेत ! आज पर्यंत आम्हीं गोविंद हरीचीं जीं पत्रें छापिलीं आहेत व पुढें ही छापूं त्यां विषयीं येथें एकदांच सांगून टाकितों कीं, तीं सारीं व दुसरीं न छापण्या सारखीं त्यांचीं शेंकडों पत्रें आह्मांजवळ आहेत तीं सर्व त्यानें स्वतः लिहिलीं आहेत. त्याचें अक्षर सामान्य प्रतीचें च आहे. तें वाचावयास एखाद्या हुशार मनुष्यास ही प्रथम फार जड जातें. कित्येक अक्षरें हल्लींच्या काळीं फारच तऱ्हेवाईक वाटतात व त्यावरून पेशवाईच्या पूर्वीची जुनाट मराठी मोडी लिपी कशी असावी याचें थोडेसें अनुमान होतें. त्याशीं समकालीन अशा इतर लोकांचीं ही पत्रें आह्मीं छापिलींच आहेत. त्या त्या पत्रांतील भाषेशीं गोविंद हरीच्या पत्रांतील भाषेची तुलना करून पाहिली असतां दोहोंमधील फरक चाणक्ष वाचकांच्या लक्षांत येईल. याचा वडील बंधु त्रिंबक हरि याची लिपी फारच विचित्र असून भाषा ही जुनाट असल्यामुळें एक एक शब्द मोठ्या प्रयासानें लावीत पत्र वाचावें लागतें. गोविंद हरि व त्रिंबक हरि यांच्याच वयाचे ह्मातारे सरदार विठ्ठल शिवदेव विंचूरकर व नारो शंकर यांचीं ही अक्षरें वळणदार व सुवाच्य नाहींत व भाषा याच तोडीची जुनी आहे. पेशवाईतील प्रसिद्ध पुरुषांचीं जीं अक्षरें आह्मीं पाहिलीं आहेत त्यांत नानासाहेब पेशवे व हरिपंत फडके यांचीं अक्षरें अत्युत्तम, कित्ता घेण्या जोगीं आहेत. रघुनाथराव दादासाहेब व माधवराव पेशवे यांचीं अगदीं सामान्य आहेत. नानाफडणीस यांचें अक्षर उत्तम नाहीं. [नानाफडणीस व हरिपंत फडके यांचे अक्षरांचे फोटो आह्मीं आपल्या ' नानाफडनविसाच्या चरित्रां ' त छापविले आहेत.] सवाई माधवराव यांचें वारीक अक्षर आमच्या पहाण्यांत आलेलें नाहीं. ते दहा अकरा वर्षांच्या वयाचे असतांना त्यानीं लिहिलेली पुस्ती श्री० रा० बापूसाहेब कुरुंदवाडकर यांच्या संग्रहीं आहे ती चांगली आहे. दुसरे बाजीराव यांचें ही अक्षर चांगलें आहे. पटवर्धनांत गोपाळराव व रघुनाथराव यांचीं अक्षरें चांगलीं आहेत. परशुरामभाऊचें अक्षर मध्यम आहे. त्रिंबकराव मामा पेठे यांचें अक्षर चांगलें नाहीं. पेशवाईतील प्रसिद्ध पुरुषांत सर्वांत अगदीं टाकाऊ गचाळ अक्षर सखारामबापूचें आहे.

१ त्या अर्थी. २ पेशव्यांशीं युद्ध करण्याच्या तयारीची मोंगलाकडे गडगड दिसून आली तर.

श.१६८४ गोविंद हरि मंगळवेढ्यांकडे जातो इ.स.१७६३

एक दो दिवशीं जमा होतील. हे आशीर्वाद.

पै॥ छ० ३ साबान फाल्गुन मास.

नं० १७४

(१३ फेब्रुवारी.)

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत फाल्गुन शु० प्रतिपदा रविवासर अस्तमान दोन तास रात्र. यथास्थित; असे. विशेष. आह्मीं कवठेंच्या मुक्कामींहून पत्र पाठविलें आहे त्यावरून कळेल. शुक्रवारीं हतीद. बहिरजी सेडगे याचे येथें आलों. शनिवारीं सांगोलें याच्या अलीकडे मांजरी नजीक मुक्काम केला. आजी रविवारीं श्रीक्षेत्रास[1] आलों. तुम्हांकडून सोमवारचीं पत्रें घेऊन शिदू जासूद आला. त्या वरून सविस्तर कळलें. आह्मीं पत्रें रवाना केलीं तीं पावलींच असतील. तुम्हीं मंगळवेढ्यांस गुरुवारचें पत्र पाठविलें तेंच त्याणीं आतांच पहावया पाठविलें, त्या वरून कळलें. चौ दिवसांचें पत्र होतें. तुम्हीं इंडी[3]अलीकडे आलां असाल, श्रीमंत येडूर मांजरीवरी होते. नारो शंकर कूच करून हिंदुस्थानांत जावें ह्मणोन मजल दर मजल सातारियाकडे गेले. (श्रीमंत) कर्नाटकची फौज रवाना करीत होते. तुमची आवई त्यांस गेली तरी कर्नाटकची मसलत राहील. पुढें ही भारीच मनसबा पडेल. आह्मीं येथें आलों. येथें रहावें तरी अनुचित. राजश्री जानोजी निंबाळकर यांजकडे पत्र पाठविलें त्याचें उत्तर न आलें. परंतु नारो शंकर यांजकडील स्वारं व विठ्ठल शिवदेव यांचे पुत्र उदईक जाणार, यास्तव आह्मीं उदईक सोमवारीं येथून पुढें पांच चार कोस जातों.

---

१ पंढरपुरास. २ मंगळवेढ्यांत लोक होते त्यानीं. ३ इंडी परगणा विजापुर जिल्ह्यांत असून मोंगलाईचे सरहद्दीवर आहे. जानोजी भोंसले फौजेसह येऊन मिळाल्याबरोबर निजामअल्ली पेशव्यांशीं लढाई करण्याचा आपला इरादा जाहीर करून सुरापुराहून निघून पेशव्यांस गांठण्याच्या उद्देशानें सिरजेकडे येऊं लागला. तो इंडीपर्यंत आल्याचें गोविंद हरि या पत्रांत लिहीत आहे.

श.१६८४ गोविंद हरि मंगळवेढ्यांकडे जातो इ.स.१७६३

तेथून मोहळेस जाऊं. इतक्यांत तुम्हांकडील पत्रें येतात. स्थलाची नेमणूक होऊन येईल, अगर नव्हे[1] तरी हरएक गांवीं पुढें जाऊन राहूं. ऋणानुबंध जेथें असेल तेथें जाऊं! मिरज आम्हीं × × पणें दिली नाहीं. एवढे फौजेस दीड महिना खडे खावया लाविलें होतें! पुढें जें ईश्वरसत्तेनें होणें तें होऊन आलें. आबालवृद्ध 'बरेंच केलें' म्हणतात. त्या स्थलाचा गुणच तसा! त्या प्रमाणें घडलें. बरें. पुढें मागती घेऊन[2] दिल्हें तर तो ही मोठा नक्षत्रच[3] आहे. आमचा आग्रह नाहीं. भविष्यानुसार होणें तें होईल. आह्मीं चार दिवस मोहळेस टिकतों. बराबर पांच सातशें स्वर जमा आहेत. वरचेवर येतात. चौ दिसांत हजाराची भरती होईल. पुढें तुमच्या सुमारानें चिरंजीव भास्करपंत व नीलकंठराऊ येतील. आम्हांस त्याहाल त्या प्रमाणें वर्तणूक करूं. चिरंजीव दाजी (कडील व) बंकापुराकडील मनसबा कसा पडेल न कळे! वरचेवर पत्र पाठवीत जाणें. लोभ असों दीजे. हे आशीर्वाद.

पै॥ छ० ३ साबान फाल्गुन मास.

नं० १७५L

[फाल्गुन शुद्ध चतुर्थी
१७ फेब्रुवारी.]

श्री.

सेवेशीं सखाराम भगवंत कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान छ० ३ साबान मु० मिरज. यथास्थित असे. विशेष. इकडील वर्तमान श्रीमंतें[4] वरचेवर लिहितात. विदित होत असेल. सांप्रतचें ही वर्तमान—भोंसल्याचें [आह्मीं] कांहीं वाईट न करतां गोपाळराव व गमाजीबावा यांणीं उत्पात करून नेले व ते[5] ही गेले! असो. चिंता काय आहे!

---

१ न होईल तर. २ आमच्या हातून मिरज गेली आहे ती मोंगलानें पेशव्यां पासून घेऊन पुनः आम्हांस दिली तर. ३ लौकीक. ४ रावसाहेब पेशवे. ५ जानोजी भोंसले.

आपलें पुण्य आहे तरी सर्व उत्तमच होईल. सारांश बाकी, मोंगलानें विघडलें तेव्हां मुद्दे नाना प्रकारचे घालितो. " भिवरेपासून मुलूख द्यावा, किल्ले द्यावे, भोंसल्यास मुलूख द्यावा, कारभार करणें तो आमच्या विद्यमानें करावा " असें ह्मणतो ! तेव्हां सर्वस्व घेतो असें यांत आहे. यास्तव सर्वांचे विचारें हेंच कीं आपली गनिमीची रीत आहे ते करावी. जों पावेतों

---

१ मोंगलाच्या मनांत कलह करावयाचा आला त्या अर्थी तो आतां नाना प्रकारच्या भलभलत्या मागण्या करीत आहे. २ धांवपळीची लढाई करण्याची रीति सखारामबापू ' आपली गनिमीची रीत ' ह्मणतो तें अगदीं बरोबर आहे. कारण, या ' गनिमी काव्या'ची लढाई करण्यांत मराठ्यां इतके पटाईत लोक हिंदुस्थानांत कोणी ही नव्हते. शत्रू बरोबर तोफा, पायदळ व पुष्कळसें बाजार बुनगें असलें ह्मणजे त्याची या मराठ्यांच्या ' गनिमी काव्या ' नें जी लेधा उडून जाई ती पुसूं नये ! ते लुटालूट व जाळपोळ करीत शत्रूच्या मुलखांतून हिंडत तेव्हां त्याच्यानें त्यांचा पाठलाग करवत नसे. कारण, तो फक्त घोडेस्वारांची फौज घेऊन पाठीस लागला तर ते वेलाशक त्याजवर उलटून पडून त्याचा चुराडा करीत. पायदळ व तोफखान्याचें लटांवर घेऊन तो पाठीस लागेन ह्मणेल तर हे कसचे त्यास सांपडतात ! तो जवळ जवळ येतो तों गेले हे शें पन्नास कोस दूर ! आणि लागले तेथल्या मुलखाचा सत्यानाश करायला ! तेथें तो जातो तों हे पुनः नाहींसे होऊन भलत्याच ठिकाणीं कोठें तरी उमटत ! हा गनिमी काव्याचा एक प्रकार झाला. मराठ्यांची फौज शत्रू पेक्षां कमी असली किंवा त्यास हेलपाटे घालावयास लावून बेजार करून नंतर त्याच्याशीं गांठ घालावयाचा त्यांचा विचार असला तर ते या प्रमाणें वागत. जर शत्रु पेक्षां दीडपटीनें दुप्पटीनें आपली फौज अधिक असली तर त्यांची ' गनिमी काव्या ' ची निराळीच तऱ्हा होती. ते जेथें शत्रु असेल तेथें जाऊन त्यास घेरीत. त्याच्या लहान सान टोळ्यांवर झडप घालून त्या मारून टाकीत. मोठीशी चांगली दहा पंधरा हजारांची टोळी आपली मुख्य फौज सोडून अंगावर चालून आली ह्मणजे आपण भ्यालोंसें दाखवून पळूं लागत. आपला जय झालासें समजून शत्रु झपाट्यानें पाठलाग करी. या प्रमाणें त्यास ' पाठीवर घेऊन ' बरेच अंतरावर गेल्यावर व त्याची लढाईची व्यवस्था अगदीं मोडली आहे व तो बेसावध झाला आहे असें पाहून एखादा अडचणीचा जागा पाहून हे एकदम माघारे उलटून त्याजवर तुटून पडत व त्यांचा संहार करीत. ते शत्रुच्या लष्करा भोंवती रात्रं दिवस घिरट्या घालीत. त्याच्या चौक्या मारून तुडवून टाकीत. त्यास अन्नपाणी व वैरण जगदीं पोंचूं नयेसा बंदोबस्त करीत. रात्रीं त्याच्या लष्करांत बाणांचा वर्षाव करीत व दिवसा जेजालांचा व बंदुकांचा मारा करीत. अशा स्थितींत तो हैराण होऊन

होईल तों करावें. नच होईल तर शेवटीं किल्लेकोट आहेतच! - जसें बनेल तसें करावें. पुढें ईश्वरानें नेमिलें असेल तसें होऊ; परंतु पन्नास हजार फौज असतां उगीच त्याचे हवालीं (दौलत) करावी हें न करावें. असें केल्यानें कांहींच राहात नाहीं. इतकें (मोंगलानें) करावयास कारण, यंदां मराठी फौज त्याजकडे फार आहे. केवळ जवळ राहून झुंजूं ह्मटल्यास रातेंबिरात दगा करतील. यास्तव हा प्रकार योजिला आहे. सांप्रत सेडे होऊन मल्हारबाकडे जावें. त्यांस मेळवून घेऊन मग जें करणें तें करावें. मल्हारबास आणावयास राजश्री विठ्ठल शिवदेव गेले. औरंगाबादेचे सुमारें त्यास घेऊन येतील. पुढें होईल तें लिहून पाठवूं. आपण सावध असावें. बहुत काय लिहिणें. लोभ असों दीजे. हे विज्ञापना.

नं० १७६L

(फाल्गुन शुद्ध चतुर्थी
१७ फेब्रुवारी.)

श्री.

तीर्थरूप मातुश्री बाई वडिलांचे सेवेशीं

अपत्यें रघुनाथानें चरणावर मस्तक ठेऊन शिरसाष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल जाणून स्वकीय लिहीत असलें पाहिजे विशेष. निजामअल्ली खानास निमकहराम गोपाळराव गोविंद जाऊन मिळाले व राजश्री जानोजी

तळ हालवून कूच करूं लागला ह्मणजे हे नेहमीं त्याच्या पिछाडीस बिलगत व त्यास 'पायबंद' बसवीत. यामुळें त्यास मुक्कामच करणें भागपडे. त्यानें मुक्काम केला ह्मणजे मराठ्यानीं अन्नपाणी बाहेरून पोंचण्याचें बंद केल्यामुळें त्यास उपाशीं मरण्याची पाळी येऊन शरण येऊन कशी तरी आपली सुटका करून घेणें भागपडे!

१ रात्री दिवसा, एखाद्या भलत्याच वेळीं. २ मल्हारराव होळकर यावेळीं चांदवड येथें होता. त्याज सारखा 'गनिमी काव्या' चा अनुभवी सरदार यावेळीं महाराष्ट्रांत कोणी ही नव्हता. यामुळें पुढें लवकरच सुरू होणारी मोंगलाशीं लढाई त्याच्याच सल्ला मसलतीनें व सहाय्यानें चालवावी असें दादासाहेब व सखारामबापू व इतर सरदार यानीं ठरविलें होतें. ३ हें दादासाहेबांचें गोपिकाबाईस पत्र.

भोसले सेनासाहेब सुभा सेनेसहित जाऊन भेटले. याजमुळें मोंगलाजवळ (मराठी) भारी फौज जमा झाली. बादसलुख करावा असें त्याच्या चित्तांत आलें. बातम्या येतात. त्यास त्याणीं बिघाडाचा डौल धरिल्यास नैतिजा द्यावा, मुकाबल्यास जावें, (अशी मसलत योजिली आहे.) चिरंजीव राजश्री नीलकंठ महादेव कर्नाटकांत रवाना केले होते ते फौजे सुद्धां माघारे आणिले. ऐनापुर, कुडची नजीक कृष्णातीरीं होतों ते मिरजेस आलों. येथें भारी तोफा वगैरे सरंजाम भारी जेडगीर असेल तें ठेऊन मोंगलाचे शहाबरी जात असों. वडिलांचे आशीर्वादप्रतापें करून त्याचा पराजय होईल. रवाना छ० ३ साबान. पुण्यांत भारी सरंजाम असेल तो किल्ले सिंहगडावर पोंचवावा. या विषयीं राजश्री नारो आपाजीस लिहीलें आहे. भारी ओझें रवाना करवावें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

पै॥ छ० ८ साबान.

नं० १७७

(१७ फेब्रुवारी)

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वादें उपरी. कुशल तागायत फाल्गुन-शुद्ध १-चतुर्थी बुधवार चतुर्थ प्रहर यथास्थित असे. विशेष. तुम्हीं शिदू जासुदाबरोबर पत्र पाठविलें तें श्रीक्षेत्रींचे मुक्कामीं रविवारीं सायंकाळीं पावलें. सातवे दिवशीं पावलें. त्या उपरी शुक्रवारीं राजश्री बाळाजी केशव व स्वांर रवाना केले ते सोमवारीं मंगळवेढ्यांस आले. काली मंगळवारीं श्रीक्षेत्रींचे मुक्कामीं आले. आम्हीं

---

१ या वाक्यांत सेनासाहेब सुभे भोंसले यानीं मोंगलाची कुमक करण्यांत आपल्या 'सेनेचा' दुरुपयोग केल्यामुळें त्याविषयीं दादासाहेबानीं क्रोध व उपहास व्यक्त केला आहे. २ निजामअल्लीनें. ३ पराभव करावा. ४ आबा पुरंदरे. ५ जड सामान. ६ नारो आपाजी तुळशीबागवाले यांजकडे पुण्याचें संरक्षण करण्याचें काम होतें. हे मूळचे साताऱ्याजवळ पाडळी ह्मणून गांव आहे तेथील कुळकर्णी होते. ७ हें पत्र गोविंद हरीनें गोपाळरावास लिहिलेलें आहे.

श.१६८४ गोविंद हरि मंगळवेढ्यांकडे जातो इ.स.१७६३

गुरुवारीं कवठें महांकाळ येथील मुक्कामीं पत्र पाठविलें आहे. त्या उपरी शुक्रवारीं हातिदास आलों. शनिवारीं सांगोल्या अलीकडे आलों. रविवारीं श्रीक्षेत्रास आलों. ते दिवशीं रात्रीं पत्र मंगळवेढ्यांस पाठविलें आहे. तेथून (तुम्हांस) पावेल. सोमवारीं मुक्काम सहज केला. ते दिवशीं रात्रीं प्रहर रात्रीस जिवाजी व खासबारदार आले. त्यांणीं चिरंजीव सौभाग्यवती वहिनीचें वर्तमान सांगितलें या मुळें मुक्काम झाला. धोकाच होता. कशी गति होईल [ही] चिंता करीत होतों. इतक्या कुटुंबांतून परमुलुखीं कोणी [तिच्या] समीप नव्हतें ! चिरंजीव सौभाग्यवती कुशीची गति काय झाली असेल न कळे. यंदां तुमच्या जिवावरील दोन झुजीं संकटें गेलीं, लष्कर लुटिलें गेलें, (इतक्या सर्वांचे) तितके श्रम मानिले नाहींत. तों हे खबर आली ! होणारास उपाय नाहीं. तुम्हीं तो विवेकीच आहां. होणार ! काल गतीचा महिमा ! निरुपाइक गोष्ट. या उपरी विषम काल गेला. आम्हीं आपण होऊन मिरजेंत राहिलों. मारावें कीं मरावें हे उमेद. दीड महिना पर्यंत झुजलों. पैहिले दिवशीं हल्ला मारून काढिली. दुसरे दिवशीं अकस्मात् बोलीचा प्रसंग पडला त्या ही मध्यें अवसान धरून धैर्यानेंच निघालों कोणास आयांस आलों नाहीं. लौकिक बराच झाला नक्षास कमी झाली नाहीं. होणार भावी तदनसार जाहलें. आम्हीं निघोन

---

१ ही गोपाळरावाची बायको. हिचें काय, नांव होतें हें ठाऊक नाहीं. ही दूर परदेशांत असतां मरण पावली म्हणून गोविंद हरि शोक करितो त्या अर्थी बंकापुरास पटवर्धनांचीं मुलें माणसें राहिलीं होतीं त्यांमध्यें ही होतीसें दिसत नाहीं. साऱ्या कुटुंबांत गोपाळरावास ' दादा ' हें नांव होतें आणि म्हणून हिचें ही नांव ' वहिनी ' असें पडलें. सासूसासरा ही तिला याच नांवानें हांक मारीत. पुढील वर्षीं गोपाळरावाचें दुसरें लग्न झालें. या दुसऱ्या बायकोचें नांव सरस्वतीबाई होतें. तिला ही गोविंद हरि ' वहिनी ' च म्हणे. २ पत्र लिहिणारानें ' पहिले दिवशीं ' हे काय शब्द लिहिले आहेत हें कळत नाहीं. जरी त्यानें वेढा सुरू झाला त्या दिवशीं जिभीवरचा हल्ला मारून काढिला होता हें खरें आहे, तरी दुसऱ्या दिवशीं, तहाचें बोलणें लागलें नव्हतें. तेव्हां ' पहिल्या दिवशीं ' याबद्दल लढाईच्या ' शेवटच्या दिवशीं ' असें त्याच्या मनांत त्याहावयाचें होतेंसें वाटतें.

आलों. आजीच राजश्री नारो शंकर यांची फौज रवाना जाहली. विठ्ठल शिवदेव यांचे पुत्र काली श्रीनरसिंगपुरास गेले. चिरंजीव दाजीकडे कवठ्यांहून जासूद पाठविला होता तो आला. रविवारचीं पत्रें आलीं. तों पर्यंत चिरंजीव[1] कुरुंदवाडींच होते. काली पत्रें[2] रवाना केलीं कीं, तुम्हीं या उपरी लष्करांत[3] न जाणें. जेथें असाल तेथें सावध राहणें. नारो शंकर सातारियाकडे जात होते. श्रीमंतांनीं तासगावींचे मुक्कामाहून माघारे नेले. कर्नाटकची फौज जावयास अनमानच करीत होती. रडतराऊत[4] लांवीत होते; तों नबाब माघारे फिरले, भोसले येऊन सामीलें[5] झाले, हें वर्तमान येतांच त्यांचें जाणें ही स्तब्ध झालें. पुरती खबर[6] कळलियावरी काय विचार करतील पहावा. मिरज गेली म्हणोन श्रम मानावा तरी मागें मिरजच होती असा अर्थ नाहीं. मिरज कोणास ठाऊक नव्हती ती दिल्लीपासून रामेश्वरपर्यंत ठाऊक झाली. आणि लौकिक ही लढाईचा उत्तम झाला. खर्च वेंच झाला, कर्ज झालें, [त्याचा] श्री परिहार करील. कोठवरी चिंता करावी ! संतोषरूपी रहावें. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

पै॥ छ० ६ सावान फाल्गुन मास.

नं० १७८

[अजमासें फाल्गुन शुद्ध द्वितीया
१९ फेब्रुवारी.]

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद[7] उपरी. तुम्हीं पत्रीं लिहिलें कीं तूर्त मंगळवेढ्यास जावें. तेथें रहावें. नबाब[8] माघारे फिरले ये आवईनें[9] कमावीसदार आपणच उठोन जा-

---

१ पुरुषोत्तमराव दाजी. २ श्रीमंतांचे लष्करांत. ३ पाठवून देत होते. ४ भोंसले येऊन मोंगलास सामील झाले. ५ मोंगल आपणावर चालून येत आहे ही खबर. ६ हें गोविंद हरीचें गोपाळरावास पत्र. ७ रायचुराकडे जाण्याचा रोंख होता तो सोडून पेशव्यांशीं लढण्या करितां मोंगल परत फिरले. ८ कमाविसदार पेशव्यांचे.

तील, ह्मणून लिहिलें तें कळतें. ऐसियासीं आमचा मजकूर[1] जे बालेघाटें प्रांतें हरएक ठिकाणीं दाणापाणी असेल त्या जागां जावें. राजश्री जानोजी निंबाळकर यांस मिरजेच्या मुक्कामींहून पत्र पाठविलें होतें, परंतु त्यांचें प्रत्योत्तर देखील नाहीं. ते श्रीमंतांचे[2] पुरातन स्नेही. आम्हांस स्थल दिल्यानें त्या स्नेहांत विकृत पडेल यास्तव (त्यानीं) पत्रोत्तरच न पाठविलें! आमचे मतें आठ चार दिवस मोहळेस रहावें; मग पुढें जावें; तों तुमचें पत्र ये रीतीचें आलें. यास्तव आजी सुस्ते[3] तारापुरास भीमातीरीं मुक्काम केला. येथून मोहळ सा सात कोस आहे. मंगळवेढें पांच सा कोस आहे. तुमचें लष्कर पुरतें कृष्णातीरास जाईल, त्यांची व नबाबाची गांठ पडेल, (मग) पुढें कसा विचार होतो तो पहावा! या गोष्टीस पंधरा वीस रोज लागतील. जलदी झाली तरी दहा पंधरा दिवस पाहिजेत. तुमचीं पत्रें ही वरचेवर येतील. (आम्हीं) मंगळवेढ्यांस जाऊन मग मागती पळत फिरावें हें अनुचित. श्रीमंतांची मसलत जे, " कर्नाटकांत फौज रवाना करावी. लोक जावया कारणें करितात यास्तव खासा[4] रायांस पाठवावे. आपण या प्रांतें येऊन मंगळवेढें घेऊन पुढें पंढरीस जाऊन मग देशास जावें. " असा विचार आहे. त्यास नबाब आले तरी हे फौज श्रीमंतांची भारी. वर्षास नबाबाची यांची गांठ पडत असते कीं नाहीं? नबाबाची मसलत (श्रीमंतांच्या) खातरेंत[5] नाहीं! कार्यभागी यांस दोन बोटें [आकाश] उरलें आहे! यंदां नबाबाकडे मराठी फौज भारी, उमदे सरदार, या प्रमाणें फौज सरदार[6] त्यांचे फौजेंत[7] नाहींत हें प्रमाण[8] आहे. परंतु लटकी चिंता! यास्तव लिहिलें आहे. दोन फौजा[9] करून[10] एक वेळ चळ दिल्हा

---

१ मनांतील हेतु. २ ' बालेघांट ' ही डोंगराची ओळ निजामाच्या राज्यांत आहे. तिचे दोन फांटे असून दोहोंस ही बीड जिल्ह्यांतील अष्टी तालुक्यांत सुरवात होत्ये. एक फांटा तेथून पूर्वेस पीलम, नांदेड, बोधन या जिल्ह्यांतून बिलोली तालुक्याकडे जातो. दुसरा दक्षिणेस धाराशीव जिल्ह्यांतून नळदुर्गावरून गुलबर्ग्याकडे जातो. याचे कांहीं लहान मोठे डोंगर इंग्रजी हद्दींत बारसी तालुक्यांत आले आहेत. वर सांगितलेल्या डोंगरांच्या ओळीच्या आसपास जितका प्रदेश आहे त्यास ' बालेघांट प्रांत ' ही संज्ञा आहे. या प्रदेशांतून मांजरा, सीना व कागना या नद्या वाहतात. हा सर्व प्रदेश ' एक लांब व विस्तीर्ण असें उंचवट्याचें मैदान ' आहे. ३ दादासाहेबांचे. ४ स्वस्थपणानें. ५ पेशव्यांची. ६ अनमान. ७ माधवराव पेशव्यांस कर्नाटकांत पाठवावें. ८ पुण्यास. ९ सखारामबापू. १० श्रीमंतांचे. ११ खरें. १२ फौजेच्या दोन टोळ्या करून एकदां श्रीमंतांवर चालून गेलांत तर.

ह्मणजे वारापाणी होतील. मोंगली फौज मागें, पुढें मराठी फौज. बाण सामान [सुद्धां, असे चालून गेल्यास] आवईनेंच घाबरे होतील ! असा मजकूर आहे. आम्हीं येथें तुमचें पत्र येइजेपर्यंत आहों. मग कोणीकडे जावें हे चिंता लागली, त्यास आस्था नसतां त्याच्या[1] ठिकाणास जावें हें अनुचित. परंतु मार्गानें गेलें पाहिजे. बारशी पानगांवाकडे जाऊं. तुमच्या फौजांची जलदी झाली तरी मग मंगळवेढ्यांकडे जाऊं. पत्राची वाट पहातों. श्रीमंतांकडील ही वर्तमान कळतें. आम्हांजवळी हजार फौज तुह्मांकडील देखील आजी आहे. वरचेवर लोक येत आहेत. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद. पै॥ छ० ६ साबान फाल्गुन मास.

नं० १७९ [२० फेब्रुवारी.]

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वादें उपरी. येथील कुशल तागायत फाल्गुन शु० सप्तमी मंदवासर यथास्थित जाणून स्वकीय लिहिणें. विशेष. आम्हीं रविवारीं श्रीक्षेत्रास आलों. सोमवार मंगळवारीं मुक्काम केला. बुधवारीं राजश्री नारो शंकर यांजकडील फौजेस निरोप देऊन आम्हीं सुस्त तारापुरास राहिलों. गुरुवारीं तेथें मुक्काम केला. काली शुक्रवारीं कसबे मोहळ येथें आलों. तुम्हीं लिहिलें होतें कीं मंगळवेढ्यांस यावें, त्यास मोंगलाई दीर्घसूत्री कारभार. बाळाजी केशव शुक्रवारीं तुम्हीं रवाना केले त्यास आजी नव रोज (झाले.) लष्कर कोठें आलें असावें ? अबजलपुरा नजीकचा मुक्काम ऐकितों. श्रीमंतांकडील फौज येऊन " जत प्रांतीं राजश्री गमाजीबावाकडील घोडीं वस्तभाव आहे " ह्मणोन (कोणी) चहाडी केली, त्यावरून (तिनें) उमदी उंबराणी येथें उपद्रव केला; ह्मणोन ऐकितों. मंगळवेढ्यास जाऊन मग निघावें हें अनुचित. पुर्ते उभयतां लष्करांचा मुकाबला होऊन[2] त्याची गडबड झाली ह्मणजे मग कांहीं गुंता नाहीं. तूर्त राहतां नये. मोंगलाचें लष्कर भिवरेच्या पाण्यानें वरतें येतें ह्मणतात. कांहीं ठीक कळेना. अ-

---

१ दाणादाण होऊन पळून जातील. २ निंबाळकरांचा आह्मांविषयीं प्रेमभाव नाहीं, असें असतां त्याच्या मुलखांत जाऊन रहावें हें अनुचित. ३ कळेल. ४ हें पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास. ५ पंढरपुरास. ६ हे दोन्ही तालुके त्यावेळीं प्रतिनिधीच्या जहागिरींत होते. ७ मोंगल व बेसवे यांच्या लष्करांचा. ८ गांठ पडून. लढाई होऊन. ९ होऊन गेली.

श.१६८४ गोविंद हरि मंगळवेढ्यांकडे जातो इ.स.१७६३

लीकडे तुम्हांकडील पत्र यावें तें ही न आलें. रवाना केलें असिलें तरी येऊन पावेल! जानोजी निंबाळकर यांच्या पत्राचें उत्तर आलें जे "कुरडू, परांडें, मोहळ, तीन स्थलें आहेत. यां पैकीं आपल्या विचारें येईल तेथें रहावें. तालुकदारास पत्र पाठऊं;" ह्मणोन लिहिलें, त्यावरून मोहळस राहतों म्हणोन लिहिलें आहे. येथें मातबर वाडा रहावयाचा दिसत नाहीं. यांची ही आस्था नाहीं. नसो. चार दिवस गुदरानी झाली पाहिजे. लोक वरचेवर दहा पांचानीं येतच आहेत. मानसिंग थोरात तिघे भाऊ लष्करांत होते ते आपले जमावानिशीं बराबर आहेत. मुळजी पाटील आहेत. मायाजी म्हसके आहेत. झांबरे, कोडग आहेत- वरकड तमाम वळणचे लोक आहेत. तुम्हांकडील देखील हजार दीड हजार आम्हांपाशीं जमा झाले आहेत. चिरंजीव भास्करपंत व नीलकंठराऊ फौज घेऊन तुम्हांकडे येणार. तुम्हांकडील तहकीक वर्तमान कळलियावरी हे निघोन येतील. रोजमऱ्याचा खर्च भारी आहे. समागमें प्यादे जवादे व पागा खर्च भारी आहे. तमचा वोढगस्तीचा प्रकार. या प्रांतीं पैसा कर्ज न मिळे असा प्रकार. मंगळवेढ्यास कमाविसदार आहे त्याचें पारिपत्य करावयाचें, सामान आह्मां जवळी आहे. परंतु येथून उतावळी करितां येत नाहीं. तुमचें लष्कर पुढें आलियावरी हरएक प्रकार करावयास येईल. श्रीमंत येडूर मांजरीवरी होते. कुरुंदवाडचा कागद सोमवारचा आला. आलीकडे कोठें आहेत कळेना. कर्नाटकची फौज जावयाची राहिली. नारो शंकर गेलेले माघोर आणिले. पुढें तुम्हांकडील बिघाडाची आवई ऐकोन काय मनसबा करितात तें पहावें!

---

१ निंबाळकरास आह्मीं पत्र पाठविलें होतें त्याचें उत्तर. २ आमची सोय करून देण्याची निंबाळकरांस आस्था आहेसें दिसत नाहीं. ३ 'तुमच्या लष्करांत मानसिंग थोरात वगैरे तिघे बंधु जमखिंडी नजीक तुह्मांवर छापा पडला तेव्हां होते, त्या नंतर तुमची त्यांची चुकामूक झाली. ते हल्लीं आह्मां बरोबर आहेत.' असा अभिप्राय. ४ सर्व बाजूंचे. ५ खरें. ६ हा कमाविसदार पटवर्धनांचा कीं पेशव्यानीं मंगळवेढें महालाची जप्ती करण्या करितां पाठविलेला कोणी मनुष्य होता? पटवर्धनांचा ह्मणावा, तर तो विथरला असल्या विषयीं या पूर्वी किंवा पुढें कोठें उल्लेख आलेला नाहीं. नं० १७८ च्या पत्राच्या पहिल्या दोन चार ओळी वाचल्या ह्मणजे हा कमाविसदार पेशव्यांचा असावा असें वाटतें. परंतु तेथें जर पेशव्यांचा अंमल बसला होता असें धरून चाललें, तर त्याच पत्रांत मंगळवेढें काबीज करण्याचा दादासाहेबांचा हेतु असल्याविषयींचें लिहिलें आहे त्याचा अर्थ काय? ७ हिंदुस्थान प्रांतीं स्वारी करण्यासाठीं निघून गेलेले नारो शंकर तासगांवच्या मुक्कामाहून श्रीमंत दादासाहेबानीं परत बोलावून नेले.

आजी उद्यांत तिकडील पत्रें येतील. तुम्हांकडील ही येतील. तदनुसार पत्रें रवाना करूं. पत्रें पाठवावया आळस न करणें. चिरंजीव दाजी कुरुंदवाडीं आहेत. त्यांस ही पत्रें गेलीं आहेत कीं, " तुम्हीं लष्करांत न जाणें. सावध असत जाणें, " म्हणोन लिहिलें आहे. कळलें पाहिजे. मजल दरमजल जावें, त्यास आतां गुंता पडावया कारण काय ? मोंगलाई दीर्घ सूत्री मनसबा ! भोसले वगैरे सरदार दोन तीन मजली पुढें होते तरी श्रीमंतांचे लष्करची गडबड फारच होती[२]. राजश्री गमाजीबाबाचीं घोडीं शिंगरें कांहीं उंब्रजेस आलीं म्हणोन वर्तमान ऐकिलें. तहकीक नाहीं. राजश्री गोविंद शिवराम[३] याचीं पांच सात घोडीं (आह्मां) बरोबर होतीं. काली पुण्याकडून त्यांचीं दहा वीस घोडीं येथें आलीं. वरचेवर येतात लोक त्यांस रोजमरा देतच आहों. सविस्तर वर्तमान तुम्हीं आपले कडील लिहीत जाणें. बंकापुराकडील वर्तमान अलीकडे कळत नाहीं. या करितां चिंता लागली आहे. तिकडील वर्तमान लिहिणें. कनकगिरीकडील[४] वर्तमान कळलें. होणार भावी ! त्यास उपाय नाहीं. जें झालें त्याचा विसर पाडून पुढें कर्तव्य तें केलें पाहिजे. एकवेळ सूड घेतल्याउपरी मग ईश्वर इच्छा ! फार करून आपण करितां असें भाषण न करावें. जाहलियावरी आपणच कळेल. कोणी केलें तरी श्रीमंतांच्या लष्करांत तुम्हीं करितां ऐसी बोली. दुसरियाचें नांव कोणी घेत नाहीं. कळलें पाहिजे. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे आशीर्वाद.

अपत्यें नीलकंठानें व पांडूनें व बाळानें साष्टांग नमस्कार विज्ञापना. पत्र येतांच त्या सुमारें येतों. हे विज्ञापना.

पै॥ छ० ६ सावान फाल्गुन मास.

---

१ श्रीमंतांच्या लष्करांत. २ झाली असती. ३ गोविंद शिवराम खासगीवाले. ४ कनकगिरीचें संस्थान कर्नाटकांत आहे. तेथील खंडणी घेण्याचा हक्क पटवर्धनांचा होता. सखारामबापूनें तेथील संस्थानिकास पत्रें लिहून तेथून पटवर्धनांस पैका मिळूं नये अशी कांहीं खटपट केल्याचें वरील लिहिण्यावरून वाटतें. ५ ' तुह्मांस जर दादासाहेब व सखारामबापू यांजवर सूड उगवावयाचा असला तर तसें बोलून दाखवूं नका. तुम्हीं काय करणार तें सिद्ध झाल्यावर आपोआप कळेलच, ' असा अभिप्राय.

मोंगलाशीं लढाई.

मागील प्रकरणांत सांगितल्या प्रमाणें भवानराव प्रतिनिधि, गमाजी यमाजी, पिराजी नाईक निंबाळकर व गोपाळराव पटवर्धन हे मराठे सरदार जेव्हां मोंगलास जाऊन मिळाले तेव्हां पेशव्यांशीं बिघाड करून त्यांस जिंकावें, त्यांचें स्वातंत्र्य हिरावून घ्यावें, निदान त्यांच्या राज्या पैकीं बराचसा मुलूख आपल्या ताब्यांत आणावा असे विचार मोंगलाच्या मनांत घोळूं लागले. त्याचा दिवाण विठ्ठल सुंदर यानें ही त्यास पेशव्यांशीं बिघाड करण्याचीच सल्ला दिली. गमाजीबाबाचें सातारच्या राजमंडळांत फार वजन होतें. त्यानें मोंगलास सांगितलें कीं, तुम्हीं साताऱ्यास चला ह्मणजे एका प्रहरांत तेथील राजा व किल्ला तुमच्या हवालीं करून देतों, त्या प्रांतांतील किल्ले ही तुम्हांस मिळवून देतों व शिवाय वीस लक्ष रुपये खंडणी गोळा करून देतों ! राजा हातीं आल्यावर जानोजी भोंसल्यास तुम्हीं सातारच्या गादीवर बसवावें व मर्जीस येईल त्यांस पेशवे, सेनापति, सचिव वगैरे पदें व सरदार यांचीं पदें वांटून द्यावीं ! इतकें नुसतें बोलून दाखवून तो थांबला नाहीं. तो स्वतः जानोजी भोंसल्याकडे जाऊन त्यास फौजेसह घेऊन आला. जानोजीच्या मनांत मराठी राज्याचा मालक व ' हिंदुपद बादशहा' होण्याची दुराशा गमाजीनें भरवून दिली. तो मोंगलाच्या लष्करांत आल्यावर राजे विठ्ठल सुंदर व खुद्द निजामअल्ली यानीं ही त्यास छत्रपतीचे सिंहासनावर बसविण्याचें कबूल केलें. भोंसले व मोंगल यां मध्यें ' साठचाळिशीचा ' तह झाला; ह्मणजे जितका नवीन मुलूख व खंडणीचा पैका मिळेल त्याच्या दहा वांटण्या व्हाव्या व त्यां पैकीं सहा मोंगलानें घ्याव्या व चार भोंसल्यानें घ्याव्या. नंतर पेशव्यांशीं लढाई करण्याचा पक्का निश्चय होऊन मोंगल चोंहोंकडून फौज गोळा करूं लागला. पटवर्धन व प्रतिनिधि वगैरे इकडून गेलेल्या सरदारांस त्यांच्या पूर्वीच्या जहागिरी प्राप्त करून देण्याचें मोंगलानें कबूल केलें इतकेंच नाहीं, तर नवीन जहागिरी व किल्ले,

हक्क व मानमरातब देण्याविषयीं त्यांस करारांच्या यादी लिहून दिल्या. हर तऱ्हेनें ही लढाई संपेपर्यंत या मराठे सरदारानीं आपणास चिकटून रहावें असा बंदोबस्त करण्यांत त्यानें कमी केलें नाहीं. त्या योगानें आजपर्यंत न बिथरलेल्या घाटगे, घोरपडे, पाटणकर, पंवार वगैरे शेंकडों जुन्या घराण्यांतील पुरुषांच्या चित्तांत महत्वाकांक्षा उत्पन्न होऊन त्यां पैकीं प्रत्येक घराण्यांतील एक भाऊ पेशव्यांकडे तर दुसरा मोंगलांकडे या प्रमाणें स्थिति झाली. मराठी राज्यांत ज्याला ज्याला ह्मणून भाऊबंदकीच्या व वतनाच्या तंट्यांत आपणा सारखा निकाल व्हावासें वाटत होतें, ज्याला ज्याला खासगी द्वेषामुळें आपल्या प्रतिस्पर्ध्यांवर सूड उगवावयाचे होते, असे सर्व लोक आतां मोंगलास जाऊन मिळाले. त्या योगानें लवकरच त्या जवळ प्रचंड सैन्य जमा झालें. तो साऱ्या लष्करासह पूर्वी रायचुराकडे चालला होता पण आतां तो रोंख फिरवून पेशव्यांवर स्वारी करण्याच्या उद्देशानें भीमानदीच्या तीरातीरानेंच तो परत सोलापूर जिल्ह्याकडे येऊं लागला. त्यानें पेशव्यांस निरोप पाठविला कीं, प्रतिनिधि व त्यांचे मुतालीक, गोपाळराव पटवर्धन, व पिराजी नाईक निंबाळकर यांच्या जहागिरी व किल्ले तुम्हीं घेतले आहेत ते त्यांचे त्यांस द्यावे, जानोजी भोंसल्यांस आणखी नवीन जहागीर द्यावी, भीमे अलीकडे जितकें तुमचें राज्य आहे तें सारें तुम्हीं आह्मांस द्यावें, शिवाय तुमच्या राज्यांतील कित्येक बळकट किल्ले आहेत ते आमच्या हवालीं करावे, व आम्हीं नेमूं तो कारभारी करून त्याच्या सल्ला मसलतीनें राज्य कारभार चालवीत जावा. इतकें तुम्हीं करीत असाल तर तुमचें आमचें सख्य राहील. तसें करावयाचें तुमच्या मनांत नसल्यास आम्हीं तुम्हांवर चालून येतच आहों. आम्हीं ह्मणतों त्या प्रमाणें तुम्हांस करावयास लावूं.

मोंगलाच्या मनांत बिघाड करावयाचा आहे हें पेशव्यांस या पूर्वीच कळून चुकलें होतें. मिरजेस वेढा पडला होता त्याच वेळीं त्याचे धमकावणीचे निरोपांवर निरोप व पत्रांवर पत्रें येत होतीं. पण तो कर्नाटकांत दरमजल जात आहे ही बातमी त्यांस लागली तेव्हां यंदा तरी बिघाड करणें त्याच्या हातून होत नाहीं असें त्यांस साहजिकच वाटलें. मिरज हातीं आ

ह्यावर ते साऱ्या लष्करचा तेथून तळ हालवून कृष्णातीरीं येडूर मांजरी येथें गेले व पुढें कर्नाटकांत हैदरअल्लीच्या दंग्याचा बंदोबस्त करण्या साठीं त्यांस स्वारी करावयाची होती त्या उद्योगास लागले. इतक्यांत जानोजी भोंसले मोंगलास येऊन मिळाल्याची बातमी आली. मागून आणखी बातमी आली कीं, मोंगल आपल्या साऱ्या सैन्यासह महाराष्ट्रावर स्वारी करण्यासाठीं रायचूर दुआबापर्यंत गेलेला परत फिरला. शेवटीं वर सांगितल्या प्रमाणें मोंगलाचा पराकाष्ठेच्या उद्दामपणाचा निरोप आला. तेव्हां आतां या गोष्टीचा विचार करणें त्यांस जरूरच पडलें.

हा मोठ्या आणीबाणीचा प्रसंग होता. पेशवाईचें स्वातंत्र्य, किंबहुना सारी पेशवाईच, जमीनदोस्त होण्याचा मोठा बिकट प्रसंग येऊन ठेपला होता. परंतु या प्रसंगाचें महत्व ओळखून दादासाहेबांच्या व पेशव्यांच्या पक्षाचे सरदार व मुत्सद्दी तत्काल एकचित्त झाले. त्यांचीं आपआपसांतील भांडणें व द्वेष लयास गेले. मोंगलाचें हरप्रयत्नानें निवारण करून राष्ट्राचें स्वातंत्र्य व अब्रू कायम राखावी हाच सर्वांस निजध्यास लागला. त्यानीं या बिकट प्रसंगीं जें मसलतीचें धोरण बांधलें तें वर सांगितलेल्या त्यांच्या सर्व प्रकारें स्तुत्य मनोरथास पूर्ण करावयास योग्य होतें. तो 'अर्वाचीन कौटिल्य' सखारामबापू या सर्व मसलतींत प्रमुख होता व त्याचें शिंदे होळकरां पासून तों लहान सान पथक्या पर्यंत सर्वांवर पराकाष्ठेचें वजन होतें. दादासाहेब व माधवराव पेशवे यानीं व नारो शंकर व विंचूरकर वगैरे सरदारानीं त्यानें सुचविलेल्या उपायाचा अंगीकार करण्याचें कबूल केलें. मग सर्वानुमतें असें ठरलें कीं, मोंगलाची या प्रसंगीं लाख फौज युद्धास तयार होऊन आपणावर चाल करून येत आहे. तिला पायदळ व तोफखाना यांचें जबरदस्त पाठबळ आहे. आपली पंचवीस हजार मराठी फौज सध्या त्याजकडे फितूर होऊन गेली आहे. यावेळीं त्याच्या समोर उभें राहून लढण्यांत आपला परिणाम लागणार नाहीं. या करितां या प्रसंगीं 'गनिमी काव्या'नें लढाई करून मोंगलास हारीस आणावें. तो आपल्या राज्यांत येण्या आधीं आपणच त्याच्या व भोंसल्याच्या राज्यांत शिरून धुमाकूळ मांडावा, ह्मणजे त्यास आपल्या पाठीवर येणें भागच आहे. येणें

करून आपल्या राज्याचें रक्षण होईल व त्याचा मुलूख लुटीमुळें व दोहीं लष्करांच्या पायमल्लीमुळें उद्वस्त होईल. येऊन जाऊन त्याच्या तोफांचा व पायदळाचा बचक बाळगावयाचा, पण पायदळ, तोफखाना, बाजार व बुणगें इतकें लटांवर घेऊन मोंगल चाल करील तर त्याच्यानें आपल्यास कधींच गांठवणार नाहीं. जर तो पायदळ व तोफखाना मागें ठेवून सध्या स्वारीनें गांठावयास आला तर आपण बेलाशक त्याजवर उलटून तुटून पडून त्याच्या सैन्याचा संहार करावा. या 'गनिमी काव्याच्या' लढाईंत बहुत वर्षांचा अनुभवी व वाकबगार शूर सरदार मल्हारराव होळकर या वेळीं चांदवड येथें होता. त्यास आणावया करितां विठ्ठल शिवदेव विंचूरकर गेला व होळकरास त्यानें औरंगाबादेकडे घेऊन यावें व आपण ही तूर्त तिकडेच जावें या प्रमाणें पेशव्यांच्या दरबारीं पक्का निश्चय झाला. दमाजी गायकवाडाची फौज मिरजेस वेढा पडण्या पूर्वीच पेशव्यांच्या लष्करास येऊन मिळाली होती, परंतु तो स्वतः अद्यापि गुजराथेंतच होता असें वाटतें. बहुधा त्यास लवकर निवून येण्या विषयीं या वेळींच बोलावणें गेलें असावें. कारण, या पुढें महिना पंधरा दिवस लोटले नाहींत तोंच स्वारींतील सरदारांत त्याचें ही नांव नमूद केलेलें कित्येक पत्रांत आढळतें. पटवर्धनांची जहागीर दादासाहेबानीं गोपाळराव बर्व्यास दिली होती, ती ताब्यांत घेण्या साठीं त्याचे बंधु कृष्णराव व लक्ष्मणपंत हे कर्नाटकांत गेले. नरसिंगराव उद्धव नांवाचा एक सरदार होता त्याची ही पेशव्यानीं तिकडेच रवानगी केली व मल्हार भिकाजी रास्ते यांस बागलकोटाकडे पाठविलें. एकंदरींत मिरजे पासून तुंगभद्रेपर्यंत पेशव्यानीं सात हजार फौज ठेविली होती तितकी त्या प्रांतीं पेशव्यांचा अमल कायम राखण्यास समर्थ होती. बाकीची अजमासें पंचेचाळीस हजार फौज घेऊन श्रीमंत कृष्णातीर सोडून पुनः मिरजेस आले. तेथें जड जड तोफा वगैरे सामान होतें तें त्यानीं किल्ल्यांत ठेवून दिलें. फक्त दहा तोफा बरोबर ठेविल्या. नंतर ते रोज बारा चवदा कोसांच्या मजला करीत रहिमतपुरावरून साल्प्यांचा घांट उतरून तेथून नगरच्या रोखें जाऊन पुढें औरंगाबादेस गेले. मिरजे पासून ही त्यांची चवदावी मजल होती! त्या शहरचे परे त्यानीं जाळून लुटून फस्त केले व शहरच्या

कोटांवर ही हल्ला केला. तो हल्ला शेहरवाल्यानीं मोडून काढिला. नंतर हे पुनः दुसरा हल्ला करीत होते तों आंत मुरादखान सुभेदार होता त्याजकडून वकील आला व त्यानें दोन लक्ष रुपये देऊन पेशव्यांशीं तह करून घेतला.

इकडे निजामअल्ली भीमेच्या पाण्यानें पुण्याचा रोंख धरून येत होता त्यानें ही पेशवे औरंगाबादेकडे गेले असें वर्तमान येतांच तो रोंख सोडून तिकडेच चाल केली. तो आपणा पासून पांच सात मजलींवर आल्याची वर्दी येतांच मुरादखानानें वर सांगितल्या प्रमाणें दोन लक्ष रुपये दिले तेवढ्यावरच तृप्ति मानून ते तेथून निघाले ते दरमजल वऱ्हाडाकडे जानोजी भोंसल्याचा मुलूख लुटण्या करितां चालले. औरंगाबादेस मुक्काम असतां एका मारेकऱ्यानें दादासाहेबांचा खून करण्याचा यत्न केला परंतु तो सफळ झाला नाहीं. त्यानें वार करून त्यांस जखमी केलें तोंच आसपासचे लोक धांवून आले व त्यानीं त्या मारेकऱ्यास पकडलें. तो मारेकरी गारदी होता. त्यानें स्पष्ट सांगितलें कीं, रामचंद्रराव जाधव यांच्या सांगण्या वरून आपण हें कर्म केलें ! या गोष्टीचा छडा लागतां लागतां असें कळून आलें कीं, हा जाधव मोंगलाकडे फितुरी झाला आहे ! त्यानें पूर्वी पंढरपुरक्षेत्र लुटलें होतें व हल्लीं ही मिरजेहून औरंगाबादेस येत असतां त्यानें वाटेंत रहिमतपुर, फलटण व दुसरे शेंकडों गांव लुटले होते. या नंतर त्यानें दादासाहेबांवर हा मारेकरी घातल्याचा त्याजवर आरोप आला. परंतु तो फितुरी आहे ही पक्की खात्री औरंगाबादेहून लष्कराचें ज्या दिवशीं कूच व्हावयाचें त्या दिवशीं झाली ! लष्कर निघालें तेव्हां तो कांहीं केल्या जागा सोडीना. श्रीमंतानीं शेवटीं बलात्कारानें त्यास कूच करावयास लाविलें. वाट चालतां चालतां श्रीमंतानीं व त्यांचे सरदारानीं विचार केला कीं, ह्या रामचंद्रराव जाधवा सारखा विश्वास घातकी सोबती उपयोगाचा नाहीं. याचें पारिपत्यच केलें पाहिजे. नंतर श्रीमंतांचे आज्ञेवरून बाबूजीनाईक व आबापुरंदरे यानीं जाधवाच्या फौजेवर हल्ला करून तिची दाणादाण केली व त्यास कैद करून दौलताबादेच्या किल्ल्यांत अडकावून ठेविलें. नंतर वऱ्हाडप्रांताकडे लष्कर चालू झालें. या नंतर नरसिंगराव धायगुडे व सदाशिव रामचंद्र व बाबूराव फडणीस व मोरोबा फडणीस हे मोंगलाकडे पळून गेले.

मल्हारराव होळकरास आणण्या करितां विठ्ठलराव विंचूरकर गेले होते. परंतु एका बोलावण्यावरून येणारा तो नव्हता! दादासाहेब व स. खारामबापू यानीं गेल्या चार सहा महिन्यांत ज्या कांहीं गोष्टी केल्या त्या सर्वच त्यास आवडण्या सारख्या होत्या असें नाहीं. अलीकडे त्यानीं त्याची पूर्वी प्रमाणें मना पासून यथास्थित विचारपूस ही केल्याचें दिसून येत नाहीं. आतां त्या वांचून त्यांचें अडलें तेव्हां मात्र त्यानीं त्यास बोलावण्यावर बोलावणीं पाठवावयाचा उपक्रम केला. मग त्यानें तरी त्यांजकडून विनवण्या कां करून घेऊं नये? पहिल्यानें विंचूरकर आले, मागून दादासाहेबांच्या विश्वासांतील दोन कारकून आले. तिसऱ्या खेपेस स्वतः सखारामबापू आले. तथापि तो निघेना! शेवटीं खुद्द रावसाहेब पेशव्यांसच दादासाहेबानीं होळकरास आणावयास लष्करांतून पाठवून दिलें; तेव्हां त्यानें एकदाची जागा सोडिली. पण निघण्या आधीं त्यानें नवीन दहा लक्ष रुपयांची जहागीर आपणास देण्या विषयीं पेशव्यां पासून करार करून घेतला तेव्हां कूच केलें! होळकर येऊन मिळाला तों पेशव्यांचें सैन्य वऱ्हाडांत शिरून लुटालूट करीत मलकापुर पर्यंत गेलें होतें.

मोंगल औरंगाबादेस येऊन उतरतो तोंच जानोजी भोंसल्यानें टकळी लाविली कीं, मी तुम्हांस येऊन मिळालों ह्मणून श्रीमंत माझ्या मुलखाचा लुटून सत्यानास करीत आहेत, या करितां तुम्हीं आम्हीं मिळून त्यांचा पुनः पाठलाग करूं या! तें मोंगलानें कबुल केलें व थोडे दिवस आपल्या फौजेस विश्रांति देऊन ते दोघे ही वऱ्हाडाकडे झपाट्यानें मजली करीत चालले. त्यांच्या तोफा, डेरे, बाजार बुनगें व पायदळ हें सारें मोठ्या आयासानें उंदेरीचा घांट चढून वर गेलें मात्र, तों पेशव्यांच्या फौजेनें आतां आपण मोंगलावर नीट चालून जाऊन त्याशीं निकरानें युद्ध करणार अशी हूल दाखवून त्या बाजूस कांहीं मजला चाल केली. ही वार्ता मोंगलास कळतांच त्यानें ही काय मागें राहिलें होतें तें ही सैन्य घांटावर आणून लढाईची तयारी केली व तो पेशव्यांच्या फौजेची वाट पहात बसला. परंतु ती कसची लढते! मोंगलाच्या लष्करा समीप येऊन ती अकस्मात् जी झुकाटली ती नीट फर्दापुरचे घांटानें खालीं उतरून पुनः औरंगाबादेच्या

बोकांडीस बसली ! पेशव्यानीं आपणास फसविलें हें पाहून मोंगल क्रुद्ध होऊन आल्या वाटेनेंच परत धापादेत घाईघाईनें परत आला तों ते औरंगाबादेहून निघून नागतळ्याचा घांट उतरून करमाळें उजवें टाकून सोलापुर तुळजापुराकडे गेले !

इतकें झालें तेव्हां मोंगलाचे डोळे उघडले. मराठे धांवूं लागले तर त्यांचा पाठलाग आपल्या हातून होणें शक्य नाहीं हें आतां त्यास कळून चुकलें. मग भोंसले वगैरे मराठे सरदारानीं त्यास सल्ला दिला कीं, तुमच्या राज्याचा नाश करण्या करितां पेशव्यानीं ज्या पद्धतीचा अंगीकार केला आहे तीच पद्धति त्यांच्या राज्याचा नाश करण्या करितां तुम्हीं कां स्वीकारीत नाहीं ! ते जर तुमच्या मुलखांत लुटालूट करीत फिरत आहेत तर तुम्हीं ही त्यांच्या मुलखांत जाऊन तसेंच करा ! त्यांस आपल्या मुलखाची आस्था असली तर ते टाकोटाक तुमच्या पाठीवर येतील. तेणें करून तुमच्या राज्यावरचें अरिष्ट टळेल व त्यांशीं लढण्याची जी तुमची इच्छा आहे ती तृप्त होईल. न आले तर त्यांचा मुलूख स्वस्थपणें जाळा, लुटा किंवा काबीज करा ! ही युक्ति मोंगलास मानवली व तो औरंगाबादेहून आपल्या प्रचंड सेनेसह अहमदनगराकडे येऊं लागला. पण त्याच्या इच्छे प्रमाणें पेशवे मात्र त्यास गांठावया करितां व आपल्या राज्याचें संरक्षण करण्या करितां आले नाहींत ! मोंगल पुण्याचा विध्वंस करण्या करितां निघाला ह्मणून ते ही त्याची राजधानी भागानगर [हैदराबाद] जमीनदोस्त करण्या करितां चालले. तुळजापुराहून ते यादगिरीस जाऊन तेथून बेदरास गेले. तेथें त्यानीं आपल्या सैन्याचे तीन विभाग केले. एका भागावर मुख्य दादासाहेब व रावसाहेब पेशवे. दुसऱ्यावर नारो शंकर व मल्हारराव होळकर तिसऱ्यावर बाबूजी नाईक, बाबूराव हरि व रामचंद्र गणेश. या प्रमाणें या तीन फौजा एकमेकां पासून वीस पंचवीस कोसांच्या अंतरावर राहून स्वांऱ्या करीत करीत बेदरा पासून भागानगरपर्यंत त्यानीं सारा प्रांत लुटून जाळून बेचिराख केला !

या पूर्वीच गमाजीबाबानें आपला धनी भवानराव प्रतिनिधी याची जहागीर व किल्ले काबीज केले होते व नारो शंकराचा अंमल उठवून प्र-

तिनिधीचा पुनः अंमल बसविला होता. पेशव्यांची स्वारी सोलापुराकडे आली तेव्हां अक्कलकोटास त्रिंबक हरि वगैरे पटवर्धनांच्या कुटुंबाचीं माणसें होतीं तीं पळून नळदुर्ग किल्ल्याचे आश्रयास गेलीं. गोविंद हरि मंगळवेढ्यांत होता त्यानें श्रीमंतांची स्वारी तेथें आल्यास मिरजे प्रमाणें तें ही ठाणें निकरानें झुजविण्याची तयारी केली. पंचमहालांत निजामअल्लीचा भाऊ मीरमोंगल व त्याचा दिवाण मीर आबास यानीं सोलापुर प्रांतीं लुटण्याचा व जाळण्याचा प्रळय केला. बर्वे व नरसिंगराव उद्धव धारवाडाकडे गेले होते ते परत कोल्हापुराकडे येऊन कोल्हापुरकर व कागलकर घाटगे यां मध्यें लढाई चालली होती तींत कोल्हापुरकरांस मिळाले. या व दुसऱ्या अशा शेंकडो गोष्टी या वर्षीं घडून आल्या, त्यांची विशेष हकीगत येथें देण्याचें कारण नाहीं. त्या सर्व स्थानिक महत्वाच्या आहेत व त्या त्या प्रांतींची तत्कालीन स्थिति दाखविण्यास उपयोगी आहेत एवढेंच. दक्षिणेंत मोठीं राज्यें पेशवाई व मोंगलाई. या दोन राज्यांत राहणाऱ्या कोट्यावधि गरीब रयतेची वाताहत, दैना व संहार करण्या करितां प्रत्यक्ष-कलीनेंच मोंगल व पेशवे या जबरदस्त राजांच्या मनांत संचार केला होता व सारा दक्षिण देश हें एक प्रचंड समरांगण त्यां साठीं तयार केलें होतें. तेथें त्या दोघांची झोंबाझोंबी चालू होती व त्यांच्या पायांखालीं असंख्य अनाथ रयत तुडविली जात होती. त्यांच्या त्या झोंबाझोंबीचें काय परिणाम होत गेले हें सांगितलें ह्मणजे झालें. त्या उभयतांच्या बाजूच्या बालमल्लांच्या ज्या कोनाकोपऱ्यांत झटापटी चालल्या होत्या, त्यांकडे किती लक्ष्य द्यावें!

मोंगलानें ही पेशव्यां प्रमाणेंच आपल्या सैन्याचे तीन विभाग केले एक विभाग दहा हजार सैन्याचा. त्यावर मुख्य सरदार राजे बिनायकदास. दुसरा ही विभाग दहा हजारांचा. त्यावर मुख्य सरदार गमाजीबावा. विठ्ठल सुंदर यास त्यानें नाशीक, जुन्नर प्रांतीं मुलखाची जप्ती करून खंडणी गोळा करण्यास पाठविलें व तसलेंच काम गमाजीबावाकडे सोंपवून त्यास साताऱ्याकडे रवाना केलें. बाकीचें लष्कर व भोंसले, धायगुडे, पटवर्धन वगैरे मराठे सरदार यांस बरोबर घेऊन मोंगलानें कूच केलें व थेट पुण्याचा रोंख धरिला.

एवढा वेळ लढाईची सारी धामधूम काय ती मोंगलाच्या व भोंसल्याच्या मुलखांत चालली होती त्यामुळें पुणें प्रांतीं जिकडे तिकडे शांतता होती. नाहीं म्हणावयास सिंहगडावर कांहीं फितूर झाला होता पण तो उघडकीस येऊन फितवेखोरांचें यथास्थित पारिपत्य झालें. सचिवांचा किल्ला राजगड येथें ही जंजिऱ्याच्या हबशाकडून कांहीं फितूर झाला होता त्याचा यथायोग्य बंदोबस्त झाला. या खेरीज पुणें प्रांतीं कांहीं गडबड झाली नव्हती. पण आतां मोंगल दरमजल चालून येत असल्याच्या बातम्या जेव्हां पुणेंकरांच्या कानीं पडूं लागल्या तेव्हां त्यांची जी त्रेधा उडाली ती कांहीं पुसूं नये ! जितकी जिनगी बरोबर नेववेल तितकी घेऊन ज्यांस जिकडे वाट फुटली तिकडे ते पळून गेले. कोणी तोरणा, लोहगड, राजमाची वगैरे घांट बंधारीच्या किल्ल्याच्या आश्रयास गेले. कोणी मावळांत जाऊन जागोजाग दडून बसले. कोणी घांट उतरून तळकोकणांत भटकूं लागले. कांहीं मुंबईस इंग्रजाच्या आश्रयास जाऊन राहिले. पेशवे सरकारचा जवाहीरखाना व कुटुंबांतील माणसें पुरंदरावर गेलीं. बाकीचे कारखाने त्या किल्ल्याच्या पायथ्यास सासवड येथें राहिले. मोंगलानें पुण्यांतील अधिकारी नारो आपाजी तुळसीबागवाले व पुण्याचे देशमुख ब देशपांडे यांस व खुद्द गोपिकाबाईस पत्रें पाठविलीं कीं, तुम्हीं बरे गोष्टीनें पुण्याच्या खंडणीची रक्कम आम्हीं सांगूं ती लवकर पाठवून द्या. नाहीं तर आम्हीं पुणें उद्वस्त केल्या शिवाय सोडणार नाहीं. गोपिकाबाईनें मोंगलास साफ उत्तर पाठविलें कीं, तुमचे वैरी भागानगर प्रांतीं गेले आहेत तिकडे जाऊन तुमचा त्यांचा काय तंटा असेल त्याचा निकाल करून घ्या. आम्हीं तुम्हांस खंडणी देणार नाहीं. पुण्याचें तुम्हांस काय वाटेल तें करा ! नारो आपाजीनें विचार केला कीं, मोंगल खंडणी मागतो ती दिली तरी त्याचें बे कैदी लष्कर पुण्यास उपसर्ग दिल्या शिवाय राहणार नाहीं. त्यांतून पैसेवाले लोक होते ते येथून गेलेच आहेत. चार गोरगरिबें राहिलीं आहेत, त्यांचें मोंगल झाला तरी काय करणार ! तर आतां खंडणी विषयीं त्यास उडवा उडवीचीं उत्तरें देऊन काय परिणाम होतो तो पहावा. पण त्यास हें कळलें नाहीं कीं, इकडील घरभेदे सरदार तिकडे मिळाले आहेत त्यांच्या

माहितगारीनें मोंगल जेथें जेथें पैका मिळण्याचें संधान असेल तेथें तेथें अचानक जाऊन छापे घालील!

विनायकदास नाशिकाकडे गेला होता त्यानें तें शहर लुटून जाळून फस्त केलें व लाखों रुपये खंडणी मिळविली. नंतर तो तेथून लुटालूट करीत जुन्नरास आला. त्या शहरची ही नाशिका प्रमाणेंच दुर्दशा उडाली. मग त्याचें लष्कर मावळांत जिकडे तिकडे पसरलें. त्यानें लुटिल्या शिवाय तिकडील एक ही गांव सोडिला नाहीं. आंबेगांव शेडाणी पर्यंत या प्रमाणें लूट झाली. जेथें जेथें ह्मणून द्रव्याचा सुगावा लागेल तेथें तेथें नेमके छापे पडत. यामुळें पुण्यांतून पळून गेलेले पुष्कळ लोक नागवले गेले. लोहगडच्या पायथ्यास पुण्याचे पुष्कळ लोक आपापल्या कुटुंबांसुद्धां राहिले होते. त्यांवर मोंगलाचा छापा पडला तेव्हां वीस लक्ष रुपयांची जिनगी लुटली गेली! त्या लोकांत नाना फडणीस होता. त्याचें सर्व वित्त लुटलें जाऊन त्यास एक वस्त्रानिशीं लोहगडावर पळून जावें लागलें! सिंहगडच्या पायथ्यास पेशवे सरकारचे जामदारखाना वगैरे कारखाने होते ते भोंसल्याकडील खोजी करांड्यानें येऊन लुटून नेले. सिंहगडच्या व पुरंदरच्या घेऱ्यांत जितके गांव होते तितके सर्व लुटले गेले. मोंगल पुण्यास आला तेव्हां त्यानें शहरचे बाडे खणवून काढण्याचा व जाळण्याचा आपला निश्चय प्रदर्शित केला. त्या वेळीं ते बाडे वांचवावे ह्मणून गोपाळराव पटवर्धनाच्या मध्यस्थीनें नारो आपाजीनें मोंगलाशीं तह केला कीं, पुणें व पुरंदरचे पायथ्याचे गांव मोंगलानें रक्षण करावे व साडे तीन लक्ष रुपये घेऊन प्रांतांतून आपली फौज उठवून न्यावी. या प्रमाणें तह ठरला व खंडणी पैकीं कांहीं रक्कम मोंगलाच्या पदरांत ही पडली. त्यामुळें नारो आपाजी आतां आपण निर्भय झालों असें समजून बेसावध राहिला. त्याचा परिणाम असा झाला कीं, मोंगलानें खंडणी घ्यावयाची ती घेऊन शिवाय यथास्थित लूट ही केली! पेशव्यानीं भागानगरच्या पेठा मारिल्या व त्या शहरा पासून खंडणी घेतली व बेदरशहर जाळून टाकिलें या बातम्या त्यास नुकत्याच कळल्या होत्या. त्यानें या आपमानाचा व नुकसानीचा सूड पुण्यावर उगविण्याचा निश्चय केला. त्यानें तोफखान्यांतून तोफा नेल्या व फरासखाना सबंदच

लुटिला, शहरांतील सर्व देवळांतून जितक्या म्हणून मूर्ति सांपडल्या तितक्या मुद्दाम छिन्नविच्छिन्न केल्या, मोठमोठाल्या कित्येक हवेल्या पाडून टाकिल्या व कित्येक पेठाच्या पेठा जाळून टाकिल्या. " तोफखान्याचे पानशांचे वाड्यास आग लागली ती नागझरीस येऊन मिळाली. " पर्वतीचा विध्वंस झाला. येथें सरकारी वाडा व " चाळीस हजार ब्राह्मणांस निवाऱ्यास व. सावयाच्या " धर्मशाळा होत्या त्या जळून गेल्या. शेवटीं त्याचा तोच कंटाळून पुण्याहून परत औरंगाबादेकडे जावयास निघाला. गमाजीबाबा साताऱ्याकडे गेला होता तो ही आतां मोंगलास येऊन मिळाला. तो त्या प्रांतींचा चांगलाच माहितगार असल्यामुळें त्यानें वांई, भोर व नीरथडीचे एकंदर गांव लुटून खुब पैका गोळा केला होता. पावसाळा समीप असल्यामुळें महाराष्ट्रांतच छावणी करून रहावें असें मोंगलाच्या मनांत आलें होतें. परंतु अनेक कारणांमुळें तो बेत रहित होऊन तो आतां आपल्या मुलखाकडे परत येत होता. छावणी बेदरास करावी कीं औरंगाबादेस करावी या विषयीं त्याचा निश्चय अद्यापि ही झाला नव्हता.

इकडे पेशव्यांचें सैन्य साऱ्या मोंगलाईभर धिंगाणा घालीत होतें त्यामुळें त्या राज्यावर पुरी साडेसाती ओढवली होती. मराठ्यांचें सैन्य, शत्रूच्या मुलखांत शिरलें म्हणजे नेहमींच लुटालूट करी, पण त्या लुटालुटींत कांहीं निर्बंध होते. परंतु या स्वारींत मात्र त्यानीं लुटण्याची व जाळण्याची अगदीं पराकाष्ठा केली व क्रोडो रुपये गोळा केले. या खेपेस लुटण्या पेक्षां नासाडी करण्याकडेच त्यांचें विशेष लक्ष्य होतें. पुण्याची मोंगलानें काय दुर्दशा केली हें दादासाहेबांच्या कानीं येतांच त्यांस पराकाष्ठेचा क्रोध आला व जेथें मोंगल असेल तेथें जाऊन त्यास गांठून त्याशीं युद्ध करावें, हें त्यांच्या डोक्यांत वारें भरलें! अजून मोंगलाशीं युद्ध करण्याची वेळ आली नाहीं असें सखारामबापूनें व होळकर व गायकवाड वगैरे सरदारानीं त्यांस पुष्कळ सांगून पाहिलें पण व्यर्थ! सखारामबापूस त्यानीं शिव्यांची लाखोली वाहिली व 'तूं गबर झाला आहेस म्हणून मला पळावयाचा सल्ला देत आलास! पण मी कांहीं आतां स्वस्थ बसणार नाहीं. मरून गेलों तर बेहत्तर, पण आतां मोंगलाशीं लढाईच करणार;'

असें त्यानीं त्यास साफ सांगितलें. मल्हारराव होळकर व दमाजी गायकवाड यानीं युद्धाचा निषेध केला, तेव्हां ते त्यांस म्हणाले कीं, 'तुह्मां सर्वांचीं ज्ञानें व हिंमतमर्दानिपणा काय आहे तो मला ठाऊक आहे! पानपतावर भाऊसाहेबांस टाकून आलेत ते तुम्हींच ना!' याच प्रकारची जेव्हां बाकीच्या सरदारांची ही पूजा होऊं लागली तेव्हां ते सारेच कचेरींतून निमूटपणें उठून गेले. दादासाहेबांच्या मर्जीतला एक देव्या म्हणून शागीर्द होता त्याची जेव्हां सखारामबापूनें विनवणी केली तेव्हां त्यानें मात्र युद्धाची इतक्यांत उतावळी न करण्या विषयीं दादासाहेबांचें मन वळविलें!

मोंगलाच्या पुण्यावरील स्वारीस जें एवढें मोठें यश आलें तें इकडून रुसून गेलेले मराठे सरदार त्यास मिळाले होते त्यांच्या मसलतीचें व खटपटीचें श्रेय होय; ही गोष्ट आतां पेशव्यांच्या सरदारांच्या व मुत्सद्दी लोकांच्या मनावर पूर्णपणें ठसली. या रुसलेल्या सरदारांची समजूत करून त्यांस परत आणावें म्हणजे मोंगल सहजच हलका पडेल व त्याशीं युद्ध केल्यास आपणास हटकून जय येईल ही सर्वांची खात्री झाली. पण रुसलेल्या सरदारांची समजूत कशी होत्ये? सखारामबापूची व खुद्द दादासाहेबांची सुद्धां पत त्या सरदारांजवळ अगदींच नव्हती. तेव्हां तुम्हांकडून घेतलेल्या जहागिरी, किल्ले व अधिकार तुमचे तुम्हांस परत देतों; तुम्हीं मोंगलास सोडून इकडे या; असें जरी त्या दोघानीं अगदीं जीव तोडतोडून सांगितलें असतें तरी सुद्धां तें त्यांस खरें वाटलें नसतें! तेव्हां सरदारांची समजूत करून त्यांस मोंगलांच्या कटांतून फोडून इकडे आणण्याचें काम सर्व सरदारानीं मल्हारराव होळकराच्या गळ्यांत घातलें. आणि खरें पाहिलें तर त्या इतका जुना व वजनदार सरदार साऱ्या राष्ट्रांत कोणीच राहिला नव्हता. तेव्हां हें काम झालें तर त्याच्याच हातून होण्या जोगें होतें. आपल्या मदती शिवाय पेशव्यांचें पदोपदीं नडतें असें पाहून या स्वारींत त्यानें ही आपला हात यथेच्छ उगवून घेण्यास मागें पुढें पाहिलें नाहीं! चांदवडाहून निघते वेळींच त्यानें दहा लक्षांच्या जहागिरीचा करार करून घेतला होता. त्या नंतर वेळोवेळ अडअडून त्यानें आजपर्यंत पंचवीस लक्षांचा मुलूख आपणास जहागीर देण्याविषयीं पेशव्यां पासून यादी करार करून

घेतल्या होत्या ! असो. रुसलेल्या सरदारांत बलिष्ट म्हटला तर एक जानोजी भोंसले. त्याचें राज्य, सैन्य, पराक्रम व दरारा ही सर्वच मोठीं होतीं. मुख्यत्वें त्याच्याच मदतीमुळें मोंगलाचें पारडें जड होऊन बसलें होतें. त्यास वश करण्या साठीं सामादि चतुर्विध उपायांची योजना सुरू झाली. साम व दान हे उपाय करून पहाण्याचें पेशव्यानीं होळकरावर सोपविलें आणि त्याच्या त्या प्रयत्नांस लवकर यश यावें म्हणून त्यानीं दंड व भेद हे ही उपाय योजिले. ते असे कीं, हिंदुस्थानांत महादजी शिंदे होता त्यास तिकडून वऱ्हाडांत शिरून लुटालूट करण्याचा त्यानीं हुकूम पाठविला. तो हुकूम पोंचतांच शिंद्याची स्वारी राजपुताण्यांत होती ती दरमजल उज्जनी अलीकडे येऊन तिनें थेट वऱ्हाडचाच रोख धरिला. शिवाय जानोजीचा भाऊ मुधोजी यास पेशव्यानीं सांगून पाठविलें कीं, तूं आम्हांकडे येशील तर जानोजीचें सेनासाहेब सुभ्याचें पद व जहागीर आम्हीं तुला देतों ! या गोष्टींचा सुगावा जानोजी भोंसल्यास लागतांच त्याचें मन चिंताक्रांत झालें. मोंगलाशीं सख्य केल्यापासून आपला काय काय फायदा झाला या विषयीं तो विचार करूं लागला तेव्हां त्यास असें दिसून आलें कीं, नफा होण्या ऐवजीं आपला मुलूख लुटला गेल्या मुळें आपली नुकसानी मात्र पुष्कळ झाली आहे. त्यांत त्याच्या व इतर मराठे सरदारांच्या मनास विशेष लागण्या सारखी गोष्ट ही होती कीं, पुणें जाळल्या पासून मोंगलास व त्याचा दिवाण विठ्ठल सुंदर यास आपण कृतकृत्य झालोंसें वाटूं लागलें होतें व ते आतां त्यांची पूर्वी प्रमाणें विचारपूस करीनासे झाले होते ! मोंगलाच्या साहाय्यानें पेशवाई बुडवून आपणच मराठी राज्याचे कधीं मालक होऊं ही त्यास आतां आशा राहिली नव्हती. अशा स्थितींत होळकराकडून जेव्हां त्याजकडे समेट करून घेण्याविषयीं बोलणें सुरू झालें, तेव्हां त्यानें तें कांहीं शर्तींवर मान्य केलें. अलीकडे मोंगला पासून घेतलेल्या मुलखा पैकीं बत्तीस लक्षांचा मुलूख आपणास मिळावा व आपणा बरोबर इतर मराठे सरदारांची ही समजूत करावी, या त्याच्या शर्ती होत्या त्या श्रीमंतानीं कबूल केल्या. नंतर भोंसल्यानें सांगून पाठविलें कीं, तुम्हीं मोंगलाच्या पाठीमागें पंचवीस कोसांवर यावें म्हणजे मी कांहीं तरी निमित्तानें रुसून

मोंगलापासून दूर राहतों. नंतर तुम्हीं त्याजवर दांड करून यावें व त्याचा संहार करावा.

बाकीच्या सरदारांकडे ही समेटाचें बोलणें निरनिराळ्या द्वारानीं सुरू होऊन ते निघून येण्यास कबूल झाले होते. भवानराव प्रतिनिधीकडे त्याची जहागीर श्रीमंतानीं पुनः कायम केली. दादासाहेबांनीं आपला पुत्र भास्करराव यास प्रतिनिधि केलें होतें. पण तो वारल्यामुळें प्रतिनिधीचें पद पुनः ज्याचें त्यास देण्यास कांहीं कोणाची हरकत नव्हती. प्रतिनिधीची मुतालिकी ही नारो शंकराकडून निघून गमाजीबाबास पूर्ववत् मिळाली. चिंतोपंत रायरीकराची फडणिशी दूर होऊन ती पुनः बाबूराव फडणिसाच्या घराण्याकडे पूर्वी प्रमाणें चालबावयाचें दादासाहेबानीं कबूल केलें. नरसिंग राव घाटगुडे व पिराजीनाईक निंबाळकर यांची ही समजूत झाली. या एकंदर समजुतींच्या प्रकरणीं होळकर प्रमुखपणानें बोलत होता व श्रीमंतानीं कबूल केलेल्या गोष्टी पूर्णपणें अमलांत येतील या विषयीं त्यानेंच हमी घेतली होती. पटवर्धनांस ही त्याची हमी मिळाली होतीच. तथापि त्या शिवाय त्यानीं विठ्ठल शिवदेव विंचूरकर व नारो शंकर या दोघांस पेशव्यांच्या तर्फे जामीन होण्यास सांगितलें व त्या प्रमाणें ते झाले.

इतकें होई तों पावसाळ्यास सुरुवात होऊन आषाढ महिना अर्धा होऊन गेला. त्या अवधींत मोंगलाईंत लुटी करितां जिकडे तिकडे पांगलेली मराठी फौज देशीं जाण्याच्या निमित्तानें एकत्र झाली. मोंगलाचा भाऊ व अदवानीचा जहागिरदार बसालतजंग याजकडे होळकरानें फितुराचें सूत्र लाविलें होतें. गंगोबातात्या बसालतजंगाकडे त्यास श्रीमंतांचे भेटीस घेऊन येण्या करितां गेले होते. तें राजकारण सिद्ध होऊन बसालतजंगाची व श्रीमंतांची पंचमहालांत चितापूर येथें भेट झाली व जरूर पडेल तर बसालतजंगानें श्रीमंतांचे कुमकेस यावें, मोंगलाची कुमक करूं नये, या प्रमाणें करार होऊन तो निरोप घेऊन गेला. पर्जन्याचे दिवस मुलुखगिरीचे नव्हत. त्या दिवसांत फौजेस विश्रांति मिळावयाची व ती दसऱ्या नंतर पुनः जमावयाची; हा प्रघात प्राचीनकाला पासून चालत आला आहे. त्यास अनुस-

रून श्रीमंतांनीं बऱ्याच सैन्यास निरोप दिला. सुमारें वीस पासून पंचवीस हजार पर्यंत सैन्य मात्र त्यांजवळ राहिलें होतें. मोंगल छावणी करिलां बेदरास येणार हें ऐकून त्यानीं ही अहमदनगरास जाऊन दोन महिने विश्रांति घेऊन घोडीं माणसें ताजीं तवानीं करून सारी फौज पुनः गोळा करून मोंगलावर स्वारी करावी असा मनसबा ठरविला व नगरच्या रोखें पंचमहालांतून कूच केलें. इतक्यांत मोंगलास काय वाटलें असेल तें असो, त्यानें बेदरचा रोख सोडून औरंगाबादेचा रस्ता धरिला. श्रीमंतांच्या फौजेस निरोप होत आहेसें पाहून त्यानें ही आपल्या फौजेस रजा देण्याची सुरुवात केली. पटवर्धन मंडळी, पिराजीनाईक निंबाळकर, नरसिंगराव घायगुडे व बाबूराव फडणीस मोंगलाचा निरोप घेऊन व दसरा झाल्या बरोबर आणखी फौज घेऊन येतों अशी त्यास थाप देऊन मंगळवेढ्याकडे यावयास निघाले.

मोंगल औरंगाबादेस जात आहे, हा गोदावरी उतरूं लागला नाहीं तोंच यास सत्वर येऊन गांठावें, या प्रमाणें जानोजी भोंसल्याचा इशारा येतांच श्रीमंत नगरचा रोख सोडून बिडाकडे जलदी जलदीनें आले व त्या शहरा पासून त्यानीं एक लक्ष बारा हजार रुपये खंडणी घेतली. मोंगलाचे पिछाडी पासून ते एक दोन मजलींचे अंतरावर येऊन ठेपले हें वर्तमान येतांच जानोजी भोंसले व भवानराव प्रतिनिधि व गमाजीबावा हे पूर्वसंकेता प्रमाणें मोंगलावर रुसून त्याचें लष्कर सोडून गोदावरीच्या तीरातीरानेंच पूर्वेस दहा बारा कोसपर्यंत दूर गेले.

मोंगलानें पुणें जाळल्याबद्दल दादासाहेब अत्यंत संतप्त झाले होते. त्यांस गेल्या दोन तीन महिन्यांत मोंगलावर सूड कसा घ्यावयास सांपडेल या विचारा पलीकडे दुसरें कांहीं दिसत नव्हतें. त्यांचा लढाईचा आवेश आंवरतां आंवरतां होळकरास व सखारामबापूस पुरे पुरे झालें होतें. त्यांची ती हौस तृप्त होण्याचा समय जवळ येऊन ठेपला. पण आश्चर्याची गोष्ट ही कीं, शत्रूची फौज लढाईच्या निश्चयानें समीप आलेली पाहून मोंगल अगदीं घाबरला. मग भोंसले वगैरे सरदारानीं त्यास दगा दिल्याचें दिसून आल्यामुळें त्याच्या मनाची अशी दशा झाली कीं काय न कळे! खरें पाहिलें तर त्याचें सैन्य फितुरी मराठे सरदार लेगयावर ही श्रीमंतांचे सैन्या

इतकें होतें. किंबहुना तोफा व गारदी यांची जय्यत तयारी असल्यामुळें तो आपल्या शत्रूपेक्षां अधिक सामर्थ्यवान् होता. असें असतां पलायनावांचून त्यास तरणोपाय दिसला नाहीं! तो गोदावरी तीरीं राक्षसभुवन येथें गेला व नदीस पूर आलेला असतां ही अर्धी फौज, बहुतेक तोफा, बुणगें, बाजार यांसह नावांवरून जलदी जलदीनें पार झाला. मागें दक्षिण तीरास बाकीची फौज घेऊन विठ्ठल सुंदर राहिला.

श्रीमंत जलदी जलदीनें कूच करून राक्षसभुवना पासून आठ कोसांवर आषाढ वद्य अमावास्येच्या दिवशीं आले तों मोंगल गोदा पार झाल्याची बातमी आली. विठ्ठल सुंदर याच्या सैन्याचा तपास आणवितां त्यांस असें कळलें कीं, आठ दहा तोफा, पांच सात हजार गारदी व दहा पासून पंधरा हजार पर्यंत निवडक स्वार इतकें तें सैन्य असून त्यांत खुद्द विठ्ठल सुंदर, राजे विनायकदास, राजे गोपाळसिंग, नवाब इस्मायलखान इलिचपुरकर, उदाजी पवार, मालोजी घोरपडे, मुरादखान, जोत्याजी घाटगे वगैरे सरदार आहेत. जलदी करून युद्ध प्रसंग केल्यास बरें, नाहीं तर हें ही सैन्य गोदा पार होऊं पहात आहे, असें कळतांच युद्धाचा निश्चय होऊन मध्यरात्री श्रीमंतांचें सैन्य तयार झालें व आठ कोसांची मजल करून श्रावण शुद्ध प्रतिपदेस सूर्योदया नंतर मोंगलाच्या सैन्याशीं त्यानें गांठ घातली. आबापुरंदरे व हुजूर पागेचे सरदार अघाडीस होते त्यांजवर मोंगलाच्या फौजेनें तोफा सुरू केल्या तों त्याच्या लष्करांत दारूखान्यास आग लागून घोंटाळा झाला. त्या संधींत आबापुरंदरे व विठ्ठल शिवदेव विंचूरकर यानीं वेगानें हल्ला केला व शत्रूच्या अघाडीस मोर्चा होता तो उधळून आंत प्रवेश केला. तों मागून खुद्द दादासाहेब ही सैन्याची एक टोळी घेऊन मारामार करीत आंत शिरले. त्या वेळीं मोठ्या निकरानें युद्ध होऊं लागलें व त्यांत मराठ्यांची सरशी होण्याचा रंग दिसूं लागला. इतक्यांत विठ्ठल सुंदर यानें आपल्या फौजेंतील निवडक लोकांनिशीं आवेशानें हल्ले करून पुरंदरे व विंचूरकर यांस मोठ्या शर्थीनें हुसकून लाविलें. नंतर सारें मोंगलाचें सैन्य मध्यभागीं सांपडलेल्या दादासाहेबांवर चोंहोंकडून तुटून पडलें. त्या प्रसंगीं दादासाहेबांनीं बहुत पराक्रम करून कांहीं वेळ आपला बचाव केला. परंतु

शेवटीं ते शत्रूच्या हातीं लागण्याचा अजमास दिसूं लागला व मराठी सैन्यांत चोंहोंकडे हाहाकार उडून गेला. अशा या आणीबाणीच्या वेळीं पेशव्यानीं दादासाहेबांकडे कुमक पाठवून त्यांस शत्रूच्या परिघांतून सोडवून आणिलें. नंतर पुनः दादासाहेब व होळकर वगैरे सरदार यानीं सैन्याच्या निरनिराळ्या टोळ्या करून शत्रूवर एकाच वेळीं चोंहोंकडून हल्ल्यांवर हल्ले केले. सर्व समरांगणावर पेशव्यांची दृष्टि असे. जेथें उणें पडेल तेथें तें भरून काढण्यासाठीं ते वेळोवेळ कुमक पाठवीत. प्रत्येक टोळीच्या पाठीवर उभें राहून तीस उत्तेजन द्यावें व जो पराक्रम करील त्यास तत्काल बक्षीस द्यावें, या प्रमाणें करीत आपल्या फौजेंतून ते सारखे हिंडत होते. असा ज्या फौजेचा धनी, व दादासाहेब, मल्हारराव होळकर, दमाजी गायकवाड, विठ्ठलराव विंचूरकर यां सारखे शेंकडों युद्धांत विजयश्री संपादन केलेले योद्धे जींचे अग्रणी, त्या फौजेस यश आलें यांत नवल तें काय? विठ्ठल सुंदर आपल्या सैन्यास मोठ्या अकलेनें व शौर्यानें झुजवीत असतां ही त्याचा पूर्ण पराजय होऊन तो मारला गेला. विनायकदास व गोपाळसिंग हे ही पडले. पांच हजार पठाणांची टोळी दोन प्रहर पर्यंत मराठ्यांचे हल्ले शर्थीनें परत हटवीत होती ती शेवटीं सबंध जागच्या जागीं कापली गेली. बहुतेक फौजेचा संहारच झाला म्हणावयास हरकत नाहीं; कारण फारच थोड्या लोकांस पळून जातां आलें. शत्रूच्या तोफा, हत्ती, घोडे, डेरे राहुट्या वगैरे सर्व लुटलें गेलें. मुरादखान, बाजीराव पाटणकर, उदाजी पंवार, बाबूराव जंगी, अजमखान इलिचपुरकर, महमद गाजेखान, मालोजी घोरपडे इत्यादि बेवीस सरदार जखमी होऊन कैद झाले. मोंगल उत्तर तीरास होता त्यानें प्रथम तिकडून मराठ्यांवर तोफा सुरू केल्या होत्या, परंतु त्यांचा कांहीं उपयोग झाला नाहीं. दक्षिण तीरीं आपल्या सैन्याचा नाश होत असलेला त्यास निमूटपणें पहात बसणें भाग पडलें. सायंकाळ पर्यंत त्यानें कसा तरी दम काढिला, पण रात्र पडतांच तोफा व डेरे वगैरे जड सामान तळावर जागच्या जागींच टाकून तो औरंगाबादेस पळून गेला!

या युद्धांत मराठ्यांस जें यश आलें तें पुष्कळ अंशीं खुद्द पेशव्यांच्या शौर्याचें व मेहनतीचें फल होय. त्यांचें शौर्य, धोरण, व्यवस्थितपणा

व सर्व लोकांवर त्यांचें बसत चाललेलें वजन हीं या वेळीं उत्तम प्रकारें दृष्टोत्पत्तीस आलीं. दादासाहेब इतके अनुभवी व पराक्रमी असून ते ही या उदयास येणाऱ्या तरुण सेनानायका पुढें फिक्के पडले. त्यानीं प्रांजलपणानें गोपिकाबाईस लिहून कळविलें आहे कीं, " चिरंजीव रायानीं यंदां मेहनतींत व शिपाइगिरींत कमी केली नाहीं. आम्हापेक्षां अधिक जाहले. इतके दिवस त्यानीं लढाई देखिली नव्हती. पहिली लढाई पाहिली, त्यांत सर्व प्रकारें तरतूद अधिक केली. ह्यांचा पुढें कर्तेपणाचा भरंवसा आम्हांस आला. सांप्रत कारभार चिरंजीवच करीत आहेत. " दादासाहेबानीं लिहिलें यांत कांहीं खोटें नव्हतें. खरोखरच यावेळीं पेशव्यांच्या मर्जी प्रमाणेंच सखारामबापू कारभार चालवीत होता. कोणच्या ही गोष्टींत दादासाहेबांच्या मनाचा कल कसा आहे इकडे लक्ष्य न देतां तो पेशव्यांची मात्र कृपा व विश्वास संपादन करण्यासाठीं अधिक अधिक झटत होता.

मोंगल औरंगाबादेस गेला त्याचा पाठलाग करणें गोदावरीस पूर आलेला असल्यामुळें अशक्य झालें होतें. नदीचें पाणी ओसरून उतार होण्यास आठ चार दिवसांचा अवकाश होता. तेथपर्यंत मराठ्यांचें लष्कर पैठणासमोर दक्षिणतीरीं राहिलें होतें. त्या अवधींत मराठे सरदार मोंगलाच्या सैन्यांतून या पूर्वीच निघून आले होते ते एक एक येऊन भेटले. पिराजी नाईक या पूर्वीच होळकराच्या विद्यमानें भेटला होता. जानोजी भोंसल्यास आणावया करितां सखारामबापू गेला होता. तो ही आला तेव्हां होळकरानें त्याची व श्रीमंतांची भेट करविली. भोंसल्या बरोबरच प्रतिनिधि व गमाजी बाबा ही आले. पटवर्धन मंडळीस आणावया करितां नारो शंकर मंगळवेढ्यांस आला होता. ते त्याच्याच विद्यमानें श्रावण शुद्ध चतुर्दशीचे दिवशीं पैठणचेच मुक्कामीं भेटले. आबा पुरंदरे व खुद्द दादासाहेब व रावसाहेब पेशवे व दुसरे लहान मोठे सरदार त्यांस सामोरे गेले होते. पटवर्धनांशीं आतां दादासाहेबांची वागणूक अगदीं निष्कपटपणाची होती. पण बाबूराव फडणिसाच्या घराण्याकडे पुनः फडणिशी देण्याचें पटवर्धनांस दादासाहेबानीं वचन दिलें होतें तें पुरें करण्याविषयीं जेव्हां गोपाळरावानें आग्रह धरिला तेव्हां दादासाहेब व सखारामबापू ह्मणूं लागले कीं, फडणिशीच्या

दरकाचें सर्व उत्पन्न आम्हीं सरकारांत घेऊं व त्यांस सालिना नक्त एक लक्ष रुपये देऊं. तेवढे घेऊन त्यानीं पूर्वी प्रमाणें आपलें फडणिशीचें काम करीत जावें. शेवटीं गोपाळरावानें व खुद्द पेशव्यानीं अगदीं नेट धरिला तेव्हां दोघानीं ही आढेवेढे घेण्याचें सोडिलें. नंतर दादासाहेबानीं नाना फडणिसांस बोलावून आणून फडणिशीचीं वस्त्रें दिलीं व ' खासें कलमदान व कीर्दीचा रुमाल ' त्यांच्या हवालीं केला.

गोदावरीचें पाणी उतरूं लागतांच होळकर व भोंसले प्रथम पळीकडे उत्तर तीरास गेले. मागून तीन दिवसांत मराठ्यांचें सर्व लष्कर नदी पार होऊन लागलेंच औरंगाबादेकडे चालू झालें. मोंगल तोफा व डेरे वगैरे सामान टाकून पळाला होता, तें सर्व सामान मराठ्यांच्या आयतेंच हातीं लागलें. लष्करची अघाडी भोंसल्याकडे नेमिली होती. त्यानें एके दिवशीं श्रीमंतांस मेजवानी करून पुण्याहून लुटून नेलेल्या तोफा त्यांस नजर केल्या व अशीरगड त्यास द्यावयाचा करार होता त्या किल्ल्याबद्दलची मागणी त्यानें आपण होऊन सोडून दिली.

मुरादखान लढाईंत पाडाव होऊन मराठ्यांकडे सांपडला होता, त्यास च त्यानीं मोंगलाकडे तहाचें बोलणें ठरविण्या करितां पाठविलें होतें व त्या बरोबर मोंगलास असा ही निरोप पाठविला होता कीं, एक कोटि दहा लक्ष रुपये उत्पन्नाचें राज्य व खंदार, अंतूर व आवसें हे तीन किल्ले तुम्हीं आम्हांस द्याल तर तह होईल. या मागण्या जबर आहेत, हें मुरादखानानें निघते समयींच सांगितलें होतें व मोंगलानें ही त्याच प्रमाणें इतकें राज्य व किल्ले आपण देणार नाहीं, असें साफ उत्तर दिलें. त्यानें दहा हजार फौज जमा केली होती व आणखी ही नवी फौज तो चाकरीस ठेवीतच होता. या प्रमाणें त्यानें लढाई देण्याचा आव घातला होता परंतु तो आंतून फार घाबरला होता. तो पेशव्यांच्या वकिलाजवळ हिमतीच्या गोष्टी सांगे पण केव्हां केव्हां असें ही बोलून दाखवी कीं, पेशव्यानीं या वेळीं मजवर मेहरनजर केली तर मी ही पुढें त्यांच्या उपयोगीं पडेन !

मराठ्यांचें लष्कर औरंगाबादेस आल्या बरोबर त्यानें तटबंदीवर हल्ला केला पण या वेळीं ही शहरवल्यानीं मर्दुमीनें लढून हल्ला माघारा

फिरविला. नंतर असें एकाएकीं हें शहर हाती येण्याजोगें नाहीं हें समजून मराठ्यानीं शहरास वेढा देऊन मोर्चेबंदी केली व तोफानीं तटाची भित पाडावयाचा उद्योग सुरू केला. त्यांच्या या मेहनतीस सध्यां तरी यश येण्याचा संभव फारच कमी होता. मराठे शिलेदार झटले झणजे अर्धे शेतकरी व अर्धे शिपाई. आठ महिने पर्यंत ते आपल्या सरदारां मागून रामेश्वरापासून हिमालयापर्यंत पाहिजे त्या मुलखांत जावयाचे, पण पावसाळा आला झणजे ने कोणाचे कोणी नव्हत! ते आपली शेतीभाती करण्या साठीं व चार महिने आपल्या मुलां माणसांत स्वस्थपणानें विश्रांति घेण्या साठीं घरोघर निवून यावयाचेच. त्यांतून यंदां तर मोंगलानें देशीं येऊन दंगा केलेला असल्यामुळें प्रांतचे प्रांत उद्वस्त झाले होते व लाखों शिलेदारांचीं कुटुंबें निराश्रित होऊन उपाशीं मरत होतीं. यामुळें शिलेदारांच्या झुंडी सरदारांच्या हुकमाची वाट न पाहतां मृगशीतळाईच्या आधीं पासूनच देशाकडे दररोज निघून चालल्या होत्या. राक्षसभुवनचे लढाई पर्यंत सरदारानीं कसें तरी करून वीस हजार पर्यंत फौज थांबवून धरिली होती तींतून ही कमी होतां होतां आतां सारे चवदा हजार लोक राहिले होते. यांत भोंसल्याच्या फौजेची नवीन भर पडली होती तिची ही गणती झाली. या प्रमाणें कमी झालेल्या फौजेची पुनः पन्नास साठ हजार पर्यंत संख्या वाढण्यास निदान तीन महिने अवकाश होता. कर्नाटक हैदरअल्लीनें पूर्ण ग्रासिलें होतें, त्याचें पारिपत्य करण्या करितां त्यावर स्वारी करावयाचें आतां मराठ्यांस भाग पडलें होतें, परंतु मोंगलाशीं तह झाल्याखेरीज हैदरावर स्वारी होण्याचा संभवच नव्हता. सध्यां आपली फौज कमी झाली असल्या मुळें औरंगाबाद आपणास घेववणार नाहीं व हैदरअल्लीवर स्वारी करावयाची तिच्या तयारी साठीं आपणास फुरसत मिळाली पाहिजे, ती मोंगलाशीं तह झाल्या खेरीज मिळणार नाहीं; तेव्हां आतां कसें ही करून तह ठरवून ध्यावा, असा पेशव्यानीं निश्चय केला. मोंगल ही तहाविषयीं आतुरच होता. उभय पक्षीं अशी स्थिति असल्यामुळें तह तत्काल व्हावयाचा. परंतु मोंगलाच्या तर्फे मुरादखान व पेशव्यांचे तर्फे कृष्णराव बल्लाळ व गंगाधर यशवंत चंद्रचूड हे वकील होते त्यांच्या कावेबाजपणामुळें तहाचें घोंगडें

आणखी महिना पंधरा दिवस भिजत पडलें. पेशव्यांच्या वकिलांस मोंगलाकडून कांहीं इनाम उपटावयाचें होतें व मुरादखान तर पेशव्यांच्या द्रव्यानें पूर्वी पासूनच लाचावलेला होता. या तिघानीं मिळून एकदां या व एकदां त्या पक्षास चढीं देऊन तहाचा निकाल कांहीं दिवस लांबविला. शेवटीं एकदांचा तह ठरला. त्यांत मोंगलानें मराठ्यांस ब्यायशीं लक्षांची जहागीर देण्याचा करार झाला. उदगीरच्या तहांत मोंगलाकडून मिळालेली बासष्ट लक्षांची जहागीर नानासाहेब पेशवे मरण पावल्या नंतर आजपर्यंत त्यानें बहुतेक परत हिसकून घेतली होती. ती सर्व परत मिळावी इतकेंच नाहीं तर आणखी अठ्ठेचाळीस लक्षांची जहागीर [एकंदर एक कोटि दहा लक्षांची] आपणांस मोंगलानें द्यावी हें मराठ्यांचें प्रथमचें मागणें होतें. त्या पैकीं आतांच्या तहांत बासष्ट लक्षांची त्यांची त्यांस परत मिळाली व नवीन सारी वीस लक्षांची मिळाली.

तह झाल्यावर मराठ्यांचें लष्कर भाद्रपद वद्यांत परत फिरलें. कबूल केल्या प्रमाणें बत्तीस लक्ष उत्पन्नाच्या जहागिरीच्या सनदा देऊन जानोजी भोंसल्यास श्रीमंतांनीं निरोप दिला. महादजी शिंदे वऱ्हाडावर स्वारी करण्यासाठीं निघाला होता हें पूर्वी लिहिलेंच आहे. भोंसल्यांचा व आमचा आतां समेट झाला असल्यामुळें त्याच्या राज्यावर स्वारी करण्याचें कारण राहिलें नाहीं. तुम्हीं जलदीनें दक्षिणेंत निघून यावें; म्हणजे सरकारची मोंगलाशीं लढाई होणार आहे तींत तुमचा फार उपयोग होईल; अशी पेशव्यांची त्यास ताकीद गेल्यामुळें तो दरमजल कूच करीत सहा हजार फौजेनिशीं समीप येऊन ठेपला होता. दादासाहेब आपणाकडून सरदारी काढून दुसऱ्या कोणास देणार आहेत, अशी वार्ता या सुमारास त्याच्या कानीं पडल्यामुळें त्यानें पेशव्यांस निरोप पाठविला कीं, माझ्या सरदारींत कांहीं घालमेल करण्याचा सरकारचा विचार आहे म्हणून ऐकण्यांत येत आहे; तसें असल्यास आपण भेटीस येत नाहीं. आल्या वाटेनें असेच हिंदुस्थानांत परत जातों. शिंद्याच्या सरदारी प्रकरणीं दादासाहेबांची कांहीं

अशा तऱ्हेची मसलत असली तरी पेशव्यांस ती पसंत पडण्या सारखी नव्हती. ते आतां मालकाच्या नात्यानें स्वतंत्र वागूं लागले होते व महादजी शिंद्या विषयीं त्यांचा नेहमीं अनुकूल ग्रह असे. त्यानीं तत्काल कृष्णराव बल्लाल याज बरोबर बेलभंडार व शपथ पत्र देऊन त्यास शिंद्याकडे पाठविलें ब तुमची सरदारी तुम्हांकडेच सरकारांतून कायम राखिली जाईल असा निरोप पाठविला. नंतर शिंदे भेटीस आले, तेव्हां श्रीमंतांनीं त्याचा यथायोग्य मान, सन्मान व गौरव केला.

गेल्या वर्षी याच दिवसांत पेशवाईची दिवाणगिरी आपल्या हातीं यावी ह्मणून सखारामबापूनें दादासाहेबांस चिथावून दिलें होतें व फौज जमा करण्या करितां विंचूरकर व नारो शंकर यांस ते मागतील तितका मुलूख जहागीर दिला होता. शिवाय या स्वारींत होळकरास ही तीस पस्तीस लक्षांचा मुलूख द्यावा लागला होता. एकंदर गेल्या आश्विन पासून या आश्विनापर्यंत भोंसले, होळकर, विंचूरकर, नारो शंकर व इतर लहान सान सरदार यांस एकंदर एक कोटीवर उत्पन्नाचा खुद्द पेशव्यांच्या अमलाखालचा मुलूख जहागीर ह्मणून तोडून द्यावा लागला होता व त्यामुळें त्यांचें सामर्थ्य ही अर्थात् कमी झालें होतें. हे सारे खेळ सखारामबापूच्या लोभी स्वभावाचे ! त्यानें जर दिवाणगिरीची हांव धरिली नसती तर चुलते पुतण्यांत युद्ध कां होतें ? पटवर्धन वगैरे सरदारांवर जर त्यानें करडी नजर केली नसती तर ते मोंगलाकडे कशास गेले असते ? व पुढें मोंगलाचें अरिष्ट राज्यावर येऊन आदळलें तेव्हां तें निवारण करण्यासाठीं सरदारांच्या मनधरण्या कशास कराव्या लागल्या ? कोट्यवधि बिचारी अनाथ रयत धुळीस कां मिळती ? हें साऱ्या अपेशाचें खापर साडे तीन शहण्यांत वरिष्ठ गणिलेल्या सखारामबापूच्या माथीं फोडणें अगदीं न्याय्य आहे !

असो. केलेलें कर्म शक्य असेल तितकें निस्तरावें व त्या योगानें पेशवे व गोपिकाबाई यांची मर्जी सुप्रसन्न करावी ही वांछा सखारामबापूच्या मनांत अलीकडे उत्पन्न झाली होती. भोंसल्याकडे मुलूख गेला तो गेलाच.

पण होळकर, विंचूरकर व नारो शंकर यांस नवीन दिलेल्या जहागिरीपैकीं चौथाई सरकारांत परत घ्यावी, ही त्यानें मसलत केली. तो सांगेल त्या प्रमाणें वागण्यास दादासाहेब केव्हां ही तयार असत, आणि पेशव्यांस ही बापूची मसलत इष्टच होती. या प्रमाणें दरबारचें एकमत्य झाल्यावर त्या प्रमाणें त्यानीं सरदारां जवळ गोष्ट काढिली, तेव्हां होळकर बिथरून तळ हालवून निघून जाऊं लागला. त्याची समजूत करितां करितां पेशवे व त्यांचे दिवाण यांस पुरे पुरेसें झालें. विंचूरकर व नारो शंकर यांवर तर हा केवळ जुलूमच होता. गतवर्षीं सखारामबापूस जरूर लागली, तेव्हां त्यानें या दोघांच्या हाता पायां पडून त्यांजकडून पंचवीस हजार फौजेची उभारणी करविली. ती फौज जमा करण्यास त्यांस सावकारांकडून अपरंपार कर्ज काढावें लागलें. त्या कर्जास तारण सरकारांतून नवीन मिळालेली जहागीर; तिज पैकीं चौथाई परत दिल्यावर कर्ज फेडणें त्यांस किती अवघड होतें! त्यानीं व होळकरानें फारच गवगवा केला. कायगांवचे मुक्कामीं सहा दिवस हाच घोळ पडला होता. शेवटीं तिघांत जड प्रकरण होळकर आजोबा यांची कबुली झाल्यावर विंचूरकर व नारो शंकर ही कबूल झाले. बाबूजी नाईक बारामतीकर हीं याच सुमारास कांहीं जहागिरीच्याच प्रकरणीं पेशव्यांवर रुसून लष्करांतून निघून गेला. त्याची समजूत कशी काय झाली, किंवा झालीच नाहीं याचा उल्लेख आम्हांस सांपडला नाहीं.

पटवर्धन येऊन भेटल्या बरोबर त्यांचा चौवीस लक्षांचा सरंजाम व मिरजेचा किल्ला त्यांस परत मिळावयाचा, पण दादासाहेबानीं व सखारामबापूनें त्यांच्या कामांत आढेवेढे घेण्याचें व अडचणी उत्पन्न करण्याचें अद्यापि सोडून दिलें नव्हतें! परंतु गोपाळरावानें आपला तापटपणा यावेळीं टाकून दिला होता. सबुरी सबुरीनें वागून आपलें काम करून घेण्याकडे त्याचें लक्ष्य होतें. त्यामुळें त्यास मिरजेची सनद पुनः मिळाली व ती बरोबरच पुणतांबें, अष्टें, तासगांव, शहापुर, बागेवाडी, संपगांव, जमखिंडी, यादवाड, हुबळी, नवलगुंद, बंकापूर, लक्ष्मेश्वर इत्यादि महाल व ठाणीं

यांच्या ही सनदा त्यास पुनः मिळाल्या. जहागीर हातीं येत्ये तों पटवर्धनांवर दुसरें अरिष्ट आलें. तें असें कीं, हैदरअलीनें तुंगभद्रेच्या आसपासच्या बंकापुर, नवलगुंद, हुबळी, लक्ष्मेश्वर वगैरे तालुक्यांत बलात्कारानें अंमल बसविला होता व मेघश्यामराव कृष्ण पटवर्धन याचा लढाईत पराभव करून त्यास कैद करून नेलें होतें! एकदां सनदा हातीं पडल्यावर दरबारच्या वेधांतून गोपाळराव मुक्त झाला व हैदराच्या ताब्यांत गेलेला आपला मुलूख व बंधु सोडवून घेण्यास काय उपाय करावे हा विचार करण्यास त्यास फुरसत मिळाली.

पुण्याकडे परत येत असतां गायकवाड, होळकर, शिंदे, पटवर्धन, विंचूरकर, नारो शंकर, धायगुडे व इतर सरदार श्रीमंतांचा निरोप घेऊन आपापल्या ठिकाणांस निघून गेले व बाकीच्या फौजेसह श्रीमंत दादासाहेब व रावसाहेब आश्विन वद्यांत पुण्यास दाखल झाले.

नं १८०

[२१ फेब्रुवारी.]

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद[1] उपरी. येथील कुशल तागायत फाल्गुन शु० अष्टमी सोमवार मु० मोहळ. यथास्थित असे. विशेष. तुम्हीं छ० ३ साबान गुरुवार तृतीय प्रहरचें पत्र पाठविलें तें येथें शनिवारीं तृतीय प्रहरीं पावलें. सविस्तर वर्तमान कळलें. " परिछिन्न बिघाड झाला. या उपर गुंता नाहीं. भोंसले देखील मिळाले. श्रीमंतांवरी चालिले. " ह्मणोन लिहिलें, उत्तम आहे. चिरंजीव दाजी काली मंगळवेढ्यास अस्तमानीं आले. श्रीमंतांची भेट घेऊन तासगांवचे मुक्कामींहून शनिवारीं निघाले ते रविवारीं आले. श्रीमंत मजल दरमजल उत्तरेच्या रोखें जातात. ' मल्हारजी होळकर गंगथडीस चांदवड प्रांतें आहेत. त्यांस सामील करून घ्यावें. आणखी ही जागां

१ हें पत्र गोविंद हरीनें गोपाळरावास लिहिलेलें आहे.

जागां लोक आहेत, ते जमा करावे आणि फिरोन[1] टक्कर द्यावी' या मनसब्यांत आहेत. तूर्त निघोन गेले या मुळें लोक म्हणतील कीं पळाले; तर तसा मजकूर नाहीं. तुमचा पुढें विचार कोणे प्रकारचा? सल्ला[2] करून बिघाड तुम्हांकडून झाला म्हणतात. तुमचे म्हणतात कीं त्यांणीं[3] करारा प्रमाणें वर्तणूक केली नाहीं असें म्हणतात. एवंच पृथ्वीप्रळय व्हावयाचें आलें. शेवटीं श्रीसत्ता प्रमाण! जें भवितव्य असेल तदनुसार घडेल. बहुत काय लिहिणें. तुम्हीं[4] यादी पाठविल्या त्या पाहिल्या. शिवलंगणचें[5] सोनें दिसतें. हे आशीर्वाद.

पै॥ छ० ८ सावान फाल्गुन मास.

नं० १८१

(फाल्गुन शुद्ध अष्टमी
२१ फेब्रुवारी.)

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वादें[6] उपरी. आजी सोमवारीं अष्टमीस दोन तास रात्रीस वर्तमान आलें जे, नबाबाचें लष्कर सिनेच्या संगमाबरी आलें. पुढें माणेच्या पाण्यानें जाणार किंवा भीमातीरें[7] जाणार हें न कळे. आम्हीं मोहळेस बाहेर रानांत राहिलों आहों. चिरंजीव भास्करपंत व नीलकंठराऊ यांच्या मतें अगोदरच मंगळवेढ्यांस जावें. आमच्या मतें लष्कर[8] अनिवार. अगोदर गेल्यानें कार्याची गोष्ट नाहीं. लष्कर माणेच्या[9] पाण्यानें वरतें गेलें अगर

---

१ उलटून. २ तह झालेला असतां. ३ पेशव्यानीं. ४ "मोंगलानें तुम्हांस किल्ले, जहागिरीचे महाल, तैनाता वगैरे देण्याचें कबूल करून अघळ पघळ यादी लिहून दिल्या आहेत, पण या पैकीं तुह्मांस कांहीं एक प्राप्त होण्याचा रंग दिसत नाहीं. या यादी आणि दसऱ्याच्या दिवशीं वांटतात तें सोनें हीं सारख्याच योग्यतेचीं आहेत," असा गोविंद हरीचा अभिप्राय. ५ हें गोविंद हरीचें गोपाळरावास पत्र. ६ मोंगलाचें लष्कर. ७ पेशव्यांचें लष्कर गांठण्या करितां मोंगल भीमा नदीच्या तीरा तीरानें वायव्य दिशेनें परत येत होता व या वेळीं तो सीना व भीमा या नद्यांच्या संगमा

भीमातीरें दोन मजली गेलें ह्मणजे मग जावें; यास्तव कसा विचार करावा [तें लिहावें] येथून एक मजलीनें मंगळवेढ्यास जावें तरी बैल ढोर छकडे चालिले पाहिजेत ते बिगारीचे बैल. लष्करचे आबईनें नदीकिनारां तमाम खेडीं वोस पडलीं आहेत. चिरंजीव दाजी मंगळवेढ्यास आले आहेत. आम्हीं येथेंच रहावें किंवा कसें करावें तें हें पत्र पावतांच तेथील स्वाराबरोबर टाकोटाक लिहून पाठवणें. तदनुसार वर्तणूक करावया येईल. आमच्या मतें माणेच्या पाण्यानें लष्कर चालिलें तरी मंगळवेढें समीप, केवळ जवळ. त्या पेक्षां येथेंच चार दिवस रहावें. एक मजल लष्कर तावशी मारापुराच्या (?) सुमारें गेलें ह्मणजे मंगळवेढ्यास जावें असें आहे तुमच्या विचारें कसें तें लिहिणें. तदनुसार वर्तणूक करूं. रानांत लष्करची अगर लुंगारी यांची गांठी पडली तरी एक विचार होईल. चार दिवस येथें राहिल्यानें कांहीं जात नाहीं. सडेच यावें तरी गांवाबाहेर बाडबिसाद वस्तभाव टाकून कसें यावें? वाटेचें भय. मोंगली लष्कर व मैसठे धावतात. चित्रगुप्ताचें देखील समागमें आहे. यास्तव विचारीं पडलों. तरी पत्रदर्शनीं काय तें लिहिणें. नाहक मूर्खपण करूं नये. [मोंगलाचें लष्कर] एक मजल पुढें गेलियावर येथून गेलें ह्मणून कांहीं नासलें नाहीं. पत्र पा-

---

पर्वत आला होता. सदरहू संगम सोलापुरच्या दक्षिणेस वीस मैलांवर आहे. तेथून तो भीमातीरानें येतां येतां माणेचा व भीमेचा संगम ह्यास पंढरपुरा पासून दहा मैलांवर सारकोली येथें लागावयाचा. मग महाराष्ट्राच्या मध्यभागीं येण्यास दोन रस्ते. एक ह्यानें भीमा सोडून देऊन माणनदीच्या तीरानें पंढरपूर व सांगोलें या तालुक्यांतून आठपाडीवरून माण तालुक्यांतून साताऱ्याकडे यावें, किंवा दुसरा रस्ता, ह्यानें भीमेच्याच पाण्यानें येत येत नगर व पुणें या जिल्ह्यांत यावें.

१ लुटारू. २ भलतीच गोष्ट होईल. ३ वाटेनें लोकांस लुटण्या करितां मोंगलाचे किंवा ह्यास मिळलेले मराठे सरदार भोंसले, प्रतिनिधि वगैरेचे स्वार धांवून येतात. ४ फडणीस. बाबूराव फडणीस व नाना फडणीस यानीं आपलें जडजवाहीर व द्रव्य पटवर्धनांजवळ ठेवावयास दिलें होतें, असें वरील वाक्यावरून दिसतें. दादासाहेब व सखारामबापू यांचा दोघा ही फडणिसांवर फारच कटाक्ष होता व फडणिसांचा व पटवर्धनांचा अत्यंत स्नेह होता, या दोन गोष्टी लक्ष्यांत आणिल्या ह्मणजे वरील प्रकारांत कांहीं विसंगतपणा वाटत नाहीं.

वतांच उत्तर लौकर पाठवावें. श्रीमंत कोणीकडे गेले, तुम्हीं कोणीकडे जातां, हें वर्तमान लिहिणें. तेथें बातमी सर्व असेल. पुढें साताऱियाकडे जाणार किंवा श्रीमंतां[1] मागें जाणार हें ही लिहिणें. मिरजेकडील मजकूर तूर्त राहिला कीं काय? भीमातीरें जाणार तरी श्रीक्षेत्रास उपसर्ग लागेल. मागें[2] राजे बहादर यांणीं रक्षिलें. प्रस्तुत क्षेत्र भैरलें आहे, त्याची गत काय? रखावाली पाहिजे, त्याचें ही कर्तव्य तें करावें. सूचना लिहिली आहे. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे. मंगळवारीं आम्हांस अस्तमानीं पत्रोत्तर पावे ऐसें रवाना करणें. हे आशीर्वाद.

पै॥ छ० ८ साबान फाल्गुन मास.

नं: १८२

(फाल्गुन शु० अष्टमी
२१ फेब्रुवारी.)

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वादें उपरी. श्रीमंत[3] तो निघोन गेले ऐसें लोक बोलतात. पुढें नबाबाचा मनसबा काय? कोणत्या मार्गें जाणार? किंवा 'श्रीमंत गेले. आतां कशास जावें,' ऐसें म्हणतात? काय मजकूर तो कळला पाहिजे यास्तव हें पत्र लिहिलें आहे, तरी विस्तारें लिहिणें. मिरजेकडे जाणार कीं नाहीं? मिरज घेणार किंवा सोडून जाणार? वरकड कित्येक तालुके तुम्हीं यादींत लिहिले ते सुटले पाहिजेत[4]. त्याची काय गति? राजश्री गमा-

---

१ श्रीमंतांचा पाठलाग करीत. २ मिरज आम्हांस पुनः घेऊन देण्याचा. ३ याच वर्षाच्या पौष महिन्यांत मोंगल मंगळवेढें परगण्यांत आला होता त्या वेळींच त्यानें पंढरपुर लुटलें असतें, परंतु त्याचा दिवाण विठ्ठल सुंदर राजे बहादर यानें रदबदली करून त्या वेळीं पंढरपुर वांचविलें,' असा अभिप्राय. ४ आसपासचे प्रांतांतील लोक मोंगलाचे भयानें पंढरपुरांत येऊन भरले आहेत. ५ हें पत्र गोविंद हरीनें गोपाळरावास लिहिलेलें आहे. ६ मोंगल चालून आला तेव्हां त्याशीं लढाई करण्याचें टाळून श्रीमंत या वेळीं औरंगाबादेकडे निघून गेले होते.

जीबावाची (व) प्रतिनिधीची स्थापना झाली पाहिजे त्याची गति काय? तुम्हांस सरंजाम नेमून दिला यादी प्रमाणें किंवा तुम्हीं मनःकल्पित लिहिलें? ते किती देणार? मिरज घेऊन दिली तर उत्तम. नाहीं तर रहावया स्थळ या प्रांतें पाहिजे. याची तरतूद काय? करकंब, भोसें, सांगोलें, सुटलें पाहिजे. बागलकोटें[1] वगैरे तालुके सुटले पाहिजेत. नबाब कोणत्या रोखें येणार हें सविस्तर लिहिणें. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद. बाळाजी केशव व स्वांर यांस काली रविवारीं मंगळवेढ्यास पाठविलें. तेथें रात्रीं चिरंजीव दाजी आले. या उपर चिरंजीव दाजीचें पत्र येईल तेव्हां आम्हीं तेथें जाऊं. तेथें गेलियावर चिरंजीव भास्करपंत व नीलकंठराऊ (यांची) व फौजेची रवानगी तुम्हांकडे करूं. तुम्हीं सविस्तर लिहिणें. हे आशीर्वाद. मिरज घ्यावी ह्मणजे लौकिक आहे. हे आशीर्वाद.

पै॥ छ० ८ सावान फाल्गुन मास.

नं० १८३L

(फाल्गुन शु० अष्टमी
२१ फेब्रुवारी.)

श्री.

तीर्थरूप मातुश्री बाई वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें माधवरावें कृतानेक * विनंती येथील वर्तमान जानोजी भोंसले आदिकरून मोंगलास मिळाले. गमाजी बावानीं मोंगलाजवळ प्रतिज्ञा केली

---

१ मोंगलाचे व पटवर्धनांचे करार मदार काय झाले होते हें जरी कळत नाहीं, तरी या पत्रावरून मोंगलानें मिरज, करकंब, भोंसें, सांगोलें, बागलकोट हे व दुसरे कांहीं तालुके गोपाळरावास जहागीर देऊं केले होते, असें सिद्ध होतें. २ हें पेशव्यांचें गोपिकाबाईस पत्र. * येथें मूळ पत्रांत जागा सोडिली आहे यांचें कारण, पेशव्यांची वडील भावजय (विश्वासरावाची बायको) लक्ष्मीबाई ही वारली होती तिचे सुतकांत हें पत्र लिहिलेलें आहे सबब नमस्कार लिहिलेला नाहीं. ती फाल्गुन शुद्ध द्वितीया सोमवार तारीख १४ फेब्रवारी रोजीं वारली.

श. १६८४ **मोंगलाशीं लढाई** इ.स. १७६३

पेशवे औरंगाबादेस जातात.

मोंगल पुण्याच्या रोखें कूच करितो.

कीं " आपल्यास सातारियास घेऊन जातों. एका प्रहरांत किल्ला [व] राजा हस्तगत करून देतों. या खेरीज वीस लाख रुपये मिळवून देतों. त्या उपरी राजगृहींचीं पदें आपले चित्तास येईल त्या प्रमाणें वांटून द्यावीं." या प्रमाणें भाषण करून मोंगलास या रोखें घेऊन येतात. भीमेचे पाण्यानें आणावें हा ही एक विचार आहे. पुढें चोहों कोसांच्या अंतरानें वीस हजार फौजेनिशीं जानोजी भोंसले यांनीं असावें, त्याचे मागें चोहों कोसांचे अंतरें विनायकदास दहा हजार फौजेनिशीं. त्या मागें तीचहूं कोसांचे अंतरें निजामअल्ली. येणें प्रमाणें तरतूद करून येतात. आम्हीं त्यांची फौज तोफखाना भारी जाणून मोंगलास पायबंद द्यावा, त्याचे मुलुखांत लढाई पाडावी, औरंगाबादेची वगैरे मुलुखाची जप्ती करावी, या उद्देशें नगरचे सुमारें चालिलों. फौज पंचेचाळीस पन्नास हजार पावेतों आहे. आज सोमवारीं दहिगांवचा मुक्काम. उद्यां मंगळवारीं नीरातीरीं. या बाटेनें जात असों. रवाना छ० ७ साबान बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

पै॥ छ० ९ साबान.

नं० १८४L

(फाल्गुन शु० दशमी
२३ फेब्रुवारी.)

श्री.

वडिलांचे सेवेशीं विज्ञापना. तागायत छ० ९ साबान मु० पिंपरें नीरातीर येथें वडिलांचे आशीर्वादें करून सुखरूप असों. विशेष. इकडील वर्तमान

---

१ राजगृहींचीं पदें पंतप्रतिनिधि, पंतप्रधान, सेनापति, सचिव वगैरे. या पदां पैकीं प्रतिनिधीचें पद ज्याचें त्यास (भवानराव प्रतिनिधीस) पुनः मिळावें, हा गमाजीनें मोंगलापासून करार करून घेतला असेलच. २ हें पत्र पेशव्यांनीं गोपिकाबाईस लिहिलेलें आहे.

श.१६८१ **मोंगलाशीं लढाई** इ.स.१७६३

प्रेशवे औरंगाबादेस जातात.

मोंगल पुण्याच्या रोखें कूच करितो.

तर नबाबाचा बिघाड झालियाचें वर्तमान तर पूर्वी सेवेशीं लिहिलें आहे. आतां दर कूच नगरास जाऊन तेथून त्याच्या मुलुखास जावें (अशी मसलत आहे.) मल्हारबास[1] बोलाऊं पाठविलें लवकरच येतील. नबाबाच्या मनांत सर्वांनीं आणिलें आहे कीं, सालारियास जावें, [व] राजा हस्तगत करावा. किल्ला ही गमाजी म्हणतो कीं घेऊन देतों. या प्रकारें बातमी आली. आम्ही त्यांच्या मुलुखाच्या सुमारें चाललियावर ते कोणता मनसबा करितात हें पहावें ! झुंजाचा प्रकार तर—सज्या फौजा चालून येतील तेव्हां झुंज करावें हा निश्चय आहे. वरकड वर्तमान राणू सांगेल त्यावरून विदित होईल. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

पैा॥ छ० १० साबान.

नं० १८९

[अजामासें फाल्गुन शुद्ध
फेब्रुवारीचा दु० पंधरवडा.]

गोपाळराव गोविंद यांचें गोविंद हरीस पत्र—

" जानोजी भोसले व मोंगल यांचा तह साठ चाळिशीचा झाला. कर्ज ही नबाबानीं काढिलें तरी त्या पैकीं चाळीस भोंसल्यास द्यावें या प्रमाणें दार मदार झाला आहे. " पुण्यापर्यंत जावें इतक्यांत श्रीमंत कोणे गोष्टीवर[2] न येत तर सप्तऋषी[3] पर्यंत जावें, पुढें मैरीचि[4] ग्रामाकडे रोंख धरावा, सालमजकुरीं तह नच बने तर सप्तऋषी पासोन[5] नगरा पर्यंत जागां जागां छावणी करून रहावें, त्यांज बरोबर लोक आहेत त्यांचीं मुलें माणसें जत करावीं, येतोलें[6] त्यांस सरंजाम द्यावा, " अशी योजना आहे. सासवड, हिंवरें येथें

१ मल्हारराम होळकर या वेळीं चांदवडास होता. २ नबाब निजामअल्लीच्या. ३ तह करून न घेतील तर. ४ सातारा. ५ मिरज. ६ श्रीमंतां बरोबर. ७ श्रीमंतांकडून आपणाकडे फितुरी होऊन येतील त्यांस.

श.१६८४ **मोंगलाशीं लढाई** इ.स.१७६३

पेशवे औरंगाबादेस जातात.

मोंगल पुण्याच्या रोखें कूच करितो.

यज्ञें करून पुढें जावें हा सिद्धांत झाला आहे. ''

नं० १८६

[अजमासें फाल्गुन शुद्ध
फेब्रुवारीचा दु० पंधरवडा]

श्रीशंकर.

विनंती उपरी. तुम्हीं व गकारपूर्वकानीं अभिमाना करितां भोंसले यांस आणून मोंगल माघारा आणिला. परंतु कोणे प्रकारें मनसबा केला हें कळत नाहीं. कारभारियानीं जहागीर देऊन शत्रू बलवंत केला. तोच पुन्हा राज्यांत शिरल्यावर राज्याची गत काय? ज्याचें अन्न भक्षिलें तो आपला देव. त्याची दौलत रक्षावयाचा विचार समजोनें कस कसा केला तो प्रकार तुम्हीं तर लिहीत नाहीं. व आजपर्यंत काय मनसबा केला हें ही कळत नाहीं. तर लिहिला आशय समजोन सविस्तर लिहून पाठवणें. आपला शहणा इतबारी बरोबर देऊन तुम्हांजवळ सकार पूर्वक पाठविले आहेत. हे स्वतिक्षेम येऊन पोहोंचत तें करणें ह्मणजे तुम्हीं लिहून पाठविलें त्याचें उत्तर तुम्हांस सत्वर पाठवूं. राज्यभार रक्षून जो विचार उचित तोच करणें. उत्तर लौकर दुसरा इतबारी शहाणा बरोबर देऊन पाठवावें. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे विनंती.

---

१ सासवड व हिंवरें हीं दोन गांवें अनुक्रमें पुरंदरे व सखारामबापू यांचीं असल्या मुळें त्यांचा यज्ञ करावयाचा ह्मणजे तीं जाळून टाकावयाची! ही मसलत मोंगलाची नसून गोपाळरावाची किंवा गमाजी बोवांची असावी! २ हें पत्र कोणी लिहिलें हें कळत नाहीं. परंतु प्रारंभींच्या 'विनंती उपरी' वरून तो गोपाळरावाचे बरोबरीचा किंवा त्याहून वरिष्ठ असा मनुष्य असला पाहिजे हें उघड आहे. ३ सखारामबापूनें. ४ निजामअल्ली. ५ विचारपूर्वक.

श.१६८४ **मोंगलाशीं लढाई** इ.स.१७६३

पेशवे औरंगाबादेस जातात.
मोंगल पुण्याच्या रोखें कूच करितो.

नं० १८७

(फाल्गुन शु० दशमी
२३ फेब्रुवारी.)

गोपाळरावाचें गोविंद हरीस पत्र छ० ९ साबानचें–

" श्रीमंत येडूर मांजरी वरून कूच करून मालगांवा नजीक मुक्कामास आले तेव्हां कृष्णा सोडिली. क्षेत्राच्या रोखें येतील अथवा तसेच सप्तऋषी-स जातील असें दिसतें. यांच्या सुमारें नीट येतील असें कांहीं दिसत नाहीं. लष्करांत आवई बहुत खातात. तमाम सडे होऊं लागले. यांस पत्र लि-हिलें आहे त्यांत आव तो बहुतच दाखविला. " येणें तर सत्वर यावें. आपण ही तयार आहों. " असें लिहून पाठविलें होतें. त्याजवरून काल नवाबानीं मंजलीस येतांच तमाम सरदार जमा करून मसलत सर्वांस वि-चारिली. जशी त्यांस कळली तशी त्यानीं सांगितली. आम्हांस पुशिलें. आम्हीं चार गोष्टी बोलिलों. त्याज वरून खुष होऊन मसलतीचा ठराव केला जे, " (आपण) नीट चालोन त्यांजवर जात असतां मग आम्हांस टाकोन डावे उजवे कांहीं जात नाहींत. जें होणें तें सन्मुख होईल. वर्षास आपलें सामान थोडें असतें, तेव्हां कोणता पराक्रम करितात ! आतां तो आपला जमाव भारी. त्यांच्यानें काय होणें ! आतां ' बिघाड ' असें सर्व-तो मुखें झालें असतां आतां मागें पुढें न घेतां मजल दर मजल जेथें अस-तील तेथें गांठ घालून शहानिशा करावी, " हा ठराव झाला. "

---

१ साताऱ्यास. २ मोंगलांच्या. ३ पेशव्यांच्या सैन्यांतील लोकानीं मोंगला-ची दहशत खाल्ली आहे. ४ मुक्कामास.

श.१६८४ **मोंगलाशीं लढाई** इ.स.१७६३

पेशवे औरंगाबादेस जातात.

मोंगल पुण्याच्या रोखें कूच करितो.

नं० १८८

(अजमासें फाल्गुन शुद्ध
फेब्रुवारी दु० पंधरवडा.)

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद[1] उपरी. सांगोलें व हलसंगीचा मजकूर लिहिला त्यास सांगोल्यांत दोन लाख व परगणा पाऊण लाख इतके रुपये त्यांणीं घेतले. रयत परागंदा झाली. श्रीमंतांचें स्थल[2] त्यांज पासून घ्यावें, बंदनाम[3] व्हावें, पदरची शिबंदी बाळगावी, रयतेस कौल देऊन वस्ती करावी, या पेक्षां रानांत निराळा स्वतंत्र एक गांव नवाच करून वसविला तर काय बाईट? त्याचे कमावीसदार व्हावें अगर चाकर व्हावें हें अयुक्त. त्याचीं स्थलें न लगेत. देशीं एखादा किल्ला दरोबस्त द्यावा, शें पन्नास स्वांर, प्यादे, एक मुलाची असामी करावी. त्यांणें सरंजाम खाऊन चाकरी करावी, असें जाहलिया करावें. त्याकडे आधीं किल्लाच नाहीं. मातबर किल्ले तो कोणास देत नाहीं. गैरबंळण[4] आमचे कार्याचा नाहीं. करवीरची कर्त्या भूधरगडा सारखा

---

१ हें पत्र गोविंद हरीनें गोपाळरावास लिहिलेलें आहे. २ मोंगलानें त्या प्रांतीं नुकतीच स्वारी केली होती तेव्हां. ३ सांगोलें. हें ठाणें तेव्हां पेशव्यांच्या ताब्यांत होतें. ४ अपकीर्ति. ५ ज्या मुलास मोंगलाकडील असामी मिळेल त्यानें. ६ मोंगलाकडे. ७ आडवाटेचा, गैर सोयीचा. ८ ही शिवी गोविंद हरीनें करवीरची राणी जिजाबाई हिला दिली आहे !!! याचा तिनें अपराध काय केला तर, हा तिज जवळ किल्ला रहावयास मागत होता तो तिनें दिला नाहीं एवढाच ! तिज पासून आश्रय मिळण्याची आशा होती तों पर्यंत तिज विषयीं गोविंद हरीचें लिहिणें किती मर्यादेचें होतें हें पांचव्या अंकांतील नं० ११३ चें पत्र वाचून पाहिल्यावर कळून येईल. पटवर्धनांनीं या वेळा पासून भूधरगडावर डोळा ठेविला होता हें कोल्हापुरकरांस पक्कें माहीत असल्यामुळें त्यानीं पुष्कळ वर्षे पर्यंत त्यांचा कावा साधूं दिला नाहीं. तथापि या पुढें सुमारें वीस वर्षानीं परशुरामभाऊनें सदरहू किल्ला फितुरानें काबीज करून घेतला. त्याजकडे तो दहा वर्षे मात्र राहिला. नंतर तो पुनः कोल्हापुरकरानीं घेतला. तेव्हां पासून तो त्यांजकडेच आहे.

श.१६८४ **मोंगलाशीं लढाई** इ.स.१७६३

पेशवे औरंगाबादेस जातात.

मोंगल पुण्याच्या रोखें कूच करितो.

देती तर कार्याचा होता. परंतु ती आटोकाट कुमैत[1] ! तिजला कोणाचा विश्वास नाहीं ! ऋणानुबंधें घडेल तें खरें ! हे आशीर्वाद.

नं० १८९

(२७ फेब्रुवारी.)

श्रीगणपतिर्जयति.

तीर्थरूप राजश्री दादा[2] व राजश्री आपा
वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें गोविंदानें साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल तागायत फाल्गुन शुद्ध पौर्णिमा रविवार तृतीय प्रहर यथास्थित असे. विशेष. आह्मीं शुक्रवारीं मंगळवेढ्यांस आलों तेच दिवशीं चिरंजीव उभयतां[3] भेटीस आले ते काली मंदवारीं राहिले. आजी भोजनोत्तर निघाले. अस्तमानीं पावतील. आजी यवनाचा मुक्काम श्रीक्षेत्रा नजीक झाला. कालीच तेथें गेले. आजीचा मुक्काम पडला. सांगोल्यास राजश्री गमाजीबाबा गेले आहेत त्यामुळें गुंता पडला. उदईक कूच होईल. श्रीमंतांचें लष्कर गुरुवारीं एकादशीस काराठी नजीक सुपें येथें मुक्काम होता. रात्रीं जासूद आले. मजल दर मजल नगर गंगातीर[4] इकडे (श्रीमंत) जातात. नबाब नीरातीरें[5] पुढें जाणार. युद्ध प्रसंग तूर्त श्रीमंत करीत नाहींत. कोण्या थरास जाईल पहावें ! आम्हीं तूर्त येथें आहों. मुलेंमाणसें व तुम्हीं तूर्त आठ पंधरा दिवस रहावें असें चिरंजीवाचे मतें, त्या प्रमाणें तुम्हांस पत्रें लिहिलीं आहेत. त्यावरून कळेल. चिरंजीव मंडळी व फौजेची रवानगी करावी. याच मार्गें जातील.

---

१ हा शब्द या ठिकाणीं कां लाविला आहे ? हा निंदाव्यंजक आहे हें उघड आहे. त्या काळीं या शब्दाचा कांहीं विशेष अर्थानें उपयोग केला जात असेल ! २ कृष्णंभट व त्रिंबक हरी. हे या वेळीं अक्कलकोटास होते. त्यांस हें गोविंद हरीचें पत्र. ३ गोपाळराव व नारायणराव. ४ गोदावरी तीर. ५ अक्कलकोटास रहावें.

श.१६८४ **मोंगलाशीं लढाई** इ.स.१७६३

पेशवे औरंगाबादेस जातात.

मोंगल पुण्याच्या रोखें कच करितो.

बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विज्ञापना.

चिरंजीव राजश्री आबा व कोन्हेरराऊ व वामनराऊ व भाऊ[1] व धोंडोबा[2] व माधवराऊ व बाळ[3] यांस आशीर्वाद. चिरंजीव बाळास वडिलां जवळी ठेऊन तुम्हीं सर्व येणें. बहुत काय लिहिणें. लोभ असों दीजे. दोनशें स्वार ठेऊन येणें. हत्ती फौज समागमें घेऊन येणें. हे आशीर्वाद.

नं० १९०

(अजमासें फाल्गुन वद्य दशमी किंवा एकादशी
९ किंवा १० मार्च.)

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वादें उपरी. शिरहट्टीहून चिरंजीव मेघश्यामरायाकडील पत्रें आलीं तींच पाठविलीं आहेत. तिकडे बर्वे[4] यानें फार शोखी मांडली आहे. त्याचें पारपत्य झालेविना कार्यास येत नाहीं. हजार दोन हजार फौज रवाना करावी आणि तेवढा लुटून फस्त करावा ! दोन तीन हजार फौज, एक सरदार–चिरंजीव नीलकंठरायासारखा–(पाठवावा. त्यानें) मिरज प्रांतांतून

१ परशुरामभाऊ. २ भास्कर हरीचा मुलगा धोंडोपंत. ३ गंगाधरराव गोविंद उर्फ बाळासाहेब. ४ हें पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास. ५ मेघश्यामरावबापू हा गोविंद हरीचा पुतण्या व कृष्णंभटाचा मुलगा. ६ मिरज काबीज केल्यावर पटवर्धनांचा कर्नाटकांत जहागिरीचा मुलूख होता तो दादासाहेबानीं गोपाळराव गणेश बर्वे यास जहागीर दिला. तो ताब्यांत घेण्यासाठीं गोपाळराव बर्व्यानें आपले दोघे बंधु कृष्णराव व लक्ष्मणपंत यांस फौजेसह तिकडे पाठवून दिलें. त्या दोघां पैकीं कृष्णराव लवकरच परत आला. लक्ष्मणपंतानें कुंदगोळ व लक्ष्मेश्वर या परगण्यांत जाऊन कांहीं ढवळाढवळ करून पाहिली, परंतु सरंजामाचा मुलूख पटवर्धनांच्या तेथील फौजेशीं लढून ताब्यांत घेण्याचें आपल्या अंगांत सामर्थ्य नाहींसें पाहून तो ही महिन्या दोन महिन्यांतच परत आला. गोपाळराव बर्वे याची कन्या दादासाहेबांस दिली होती. तिचें नांव जानकीबाई. ती वारल्या नंतर दादासाहेबानीं दुसरें लग्न केलें ती स्त्री आनंदीबाई. या विषयीं अधिक खुलासा अंक ४ पृष्ठ १०८ यांतील दुसऱ्या टिपेंत आहे.

श.१६८४ **मोंगलाशीं लढाई** इ.स.१७६३

पेशवे औरंगाबादेस जातात.

मोंगल पुण्याच्या रोखें कूच करितो.

फिरत फिरत जावें. मनोळीकर सामील करून घ्यावे. शिरहट्टी बंकापूरचें सामान (आपलें तेथें आहेच.) श्रीमंत गेले हें त्यांस ठाऊक नाहीं. कळलें म्हणजे अवसान सुटेल. मिरज प्रांतीं ही धाक पडेल. तमाम तेरदाळ, जमाखिंडी, गोकाक, यादवाड, धारवाड, जेथें साधेल तेथें घास दाणे घेत जावें. पोटभरू फौज मिळेल (ती) तमाम गोळा करून बर्वा बुडवावा. शहापूर, यादवाड, संपगांव, देखील अंमल कायम करावा. मोंगली फौज अगर गाडदी निमित्यास मात्र सरदार एखादा बरोबर घ्यावा. हा मनसबा भारी आहे. विचारास येईल तें करावें. हे आशीर्वाद. कुरुंदवाडचा कागद पाठविला आहे. हे आशीर्वाद.

पै॥ छ० १८ साबान फाल्गुन मास.

नं० १९१

[३ मार्च.]

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत फाल्गुन वद्य चतुर्थी गुरुवासर यथास्थित असे विशेष. मंगळवारीं तुम्हीं गेल्यादारभ्य[2] पत्र नाहीं. असें न करावें. रोज बेरोज[3] पत्र पाठवीत जावें. कालीं बुधवारीं सायंकालीं राजश्री गमाजी बावाकडील स्वार व प्यादे माचनुरास[4] गेले कीं ठाणें खालीं करून देणें. आमचे प्यादे व जगदेव पाटील तेथें आहेत त्याणीं जाबसाल केला ज, तुमच्या कागदाशीं आम्हांस गरज नाहीं. आमचे धैणी[5] लष्करांत आ-

१ हें पत्र गोविंद हरीनें गोपाळरावास लिहिलेलें आहे. २ गेल्यापासून. ३ दररोज. ४ माचनूर हें गांव पंढरपुरचें आग्नेयीस पंधरा मैलांवर भीमातीरीं आहे. येथील किल्ला औरंगजेब बादशहानें इ० स० १७०० मध्यें बांधिला. हें माचनूरचें ठाणें निजामअल्लीनें पटवर्धनांस दिलें होतें. पण गमाजी बावा ही त्यावर वारसा सांगत होता. ५ गोपाळराव मोंगलाच्या लष्करांत आहेत.

पेशवे औरंगाबादेस जातात.

मोंगल पुण्याच्या रोखें कूच करितो.

हेत, त्यांची चिट्ठी घेऊन येणें. चिठी नसतां उपाधि कराल तर कार्याची नाहीं. ठाण्यांत कोण आहेत म्हणोन त्या स्वारानीं पुसिलें. जगदेव पाटील आहेत म्हणोन कळतांच दहा वीस प्यादे व स्वार देवळापाशीं राहून माघारे बेगमपुरास[1] सारे गेले. ते समयीं जगदेव पाटील याजकडून माणूस मध्यान रात्री आले तेव्हां [आम्हीं] प्यादे दहा व दारूगोळी लाऊन दिली. आणि सांगितलें जे, " बेजरब जवळी आले तर गोळी चालवावी. मुलाजा न करणें, म्हणोन सांगितलें आहे. आजी ते[2] राहतील किंवा जातील न कळे. बोलिले कीं हलसंगीकडून सामान आणविलें आहे. त्यांस खातरेस आणीत नाहीं. गैर सनदी कजिया कार्याचा नाहीं. सैरकारांतून[3] तुमचें ठीक असलिया त्यांचा मुलाजा करणार नाहीं. उत्तर टाकोटाक पाठविणें. किल्ल्यांत दाणा नाहीं त्याची तरतूद करवितों. त्याणीं बेगमपुर धरिलें, स्वार प्यादे सारे तेथेंच राहिले, (तरी) फिकीर काय ! आमची अक्कलकोटाकडील फौज उद्यां येईल. लष्कर[4] कोणत्या मार्गें जातें, श्रीमंत कोणे ठिकाणीं आहेत, काय वर्तमान, तें वरचेवर लिहीत जाणें. तुम्हीं बहुत सावधपणें रहात जाणें. बहुत काय लिहिणें. शेवग्याच्या शेंगा पंचवीस पाठविल्या आहेत. हे आशीर्वाद. चिरंजीव दौजी[5] आहेत कीं गेले हें लि-

---

१ बेगमपुर हें माचनुरासमीपच भीमातीरीं आहे. येथें औरंगजेब बादशहाची बेगमसाहेब नांवाची एक कन्या मरण पावली. तिचें थडगें या ठिकाणीं अद्यापि आहे. २ माचनुरास आलेले गमाजीचे लोक. ३ मोंगलाच्या दरबारांत. ४ गमाजीबावाकडून माचनूरचें ठाणें घेण्याकरितां आलेल्या लोकांचा. ५ मोंगलाचें लष्कर. ६ गोपाळराव जरी मोंगलास जाऊन मिळाला होता तरी अजून ही पेशव्यांशीं समेट होईल ही मिरज हातची गेल्यावर ही गोविंद हरीस आशा होती व त्या कामीं विंचूरकर व नारो शंकर यानीं मध्यस्थी करण्याचें कबूल केलें होतें. त्यावरून गोविंद हरीनें आपला पुतण्या पुरुषोत्तमराव दाजी यास समेटाचें बोलणें करण्या करितां श्रीमंतांच्या लष्करांत ठेविलें होतें. तो तेथून श्रीमंतांचा कांहीं निरोप घेऊन या वेळीं मोंगलाच्या लष्करांत गोपाळरावाकडे आला होता व गोपाळरावाचा निरोप त्यास आतां श्रीमंतांकडे जाऊन

श.१६८४ **मोंगलाशीं लढाई** इ.स.१७६३

पेशवे औरंगाबादेस जातात.

मोंगल पुण्याच्या रोखें कूच करितो.

हिणें. गेलेच तर राजे बहादर यांस सांगोन ठेवणें कीं [दाजीनीं] श्रीमंतांशीं करार होता कीं आपण फिरोन येऊन भेटून जावें. पायांवर हात ठेविला होता, यास्तव जातात; ह्मणोन सांगोन ठेवावें. चित्तांत विकल्प न मानीत तें करावें. हे आशीर्वाद.

पै॥ छ० २० साबान फाल्गुन मास.

नं० १९२

(४ मार्च.)

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत फाल्गुन वद्य पंचमी भृगुवासर यथास्थित असे. विशेष. मंगळवारापासून तुम्हीं गेल्या तागायत पत्र आलें नाहीं यास्तव चिंता लागली आहे. रोज बेरोज पत्र पाठवीत जाणें. माचनुरास राजश्री गमाजी बावाकडील गोविंदराव नाईक निंबाळकर येऊन कजिया करितात. कालीं सायंकाळीं त्यांचें पत्र आलें तेंच पाठविलें आहे व माचनुराहून ही पत्र आलें तें पाठविलें आहे. आम्हीं साफ लिहिलें आहे कीं " नबाबानें (माचनुरची) जागीर आम्हांस दिली आहे. सनदी पत्रीं कारभार (झाला आहे.) कांसेगांवाखालील माचनूर नव्हे. स्वतंत्र (आहे.) तुम्हीं उठोन जाणें. नसती उपाधि न करणें. " ह्मणोन लिहिलें आहे. अक्कलकोटाकडील फौज अद्यापि आली नाहीं. कळलें पाहिजे. पुढें लष्कर कोणत्या सुमारें जातें, चिरंजीव दाजी गेले कीं नाहींत, तें लिहिणें. अक्कलकोटाकडील फौज कोणत्या मार्गें यावी तें लिहिणें. नागण्याकडील स्वार मुजरद पाठविले आहेत. उत्तर पाठविणें. गमाजीबावाकडील

कळवावयाचा होता तो जाऊं लागला ह्मणजे मोंगलाचा दिवाण विठ्ठल सुंदर राजे बहादर यास पटवर्धनांच्या एकनिष्ठे विषयीं शंका येईल. ती दूर होण्याचा उपाय गोविंद हरी खालील ओळींत सुचवीत आहे. १ पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास.

पेशवे औरंगाबादेस जातात.
मोंगल पुण्याच्या रोखें कूच करितो.

स्वारांस भीत नाहीं परंतु गृहस्थपणामध्यें अंतर पडेल. दरबारीं उभयपक्षीं बोलोन घ्यावें. त्याजकडे दिलें असलें तर स्वल्पासाठीं कलह करावा असा नाहीं. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

पै॥ छ० २१ साबान फाल्गुन मास.

नं० १९३

(४ मार्च.)

श्री.

वडिलांचे सेवेशीं साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील वर्तमान तागायत फाल्गुन वद्य पंचमी मु० औरंगाबाद. वर्तमान यथास्थित असे. विशेष. मौजे येडूराहून निघाले ते मजल दर मजल सालप्याच्या घांटें चवदावे मजलीस येथें पोहोंचलों. [श्रीमंत] तुमचा रोंख चुकाऊन मजल दर मजल वऱ्हाडांत जातात. ऐसा रोंख आहे. मजली बारा बारा चवदा चवदा कोसांच्या करितात. तोफखाना व डेरे दोन ऐसे मिरजेस ठेविले. बरोबर साऱ्या तोफा दहा घेतल्या आहेत. तुमचा रोंख चुकविला कां म्हणाल तर, जानोजी भोंसले निजामअल्लीस भेटले, तुम्हीं सर्वत्र एकत्र होऊन मराठी फौज पंचेचाळीस हजार फौजेची आवई. शिवाय मोंगल. आणि बिघाडाचें वर्तमान आलें, व दोन मजली माघारे आलां, ऐसी बातमी यांस येतांच फौजा बहुतच गडबडल्या होत्या. यास्तव यार्णी मनसबा ऐसा केला कीं, आम्हीं

१ पत्र कोणी लिहिलें हें कळत नाहीं. पण लिहिणारा पटवर्धनांचा कोणी आप्त व पूर्वी त्यांच्या नोकरींत असलेला कोणी कारकून असावा. यानें हें पेशव्यांच्या लष्करांतून मोंगलाच्या लष्करांत गोपाळराव होता त्यास पत्र लिहिलें असून यांत त्यानें श्रीमंत मिरज नजीक येडूर मांजरी येथून निघून औरंगाबादेस जात पर्यंत काय काय वर्तमान झालें, औरंगाबादेस गेल्यावर तेथें काय हकीगत घडली, हें सर्व इत्थंभूत लिहून कळविलें आहे. लिहिणारा सखारामबापूचा द्वेषी होता हें त्याच्या लिहिण्यावरून दिसून येईलच.

श.१६८४ **मोंगलाशीं लढाई** इ.स.१७६३

पेशवे औरंगाबादेस जातात.
मोंगल पुण्याच्या रोखें कूच करितो.

त्याजवर चालोन जातों तर फौज बेदि[1]ल, खर्चास नाहीं, परिणाम लागणार नाहीं, लोक पळतील, ऐसें पुरतें समजोन आपलाच बेजरब मुलूख लुटीत तोंड चुकाऊन इकडे वऱ्हाड प्रांतें चालले. या मनसब्याचा मजकूर म्हणाल तर त्यांच्या[2] या मुलुखांत जाऊन जानोजीबाबांचा मुलूख लुटावा म्हणजे ते[3] सहजच उठोन येतील. अथवा सारेच तुम्हीं मोंगल सुद्रां पाठीवर आलेत तर नी धामधूम होणें ती त्यांच्याच मुलूखांत होईल. इतक्यास्तव मजल दर मजल भारी[4] मजली करून येथपर्यंत आलों. थोडे बहुत सेडे आहेत. पंधरा वीस हजार फौजेस निरोप दिल्हा. आपआपले घरीं माणसें पळवावया करितां गेले आहेत. ते ही चहूं रोजीं आठा रोजीं येतील. येथें फौज तीस पंसतीस हजार पावेतों आहे. शिवाय तीन हजार गार्दी. रामचंद्र जाधवराव रहिमतपुरावर मागें राहिला होता. कां म्हणाल तर त्याच्या तोफा लांब मजली मुळें चालत ना; म्हणून मागें राहिला होता. त्याणें मागें धामधूम बहुत मांडली होती. गांव रोखोन खंडणी घेत होता. रहिमतपुरा पासून आठ हजार रुपये घेतले. फलटणास आला. तेथें मुधोजीनाईक[5] या जवळून दहा हजार घेतले. वरकड गांव पाहोन हजार दोन हजार पांचशें सातशें घेत येथ पर्यंत आला. आज येथें औरंगाबादेस लष्करास येऊन

---

१ बिथरलेली. २ मोंगलाच्या. ३ जानोजी भोंसल्याचा मुलूख लुटूं लागलों म्हणजे तो त्याचें रक्षण करण्या करितां आपोआप वऱ्हाडाकडे येईल. ४ लांब लांब. ५ मोंगल पुण्यावर चालून येत आहे ही बातमी पेशव्यांच्या लष्करांत कळतांच त्या प्रांतींचे लोक सैन्यांत होते त्याणीं आपआपलीं माणसें सुरक्षित स्थळीं पोंचविण्यासाठीं घरीं जाऊन येण्यास परवानगी मागितली. ६ नं० १८३ चें पत्र खुद्द पेशव्यानीं लिहिलें आहे त्यांत फौजेचा अजमास पंचेचाळीस पन्नास हजारांचा केलेला आहे. प्रस्तुतचे पत्रांत पसतीस हजार फौज लिहिली आहे ही व घरीं गेलेली पंधरा हजार मिळून पेशव्यांच्या लिहिण्या प्रमाणें पन्नास हजार फौज झालीच. ७ मुधोजीनाईक निंबाळकर हा फलटणचा जहागिरदार. याचा बाप जानोजीनाईक इ. स. १७४८ त वारला तेव्हां याजकडे जहागीर आली. हा इ. स. १७६५ त मरण पावला.

श.१६८४ **मोंगलाशीं लढाई** इ.स.१७६३

पेशवे औरंगाबादेस जातात.

मोंगल पुण्याच्या रोखें कूच करितो.

पोंहचला. मल्हारजी होळकर यांस आणावयास हरी रघुनाथ भिडे व पांडुरंग कृष्ण गडबोले पाठविले आहेत. त्यास मल्हारबा चांदवडाहून दोन तीन मजली माघारा आला. त्याची फौज आठ दहा हजार आहे म्हणून आवई आहे त्यास इतकी नाहीं. चार हजार पावेतों आहे. पांच सात रोजीं

---

१ हरीपंत भिडे हा दादासाहेबांच्या मर्जीतला शूर शिपाई होता. राक्षसभुवनचे लढाईंत याचा एक हात तुटला. इ. स. १७६७ त दादासाहेबानीं ग्वाल्हेर प्रांतीं गोहदेस वेढा बसविला होता. त्या किल्ल्यावर सारे सरदार नको नको म्हणत असतां दादासाहेबानीं आग्रहानें हल्ला करविला तेव्हां किल्लेकऱ्यानीं हल्ला परतवून मराठ्यांचे शेंकडों लोक मारिले. त्या हल्ल्यांत हा हरीपंत भिडे प्रमुख होता. नारायणराव पेशव्यांचा खून झाल्या नंतर पेशवाई दादासाहेबांस मिळाली तेव्हां त्यांच्या कारभारांत हरीपंत प्रमुख असे. पुढें बारभाईनीं दादासाहेबांस पदच्युत केलें तेव्हां ते इंग्रजांच्या आश्रयास गेले. पुढें इंग्रज व दादासाहेब एक होऊन गुजराथेंत त्यांचीं पेशव्यांच्या (सवाई रावसाहेबांच्या) सैन्याचीं युद्धें झालीं. त्यांत नापारचे युद्धांत इंग्रजांचा पराजय व फार नासाडी झाली असें मराठे सरदार लिहितात. हा पराजय होण्यास कारण हरीपंत भिडे याचा शत्रूकडे फितूर हें होय असें समजून इंग्रजानीं त्यास त्याच जागीं ठार मारिलें. त्या युद्धांत हरीपंत फडके हे पेशव्यांकडील फौजेवर मुख्य सरदार होते व त्यांच्या हाता खालीं इतर सरदार व पटवर्धनां पैकीं वामनराव, परशुरामभाऊ, व रघुनाथ राव हे सरदार होते. वामनरावानें नापारच्या लढाईची जी हकीगत एका पत्रांत लिहिली आहे तींत हरीपंत भिड्याच्या मरणा संबंधें येणें प्रमाणें मजकूर आहे—" हरीपंत भिडे श्रीमंतांकडील यास इंग्रजानीं जिवें मारिलें. याचें कारण—इंग्रजांची कैद अशी कीं, श्रीमंतांकडील [दादासाहेबांकडील] स्वारानीं तमाम झाडपाल्याचे तुरे लावावे, म्हणजे आपले ओळखीचे अशी खूण करावी म्हणून सांगितलें होतें. लढाईचे दिवशीं इंग्रजांजवळ हरीपंत भिडे पहावयासाठीं आले तों आम्हांकडील स्वारांनीं झाडपाल्याचे तुरे लाऊन इंग्रजांच्या फौजेंत शिरले. तो इंग्रजानीं हरिपंतास हे स्वार कोणाचे म्हणून पुशिलें, तेव्हां हे स्वार आपलेच असतील असें बोलले. तों आमचे स्वारानीं जाऊन इंग्रजांस मारिलें. तेव्हां हरीपंतानींच दगाबाजी केली म्हणोन श्रीमंत दादासाहेब यांस सांगून त्यांचे रुबरू इंग्रजानीं श्रीमंतांची रदबदल न ऐकतां हरीपंत भिडे यास जिवें मारिलें. " नापारच्या लढाईंत आपला पराजय झाला ही गोष्ट इंग्रज मुळींच कबूल करीत नाहींत. वामनराव व परशुरामभाऊ व रघुनाथराव तर आपणास जय मि-

श.१६८४ **मोंगलाशीं लढाई** इ.स.१७६३

पेशवे औरंगाबादेस जातात.
मोंगल पुण्याच्या रोखें कूच करितो.

सुभेदार[1] येऊन पोहोंचतील. त्रिंबकराव[2] शिवदेव यांस आजीच हजार फौजेनिशीं सौभाग्यवती आनंदीबाईस श्रीत्रिंबकेश्वरास पोंहचवावयासीं पाठविले आहेत. त्यांस श्रीत्रिंबकेश्वरास पोंहचविलें म्हणजे ते टोकें औरंगाबाद इतक्यांत राहतील. लष्करांत येणार नाहींत. त्यांस ऐसींच आज्ञा आहे. सदाशिव रामचंद्र निरोप घेऊन दौंडेस फौज सुध्धां गेले आहेत. ते ही अद्यापि

ळाल्याचें स्पष्ट लिहितात. याचा निकाल दोंहीं पक्षींचीं साधक बाधक प्रमाणें पाहून केला पाहिजे व तो करण्याचें हें स्थळ नव्हे. इ. स. १७७५ सालचीं पत्रें छापूं त्या वेळीं नापारचे लढाई विषयीं लिहावयाचें तें लिहूं. हरीपंत भिड्याविषयीं इंग्रज असें लिहितात कीं, तो शत्रूकडे फितुरी झाला होता व आमच्या सैन्याच्या एका टोळीस मारण्या करितां तो शत्रूस उघडपणें उत्तेजन देत होता. त्याच्या दगलबाजीमुळें आमच्या सैन्याचा व राघोबादादाकडील सिंधी व आरब यांचा नाश बहुत झाला. त्याच्या दगलबाजी बद्दल त्यास शिक्षा झाली ती ही योग्य झाली. ती अशी कीं, आमच्या ग्रेनेडियर शिपायां पैकीं एकानें त्यास घोड्यावरून ओढिलें व आरबानीं त्याचे तुकडे तुकडे केले.

१ सुभेदार मल्हारराव होळकर. २ त्रिंबकराव शिवदेव ओढेकर [ओरीकर]. ओढेकरांच्या घराण्याची हकीगत अशी आहे कीं, या घराण्याचा मूळ पुरुष शिवाजी शंकर. हा चांदवडच्या डोंगरांच्या ओळींच्या अगदीं पूर्वेच्या टोंकास रोहेडा म्हणून गांव आहे तेथील राहणारा होता. हा आपल्या योग्यतेनें वाढत वाढत यशवंतराव पंवाराचा व नंतर कांहीं दिवसानीं मल्हारराव होळकराचा दिवाण झाला. याजकडे पेशवे सरकारची एक पागा ही होती. पहिल्या बाजीरावाच्या हाताखालीं यानें हिंदुस्थानांत पुष्कळ कामगिऱ्या बजाविल्या. शिवाजी शंकर यास तीन मुलगे. पैकीं पहिला रंगराव हा पहिले बाजीरावाच्या कारकीर्दीत गोहद येथें लढाईत पडला. दुसरा त्रिंबकराव यास दादासाहेबानीं हिंदुस्थानांत साडेसात लाखांची जहागीर दिली होती. यानें राक्षसभुवनचे युद्धांत मोठा पराक्रम केला म्हणून त्याजकडे माधवराव पेशव्यानें ही ती जहागीर कायम केली. त्रिंबकराव मरण पावल्यावर तिसरा भाऊ माधवराव यास पवाराची दिवाणगिरी मिळाली. परंतु आतां या घराण्याकडे वर सांगितलेली जहागीर किंवा दिवाणगिरी या पैकीं कांहीं चालत नाहीं. नाशिकाजवळ ओरी म्हणून चार हजार रुपये उत्पन्नाचा एक गांव आहे तो मात्र यांजकडे अद्यापि इनाम चालत आहे.

श.१६८४ **मोंगलाशीं लढाई** इ.स.१७६३

पेशवे औरंगाबादेस जातात.

मोंगल पुण्याच्या रोखें कूच करितो.

आले नाहींत. मल्हार भिकाजी[2] रास्ते व त्रिंबक खंडेराव व नरसिंगराव[3] पागे. वगैरे किरकोळ मिळून फौज पांच सात हजार व चार तोफा ऐसे बागलकोटाकडे आहेत. औरंगाबादेस फाल्गुन वद्य पंचमीस भृगुवारीं आलों. एका कोसाअलीकडे आंबराईंत राहिलों. मुरादखानाकडून[4] एक कारकून तुम्हांकडील वर्तमान सांगावया करितां आला आहे. त्यास दोन चार दिवस झाले. निंबाळकराचें[5] व शहाजी सुभेदार यांचें सूत्र यांजकडे आलें आहे. काय असेल तें देव जाणे! परंतु मुसाफरखाना[6] सारखें अगर काय असेल तें तुम्हीं अंदेशा ध्यानांत करून त्याचा बंदोबस्त यथास्थित करावा. तुम्हीं जातीनें बहुत खबरदार रहावें. हे[7] लबाडी करावयासी येथून व तेथून ही गृहस्थ चुकावयाचे नाहींत. सर्कारनामकाचा[8] तुम्हांवर अंतर्यामीं क्रोध बहुतच आहे. तुम्हीं चौकशीस न चुकावें. मग जें होणें तें ईश्वर सत्तेनें होईल. यांत गुंता नाहीं. यांणीं[9] तुह्मां त्रिंबकगोंकडेस[10] फितुराचें सूत्र लाविलें आहे व नबाबाकडेस ही अंतस्थ सूत्र फितुराचें लाविलें आहे. जें

---

१ रामचंद्र बावा शेणवी ह्मणून बाजीराव बल्लाळ व बाळाजीराव यांचे कारकीर्दीत एक मुत्सद्दी व सरदार होता. त्याचा हा सदाशिव रामचंद्र मुलगा. हा मनुष्य विशेष कर्तृत्वाचा होता असें दिसत नाहीं. हल्लीं हा पेशव्यांच्या लष्करांतून आला होता तो तिकडे परत न जातां मोंगलाकडे गेला. २ मल्हार भिकाजी हा गोपिकाबाईचा बंधु व पेशव्यांचा मामा. त्रिंबक खंडेराव हा कोण हें कळत नाहीं. ३ हा नरसिंगराव धायगुडे नव्हे. हा निराळाच नरसिंगराव उद्धव ह्मणून सरदार होता. ४ मुरादखान हा दादासाहेब व सखारामबापू यांचा मित्र असल्यामुळें त्याचा प्रतिस्पर्धी विठ्ठल सुंदर याच्या मसलती काय आहेत, भोंसले काय ह्मणतात, पटवर्धनांचा रोख कसा आहे, नबाबाच्या मनांत काय हेतु आहेत या बातम्या देण्या करितां त्यानें पेशव्यांकडे कारकून पाठविला होता! ५ जानोजी निंबाळकर व शहाजी सुपेकर हे मोंगलाचे सरदार. यांचे मनांत आपल्या धन्यास दगा देऊन पेशव्यांकडे यावयाचें होतें. ६ पेशव्यांकडे. ७ मुसाफरखान कोण? मुजफरखान ह्मणून पूर्वीच्या पेशव्यांच्या गारद्यांचा एक सरदार होता तो तर नव्हे? ८ तर्क. ९।१० सखारामबापू. ११ सखारामबाप वगैरे मुत्सद्यानीं. १२ भोंसले, प्रतिनिधि व पटवर्धन.

श.१६८१ **मोंगलाशीं लढाई** इ.स.१७६३

पेशवे औरंगाबादेस जातात.

मोंगल पुण्याच्या रोखें कूच करितो.

घडतो घडेल तें खरें. परंतु मोंगलास हाताखालीं घेऊन तुह्मां त्रिवर्गास बुडवावें अगर तुह्मां त्रिवर्गास हाताखालीं घेऊन मोंगलास बुडवावें ऐसा कावा आहे. यास आपण व मोंगल ऐसे एकचित्तें रहावें आणि यांचें पारिपत्य करावें. आपला डाव उगवून घ्यावा. ज्याचें म्हणवावें त्याचा पार लावावा. हें इतकें कां लिहिलें म्हणाल तर, सकार नामकाचे डेऱ्यांत आम्हीं जात असतों. तेथें तुह्मां त्रिवर्गास जें बोलों नये तें बोलतात. तें आम्हीं ऐकिलें म्हणजे आमच्या अंगाची आग होते. तुळाजी आंग्रे याणें तेज्जातीचा द्वेष करीत आला होता तैसा येथें प्रकार आहे. वरकड कित्येक भाषणें व कितेक गोष्टी आहेत त्या पत्रीं लिहितां पुरवत नाहीं ! ईश्वरें भेट तुमचीं आमची केली तर सर्व विदित होईल. यांस स्वर्ग दोन बोटें राहिला आहे. या गोष्टी वेड्या, कागदीं लिहू नयेत, परंतु आपणास कळाव्या यास्तव लिहिल्या आहेत. यांचेंच हित केल्यानें हेच मोक्षास नेतात आणि मोंगलाचें हित केल्यास मोक्ष नाहीं ऐसा पदार्थ नाहीं. ईश्वरोचे घरीं ब्राह्मण, हिंदु, मुसलमान, म्हार सर्व ब्रम्हीं एकच आहेत हें आपणास टाऊकच आहे. परंतु जी [बाजू] धरली ती तडीस न्यावी. यार्णी आपल्या मुलुखाची आस्था सोडिली. कां म्हणाल तर तुह्मां समूर आल्यानें परिणाम लागणार नाहीं. यास तुमचा सातारियाकडे जावयाचा मनसबा असला तर तिकडे न जावें. तसा ही मध्यें राजाचे वकिलाचा कांहीं तुम्हांकडे फितूर असल्य तर दहा हजार फौज व तुमचे नारायणराव अगर कोणी शहाणा

---

१ तुळाजी आंग्रे हा चित्तपावनांचा फार द्वेष करीत असे. याच कारितां नानासाहेब पेशव्यानीं त्याची जहागीर घेऊन त्यास कारागृहांत घातलें. २ चितपावनांचा 'तज्जाती' शब्दांतील सर्वनाम पत्र लिहिणारानें त्याचा अर्थ न समजतां घातलें आहे. ३ सखारामबापू. ४ पेशव्यांचें. ५ ही उक्ति इतरत्र थोर मनाच्या मनुष्यास साजेल अशीच आहे. पण या ठिकाणीं तिचा किती दुरुपयोग केला आहे ! ६ सातारकर महाराजांच्या.

श.१६८४ मोंगलाशीं लढाई इ.स.१७६३

पेशवे औरंगाबादेस जातांत

मोंगल पुण्याच्या रोखें कूच करीत.

माणूस बरोबर पांच सात तोफा देऊन तिकडेस पाठवावे. ह्मणजे तिकडी फितूर असला तर तें कार्य होईल. आणखी वाईप्रांत, पुणेप्रांत, कऱ्हाडप्रांत जुन्नरप्रांत, वगैरे कितेक महाल आहेत तेथील जप्त करून ऐशामध्यें—यांचा तिकडे कोणी नाहीं तों—बीस पंचवीस लक्ष मेद त्वयाचे दिवस आहेत. यांचा तिकडे एव्हां शह पोंचणार नाहीं. तुम्हीं एगबा सुद्धां यांचे पाठीवर यावें ह्मणजे न झुजतां सहजच उधळोन जातात वप्रस्तुत. तुमचे आवईचा धोशा असाच आहे. तुमची गांठ पडेल ते दिवशी तुम्हीं उत्तरेकडून झुंजास तोंड लावावें. ही अवधी कोठ पर्यंत म्हणाल तर वर्ष प्रतिपदा पर्यंत आहे. निदान अखेर चैत्रमास पर्यंत गांठ पडली तर तुमची यांची. पर तुम्हीं यांचे पाठीवरच यावें. तिकडील जो जो तंचे चित्तांत बंदोबस्त करावयाचा असेल तो दहा हजार फौजेनें होईल तशा ही मध्यें आप मनसब्यास जें उत्तम दिसेल तें करावें. जाधवराव मल्हारजी होळकर कितेक मायेचे कागद जबाब करून आपले पासि येतील तर पाठ आणि मायेंत गोंवून ठेवावे. त्यांस माया दाविली तर उभयतां मा येतील. (या) फौजेंत महिन्यामध्यें चौरोजां एक अगर दोन दंगे होत तमाम मुलुख लुटून खातात. गांव देखील मारिलेत. कोणी मनास ए नाहीं ! तुम्हीं तिकडील निंबदेहरे वगैरे घांट अहेत ते घरून मागें करून पैका मिळविल्या कोणी पुसणार नाहीं ! आतांशी रात्रीस जार फौज घेऊन दोनशें बाण घेऊन बातमी न लावतां या लष्क वई केली तर येथें कोणी धर धरणार नाहीं ! ऐसा आंव गेला अ भय दोन जागां आहे, ह्मणून मात्र भयानें वसलेले आहेत. तुम केल्यानें हे रात्रीसच पळोन जातील ! तुम्हीं दिवसाचे चालोन नबाब सुद्धां यावें. ऐसें ही करितां चार पांच कोसांवर झपाटा

१ निंबदेहऱ्याचा घांट नगराजवळ आहे. २ अवसान.

श.१६८४ मोंगलाशीं लढाई इ.स.१७६१

पेशवे औरंगाबादेस जातात.

मोल पुण्याच्या रोखें कूच करितो.

त्यास चिंता नाहीं. त्यानें माघारें फिरवत नाहीं. तुम्हीं उभयतां मिळून मराठी फौज घेऊन गा ने घालावी. पुढें येणें तेव्हां नबाब पाठीमागें दोन कोसांवर घेऊन यावें. म्हणजे हे तूर्त तोंड देणार नाहींत. हल्लीं छाप्याचा लाग थोर आहे, परंतु तुम्हीं लांब आहां (तुमच्यानें छापा घालवावयाचा नाहीं.) येथें बातमी फ दोन रोजांनीं येत असते. काल षष्टीची बातमी आली कीं, " पंढरपुरार आले " ऐसी होती. व आज सप्तमीस बातमीस आली कीं, " नागतळावर आले " ऐसी (बातमी घेऊन) सांड संध्याकाळीं रविवारीं आली. मुरादखान व निंबाळकर यांच्या बातम्या येत असतात. जानोजी भोंसले व निंबाळकर या उभयतांकडील येथें वकील आला आहे म्हणोन ऐकिलें त्यास तुम्हीं तेथें बारीक शोध करून भोंसल्याचें चित्त कांहीं इकडे असेल तर त्यास मायेत घेऊन ठीक बंदोबस्त करावा. विठ्ठल सुंदर यांचा हे वकील येथें आला आहे म्हणून ऐकिलें. त्यास म्हीं शोध करावा. सारांश तुम्हीं व पिराजी नाईक व भोंसले व गमाजी मावा, नबाब व विठ्ठल सुंदर इतक्यांचें एक चित्त राहील तें लक्ष असों द्यावें, म्हणजे जे गोष्टी वक्तांत धराल ते जाहली ऐसेंच समजावें. ही गोष्ट ऐसे तुम्हीं बोलोन दाखवावी. मामाची भीड राखत होतेत तैसी त्यांची भीड राखावी. परंतु एकाचित्त असल्यास [बोलावें.] पुरुषोत्तमरायाजवळ कितेक गोष्टी बोलिले आहेत, त्यास येथें मागें ते गेल्यानंतर बोलतात ज्याची * * याचाच * * करून पाठविला आहे ! ' या याचा भाव कसा आहे तो सहजच कळेल ! वरकड औरंगाबादेचें

---

१ भोंसले व पटवर्धन. २ दिवाण विठ्ठल सुंदर राजेबहादर यास. ३ ' पूर्वी व मामा कारभारी होते, तेव्हां तुम्हीं त्यांची भीड राखीत होतां, तुम्हांस काय चें तें स्पष्टपणें बोलून दाखवीत नव्हतां, तर आतां विठ्ठल सुंदराची भीड बा- त्र प्रमाणें बोलण्या चालण्यांत त्याशीं संकोचवृत्ति धरूं नका. ' असा लिहि- पेप्राय. ४ सखारामबापू बोलले आहेत.

श. १६८४ मोंगलाशीं लढाई इ.स. १७६३

पेशवे औरंगाबादेस जातात.

मोंगल पुण्याच्या रोखें कूच करितो.

वर्तमान तर, रविवारीं सप्तमीस प्रातःकाळीं तमाम फौजा तयार करून शहर घ्यावयास गेले. त्यास बाहेरील पुरे तमाम लुटिले. शहराच्या कोटास चार तोफा लागू केल्या होत्या व शिड्या ही दोन चार लाविल्या होत्या. परंतु त्याणीं हल्ला मारून काढिली. त्यास हे फिरोन हल्ला करीत होते. इतक्यांत आंतून वकील येऊन दोन लक्ष रुपये द्यावे ऐसा करार झाला. तुमची नागतळ्याची बातमी आली, त्याजवरून उदयीक इंदुवार अष्टमी प्रातःकाळीं कूच करून फुलमरीस जाणार. अगर इंदुवारचा मुक्काम एका वाव्यानें झाला तर होईल. इंदुवारचा मुक्काम जाहल्यास भौमवारचा कूच होईल यांत संशय नाहीं. बाबूराव फडणीस औरंगाबादेच्या दंग्याअगोदर दौलताबादेस गेले. त्यास श्रीमंत माधवराव दौलताबाद पहावयासीं गेले, तेव्हां नमस्कार

---

१ दादासाहेब व सखारामबापू यांचें हल्लीं जें वर्चस्व झालें होतें तें ह ण्यापूर्वी बाबूराव फडणीस, त्रिंबकराव मामा पेठे व गोपाळराव पटवर्धन यांच्या स मसलतीनें पेशव्यांचा राज्य कारभार चालला होता व या तिघांवर त्यांचा पूर्ण इत व प्रेम होतें. पुढें सखारामबापूनें कारस्थानें लढवून व लढाई पर्यंत प्रसंग आणून ः पणास पुनः दिवाणगिरी देण्याचें पेशव्यांस भाग पाडलें. नंतर त्यानें गोपाळरावापार मिरज घेऊन व त्याची जहागीर जप्त करून त्यास राज्यांतून हांकून लाविलें व बाबू व त्रिंबकराव मामा यांस ही निर्माल्यवत् करून सोडिलें. अशी स्थिति झाल्यावर व्यानीं बाबूराव व त्रिंबकराव यांशीं पूर्वी आपलें वर्तन कसें होतें हें स्मरून आतां स गौरवानें वागवावें, त्यांची यथायोग्य विचारपूस करावी, कारभारांत त्यांची ही मसलत घेत जावी, असें हें पत्र लिहिणाराचें मत आहे, व त्रिंबकरावास लव जाण्यास पेशव्यानीं निरोप दिला व बाबूरावाची दौलताबादेस गांठ पडली, ते चा नमस्कार घेणें व त्यास निरोपाचा विडा देणें या पलीकडे त्याचा सन्मा कांहीं केला नाहीं, यामुळें त्यांस दोष देण्याकडे हें पत्र लिहिणाराचा कटाक्ष ः मोंगलाचा पक्ष सोडून तुम्हीं इकडे याल तर तुमची ही इतपतच विचारपू असें ही तो गोपाळरावास हळूच सुचवीत आहे असें वाटतें. आह्मांस तर या गोष्टींत पेशव्यांस दोष देण्या जोगें कांहीं एक नसून यां वरून त्यांच्या र त्यंत प्रौढपणा व खरा मुत्सद्दीपणा मात्र निदर्शनास येतो. वरील पत्र लि मता प्रमाणें ते चालते तर राज्यांत नवीन नवीन बखेडे व तंटे उपस्थित

पे. वे औरंगाबादेस जातात.
मोंगलें पुण्याच्या रोखें कूच करितो.

व झाला. कांहीं बोलणें चालणें झालें नाहीं. विडे मात्र घेऊन आले. व्यंकराव मामा यांस मिरजेचे मुक्कामाहून निरोप झाला. त्यास ते प्रस्तुत माहुलीस आहेत. मुख्यस्थानीं मकारनामकाकडे कांहीं तुमचें सूत्र असलें, त्यानीं माया तुम्हांकडे असली, तर एक खुणेची चिठी मकारनामकास आमच्या लाखोट्यांत पाठवावी—"जे तुम्हांकडेस हरएक गोष्ट पोंहचवणें व हरएक गोष्ट बारीक मोठी सुचना करणें तें माझे नांवें लिहून यां जवळ रात जावी. म्हणजे आम्हांस पोंहचेल." मर्जीस आली तर ऐशी चिठी मामचे लाखोट्यांत लेहून पाठवावी म्हणजे आम्हीं नेऊन देऊं. चौकशी-शीं चिंता न करावी. तुम्हांकडे सूत्र गेलें आहे. त्यास त्रिवर्गाचा मजराठीक इकडे होत असला तर पुरता बंदोबस्त करून घेऊन नवाबाचें घर राखोन आपल्याकडे बदनक्ष न येईल ते गोष्ट करावी. आणि ज-

---

साम पेशवाई लयास जाऊन मोंगलाई झाली असती ! हें अरिष्ट टाळण्याचें सामर्थ्य रामबाबूंत होतें. या वेळची सारी बाणी त्याच्या हातीं होती. त्यानें आपल्या पलोकांचे केलेले अपमान हे आपलेच अपमान हें पेशव्यांस वाटणें जर साहजीक तर पदोपदीं असे अपमान सहन करून आत्मसंयमन करणें हें त्या सारख्या ताभावाच्या मनुष्यास किती अवघड होतें ! परंतु तें सर्व सोसून 'सुसरीबाई तुपाठ मऊ' असें म्हणत म्हणत ते या संकटांतून पार पडले ! पुढें जेव्हां योग्य ाला तेव्हां ते आपल्या पक्षाच्या लोकांस विसरले नाहींत. बाबूराव फडणिसाप मोरोबादादा यास त्यानीं दिवाणगिरी दिली होती. व नाना फडणिसावर राभार सोंपविला होता म्हटलें तरी चालेल. त्यानीं गोपाळरावास सत्तावीस हागीर दिली. कर्नाटकांतील आपल्या हयातींतल्या शेवटच्या स्वारीचें काम ाकराव मामावर सोपविलें होतें व त्या योगानें त्याचें नांव मराठी इतिहासांत झालें आहे.

मल्हारराव होळकराकडे. २ हा वर सांगितलेल्या खुणेच्या चिठीचा मसुयाच्या लष्करांत काय चाललें आहे याची चौकशी करून तुह्मांस बातमी ४ समेट करून घेण्या विषयींचा इशारा. ५ भोंसले, प्रतिनिधि व तुम्हीं मना प्रमाणें पेशवे तुमची सोय करून देत असतील तर. ६ अपकीर्ति

श. १६८४ मोंगलाशीं लढाई इ.स. १७६३

पेशवे औरंगाबादेस जातात.

मोंगल पुण्याच्या रोखें कूच करितो.

हागीर व पहाडी एक दोन किल्ले हाताखालीं आधीं घालून घ्यावे. म इकडे यावें. परंतु यांचें सूत्र असल्यास, निश्चय पुरल्यास यावें. केवळ कर्चे अर्थ धरावा ऐसा ही पदार्थ नाहीं. यांत समजावें. आपणाकडील बारीक मोठे वर्तमानाचे चुटके लिहून पाठवावे. मी स्वामींचे पदरचा आहें. बहुत काय लिहिणें. बहुत लिहिलें आहे म्हणून रागास न यावें. लोभाची वृद्धि दिवसें दिवस अधिकोत्तर करावी. हे विज्ञापना. मिती वद्य अष्टमी इंदु वासर प्रातःकाळ. दोन बंद तपशीलवार वाचून आपणच पहावे. दुसऱ्या स न दाखवावे. दोन बंद लिहिले आहेत. परंतु आपण एक घटिका वे करून अक्षरशहा वाचून पहावे. फार लिहिलें म्हणोन, वाचावयाचा आळ न करावा. मागें कृपा करून पत्र पाठविलें तें पावलें. आतां ही उत्तर ए ठवावें. शहरास (यानीं) उपद्रव दिला हा मुरादखानाकडून अर्थ दि ऐसा अर्थ आहे. सत्य मिथ्या ईश्वर जाणें ! याणीं शहरास उपद्रव दि म्हणोन नबाब रागें येऊन पुण्यास उपद्रव लांकडास मात्र देतील, ते गोष्ट थोर लोकांस योग्य नाहीं ऐसें समजावें. राग शमे तो अर्थ क याँणीं आपलें उचित होतें तें केलें. हे विज्ञापना.

---

१ खात्री पटल्यास. २ मोंगलाचा पक्ष सोडावयाचाच नाहीं असा धरणें. ३ यावरून हें पत्र लिहिणारानें पत्रास फाल्गुन वद्य पंचमीस प्रारंभ अष्टमीस संपविलें हें सिद्ध झालेंच. ४ औरंगाबादेस. पेशवाईत कित्येक शब्द अगदीं ठरीव झाला होता. जसें, ' शहर '=औरंगाबाद. ' सरदार ' विशेषें भयतां सरदार ' = शिंदे होळकर. ' पट्टण ' = श्रीरंगपट्टण. ' दुर्ग ' = चित्र खक ' ' चित्रगुप्त ' = फडणीस (भानू) ' भोळासांब ' = दादासाहेब. [' संज्ञेत दादासाहेबां बरोबर आनंदीबाईचा ही समावेश होतो हें वाचकानीं ध णावें !] ' सांबाचें गण ' = दादासाहेबांचे शागीर्द. ' सुभेदार ' = मल्ह कर. ' वृद्ध ' ' कपी ' ' जांबुवंत ' = सखारामबापू. ५ ' औरंगाबादेस पे द्रव दिला त्यांत त्यांस त्या शहरचा सुभेदार, मुरादखान याजकडून प असा अभिप्राय. ६ पुण्यांतील वाडे व हवेल्या वगैरे जाळून ! ७ पेश

श.१६८४ **मोंगलाशीं लढाई** इ.स.१७६३

पेशवे औरंगाबादेस जातात.

मोंगल पुण्याच्या रोखें कूच करितो.

नं० १९४

(फाल्गुन वद्य नवमी
८ मार्च.)

श्रीगणपतिर्जयति.

चिरंजीवे राजश्री आबा व समस्त चिरंजीव मंडळीस आशीर्वाद. उपरी म्हीं कालीं सोमवारीं दुधनगांवावरून कूच करून अक्कलकोटा नजीक मुम करून पत्र पाठविलें तें रात्रौ पांच घटिका मध्यें पावलें. बहुत समान झालें. लष्कर यवनाचें श्रीक्षेत्राअलीकडे दोन तीन मुक्काम होतें जी मंगळवारीं कूच होऊन कुरोली (येथें) भीमातीरीं जातील. पांच कोस लष्कर पिछाडी पासून अघाडी पावेतों राहतें. तुम्हीं बुधवारीं लां तरी मध्यें मुक्काम होईल. गुरुवारीं याल अगर शुक्रवारीं याल. मंगळवेढें येथें आहों. चिरंजीवे शुक्रवारीं भेटीस आले सायंकाळीं. हीं प्रातःकाळीं येथें आलों होतों. शनिवारीं येथें राहिले. रविवारीं भोरून लष्करास गेले. अघाडी चिरंजीवास नेमिली आहे. आणखी तेक लोक नेमिले आहेत. श्रीमंत मजल दरमजल भीमापार होऊन गरच्या रोखें गेले. या उपरी हे त्यांचे मागें जातील किंवा काय करतील न कळे! बिघाड परिछिन्न झाला. गमाजीबावा यांणीं सांगोलें, नाझरें, आटपडी, म्हसवड, तमाम नारो शंकर याचा

---

१ हें पत्र गोविंद हरीनें लिहिलेलें. २ मोरोबा आबा. इतर चिरंजीव मंडळी परशुरामभाऊ, कोन्हेरराव वगैरे. ३ गोपाळराव. ४ मोंगलानें लष्करच्या चालण्या विषयीं गोपाळरावाची योजना केली आहे. ५ मोंगल. ६ निस्संसाहेबानीं भवानराव प्रतिनिधीस पदच्युत करून तें पद आपला अल्पवयस्करराव याचे नांवें करून मुतालिकी नारो शंकरास दिली होती. नारोधीच्या जहागिरीवर आपला अंमल बसविला होता तो या प्रसंगीं गमाजीनें पुनः जहागिरींत आपल्या धन्याचा अंमल बसविला.

श.१६८४ **मोंगलाशीं लढाई** इ.स.१७६३

पेशवे औरंगाबादेस जातात.

मोंगल पुण्याच्या रोखें कूच करितो.

अंमल उठवून आपलीं ठाणीं घातलीं. सांगोलें हुजूरपागेकडे होतें परंतु घेतलें. वरकड त्यांचे किल्ले भूषणगड, सदाशिवगड, मच्छिंद्रगड, हे त्यांणीं घेतले होते. लोक जुने होते. निशाणें व दहा दहा माणूस होतें तें उतरोन लाविलें. अंमल आपला केला. बिघाडामुळें तमाम मुलूख गडबडला. श्रीतं तांनीं जाते समयीं लुटालूटी करीतच गेले. तेथें[२] लुटीखेरीज दुसरा प्रकार नाहीं! मिरजेंत लक्ष्मण[३] कोन्हेर ठेविले. तुम्हीं; माणेवरी मुक्काम करावा आमची ही भेट होईल. मुलूख तमाम लुटिला गेला. अदृष्टानुसार वांचे आहे तें नाश नेन्हे[४] इतकें करणें. वरकड सर्व कुटुंबें अक्कलकोटीं राहवावी चारी वाकेल. (?) चिरंजीव सौभाग्यवती कुसाबाई[५] येथें आलीच पाहि ते व सौभाग्यवती यशोदाबाई[६] व वांटवी येसूबाई[७] यांस मात्र घेऊन य त्यांजबराबरील जडजूड[८] आटाळा आहे तेथें ठेवावा. कार्या कारण ये यावें. करकंब, भोसें येथें आमचीं ठाणीं बसलीं. माचनुरांत बसलें. व पाहिजे. तीर्थरूप दादा व आपा तेथेंच राहतील. चिरंजीव लक्ष्मण[९] मात्र राहील. वरकड नेहमीं लष्करास जाणारांनीं यावें. चिरंजीव मा राऊ येथें मंगळवेढ्यांत आम्हांजवळी असतील. तूर्त आम्हीं येथें व पुढें ऋणानुबंधें जेथें चातुर्मास कर्मणा करावयाची नेमणूक होईल ते

---

१ नारो शंकरानें किल्ले घेतले होते तेथें प्रतिनिधीचे जुने गडकरी हे कडे पूर्वी प्रमाणेंच किल्ल्यांची वहिवाट ठेऊन आपलें स्वामित्व स्थापण्या करि किल्ल्यावर आपलें निशाण देऊन दहा दहा असामी मात्र आपल्या लोकांपैं होते. २ पेशव्यांचे लष्करांत. ३ या मनुष्याचें पूर्वी नांव चुकून नारो वे लिहिलें गेलें आहे. ४ न होईल. ५ गोपाळरावाची पहिली बायको वार एका पत्रांत उल्लेख आला आहे. तिची ही कुसाबाई मुलगी. ही पांडवगड रांकडे दिली होती. त्या कोल्टकरांची एक शाखा हल्लीं सांगलीस राहत्ये. बाई ही गोविंद हरीचा द्वितीय पुत्र वामनराव यांची बायको. ७ वाटवे उपाध्ये. त्यांच्या कुटुंबा पैकीं ही येसूबाई. ८ जडजूड म्हणजे दागदागि हीर. आटाळा म्हणजे खटलें. ९ हा लक्ष्मण कोण हें ठाऊक नाहीं.

श.१६८४ **मोंगलाशीं लढाई** इ.स.१७६३

पेशवे औरंगाबादेस जातात.
मोंगल पुण्याच्या रोखें कूच करितो.

चिरंजीव भास्करपंत व विनायक लष्करास चिरंजीवा समागमें गेले तैसच चिरंजीव पुरुषोत्तमराऊ दाजी ही गेले. चिरंजीव तात्या कुरुंदवाडाहून आले ते व चिंतामणी व गणेश सहस्रबुधी ऐसे येथें आहेत. तुम्हां समागमें जातील. आम्हांपाशीं शंभर स्वार नेमून चिरंजीवानीं ठेविले आहेत. हत्ती, उंटें, लष्करचा कारखाना—कापड देखील स्वारी समागमें न्यावयाचे उंट, डेरे, राहुट्या, जाजमें, गालिचे, भांडीं, समया, ज्यांचीं त्यांस पाहिजेत. घेऊन यणें. कुरुंदवाडीं महादाजीपंत आहेत. बंदोबस्ती आहे. कळलें पाहिजे. हे आशीर्वाद.

तुमचें पत्र रात्रीस लष्करांत पाठविलें. दिवस उगवावया जाब यावा तो आला, या मुळें (या पत्राच्या) रवानगीस उशीर झाला.

नं० १९९

[अजमासें फाल्गुन वद्य मार्चाचा प० पंधरवडा]

श्रीगणपतिर्जयति.

वादे उपरी. तुम्हीं भोसले व तांबे यांज बरोबर चिठ्ठी पाठविली ते वर्तमान कळलें. सांगोलें[5] विल्हेस लागलें. राजश्री महादाजीपंत राजश्री गमाजी बावाचें पत्र आलें तेंच पाठविलें आहे. श्रीमंतांचे न रात्रीं निबाजी आला. गुरुवारीं लष्कर गारदौडेवरी गेलें. शुक्रनिघाला. लष्करचा मुक्काम कातराबाद मांडोगणचा नेमिला होता. तरीतून पांचशें स्वार कनिष्टपक्षीं जातो. (श्रीमंत) युद्धाची गांठ

१ पांडुरंगराव तात्या. २ सहस्रबुद्धे. ३ हें पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास. तांबे हीं शिलेदारांची आडनांवें असावीं. ५ सांगोलें हें पेशव्यांच्या हुजूर होतें. तें या वेळीं प्रतिनिधीसाठीं गमाजीबावानें घेतलें. ६ रोज पांचशें कंटाळून पेशव्यांचें लष्कर सोडून जातात.

श. १६८४ **मोंगलाशीं लढाई** इ.स. १७६३

पेशवे औरंगाबादेस जातात.

मोंगल पुण्याच्या रोखें कूच करितो.

पडों देत नाहीं. लष्करांत फितवा. मुख्यैंच गेले तरी आपण हलके पडों यास्तव जातात. पुढें होणार तें भविष्यानुरूप होईल ! परिछिन्न झुजास उभे रहात नाहींत. बारामतींत आबाजी नाईक पांचशें स्वारांनिशीं आहे. वंदनकिल्ल्यावरी[2] त्याची मालियत[3] चढली. जवळी लष्कर[4] आलें म्हणजे ते ही जाणार. करकंब भोसेंकडे रखवालीची बंदोबस्ती करावी. गुरसाळें याचें काय करावें ? वरचेवर वर्तमान लिहीत जावें. चिरंजीव बाळाची रवानगी प्रातःकाळींच करावी. सांगोल्यांत ठाणें कालीच बसलें. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद. राजकी वर्तमान वरचेवर लिहीत जाणें. हे आशीर्वाद कही कसब्यापर्यंत आली. राजमळ्याकडे कोणी आले नाहींत. कासेगांव परगणा सोडून मंगळवेढ्यांचीच कही जाहली ! तेथील ही झालीच असेल हे आशीर्वाद. किल्ले[5] सदाशिवगड, मच्छिंद्रगड, भूषणगड, गमाजीबावाकडे जाले. नारो शंकर यांचे लोक निशाण उतरून लाऊन दिले. हे आशीर्वाद. शाकभाजी सुभानजी बरोबर पाठविली आहे.

---

१ 'सखारामबापू वगैरे मुत्सद्यांचे' मतें लष्कर सोडून जावेंसें आहे, मुख्य दादासाहेब व रावसाहेब पेशवे मुलखगिरीवर गेले व आपण घरीं बसलें आपली प्रतिष्ठा राहणार नाहीं असें समजून ते ही लष्कराबरोबर चालले आ असा अभिप्राय. २ यावरून वंदनकिल्ला बावूजी नाईकाचे ताब्यांत होता हें सिद्ध च. चंदन व वंदन हे सातारा जिल्ह्यांतील प्रसिद्ध किल्ले आहेत. पैकीं वंदन ह आग्नेयीस दहा मैलांवर आहे व चंदन कोरेगांवच्या उत्तरेस पंधरा मैलांव ३ जिनगी. ४ मोंगलाचें लष्कर पुण्याकडे चाललें होतें तें. ५ कासेगांव हा प्र चा तालुका. तेथें मोंगलाची कही [धान्य, वैरण व लांकूड फांटें लुटून आण न्याची टोळी] गेलेलीं गोविंद हरीस चालत्ये. आपल्या मंगळवेढ्यांकडे मात्र पुरवत नाहीं ! ६ हे तिन्ही किले तेव्हां प्रतिनिधीच्या जहागिरी पैकीं होते जिल्ह्यांत आहेत. सदाशिवगड कऱ्हाडचे पूर्वेस तीन मैलांवर आहे. मच्छिं तालुक्यांत व भूषणगड खटाव तालुक्यांत आहे.

पेशवे औरंगाबादेस जातात.
मोंगल पुण्याच्या रोखें कूच करितो.

नं० १९६L

(फाल्गुन वद्य अष्टमी
७ मार्च.)

श्री.

राजश्री रामचंद्र[1] नारायण गोरे गोसावी यांसी.

सुहसन सलास सितैन मया व अलफ. इकडील वर्तमान तीर्थरूप मातुश्री बाई यांचे पत्रीं लिहिलें आहे त्या वरून कळेल. प्रस्तुत मातुश्री बाईची मर्जी कशी आहे तें लिहिणें. आणि तिकडील नवल विशेष वर्तमान आढळत जाईल तें वरचेवर लिहीत जाणें, म्हणून पेशजी तुम्हांस लिहिलेंच होतें. परंतु त्या प्रमाणें तुम्हांकडून पत्र येत नाहीं. तरी सर्वात्मना असें न करणें. वारीक मोठें वृत्त जें आढळत जाईल तें सविस्तर लिहीत जाणें. मोंगलाकडील वृत्त तीर्थरूप मातुश्री बाईचे पत्रीं लिहिलें आहे तें तुम्हीं सविस्तर भाग्यवती मातुश्री काकूबाईस[2] वाचून दाखवणें. आणि तीर्थरूप मातुश्रीच्या मर्जीचा प्रकार तुम्हांस कळत जाईल तो आम्हांस लिहून पाठवीत जा. कागदपत्र पाठवावया आळस सहसा न करीत जाणें. जाणिजे.

छ० २१ साबान.

नं० १९७

(९ मार्च.)

श्रीगणपतिर्जयति.

दिं उपरी. येथील कुशल तागायत फाल्गुन वद्य दशमी बुधवार य-

---

१ रामचंद्र नारायण गोरे हा गोपिकाबाईचा विश्वासू कारकून होता. त्यास खराव पेशव्यानें लिहिलेलें आहे. २ सर्वथा. ३ सदाशिवराव भाऊ साहेब डले त्यांची ही बायको पार्वतीबाई. विशेष माहिती अंक पांचवा पृष्ठ १५१ दावरील टिपेंत पहा. ४ हें पत्र गोविंद हरीनें गोपाळरावास लिहिलेलें आहे

श.१६८४ **मोंगलाशीं लढाई** इ.स.१७६३

पेशवे औरंगाबादेस जातात.

मोंगल पुण्याच्या रोखें कूच करितो.

थास्थित जाणून स्वकीय कुशल लिहीत जाणें. विशेष. सांप्रत आपणाकडील पत्र चार पांच दिवसांत येत नाहीं. हर कोणी येत जाईल त्याज बरोबर पत्र पाठवीत जावें. चिरंजीव मेघश्यामरायाचीं पत्रें लक्ष्मेश्वराहून मुजरद[1] जासूद घेऊन आला आहे त्यावरून कळेल. कुरुंदवाडाहून काली जासूद आला. सर्व यथास्थित आहे. रौस्ते[2] माघारे गेले. नरसिंगराऊ उद्धव चिकोडीकराचे आश्रयानें मुलखांत फिरतो. घोसरवाडावरी[3] होता. तेथून लोंटेवरी[4] गेला. पुढें निपाणीकडे जाणार. राजश्री 'शेषोपंत, भगवंतपंत[5] यांचे खेड्यांचे वाटेस न जाणें' ह्मणून पत्रें त्यांणीं आणिलीं. तैसींच 'एकमनमोर्डीचे[6] वाटेस न जाणें' ह्मणून आणिलीं. परंतु रुपये गांवगन्ना मिळवीत फिरतो. बेरवा[7] सावनूर प्रांतीं होता. तिकडून फिरोन हुबळीकडे आला. तो मजल दरमजल देशास येतो कीं काय पहावा. माणूस सांगतो कीं, मुळगुंदांत ठाणें बसलें होतें तें उठोन गेलें. बेहट्टी हुबळींत आहे. अलीकडे तीं ही सोडून येईल कीं काय पहावें! तिकडील वृत्त चिरंजीवांचे पत्रावरून कळेल. मिरजेंत गृहस्थ[8] आहेत त्याणीं पहिल्यानें कागवाडास[9] रोखा केला होता तो [कागवाडकरानीं] मान्य केला नाहीं.

---

१ तावडतोब. २ रास्ते मल्हार भिकाजी वागलकोटाकडे होते ते. ३ घोरवाड हें कुरुंदवाडा पासून आठ मैलांवर आहे. ४ लाट इचलकरंजी पासून तीन मैलावर. ५ शेषोपंत व भगवंतपंत हे चिकोडी व हुकेरी परगण्यांचे मामलेदार होते. नरसिंगराव उद्धव यांणें आपल्या परगण्यांस उपद्रव न द्यावा ह्मणून त्यानीं पेशव्यांस आज्ञापत्रें आणिलीं. ६ एकमनमोर्डी कोणची? व्यंकणमोर्डी तर नव्हे? व्यंकणमोर्डी बेळगांवा पासून सुमारें बारा मैलांवर आहे. ७ बर्वे लक्ष्मणपंत. बर्व्यांस त्यांनीं जहागीर दादासाहेबानीं दिली होती हें मागें एकदां लिहिलेंच. त्यानीं कांहीं घेतलीं होतीं परंतु तीं सोडून देऊन त्यांस परत यावें लागलें. ८ हुबळी व लोंढा चांगलें बारा कोसांचें अंतर आहे. ९ मेघश्यामराव बापूचे. १० मिरजेचा सुभेदार व मामलेदार लक्ष्मण कोन्हेर. ११ कागवाड हें पटवर्धनांचें ठाणें होतें. श्रीमंतानीं घेतलें असून त्यांस परत दिलें. असें असतां हा लक्ष्मण कोन्हेर

श.१६८४ **मोंगलाशीं लढाई** इ.स.१७६३

पेशवे औरंगाबादेस जातात.

मोंगल पुण्याच्या रोखें कूच करितो.

हल्लीं दुसरा रोखा केला त्याची नक्कल आली ती पाठविली आहे. ते मदांध झाले. कांहीं त्यांस दिसत नाहीं! कागवाड सरकारांत घेतलें (होतें) तें माघारें श्रीमंतांनीं दिलें असतां हे मनमाने तसें लिहितात! ते कांहीं बधत नाहींत! परंतु हे आपलें गृहस्थपण दाखवितात. असो. हे दिवस त्यांचे असेच राहतील असा अर्थ नाहीं! अक्कलकोटी सारीं सुखरूप आहेत. चिरंजीवमंडळी येथून शनिवारीं श्रीक्षेत्रास गेले. आदितवारीं करकंबेपलीकडे अखुबेंअहिरगांवास गेले. सोमवारीं पुढें गेले. मजल दरमजल जाऊन पोंहचले असतील. प्रस्तुत श्रीमंत कोणे ठिकाणीं आहेत. तुम्हीं कोठें आहां, तफावत किती आहे, किंवा मजल दरमजल जातात! फौज त्यांजवळी किती आहे? तुमची कस्त कोणे रीतीची आहे? नबाब शहरास जाणार म्हणोन बोली आहे. विस्तारें लिहिणें. तुंमचे जागिरीचे परवाने झाले किं नाहींत? लिहिणें. सदाशिव रामचंद्र येणार म्हणोन तुम्हीं लिहिलें होतें तें वर्तमान लिहिणें. आम्हीं येथें आहों. आम्हांजवळ स्वार आहेत त्यांची याद परवांच पाठविली आहे. माचनूरीं कासेगांवाहून स्वार आले होते, ते प्रस्तुत गेले आहेत. नागण्र्याच्या स्वारा बरोबर पत्र पाठवून आजी सा रोज झाले. उत्तर देऊन पाठविलें असलें तर येऊन पोंचेल. आम्हांस बुद्धिवाद लिहीत जाणें. त्या प्रमाणें वर्तणूक होईल. बहुत काय हिणें. लोभ असों दीजे. हे आशीर्वाद. हरएकविशीं बहुत सावध असत णें. हे आशीर्वाद.

---

१ रोखे करीत होता! 'रोखे' शब्दा विषयीं अधिक माहिती अंक पांचवा पृष्ठ येथें टीपेंत पहा.

१ वामनराव, परशुरामभाऊ वगैरे मोंगलाच्या लष्करास मिळावयाकरितां हाहून मंगळवेढ्यास आले. तेथून फाल्गुन वद्य षष्ठी शनिवारीं पंढरपुरास जाऊन ले. २ निश्चय, मेहनत. ३ औरंगाबादेस. ४ मोंगलाकडून तुह्मांस जहागीर ी तिचे. ५ सदाशिव रामचंद्र याविषयीं माहिती मागें नं. १९१ चे पत्राच्या ाली आहे. ६ 'नागण्या' हें कोणाशिलेदाराचें आडनांव.

श.१६८४ **मोंगलाशीं लढाई** इ.स.१७६३

पेशवे औरंगाबादेस जातात.

मोंगल पुण्याच्या रोखें कूच करितो.

नं० १९८

[१० मार्च.]

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद[1] उपरी. येथील कुशल तागायत फाल्गुन[2] वद्य एकादशी गुरुवार यथास्थित जाणून स्वकीय लिहीत जाणें. विशेष. तुम्हीं पत्रें रोशनीचे मुक्कामचीं पाठविलीं तीं पावलीं. विस्तारें वर्तमान कळलें. सदाशिव रामचंद्र भेटल्याचें वर्तमान लिहिलें तें कळलें. "चिरंजीव दाजीचें जाणें राहिलें" म्हणून लिहिलें, बहुत उत्तम. परंतु सांडणीस्वारा बरोबर त्याणीं आपल्या नांवें पत्रें[3] पाठवून उतराई व्हावें. कुरुंदवाडाकडील वर्तमान यथास्थित आहे. सविस्तर राजश्री जिवाजीपंत सांगतां कळेल. चिरंजीव माधवराऊ चिरंजीव मंडळी बरोबर दोन तीन मजली गेले. पुढें लष्कर लांबलें यास्तव माघारे आले. तुम्हीं सनगें केसोपंताचीं व चिरंजीव बाळास राजे याणीं दिलीं तीं पाठविलीं तीं पावलीं. चिरंजीव मंडळी निघोन गेली. तुम्हांस भेटली असेल. नागतळ्याचे घाटें जातात म्हणोन लिहिलें तें कळलें. उत्तम आहे. नवाबानीं थोर माणसाई केली. देश रक्षून गेले. मातबर गोष्ट केली. माचनुरास तूर्त उपद्रव नाहीं. राऊत गेले. पुढें आले तर त्यास लाऊन देऊं. गांवगन्ना वसूल ध्यावयाची ताकीद केली. चिरंजीव महादेवँ[7] आला. या उपरी तो वसूल घेईल. आम्हांकडे गुंता ना आम्हीं वरचेवर ताकीद करीत जाऊं. तो खबरदार आहे. आला, उ

---

१ हें गोविंद हरीचें गोपाळरावास पत्र. २ हें गांव नगरजिल्ह्यांत क नैर्ऋत्येस दहा मैलांवर आहे. ३ पत्र पेशव्यांस दाजीनीं पाठवावें. ४ मोंगलाचें ५ मोंगलाचें लष्कर पुण्याचा रोंख सोडून नागतळ्याच्या घाटानें औरंगाबादेक ६ मोंगलाची थोर माणसाई त्यानें पुणें, सातारा, जुन्नर वगैरे मुलखांवर स्व उपद्रव दिला नाहीं ही होय. ७ महादेव आणि माधवराव एकच. याचें वर आलें आहे.

श.१६८४ **मोंगलाशीं लढाई** इ.स.१७६३

पेशवे औरंगाबादेस जातात.

मोंगल पाठलाग करितो.

झालें. प्यादे नवे ही ठेवितों. करकंबेस प्यादे पंचवीस पाठविले. कुरुंदवाडचे प्यादे जाऊं म्हणतात. परवां महादाजीपंताचें पत्र आलें जे, प्यादे पाठवणें. रवाना करितों. इतबारी माणूस शें पन्नास पाठवणें तें नाहीं. अक्कलकोटाकडील प्यादे आहेत. आणखी ही वरचेवर ठेवितों. सर्व कर्जासीं संबंध. अबदुलभाईस बलाविलें आणि सांगितलें, त्यास " दो चौ रोजानीं तरतूद करीन. मग जाईन. जाते वेळेस मजला नेलें[1] नाहीं. " ह्मणोन कष्टी होत होता. " साहेबाच्या वचनावरी जाईन, परंतु तेथें गेलिया उपरी [मला] जळतोंडा ह्मणतील. नीट बोलणार नाहींत. राग करतील. मग माझी गत काय ? " (असें म्हणाला) तेव्हां आम्हीं सर्व कबूल केलें कीं, " रागें भरत नाहींत. चिरंजीव नारायणराऊ समाधानें बोलतील. राऊसाहेब[2] बोलतील. चिंता करूं नको. " ह्मणोन समाधानें सांगितलें आहे. कळलें पाहिजे. तुम्हीं वरचेवर वर्तमान लिहीत जाणें. रास्ते देशास गेले. बरवे ही जातील. नरसिंगराऊ उद्धव चिकोडीकराचे आश्रयें राहिले आहेत. कळलें पाहिजे. लोभ असों दीजे. हे आशीर्वाद. भिरजकराचा रोखा कागवाडास आला त्याची नक्कल पाठविली आहे.

चिरंजीव राजश्री भास्करपंतास आशीर्वाद. कुरुंदवाडाकडील यथास्थित आहे. ज्या स्थलीं पहिलीं होतीं त्या गांवीं तुम्हांकडील [कुटुंबाचीं माणसें] आहेत. नरसिंगराऊ उद्धव आहे. चिकोडीकराचे आश्रयें फिरतो. परंतु या[3] र लौकर जाईल. रास्ते गेले. बरवे ही फिरले ह्मणोन बोली आहे. जा-ऽ. वर्तमान आलें ह्मणजे लिहितों. हे; आशीर्वाद.

पौ॥ छ० ३ रमजान.

व राजश्री नारायणराऊ व नीलकंठराऊ व दाजी यांसीं आशीर्वाद.

---

१ ' मोंगलाकडे जाते वेळीं गोपाळरावानें मला नेलें नाहीं. २ धन्याच्या रीच्या). ३ गोपाळराव.

श.१६८४ **मोंगलाशीं लढाई** इ.स.१७६३

पेशवे औरंगाबादेस जातात.

मोंगल पाठलाग करितो.

लिहिलें परिसिजे. हे आशीर्वाद. चिरंजीव राजश्री आबा व समस्त मंडळीस आशीर्वाद. तुम्हीं पत्रें पाठविलीं तीं पावलीं. गुंड व पातेली पावली. हे आशीर्वाद.

नं० १९९

(अजमासें फाल्गुन वद्य
मार्चाचा प० पंधरवडा.)

श्रीगणराज.

अपत्यें साष्टांग नमस्कार. विज्ञापना ऐसीजे, दक्षणे कडील राजकी वर्तमान तरी राजश्री नारोकृष्ण जोशी लक्ष्मेश्वराहून आले त्यांनीं सांगितलें कीं, कुंदगोळास बेर्व्यानीं व उद्धव सुतांनीं मिळून परिघ घातला आहे. पेठ लुटली. कोट झुजत आहे. अद्याप अवसान[3] बस्त आहे. हैदरनाईक मृत्यु पावला ह्मणून सांगितलें. खरें लटकें ईश्वर जाणें! सावनूरवाले त्यांस भेटले आहेत. त्यांचें सामान बाहेर निघणार आहे. सामील होणार ऐसी बोलवा आहे. बसवा पट्टणास परिघ घातला आहे. दामोदर[4] कृष्ण करमरकर व नारो राम ऐसे त्या प्रकरणांत आहेत. देसाई[5] तो सावनूरवालेपासीं आहे. ऐसे ग्रह ही त्यास सामील झाले आहेत. यांत होईल तें खरें. मिरजकर फारसे उड्या मारीत होते. परंतु लष्करच्या[6] आवईनें स्तब्ध झा

---

१ महादाजी बल्लाळ ह्मणून कुरुंदवाडच्या ठाण्यांत पटवर्धनांचा [विशेषें करून हिं हरीचा] अत्यंत विश्वासू कारकून होता. त्याचें हें गोविंद हरीस पत्र. असे विर मर्जीतले कारकून आपल्या यजमानांस कागदोपत्रीं 'वंडील' शब्दानें व आपणास ' शब्दानें उल्लेखीत असत. २ लक्ष्मणपंत बर्वे व नरसिंगराव उद्धव यानीं. ३ खबरदार. ४ रअल्लीस. ५ हरिहर व बसवापट्टण हीं विदनूर प्रांतापैकीं ठाणीं पटवर्धनांचीं होतीं कृष्ण पटवर्धनांचे ब्राह्मण कारकून ही हैदराकडे फितुरी झालेले! ७ देसाई बस ८ मिरजेचा किल्लेदार लक्ष्मण कोन्हेर, ९ लष्कर मोंगलाचें.

श.१६८४ **मोंगलाशीं लढाई** इ.स.१७६३

पेशवे औरंगाबादेस जातात.

मोंगल पाठलाग करितो.

आहेत. पुढें होईल तें खरें. लष्करास दोघें मनुष्यें गेलीं आहेत. अद्याप आलीं नाहींत. पहिलीं दोघें मनुष्यें लष्करास पाठविलीं आहेत. त्याजवर दुसरीं दोघें रवाना केलीं. त्यांतील एक ही आलें नाहीं. इंचलकरंजी (व) नांदणी हे मिरजकराचे मायेंत. त्यांचें यांचें सूत्र एकच आहे. साधिले प्रसंगीं गळीं पडावयास चुकत नाहींत. त्यासी आह्मीं खबरदारीनें आहों. त्यांस भितों ऐसें नाहीं. मिरजकराचे चित्तीं तोफा घेऊन जाव्या. खामखा मर्दुमी करून दाखवावी. स्थलें घ्यावीं. ऐसी हिम्मत बहुत कांहीं धरिली होती. परंतु ईश्वरें तोंडांत मारिलें ऐसें झालें आहे. किल्लेंत आठ दहा तोफा आहेत. व उद्धवसुता बरोबर दहा बारा आहेत. अशांत चार पांच हजार फौज दक्षणेस गेली तरी अवघेंच बुडोन जातें ! एक वेळ तोफखाना बुडालेवर मग फिरून कांहीं होणें नाहीं. अशांत मिरजेंत ही अवसान नाहीं. फौज आलिया कोणी झुजतो ऐसें नाहीं. तरी हा मजकूर श्रीमंत राव साहेबांस लिहून पाठवावा. मोंगली कारभार. फौज येऊन पारपत्य झालें तरी बरें. नाहीं तरी मोंगल एकीकडे जाहलियावर मागती हे काळ्यारानांत होतील. जलदी होईल तरी बरें आहे यांत घडेल तें खरें. गाडदी शेडबाळास आलेवर वडिलांकडे मनुष्यें रवाना केलीं होतीं तीं वालेखिंडीपर्यंत गेलीं. पुढें वाट न फुटे म्हणून फिरून आलीं. वडिलीं आमचे खबरदारींत रावें. सर्व भरंवसा वडिलांचा आहे. हे विज्ञाप्ति.

नं० १९०

(१३ मार्च.)

श्रीगणपतिर्जयति.

पदीं उपरी. येथील कुशल तागायत फाल्गुन वद्य चतुर्दशी रविवार.

---

१ इचलकरंजी व नांदणी या गांवचे मालक. २ मिरजेंतील तोफा घेऊन . ३ खचित. ४ चार पांच हजार फौज पटवर्धनांची. ५ गोपाळरावास. कडे किंवा तिंबक हरीकडे. ७ पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास.

श.१६८४ **मोंगलाशीं लढाई** इ.स.१७६२

पेशवे औरंगाबादेस जातात.

मोंगल पाठलाग करितो.

यथास्थित जाणून स्वकीय लिहिणें. विशेष. तुम्हीं खडकताहून कूच झालें ते दिवशीं मंगळवारीं नागणें याच्या स्वारावरोबर पत्र पाठविलें तें येथें गुरुवारीं तिसरे दिवशीं पावलें. लिहिलें वर्तमान कळलें. इकडील वर्तमान लिहिणेंसें नाहीं. बर्वे जमाखिंडीस आले, म्हणून वर्तमान तहकीक आलें. जिवाजी भोंसले यास त्यांतील स्वार भेटले. मनोळीचे[1] बारीस तीन दिवस अटकले होते. मग स्नेह करून आले म्हणोन सांगितलें. ते ही देशास गेले असतील अगर जातील. रास्ते सडे होऊन श्रीमंतांकडे गेले. वाईस आमचे मनुष्य गेले होते ते कालीच आले. सोलापुरकरांनीं फारच मुलखांत धामधूम मांडली आहे. हलसंगीचीं[2] गुरें परवां नेलीं. भंडारकवठ्यांच्या गळां पडणार हे ही बोली आहे. राजश्री गमाजी बाबाचें सामान भारी या प्रांतीं नाहीं. नरखेडास मकरंदनाइकाकडील[3] पंवार कोण आहे त्याणें दोन चारशें स्वार व पांच सातशें पाईचे मिळवून वेढा घातला आहे. त्यास आंत सोनलकर आहे. त्याणें ठाणें मोहळकरास द्यावेंसें केलें आहे. मोहळकर परवां दिवसाचेच दहा पांच स्वार व पाईंचे पंचवीस तीस जात होते. झुंज झालें. त्यांतील दोन घोडीं पाडाव नेलीं. दोन तीन जखमी झालीं. प्यादयांतील दोन चार जखमी झाले. एक दोन ठार झाले. दहा पांचांच्या बं-

---

१ खात्रीचें. २ मनोळीकर शिंदे हे पटवर्धनांचे स्नेही म्हणून त्यानीं बर्व्यास अडविले होतें. ३ हलसंगी व भंडारकवठें हीं ठाणीं प्रतिनिधीचीं. त्यांस पेशव्यांचा सोलापूर किल्लेदार उपद्रव देत होता. ४ मकरंद नाइकाचें आडनांव निंबाळकर. हा प्रतिनिधीच्या बाजूचा होता कीं काय, त्याजकडील पंवार म्हणून जो कोणी छोटासा सरदार होता त्यानें नरखेडास काय म्हणून वेढा घातला, नरखेड कोणाकडचें व तें सोलापूर कोणच्या बाजूस आहे, मोहळ हें ठाणें तर जानोजीराव निंबाळकरांचें. तेव्हां ठाणेदार गोपाळपंत हा नरखेडचे मदतीस कां जातो, जानोजी निंबाळकर हे सरदार व अर्थात् सध्यां तरी पेशव्यांशीं वांकडे असावयाचे. मग त्यांच्या गो पेशव्यांच्या सोलापुरच्या लोकांकडून मदत कशी मिळले, इत्यादि गोष्टी दुर्ब त्यांचा उलगडा आमच्यानें होत नाहीं!

श.१६८४ **मोंगलाशीं लढाई** इ.स.१७६३

पेशवे औरंगाबादेस जातात.

मोंगल पाठलाग करितो.

हुका गेल्या. दोन चार स्वांर व पांच पाईंचे इतके जाऊन आंत पोंहचले. हल्लीं गोपाळपंत मोहळकर याणें सोलापुराहून शें दीडशें प्यादे आणिले. आणखी जमाव करून कालीं नरखेडचे मदतीस जाणार होता. गेला असेल. निंबाळकरांचें व सोलापुरकरांचें सूत्र अंतर्यामीं (एकच) आहे चव्हाणांचें ठाणें नलदुर्गीं आहे. ते अक्कलकोट प्रांतीं धामधूम करितात. व गुरें वळवून नेतात. चौकडे दंगा. तेथें[1] मुलें माणसें व उभयतां वडील आहेत. स्वसत्तेनें रहावया स्थल दिसत नाहीं. हे[3] ही जागा अफाट. तूर्त आम्हीं येथें आहों. स्वांर ही सव्वा दोनशें पावेतों भरती होईल. प्यादे ही पांचशें पावेतों माचनूर व येथें मिळोन आहेत. कुरुंदवाडचे प्यादे आम्हांजवळ होते ते लाऊन दिले. अक्कलकोटाकडून शें पन्नास प्यादे आणविले आहेत. सावधपणें आहों. लज्जारक्षक श्रीभगवान आहे. पुण्यास माणसें गेलीं होतीं तीं कालीच आलीं. श्रीमंत मातुश्री खालींच आहेत. पुण्यांतील लोक फार करून पळाले. आमची वस्तभाव तिन्ही घरची फार करून पळविली आहे. गंगाधर[5] आपाजी तुम्हांकडे येणार आहेत. प्रस्तुत तुम्हीं कोठें आहां, काय वर्तमान, श्रीमंत कोणीकडे गेले, शहरापासून किती लाख खंडणी घेतली, तें लिहिणें. तुम्हांस खुद्द वैशाख शुद्ध पक्षीं येथें असलें पाहिजे. चैत्र वद्य पक्षीं निघोन निरोप घेऊन यावें. वधूंचा करार जाहलिया ी मुजरद जोडी बरोबर पत्रें पाठवितों. वैशाख वद्य पक्षीं अस्त आहे. स्तव सूचना लिहिली आहे. चिरंजीव मंडळी तुम्हांजवळी पावलीच अस-

---

१ अक्कलकोटास. २ कृष्णंभट व त्रिवक्रपंत आपा. ३ मंगळवेढें. ४ गोपि- ि पुण्यासच आहे. खरें पाहिलें तर या धामधुमीच्या वेळीं सिंहगड किंवा पुरंदर ावयाची. ५ मिरज, कुरुंदवाड व तासगांव येथील ह्मणजे अनुक्रमें गोविंद हरि, रि व परशुराम रामचंद्र या तीन विभक्त कुटुंबांची. ६ याचें आडनांव याचे वंशज हल्लीं मिरजेंत राहतात. ७ गोपाळरावाची पहिली बायको मेल्यापरें लग्न करावयाचें. त्याची ही वाटाघाट]

श.१६८४ **मोंगलावर स्वारी** इ.स.१७६३

पेशवे औरंगाबादेस जातात.

मोंगल पाठलाग करितो.

तील. आम्हीं पडले प्रसंगीं पाहिजे तें सामान मेळवूं. श्रीसत्ता प्रमाण! बहुत काय लिहिणें. जिवाजी बराबरी सविस्तर लिहिणें. हे आशीर्वाद.

पै॥ छ० ६ रमजान.

नं० २०१

[अजमासें फाल्गुन वद्य मार्चाचा प० पंधरवडा]

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी. राजश्री लक्ष्मण कोन्हेर मिरजेस आहेत. कुटुंब आणिलें आहे. वैशाखमासीं मुंजी करणार. अथणी त्याणीं घेतली म्हणोन खबर आहे. आजी काली त्यांच्या नजरेंत दिन दुनिया नाहीं! बरें! श्रीपंढरीचा नाथ समर्थ आहे. करवीरवासी आपले स्थलीं आहेत. वैशाखमासीं राज्याभिषेक अर्भकास करणार. चैत्रमासीं व्रतबंध केला. करीम आजी मंदवारीं दोन प्रहरां रवाना केला आहे. बहुत काय लिहिणें. हे आशीर्वाद.

नं० २०२

[अजामासें फाल्गुन वद्य मार्चाचा द्व० पंधरवडा.]

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी. सावनूर, बंकापुराकडील अलीकडे पत्र नाहीं. [illegible]

---

१ नं० २०१ व २०२ हीं गोविंद हरीचीं गोपाळरावास पत्रें. २ [illegible] राणीनें दत्तक मुलगा घेतला होता त्यास. सदरहू मुलास अश्विनमासीं राज्याभि त्याविषयीं गोविंद हरीनें तिसऱ्या अंकांतील नं० ७२ चे पत्रांत माहिती गो लिहून कळविली आहे ती खरी नव्हे, असें वरील उल्लेखावरून सिद्ध झालें.

श.१६८४ **मोंगलाशीं लढाई** इ.स.१७६३

पेशवे औरंगाबादेस जातात.

मोंगल पाठलाग करितो.

अवस्था कोणे रीतीची आहे न कळे! कृतघ्न हैदरअल्लीस लिहील. सिरट्टीकर देशाई यास लिहील. सावनूरकरास लिहील. चुकणार नाहीं! हर एक प्रकारें आम्हांस बुडवावें हा (त्याचा) भाव. परंतु धण्याचें घर बुडतें हें न कळे! आम्हीं ही चिरंजीवांस लिहिलें आहे कीं, तो[3] बंकापुरचे गळां पडतो ऐसें झालिया सावनूरवाले यांस ठिकाण द्यावें, परंतु त्यास देऊं नये; ऐसें लिहीलें आहे. " चिरंजीव दाजी हिर्वेऱ्यास येतील. येथून लष्करांत येतांच रवानगी करितों " म्हणून लिहिलें तें कळलें. त्यांचें शरीर आधीं क्षीण. त्यामध्यें मिरजेचा कसाला भारी पडला त्यामुळें भागवटा आला. श्री कृपा करील. कांहीं चिंता नाहीं. आलियावरी सोबत मार्गे उत्तम पाहून रवानगी करणें. बहुत काय लिहिणें. लोभ असों दीजे. हे आशीर्वाद. उद्धवसुत व बर्वे कित्तूर प्रांतीं होते. अलीकडे कोणे ठिकाणीं आहेत हें कांहीं वर्तमान लिहिलें आलें नाहीं. मिरजकर तोफा तयार करितात म्हणोन महादाजीपंतीं लिहिलें होतें. मिरजकरांनीं अथणींत ठाणें वसविलें. कळलें पाहिजे. हे आशीर्वाद.

चिरंजीव राजश्री नारायणराऊ व नीलकंठराऊ व आबा व कोन्हेरराऊ व वामनराऊ व भाऊसाहेब व धोंडोबा व विनाजी यांस आशीर्वाद. लिहिलें परिसिजे. लोभ असों दीजे. कोणाच्या कजियांत पडों नये. सूचलिहिली आहे. हे आशीर्वाद.

---

१ सखारामबापू. पटवर्धनांची कर्नाटकांतील जहागिरि जबरदस्तीनें आपल्यात घेण्या विषयीं सखारामबापू हैदरअल्लीस किंवा सावनूरच्या नवाबास अथवा त्याच्या देसायास लिहिल असें गोविंद हरीस भय वाटत आहे! २ मेघश्यामराव त्याजकडे तिकडील जहागिरीचा बंदोबस्त गोपाळरावानें सोंपविला होता. ३ हैदर. ४ हें हिवरें कोणचें? सखारामबापूचें मुळ गांव हिंवरें हें पुणें प्रांतीं आहे. हें नव्हे. ५ जिवापाड मेहनत. ६ नरसिंगराव उद्धव व लक्ष्मणपंत बर्वे. ७ पाळ यानें कुरुंदवाडाहून.

श.१६८४ **मोंगलाशीं लढाई** इ.स.१७६३

पेशवे औरंगाबादेस जातात.
मोंगल पाठलाग करितो.

नं० २०३

(अजमासें फाल्गुन वद्य
मार्चाचा प०पंधरवडा.)

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी. कुरुंदवाडाकडील वर्तमान यथास्थित आहे. वरचेवर पत्रें येत असतात. नरसिंगराव उद्धव कोगनोळीवरी होते. त्यांजकडे करवीरा-कडून राजकारण येऊन कागलास नेऊन वेढा घातला. बर्वे सावनूर तालु-क्यांतून आले त्यांस हिकसूरच्या [?] ओढ्यावरी नरसिंगरायाचें पत्र गेलें. ते ही आले. चिकोडी प्रांतीं गुरें ढोरें वळिलीं. बाजार लुटिले. अनिवार लष्कर ! त्या उपरी कागलावरी आले. नरसिंगरायाचा (व)[3] त्यांचा वि-रोध कोणे गोष्टीचा आला न कळे ! कूच करून पंचगंगेवरी मुक्काम केला. ते दिवशीं आसपास खेड्यांचीं गुरें वळिलीं. यामुळें करवीरचे राऊत धांवून (त्यानीं यांची) कही पाडून नेली. पुढें तेथें मुक्काम झाला, किंवा काग-लास समजाऊन नेले, कीं पुण्याकडे आले, न कळे ! कागलकरानीं ही प्यादे मिळविले आहेत. कोण्याथरास जाईल पहावें ! बहुत काय लिहिणें. हे आशीर्वाद. नांदणीहून भोंसले याचा माणूस काली तिसरे दिवशीं आ-ला. त्यानें सांगितलें कीं, " बर्वे याची फौज आळत्यावरून जेजेचे खिंडी तून जाणार होती. त्यास राणीकडील लोकांनीं खिंड धरिली. मग नि शिरगांवाकडून दानोलीकडून पुढें जावयास गेले. म्हणून नांदणींत बो होते, म्हणोन सांगितलें. कळावें म्हणोन लिहिलें आहे. बहुत काय लि लक्ष्मेश्वराहून जासूद सायंकाळीं पत्रें घेऊन आला तोच पाठविला त्यावरून तिकडील वर्तमान कळेल. हे आशीर्वाद:

१ हें पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास. २ या वेळीं कागलकर कोल्हापुरकर राणी यांची लढाई जुंपली होती. कागलकर तिला बधेनात पेशव्यांचे सरदार बर्वे व नरसिंगराव उद्धव यांस मदतीस बोलाविलें. ३

श.१६८१ **पेशवे वऱ्हाडप्रांतीं जातात** इ.स.१७६३

मोंगल पाठलाग करितो.

नं० २०४L

(फाल्गुन वद्य त्रयोदशी
१२ मार्च.)

श्री.

तीर्थरूप मातुश्री बाई वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें माधवरायानें चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान तागायत छ० २६ साबान मुक्काम नजीक कावागड परगणे पाटोदें वडिलांचे आशीर्वादें करून सुखरूप असों. विशेष. औरंगाबादेस आलों त्या पुढील वर्तमान सविस्तर सेवेशीं लिहून पाठविलें आहे. रामचंद्र जाधव यानीं पैहिलें पुण्याचे मुक्कामीं चाकरीस चुकाविलें. त्याजवर पंढरपुर लुटिलें तो अन्याय माफ केला. मिरजेवर एकदां रुसले होते. सरंजाम देऊन समजावीस काढिली. कोपळ[3] किल्ला देविला. सेनापतीचीं वस्त्रें राजाकडून देविलीं. सर्व ही आर्डे भांडे चालवीत असतां फितव्यांत होतेच. मोंगलाकडे सूत्रें त्यानीं चालविलींच होतीं. दगा ही करावा हें ही चार दिवस (त्यांच्या) मनांत होतें. मिरजेवरून फौज पुढें आली आपण मागेंच राहिले. तमाम गांव लुटीत आले. गांवगन्ना खंडण्या मनास तील तशा घेतल्या. टिपंण्या[6] घातल्या. एक दोन खून ही केले. इतकें असून औरंगाबादेच्या मुक्कामीं अडले. समागमें येईनात. बहुत प्रकारें वीस काढीत असतां नच ऐकत. त्यांचे मनांत फारच वांकडें होतें. वरूप राजश्री दादासाहेबांवर शेंहरचे मुक्कामीं (यानीं) मारेकरी घा-

१ हें पेशव्यांचें गोपिकाबाईस पत्र. २ दादासाहेबांशीं घोडनदीवर लढाई त्या स्वारींत ? ३ कोपळचा किल्ला मोंगलाईत लिंगसुगुर जिल्ह्यांत आहे. जुनाषयीं व बळकटी विषयीं याची प्रख्याति आहे. निजामाकडून सर सालरजंग राण्यास जहागीर मिळाली आहे तींत हल्लीं कोपळ शहर व परगणा मोडत याच शेजारीं बहादुरबिंडा नांवाचा दुसरा एक प्रसिद्ध किल्ला आहे. ४ हट्ट. च्या मुकामीं. ६ टिपऱ्या घालणें म्हणजे हात पायांस दोरीनें पीळ भरणें !

श.१६८३ **पेशवे बऱ्हाडप्रांतीं जातात** इ.स.१७६३

मोंगल पाठलाग करितो.

तला. [मारेकऱ्यानें] दिशेकडे जातां शेतखान्याजवळ गांठिलें. तरवारीची हूल चालविली. थोडासा दंडावर काकर निघाला. खैर झाली. मारेकरी गाडदी मुसलमान होता. पक्का शोध लागला नाहीं, परंतु हें कृत्य जाधवरायाशिवाय दुसऱ्याचें नव्हे ! असे दुष्कर्मी सोबतीस बाळगून फळ काय ! समयीं दगा करावयास चुकणार नाहींत, असें जाणून धरून दौलतावादेस खासा व त्याचा पालक[1] लेक असे पाठविले. त्याजकडील फौज बुणगें होतें तें गफलतीनें लुटिलें[2] गेलें. तेथून कूच करून येहळानजीक मुक्काम केला. छ० २४ साबानीं दोन प्रहरां आम्हीं सडे होऊन मल्हारबास आणावया निमित्त या मुक्कामास आलों. आज मल्हारबाची गांठ पडेल. तीर्थस्वरूप राजश्री दादासाहेब कूच करून कासारबारीचे[3] सुमारें जातील. मल्हारबाची आमची गांठ पडल्यावर मनसबा होईल तो मागाहून लिहून पाठवूं. तांब्रांची फौज मराठे सुद्धां आजकाल गंगेवर पैठणचे सुमारें येऊन पोंचले असतील. बहुधा शहरास येऊन काय मनसबा करतील तो पहावा! होईल वर्तमान तें वरचेवर सेवेशीं लिहून पाठवीन. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना. पै॥ छ० ३ रमजान.

नं० २०५

(अजमासें चैत्र शु
मार्चाचा दुसरा पंधरवडा.

श्री.

विनंती विशेष तर, दरबारी वर्तमान छ० २९ साबानचें[4] पत्र श्री

---

१ रामचंद्र जाधवाचा दत्तक पुत्र श्रीपतराव जाधव. २ जाधवाच्या ची व बुनग्याची लूट पेशव्यांच्या फौजेनें केली हें त्यांस बरें वाटलें नाहीं. बंदोबस्त ठेविला नाहीं ह्मणून असें झालें असा त्यांच्या लिहिण्याचा अभि ३ कासारबारीच्या घांटाच्या सुमारें. ४ ' भोंसले, पटवर्धन वगैरे मराठे मोंगलाची फौज आजकाल गोदावरीतीरीं पैठणापर्यंत आली असेल. ' दून कोणी बातमीदारानें गोपाळरावास पाठविलें आहे. ६ फाल्गुन

लष्करचें आलें तेथें बातमी तर, श्रीमंत दादासाहेबांस कट्यारेची जखम थोडी लागली. मारेकरी धरिला, व जाधवराव कांहीं नबाबाकडे फितुरांत आढळले, व कांहीं कागदीं पत्रीं सांपडले, व मारेकरी यानें ही नांव त्यांचेंच घेतलें; सबब जाधवराव यांचा गोट लुटून घेऊन मशारनिल्हेस कैद करून दौलताबादेवर ठेविलें. तें (वर्तमान) छ० २१ साबानीं जालें. अलीकडे राजश्री सखारामपंत राजश्री मल्हारबांकडे गेले. त्यास त्यांची यांची चित्तशुद्धि नव्हती; सबब ते पुढें जाऊन मागाहून श्रीमंत ही चालिले. सारांश मल्हारबाची समजुती पडत्ये. नवा सरंजाम दहा लक्षांचा आंबेड वगैरे महाल [होळकरास] देतात, असा करार ठरावांत आला आहे. त्यास त्याचे हातून भोंसले यांचें वगैरे समाधान करून सर्व मल्हारबाचे बाहेर्दारीनें आणून मग नवाबाशीं प्रसंग करावा, कारभार बापूनींच करावा, ऐसें मानस आहे. राजश्री आबा पुरंदरे यांचें व बापूंचें अंतर्याम एकच आहे. बाह्यरंग मात्र श्रीमंत रावसाहेबांस ममतेंत घ्यावें एतदर्थ विपर्यास! परंतु पारसनीस, पोतनीस, आंबा, वगैरे सखारामपंतास बाह्यप्रकारें दूर दर्शवून रायास साधून घ्यावें, हा भाव; त्यांचा अंतर्यामाचा खुलासा आहे. हा खुलासा त्या उभयतांचे आप्तविषयी यांजकडून बाजीपंत बोकीलं व त्रिंबक विनायक यांचे मुखोत्तरें करून श्रुत जाहला, त्यावरून आपणास

१ कांहीं अंशीं. २ जाधवरावाचेंच. ३ आंबेड परगणा औरंगाबाद प्रांतीं आहे. ४ मध्यस्थीनें. ५ युद्ध प्रसंग. ६ सखारामबापूनें. ७ माधवराव पेशव्यांस. ' सखारामबापू व आबा पुरंदरे हे आंतून, मित्रच आहेत, पण पेशव्यांचा विश्वास रावा ह्मणून आबा व पोतनीस पारसनीस वगैरे दरबारी सखारामबापूशीं वांकडेपणा वितात, ' असा अभिप्राय. ९ मनांतील अभिप्राय. १० सखारामबापूचें आडनांव ल असें होतें हें आमच्या वाचकांस माहीत असेलच. बाजीपंत बोकील हा सखारचा आप्त व त्रिंबक विनायक हा पुरंदरे याचा आप्त, तेव्हां यानीं दिलेली मारीच असली पाहिजे असें पत्र लिहिणारा सुचवीत आहे. त्रिंबक विनायक या उपनाम माहीत नाहीं. वसईस विसाजीपंत लेले सरसुभेदार होता; तो सुभार होऊन सखारामबापूच्या वशिल्यानें या त्रिंबक विनायकास पेशव्यांकडे-थला होता.

मोंगल पाठलाग करितो.

सूचनार्थ लिहिलें आहे. नबाबाचा व श्रीमंतांचा, दोहोंतून एक निर्गम जाहलियास सर्वांचें पारिपत्य तजवीजीनें करावें हा ही दृढ विचार, कीं आज समय गांठून पुढें जें कर्तव्य तें करूं, ऐसे ही त्याचे विचार झाले आहेत. (त्यानीं) राजश्री गंगाधर यशवंताचें वगैरे सर्वांचें समाधान केलें आहे. सारांश कारभारी यांचे बोलण्यांत भाव जे मुरादखान याचे हातून एकदा ठराव झाला असून राजे विठ्ठल सुंदर यांणीं करार मोडून हें कर्म अवलंबिलें आहे, तर नबाबाकडे जितके सरदार गेले आहेत त्यांचें तूर्त सर्वांचें समाधान ज्याचे त्याचे चित्तानुरूप करून राजेबहादर यांस फिके पाडावें. मग पुढें सर्व ही घडोन येईल. व मुरादखान याचीं ही नित्य पत्रें येतात त्यांत मजकूर कीं, " सर्व प्रकारें माझा अभिमान असावा. मी सेवेशीं अंतर करणार नाहीं, " ऐशीं येतात. त्याचा ही मजकूर वैष्णव लेखका कडून श्रुत होतो. तर तेथें जो ठरावं होणें तो या कारभारी यांचे भरंवशावर जाहलियाशीं परिणाम शुद्ध नाहीं. तशांत आपल्या ज्ञातीचा तर कळतच आहे ! हें वर्तमान पक्के बातमीचें आहे. बाजारी बातमीचें नाहीं. आपणास सूचनार्थ श्रुत व्हावें म्हणोन लिहिलें असे. बहुत काय लिहिणें कृपा लोभ कीजे हे विनंती.

---

१ मोंगलाशीं लढाई किंवा तह यांतून कोणचें तरी एक सिद्धीस जाईपर्यंत त्याजकडे सरदार गेले आहेत त्यांची समजूत करून त्यांस आणावें. एकदां मसलत सिद्धीस गेली म्हणजे मग त्या सरदारांचें पारिपत्य करावें, हा सखारामबापूचा पक्का निश्चय आहे; असें पत्र लिहिणारा सुचवीत आहे. २ सखारामपंत वगैरेचे. ३ हा होळकराचा दिवाण गंगोबा तात्या. ४ पेशव्याशीं लढाई करण्याचें. ५ पटवर्धनांचें वगैरे पारिपत्य करण्याचें नंतर घडून येईल. ६ मुरादखान हा दादासाहेब व सखारामबापू यांचा मित्र होता व राजे विठ्ठल सुंदर याचा प्रतिस्पर्धी होता. ७ हा वैष्णव फडणीस कोण हें ध्यानांत येत नाहीं. ८ पेशव्यांच्या दरबारांतून तुमची समजूत करण्याचा ठराव. ९ कोकणस्थांचा.

श.१६८५ पेशवे वऱ्हाडप्रांतीं जातात. इ.स.१७६३

मोंगल पाठलाग करितो.

नं० २०६

(अजमासें चैत्र शुद्ध मार्चाचा दु०पंधरवडा.)

रामचंद्र त्रिंबक याचें गोविंद हरीस पत्र.

" मोंगलअल्ली[1] व त्याचा दिवाण मीरआबास यांस मोंगलानें विजापुरचे रखवालीस पाठविलें आहे. शिवाजी केशव वगैरे यांस गंगथडी नाशिक प्रांताचे जप्ती करितां पांच हजार फौज देऊन पाठविलें. जाधवराव[2] याचें वर्तमान तर श्रीमंतांनीं कूच केलें तेव्हां त्यास समागमें बोलाविलें. तेव्हां त्यानें सांगून पाठविलें कीं, " फौजेच्या देण्याचा गवगवा आहे, एका दोहों रोजांनीं मागाहून येतों. " मागें मोंगलाचा शह असतां मागें रहावयाचें कारण नव्हतें, व मोंगलाकडील सूत्र होतें असें सर्व विदित झालें; इतक्यांत एका गाडद्यानें श्रीमंत दादासाहेबांस कठार चालविली. ईश्वरें रक्षिलें. लागली नाहीं. तेव्हां चित्तांत कित्येक विचार येऊन राजश्री नीलकंठ महादेव व आमचे यजमान यांस पाठविलें कीं, जाधवरायास घेऊन येणें. हे गेल्यावर गोट वेष्टिला. त्यास व श्रीपतरावांव[4] जाधव यास देवगिरीवर बेड्या घालून ठेविलें. बरकड गोट लुटिला. तोफखानां सरकारांत लाविला. राजश्री नरसिंगराव धायगुडे पळून मोंगलाकडे गेले. कांहीं लोक लुटिले. कांहीं पळाले. "

नं० २०७

(१६ मार्च)

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत चैत्र शुद्ध द्वितीया बुधवार. य-

१ हा बाबूजी नाईक बारामतीकराचा एक कारकून. २ विजापुरचा सुभा मोंगलअल्लीच्या वांटणींत आलेला होता व तो पूर्वी त्याजकडेच होता. (अंक पांचवा पृष्ठ १६३ या मधील टीप पहा.) ३ हा मोंगलाकडील एक सरदार. ४ हा श्रीपतराव जाधव रामचंद्ररावाचा दत्तक पुत्र. ५ दौलताबादेवर. ६ पत्र गोविंदहरींचें गोपाळरावास.

मोंगल पाठलाग करितो.

थास्थित असे. विशेष. तुम्हांकडील पत्र आजी दहा बारा दिवस येत नाहीं. प्रस्तुत कोणे ठिकाणीं मुक्काम आहे, श्रीमंतांचें लष्कर कोणीकडे गेलें, पुढें काय विचार, तें विस्तारें लिहिणें. आथणीहून राजश्री आनंद राऊ जगजीवन आले आहेत. तिकडील वर्तमान सांगतां कळेल. आम्हीं पत्राचा मार्ग पहात असतों. चौ सा दिवसां एक पत्र पाठवीत जाणें. कुरुंदवाडाकडील वर्तमान यथास्थित आहे व अक्कलकोटाकडील यथास्थित आहे. राजश्री गमाजीबावाकडील ठाणें [दार] कासेगांवीं आहेत राणोजी नाईक निंबाळकर याजकडील, ते क्षेत्रासीं घांसाघास करणार. त्याचा कलह होईल. तुम्हांस कळावें म्हणून लिहिलें आहे. बहुत काय लिहिणें. लोभ असों दीजे. चिरंजीव आबास चतुर्दशी वद्य रविवारीं पुत्र झाला. संतोषाचें वर्तमान कळावें. हे आशीर्वाद.

नं० २८८

(१६ मार्च.)

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत चैत्र शुद्ध द्वितीया बुधवार. यथास्थित जाणून स्वकीय कुशल लिहीत जाणें. विशेष. सांप्रत बहुत दिवस तुम्हांकडून पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं, या करितां चित्त स्वस्थ नाहीं, तरी ऐसें न करणें. वरचेवर येणारासमागमें पत्र पाठवीत जाणें. चिरंजीव मंडळी तुम्हांजवळी कोणे मुक्कामीं पावली ? श्रीमंत कोणीकडे गेले ? औरंगाबादेस कांहीं द्रव्य घेऊन गेले म्हणोन ऐकतों. तें लिहिणें. [मोंगल] देशीं फौज ठेवणार म्हणोन [तुम्हीं] लिहिलें होतें. ठेवली

१ पंढरपुराशीं. पंढरपुर पटवर्धनांकडे होतें. कासेगांव हें सोलापुरच्या वायव्येस आठ मैलांवर आहे. २ पत्र लिहिणाऱ्याचा पुतण्या मोरो बल्लाळ यास. ३ पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास. हें व मागचें नं० २०७ चें अशीं दोन्हीं एकाच दिवशीं लिहिलेलीं. ४ औरंगाबादे पासून.

नाहीं तर बरें आहे. ठेवल्यानें प्रांताचा नाश आणि फौजेचा ही निभाव नाहीं, यास्तव न ठेवली हेंच बरें! तुम्हांकडील फौजा सज्या होऊन पुढें गेल्या, नबाब मागें दोन तीन मजलीच्या अंतरे आहेत ह्मणोन ऐकतों, तें लिहिणें. अक्कलकोटाहून तीर्थरूपांनीं पत्र पाठविलें जे वैशाख शुद्धपक्षीं लग्न करावें. पुढें अस्त होतो यास्तव सूचना लिहिली आहे. यावें लागेल. येविशींचें उत्तर पाठवणें. वधूचा यत्न केला आहे. इत्यर्थ पौर्णिमेइतेंका होईल. लक्ष्मेश्वराकडून बर्वे याची फौज आली. या उपरी तिकडील कजिया वारला. चिरंजीव मेघश्यामरायानीं लिहिलें आहे त्या वरून कळेल. पुढें पर्जन्यकाल समीप आला. कुटुंबें रहावयाची सोय झाली पाहिजे. श्रीमंतांचा तह अथवा एकप्रकार होता ह्मणजे बरें होतें. मिरज प्रांतीं लक्ष्मण कोन्हेर आहेत. कुरुंदवाडीं खबरदारी आहे. नरसिंगराऊ उद्धव (यांचें) कोंगनोळीहून कूच जाहल्याची खबर आली नाहीं. नवीन राजांचा व्रतबंध चैत्र शुद्ध दशमीस नेमिला आहे. कळावें. बरकड नवल विशेष लिहिणेंसें नाहीं. चिरंजीव सौभाग्यवती मथुराबाई वद्य चतुर्दशी बारा घटिका नंतर प्रसूत झाली. पुत्र झाला. संतोषाचें वर्तमान कळावें. चिरंजीव सौभाग्यवती भिऊबाई आजी पुण्याकडे गेली. सदाशिवपंत काळे यांचें पत्र पुण्याहून आलें. ते पुण्यांतच आहेत. त्यांची सून सासवडीं प्रसूत झाली. कन्या झाली. हीं प्रस्तुत सासवडास जातील. कळावें. बहुत काय लिहिणें. लोभ असों दीजे. पत्र पाठवावया आळस न करणें. हे आशीर्वाद.

---

१ गोपाळरावाची पहिली वायको नुकतीच वारली होती ह्मणून दुसरें लग्न त्याचें व्हावयाचें होतें त्या विषयीं हें लिहिणें. २ पौर्णिमेपर्यंत. ३ तहा पेक्षां निराळा प्रकार लढाईचा. ४ कोल्हापुरकर राणी जिजाबाई हिनें मुलगा दत्तक घेतला होता त्याचा.

श.१६८५ पेशवे वऱ्हाडप्रांतीं जातात इ.स.१७६३

मोंगल पाठलाग करितो.

नं० २०९

(१८ मार्च)

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वादें उपरी. येथील कुशल तागायत चैत्र शुद्ध चतुर्थी भृगुवासर. यथास्थित असे. विशेष. तुम्हीं हणगोजी बरोबर पत्र पाठविलें तें पावलें. लिहिलें वर्तमान कळलें. विसाजीपंताचें पत्र पावलें. तिकडील ही वर्तमान कळलें. त्यास मंगळवारीं प्रतिपदेस हणगोजी आला. दुसरे दिवशीं जाधवराऊ यास श्रीमंतानीं धरिला, लुटिला, म्हणोन करकमले (?) याची खबर आली, व जाधवरायाच्या लष्करचे राऊत पैठाचे आले त्याणीं जिवेंच मारिला म्हणोन सांगितलें ! श्री क्षेत्रींचे लोक बहुत संतोषी झाले. पुढें ऋणानुबंध प्रमाण. शुक्रवारीं तुम्हीं गंगेवरी गेलां तेव्हां पांच गांवचें अंतर त्यांसं तुम्हांस राहिलें असावें. परंतु ते दौलताबादे नजीक ठरोन राहणार नाहींत. तीन प्रकार. उत्तम तह. मध्यम लढाई. तिसरा कनिष्ट पलायन! यांत कोणता अंगीकारला न कळे. पुण्याहून ही पत्रें आलीं. तुम्हांकडे राजकारण आलें होतें तें प्रस्तुत राहिलें तें व्हावयाचें कठिण. उभयतां

---

१ पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास. २ विसाजीपंत हा इचलकर्जीकर घोरपड्यांचा कारभारी. हा या वेळीं पेशव्यांच्या स्वारींत होता. ३ पळून आलेले. ४ श्री क्षेत्रींच्या म्हणजे पंढरपुरच्या लोकांस जाधवरावाचें पारिपत्य झालेलें ऐकून आनंद होण्याचें कारण, त्यानें चार महिन्यांपूर्वी त्यांचे हालहाल करून त्यांस नागविलें होतें हें होय. ५ गोदावरी नदीवर. ६ पेशव्यांस व तुह्मांस [मोंगलाच्या लष्करास.] ७ उभयतां यजमान पेशवे व दादासाहेब. एकूण असें कांहीं राजकारण पुण्याच्या दरबारी लोकांकडून गोपाळरावाकडे झालें होतें तर ! तें राजकारण काय होतें व कोणाकडून झालें होतें हें मात्र कळण्यास मार्ग नाहीं. बहुधा हें पेशवे व गोपिकाबाई यांच्या लोभांतील कोणी साधारण प्रतीच्या लोकानीं आपण होऊनच केलें असावेंसें वाटतें. असें नसतें तर, " पेशवे व दादासाहेब यांमध्यें वांकडे असावें तें नसल्यामुळें व राजकारण करणारीं माणसें क्षुल्लक असल्यामुळें हें राजकारण सिद्धीस जाणें कठीण; " असें गोविंद हरि न लिहिता.

श.१६८५ पेशवे वऱ्हाडप्रांतीं जातात इ.स.१७६३

मोंगल पाठलाग करितो.

यजमान एकत्र आणि क्षुल्लक मनुष्यें. भलतेंच साहस कर्म होणें कठिण! मुख्य गोष्ट नबाबानीं आजीच्या प्रसंगीं पुणें वांचविलें. नाहीं तर पुण्यास हात लागता तरी पुन्हां वस्तीचा प्रकार नव्हता! सर्कारनामकाच्या मतें आपण अनास्था करून गेलों. यांनीं जाऊन जाळिलें म्हणजे चितपावनांची जाळीच मोडली. परंतु नबाबानीं थोर गोष्ट केली. यांनीं जाऊन शहरावरी हल्ला केली! याणीं या प्रकारचें केलें! बरें! होणार तदनुसार घडलें! नाहक लोक जायां केले. पुढें कोण्या प्रकारचा विचार घडतो न कळे! चिंतार्णवीं आहों. बसावया स्थल नाहीं. चार चौ जागां झालीं आहेत. पुढें कसें होईल हें ही काळजी (आहे.) लग्नाचा प्रकार सिद्धीस गेला पाहिजे. तुमचें येणें होतें कीं नाहीं न कळे! मुजरेद माणसा बरोबर पत्र रवाना करावयाचें देखील तुम्हांस कनुकूल न पडेसें झालें! आडवळणी खबर काडीमात्र कळत नाहीं. दुष्ट शेजारी नानाप्रकारच्या खबरी उठवितात. " श्रीमंतांचे स्नेही " म्हणोन आम्हांस ही कळतें. आम्हीं श्रीमंतांचें अनिष्ठ व्हावें असें इच्छीत नाहीं. परंतु अशा खबरी उठवितात कीं, मागून लोक तुम्हांकडे येतात त्याणीं पळून जावें! त्याच्यानें काय होणार! आपला स्वभाव करतील. त्यांस आमचें [कल्याण] परम असह्य आहे. राजे बहादर [व] तुम्हीं एक या मुळें फारच आकांत करितात. कोणे दिवशीं कसा दगा करितील न कळे! ये विशीं त्यांस हुजुराहून ताकीद

---

१ सिद्धीस जाणें. २ झाला नसता. ३ सखारामबापूच्या. ४ मोंगलानें. ५ पेशव्यानीं. ६ औरंगाबादेवर. ७ ताबडतोब. ८ हें निंबाळकरांस उद्देशून लिहिणें. त्यांच्या जहागिरीचा मुलूख मंगळवेढें व अक्कलकोट यांच्या शेजारीं होता. शिवाय ते मोंगलाचे सरदार व ताबेदार असून आंतून पेशव्यांचे हितचिंतक होते ही गोष्ट सुप्रसिद्ध होती. निंबाळकर व मुरादखान यांची मैत्री फार दिवसांची. ते दोघे ही मोंगलाचा दिवाण विठ्ठल सुंदर याचा द्वेष करीत असत. सांप्रत गोपाळराव पटवर्धन त्या दिवाणाच्या धोरणानें वागत असल्यामुळें त्या दोघांस नकोसा झाला होता. ९ राजेबहादर विठ्ठल सुंदर. १० खुद्द मोंगलाकडून.

मोंगल पाठलाग करितो.

असावीं कीं, "हे[1] त्या प्रांतीं आहेत. तुम्हीं सर्व प्रकारें त्यांच्या साहित्यांत[2] राहणें." ह्मणोन ताकीद असावी. विचारें[3] आलिया करावें. न ये तरी चिंता नाहीं. चिरंजीव दाजी लौकर येतील म्हणोन लिहिलें ते कळलें. आले तर उत्तम होईल. मार्णसें उदंड आहेत. पत्र पाठवीत जाणें म्हणजे लक्ष लाभ होतील. लेखक दौलताबादेस गेले, यजमानास[4] भेटले, त्याचा मजकूर विस्तारें लिहिलें. हे आशीर्वाद.

नं० २१०.

(१९ मार्च)

श्रीगणपतिर्जयति.

श्री हरि गुरु भक्त परायण राजश्री
रघुनाथबावा स्वामीचे सेवेशीं.

चरणरज गोविंद हरि चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत चैत्र शुद्ध पंचमी मंदवासर स्वामींच्या कृपाकटाक्षें करून यथास्थित असों. विशेष. कृपा करून आज्ञा पत्र पाठविलें त्यावरून व राजश्री आबाजीपंतीं सांगितलें त्यावरून सविस्तर कळलें. ऐशास जामखेडची जप्ती

---

१ मंगळवेढ्यांस गोविंद हरि व अक्कलकोटास त्रिंबक हरि व कृष्णंभट कुटुंबा सुद्धां आहेत. २ मदत करावी. ३ विचारास आलें तर. ४ जासूद. ५ बाबूराव फडणीस. ६ पेशवे. दौलताबाद किल्ला पेशव्यांच्या ताब्यांतला असल्यामुळें त्याचा बंदोबस्त नीट राखिला गेला आहे कीं नाहीं हें पहाण्या करितां पेशवे वऱ्हाडांत जातां जातां त्या किल्ल्यावर एकदां जाऊन आले. बाबूराव फडणिसाची व त्यांची तेथें सहज गांठ पडली. ७ हा रघुनाथबावा कोण होता हें ठाऊक नाहीं. पण जामखेड परगण्यांत त्याचें राहणें व उत्पन्नाचे गांव वगैरे असावे, व ते पेशव्यांचे राज्यांत असल्यामुळें त्यांची जप्ती करण्याचें काम गोपाळराव पटवर्धनाकडे मोंगलानें सोंपविलें होतें असें या पत्रावरून उघड होतें. जामखेडची जप्ती गोपाळराव करूं लागला ह्मणजे आपल्या जिनगीची व उत्पन्नाची खराबी होईल तीं न होण्याविषयीं गोविंद हरीच्या द्वारें गोपाळरावाकडे संधान बांधावें ह्मणून या रघुनाथबावानीं गोविंद हरीकडे पत्र देऊन आबाजीपंत नांवाचा कारकून पाठविला होता. सदरहू पत्राचें हें नं० २११ चें पत्र उत्तर आहे.

श.१६८५ पेशवे बऱ्हाडप्रांतीं जातात इ.स.१७६३

मोंगल पाठलाग करितो

चिरंजीवांकडे जाहली हें कांहीं स्याणी आम्हांस लिहिलें नाहीं. व ऐकिलें ही नाहीं. स्वामीनीं लिहिले वरून कळलें, त्या वरून चिरंजीवास पत्र लिहून दिलें आहे. आपले आज्ञेप्रमाणेंच लिहिलें आहे. वरकड आम्हांकडील वर्तमान स्वामीनीं परस्परें ऐकिलेंच आहे. सावनूर बंकापुराकडे मंडळी होती ती सर्व अक्कलकोटास आली. तेथें कुटुंबें व तीर्थरूप राजश्री दादा व राजश्री त्रिंबकपंत आपा राहिले. आणि चिरंजीव मोरोबा आबा व कोन्हेरराऊ व वामनराऊ व परशुरामभाऊ हे फौज हत्ती बुनगें घेऊन मागून लष्करास गेले. नागतळ्याचा घांट उतरोन गंगेच्या मुक्कामीं चिरंजीवांस भेटले. आम्हीं येथें आहों. स्वामीचा कृपाकटाक्ष वज्रपंजर होता, या मुळें दीड महिना मिरजेच्या वेढ्यांत होतों; परंतु संतोषरूप होतों. निघालों तेव्हां नक्षत्रानेंच निघालों. श्रीपंढरीनाथें कोणे ही गोष्टीचें न्यून पडों दिलें नाहीं. सविस्तर राजश्री आबाजीपंत सांगतां विदित होईल. बहुत काय लिहिणें. कृपा केली पाहिजे. हे विज्ञापना.

नं० २११L

(चैत्र शुद्ध सप्तमी
२१ मार्च.)

श्री.

तीर्थरूप मातुश्री बाई वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें माधवरायानें चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार. विनंती उपरी. येथील क्षेम तागायत छ० ९ रमजान मुक्काम मलकापुर प्रांत बऱ्हाड येथें वडिलांचे आशीर्वादें करून सुखरूप असों. विशेष. इकडील वर्तमान तर मोंगल शहरास दाखल जाहल्याचें वर्तमान पूर्वी सेवेशीं लिहि-

१ कुटुंबांतील माणसें. २ वडील बंधु कृष्णभट. ३ गोदावरीच्या तीरच्या मुक्कामीं. ४ गोपाळरावास. ५ मंगळवेढ्यांस. ६ दरारा राखून. ७ हें पेशव्यांचें गोपिकाबाईस पत्र. ८ औरंगाबादेस.

मोंगल पाठलाग करितो.

लेंच आहे. त्यावरून विदित झालें असेल. त्याअलीकडे मोंगल देखील मराठे कूच करून चिखलठाणचे मुक्कामीं आले. पुढें सडे होऊन आठ आठ दहा दहा कोसांच्या मजली करून आमचा पिच्छा करावा असा त्यांचा मनसबा आहे. अलीकडे बातमी आली नाहीं. आलियावरी सविस्तर लिहून पाठवीन. तूर्त त्यांसीं गांठ घालीत नाहीं. त्यांजकडील मनसबा जसजसा आढळत जाईल तदनुरूप आम्हीं वर्तणूक करूं. सड्या फौजा पुढें उत्तेन आल्या तर खामखां गांठ घालून झुंज करावें लागेल. सारेच मोंगल सुद्धां आले तर तूर्त गांठ पडणार नाहीं. प्रस्तुत त्यांस आम्हांस चाळीस पन्नास कोसांचें अंतर आहे. वडिलांस कळावें. दोन चार पत्रें पाठविलीं परंतु जाब आला नाहीं, त्या वरून चित्त सचिंत आहे. तर उत्तर पाठवावयासीं आज्ञा केली पाहिजे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

पैा॥ छ० १६ रमजान.

नं० २१२

[२४ मार्च.]

श्रीगणपतिर्जयति.

चिरंजीव राजश्री रावसाहेब यासीं प्रती गोविंद हरि आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत चैत्र शुद्ध दशमी गुरुवासर यथास्थित जाणून कुशल लिहणें. विशेष. तुम्हीं बंकापुरेंचें पत्र माणसा बरोबर पाठविलें तें पावलें. वर्तमान कळलें. प्रस्तुत नबाबाचें लष्कर कोठें आहे? श्रीमंत कोठें आहेत? कोणीकडे चालिले? सड्या फौजा होऊन पिच्छा केला कीं काय? कांहींच वर्तमान कळत नाहीं! कोंकणांत पाटणकराकडे वधूचे योजनेस

---

१ भोंसले, पटवर्धन वगैरे मराठे सरदारांसह. २ मोंगलाशीं. ३ हटकून. ४ गोपाळराव. ५ बंकापुराहून तुह्मांस आलें होतें तें.

मोंगल पाठलाग करितो.

पत्रें पाठविलीं होतीं त्यानीं तीन मुली आठ आठ वर्षांच्या कुलशील उत्तम पाहून लिहिलें त्या वरून आजी घोडीं व माणसें रवाना केलीं. वैशाख शुद्ध पक्षीं लग्नें आहेत, यास्तव त्वरेनें यावें. येतेसमयीं मार्गाचे बहुत सावधपणें यावें. समागमें फौज भारी असावी. दोन हजार स्वार समागमें असावे. चिरंजीव नारायणराऊ व कोन्हेरराऊ व भाऊ व वामनराऊ राहतील. चिरंजीव भास्करपंत आपा राहतील. चिरंजीव आबास जरूर ठेवणें झालें तरी ठेवावें. नाहीं तरी समागमें घेऊन यावें. चिरंजीव नीलकंठराऊ यांस समागमें घेऊन यावें. चिरंजीव भास्करपंत एखादा चिरंजीव पाठवितील तर घेऊन येणें. चिरंजीव आबा येथें आले तरी कार्याचेच आहेत. खेटपट आहे. त्यांस ही आणावें. जरूर ठेवावेसें झाले तर आमचा उपाय नाहीं. चिरंजीव नीलकंठरायास अगत्य घेऊन येणें. अवकाश थोडा राहिला यास्तव त्वरेस मोल आहे. निरोपें घेऊन येणें. चिरंजीव दाजीची रवानगी केलीच असेल. नसली तरी त्यास ही अगत्यरूप समागमें घेऊन येणें. श्रीमंतें चांदवडाकडे गेले होते, होळकर यास घेऊन गेले किंवा कसें झालें? तहावरी गोष्ट येईल म्हणत होतों, परंतु (श्रीमंतानीं) अविवेकावरी नेलें कीं काय न कळे! लेखक शहरीं होते त्यांची तुमची भेट जाहली कीं नाहीं न कळे. हें पत्र पावतांच निघावयाची तरतूद करून पुढें पत्रें टाकोटाक रवाना करणें. पत्रें पाठवावया आळस न करणें. बहुत काय लिहिणें. लोभ असों दीजे. हे आशीर्वाद.

---

१ ही गोपाळरावाच्या दुसऱ्या लग्नाची तयारी. (पहा नं० २०८ चें पत्र.) गोपाळरावाचें वय या वेळीं पस्तिशीच्या सुमारें होतें. तथापि त्यास मुली पहाण्यांत आल्या त्या आठ आठ वर्षांच्या होत्या हें हल्लींच्या काळांत ध्यानांत ठेवण्या जोगें झालें आहे! २ लष्करांत राहतील. ३ 'मोरोबा आबा खटपटी असल्यामुळें लग्नाची खटपट उरकण्यांत त्याचा उपयोग होईल' असा अभिप्राय. ४ मोंगलाची परवानगी घेऊन. ५ मल्हारराव होळकर चांदवडास होता त्यास घेऊन येण्या करितां दादासाहेबानीं लष्करांतून पेशव्यांची रवानगी केली होती. ६ बाबूराव फडणीस औरंगाबादेस राहिला होता त्याची.

श.१६८५ पेशवे वऱ्हाडप्रांतीं जातात. इ.स.१७६३

मोंगल पाठलाग करितो.

नं० २१३

(२५ मार्च.)

रामाजी नारायण गोखले यांचें पुण्याहून गोविंद हरीस पत्र

चैत्र शुद्ध एकादशीचें—

" श्रीमंत कासारखारी उतरोन गेले. समागमें फौज पंधरा [?] हजार पावेतों आहे. जाधवराव देवगिरी पैर्वतारूढ झाले. नगर पावेतों अविंधाचा अम्मल वसला. गणेश विठ्ठल वागमोरे यांचे घरीं लिहिलें आलें. राजश्री मल्हारजी होळकर याचे समजाविशीविशीं मजकूर तर, सखारामबापू व श्रीमंत माधवराव होळकराकडे गेले होते. चांदवडास भेटी झाल्या. त्यांस होळकर यार्णी प्रत्युत्तर दिलें कीं, " तुम्हीं पुढें जाणें. आम्हीं मागाहून फौज नवे नालबंदीची व किरकोळ जमा करून येतों. म्हणोन सांगितल्यावरून उभयतां बारी उतरोन थोरले श्रीमंतांजवळ गेले. त्यांस श्रीमंत दादासाहेब बोलिले जे, " तुम्हीं आणि नीलकंठ महादेव व विठ्ठल शिवदेव असे पुण्यास जाणें. आम्हीं दोन तीन हजार फौज घेऊन हिंदुस्थानांत जातों " त्यास श्रीमंत माधवराव यार्णी पुसिलें कीं, " असें कां ? " त्यास श्रीमंत दादा बोलिले कीं, " तुम्हीं जाणे व तुमचा धंदा जाणे ! अविंध व गोपाळराव व तुम्हींच राज्य करावें ! " येणें प्रमाणें भाषण झालें. तेव्हां सरदार यार्णी उत्तर केलें कीं, " आमचे कबिले दक्षिणेस आणि आम्हीं नर्मदा उतरोन येत नाहीं. " त्या वरून अवसानास खामी झाली. किल्ले सिंहगड यावरी फितूर झाला होता. कल्याणदरवाजा भेदोन पांच सात जण बहिरीच्या देवळा पावेतों आले होते, तों वर्तमान हवालदार यासीं कळतांच [त्यानें] सातजण धरून अटकेत ठे-

---

१ हा पटवर्धनांचा एक कारकून होता. २ कासारखारीचा घांट औरंगाबाद व वऱ्हाड या प्रांतांमध्यें आहे. ३ दौलताबादेच्या किल्यावर कैदी होऊन राहिले. ४ मोंगलाचा. ५ आबा पुरंदरे. ६ कुटुंबें. ७ कर्मापणा.

विले व दरवाजेकरी यांसीं बिड्या घातल्या. ते नांव कोणाचें अजून सांगत नाहींत. सचिव यांचा किल्ला राजगड, त्याजवरी हबशी याचा परवारी होता त्याजवळ कांहीं कागद पत्र सांपडले. त्यास तोफेच्या तोंडीं दिलें. "

नं० २१४

[चैत्र शुद्ध एकादशी
२५ मार्च.]

श्री.

तीर्थरूप मातुश्री बाई वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें माधवरायानें चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान तागायत छ० ९ रमजान मुक्काम फरदापुर येथें वडिलांचे आशीर्वादें करून सुखरूप असों. विशेष. वडिलांकडे दोन चार पत्रें पाठविलीं, परंतु एका ही पत्राचा जाब आला नाहीं. असें न व्हावें. सदैव तिकडील वृत्त आशीर्वादपत्रीं लिहावयास आज्ञा केली पाहिजे. इकडील वर्तमान तर आम्हीं मल्हारबास समागमें घेऊन मजल दरमजल मलकापूर पावेतों गेलों. मलकापुरची खंडणी पंचेचाळीस हजार पर्यंत जाहली. मलकापुरीं तीन मुक्काम झाले. तों मोंगल व जानोजी भोंसले एकत्रच होते ते शहरांतून[1] नीट उंदेरीच्या घांटास आले. आज काल घांट उतरून बाळापुर पर्यंत आले असतील. आम्हीं आज मुक्काममजकुरास आलों. उदईक घांट चढोन औरंगाबाद[2] उजवी टाकून धारूरचे रोखें जाऊं. आम्हीं तिकडे गेल्या नंतर ते[3] मनसबा काय करतील हें पहावें. त्यांचा मनसब जसा दृष्टीस पडेल त्या प्रमाणें जें करणें तें करावें लागेल. राजश्री मल्हारराव[4]

---

१ हें पेशव्यांचें गोपिकाबाईस पत्र. २ औरंगाबादेहून. ३ मोंगल, भोंसले वगैरे. ४ मल्हारराव रास्ते. [गोपिकाबाईचा बंधु.] हे बागलकोटास होते तेथून या वेळीं वऱ्हाडांत जाऊन पेशव्यांच्या लष्करास मिळाले.

श.१६८९ पेशवे पुनः औरंगाबादेकडे येतात इ.स.१७६३

मोंगल पाठलाग करितो.

भिकाजी छ० ७ रमजानीं मलकापुरचे मुक्कामास येऊन भेटले. वडिलांस कळावें ह्मणून लिहिलें असे. होईल वर्तमान तें मागाहून सेवेशीं वरचेवर लिहून पाठवूं. मोंगलानें बिघाड केला ह्मणून तेंच थोडेसे पस्ताई पडले आहेत व पेगाम ही सुभेदाराकडे आला आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना. पैा॥ छ० १८ रमजान.

मं० २१९

(चैत्र शुद्ध त्रयोदशी
२७ मार्च.)

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वादउपरी. नबाब शहरास गेल्यावरी शहरीं किती दिवस होते, जरारे होऊन बाहेर निघाले किंवा अद्याप शहरींच आहेत, श्रीमंत कोणे स्थलीं आहेत, हें वर्तमान काडीमात्र कळत नाहीं. तुम्हीं तमाम सरदार सडे होऊन पिच्छा करावयास जाणार होतां, तुमची रवानगी कां न केली? याचा अर्थ काय? किंवा अद्याप शहरींच आहां? नरसिंगरावं धायगुडा आला त्याचा निभाव ते फौजेंतून इकडे यावया कोणे प्रकारें जाहला हें लिहावें. राजश्री मल्हारराव होळकर चांदवडीं होते, त्याजकडे मुख्य श्रीमंत व सखारामपंत व विठ्ठल शिवदेव व नारो शंकर गेले होते, होळकर चांदवडच्या किल्ल्यावरी गेले ह्मणोन ऐकिलें, तें वर्तमान विस्तारें लिहावें. श्रीमंत कासारबारीनें होऊन (त्यानीं) वऱ्हाडचा रोंख धरिला म्हणतात. कोणी म्हणतात हिंदुस्थानचा रोंख धरिला. कोणी म्हणतात बागलाणचा रोंख. कांहींच कळत नाहीं! (तुमचे) वीस पंचवीस मुक्काम शहरीं पडले. या

१ मोंगल. २ होळकराकडे मोंगलाकडून तहाचें बोलणें आलें आहे. ३ पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास. ४ औरंगाबादेस. ५ नरसिंगराव धायगुडे श्रीमंतांच्या फौजेंतून मोंगलाकडे पळून गेला. ६ माधवराव पेशवे. ७ कासारबारीच्या घांटाकडे जाऊन.

श.१६८५ पेशवे पुनः औरंगाबादेकडे येतात इ.स.१७६३
मोंगल पाठलाग करितो.

उपरी इतके फौजेची गुदरानी लुटीवरी कशी झाली ? आसपास वीस कोशीं मुलूख सत्यानास झाला असेल ! भोंसले कोठें आहेत ? जाधवराऊ याजवरी [श्रीमंतानीं] आरोप काय ठेविला ? त्याणीं जीव नाश केला म्हणतात, तें विस्तारें लिहिलें पाहिजे. इकडील वर्तमान तरी बर्वे यांची फौज कागलास गेली होती. नरसिंगराऊ तेथेंच होते. राणीकडील फौज आली. वेढा बसला. इतक्यांत बर्वे दोघे भाऊ पैकीं एक उठोन देशास गेले. एक भाऊ दीड दोन हजार व नरसिंगराऊ व करवीरची फौज मिळोन चार हजार स्वार व कांहीं प्यादे मिळोन गोळागोळी होऊं लागली; म्हणोन कुरुंदवाडाहून पत्र आलें तेंच पाठविलें आहे. त्यावरून कळेल. इकडील वर्तमान येथें आम्हीं आहों. उभयतां तीर्थरूप व कुटुंबें अक्कलकोटीं आहेत. सदैव तुम्हांकडील पत्राचा मार्ग लक्षितात. दुसरा ध्यास नाहीं. काली द्वादशी मंदवारीं सोलापुराहून दोन तीनशें स्वार व चारशें प्यादे दोन तीन तोफा येऊन (त्यानीं) भंडारकवठें लागलेंच तिसरे प्रहरीं घेतलें. अस्तमानीं वेढा आला म्हणोन खबर आली. प्रहर रात्रीं गेले म्हणोन खबर आली ! राजश्री गमाजी बावाकडील शिंद्याचे पाऊणशें प्यादे होते. आसरा मदतीचा नाहीं, (म्हणून) त्याणीं बोली करून दिल्हें. हत्यारानिशीं निघोन गेले. कळलें पाहिजे. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद. तुळाजी शिंदे व शिंदोजी कदम वगैरे येथें आले. आजी चार रोज झाले. पुढें त्यांचा निभाव न होय. त्यांस रोजमरा देऊन ठेऊन घेतलें. हे आशीर्वाद.

---

१ एकूण मोंगलाच्याच फौजेनें राजरोसपणें मोंगलाचाच मुलूख लुटिला ! पेशव्यानीं ही असेंच केलें असेल ! खासा धंदा ! २ बर्वे लक्ष्मणपंत व कृष्णराव असे उभयतां बंधु व नरसिंगराव उद्धव यांची कुमक घेऊन कोल्हापूरकर राणी जिजाबाई हिनें कागलकर घाटग्यांशीं युद्ध सुरू केलें होतें, त्यास अनुलक्षून हें लिहिणें. ३ कृष्णंभट बर्वे. ४ पुण्यास. ५ मंगळवेढें येथें. ६ वडील बंधु कृष्णंभट व त्रिंबकपंत आपा. ७ या वरून हें गांव मंगळवेढें व सोलापुर या दोन्ही ठिकाणांहून प्रहर दोन प्रहरांच्या घाटेवर असावें असें दिसतें. हें गांव या वेळीं प्रतिनिधीच्या ताब्यांत होतें. ८ येथून मोंगलाच्या लष्करांत तुम्हीं आहां तिकडे यावयास.

श.१६८९ पेशवे पुनः औरंगाबादेकडे येतात इ.स.१७६३
मोंगल पाठलाग करितो.

नं० २१६

(१ एप्रिल.)

श्रीशंकर.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
गोविंदपंत नाना स्वामीचे सेवेशीं.

पोष्य त्र्यंबकराव[1] विश्वनाथ कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल बहुल तृतीया पर्यंत चिंचवाडानजीक किवळें म्हणून लहानसा गांव आमचा आहे त्या गांवीं तूर्त सर्व मनुष्यें सुद्धां सुखरूप असों. विशेष. मिरजेचे मुक्कामीं होतों, परंतु कालकृत[2] प्रतिबाध, त्या मुळें भेट न झाली. राजश्री पुरुषोत्तमराव भेटले परंतु सावकाश बोलावयास गांठ न पडली. परंतु परस्पर मनोमन साक्ष आहेः ईश्वरें मोठे संकटांत तुमची अब्रू रक्षिली तुमचें पुण्य उभें राहिलें. नाहीं तर बाकी राहिली मन्हती. वरकड सर्व तुम्हांस कळतच आहे. आम्हीं लिहावेसें नाहीं. सोइरे धायिरे इष्ट यांच्या परीक्षा या काळीं बहुतांच्या झाल्या! राजश्री गोपाळराव (यांचा व) सर्व (पटवर्धन) मंडळीचा ऋणानुबंध कृतिम पडला. त्यापासून कायावाङ्मनसा परस्परें दुसरा भाव नाहीं. गोपाळरायाचीं एक दोनदां पत्रें आलीं होतीं. आमचें ही पत्र (व) निरोप गेला होता. प्रस्तुत आम्हीं पेचांत दोन महिने आहों. पुढें सर्व प्रकारें लौकिक रक्षण्याविषयीं स्वरूपा प्रमाणें चिरंजीवांची[3] सोयी करणें ते राव मशारनिल्हे याणींच बोलून चालून ठीक

---

१ हें त्रिंबकराव मामा पेठे याचें गोविंद हरीस पत्र. २ मिरजेस वेढा पडला होता तेव्हां त्रिंबकराव मामा पेशव्यांच्या लष्करांत होता. तो पटवर्धनांचा मित्र असल्यामुळें दादासाहेबांची त्यावर विशेष इतराजी होती. असें असल्यामुळें गोविंद हरीशीं दळण वळण ठेवण्यास त्यास सक्त मनाई असणें साहजिकच होतें. ३ मोंगलाच्या फौजेंत गोपाळरावाच्या द्वारें आपल्या मुला करितां सरदारी मिळविण्याचा त्रिंबकराव मामाचा हेतु या उल्लेखावरून उघड होतो.

करून ठेविल्यास दसऱ्याचे हंगामीं सर्व पेंच उलगडून गोष्ट घडणें तें घडून येईल. तूर्त तर उगेच स्वस्थ आहों. ईश्वरें केल्या गोष्टीचा शेवट—उसनें पारणें फेडिलें—तर जितके आम्हीं समदुःखी तितक्यांचें मन समाधान होईल! श्रीमंत[1] तर बाल राजा. ज्येष्ठ[2] तर निर्विकारी. भरंवसा शब्दाचा नाहीं. ऐसा प्रसंग असतां पुढें परिणाम लागणें कळत आहे. यास्तव सूचना आपणास लिहिली आहे. आपण वडीलपणें गोपाळरायास लिहून शोध आणवून उत्तर लेहून पाठवावें. त्या लक्षा प्रमाणें आम्हीं वर्तणूक करूं. फार सावध निर्भय स्थलींच रहावें. कोणेविशीं भरंवसा विश्वास या उपर कोणाचा धरूं नये. ईश्वरें एकदां संकटांत रक्षिलें. त्यांच[3] गृहस्थाचा पुन्हा विश्वास धराल तर उचित नाहीं. ते वेळेस तुमचें पुण्य उभें राहिलें. आपलेकडील नवल विशेष सर्वदां लिहून संतोषवीत जावें. राजश्री त्रिंबकपंत[4] आपा[5] कोठें आहेत, काय वर्तमान, तें लिहावें. त्यांस आमचा नमस्कार लिहून पाठवावा. बहुत काय लिहिणें. लोभ असों दीजे. हे विनंती.

नं० २१७

[२ एप्रील.]

श्री.

श्रीमंत राजश्री गोविंदपंत[6] नाना यांसी.

सेवक सदाशिव बल्लाळ वैद्य मुक्काम पुणें, कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत चैत्र वद्य चतुर्थी भृगुवार पर्यंत यथास्थित असे. विशेष. इकडील राजकीय वर्तमान तर चैत्र शुद्ध षष्ठीस यवन[7] शहरांतून सडे स्वा-

---

१ माधवराव पेशवे. २ ज्येष्ठ ह्मणजे दादासाहेब. त्यांस 'मूर्ख' ह्मणण्या ऐवजीं 'निर्विकार,' 'भोळे,' इत्यादि विशेषणें देणें या दरबारीभाषेच्या पद्धति होत! ३ ज्यानें तुह्मां आह्मांस संकटांत पाडलें त्या सखारामबापूचा. ४ त्रिंबकपंत आपा कुरुंदवाडकर. [गोविंद हरीचा वडील बंधु.] ५ हा गोविंद हरीचा एक कारकून होता. ६ औरंगाबादेतून.

श.१६८९ पेशवे पुनः औरंगाबादेकडे येतात इ.स.१७६३

मोंगल पाठलाग करितो.

रीनिशीं सर्व मराठी फौजेसह श्रीमंतांचे पाठीवर गेले. श्रीमंतांचा मुक्काम अष्टमीस पे॥ बेदवाड प्रांत खानदेश येथें होता. फौज बराबर चाळीस हजार पर्यंत आहे. बऱ्हाडास जाणार. मल्हारजी होळकर यांची भेट चाळीसगांवचे मुक्कामीं झाली. दोन तीन हजार फौज होळकराबराबर आहे. समस्त कारभारी यांचे मतें यवनाशीं सख्य न करावें. प्रस्तुत षड्ग्रही योग आहे, यास्तव महिना पंधरा दिवस यवनाशीं गांठ न घालावी. वैशाख मासीं एक वेळां युद्ध बरेच रीतीनें करावें. यवनानें फारच दाटी करून बऱ्हाडचा मार्ग रोधिला तर श्रीमंतांनीं शहरास येऊन उपसर्ग द्यावा. युद्ध न करावें. डावे उजवे यवनाचे सैन्याशीं बारा पंधरा गांवें अंतर असावें. या रीतीचा मनोदय श्रीमंतांचा व समस्त कारभारी यांचा आहे. ईश्वर इच्छेनें घडेल तें खरें! मिरजेच्या पेंचांतून (आपणास) श्रीनें सर्वांचें रक्षण करून कोणास शरण न जातां काढिलें. आजच बाजारी अफवा आली आहे कीं श्रीमंत माघारे फिरले. अजिंठ्याच्या घांटानें येणार अशी वदंता आहे. लेख कोणाचा नाहीं. राजश्री सदाशिव रामचंद्र यवनाकडे गेले हें पूर्वीच आपण ऐकिलें आहे. कदाचित् श्रीमंत फिरोन शहरास आले तर येथें ही गडबड होईल. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं० २१८

(अजमासें चैत्र वद्य
एप्रिलचा प०पंधरवडा.)

गोपाळराव गोविंद याचें गोविंद हरीस पत्र—

" आम्हीं घांट उतरोन उंदेरीचा गेलों दोन मजली तों श्रीमंत मलकापुरावरून मागती माघारे फर्दापुरच्या घांटानें शहरचा रोंख धरून निघाल्याची बातमी आली. लागलेंच कूच करून आल्याच मार्गें माघारे फिरून उंदेरीचा घांट चढून आलों. आज येथून कूच करून फरकाबादेवर (?) जातों. तेथून पुढें त्यांचा रोंख असेल त्या रोखें जाऊन गांठ घालावी हेच

कस्त आहे. ते दौड देऊन गांठ घालीत नाहींत. हरतऱ्हेनें चुकांड्या देत फिरावें आणि वैशाखमास घालवावा ऐशी त्यांची मसलत आहे. अद्यापि तहाची बोली नाहीं. होळकर त्यां समागमें आहेत. या उपरी संधान लागेल तर न कळे! पंधरा वीस रोज चुकांड्या देतीलसा सुमार दिसतो."

नं० २१९L

[चैत्र वद्य पंचमी
२ एप्रिल]

श्री.

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य राजश्री रामचंद्र[1] नारायण गोसावी यांसी—सेवक माधवराव बल्लाळ प्रधान. नमस्कार. सु॥ सलास सीतैन मयाव अलफ. तुम्हांकडून पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं; त्या वरून अपूर्व वाटतें. तरी असें न करणें. निरंतर पत्र पाठवीत जाणें. इकडील वर्तमान तरी खासा स्वारी खडकत प्रांत केडवली येथें दाखल झाली. मोंगल माहुरावरी आहे. पुढें जें होतां होईल तें खरें. तीर्थरूप मातुश्रीची मर्जी व शरीरभावना कैसी आहे तें वरचेवरी लिहीत जाणें. छ० १७ रमजान. बहुत काय लिहिणें.

पै॥ छ० २४ रमजान.

नं० २२०L

(चैत्र वद्य पंचमी
२ एप्रिल.)

श्री.

तीर्थरूप मातुश्री बाई वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें माधवरावानें चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना.

---

१ रामचंद्र नारायण गोरे हा गोपिकाबाईचा एक विश्वासू कारकून होता. २ २ हें पेशव्यांचें गोपिकाबाईस पत्र.

श.१६८९ पेशवे पुनः औरंगाबादेकडे येतात इ.स.१७६३

मोंगल पाठलाग करितो.

येथील क्षेम तागायत छ० १७ रमजान. खडकत नजीक करमाळें येथें वडिलांचे आशीर्वादें करून सुखरूप असों. विशेष. वडिलीं पत्र पाठविलें तें पावून लिहिला अर्थ सविस्तर कळों आला. इकडील वर्तमान तर अजिंठ्याच्या घांटापासून झालें वर्तमान पूर्वी लिहून पाठविलेंच आहे. त्या अलीकडे आम्हीं मजल दरमजल कूच करून औरंगाबादेवरून या मुक्कामीं आलों. मोंगल मराठे बऱ्हाडचा [?] घांट उतरून खालीं गेले होते ते मागती घांट चढून मजल दरमजल पिच्छा करीत आले. काल मुक्काम त्यांचा मुंगीवर गंगातीरीं होता. आज अलीकडे येतील. अद्यापि बातमी आली नाहीं. नबाबास मागें ठेऊन सर्व सरदार व विठ्ठलपंत असे रातवों[2] खपून जलदीनें येणार. झुंजाचा दम बराच आहे. त्यांजकडील मराठे सुद्धां चाळीस हजार आहेत. बहुत करून उद्यां परवां गांठ पडेल. आपली ही फौज तीस पसतीस हजार पर्यंत आहे. खेरीज दोन हजार पेंढार आहे. त्यांनीं गांठ घातल्यास चांगली लढाई होईल. पुण्याकडे आपली फौज नाहीं. ते तिकडे पुण्याकडे फौज पाठविणार ह्मणून बातमी आली आहे. याज करितां आपण सावध राहून किल्ल्यावर जावयाचें करावें ह्मणजे शंभर संशय लोकांचे जातील; यास्तव लिहिलें आहे. तेथें लोक शंभर संशय[3] वडिलांस कळवितात. त्यास तो प्रकार किमपि नाहीं. भेटी नंतर सविस्तर कळेल. सेवेशीं श्रुत होय. हे विज्ञापना.

पै॥ छ० २४ रमजान.

---

१ मोंगलाचा दिवाण विठ्ठल सुंदर राजे बहादर. २ रात्रभर चालून. ३ 'मोंगल पुण्यास येणार, या करितां तुह्मीं सिंहगडावर किंवा पुरंदरावर जलदीनें जाऊन रहा; असें दादासाहेब सांगून पाठवितिल तर तुह्मीं किल्ल्यावर न जातां पुण्यांतच रहा. हरतऱ्हेनें तुह्मांस किल्ल्यावर नेऊन कैदेंत ठेवण्याचा दादासाहेबांचा विचार नसेल असें कशा वरून ? ' असा संशय गोपिकाबाईच्या मनांत कोणी लोक भरवून देत त्या विषयीं हें लिहिणें.

श. १६८५ पेशवे पुनः औरंगाबादेकडे येतात इ.स. १७६३

मोंगल पाठलाग करितो.

नं० २२१

(चैत्र वद्य पंचमी
२ एप्रिल.)

श्रीगणराज.

तीर्थरूप राजश्री दादा वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें मेघश्यामानें[1] चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार. विनंती येथील कुशल तागायत छ० १७ रमजान मुक्काम हिरेनरती परगणे मुळगुंद नजीक कुंदगोळ वडिलांचे आशीर्वादें करून क्षेमरूप असों. विशेष. वडिलीं फाल्गुन कृष्ण सप्तमीचीं आशीर्वादपत्रें पाठविलीं तीं चैत्र शुद्ध चतुर्दशीस पावोन सविस्तर कुशलतेचें वर्तमान कळोन आलें. " श्रीमंतांचा व नबाबाचा बिघाड झाल्यापासून (श्रीमंत) शहरास गेले. पुरेवर हल्ला केली. तेथें खराबी झाली. दोन लाख रुपये घेऊन पुढें चांदवडास होळकराकडे श्रीमंत गेले. नबाब पुण्या साताऱ्याचा रोंख सोडून शहरास आले. पुढें दरमजल गांठ घालावी असा प्रकार झाला व होणार " ऐसा विस्तारें अर्थ लिहिले वरून कळों आलें. अलीकडील वर्तमान कळत नाहीं. सविस्तर लिहावया आज्ञा करावी. बहुत करून सल्ल्यावर पडलें असेल. नसल्यास मुख्य प्रधानपंतास अधिकार होऊन सल्ला होय, दुर्तफा कल्याण, तेंच वडील करतील. सल्ला जाहल्यास यश आहे. राज्यास क्षेम असे. सदाशिव रामचंद्र व धायगुडे व रामचंद्र कृष्ण नबाबाकडे आल्याचा मजकूर कळला. जाधवरायास कैदेंत घालोन गोट लुटिल्याचें वर्तमान कळलें. श्रीमंतांस मारेकरी घातले यास्तव इतराजी जाधवरावावर जाहली; असें वर्तमान ऐकण्यांत येतें. या नंतर वडिलीं लिहिलें जे, (श्रीमंतानीं तिकडून) बर्वे, रास्ते[2] माघारे आणविले तेव्हां (त्यांणीं) घेतलीं टाणीं तुम्हीं उठवि-

१ मेघश्यामराव कृष्ण पटवर्धन मंगळवेढेकर यांचें हें गोपाळरावास पत्र. हे दोघे एकमेकांचे चुलत बंधु. २ मोंगलाचें व श्रीमंतांचें. ३ मल्हारराव रास्ते. बर्वे ल-

श. १६८५ पेशवे पुनः औरंगाबादेकडे येतात इ.स. १७६३
मोंगल पाठलाग करितो.

लींच असतील ह्मणोन आज्ञा, त्यास तीर्थरूप राजश्री आबा[1] येथून गेले तेव्हां आधींच अवसान ऐवज देखलगिरीनेंच गेल. कोणे प्रकारें वडिलांचीं ठाणीं राहून माझ्या माथां अपकीर्त न यावी हें मात्र इच्छित आहों. ठाण्याच्या शिबंदीस अद्यापवर महालचा अथवा वडिलांकडील पोत्याचा पैसा पावला नाहीं. नापीक झालें असतां डोळे झांकिले. बे मुरवत वसूल एक हिसा घेतला. बाकी निम्मे राहिली त्यास बर्वे आल्या प्रसंगीं रयत पळाली तीच येऊन लावणी होणें कठीण आहे. शिलेदारांच्या नालबंदीस आबानीं ऐवज देविला तरी कांड व पैडलीं घोडीं सुद्धां ऐवज मोबदला उगवला नाहीं. कर्ज वाम हरकसें करून हे दिवस घालविले. पुढें उदराचे कठिण! भगवान् कसा लज्जा राखीलसें झालें आहे. त्यांत चौंकडील दंगा प्राप्त आहे. हें सवेशीं कळावें. आज्ञे प्रमाणें बाहेर निघोन येथें आलों. राजश्री

क्ष्मणपंत व कृष्णराव. बर्व्यांस दादासाहेबांनीं पटवर्धनांची कर्नाटकांतील जहागीर दिली होती ती ताब्यांत घेण्यासाठीं ते रास्त्यांस मदतीस घेऊन तिकडे गेले होते.

१ मोरोबा आबा. २ आमचें सामर्थ्य किती, आह्मांस द्रव्याचें आनुकूल्य किती हें समजून घेऊनच. ३ सरकारी कामगिरीवर शिलेदारांचीं घोडीं पडलीं तर फौजेवरील सरदारानें एक तर आपल्या खासपागे पैकीं तितक्या किंमतीचीं घोडीं शिलेदारांस तत्काळ द्यावीं किंवा किंमतीची रक्कम पदरांत घालावी या प्रमाणें शिरस्ता असे. शिलेदार सरदाराच्या दारांत धरणें बसवून रोख किंमत किंवा मोबदला घोडें घेत तेव्हां त्यास सोडीत! मेलेल्या घोड्याची किंमत चार वजनदार शिलेदारांची पंचाईत बसून तींत जी ठरे ती सरदारास मुकट्यानें द्यावी लागे. अशा घोड्याची किंमत दोन दोन अडीच अडीच हजार रुपये पर्यंत परशुरामभाऊस द्यावी लागल्याचे दाखले सांपडले आहेत! इ. स. १७८१ च्या मार्च महिन्यांत जनरल गादर्दाच्या सैन्याशीं परशुरामभाऊच्या ज्या कित्येक निकराच्या चकमकी झाल्या त्यांत पटवर्धनांचे घोडे फार पडले. त्या संबंधाच्या कांहीं यादी आम्हीं मासल्या करितां त्या सालचीं पत्रें छापताना छापूं. त्या यादींतून पडलेल्या घोड्यांच्या किंमती पांचशें, सातशें, आठशें, बाराशें पर्यंत सुद्धां लाविलेल्या आहेत. आणि तीं मेलेलीं घोडीं तर अगदीं साधारण शिलेदारांचीं होतीं!

श.१६८५ पेशवे पुनः औरंगाबादेकडे येतात इ.स.१७६३

मोंगल पाठलाग करितो.

गोविंदपंत[1] मामा बंकापुरकर आले आहेत. दोन्ही नरत्या व नारायणपुर घेतलें. नरतीवर [आमचें] माणूस फार जाया झालें. बुराणशहा करोल ठार झाला. चांगला सोवती होता. मनों करीत असतां मृत्यूनें नेला! या उपरी परराज्यांत देशचें माणूस लहान कामावर खर्च न करावें अशी बुद्धि झाली. विचारें करणें तें करीत आहों. मुळगुंद व हुबळींत प्यादे[2] स्वार[3] (यांची) जबरदस्ती आहे. आम्हीं जाऊन फसों असें पाहून येथेंच आठ दहा मुक्काम केले. राजकारणें लागलीं आहेत. लागभाग पाहून जरब एखादे जागां देऊन कार्य जाहल्या करतों. कुमक हरीविना कोणाची नाहीं! राजश्री भास्करपंत नरगुंदकर देखील कडेचे पोहणारे! बदलींमीस भितात. कुमक देत नाहींत. आम्हीं बेखैर्च जाजती फौज ठेवणें कसें घडतें? असो. आपले मान प्राण राखोन करणें (तें) करितों. येथें येते समयीं मौमानीं तडस[4]ची एक गढी घेतली. मुळगंदकर जमीदाराच्या दोन आम्हीं घेऊन आलों. याउपरी घडेल तें लिहून पाठवूं. आपाजी राम मंगेशपुत्र हुबळीस आहेत. पैकेकरी, त्यास जमावास काय उणें असे! आम्हांस कर्ज देखील देणार आप्त कोणी नाहीं असा प्रकार असे. तीर्थरूप राजश्री नानां मंगळ-

---

१ हा बंकापुरचा किल्लेदार गोविंदपंत सखदेव. पुढें थोड्याच महिन्यानीं हैदरअल्लीनें बंकापुरास वेढा घातला तेव्हां तें ठाणें यानें दोन महिने पर्यंत मोठ्या शौर्यानें झुजविलें. दुसऱ्या अंकांतील नं० ४० चें पत्र यानेंच लिहिलें आहे. २ जीव धोक्यांत घालूं नको असें सांगत असतां बुराणशहानें ऐकिलें नाहीं त्यामुळें तो ठार झाला. ३ हे प्यादे व स्वांर पटवर्धनांचे या वेळीं प्रतिस्पर्धी झालेले वर्वे यांचे होते. ४ वेइमान. भास्करराव भावे नरगुंदकर हे पेशव्यांचे सरदार असल्यामुळें जरी पटवर्धनांचें व त्यांचें सख्य होतें तरी हल्लींच्या स्थितींत पटवर्धनांस मदत केल्यानें आपण पेशव्यांशीं बेइमानानें वागल्या सारखें होईल असें त्यांस वाटणें साहजिकच होतें. ५ भलताच खर्च. ६ गोविंदपंत मामा सखदेव बंकापुरचे किल्लेदार. ७ तडस परगण्यांतील. तडस हें गांव धारवाड व कारवार या जिल्ह्यांचे सरहद्दीवर शिगांवच्या वायव्येस दहा मैलांवर आहे. धारवाडाहून कुमठ्यांस जाणारी सडक याच गांवावरून जाते. ८ आपाजीराम मंगेश हा कोण! 'तो पैसेवाला असल्यामुळें फौज फांटा पुष्कळ जमविण्यास समर्थ आहे. आमच्यानें मात्र तसें होणार नाहीं.' असा लिहिणाराचा अभिप्राय. ९ गोविंद हरि.

वेढेंत आहेत. तीर्थरूप राजश्री बापाजी[1] व आपा अक्कलकोटीं आहेत. पत्रें येत असतात. विदित होय. हैदर नाईक विदनुरीं आहेत. मीरफैजुल्लाखान[2] हरिहर बसवापट्टण आदिकरून ठाणीं घालावया रवाना झाले. अद्याप पत्राचीं उत्तरें न आलीं. वीरसेटी[3]च्या गुमस्त्यास पत्र हरिहराहून निघणेंविशीं आलें, म्हणोन घाबेरपणें पत्रें राजश्री लक्ष्मण[4] हरीचीं आलीं आहेत. फौज निघाली. सौंदेकेंडे आधीं येतील असें ही वर्तमान आलें आहे. नबाबाचीं[5] पत्रें तालुक्याविशीं हैदरनाइकास देऊन सांडणीस्वार गेला. परंतु त्याच्या खातरेंत कोणी नाहीं! बर्वे व नरसिंगराव पागे कागलावर आहेत. कागल

---

१ बापाजी व आपा हीं अनुक्रमें कृष्णंभट व त्रिंबकहरी यांचीं नांवें. २ मीरफैजुल्ला हा पराक्रमी सरदार शिरें येथील मोंगल सुभेदाराचा कोणी आप्त होता. इ.स. १७५८ त बाळाजी बाजीराव पेशव्यानीं शिऱ्यांचा सुभा काबीज केला तेव्हां त्यानीं यास थोडी जहागीर दिली होती तिजवर तृप्त न होतां हा पानपतच्या लढाई नंतर मराठी राज्यांत जी अव्यवस्था व धामधूम झाली तींत हैदरअल्लीस अनुकूल झाला. हैदरअल्लीनें कर्नाटकांत जें एवढें मोठें राज्य स्थापिलें व त्याचा झपाट्यानें उत्कर्ष होत गेला त्यास पुष्कळ अंशीं मीरफैजुल्लाचेच पराक्रम कारणीभूत झाले. ३ महादशेट वीरकर उर्फ वीरशेटी हा पुण्याजवळ वीरवाल्हें गांव आहे तेथील राहणारा लमाणांचा नाईक व श्रीमान् सावकार होता. पेशवे सरकारच्या लष्करास धान्याचा पुरवठा करण्याचें काम यानें नानासाहेब व माधवराव पेशवे यांच्या कारकीर्दीत केलें. थोरले बाजीरावाच्या ही किल्येक स्वांऱ्यांत हा असावासें वाटतें. मराठ्यांचें लष्कर परमुलखांत हिंडूं लागलें. म्हणजे प्रत्येक ठिकाणीं खंडणी वसूल करितांना या महादशेटीचा त्यांस फार उपयोग होई. तो असा कीं, ज्या ठिकाणीं खंडणीचा वसूल रोख न येईल त्या ठिकाणच्या लोकानीं हप्त्या हप्त्यानें रक्कम देण्याची तजवीज महादशेटीच्या मार्फत केली म्हणजे झालें. मराठ्यांकडून त्या ठिकाणास उपद्रव होत नसे. महादशेटीचे गुमास्ते साऱ्या हिंदुस्थानभर पसरलेले होते. प्रस्तुतच्या पत्रांत आलेला गुमास्ता विदनुर संस्थानापासून येणाऱ्या खंडणीच्या वसुला करितां बसवापट्टण येथें राहिलेला होता. ४ लक्ष्मण हरी लागू हा हरिहरचा मामलेदार होता. याचे वंशज हल्लीं सांगलींत राहतात. ५ या स्थलाच्या माहिती करितां पहिल्या अंकांत नं० ४ चें पत्र पहा. ६ 'आमच्या तालुक्यांस तुम्हीं उपद्रव करूं नये अशीं निजामअल्लीनें हैदरास पत्रें पाठविलीं आहेत परंतु हैदर त्यास जुमानीत नाहीं' असा लिहिणाराचा भाव.

श.१६८५ पेशवे पुनः औरंगाबादेकडे येतात इ.स.१७६३

मोंगल पाठलाग करितो.

घेतलें. पुढें पलीकडे येऊन कितुराकडे व या तालुक्यांत यावें हे मसलत आहे. दहा तोफा फिरवीत आहेत. हा शैह[1] त्या पेक्षां हैदरखानाचे जोडीचाच आहे. हरी पार पाडिता असे! नव्या ताकिदा थैल्यापत्रें आम्हांकडे वडिलीं तालुक्याविशीं जलद रवाना करव्या. दोन हजार फौज येथें जथेसें करावें, तरी अब्रू लहान सहान शैहास[2] राहील, ठाणीं टिकतील, असें आहे. होईल तेथवर रक्षीत असों. वडिलीं आपलेकडील सविस्तर लिहावें. सेवेशीं श्रुत होय. या प्रसंगीं पहाडी किल्ला एखादा देशीं[3] संपादावा. यादगिरी[4] तरी घ्यावी. श्रुत होय हे विज्ञापना. जेडें, अनवटीकडे हैदरनाईकाचा जमाव आला. बंकापुरास दंगा होणार म्हणोन पत्रें आतां आलीं, त्या वरून (गोविंदपंत मामा) आपल्या ठिकाणास जावया गेले. बर्वे व नरसिंगराव उद्धव आले. फौज कांहीं पाठवितां तरी अबरू राहील! हे विज्ञापना. तीर्थरूप राजश्री नाना व नीलकंठरावजी व दाजी व आबा वडिलांचे सेवेशीं साष्टांग नमस्कार. विनंती. वडिलांचीं पत्रें पावलीं. मजविशीं चिंता न करावी. जेथवर निभाव तेथवर करीत आहें. समाचारांत रहावें. सविस्तर पत्रावरून कळेल. बहुत लिहिणेंस शक्ति नव्हे हे विज्ञापना. आज पर्यंत निभावलें तें कांहींच नव्हेसा समय आला आहे! कुमक करितां तरीच ठाणीं [व] आम्हीं क्षेम राहतों. फार काय लिहावें! होईल येथवर करीत आहों. श्रुत होय हे विज्ञापना. चिरंजीव राजश्री वामनरावजी व परशुरामपंतभाऊ व कोन्हेरराव यांस आशीर्वाद. लिहिलें

---

१ बर्वे व नरसिंगराव यांचें व हैदरअल्लीचें भय सारखेंच वाळगणें प्राप्त झालें आहे. २ लहानसान ठिकाणें घेण्यास. ३ महाराष्ट्रांत. ४ यादगिरी हें स्थळ मोंगलाईत आहे. ५ जडें व अनवटी हीं स्थळें वंकापुरचे दक्षिणेस २५ मैलांवर म्हैसुरच्या राज्यांत आहेत. ६ या प्रांतीं येत आहेत. ७ पत्र लिहिणाराचा वडील बंधु नारायणराव. दाजी व आबा यांचीं नावें अनुक्रमें पुरुषोत्तमराव कृष्ण व मोरो बल्लाळ. पत्र लिहिणाराचे नारायणराव व पुरुषोत्तमराव हे सख्खे बंधु व बाकीचे दोघे चुलत बंधु. ८ हे तिघे ही पत्र लिहिणाराचे चुलत बंधु.

श. १६८५ पेशवे पुनः औरंगाबादेकडे येतात इ.स. १७६३

मोंगल पाठलाग करितो.

परिसोन लोभ कीजे. हे आशीर्वाद. राजश्री हरीपंत फडणीस व विष्णुपंत व शिवाजीपंत स्वामीस साष्टांग नमस्कार.

नं० २२२

[४ एप्रील.]

श्री.

तीर्थरूप राजश्री दादा[2] वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें सुंदर नारायण चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना येथील कुशल तागायत चैत्र वद्य सप्तमी प्रहर रात्र मुक्काम लव्हेलव्हारें सीनातीर येथें वडिलांचे आशीर्वादें करून यथास्थित असों. विशेष. बैंडिलीं[1] आशीर्वादपत्र विठोजी जासूद व जानू जगदळ्या यांज बरोबर पाठविलें तें पाऊन परम संतोष झाला. इकडील राजकी मजकूर तरी श्रीमंत मिरजे पासून मजल दरमजल नगरचा[3] घांट उतरून शहरास दाखल झाले. दोन पुरे झाबंडले[5]. मग शहरा पासून अडीच लक्ष रुपये घेतले. जाधवराव मागें रहिमतपुरावर राहिला होता तो क्षेत्रापर्यंत[6] मार्गांत उपद्रव करीत आला. तो बोभाट श्रीमंतांस निवेदन झाला. तेथून कूच केलें ते

---

१ या मनुष्या विषयीं पहिल्या अंकांत पृष्ठ ११ व १२ यांत टीप लिहिली आहे ती पहा. २ दादा ह्मणजे गोपाळराव. हा या वेळीं मोंगलाचे लष्करांत होता हें पुनः पुनः सांगणें नकोच. त्यास हें नं० २२२ चें पत्र पाठविणारा सुंदर नारायण हा पटवर्धनांचा कारकून पेशव्यांच्या लष्करा बरोबर हिंडत होता. ३ कारकून लोक पुष्कळ वेळां आपल्या यजमानास 'वडील' या शब्दानें पत्रव्यवहारांतून उल्लेखीत असत. ४ पेशवे मिरजेहून निघाले ते रहिमतपुरावरून सालप्यांचा घांट उतरून नगराकडे गेले व तेथून नगरचा ह्मणजे निंबदेहच्याचा घांट उतरून शहरास ह्मणजे औरंगाबादेस दाखल झाले. ५ घाईघाईनें लुटिले. काय हातीं लागेल तितकेंच पुरे अशा दृष्टीनें लुटणें यासच 'झाबडणें' हा शब्द लाविला जात असे. ६ कोणच्या क्षेत्रापर्यंत? पंढरपुर जाधवानें पूर्वीच लुटिलें होतें. [अंक पांचवा. नं० ११९, १२१, १२२ वगैरे पत्रें पहा.] ७ औरंगाबादेहून.

श.१६८५ पेशवे पुनः औरंगाबादेकडे येतात इ.स.१७६३
मोंगल पाठलाग करितो.

दिवशीं जाधव कूच करीनासा जाहला. मग मनसबा करून जाधवराव यास कूच करा म्हणोन जाहलें करून फौजा तयार करून त्याजकडे आले तों त्यानें ही कूच केलें. तेव्हां स्वारी बरोबर चालले. तेव्हां राजश्री बाबूजीनाईक यानीं व दादासाहेबानीं एकत्र होऊन वाटेनेंच सिद्धांत केला कीं, हा बदमामली; यास किल्ल्यांत घालावें; हा निश्चय करून त्यांज भोंचती नाइकाची फौज व नीलकंठ महादेव पुरंदरे हे दोन्ही पथकें यांनीं घेरून घोडियावर होता तो अंबारींत जबरदस्तीनें घालून दौलताबादेस नेऊन किल्ल्यांत दाखल केला. तों मागें लोकांनीं त्याचें बुनगें अगदीं लुटलें. पारिपत्य उत्तम प्रकारें झालें. तेथून एरंळावरून मजल दरमजल कासारबारी उतरून मलकापुरास गेलों. तेथें पन्नास हजार रुपये घेतले तों अविंधाची फौज उंदेरीचे घांटें उतरली. मग यांनीं कूच करून फर्दापुराचा घांट चढोन शेंहरावरोन नागतळ्याचा घांट उतरून करमाळें उजवें टाकून आज आले. समागमें सरदार मल्हारजी होळकर, दमाजी गायकवाड, गोपाळराव बर्वे, विसाजीपंत, नारायणराव घोरपंडे, शहाजी भोंसले, पंवार मंडळी, सरलष्करचीं पथकें व कवडे, शिवाय किरकोळ लोक व हुजुरांत पंधरा वीस हजार एकूण पन्नास साठ हजार पर्यंत आहे. तूर्त रोंख सोलापुराकडे जाणार. तेथून तुळजापुराकडे जाणार. ऐसा मजकूर आहे. अविंधाची फौज नागतळ्याचा घांट उतरून आली. चैत्राचा महिना हे गांठ पडों देत नाहींत. पुढें युद्ध करणार. ऐसें वर्तमान आहे. सदाशिव रामचंद्र व नरसिंगराव धायगुडे हे मोंगलाकडे गेले. येणें प्रमाणें मजकूर आहे. कवड्यास करकंब व भोसें येथील सनदा करून द्यावयाची परवानगी राम-

---

१ क्रुद्ध होऊन. २ वेड्यासारखी. ३ पांडवलेण्यां विषयीं प्रसिद्ध असलेलें दौलताबादेजवळचें वेरूळ. ४ औरंगाबादेवरून. ५ विसाजीपंत विनीवाले. ६ घोरपडे इचलकरंजीकर. ७ शहाजी राजे भोंसले अक्कलकोटकर. ८ महिपतराव कवडे. ९ एकूण या वेळीं पेशव्यांचा पाठलाग करीत मोंगल औरंगाबादे अलीकडे ही कांहीं मजली आला होता.

श.१६८९ पेशवे पुनः औरंगाबादेकडे येतात इ.स.१७६३
मोंगल पाठलाग करितो.

चंद्र [1]गणेशाकडे झाली हें यांनींच रुबरू सांगितलें. ऋणानुबंधें घडेल तें खरें. वर्तमान जाहलें तें सेवेशीं लिहिलें आहे. हे विनंती. उदईक [2]पानगांवचा मुक्काम आहे.

नं० २२३

(३ एप्रिल)

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद[3] उपरी. येथील कुशल तागायत चैत्र वद्य षष्ठी भानुवासर यथास्थित असे विशेष. तुम्हीं शुद्ध सप्तमीचीं पत्रें पाठविलीं तीं वद्य प्रतिपदा बुधवारीं पावलीं, अकरावे रोजीं पावलीं. आपाजी कोडकर यानें सांगितलें. तुम्हीं लिहिलें वर्तमान विस्तारें कळलें. वधू आणावया गेले त्यास आजी दहा अकरा दिवस झाले. आणखी पांच सात दिवसां यावी ऐसें असतां वैशाखमासीं न फावे तरी ज्येष्ठ मासीं लग्न करूं म्हणोन लिहिलें हें अपूर्व आहे ! येविशीं अगोदर पत्रें रवाना केलीं आहेत. निघालां असिलां तरी याल. ईश्वरसूत्र प्रमाण ! कुरुंदवाडाकडील वर्तमान यथास्थित आहे. बर्वे एक बंधु कृष्णराऊ देशास गेले. बाजीराऊ बर्वे हजार दीड हजार राहिले. हजार पांचशें [4]नरसिंगराऊ व राणीकडील फौज मिळोन तीन साडे तीन हजार फौज [जमून] कागलास मोर्चे लाविले. गोळागोळी होतांच कौलास येऊन निशाण[5] लोक घेतले. तेथून कूच होऊन कुरली चिखलीवर

---

१ करकंब व भोसें हे पटवर्धनांच्या जहागिरींचे महाल आतां महिपतराव कवड्याकडे दिल्याच्या सनदा तयार करण्याचें काम दादासाहेबानीं रामचंद्र गणेश कानडे यास सांगितलें, असें खुद्द कवडे यानींच पत्र लिहिणारास सांगितलें. रामचंद्र गणेशाविषयीं अधिक माहिती अंक ४ नं० ८५ च्या पत्राखालीं टीप दिली आहे तींत पहा. २ पानगांव बारशी जवळचें. ३ मंगळवेढ्यांहून गोविंद हरीचें गोपाळरावास पत्र. ४ नरसिंगराव उद्धव याचे हजार पांचशें लोक. ५ कागलकरानीं राणींचें निशाण व लोक कागलांत घेतले.

जाऊन हल्ला करून कुरली लुटून पस्त केली. पुढें कणगल्यास[1] गेले. राजश्री हरीपंतआपा ही त्यां समागमें आहेत. त्यांच्या मतें आपल्या तालुक्यांत न्यावें असा मजकूर. राणीच्या मतें मनोळीकडे न्यावें. कोणता योग घडेल पहावें. दोन तीन हजार फौज (घेऊन तुम्हां पैकीं) त्या प्रांतीं कोणी तरी येता तरी आवईनेंच पळोन जाते ! श्रीहरि संकल्प (असल्यास घडून येईल.) मिरजेंत लक्ष्मण कोन्हेर आहेत. रयतेस हाण मार करून पैका घेतात. किल्लयांतील धान्य विकावें या अर्थें बाहेर आणितात. सोलापुरकर याणीं भंडारकवठें घेतलें. हलसंगी परगण्याचीं खेडीं दोन चार सांपडलीं त्यांत जेथें जें साधलें तें एक दिवस फिरून घेऊन माघारे गेले. करकंब भोसें येथील रयत कौल देऊन बहिरोपंतीं आणिली. कांहीं येणार. तगाद्या खर्चापुरतें दहा पांच हजारांची पट्टी ही केली आहे. येथें ही पट्टी केली. प्यादे यांचा रोजमरा व राउतांचा रोजमरा वरचेवर चालला म्हणजे लक्ष (लाभ) जाहले ! अक्कलकोटीं समस्त सुखें आहेत. तीर्थरूपें[2] उभयतां आहेत. 'पर्जन्यकाल समीप आला. पुढें रहावयाच्या स्थलाची वाट काय' म्हणोन लिहितात. आम्हीं लिहितों जे, तहें[3] झाला तरी कांहीं चिंता नाहीं. बिघाडच राहिला तरी स्थलाची ही योजना होईल. श्रीनें हर कोठें नेमून ठेविलें असेल. चिंता करून काय होणें. कासेगांवकर म्हणतात जे, "आपणांपाशीं प्रतिनिधीच्या सनदा माचनूर व टाकळी गोसावीपुरा श्रीक्षेत्रें[4] येथील आहेत. तुम्हीं असून घेतला तरी कजिया होईल" म्हणतात. आम्हीं त्यांस खातरेस आणीत नाहीं. परंतु नित्य कजिया आहे. राघो महिपतीस कां ठेऊन घेतलें म्हणोन लिहिलें, तरी त्याचे सोबती थोडे नाहींत. तुम्हांकडेच दोन तीनशें गेले. तुम्हीं त्यांस लाऊन दिलें तरी आम्हीं यास लाऊन देऊं. कालिच्या[5] प्रसंगीं गृहस्थ केवढे कार्यास आले ! कित्येक घरींच

---

१ हातकणंगल्यास? २ हरीपंत पोंभुर्लेकर हे इचलकर्जीकरांचे कारभारी. ३ कृष्णंभट व त्रिंबकहरि. ४ तह श्रीमंतांचा व मोंगलाचा. ५ पंढरपुर. ६ मिरजेस वेढा पडला होता तेव्हां.

श. १६८५ पेशवे पुनः औरंगाबादेकडे येतात इ.स. १७६३

मोंगल पाठलाग करितो.

राहिले त्यांचें काय करणें तें करावें. वरकड नवलविशेष लिहिणेंसें नाहीं. सदाशिवपंत काळे यांची सून प्रसूत होऊन कन्या झाली. सोळावे दिवशीं वारली. कन्या व पाहिला पुत्र दोन्ही आहेत. चिरंजीव सौभाग्यवती भिऊबाई पुण्यग्रामास गेली. तुम्हांस कळावें. चिरंजीव आबास जालनापुरास[1] पाठविलें ह्मणोन लिहिलें, उत्तम केलें. गंगथडीचे परगणे यांची कमावीस नारो[2] बाबाजीकडील कारकुनास सांगितली, उत्तम केलें. प्रस्तुत तुम्हीं कोणें ठिकाणीं आहां, श्रीमंत कोठें आहेत, युद्ध प्रसंग झाला किंवा होणार, किंवा तह होणार, हें विस्तारें अवकाश करून ल्याहावें. 'राजश्री बाबूराव[3] बाबा आले होते. शहरास गेले. राजश्री मोरोबा दादा आहेत.' त्यांचा परामर्ष बहुतां प्रकारें करावा. ईश्वर त्यांचे मनोरथ स्वल्प कालेंच सिद्धीस नेईल. वाघाचे वाडे वसत नाहीं (त.) त्यांच्यां मतें होतें कीं, पुणें यवन जाळील. परंतु नबाबानें फार थोर माणसाई केली. सखारामाचें[4] मनोगत सिद्धीस न गेलें. श्रीमंतांची दौलत बुडवून त्यांस दारोदार फिरवावें हा संकल्प त्याचा मोठासा आहे. परंतु श्रीइच्छा प्रमाण! (त्यानें) श्रीमंत दादासाहेबांस निमिषास पुढें उभें करून श्रीमंतांची दौलत धुळीस मिळविली. आणखी सहा महिने कारभार त्यानें केला ह्मणजे कांहीं बाकी ठेवीत नाहीं! श्रीमंत मुख्य राव त्यांतच मिळालेसे दिसतात! (त्यांस) कांहींच न कळेसें झालें! होणार भावी बलवत्तर, तदनुसार झालें. नरसिंगराऊ[5]

---

१ जालनापुर हें पटवर्धनांच्या जहागिरी पैकीं होतें. २ नारो बाबाजी दामले हा पटवर्धनांच्या पदरचा त्या वेळचा एक मुत्सद्दी. अलीकडे याच्या वंशजाकडे मिरजेच्या हसम (हसब) निशीचें काम होतें. दामले याचे वंशज हल्लीं ही मिरजेंत रहात आहेत. ३ माधवराव पेशव्यांचे माजी कारभारी बाबूराव फडणीस. 'ते मोंगलाच्या लष्करांत आले होते, परंतु लष्करावरोबर हिंडावयाचें रहित करून तें औरंगाबादेस रहावयास गेले; त्यांचे पुत्र मोरोबा दादा मात्र हल्लीं लष्करावरोबर आहेत;' असें गोपाळरावानें लिहिलें होतें त्याचाच हा अनुवाद. ४ सखारामबापूच्या. ५ पेशवे ही सखारामबापूच्याच धोरणानें वागूं लागले.

श १६८९ पेशवे पुनः औरंगाबादेकडे येतात इ.स.१७६३

मोंगल पाठलाग करितो.

धायगुडे[1] नाईकाचे ममतेचे. हे यावयास कारण काय? रामचंद्र कृष्ण यावयास कारण काय? नरसिंगरायाची[2] पागा दूर करून त्यास मोडणार होतो या मुळें ते निघाले; परंतु रामचंद्रपंतास यावया कारण [तुम्हीं] कांहीं लिहिलें नाहीं. शोध घेऊन लिहिणें. जाधवरायास[3] कैद करावया त्याजवरी अपराध काय ठेविला हें लिहिणें. श्रीमंतांपाशीं फौज किती? नबाबाकडे फौज किती? उभयदळीं उमेद कशी आहे? गांठी पडलियावरी टिकतील असा भरंवसा येत नाहीं. आधीं गांठ पडोंच देत नाहींत. होळकर[4] आला आहे तो कांहीं तहाचा प्रकार करील तर न कळे! तुमचे खुद्द राशीस ग्रहण आहे. त्याची शांति केली पाहिजे यास्तव पोथी पाठविली आहे; तर शांति करणें. षड्ग्रह तुमचे राशीस एकंदर आले आहेत त्यांचें कांहीं कर्तव्य तें येथें आम्हीं करितों. शास्त्रास विरोध करूं नये. श्रीपंढरीनाथ समर्थ आहे. दुष्ट फलाचे दिवस गेले. तथापि प्राप्त झालें तें करावें. लक्ष्मेश्वरास व बंकापुरास ही पत्रें रवाना केलीं आहेत. तूर्त हैदरनाइकाचा शह (तिकडे) भारी आहे. 'नबाबाचीं[5] पत्रें आपल्या तालुक्याविशीं हैदर नाइकास आहेत,' ह्मणोन लिहिलें उत्तम आहे. कल्याणा[6] सारखें अगर दुसरें एखादें स्थल गुदरानीपुरतें असावें. श्री सर्व ही अनुकूल करील. चिंता कोठवरी करावी! तुम्हीं आठ दिवसां एक पत्र पाठवीत जाणें ह्मणो-

---

१ नरसिंगराव धायगुडे हे बाबूजीनाइकाच्या ममतेंतले गृहस्थ आहेत. [अंक तिसरा पृष्ठ ९५ या मधील सहावी टीप पहा.] मग ते पेशव्यांस सोडून मोंगलाकडे यावयास काय कारण? २ हा कोण हें ठाऊक नाहीं. ३ सखारामबापू हा धायगुड्याची पागा दूर करून त्यांस घरीं बसविणार होता. ४ लढाईस श्रीमंत उभे राहतील असा. ५ मल्हारराव होळकर सध्यां श्रीमंतांस येऊन मिळाला आहे तो. ६ तुह्मीं पटवर्धनांचे तालुक्यांस उपद्रव देऊं नये अशीं निजामअल्लीचीं हैदरनाइकास पत्रें. ७ कण्याण हें प्राचीन शहर मोंगलाईत गुलबर्गा जिल्ह्यांत आहे. हें प्राचीनकाळीं चालुक्य वंशाचे राजे झाले त्यांच्या राजधानीचें शहर होय. हें शहर किंवा याच सारखें दुसरें एकादें स्थळ मुलें माणसें ठेवण्यासाठीं मोंगला पासून मागून घेण्याविषयीं गोपाळरावास गोविंद हरि सुचवीत आहे.

श.१६८५ पेशवे मोंगलाईंत शिरतात इ.स.१७६३
मोंगल पुण्यावर चालून येतो

न कितेक वेळ सांगितलें, परंतु पत्राभाव; त्यावरून चित्त स्वस्थ नाहीं. श्रीकृपेनें (तुह्मां जवळ) जासूद बहुत आहेत. पत्रें पाठवावया आळस न करणें. बहुत काय लिहिणें. लोभ असों दीजे. हे आशीर्वाद.

चिरंजीव राजश्री नारायणराऊ, नीलकंठराऊ, दाजी[1], आबा, कोनेरराऊ, वामनराऊ, भाऊ, यांस आशीर्वाद. लिहिलें परिसिजे. हे आशीर्वाद. चिरंजीव राजश्री तात्यांस[2] आशीर्वाद. तीर्थरूप काकां[3] सुखें आहेत.

नं० २२४L

(४ एप्रिल.)

श्रीशंकर.

पौ॥ छ० २५ रमजान

तीर्थस्वरूप मातुश्री बाई वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें रघुनाथाचे[4] साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल तागायत छ० १९ रमजान चैत्र वद्य ७ सोमवार मुक्काम नजीक परांडें येथें वडिलांचे कृपे करून सुखरूप असों विशेष. बहुत दिवस वडिलांकडून पत्र येत नाहीं येणेंकरून अपूर्व वाटतें. चिरंजीव माधवराव व नारायणराव यांजवर वडिलांची कृपा आहे तशी आम्हांवर नाहीं असें दिसतें. पूर्वी तर वडील हमेश कृपा करीत आले. अलीकडे पत्र येत नाहीं या वरून विलक्षण वाटतें. आम्हीं ही बहुत दिवस वाट पाहिली, परंतु सविस्तर पत्र न आलें; यास्तव कृपा करून सर्वदा तोषवीत गेलें पाहिजे. इकडील वर्तमान तर जानोजी भोंसले मोंगलास मिळाले व आम्हांकडील ही चार निमकहराम मिळाले. वीस पंचवीस हजार फौज आम्हांकडील (त्यास) मिळाली.

---

१ या पटवर्धन मंडळींत दाजी, आबा, भाऊ यांचीं नावें पुरुषोत्तमराव कृष्ण मोरोबल्लाळ, व परशुरामभाऊ, अशीं अनुक्रमें आहेत. २ पांडुरंगराव यास. ३ काका कोणचे ? कृष्णंभट कीं त्रिंबक हरि ? ४ हें दादासाहेबांचें गोपिकाबाईस पत्र.

श.१६८९ पेशवे मोंगलाईत शिरतात इ.स.१७६३

मोंगल पुण्यावर चालून येतो

येणेंकरून मोंगलानें फारशी शोकी[1] करून आम्हांवर निकर्षच आरंभिला. परंतु ईश्वर [आम्हांस] सानुकूल आहे. या बेइमानांच्यानें कांहीं होणें नाहीं ! दोन महिन्यानीं (यांचें) पुरतें पारिपत्य होईल. वडिलीं सर्वदा कृपा करून आशीर्वाद देत जाणें. तेणें करून सर्व शत्रू पादाक्रांत होतील आम्हांकडील फौज देशास[2] कांहींच नाहीं. मोंगलाच्यानें आमचा पाठलाग करवत नाहीं. तोफा[3] टाकून आल्यास आम्हीं मारून टाकितों हें समजोन [यानें] बहुत दिक्कत खादली आहे. सांप्रत (त्याची) कांहीं फौज पुणें, जुन्नर, सातारा, नाशीक या प्रांतें[4] येऊन जप्त्या करणार; यास्तव वडिलीं सावध असावें. आज काल [आपण] किल्ल्यावर असावें. नाहीं तर दंगा[5] झाल्यास सर्व दौलतेस अपाय आहे. हवेल्यांचे सुखासाठीं खालीं[6] न रहावें. चार दिवस तसदी पडली तरी कबूल करावी. आयते वेळेस फौज अचानक आली तरी पुण्या पासून सिंहगडास पोंचणेंचें संकट पडेल. मग आम्हीं लिहितों तें आठवेल. परंतु आठवून ही फळ नाहीं ! यास्तव बहुत सावध असावें. निदानीं पार्वतीबाई[7] व रमाबाई व सगुणाबाई वगैरे बायका व चिरंजीव नारायणराव असे तरी सिंहगडावर पाठवावे. आपण आयते वेळीं गेलीं तरी कामास येईल. मी लिहितों यास्तव वडिलीं रागास न यावें. मी लेंकरूं आहें. हा काल संकटाचा. या मध्यें बहुत सावध असावें. ग्रहण व षड्ग्रही आली आहे. आणिक ही या वर्षांत दोन चार योग क्रूरच आहेत. यास्तव पुण्याचे भरंवशावर राहूं नये. दगा झाला तरी फजितीस जोडी नाहीं ! गोपाळ गोविंद वगैरे कोणी मोंगलाचे लष्करांतून लिहितील त्याजवर जाऊं नये. ते लबाड आहेत. आज तागायत [त्यानीं आमच्या]

---

१ तोरा. २ जुलूम. ३ पुणें प्रांतीं. ४ तोफा मागें ठेऊन सड्या स्वारींनिशीं मोंगल पाठलाग करीत येईल तर. ५ दगा. ६ पुणें शहरांत. ७ पार्वतीबाई ही पानपतांत पडलेल्या भाऊसाहेबांची बायको. रमाबाई ही माधवराव पेशव्यांची बायको. दादासाहेबांचा धाकटा बंधु जनार्दनराव ह्मणून होता तो लहानपणींच वारला होता त्याची बायको सगुणाबाई.

दौलतेंत पेंच पाडिले. आतां मोंगलाची ही दौलत बुडवितील! तिकडे सारे निमकहराम बेइमान मिळाले आहेत. ईश्वर त्यांचें सत्वरच पारिपत्य करील! दोन दिवस त्यांनीं आपली बाजी शिरे[२] केली, परंतु परिणाम त्यांचा लागत नाहीं. त्यामध्यें ईश्वर इच्छा प्रमाण! आम्हांस सुचतें तें लिहितों. आपण वडील आहेत. विचारास येईल तें करावें. बहुत काय लिहिणें हे विनंती.

नं० २२९L

(चैत्र वद्य एकादशी
८ एप्रिल.)

श्री.

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य राजश्री नारो[३] आपाजी गोसावी यांसीं सेवक माधवराव बल्लाळ प्रधान नमस्कार सु।। सलासीतैन मया व अल्फ. मोंगलाचें कूच पुण्यास जावें या उद्देशें छ० १९ रमजानीं पैठणाहून जाहलें. टोंक्याचे रोखें चालले. खासा स्वारी[४] बेदर हैदराबादेकडे मुलूख लुटावा जाळावा या विचारें चालली. तुम्हीं तेथील[५] सर्व बंदोबस्त उत्तम रीतीनें केलाच आहे. भरंवसा तुमचा आहे. तीर्थरूप मातुश्री बाईसाहेबांस विनंती करून चिरंजीव राजश्री नारायणराव सुध्धां सिंहगडावर जाण्याचें करावें. विलंब न करावा. बातमी चांगली राखावी. तुम्हांस इतकें लिहावयाचें प्रयोजन तो[६] नाहीं. परंतु सूचनार्थ लिहिलें असे. केवळ बातमीच्या भरंवशावर न जावें. मोंगलाजवळ इकडील मंडळी मिळाली आहे ती दगा करावयास चुकणार नाहीं. या करितां किल्ल्यास जाण्याचेंच करावें. जाणिजे. छ० २३ रमजान. ज्या गोष्टीनें तुमच्या शहाणपणास बोल न लागे

---

१ मोंगलाकडे. २ आपला पक्ष प्रबळ केला. ३ नारो आपाजी तुळशीबागवाले. यांजकडे पुण्याचा बंदोबस्त राखण्याचें काम होतें. ४ आमची स्वारी. ५ पुण्याचा. ६ तर ७ पटवर्धन, भोंसले वगैरे.

श.१६८६ **पेशवे मोंगलाईत शिरतात** इ.स.१७६३

मोंगल पुण्यावर चालून येतो

तें करणें. बहुत काय लिहिणें.

पै॥ छ० २६ रमजान.

नं० २२६

[चैत्र वद्य एकाशी
८ एप्रिल]

श्री.

राजश्री रामचंद्र[1] नारायण गोरे यांसीं.

सु॥ सलास सीतैन मय्या व अल्फ. तुम्हांकडून बहुत दिवस पत्र येऊन वर्तमान कांहींच कळत नाहीं. तरी असें न करणें. सदैव पत्र पाठवीत जाणें. मातुश्री बाईची मर्जी कशी आहे हें सविस्तर तपशीलवार लिहिणें. एक दोन पत्रें पाठविलीं त्यांचें विस्तारपूर्वक उत्तर आलें नाहीं. तरी प्रस्तुत तिकडील वर्तमान विनंती[2] करून लिहून पाठविणें. इकडील वर्तमान तर नबाब माघारे फिरून कोलगांवावर[3] पुण्याकडे यावयाच्या उद्देशें गेले. वरकड वर्तमान मातुश्री बाईच्या पत्रीं लिहिलें आहे त्या वरून कळेल. नबाबाची सडी फौज दगा करून गांठ घालावयास तिकडे येणार, तर मातुश्रीस विनंती करून किल्ल्यावर जावयाचें लौकर करावें. कोणी कांहीं संशय घालितात ह्मणून येथें वर्तमान आलें, तरी त्या गोष्टी येथें नाहींत. किमपि संशय न धरावा. हे गडबडीचे दिवस. यास्तव किल्ल्यावर जावयाचें करावें. नाहीं तर ते दगा करितील. यास्तव जरूर जरूर जाणून लिहिलें आहे. जाणिजे. छ० २३ रमजान. मुक्काम तुळजापुर. बहुत काय लिहिणें.

पै॥ छ० २९ रमजान.

---

१ सदरहु मनुष्य गोपिकाबाईचा एक विश्वासू कारकून होता हें पूर्वी एक दोनदां लिहिलेंच आहे. त्यास हें पत्र माधवराव पेशवे यानीं लिहिलें आहे. २ गोपिकाबाईस विनंती करून. ३ हें गांव पैठणाहून नगराकडे येणाऱ्या रस्त्यावर असावें.

श.१६८५ पेशवे मोंगलाईंत शिरतात इ.स.१७६३

मोंगल पुण्यावर चालून येतो

नं० २२७

(चैत्र वद्य नवमी
६ एप्रिल.)

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद[1] उपरी. तुम्हीं पौर्णिमा[2] भौमवारचें पत्र पाठविलें तें परवां सोमवारीं अस्तमानीं पावोन समाधान झालें. फार दिवस पत्र येत नव्हतें. श्रीमंत घांट[3] चढले तेच दिवशीं रातोरात राजश्री जानोजीराव निंबाळकर यांणीं पत्र पाठविलें कीं " श्रीमंत शुक्रवारीं कडेअष्टीस आले. पुढें पंढरपुरच्या रोखें येणार, " ह्मणोन लिहिलें. तें पत्र रविवारीं तास दिवसास पावलें. दुसरे दिवशीं अस्तमानीं तुमचें पत्र पावलें. आम्हीं रविवारीं निंबाळकराचें पत्र आलें तेचक्षणीं अक्कलकोटास स्वांर रवाना केले. पत्र पाववून सोमवारीं अस्तमानीं पत्रोत्तर आलें. रोज दोन पत्रें पाठवीत गेलों. तुमचा सांडणीस्वांर गेला तींच पत्रें त्यांणीं बजिन्नस पहावया पाठविलीं. काली सोमवारीं ते निघोन दुर्गास जाणार होते. श्रीमंत काली काठीच्या (?) सुमारें कूच करून गेले ह्मणोन ऐकतों. सत्य मिथ्या न कळे. तुमचा मुक्काम सोमवारीं परांड्या नजीक जाला. काली मंगळवारीं कोठील झाला न कळे. मनसबाच कांहीं कळेना ! इतकी भारी फौज ! आणि ते[4] चालिले आहेत, तरी तुमच्या लष्करांत फितवा आहे कीं काय कळेना! आम्हाकडे येतील ह्मणून फार चिंताक्रांत होतों. मागती[5] विश्वास नाहीं ! आमचा तो संकल्प हें स्थल सोडून जाऊं नये. आले तरी मुक्काम करावया

---

१ पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास. २ चैत्र शुद्ध पौर्णिमा. ३ घांट नागतळ्याचा. औरंगाबादेहून सोलापुराकडे वगैरे येण्याचा. ४ रविवार चैत्र वद्य षष्ठी या दिवशीं. ५ अक्कलकोटास त्रिंबकहरि व कृष्णंभट होते त्यानीं. ६ तुमची [मोंगलाची] इतकी फौज असून पेशव्यांचा पाठलाग तुमच्यानें होत नाहीं, ते निर्भयपणें चालले आहेत. ७ पुन: नच येतील असा भरंवसा नाहीं.

पाणी नाहीं. दोन प्रहराचें झुंज. माणेवरी राहतील अगर भीमेवरी राहतील. आम्हीं ही तरतूद करीत आहों. मुख्य श्रीपंढरीनाथाची कृपा, त्याज मुळें अरिष्ट गेलेंसें झालें. पळोन तरी कोणेकडे जावें? येथेंच जें होणार तें होईल असा निश्चय केला होता! प्यादे रोजबेरोज नवे ठेवीतच आहों. सातशें प्यादे ठेविले. आजी उद्यां आणखी शेंपन्नास ठेवितों. तीर्थरूप यांनीं अक्कलकोटाहून रवाना केले आहेत ते ही येतील. श्रीसत्ता प्रमाण! लग्नाचा मजकूर–गांठ न पडे–म्हणोन लिहिलें, त्यास कारण काय? अनायासें तुम्हीं समीप आलां आहां. कोंकणांतून ही आठ चौ दिवसांत पाटणकर यावे. गांठ पडली तरी उरकोन घ्यावें असा प्रकार आमचा आहे. समीप आलां. आणखी बरचेवर पत्रें पाठवीत जाणें. आधीं तो युद्ध प्रसंगास गांठ पडों देत नाहींत. जाहला तर सावध राहणें. चिंतार्णवीं आहों. अक्कलकोटचीं [आमच्या कुटुंबाचीं माणसें] पळालीं त्यांची गति ईश्वर जाणे! वरकड होणार तदनुसार होईल. काळजी काय ती करावी! कुरुंदवाडचीं पत्रें परवां आलीं. रेणेदाळ राणीनें दिलें. आठशें रुपये खर्च कबूल केला. नरसिंगराऊ उद्धव, बर्वे व हरीराम ऐसे सामानगडाकडून पलीकडे शहापूर बेळगांवाकडे गेले. कित्तूरप्रांतें जाणार. हरीपंत समागमें जाऊन आपली मामलत उगविणार. बर्व्याचे मतें जाऊन मागती बल

१ मंगळवेढ्यापासून माण व भीमा या दोन्ही नद्या अंतरावर असल्यामुळें या ठाण्यास वेढा घालण्याच्या उद्देशानें शत्रू समीप येऊन राहील तर त्यास पाण्याची गैर सोय मोठी आहे. २ गोपाळरावाचें दुसरें लग्न व्हावयाचें होतें व त्यासाठीं कोकणांत नवरी मुलगी पाहून ठेविली होती ती ही आठ चार दिवसांत मंगळवेढ्यास येऊन दाखल व्हावयाची होती. परंतु लग्नासाठीं लष्कांतून घरीं यावयास फुरसत होत नाहीं असें गोपाळरावानें लिहिलें होतें त्यास अनुलक्षून हें लिहिणें. ३ योग जुळून आला तर. ४ पेशवे लढाईची संधिच आणूं देत नाहींत. ५ कोल्हापूरच्या राणीनें रेणदाळचे ठाणें त्रिंबक हरीस दिलें. ६ हा कोण सरदार? ७ हा इचलकर्जीकरांचा कारभारी. याजकडे कर्नाटकांतील मुळगुंदपरगण्याची मामलत होती. ८ कर्नाटकांत पटवर्धनांची (दादासाहेबांकडून जिची सनद गोपाळराव बर्व्यास मिळाली होती ती) जहागीर घेण्याचा

पाडावें. नरसिंगराऊ व राणीच्या मतें मनोळीकडील कार्यभाग उरकावा. कोणकोणतें घडतें पहावें ! तुम्हीं सर्व मंडळी सावध राहणें. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे आशीर्वाद.

चिरंजीव राजश्री नारायणराऊ व नीलकंठराऊ व आबा व दाजी व कोनेरराऊ व वामनराऊ व भाऊ व धुंडी, विनायक यांस आशीर्वाद.

नं० २२८

[८ एप्रिल.]

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वादं उपरी. येथील कुशल तागायत चैत्र वद्य एकादशी मंदवासर. यथास्थित जाणून स्वकीय लिहिणें. विशेष. तुम्हीं वद्य पंचमी मंदवारचीं पत्रें पाठविलीं तीं काली शुक्रवारीं सातवे दिवशीं अस्तमानीं पावलीं. लिहिलें वर्तमान कळलें. अक्कलकोटचीं सर्व आपल्या लिहिल्या प्रमाणें दुर्गास गेलीं. भौमवारीं निघोन बोरगांव येथें मुक्काम केला. बुधवारीं गेले. त्रिंबकराऊ सर देशमुख प्यादे व शें दीडशें स्वारांनिशीं गेले. येथील वर्तमान— आम्हीं सर्व मंडळी सुध्धां येथें आहों. मोहोळेकडे (खटलें) लाऊन द्यावें तरी श्रीमंतांचें सैन्य तिकडे (आहे,) आणखी कोठें स्थल योजेना, यामुळें रवानगी झाली. तुम्हीं पाठीमागें आहां, ह्मणून फार लौकिक होता, परंतु लांब मजलीमुळें (तुमचें) लष्कर श्रमी झालें; यामुळें गंगातीरींच [तुम्हीं] मुक्काम केले; उत्तम गोष्ट केली. लोक ही अंसुधे झाले. या उपरी नबाब शहरांस जातीलसें दिसतें. श्रीमंत बुधवारीं गंगेवरी छ० १४

पुनः जोरानें एलगार करावा असें लक्ष्मणपंत व कृष्णराव व बाजीराव या बवें बंधुत्रयाच्या मनांत आहे.

१ पत्र गोविंदहरीचें गोपाळरावास. २ नळदुर्गास. ३ खटलें नळदुर्गास रवाना केलें. ४ मोंगलाचे लष्करचे लोक विश्रांति मिळाल्यामुळें हुशार झाले. ५ औरंगाबादेस. ६ गोदावरी नदीतीरीं.

रमजानीं आले. छ० १५ (रोजीं) मानुरास आले. छ० १६ [रोजीं] शुक्रवारीं कडेअष्टीचा मुक्काम. शनिवारीं छ० १७ (रोजीं) खडकत. छ० १८ रविवारीं परांडें याचा. शिना[1] आव्हाटी गोडेरें येथील मुक्काम सोमवारीं. रिधोरें पापनाशनी नजीक तांदुळवाडी येथें मंगळवारीं. यावली तडवळें वैरागेच्या रोखें भोगावतीतीरीं तीन मुक्काम झाले. काली शुक्रवारीं कूच छ० २३ रमजानीं करून कबूच्या डोहावरी गेले. गंगाजी शंकर जासूद कालीच लष्कर कूच होऊन गेल्या नंतर निघाला तो मध्यानरात्रीं आला. बेगमपुरास पांच सातशें स्वार लिंगापा नाईक भोगोजी याकडे आले आहेत. सांगोल्यांहून स्वारांनीं ऐवज कांहीं तेथें पावता केला होता ते वातमीमुळें–किंवा कोण्यासूत्रें न कळे–आले आहेत. मोंगलाचें लष्कर समीप आलें अगर येईल या आवईनें कूचें झालें नाहीं. स्वभाविकपणें गेले. त्यांचे लष्करांत मोंगलाच्या लष्करची चर्चाच नाहीं ! (मोंगल) औरंगाबादेस राहिले, भोंसले वऱ्हाडांत गेले, ते कांहीं पाठीवर येत नाहींत, हेच आवई (श्रीमंतांच्या लष्करांत) बोलतात. लोक मात्र–ज्यांस ठाऊक नाहीं ते–म्हणतात, (कीं मोंगलाची) फौज पाठीवरी (येत आहे !) काली जासूद आले त्याणीं सांगितलें कीं, " निंबाळकरांनीं[3] रदबदली केली कीं ये वाटेनें गनीम गेले, तुम्हीं ही जातां, तरी मुलूख खराब होईल; त्या वरून (मोंगल) धारूरचे घांटें जाणार; " ऐसी बोली गांवोगांव बोलतात, ह्मणोन सांगत होते. आम्हांपाशीं प्यादे सात आठशें पावेतों आहेत. भांचनूर[4] देखील जो प्यादा नोकरीस येतो तो वरचेवर ठेवितों. लग्नाचा मजकूर–वैशाखमासीं बनत नाहीं ह्मणोन [तुम्हीं] लिहिलें–त्यास तुमचा व आमचा इलाज काय ? ईश्वरसूत्र प्रमाण ! कोणीकडे वऱ्हाड ! तिकडे

१ सिना नदीचे तीरीं. २ श्रीमंतांच्या लष्करचें कूच. ३ निंबाळकरानीं मोंगलाशीं रदबदली केली कीं, आमच्या तालुक्यांतून मराठे नुकतेच गेल्यामुळें फार नुकसान झालें आहे, तुह्मीं ही जाऊं लागलां तरी अधिकच नुकसानी होईल. ४ भांचनुराहून आलेला देखील.

श.१६८९ **पेशवे मोंगलांईत शिरतात** इ.स.१७६३

मोंगल पुण्यावर चालून येतो

गेले होतेत, अकस्मात् गंगातीरीं आलेत हें अपूर्व. तसेंच (लग्नाचें ही) घडणार असेल तरी घडेल ! कोंकणांत माणसें[1] जाऊन आजी सतरा दिवस जाहले. अमावास्ये[2] इतके यावे, अगर कृष्णातीरीं करून (?) येतील. परंतु इकडे धामधूम. निभाव त्यांचा कसा होईल हे काळजी येऊन पडली आहे. लज्जारक्षक श्रीभगवान् आहे. काली षड्ग्रह शांति केली. ग्रहणाचे दिवशीं तुम्हीं करावी, ते पोथी पाठविलीच आहे. वरकड मजकूर विशेषात्कारें लिहिणेंसा नाहीं. प्यादे यांस पोटास व राउतांस वरचेवर वसूल करून काल चालत होता, लष्कर श्रीमंतांचें आलें[3] यास्तव गडबडीमुळें पैसा ही नयेसा[4] जाला. तसेंच करकंब [येथें] वस्ती होत होती ते फाटली. तेथें ही प्यादे तीन चारशें पावेतों आहेत. हें[5] ही ग्राम फुटोन गेलें असतें, परंतु आम्हीं आहों, या मुळें अद्यापवर आहे. आणि अरिष्ट[6] परस्परच जात आहे या मुळें राहिलें आहे. परंतु सर्वांस भय प्राप्त जाहलें आहे कीं, केव्हां येतील न कळे. उपाय नाहीं. कोणत्या स्थलीं जाऊन विश्राम पावावा ऐसें स्थलच नाहीं ! जिकडे तिकडे धामधूम. काठी माडी [?] बारशी पानगांव या परगणेची खराबी (श्रीमंतानीं) फार केली. पानगांवीं पांच सातशें प्यादे जमा केले आहेत. बाबूजी नाईक [तेथें] गेले होते. तेथील[7] काय केलें न कळे. वैरागची खंडणी जाहली म्हणोन बोली (आहे.) मुलूख सुंदी[8] होता त्याची वाताहात जाहली. श्रीइच्छा प्रमाण ! पागा माचनुरीं अद्यापवरी आहे. तेथें हिय्याचा माणूस जगदेव पाटील आहे. येथील लष्कर आलेवरी उपाय नाहीं. किरकोळास तो कांहीं बधत नाहीं. येथें तो सर्व गोष्टी कळतच आहेत. एक श्रीपंढरीनाथावरी भार घालून बसलों आहों. त्याचे इच्छेनें होणार तें होईल. मोठ्या चिंतार्णवीं आहों.

---

१ माणसें कोंकणांत नवरी मुलीस आणण्या करितां रवाना झालीं होतीं. २ अमावास्येच्या सुमारें. ३ न येई, वसूल होईना. ४ मंगळवेढें. ५ अरिष्ट पेशव्यांच्या लष्कराचें ! ६ पानगांव येथें बाबूजीनाईका पासून उपसर्ग न लागावा या विषयीं तुम्हीं काय बंदोबस्त केला हें कळत नाहीं. ७ सुखी. ८ श्रीमंतांचें सारें लष्कर.

श.१६८५ **पेशवे मोंगलाईंत शिरतात** इ.स.१७६३

मोंगल पुण्यावर चालून येतो

श्रीनें योजिलें असेल तसेंच घडेल. परंतु निश्चय नाहीं यामुळें चित्त भ्रमत आहे. तुम्हीं पाठीवर[1] असाल हाच आम्हांस दम फार होता परंतु (तुमची) फौज चालीमुळें श्रमली, मागें राहिली, या मुळेंच संदेह प्राप्त झाला. (तुमची) श्रीमंतांच्या दुप्पट फौज; नामी नामी सरदार; परंतु त्यांच्या[2] भविष्यानुसार (तुम्हा) साऱ्यांचींच घोडीं थकोन राहिलीं! श्रीमंतांचे फौजेस हमेशा धांवणीचा दंडक[3] नवाबाकडील फौजांस [धांवण्याचा] दंडक नाहीं या मुळें थकले. विचारें पहातां बाळापुरापासून गंगे पावेतों बराच पाठिलाग जाहला होता. तुमचे मतें श्रीमंत नगराकडे जातील, परंतु तें रान अगदींच सोडून या वळणांत आले! श्रीमंतांची फौज बरी ताजी. घोडे शाबूत. लूंट लबाड गुरूं ढोर मिळविलें होतें तेवढें मात्र व रोडके घोडे (घेऊन) ज्यांचीं गांवें जवळी ते थांगेयानीं (त्या लष्करचे लोक) जातच आहेत. यावरी तुम्हीं आसपास आलां तरी झुंजावें हाच [श्रीमंतांचा] निश्चय ऐकतों. प्रसंगीं कसें होईल तें कळेल! बहुत काय लिहिणें. बाळाजी नरसिंग बेशकराऊ (?) याकडील कारकून यांचे घोडेचालक[6] तुम्हीं घांटें चढोन आलांच असाल, हा अर्थ चित्तांत आणून पाठविले आहेत. भेटतांच फलाणे स्थलीं आलों असें लिहून रवानगी करावी. बहुत काय

---

१ तुम्हीं व मोंगल श्रीमंतांचा पाठलाग करीत असाल. २ श्रीमंतांच्या सुदैवानें. ३ दंडक ह्मणजे संवय. मागें चौथ्या अंकांत नं० ८६ चे पत्रांत हा शब्द आला आहे तेथें त्याचा अर्थ कळला नाहीं हें दाखविण्या साठीं आह्मीं कंसांत प्रश्नचिन्ह घातलें आहे, परंतु प्रस्तुत स्थळीं त्याचा अर्थ संवय असाच लागतो. चौथ्या अंकांत हा शब्द आला आहे तेथें ही हाच अर्थ लागू पडतो. ४ लुटीचा सर्व माल. एकूण पेशव्यांच्या लष्करानें भोंसल्याचा मुलखांतून गुरें ढोरें सुद्धां लुटून आणिलीं होतीं. ५ इतःपर. ६ घोडे चालक ह्मणजे काय? चावूकस्वांर?

लिहिणें. केवळ ज्यांसं जातांचं न ये तीं अज्ञातेपणें बुद्धिदुर्गी राहिलीं व अस्पर्श होतीं तीं ही राहिलीं. त्यांचीं मुलें व यांचीं मुलें समागमें नेलीं. कळलें पाहिजे. बहुत काय लिहिणें. लोभ असों दीजे हे आशीर्वाद. चिरंजीव दाजी शेहरीं राहिले ह्मणोन लिहिलें तें कळलें.

चिरंजीव राजश्री नारायणराऊ व राजश्री नीलकंठराऊ व आबा व कोनेरी व वामनराऊ व भाऊसाहेब व धुंडी, विनायक यांस आशीर्वाद. लिहिलें परिसिजे. लोभ कीजे हे आशीर्वाद.

नं० २२९L

(चैत्र वद्य एकादशी
९ एप्रिल.)

श्री.

सेवेशीं विज्ञापना. तागायत छ० २४ रमजान मुक्काम नजीक तुळजापुर येथें सुखरूप असों. विशेष. वडिलांचें पत्र येऊन बहुत दिवस झाले. तिकडील वर्तमान तपशीलवार लिहून पाठविण्याची आज्ञा केली पाहिजे. इकडील वर्तमान—नबाब मुंगीच्या तळावरून माघारे टोक्याचे सुमारें गेले. तिकडून नाशिक पुण्याकडे जाणार अशी बातमी आली आहे. त्या प्रांतीं जाऊन तमाम मुलुखाची जप्ती करणार, व पुण्याचीं वगैरे ठाणीं बसविणार. साताऱ्याकडे जाऊन राजा काढावियाचा, गमाजीनीं [तेथील संधान] ठीक करून ठेविलें आहे तें ही राजकारण सिद्धीस नेणार, असें वर्तमान बातमी-

---

१ पेशव्यांचें लष्कर समीप आल्यामुळें पटवर्धनांचीं माणसें अक्कलकोटांत होतीं तीं नळदुर्गचे किल्ल्याच्या आश्रयास गेलीं; तथापि कांहीं बायका बाळंत वगैरे होत्या त्यांस जातां आलें नाहीं; त्या विषयीं हें गोविंद हरीचें लिहिणें. २ लपून, छपून. वेष पालटून. ३ बुद्धिदुर्ग ह्मणजे अक्कलकोट! ४ 'त्यांचीं' व 'यांचीं' या शब्दांचा अर्थ ज्यानें ज्यास पत्र लिहिलें त्या दोघांसच माहीत! ५ पुरुषोत्तमराव कृष्ण पटवर्धन उर्फ दाजी औरंगाबादेस राहिला. ६ हें पेशवे यांचें गोपिकाबाईस पत्र. ७ मुंगी पैठणच्या. ८ किल्ल्याबाहेर काढावयाचा.

चें आलें आहे. आह्मीं ही भागानगर प्रांतीं जात आहों. तमाम मुलुखाची खंडणी घेणें [ती घेतों व] रोजच्या रोज घास दाणा हीं घेतों, व मुलुख ही बहुत लुटला जातो. या प्रकारचें वर्तमान आहे. सुभेदाराची फौज सहा हजार (समागमें) आहे व वरचेवर आणखी ही येत आहे. वडिलांस कळावें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

पै॥ छ० २९ रमजान.

नं० २३०

(अजमासें चैत्र वद्य
एप्रिलचा प०पंधरवडा.)

श्री.

विनंती उपरी. आपण छ० २५ रमजानचें पत्र पाठविलें तें छ० २८ रमजान सोमवारीं पावलें लेखनार्थ सविस्तर कळला. पारनेर परगण्याचें वर्तमान तर पा॥ मजकुरीं लुंगोरे राऊत कांहीं देहरियांकडून शिरले व कांहीं संगमनेराकडून शिरले. त्यांणीं तमाम गांव लुटले जाळले आहेत. संगमनेरीं व कान्हेरीं रखवालीस कोणी बाणदार व ताकीददार पाठविले असले तर दोन्हीं स्थलें मात्र जगतील. परगण्याचे गांव आधींच लुगारे राउतानीं लुटले जाळले आहेत. लष्कर घांट चढलियावर मग कळतच आहे. परगण्यांत आतां रूपया वसूल व्हावा असा दिसत नाहीं ! आम्हीं काल मं-

---

१ मल्हारराव होळकराची. २ मोंगलाचें लष्कर लुटालूट करीत नगराकडून पुण्याकडे येत असतां आपल्या मालमत्तेचें रक्षण व्हावें ह्मणून कोणी मनुष्यानें हें गोपाळरावास पत्र लिहिलें आहे. पत्र लिहिणाऱ्याकडे पारनेर परगण्याचा बंदोबस्त ठेवण्याचें काम पेशव्यानीं सोंपविलें होतें असें पत्रांतील मजकुरावरून वाटतें. ३ लुटारू. ४ निंबदेहच्याच्या घांटानें. सदरहू घांट नगराजवळ आहे. ५ कान्हेरें हें गांवाचें नांव. ६ बाणा ह्मणून एक तरवारीच्या जातीचें हत्यार आहे तें बाळगणारे लोक बाणदार. दारूचे बाण पेटवून शत्रूवर टाकणारे लोकांस ही बाणदारच ह्मणत. [पहा अंक तिसरा. पृष्ठ ६८ ओळ असावी.] ७ मोंगलाचें लष्कर निंबदेहच्याचा घांठ चढून आल्यावर.

गळवारीं चासेस आलों. येथून ही पुढें जावेंसें जाहलियावर आपलें पत्र येईल त्या प्रमाणें राजश्री रामचंद्रपंत व आम्हीं पुढें एखादे ठिकाणीं निर्वेध स्थलास जाऊं. रामचंद्रपंत आपल्या भरंवशावर निश्चित आहेत. बहुत काय लिहिणें. लोभ असों दीजे. हे विनंती.

नं० २३१

(१२ एप्रिल)

श्रीगणराज.

श्रियासह चिरंजीव राजश्री गोविंदपंत[1] यांसीं प्रती कृष्णंभट व त्रिंबक हरि आशीर्वाद. उपरी येथील कुशल तागायत चैत्र बहुल चतुर्दशी भौमवासर. मुक्काम नलदुर्ग. यथास्थित जाणून स्वकीय कुशल लेखन करीत असिलें पाहिजे. विशेष. आम्हांकडील वर्तमान तरी—आम्हीं येथें सौम्यवारीं आलों. तदनंतर तुम्हांकडे पत्रें लिहिलीं आहेत तीं अक्कलकोटावरून तुम्हांकडे पावलींच असतील त्याजवरून सविस्तर कळलेंच असेल. त्या अलीकडील वृत्तांत तरी श्रीमंत माघारे फिरले ते या रोखेंच आले. एक दोन दिवस तुळजापुरानजीक आसपास मुक्काम झाले. दुर्गकरांचीं[2] खेडीं अगदीं लुटून जाळिलीं. तांदुळवाडी देखील. तदुपरी काल त्रयोदशी इंदुवारीं कंदोरीवागेवर मुक्कामास आले. तेव्हां राजश्री मल्हारजी होळकर व कैवडे[3] वगैरे लुटारे मिळोन दुर्गचे पेठेवर चालोन आले. आम्हीं व शिपाई लोक बाहेर गेलों होतों. तों त्याणीं हल्ला केला तेव्हां बाहेरून सांभाळून गांतांत आलों. त्या उपरांतिक त्यांजकडील दहा पांच माणूस जागांच ठार व घोडीं पांच सहा ठार झालीं. या खेरीज घोडीं माणसें मिळून वीस पर्यंत जखमी झालीं. निशाणाचे हत्तीचा महात प्रथमच जागां तोफेच्या गोळ्यानें चीत झाला. एक वेळ ईश्वरें (आम्हांस) यश दिलें. आम्हांकडील लोकांनीं

---

१ गोविंद हरीस हें दोघा वडील बंधूंचें पत्र. २ नळदुर्गकरांच्या ताब्यांतील. ३ महिपतराव कवडे.

तीन घोडीं पाडाव केलीं. दोन थोर आहेत. एक कनिष्ट आहे. याज प्रमाणें प्रसंग जाहला. राजश्री मल्हारबाचा पाळेक पुत्र ठार जाहला ह्मणोन वार्ता आहे. सत्य मिथ्या न कळे! तुम्हीं आहां त्या स्थलास यावें हा (श्रीमंतांचा) बहुतसा आग्रह होता. परंतु तूर्त चुकलासा दिसतो. त्याणीं पहिलेंच तुम्हांस न सोडावें, परंतु तुमचे मध्यस्त इमानी, मातबर, त्याजमुळें त्याणीं निभावणी बोलल्यासारखी करून दिली. याज उपरी तुम्हीं हठनिग्रह केवळ न करावा. त्यांचे बातमींत राहोन त्यांचा आगमनाचा प्रकारसा दिसला तरी स्थळांतर परिच्छिन्न करावें. हे माघारे फिरते वेळेस तुमच्या परामर्षास येणार, याज प्रमाणें राजश्री नारोपंत पोक्षे आज येथें आम्हांस भेटले त्याणीं सांगितलें. बहुत सावधपणें खबरबखर वरचेवर लष्करची आणवावी. आमची ही बातमी आहे. चिरंजीवांकडून पत्रें नूतन आलीं असलिया सविस्तर लिहावें. आम्हांकडे यवनाचे लष्करचें वृत्त कोणे ठिकाणीं आहे हें किमपि नाहीं. लष्करांतून आमचे एक दोन गृहस्थांकडून स्वार आले होते. शितोळे महादजी आला होता. सुभानजी माने चव्हाणाकडे आले. येथें ही फार जथ प्याद्यांचा जाहला. त्यांतून ईश्वरकृपेनें खैर जाहली. मुलें माणसें किल्ल्यांत व तीर्थस्वरूप आहेत. आम्हीं मात्र लोक बाहेर आहों. कळलें पाहिजे. तुमचीं फौज लवकर यावी आणि विजापुर पुढें देऊन या प्रांतें भीमातीरीं छावणी व्हावी, ह्मणजे सहजच त्यांचें पारपत्य होईल. विशेष काय लिहिणें हे आशीर्वाद.

चिरंजीव राजश्री माधवराव व पंढरीनाथ व बाळि यांस आशीर्वाद.

---

१ मल्हारराव होळकराचा मानलेला [पालक] पुत्र कोण? तुकोजीराव? २ मंगळवेढ्यांस. ३ मिरजेस दादासाहेबांच्या ताब्यांत तुम्हीं सांपडलां होतां तेव्हां. ४ मध्यस्थ विठ्ठलराव विंचूरकर व नारो शंकर. ५ पेशवे मोंगलाईतून परत आल्यावर आधीं मंगळवेढ्यास येऊन तुमचें पारिपत्य करणार. ६ मोंगलाच्या लष्करांतून गोपाळरावाकडून. ७ 'मोंगलाच्या लष्करानें विजापुरा अलीकडे भीमातीरीं छावणीस रहावें ह्मणजे पेशवे मोंगलाईतून परत येऊं लागतील तेव्हां त्यांचें पारिपत्य करण्यास होईल,' असा लिहिण्याचा अभिप्राय. ८ हा बळवंतराव कृष्ण.

अपत्यें बाळानें साष्टांग नमस्कार.

अपत्यें बाळाजी वामन व केसो सखदेव कृतानेक साष्टांग नमस्कार.

नं० २३२

(अजमासें वैशाख शुद्ध
एप्रिलचा दु०पंधरवडा.)

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वादें उपरी. इकडील वर्तमान तरी श्रीमंत नलदुर्गाप्रलीकडे गेले. वैशाख मास या प्रांतीं गुदरान करावीसा (त्यांचा) मजकूर आहे. न कळे मनसबा, कोणे समयीं मागें फिरतील ! नलदुर्गास गेले होते. हल्ला ही करून पाहिली. दहा बीस माणूस ठार पडलें ब कांहीं जखमी झालें. आम्हीं मुजरेंद माणसें दुर्गास पाठविलीं आहेत. सोमवारीं हल्ला झाली होती. मंगळवारीं बंदोरीवागेहून कूच होऊन पुढें गेले. आम्हीं अद्याप येथेंच आहों. जावें कोणीकडे ! कोठें निर्भय स्थल नाहीं ! सैमर्थाचा आश्रय धरून बसलों ह्मणावें, तर निश्चय एकच नाहीं. मन सारेबेळ भ्रमत् चक्रीं पडलें आहे. ' वराता करितों' ह्मणून लिहिलें त्यास सुखरूप कराव्या. लोकांचा मजकूर लिहिला तो कळला. ऐशास ज्या गृहस्थानीं इतका खेळ मरीचिग्रामीं केला तो कृतघ्न समागमें आहे. तो सर्वांचा बुद्धिभ्रंश करून कचाट करावया अंतर करणार नाहीं. तो समागमें न्यावयाचा नव्हे ह्मणून चिरंजीव नीलकंठरायास सांगितलें, परंतु न पुसत घरास गेला; आणि न बलावितां आला ! कुचेष्टखोर तो आहे. काळ पेंच तुम्हांस सर्व अनुभवास

---

१ गंगाधरराव गोविंद उर्फ बाळासाहेब. २ पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास ३ ताबडतोब. ४ मोंगलाचा. ५ मरीचिग्राम ह्मणजे मिरज. तेथें पेशव्यांचा वेढा पडला होता त्यावेळीं किल्ल्यांतील लोकांत फितूर उत्पन्न करून त्यांस लढण्याविषयीं ज्यानें निरुत्साह केलें तोच मनुष्य हल्लीं मोंगलाच्या लष्करांत तुम्हांजवळ जी फौज आहे तींत बेदिली उत्पन्न करीत आहे; असें गोविंद हरि गोपाळरावास लिहीत आहे. पण हा मनुष्य कोण हें ध्यानांत येत नाहीं.

आले. चार बरे वाईट लोक असावे ते ये समयीं सारेच [1]बरे झाले ! होणार गति ! चिंता न करणें. हे ही दिवस जातील. अमावास्या चैत्री गेली. या उपरी सुगम दिवस येतील. तुम्हीं पुण्याकडे चालिलां, आणि श्रीमंत बालेघांटाकडे गेले, याचा अर्थ काय तो तुम्हांस कळला नाहीं ! सखारामपंताच्या मनोदय कीं, ' पुणें एक वेळ भस्म करावें ' म्हणजे कोकणस्थ लोकांचा थारा मोडेल ! एक जागां घरें करून आहेत यामुळें भय आहे, तो मोडावा. दाणादाण करावी. देशधडी कितेक केले. राहिले ते करावे ! ' श्रीमंत दादासाहेब यांणीं पुण्यास सांगोन पाठविलें आहे कीं, " आसपास [2]वाड्याच्या हवेल्या आहेत त्या मोडून टाकणें. म्हणजे-फडणीस उभयतां, [3]वासुदेव जोशी, [4]जिवाजीपंत, आम्हीं, [5]विसाजीपंत, पश्चिमेकडे [6]शंकराजी केशव व ओंकार व गाडगीळ इतके [7]वाडे मारून मोडून साफ करावे ! म्हणजे किल्ला मोंगला बराबर झुंजेल. कदाचित् मोंगल (पुण्यास) गेला तरी शहरास अग्नि लाऊन तमाम शहर जाळून टाकावें. [8]मुलूखें खानदेशपासून कर्नाटक पर्यंत व भागानगराकडे राहिले होते तिकडे तूर्त खासा स्वारी झाली ! सरदार घालविले, कांहीं मारिले, पुणें जाळिलें, श्रीमंतांची दौलत क्षयास गेली ! मग काय करणार ! कोठील पैसा पेस्तर रसद ध्यावी असा देशांत प्रकार ठेविला नाहीं. नवाब [9]पुंढें चालिले म्हणजे तह करून राहिला प्रांत त्यास द्यावा, नाहीं तरी सहजच त्याणीं घेत

---

१ हें लिहिणें उपरोधिक आहे. २ शनवारच्या वाड्याच्या आसपास. ३ वा. वूराव फडणीस व नाना फडणीस. ४ हे कोण हें ठाऊक नाहीं. ५ खासगीवाले. ६ विसाजीपंताचा वाडा हा अर्थात् इचलकर्जीकरांचा. ७ शंकराजी केशव लेले वसईचे सरसुभेदार. एकूण यावरून असें होतें कीं, त्यावेळीं बाबूराव व नाना फडणीस, वासुदेव जोशी, खासगीवाले, पटवर्धन, इचलकर्जीकर, शंकराजी केशव, ओंकार व गाडगीळ इतक्यांचे हे नऊ वाडे शनवारच्या वाड्या सभोंवती असले पाहिजेत व हल्लीं ही ते असतील. परंतु वर सांगितलेल्या नऊ जणांच्या वंशजांपैकीं कितिकांची त्या ठिकाणीं वस्ती आहे याचा खुलासा आमचे कोणी पुणेंकर शोधक मित्र करितील तर होण्या जोगा आहे. ८ शनवारचा वाडा. ९ मुलूख हा येथें बहुवचनी शब्द योजिला आहे. १० पुण्याकडे.

चालिलेच आहेत. इतक्यांत अवतार कृत्य त्यांचें समाप्त होईल. 'परित्राणाय दुष्टानां साधूनां निग्रहायच' हें त्याचें सिद्धीस गेलें! चितपावन लयास गेले. जे कश्यपीं लागले ते सहजच उडतील, मग अक्षय पद पर्वतारूढ होऊन आपण करावें तें मग करतील! यजमानांसी तेव्हां सावधता होईल तर न कळे! तहाची गोष्ट होळकर याचे मतें करावी, परंतु त्याच्या मतें सारा मुलूख विल्हेस लाऊन मग तह करून आपण स्वस्थलास जावें; भलतें एखादें निमित्य आणून कारभार टाकून जावें, आपण स्वस्थ बसावें, म्हणजे मनोरथ सिद्धीस गेलेसे होतील! बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

नं० २३३

(१९ एप्रिल.)

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत वैशाख शुद्ध द्वितीया भृगुवासर. यथास्थित जाणून स्वकीय लिहिणें. विशेष. तुम्हीं वद्य नवमीचीं बुधवारचीं पत्रें पाठविलीं तीं मंगळवारीं चतुर्दशीस पावलीं. लिहिलें वर्तमान विस्तारें कळलें. विवेकाचा मजकूर लिहिला तो कळला. होणार असला तरी हो-

---

१ सखारामबापूचें. या पत्रांत सारें वर्णन सखारामबापूच्या कारस्थानाचें गोविंद हरीनें केलेलें आहे. हें पुष्कळ अंशीं पक्षाभिमानानें अंध होऊन केलेलें आहे हें सांगणें नकोच. २ गीतेंतील वाक्य पत्र लिहिणारानें उलटें करून लिहिलें आहे! अभिप्राय इतकाच कीं, त्या गीतेंतील श्लोकांत भगवंतानीं जी प्रतिज्ञा केली आहे तिच्या उलट प्रतिज्ञा सखारामबापूची असून ती त्यानें सिद्धीस ही नेली आहे! ३ 'सखाराम बापूचा ज्या कोकणस्थानीं आश्रय केला आहे त्यांचा नाश आपोआप होईलच.' ४ किल्ले मिळाले आहेत त्यांजवर जाऊन सखारामबापू वसला म्हणजे गोविंद हरीच्या लिहिण्यांत ध्रुवा प्रमाणें तेंच त्याचें अक्षय्य पद! ५ दादासाहेब व रावसाहेब पेशवे यांस. ६ 'होळकराच्या मनांत पेशवे व मोंगल यांचा समेट करून द्यावयाचें आहे परंतु तें सखारामबापूच्या मनास येत नाहीं' इ. इ. ७ पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास. ८ पेशवे व मोंगल यांमध्यें तह होण्याचा.

ईल ! मुलखाचा सत्यानाश करून करणें तरी करतील ! सखारामपंत बोलिले होते कीं आपण विठ्ठल सुंदर याची शागिर्दी करीन, परंतु आपले मनोरथ सिद्धीस नेईन ! ह्मणजे याचा अर्थ काय कीं, तुमचे पाय भुईस लागों नयेत ऐसें करीन ! त्याच अन्वयें [त्यानें] कागदीं पत्रीं त्याजकडे अनुसंधान लाविलें. काय काय करील न कळे. तीर्थरूप ठिकाणास पोहचले. या उपरी त्यांची चिंता न करावी. त्यांचें पत्र आलें तेंच बजिन्नस पाठविलें आहे. चिरंजीव दाजीचे व्यथेस उपशम जाहलियावरी ते ही लष्करांत आलेच असतील. नबाब एकाएकीं घांट चढणार नाहींतसें दिसतें. आमचा तो निश्चय, परंतु (लोक) थोर भय घालितात. जें भावी होणार तें चुकेना ! कोठें ही एक निश्चय चित्ताचा होत नाहीं. एक श्रीपंढरीनाथाचे चरणारविंदीं असला तरी तो तर पार पावील. परंतु तें ही होत नाहीं ! दुग्धेमध्यें चित्त आहे. श्रीमंत माघारे एव्हांच फिरले तरी फौज देशास येतांच फुटेल, यास्तव बाहेर फिरतात; हा एक सुमार. पुण्याचें पारपत्य जाल्यावरी मग यावें असें असलिया तें एक कोणतें मनोऽभिलषित असेल तें खरें ! चिरंजीव मेघश्यामरायास पत्र पाठविलें. तिकडे हैदरनाइकाची आवई भारी आहे. ' प्रतिनिधि, सेनापति, सरलष्कर हीं पदें ज्यांचीं त्यांस द्यावीं, पूर्वी निजामउल्मुलुख याच्या तहा प्रमाणें करावें, ह्मणोन यांचा आशय ह्मणोन लिहिलें त्यांस हें श्रीमंत कबूल करितील, परंतु पैहिला

---

१ तह करणेंच झाला तर आपल्या मुलखाचा विध्वंस झाल्यावर मग सखा रामबापू वगैरे मुत्सद्दी तह करतील ! ' २ ' आपण विठ्ठल सुंदर [मोंगलाचे दिवाण] याची शागिर्दी करूं, पण पटवर्धनांस मोंगलाकडे थारा मिळूं देणार नाहीं ! असा सखारामबापू पूर्वी कधीं बोलल्याचें गोविंद हरि लिहितो. ३ विठ्ठल सुंदर याजकडे. ४ निंबदेहऱ्याचा घांट. मोंगल आसपास असला ह्मणजे गोविंद हरीस पेशव्यांचें भय नव्हतें तो निंबदेहऱ्याचा घांट चढून नगरास व तेथून पुण्याकडे गेला ह्मणजे पेशवे मोंगलाईतून परत येऊन आपलें पारिपत्य करितील हीच त्याला भीति ! ५ मेघश्यामराव कर्नाटकचे जहागिरीचे महाल पटवर्धनांचे होते त्यांचें रक्षण करण्यांत तिकडे गुंतला होता. ६ तह झाला तर आधीं. ७ पेशव्यानीं प्रतिनिधीचें पद पुनः भवान्नराव प्रतिनिधीस द्यावें, सेनापतीचें पद धनाजी जाधवाचा नातू रामचंद्रराव जाधव यास द्यावें, सरलष्करचें

तह झाला म्हणजे सर्वस्व गेलें ! तुम्हांस मिरज दिली म्हणजे त्यांचा प्राणच गेला ! हे दोन मतलब कबूल करितां संकट आहे. कांहीं होईल, कांहीं नव्हे. राज्य तरी बुडालेंच आहे. बाकी काय राहिली ! पत्रें पाठवीत नाहीं म्हणोन रागें भरतां, त्यास आपला पर्याय लिहिला तो विस्तारें कळला. ऐशास आम्हीं संकट किती म्हणून मानावें ! लिहिणार स्वतंत्र आहेत. एक पत्र लिहावें. जासूद रवाना करावा. चौ दिसां आठ दिसां तरी म णूस यावें. आम्हीं सदैव चिंतार्णवीं तुम्हांकडील पत्रा करितांच. कृपा करून पत्र पाठवीत जाणें, म्हणजे सर्व पावलें ! आम्हीं कसें करावें तें टाकोटाक लिहिणें. त्या प्रमाणें वर्तणूक करूं. बहुत काय लिहिणें. या प्रांतीं एक फौज[3] रवाना झाली म्हणोन बातमी गेली तरी त्यांसें विचार पडेल. हे विनंती. चिरंजीव राजश्री कोन्हेरराऊ व वामनराऊ यांस आशीर्वाद.

नं० २३१

(१६ एप्रिल.)

श्री.

श्रियासह[4] चिरंजीव राजश्री गोपाळराव दादा यांसीं सौभाग्यवती सत्यभामाबाई आशीर्वाद उपरी येथील कुशल तागायत वैशाख शुद्ध तृतीयापर्यंत यथास्थित असे विशेष. तुम्हीं सांडणीस्वाराबरोबर पत्र पाठविलें तें पावलें. लिहिला मजकूर सविस्तर कळला. ' लग्न ज्येष्ठ मासा खेरीज येणें होत नाहीं ' म्हणोन लिहिलें, ऐशास श्रीमंत कलबुर्ग्याकडे गेले, नवरी मूल ही येथें आली, ऐशांत तावडतोब येऊन एक दिवसांत लग्नाचा गुंता उरकोन

पद हैबतराव निंबाळकराच्या घराण्याकडे पुनः द्यावें, बाजीराव बल्लाळ पेशवे यांचा व निजामउल्मुलख यांचा तह ठरला होता त्या प्रमाणें दोहीं पक्षीं चालावें, या शर्तीवर तह करण्याचें मोंगलाच्या मनांत असल्याचें गोपाळरावानें लिहिलें होतें त्या विषयीं एथ पासून गोविंद हरीचें लिहिणें.

१ सखारामबापूचा. २ न होईल. ३ मोंगलाची फौज मंगळवेढें प्रांतीं गेली अशी बातमी कळल्यास. ४ पेशव्यांस. ५ हें गोपाळरावाच्या आईचें पत्र.

निघोन जावेंत. समीप असते तरी यावयास न येतें. आतां ते लांब गेले मग फिकीर काय आहे ? तरी वैशाख मासींच बनलें तरी येऊन कार्य उरकून गेलें पाहिजे. यांत तुमचे विचारें जसें होईल तसें हो ! इकडील सविस्तर वृत्त पत्रांवरून कळेल. बहुत काय लिहिणें. लोभ असों दीजे. हे आशीर्वाद. हेच पत्रीं चिरंजीव राजश्री नारायणराऊ व नीलकंठराऊ व पुरुषोत्तमराऊ व मोरोपंतआबा व वामनराऊ व परशूरामपंतभाऊ व धोंडोबा व विनाजी यांसीं आशीर्वाद. लिहिलें परिसोन लग्नास पाठवून द्यावें. नवरी मुली आली. श्रीमंत दूर गेलें. कांहीं फार दिवस लागावयाचे नाहींत. कळलें पाहिजे. हे आशीर्वाद. चिरंजीव भास्करपंत व ताया यांस आशीर्वाद. लिहिलें परिसिजे. हे आशीर्वाद.

नं० २३९

(१६ एप्रिल.)

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी. येथील वर्तमान तागायत वैशाख शुद्ध तृतीया मंदवासर. यथास्थित जाणून स्वकीय लिहिणें. विशेष. तुम्हीं त्रयोदशी इंदुवारचें पत्र खेडेले (?) याचे मुक्कामचें पाठविलें. तें काली दोन प्रहरीं प्रविष्ट झालें. लिहिलें वर्तमान कळलें. हणगोजी बराबरील पत्रें पावलीं. आम्हीं इकडे श्रीमंत आलियावरी दोन तीन पत्रें पाठविलीं आहेत. पावलींच असतील. श्रीमंत तुळजापुराच्या रोखें गेले. नळदुर्गाकडे गेले. तिकडून मुरुमास गेले. पुढें गुंजोटीस आले. कलबुर्गे, चितापुर, पुढें पंचमहालांत जाणार; ऐसी

---

१ श्रीमंतांची स्वारी जर मंगळवेढें, पंढरपुर या प्रांतीं असती तर तुम्हांस इकडे येण्यास भय होतें, आतां ते कलबुर्ग्याकडे दूर गेले आहेत, मग तुह्मांस यावयास हरकत कोणची ? २ नवऱ्याच्या ह्मणजे गोविंद हरीच्या पत्रावरून. ३ या मंडळींत वामनराव हा पत्र लिहिणारणीचा मुलगा. बाकीचे सर्व पुतण्ये. वयाच्या अनुक्रमानें हीं सर्व नांवें आलेलीं आहेत. ४ भास्करपंत हा धाकटा दीर. ५ अंताजी विठ्ठल पटवर्धन यादवाडकर. ६ पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास.

बोली. भागानगर प्रांतें ही जावें ऐसी बोली आहे. काय करतील पहावें. तीर्थरूप उभयतां व कुटुंबें नलदुर्गी आहेत. चिरंजीव आबाचें कुटुंब अक्कलकोटीं आहे. चिरंजीव सौभाग्यवती भवानीबाई[1] व सौभाग्यवती रमाबाई[2] या ही उभयतां तेथेंच आहेत. रमाबाईस गोवर आला होता. ती अस्पर्शा मुळें राहिली. श्रीमंत नलदुर्गाकडूनच गेले. होळेकर[3] वगैरे यांची हल्ला झाली होती, परंतु कारेगार झाली नाहीं. हत्तीचा महात तोफेच्या गोळ्यानें पडला. दहा पांच माणूस ठार झालें व कांहीं जखमी झालीं. फजीत पावून गेले. या प्रमाणें तेथील अरिष्ट निरसन झालें. तुम्हीं आम्हांस लिहिलें कीं, 'पाहिले मध्यस्त आहेत त्यांस पत्र लिहावें; ऐशास श्रीमंत समीप आले. आम्हीं पत्र लिहिलें त्याणीं उत्तर पाठविलें जे, "तुम्हीं निघोन जाणें. नाहीं तर करकंब, भोंसें, माचनूर, हीं ठाणीं खालीं करून देणें. गुरसाळें देणें. नाहीं तर तुम्हांवर स्वारी येती." म्हणजे घाबरे होऊन सोडून द्यावें या अर्थें लिहिलें नाहीं. (?) समीप भीमातीरास येतीलें तेव्हां सांगोन पाठवावें कीं, तुम्हीं स्थळ[4] दिलें म्हणून मोहोळेस गेलों होतों ते माघारे येऊन राहिलों. त्याणीं 'तुमचे वाटेस जात नाहीं' म्हटलें तर उत्तम, आले तरी होणार तें हो, या अर्थें राहिलों; तों अरिष्ट परभारेंच गेलें. प्रथमता पंढरपुराकडे येतात ऐसें ऐकिलें; तेव्हां कोणीकडे जावें, येथेंच श्री करील तें करूं, म्हणून राहिलों. अलीकडे लोक भय घालूं लागले यामुळें भैनसबा पडला. परंतु तूर्त गेले आहेत. येतील तेव्हां श्री इच्छा प्रमाण! सावधता कोठवरी करावी? काय उपाय करावा? प्यादे

---

१ दोघे थोरले बंधु कृष्णंभट व त्र्यंबक हरि. २ ही नीलकंठरावाची बायको. रमाबाई कोण हें ठाऊक नाहीं. ३ मल्हारराव होळकर वगैरे लोकानीं जातां जातां नळदुर्गावर हल्ला केला होता पण तो लागू झाला नाहीं. ४ 'पेशव्यांची स्वारी तुम्हांस उपद्रव देण्या करितां मंगळवेढ्याकडे येण्याची भीति आहे, तर या विषयीं तुह्मीं मिरज मुक्कामीं मध्यस्थ झालेले नारो शंकर व विठ्ठल शिवदेव यांस पत्र लिहावें' असें गोपाळरावानें लिहिलें होतें त्यास अनुलक्षून हें लिहिणें. ५ श्रीमंत येतील. ६ मंगळवेढें. ७ विचार पडला. चित्त डळमळूं लागलें.

वरचेवर ठेवितों. श्रीपंढरीनाथ लज्जारक्षक ! जावयास स्थल नाहीं. उपाय काय करावा. तुम्ही तो आस्था सोडिली. बुद्धिवाद मात्र लिहितां ! पराधीन ! तुम्हांवरी अंतर तिलमात्र नाहीं. कोठें जावें ! उभें रहावयास स्थल नाहीं. आम्हीं गेलों तरी माचनूर, मंगळवेढें, श्रीक्षेत्र, गुरसाळें, भोसें, करकंब, सारीं स्थलें गेलीं असें जाणावें; या अर्थें करून राहिलों आहों. होता होईल तेथें वस्तभाव कोठें लावून द्यावी (असें मनांत आहे.) चिरंजीव बाळ व सौभाग्यवती यशोदाबाई व सौभाग्यवती कुसाबाई यांस बाहेर लाविणार होतों. अरिष्ट टळलेंसें झालें आहे. 'फिरलें तर लाऊन देऊं' म्हणतों. श्री पंढरीचा नाथ समर्थ आहे. त्याचे इच्छेनें होणें तें होईल ! आम्हीं तूर्त निघावयाची चर्चा करीत नाहीं. वरचेवर पत्रें पाठवून परामर्ष करीत जाणें, म्हणजे लक्ष जोड पावली. नबाबाचा प्रकार–पुण्याकडे चालिले–म्हणोन लिहिलें, तरी पुण्यास जाऊन काय करणार ? भक्षावया मिळणार नाहीं. खोतें तोंड भारी. आणि तेथपर्यंत गेले म्हणजे लोहगड पावेतों क्षय होईल ! कोंकणांत स्थलें आहेत त्यांस फिरंगी, हबसी, इंग्रेज हे अपाय करतील. श्रीमंत तो परिछिन्न आस्था सोडोन गेले. सखारामाचे मतें पुणें विल्हेस लावलें म्हणजे आपलें अवतार्कृय योजिला मनसबा सिद्धीस गेला ! या अर्थें तो नेतों. यांस कांहीं समजत नाहीं. देशास यावें, गड किल्ल्यांचे आसरे धरून रोज (मोंगलांचें) कही कबाड मारावें, झुंज करावें देशांत मोंगल शिरूं देऊं नये, ते गोष्ट अगदींच सोडिली ! माया कोणास नाहीं. ते अनास्थिक. ऐसी गति झाली. त्यांचे मतें आपले जीव वांचले म्हणजे झालें. नारो शंकर, विठ्ठल शिवदेव, व खुद्द दादासाहेब यांचे कांबिले गंगथडी प्रांतें किल्ल्यावरी आहेत. पुरंदरे व सखाराम हे पुरंदर

१ दोष. २ पाठवून देणार होतों. ३ श्रीमंत मोंगलाईतून माघारे फिरले तर. ४ मोंगलाच्या लष्करांत पोट बाबू लोक फार. ५ निःसंशय. ६ सखारामबापू श्रीमंतांस मोंगलाईकडे नेतो. ७ श्रीमंतांस. ८ पुण्याकडे. ९ सखारामबापू वगैरे. १० स्त्रिया. दादासाहेबांची स्त्री आनंदीबाई त्रिंबकच्या किल्ल्यावर राहिली होती. ११ हे म्हणजे यांचीं मुलें माणसें. स्वतः पुरंदरे व सखारामबापू पेशव्यांच्या लष्करांत मोंगलाईत होते हें सगांवयास नकोच.

रुद्रमाळ येथें आहेत. वरकड लोकांची काळजी त्यांस काय? होणार भावी तसें होईल! दोनी पर्वत[1] सासवडास समीप. त्यांचे आश्रतमाम किल्ल्यावरी गेले म्हणजे पर्वताचें कोणें काय करणें? पुण्याच्या हबेल्या जाळिल्यानें नवाबाची कीर्ति उत्तम नाहीं. चौंलिले[2] तेव्हां गेल्या दाखल झाले. पेडगांवच्या सुमारें अगर घोडनदीच्या सुमारें गेल्या उपरी सारा प्रांत विल्हेस लागेल. मोंगलाचें भय नाहीं. मैंराठे जाऊन लुटून जाळून सत्यानाश करतील. अन्न देखील पुण्याकडे मिळणार नाहीं. कोणाची दैवदशा सारखी नाहीं! नगरची पेठ जळून दाणादुणा मिळेल. जवळी आदकोशीं गोळ्याचा मारा चुकाऊन मुक्काम करावा. दबा[3] पुढें घालून तहावरी गोष्ट आणावी. न आणीत तरी सहजच बुडतील. नबाबानीं पुढें जाऊं नये. पर्जन्यकाल समीप आला. जैती करावी. धास्त घालावी. कोणी भेटीस न ये त्याचें पारपत्य करावें. पुरंदरापासून तमाम मुलूख व सिंहगडा पासून दाभाडे यांचें तळेगांव देखील लोक पळाले असतील. त्यास वाकफगार कोणी मेळऊन भय प्रदर्शन करून सांगोन पाठवावें, म्हणजे विल्हे लागेल. ऐसा विचार आहे. सारें निमित्य तुम्हांवरी येईल. श्रीमंतांचें धर्मराज्य रक्षण करावें हें श्रेयस्कर. नबाब केवळ तुमचे आज्ञेंत नाहींत. तथापि युक्तीनें रोजेबहादर यांस बोध करून पहावें. खानदेशची जप्ती, गंगथडीची जप्ती, जुन्नरदेशची जप्ती सुदी करावी. पैसा घ्यावा. 'नेवासें यांत ठाणें ठेविलें, जालनापुर पैकीं कांहीं खर्चास येईल, मानूर दहा हजारास दिलें,' म्हणोन

---

१ पर्वत म्हणजे किल्ले. दोनी किल्ले म्हणजे पुरंदर व रुद्रमाळ. २ मोंगल पुण्याकडे चालले. ३ भोंसल्याचे वगैरे लोक. ४ पेशव्यांस धाक घालून. ५ पुढें पुण्याकडे न जातां मोंगलानें आपलें लष्कर जेथें आहे त्याच्या आसपासचा मुलूख ताब्यांत घ्यावा. ६ लोहगडा पासून दाभाड्याच्या तळेगांवापर्यंत सर्व रहिवासी लोक पळून गेले असतील मोंगल पुण्यास गेला तरी ते त्याच्या हातीं लागणार नाहींत. या करितां कोणी हुशार मनुष्य त्यांजकडे पाठवून त्यांस भय घालून पहावें, म्हणजे ते खंडणी देतील. ७ मोंगलास पुण्याकडे आणिल्याचें अपेश. ८ मोंगलाचा दिवाण विठ्ठल सुंदर यास. ९ सावकाशपणानें.

लिहिलें, उत्तम केलें. तूर्त काल चालिला पाहिजे. कळेल तसें करावें 'मातबर धरून पैका ध्यावा' (असा बेत आहे) म्हणोन लिहिलें, त्यास मातबर कसा सांपडेल? पैकेकरी आधीं पळेल. श्रीमंतांची फौज समरांगणीं परिछिन्न उभी रहात नाहीं. देशास श्रीमंत आले तरी लोक चौंकडे जातील. इभ्रतीनें काम करावें, दबा घालावा, असें कोणांत[1] नाहीं! लोकांस रोजमरे देऊन देशीं राहून नबाबास आंत शिरों देऊं नये, हें कर्म थोरले[2] गेले त्यांचें! यांची बुद्धि ये रीतीची! मुख्य राव प्रधान त्यांतच मग्न समरसेय[3] झाले! आपली दौलत बुडती हें ज्ञान [त्यांस] नाहीं. श्रीमंत दादासाहेबांत समजाविताततकीं, 'तुम्हीं राज्य रक्षून मागती यावीं आणि यांच्या कार्यभागी[4] यांणीं दौलत कैरावी; आम्हांस कांहीं नाहीं [असें होणार;] या पेक्षां बुडाली म्हणजे सहजच राहिले! यांचीं द्रव्यें व पैवंत मातबर हातास आले आहेत. पुढें फौज ही आपणच ठेवून राज्य करूं!' हे मनोदय[5] त्यांचे आहेत. कळलें पाहिजे. श्रीमंत मातुश्रीस[6] तुम्हीं पत्र लिहिलें तर त्यांत कांहीं मजकूर न लिहावा. त्यांचें बरें वाईट त्यांस समजतें. कोणे प्रकारें वाटेल न कळे! 'आम्हांस (श्रीमंतांनीं राज्याबाहेर) घालविलें म्हणोन [7]यांचे आश्रयें करून राहिलों,' इतकें–त्याचें पत्र आलें तरी–लिहावें. 'स्थलाच्या[8] यत्नांत आहों' म्हणोन लिहिलें, उत्तम आहे. यत्न चालला तरी होईल. परंतु स्थल तरी कोणतें उपयोगी पडेसें आहे? श्रीसत्ता प्रमाण! श्रीमंत माघारे जात तों गंडांतर आहे. श्रीपंढरीनाथ लज्जा

---

१ असें कोणा सरदारांत सामर्थ्य नाहीं. २ थोरले बाजीराव व नानासाहेब व भाऊसाहेब. ३ एकचित्त. ४ सखारामबापू वगैरे समजाविताततकीं. ५ माधवराव पेशव्यानीं. ६ पेशवे आह्मांस घरीं बसवून दिवाणगिरी दुसऱ्या कोणास सांगतील त्यांनीं. ७ उपभोगावी. ८ पेशवे राज्यभ्रष्ट होतील. ९ किल्ले पुरंदर, रुद्रमाळ, सिंहगड, सातारा, शिवनेरी, त्रिंबक, नगर, अशीरगड व महाराष्ट्रांतील दुसरे अनेक विख्यात व बळकट किल्ले या वेळीं दादासाहेब, सखारामबापू व आबा पुरंदरे यांच्या ताब्यांत होते. १० सखारामबापू व तत्पक्षीय यांचे. ११ गोपिकाबाईस. १२ मोंगलाचे. १३ मुलें माणसें ठेवण्याकरितां स्थळ पाहिजे तें मिळविण्याच्या.

रक्षील ! परभारें गेले तरी पिडाच गेली ! तुमची फौज पेडगांवच्या सुमारें एखादी आली तरी आवईनेंच ते इकडे येणार नाहींत. पौर्णिमेच्या सुमारें पलीकडेच आठ रोज इतकी वैशाख अखेरींत आवई पडली म्हणजे [1] हें रान ते पहात नाहींत. वरकड ' मोंगली दरबार. काम काज करून घेणें तें लगबगेनें होत नाहीं. धीरें करून घ्यावें लागतें. ' म्हणोन लिहिलें तें प्रमाणच आहे. ये विशीं तुम्हांवर शब्द नाहीं. भोंसले याचा व नबाबाचा साठ चाळिसांचा तह[2] वऱ्हाड प्रांतींचा किंवा कोठील हें समजलें नाहीं. ' नबाबाची कस्त[3] सातारिया पावेतों यावयाची आहे, ' म्हणोन लिहिलें, बहुत उत्तम. सुपें, बारामती, पेडगांव, हीं ठाणीं बसलीं म्हणजे सहजच वेढी[4] होतील. जुन्नर प्रांतीं ठाणीं बसलीं म्हणजे राज्य बुडालेंसें झालें. श्रीमंत काय मनसबा करितात पहावें ! नबाबाच्या धैमकाच. सातारिया पावेतों जाणें होणार नाहीं. खर्चा खालीं येतील. फसतील. कळलें पाहिजे. हे आशीर्वाद.

नं० २३६

(२६ एप्रिल.)

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद[5] उपरी येथील कुशल तागायत वैशाख शु० चतुर्दशी भौमवार. यथास्थित असे विशेष. तुम्हीं राजश्री बहिरोपंताचे जासुदा बरोबर शुक्रवारचीं पत्रें पाठविलीं तीं काली सोमवारीं दोन प्रहरां पावलीं. लिहिलें वर्त-

---

१ मंगळवेढें, पंढरपुर वगैरे प्रांताकडे पेशवे येत नाहींत. २ हा तह भोंसले व मोंगल यांमध्यें झाल्याची वातमी गोपाळरावानें गोविंद हरीस पूर्वीच लिहून पाठविलेली आहे. मग गोविंद हरीनें पुनः त्याच गोष्टी विषयीं खुलासा कां विचारला आहे हें कळत नाहीं. (पहा नवव्या अंकांतील नं० १८५ चें पत्र.) ३ हुरूप. ४ श्रीमंत व त्यांचे कारभारी घाबरून जातील. ५ ' साताऱ्याकडे जाण्याविषयीं मोंगल फक्त धमकी मात्र देत आहे. तिकडे त्याच्यानें जाणें व्हावयाचें नाहीं, ' असा अभिप्राय. ६ हें गोविंद हरीचें गोपाळरावास पत्र.

मान विस्तारें कळलें. सांडणीस्वारांबरोबरी 'लग्न तूर्त राहिलें. पुढें ज्येष्ठ मासीं श्री इच्छेनें जें होणें तें होईल. नबाबाकडील मजकूर—हलक्या मजलीनें मुख्य स्थलांचा मार्ग धरावा' (असा बेत आहे,)—म्हणोन लिहिलें तें कळलें. उत्तम आहे. आपल्या मनसब्यास येईल तसें करितील. कार्यभागी यांचा मनसबा पुणें विल्हेस लागल्यावरी तह करावा हा मनापासून आहे. वैकिलाचें लिहिलें राजे बहादर. यांस आलें त्याचा मजकूर कळला. महादजी शिंदे बुंदीकोट्याच्या रानांत आहेत, कालहरण करितात, [म्हणोन तुम्हीं लिहिलें,] असो ! भविष्यानुसार बुद्धि ! थोरल्या श्रीमंतांचे मागें पृथ्वी ओस पडावी, धर्मराज्य क्षयास जावें, कार्यभागी यानीं यश घ्यावें, सर्व लोक देशधडी करावे, असें [दैवीं पहाण्याचें] आहे; त्या प्रमाणें होत आहे ! मंदवारचें पत्र नलदुर्गाहून वडिलांचें काली आलें तेंच बजिन्नस पाठविलें आहे. चिरंजीव मेघश्यामरायाचीं पत्रें शिरहट्टीहून आलीं तींच बजिन्नस पाठविलीं आहेत. त्या वरून विस्तारें कळेल. बंधु ठेऊन घेतली आहे हें तुम्हांस व सर्व मंडळीस स्मरण असावें. श्रीमंत उदगीर प्रांतें गेले म्हणतात. गेले म्हणजे इकडील वेध श्रीनें टाळिलासा झाला. भरंवसा पुरत नाहीं. कोणे समयीं माघारे मुरडतील ! तथापि गेलेसे झाले तर समाधानार्थ तूर्त होईल. आम्हीं बातमीस जोडी रवाना केली आहे. कळलें पाहिजे. बहुत काय लिहिणें. लोभ कीजे. हे आशीर्वाद.

---

१ पुण्याचा. २ पुणें शहर जळून खाक झाल्यावर. ३ पेशव्यांच्या लष्करांत मोंगलाचा वकील होता त्याचें मोंगलाच्या दिवाणास लिहून आलें. ४ बुंदी व कोटा हीं संस्थानें राजपुतान्यांत आहेत. तिकडे या वेळीं महादजी शिंदे होता. 'महादजी शिंद्याच्या चरित्रकारानीं पटवर्धन वगैरे सरदारां प्रमाणें महादजी ही या वेळीं पेशव्यांवर रुसून मोंगलाकडे गेला होता असें लिहिलें आहे, तें बरोबर नाहीं हें वरील लिहिण्यावरून उघड होतें. ५ गोविंद हरीनें आपल्या भरज्वानींत पहिले बाजीरावाच्या हाता खालीं सरदारी केली असल्यामुळें त्या वेळची राज्याची भरभराटीची स्थिति व हल्लींची विपन्नावस्था लक्ष्यांत आणून तो खेदोद्गार प्रकट करीत आहे. ६ राज्याचा क्षय करण्याचें अपेश सखारामबापूनें घ्यावें. ७ गोपाळरावाचें दुसरें लग्न व्हावयाचें होतें त्या साठीं.

नं० २३७

(२६ एप्रिल.)

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी येथील कुशल तागायत वैशाख शुद्ध चतुर्दशी भौमवासर. यथास्थित जाणून स्वकीय लिहिणें. विशेष. सांप्रत तुम्हांकडील पत्र सांडणीस्वार आल्या उपरी आलें नाहीं, यास्तव चित्त सापेक्षित आहे; तरी वरचेवर पत्र पाठवीत जाणें. श्रीमंत गुंजोटी, अळंद प्रांतें आहेत. नलदुर्गास पत्रें पाठविलीं होतीं त्यांचें उत्तर आलें तें पाठविलें आहे. सांडणीस्वारा बराबरील पत्रें नलदुर्गास रवाना केलीं. पावलीं असतील. आजी लक्ष्मेश्वराहून पत्रें आलीं तीं बजिन्नस पाठविलीं आहेत त्यांवरून कळेल. तिकडे हैदरनाइकाचा उत्पात विशेष झाला. बैसवापट्टण त्याणें घेतलेदाखल आहे. अलीकडे आला तरी आमचीं ठाणीं दम धरीत नाहींत. नरसिंगराऊ व बर्वे ही त्या प्रांतीं गेले, एवंच तिकडील गुंतो जरी तो तुंगभद्रेअलीकडे आला तरी उरकेलसें दिसतें. नगरास नबाब आले म्हणतात. आमचीं पत्रें पावलीं असलीं तरी तुम्हीं निघालां असाल. वधू येथें आली. आजी दोन रोज झाले. आलां तरी लग्न होऊन सवेंच माघारे जाल. श्रीमंत दूर आहेत. केव्हां येतील न कळे! आम्हीं प्यादे वरचेवर ठेवितों. ईश्वर सत्ता प्रमाण. लक्ष प्रकारें श्रीमंत आम्हांवरी येत नाहींत. आले तरी श्रीपंढरीनाथाची कृपा समर्थ आहे. चिंता न करणें. बहुत काय लिहिणें. हे आशीर्वाद.

समस्त चिरंजीव मंडळीस आशीर्वाद.

---

१ हें पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास. २ हीं दोन्हीं स्थळें मोंगलाईच्या हद्दीवर विजापुर जिल्ह्यांत आहेत. ३ बसवापट्टण व हरिहर हीं दोनी ठाणीं मूळचीं विजनूर संस्थानापैकीं असून अलीकडे कांहीं वर्षें तीं मराठ्यांकडे होतीं. ४ तुंगभद्रे अलीकडे. ५ 'आमची सारी जहागीर हैदरअली घेईल' असा भाव.

नं० २३८

(२९ एप्रिल.)

श्री.

श्रियासह चिरंजीव राजमान्य राजश्री गोपाळराव दादा यांसीं प्रती महादेव भट पाटणकर[1]. आशीर्वाद. उपरी येथील कुशल तागायत वैशाख शुद्ध त्रयोदशी इंदुवासर पर्यंत यथास्थित असे. विशेष. आम्हीं मुलीस घेऊन कोंकणांतून आलों हें सविस्तर श्रीमंत तीर्थरूपांनीं[2] लिहिलें होतें, त्यास वैशाख मासची योजना राहिली; ज्येष्ठ मासावर गेलें; याज मुळें ज्येष्ठ मास पावेतों आम्हीं स्वस्थ राहिलों. तुम्हांस कळावें यास्तव लिहिलें आहे. बहुत काय लिहिणें. लोभ असों दीजे. हे आशीर्वाद.

नं० २३९

(२९ एप्रिल.)

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद[3] उपरी. येथील कुशल तागायत वैशाख शुद्ध त्रयोदशी सोमवार प्रथम प्रहर यथास्थित जाणून स्वकीय लिहिणें. विशेष. तुम्हीं बुधवार सायंकाळचीं पत्रें पाठविलीं तीं मंदवारीं अस्तमानीं सांडणीस्वारा बराबरील पावलीं. व अगोदर करकंबच्या जासुदा बराबरी रवाना केलीं तीं ही तेच समयीं पावलीं. सर्व पत्रार्थ ध्यानांत आला. लग्नाचा प्रकार घडावयाचा कालच येत नाहीं, मग [तुमचें] आगमन कोठून होणार! इकडे आलां ह्मणून बोलावयास स्थल. वऱ्हाडांत असतेत तरी कोणास बोल लावावा! परंतु कोंकणांतून आलीं त्यांचे मतें समीप असोन येणें न झालें, ते पुढें कसे येतील? तेव्हां त्यांचें बहुत प्रकारें समाधान केलें. आलेलीं माघारीं

१ यास 'पाटणकर मामा' ह्मणत असत, यावरून हा गोपाळरावाच्या आईच्या माहेरच्या माणसां पैकीं कोणी असावा. २ गोविंद हरीनें. ३ हें गोविंद हरीचें गोपाळरावास पत्र.

गेलों तरी त्यांस उचित नव्हे, या मुळें राहिलों. पाटणकर जाऊन येऊं म्हणत होते, परंतु जाऊं देत ना. ते[1] ही केवळ क्षुल्लक नव्हेत. संभावीत आहेत. [2]भिडे सौभाग्यवती यमुनाबाई जिवाजीपंत अण्णाची स्त्री तिची बहीण वधू. सख्या चुलत बहिणी. तशीच बाबूजीनाइकाची स्त्री. ते[4] ही गृहस्थ गृहस्थपणा साठीं कबूल करून आले. परंतु फसलेसे झाले. ईश्वरी सूत्र ! कोणास ये विशींचें निमित्य ठेवावयास न ये. बरें. जें झालें तें उत्तम. चिरंजीवांचे नांवें उभयतांस पत्रें पाठविलीं त्यांचीं प्रत्योत्तरें वाचून पाहिलीं. त्यांणीं कसें आक्रमून आपलीच प्रतिष्ठा दाखवून लिहिलें ! यास्तव अशांस पत्राचा अभाव करावा. पुण्याहून आणून हें ही करावयाचा भाव त्याणीं दाखविला. आपले फौजेची इभ्रत लिहिली. तुमच्या फौजा वारापाणी केल्या. जानोजी भोंसले तुम्हांस म्हणत होते ती गोष्ट तुम्हीं उडवून टाकिली, बरें केलें. शिवाजी बाबाजीस पाठविलें म्हणोन लिहिलें तें कळलें; परंतु युक्त गोष्ट न केली. पाठवावयाचा नव्हता. तीं मनुष्यें अल्पबुद्धि. पेश [5]अंदेशीनें पाहून पुढील कर्तव्यार्थ (त्यांच्या) ध्यानांत येत नाहीं. ज्याणें जें सांगितलें तेंच ते समयीं प्रमाण ! दुसरे समयीं दुसरा सांगेल तें प्रमाण ! परंतु भला आहे तो फिरोन एक वेळ कळलियावरी चर्चा करीत नाहीं. क्षुल्लकास लज्जा बोलिल्याची अगर दुसऱ्याचें वाईट अगर यामुळें आपणास आरोप हें कांहींच नाहीं. ते[6] कार्य सिद्धीस नेऊन कर्ते होतात. परिणाम दीर्घ दृष्टीनें पहात नाहींत. श्रीमंत दादासाहेब कोणाचें ही ऐकत नाहींत. परंतु ज्या कृतघ्नास लाख शिव्या दिल्या तरी सोसून (तो) कार्यकर्ता झाला. त्यांस असें न कळे जे, आपण कार्य करितों ? दौलत सारी बुडत चालली हे चिंता किंमपि नाहीं ! [10]तो सां-

---

१ । २ । ४ नवरी मुलीचा बाप. ३ लिमये खासगीवाले. ५ चिरंजीव कोण? कोणा उभयतांस पत्रें पाठविलीं? शिवाजी बाबाजीस कोणाकडे पाठविलें? जानोजी भोंसले काय म्हणत होते? या गोष्टींचा उलगडा होत नाहीं. ६ दूर दृष्टीनें. ७ क्षुल्लक लोक. ८ । १० सखारामबापू. ९ दादासाहेबांस.

गतो त्या प्रमाणें वर्ततात. एकादे समयीं याची बुद्धि फेटकळ असें ध्यानांत येऊन [सुद्धां] मागती त्याचे बुद्धीनें या थरास आणिलें, (व) तुम्हांस [राज्या] बाहेर घालविलें. (तुम्हांस) उभें रहावया स्थल नाहीं, निदान झालें, तेव्हां तुम्हीं यवनाकडे गेलां, नांवाचे माणूस ह्मणून त्याणें अंगिकार मात्र केला. येतांच तुम्हांस नाहीं दौलत दिली, अगर खर्चास दिलें, अगर लागलेंच साहित्य केलें असें किमपि नाहीं. यवन आपले मनसुब्यानें वर्ततो. कोणाचे मनसबे त्याचे खातरेस येत नाहींत. श्रीमंत फिरले[3] ते समयीं माणेच्याच पाण्यानें दोन मजली वरता जाता, तरी मिरज तेव्हांच सुटली होती, व सातारिया पावेतों प्रांत सुटला होता. करवीरवासी[3] कांहीं देती. वरकड ही चिकोडीकर (खंडणी) देते. कृष्णातीर वसगड्या पावेतों तमाम मुलूख सुटला होता. आठ दहा मुक्कामांचें काम. तेव्हां [तें नबाबानें] न केलें. श्रीमंतांमागें जाऊन श्रमी होऊन महिनाभरां ध्यानास आलें तेव्हां त्यांचा पिच्छा सोडिला, आणि पुण्याचा रोख दाखविला. ' सातारियास जाऊं ' ह्मणतात, परंतु सारा वैशाख भीमातीरीं [मोडेल.] इतक्यांत तह झाला तरी बरें. नाहीं तर ज्येष्ठाचे पंधरा दिवस घालवितील आणि शेहराकडे जातील ! थां देशीं राहून त्यांचा परिणाम कसा लागेल ? सातारियाकडे जावयाच्या धमका (मात्र देतात.) मिरजेकडे तो येत नाहींत. विना सल्लूख त्याचा परिणाम नाहीं. हा मनसबा सोंगली. परिणामीं कळेल ! तुम्हांस ते[5] कृतघ्न ह्मणतात जे, ' धर्मराज्य तुम्हीं त्यांस अनुकूल होऊन न बुडवावें ' परंतु असें ध्यानांत न ये कीं, मोंगल[10] यांचे हातें पाणी पितो कीं काय ? परंतु लौकिक तो मातबर ! तुम्हीं लौकिकाचे माणूस. बाहेर लोकांस काय कळे ? मोंगल[11] रायांनीं (पुण्यावर) आणिला, सारे राज्या-

---

१ दुष्टपणाची. २ मिरजेहून औरंगाबादेकडे जाऊं लागले. ३ राणी जिजाबाई. ४ श्रीमंतांचा पाठलाग करून. ५ औरंगाबादेस. ६ महाराष्ट्रांत. ७ तह केल्याशिवाय मोंगलाचा परिणाम लागणार नाहीं. ८ अविचारी. ९ सखारामबापू वगैरे. १० मोंगलास. ११ गोपाळरावाचे. १२ गोपाळरावानीं

चा क्षय यांणीं मांडिला, [हा लौकिक !] आबालवृद्ध म्हणतात कीं ' गोपाळरावानें इतकें केलें, यास तुम्हीं काय कराल ? न करितां लौकिक! यांत कांहीं बरा, कांहीं वाईट ! ' पेशव्यांची सेवा बहुत दिवस करून (शेवटीं) त्यांच्या घरावरी उठले. ' हा वाईट. ' त्यांणीं (राज्या) बाहेर घातलें परंतु मर्दानें आपलेसें केलें ! परंतु मना पासून त्यांचें वाईट इच्छील कीं काय ! ज्याची सेवा सेकटास्तव कबूल केली तो जिकडे जाईल त्या बराबरी गेलें पाहिजे. " (हा लौकिक बरा. कोणास कागद पत्र एकंदर लिहूं नये. कोणाच्या कार्यभागांत लटक्या चित्त घालूं नये. एखाद्याचें वाईट होत असलिया आपलें वचन चालिलें तरी बरें करावें. तो बरें केलें असें म्हणणार नाहीं, तथापि, ज्याची रीत त्याणें करावी. पुण्याचा विध्वंस न व्हावा. यांणें नबाबाची ही कीर्ति नाहीं. जीवंतराऊ वैजापुरे याजवरी केवढी आग टाकिली होती ! त्याणें तेंच राजे बहादर यांस दाखविलें, (तेव्हां) त्यांस कळलें. कीं यांणीं दगाबाजी केली होती. यांत श्रीमंतांचा वक्र काय राहिला ! क्षुलक पाजी कर्म करावें म्हणोन लिहिलें, परंतु लौकिक एक प्रकार. उभयतां ते हे हमेशा झुजत आले, परंतु छळें करून एकाचें वाईट एकानें केलें नाहीं. सलुख तेव्हां मागती एक. नबाबाच्या घराण्यांत बेइमानीची जात नाहीं, या मुळें या दक्षिणेंत त्यांचा परिणाम ईश्वरें लाविला. श्रीमंतांचा प्रकार एक ठीक नाहीं. निदानीं विनासलुख गति उभयपक्षीं नाहीं. ते कलबुर्ग्याचा रोंख सोडून बालेघांटीं गेले. तिकडून गंगथडीनें वर यावें, (आणि) सलुखाचा प्रकार करावा. अगर दुसरा मनसवा वऱ्हाडांत जावें. हें तो घडणेंच नाहीं. शिंदा नर्मदा उत-

---

१ श्रीमंतानीं. २ पुण्याचा विध्वंस केल्यानें. ३ हा कोण ? पुढील मजकुराच्या रोंखावरून असें दिसतें कीं, हा मोंगलाच्या आश्रयास गेला असतां त्या विषयीं मोंगलाच्या मनांत वैषम्य उत्पन्न करावें व त्यानें त्यास घालवून लावावें म्हणून पेशव्यांच्या दरबारी लोकानीं कांहीं खोटे कागदपत्र करून मोंगलाच्या लष्करांत पाठविले होते. ४ पेशव्याच्या दरबारी लोकानीं. ५ वजन, दरारा. ६ वाईट. ७ पेशवे व मोंगल. ८ तह झाल्यावर दोघे ही मैत्रीनें रहात आले. ९ महादजी शिंदे.

रोन येतो म्हणतात, परंतु दोन वर्षांची छावणी करून येतो. त्यांत जीवं कोठें आहे ? धातुपोषणाचा मनसबा ! कार्यभागी यांचा निश्चय कीं, मुख्य स्थानांचा विध्वंस झाला ह्मणजे तह करावा. तें झालें ह्मणजे सारे एक गांवीं जमा झाले आहेत हे देशधडी होतील; ह्मणजे आपला अवतार ज्या कार्यासाठीं जाला तें कार्य सिद्धीस नेलेंसें होईल ! इतक्यानें त्याची कृतकृत्यता झाली ! फिरोन कोणास पत्र ऐकंदर लष्करांत अगर पुण्यास न लिहिणें. कोणाच्या लबाड बोलींत मन न घालणें. कोठें तिन्ही तालीं [?] उभें रहावया स्थल नाहीं तेव्हां [तुम्हीं] नबाबाचा आश्रय केला. त्याणीं खर्चास दिलें नाहीं, अगर मनसब्यांत कोणाच्या (तुम्हीं) नाहीं. परंतु लौकिकांत ' जिवंत आहेत, ते एकाच्या आश्रयास आहेत, ' इतकें पुरे ! आम्हांस लिहिलें कीं, ' वैरकड नलदुर्गाकडे लावावीं ' त्यास मार्ग सुंभेता नाहीं. राउताचें मासेवळण झालें आहे. नलदुर्गाकडे आसपास दोन कीं एक तोफ [बरोबर देऊन श्रीमंतांनीं] बाबूरावं एकांडा ठेविला

---

१ नादीं लावण्याचा, धीर देण्याचा. २ सखारामबापूचा. ३ पुण्याचा. ४ सारे कोंकणस्थ. ५ सर्वथा. लष्करांत पेशव्यांच्या. ६ ' तुह्मीं एकटे मंगळवेढ्यास राहून बाकीचीं माणसें नळदुर्गास पाठवावीं ' ह्मणून तुह्मीं लिहिलें, त्यास इ.इ. ७ निर्भय. ८ ' पाण्यांत मासे जसे चोंहोंकडे धांवत असतात तसे शत्रूचे स्वार चोंहोंकडे देशाच्या सांदी कोपऱ्यांतून सुद्धां फिरत आहेत, ' असा अभिप्राय. ९ बाबूराव हरि व सखाराम हरि हे परभू जातीचे दोघे बंधु पेशवाईत विख्यात योद्धे होऊन गेले. एकांडा ह्मणजे एकटा. एकांड्या बरोबर त्याचे स्वतःचे स्वार नसावयाचे. एकांड्यांचें काम नेहमीं लष्करांत धन्या संनिध राहण्याचें असे. ज्यांची शौर्या विषयीं फार वाहवा झाली असे अशाच लोकांतून एकांड्यांची निवडणूक होई. एखाद्या अवघड किल्ल्यावर हल्ला चढवावयाच्या वेळीं किंवा लढाईत ऐन आणीबाणीच्या प्रसंगीं हे नेहमीं पुढारी असत. पेशवाईत भरण्याच्या घोडे स्वारास पगार अडीचशें रुपये सालिना मिळे. चांगल्या घोडे स्वाराचा शेरा सालिना तीनशें रुपयांचा असे. तथापि नांवाजलेला कोणी कोणी शिलेदार पथकांत असेल तर त्याच्या इभ्रतीवर व कर्तृत्वावर पांचशें, सातशें, आठशें रुपये पर्यंत सुद्धां त्यास वेतन मिळे. असले निवडक शिलेदार प्रत्येक सरदाराच्या पागेंत व पथकांत कांहीं असत. हे ' भरण्याचे ' ' चांगले ' व ' निवडक ' असे तीन भेद सांगितले यां पेक्षां एकांड्यांची योग्यता फार मोठी होय. त्यांस दोन तीन

आहे. कोण्या मतलबावरी कळेना ! दुर्गचें सूत्र आहे किंवा त्याच्यां कार्यभागियानें आमचीं हीं वोपून द्यावींसीं केली आहेत कळेना ! प्रत्यहे क्षेत्राकडून पांचशें चारशें दोनशें शंभर राऊत जातच आहेत. सोलापुरांत नाइकांचा आखाडा भारी. बारामतीकडील अगदीं बाडबिसाद शिंगरें घोडीं सुद्धां सोलापुरास गेलीं. कांहीं चंदनवंदनच्या किल्ल्यावरी गेलीं. येथून पाठवावया चित्त प्रशस्त होत नाहीं. श्रीपंढरीनाथकृपेनें अरिष्ट परिहरलें तरी बरेंच झालें. नव्हे आणि इकडे आले तरी तें ही संकट. त्यासच दुसरा अवलंब नाहीं. तुमच्या खर्चाची अनुपती हें कळतें. परंतु आम्हांपाशीं आहे नाहीं हें कळतच आहे. असतें तरी पाठवितों. लोकांचे मुबादलेखर्च मिरजेच्या प्रकरणीं केले आहेत त्यांची वाट नाहीं. काय करावें ! सारा संकटाचा प्रसंग ! तरी तुम्हीं फार करून संकटकाल सोशिला. या उपरी चिंता न करणें. श्रीपंढरीनाथ सर्व प्रकारें कृपा करील. बहुतांचा आशीर्वाद व श्रीची कृपा व ज्या धण्याची एक सान चाकरी केली तें सुकृत पदरीं आहे. सर्व ही मनोरथ सिद्धीस जातील. आम्हीं प्यादे ठेवितों. सामान तरतूद करितों. लोकिक आवई—श्रीमंत आले तरी खामखा झुजावें—ही आहे. लज्जारक्षक श्रीभगवान् समर्थ आहे, त्यामुळें कोणाचा हिसाब धरीत नाहीं. जें प्राक्तनीं असेल तें घडेल हा ही एक विचार आहे. तुम्हीं समीप आहां. फौज पाठविलीत आणि दोन्ही अर्भकें व सौभाग्यवती यशोदाबाई

पासून पांच हजारां पर्यंत सालिना नेमणूक, शिवाय त्यांच्या योग्यते प्रमाणें कापड, इतकें मिळून किल्येकांच्या लवाजम्याचा व शागीर्द पेशाचा खर्च ही सरकारांतून चालविला जाई.

१ नळदुर्गच्या किल्लेदाराचे. २ चव्हाणाकडे या वेळीं नळदुर्ग किल्ला असावासें वाटतें. 'त्याच्या कार्यभागियानें' ह्मणजे चव्हाणाच्या कारभाऱ्यानें असा अर्थ असावा. 'आमचीं मुलें माणसें नळदुर्गास आहेत तीं बाबूराव एकांड्याच्या हवालीं करण्याचा नळदुर्गच्या किल्लेदारानें किंवा चव्हाणाच्या कारभाऱ्यानें बेत केला नसेलना ?' असा लिहिण्याचा अभिप्राय. ३ दररोज. ४ पंढरपुराकडून. ५ बाबूजीनाईक बारामतीकराचा. ६ कुटुंबाचीं माणसें नळदुर्गास पाठवावयास. ७ असें न झालें तर. ८ एकसान ह्मणजे काय ? एकनिष्ठ ? कीं एकसारखीं ?

नेली तरी कार्यास येईल. खंडोजी देखील लाऊन देऊं. करकंब येथून एक मजल. तेथून दोन मजलीचें कार्य आहे; भीमातीराच्या सुमारें आलां तरी. नाहीं तर श्रीमंतच परभारें गेले तरी श्रीची इच्छा! तुम्हीं लग्नास याल म्हणोन फार भरंवसा होता. बरें! ऋणानुबंध प्रमाण! या उपरी तुम्हीं आमची चिंता न करणें. कदाचित् (श्रीमंत) माघारे याच मार्गे फिरले तरी गैळां पडत नाहींत. यद्यपि आले तरी फजीत पावून जातील! श्रीची इच्छा प्रमाण! कुरुंदवाडाकडे सावधता किती म्हणोन लिहावी! त्या ब्राह्मणानें काय करावें! लिहीतच आहों. बाबूराव एकांडा नलदुर्गाकडे राहिला म्हणोन तेथील पत्र नाहीं. लष्करांहून माणूस आला त्यानें सांगितलें. सत्य मिथ्या [कळत] नाहीं. प्रत्यह आमचें माणूस जातें येतें. आम्हीं लिहिलें म्हणोन चिंता न करणें. पिलिवाहून लक्ष्मणपंत व गोपाल पंत यांणीं लिहिलें कीं, ' (इकडे) मोंगल येतो. निदानीं तेथें शहाजी बुवाचें कुटुंब घेऊन येऊं. ' त्यांस लिहिलें कीं, ' चिंता न करणें. तसाच प्रसंग आला तरी येणें. ' म्हणोन लिहिलें. कळलें पाहिजे. लोभ कीजे. हे आशीर्वाद.

नं० २४०

(२६ एप्रिल.)

वैशाख शु० १४ चें मु०नलदुर्गचें पत्र विंबक हरीचें गोविंद हरीस——

" इकडील वर्तमान—श्रीमंत खासा हुदुनसुरे (?) म्हणून यादगिरीजवळ

---

१ यावरून मोंगलाचें लष्कर या वेळीं मंगळवेढ्या पासून तीन मजली होतें असे स्पष्ट झालेंच. २ आमच्या वाटेस जात नाहींत. ३ कुरुंदवाडास महादाजीपंत कारकून होता त्याणें. ४ पेशव्यांच्या लष्करांतून. ५ हे दोघे अक्कलकोटकरांचे कारकून पुढील वाक्यांत शहाजी बावाचें नांव आलें आहे ते शहाजी राजे भोंसले अक्कलकोटकर होत. ६ यादगिरी व पुढील वाक्यांत शिरढोण आलें आहे तें हीं दोन्हीं ठाणीं मोंगलाईत गुलबुर्गे प्रांतीं आहेत.

गांव आहे तेथें मुक्काम आहे. राजश्री बाबूजी नाईक व बाबूराव हरि शिरढोण प्रांतें आले आहेत. राजश्री होळकर व नारो शंकर हे (श्रीमंतांनी) एकीकडे पाठविले आहेत. तीन दळें झालीं. मुलूख मोडितात. लुटण्यांत ताल राहिला नाहीं. यवनानें विनायकदास यांस नाशिकाकडे रवाना केलें होतें, त्यास तिकडून अगदीं मुलखाची जप्ती करून [ते] नगरावर आले. खासा नगरावरच राहिला आहे. पेठा लुटून फस्त केल्या. किल्ल्याचें ही अनुसंधान लागलें म्हणून जनचर्चा आहे. राजश्री जानोजी भोंसले व गमाजी यमाजी फौजेसह पुण्याकडे गेले. पुणें परिछिन्न जाळणार. या प्रमाणें वर्तमान आहे."

नं० २४१

(अजमासें वैशाख वद्य
मेचा प०पंधरवडा.)

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद[2] उपरी. तीर्थरूप[3] उभयतां फार श्रमी. छाया नाहीं. राहुटी उभी करावी तरी मेखा लागेनात. रहावया घर न मिळे. मांडव घालावया वांसा न मिळे. ऐसे संकटस्थलीं आहेत. त्याणीं तुम्हांस लिहिलें असेल म्हणोन तुम्हीं सचिंत असाल, तरी चिंता करून काय होणें ? तसेंच आम्हीं वारंवार लिहितों त्यास काय उपाय ? जन्मवरी ज्याची सेवा केली त्याणीं हे गति केली ! निरापराधी कर्जदार [होऊन] एकनिष्ठेनें सेवा केली त्याचें फल हें प्राप्त झालें ! देशधडी कुटुंबें झालीं ! कोठें उभें रहावया स्थल नाहीं ! तुम्हांस श्रीमंतांनीं आज्ञा केली कीं, ' कृष्णातीरीं रहाणें. ' ऐसें असतां दगाबाजीनें फौज पाठवून दगा केला ! लोक म्हणते कीं, ' बहुता दिवसांचे सेवक (असून) हे एकाएकीं मोंगलाईत गेले ! ' तेवढें निमित्य

---

१ स्वत: मोंगल. २ हें गोविंद हरीचें गोपाळरावास पत्र. ३ ज्येष्ठ बंधु कृष्णभट व त्रिंबक हरि नळदुर्गास होते ते. ४ मिरजेस वेढा बसण्यापूर्वी.

ईश्वरें वारिलें. तुम्हीं नबाबा सन्निध गेलां. ते थोर. (त्यानीं तुमचा) आदरमान केला. राजे बहादर यांणीं अभिमान धरिला. तुमचा काल अनुकूल होईल तेव्हां सर्व ही चित्तानुरूप योग घडोन येतील. नबाबानीं स्थल देईन म्हणावें तरी त्यांच्या तरी हाताखालें स्थल कोठें आहे? तुम्हीं गेलां तेथें कर्ज देखील मिळेना! बरें! चार दिवस जसा प्रसंग पडेल तसें वर्तावें. पुढें सर्व ही संकटें वारावार होतील. नबाब जितकी जागीर देतील तितकींच पुरे. त्यांतच गुदरान करावी. काळाचे दिवस घालवावे. चित्तांत श्रम मानूं नयेत. मोठी काळजी कर्जदारांची आहे. ईश्वर इच्छा प्रमाण! आजन्मांत कर्ज नाहीं. होणार पुष्कळ झालें. कर्ज फिटावया उमेद तिलमात्र दिसत नाहीं. नवें कर्ज करून आजी चार पांच महिने तुम्हीं गुदरान केली. मृग ही समीप आला, तेव्हां लोक मागील देणें या साठीं दंगा करतील. पुढें उठोन जाऊं लागतील. तेव्हां समागमें नांवा सारखें सामान पाहिजे. तेव्हां मोंगलाईच्या शिरस्त्यानें[3] महिने महाल लोक ठेवावे लागतील. आम्हीं येथें आहों. दुसरें स्थल मजबूत नाहीं. श्रीमंत आम्हावरी फिरोन येते समयीं येणार म्हणोन लोक भय घालितात, त्या भयें कडून कोठें जावें? खर्चास नाहीं. कोणत्याचे दारीं जाऊन उभें रहावें? येऊन जाऊन एक शेजारी[3], तेथें गेलों होतों. आपल्या विचारास न ये, व राजे बहादर यांच्या विचारास न ये, [म्हणून] येथें आलों. अबशाची चिठ्ठी जावयाची त्याणीं दिल्ही, परंतु तें गैर वळण. एक माणूस जवळी राहणार नाहीं, या मुळें न गेलों. बरें! श्रीमंत आले तरी आमचा साहाकारी श्रीपंढरीनाथ समर्थ आहे. होणार प्रारब्धगतीनें होऊन येईल! आ-

---

१ तुम्हांस लष्करांत टाकून घरोघर निघून येतील. २ दरमहां वेतन देण्याची बोली करून. ३ निंबाळकर. त्यांचें गांव मोहोळ येथें गोविंद हरि पूर्वी गेला होता, परंतु मोंगलाचा दिवाण विठ्ठल सुंदर याचें व निंबाळकरांचें वांकडें असल्यामुळें त्यांच्या आश्रयास गोविंद हरि जाऊन राहिला हें त्यास आवडलें नाहीं; म्हणून त्याच्या व गोपाळरावाच्या सांगण्या वरून गोविंद हरि मंगळवेढ्यास येऊन राहिला. ४ आवसें शहर व किल्ला मोंगलाईत प्रसिद्ध.

मचा संकल्प कीं, या स्थलींच परिणाम लागो. परंतु अशी पुण्याई कैची! धणी येतील त्यांच्या हातून या देहाचें सार्थक कसें होईल! त्यांस यश कसें घडेल! मिरजेंत तीच इच्छा धरून राहिलों, शेवट श्रीइच्छेनें होणार तें झालें. एवढे फौजेच्या परिघांतून (ईश्वरानें) अक्षतमरिष्ट बाहेर काढिलें. पुढें ही उत्तम प्रकारें परिणाम लाविणार तोच आहे. सखारामानें आपला मनोरथ सिद्धीस नेलासा झाला! बरें! श्रीपंढरीनाथ समर्थ! चिंता न करणें. हे आशीर्वाद.

नं० २४२

(अजमासें वैशाख वद्य
मेचा प०पंधरवडा.)

श्रीगणपतिर्जयति.

चिरंजीवें राजश्री नारायणराऊ व नीलकंठराऊ यांस आशीर्वाद. तुमचें पत्र पावलें. सविस्तर चिरंजीवाच्या पत्रावरून कळेल. 'लग्नाचा योग घडत नाहीं' म्हणोन लिहिलें तें कळलेंच आहे! वैशाख शुद्धपक्ष गेला. मग ज्येष्ठमासावरी गोष्ट गेली. ईश्वर इच्छा प्रमाण! प्रस्तुत मुक्काम कोणे ठिकाणीं तें लिहिणें. नीलकंठराऊ येथें असतां 'तुमचें पत्र येत नाहीं. आपण लष्करांत असतों तरी वरचेवर पत्रें पाठवितों' असें बोलले होते तो ही मजकूर कळला! एवंच फुकाचें पत्र पाठवावयास इतका दिरंग, तेव्हां वरकड कळोन गेलेंच आहे! तुम्हांस लष्करांत काळजी नाहीं; परंतु जागां जागां (तुमचीं मुलें माणसें) आहेत तीं आपलाल्या स्थलीं श्रमी. तुमचें पत्र येत असावें. आम्हीं कोणे रीतीनें वर्तावें! येथून निघोन परांड्याकडे जावें तेव्हां या ठाण्यास उदक सोडावें! उगेच नांव आहे तें बुडतें. राहिलों

---

१ मंगळवेढ्यांसच. श्रीमंतांनीं येऊन वेढा घालावा. युद्धांत आपण लढून मेलों तरी सार्थक्य झालें, त्यांच्या हातें मृत्यु यावा, असा अभिप्राय. २ कांहीं इजा न होतां. ३ हें गोविंद हरीचें पत्र. ४ गोपाळरावाचें दुसरें लग्न व्हावयाचें होतें त्याचा. ५ मंगळवेढ्यास.

तर पेशवे येतील, काय करतील, हे काळजी. लौकिक राहिला पाहिजे. याचा विचार काय तो लिहिणें. बहुत काय लिहिणें. 'तुळजापुरच्या रोखें (मोंगलाची) दहा वीस हजार फौज आली' अशी आवई गेली म्हणजे 'गच्छ' करितील! बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

चिरंजीव राजश्री तात्या यांस आशीर्वाद. लिहिलें परिसिजे. तीर्थरूप सुखें आहेत. चिरंजीवाचें लग्न होणार आहे. कळलें पाहिजे. हे आशीर्वाद.

नं० २४३

(अजमासें वैशाख वद्य
मेचा प०पंधरवडा)

श्रीगणपतिर्जयति.

चिरंजीवे[1] राजश्री नारायणराऊ व नीलकंठराऊ व आबा यांस आशीर्वाद. उपरी. नीलकंठराऊ येथें बोलले होते कीं, 'आम्हीं रोज बेरोज पत्रें पाठवीत जाऊं.' त्यांस कागद लिहावयाचें स्मरण नाहीं. आबास नाहीं. नागयणरायानीं मध्यें महिनाभर लेखणी धरलीच नव्हती! परंतु नगराकडे आल्या पासून पत्रें लिहूं लागलें. पुढें लग्नाचे दिवस थोडके उरले. यावया गांठ पडली तरी उत्तम. न पडे तरी लष्करांत वधू नेऊन [लग्न] उरकोन घ्यावें. हें स्मरण असों द्यावें. सुचना लिहिली[2] आहे. बहुत काय लिहिणें. हे आशीर्वाद.

नं० २४४

(वैशाख वद्य
मेचा प०पंधरवडा.)

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद[3] उपरी. काली पुण्याहून पत्रें आलीं त्या बराबरी मामाचा[4] निरोप

---

१ श्रीमंत पळून जातील. मंगळवेढ्यांकडे येणार नाहींत. २ पत्र गोविंद हरीचें. ३ गोपाळरावानें नवरी नापसंत केली असल्याचा सुगावा गोविंद हरीस लागला होता असें या लेखांत जो आग्रहीपणाचा रोंख आहे त्यावरून वाटतें. ४ 'मामा' कोण हें कळत नाहीं. ५ पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास. यांत 'वैशाख शुद्ध पक्ष

आला आहे जे, ' पुढें कांहीं काल क्रमल्या नंतर, चिरंजीवाचे कांहीं आपण आहों तेथें समजूं न द्यावें, [?] ये विशीं सूचना रावसाहेबांस लिहावी ' म्हणोन लिहिलें आलें आहे; यास्तव सूचना लिहीत असे. दुसरी—वधूची ही गोष्ट त्याणीं लिहिली आहे कीं, वसई प्रांतीं नव वर्षांची सुंदर आहे. ' आणा ' म्हणाल तर आणवून प्रविष्ठ करूं. त्यास तुमचे आमचे दर्शनांतीं तो प्रकार करणें तरी करूं. तूर्त उत्तर लिहीत नाहीं. पाठणकर येतात हें ही पाहतों. तुमचें येण्याचें ही पहातों. वैशाख शुद्धपक्ष गेला तरी सहजच राहिलें. पुढें ऋणानुबंध प्रमाण ! हे आशीर्वाद. बहुत सावधपणें रहावें. आमची चिंता न करावी. आमचा साहकारी भगवान् आहे तो चित्तास येईल तें करूं ! हे आशीर्वाद. चिरंजीव दाजीकडे वरचेवर आठ चौ रोजीं पत्र पाठवीत जाणें. ते बरे झाले तरी (त्यानीं तुम्हांकडे) कोणत्या मार्गे यावें हें ही लिहिणें. हे आशीर्वाद.

नं० २४५

श्रीगणपतिर्जयति.

चिरंजीवे राजश्री नीलकंठराऊ यांस आशीर्वाद. उपरी. तुम्हीं पत्र पाठविलें

गेला तरी ' हे शब्द आले आहेत त्यावरून नजर चुकीनें आह्मीं हें वैशाख वद्य पक्षीं घातलें आहे, परंतु याचें योग्य स्थल चैत्र वद्यांतील पत्रांमध्यें आहे. पत्र विशेष हांशिलाचें आहे असें नाहीं, परंतु गोपाळरावा सारख्या पसतीस चाळीस वर्षांच्या बिजवरास नवरी शोधून काढली ती नऊ वर्षांची होती हें पुनः वाचकांस दर्शविण्याची संधी आमच्यानें फुकट दवडवेना.

१ गोपाळरावास. २ नं० २४५ व २४६ हीं पत्रें गोविंद हरीनें लिहिलेलीं. यांत नं० २४६ चें पत्र गोपाळरावाच्या लग्ना संबंधें आहे. हें वाचून वाचकांस क्षणभर गंमत वाटल्या शिवाय राहणार नाहीं ! त्यांत ध्यानांत ठेवण्या सारखें हें आहे कीं, गोपाळरावाच्या लग्ना करितां आपण पसंत करून आणविलेली मुलगी त्यास आवडली नाहीं व तो आयते वेळीं लग्न करून घेण्यास आढेवेढे घेत आहे असें पाहून गोविंद हरीस फार राग आला आहे; पण त्या रागांत त्यानें हें पत्र लिहिलें आहे तरी तें गोपाळरावास न लिहितां नारायणराव व नीलकंठराव यांस लिहिलें आहे ! जसें काय

तें पावलें. सविस्तर वर्तमान कळलें. सारांश सखारामाचे मनोदय पूर्ण जाहले ! इतक्यानें शेवटास गेलें ! त्यास संतोष झाला ! वरकड होणार भावी तसेंच होतें. तदनुसार श्रीनें घडविलें. निमित्यास मात्र श्रीमंत दादा साहेब ! सखारामाच्या योगें करून झाले. पुढें तह नाहीं तेव्हां मनुष्यास उभे रहावया स्थल नाहीं. जागां जागां बंडें होतील. माणसास माणूस खाईल असे दिवस आले. या उपरी नबाब सातारियाकडे जात नाहीं. कोठें जात नाहीं. पुणें जाळून सत्यानाश केला. तेवढी (त्याची) कीर्ति झाली ! या उपरी शहरास जातो. कळावें बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद. चिरंजीवाच्या पत्रावरून सर्व कळलें. अद्याप ही ते कृतघ्न कोणीकडे होतात हें ठीक नाहीं. हे आशीर्वाद.

नं० २४६

[वैशाख वद्य
मेचा प०पंधरवडा.]

श्रीगणपतिर्जयति.

चिरंजीव राजश्री नारायणराऊ व नीलकंठराऊ यांस आशीर्वाद उपरी. तुम्हीं पत्र पाठविलें तें पावलें. मजकूर कळला. तुम्हीं जाते समयीं सांगितलें कीं, ' नवरीचा यत्न करणें. तेव्हां पाटणकरांस पत्र लिहिलें. त्यानीं तीन नवऱ्या ठिकाणीं लाऊन आम्हांस लिहिलें. ' तीन पैकीं एक उत्तम असेल ती घेऊन येणें. तुम्हीं आणाल ती मान्य. ' या प्रमाणें आम्हीं पत्र लिहून पाठविलें. ते घेऊन आले. तुम्हीं समयास[2] न आलां. आतां मैनसबे

आपल्या लग्नाच्या कामांत गोपाळरावास बरें वाईट कांहीं समजतच नाहीं, आईबाप व भाऊ ठरवितील तीच मुलगी तो करणार, व नारायणराव व नीलकंठराव वगैरे ' चिरंजीव मंडळी ' मात्र नवरी मुलगी बाईट ह्मणून नाकें मुरडीत आहेत ! वस्तुतः हें पत्र गोपाळरावाच्या नांवानें लिहिलेलें नाहीं तरी तें त्यासच उद्देशून लिहिलेलें आहे हें वाचकांस कळवावयास नकोच !

१ तपास करून. २ लग्नाचा मुहूर्त ठरविला होता तेव्हां. ३ उडवाउडवीच्या गोष्टी लिहितां.

लिहितां. परंतु पाटणकराशीं संबंध आहे! श्रीकृपेनें नवरी उत्तमच आहे. कोणी शब्द लावावासा नाहीं. तथापि विचक्षणा केली तरी सुटावयाची नाहीं !!! असो. ईश्वरसूत्र प्रमाण. तुमचा कागद. चोरून छपून फाडून टाकिला. त्याची चर्चाच केली नाहीं. तूर्तच अग्नि पडेल तें लांबींवर पडलें! हें एक संकट. प्रत्यह जे[1] आणिले परकी त्यांचें समाधान आह्मीं करितों, त्यास त्यानीं हें ऐकिलें ह्मणजे आम्हांस उभे रहावया स्थल नाहींसें होईल! फिरोन ऐसें लिहिण्याचें प्रयोजन नाहीं. तुम्हीं दहा लग्नें करा. आधीं हें, मग दुसरें! कळलें पाहिजे. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

राजश्री विष्णूपंतास नमस्कार. तुमचें पत्र पावलें. एक वेळ क्षमा झाली. पुढें असा मजकूर लिहिल्यानें तुमची प्रतिष्ठा राहणार नाहीं. हे विनंती.

न० २१७L

(१६ एप्रिल)

श्री.

तीर्थरूप मातुश्री बाई वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें माधवरायानें[2] चरणावरी मस्तक ठेऊन शिरसाष्टांग नमस्कार पिज्ञापना. येथील कुशल जाणून स्वकीय लेखन करावयासीं आज्ञा केली पाहिजे. विशेष. वडिलांकडील पत्र छ० २० रमजानचें आलें तें पावलें. लिहिलें वर्तमान कळलें. असेंच सदैव आशीर्वाद पत्र पाठवावयाची आज्ञा केली पाहिजे. इकडील वर्तमान तर सविस्तर पूर्वी सेवेशीं लिहून पाठविलेंच आहे. आज येथें मुक्काम झाला. उदईक कूच करून परळीच्या[4] घाटासुमारें

---

१ कोंकणांतून नवरी मुलीचा बाप व त्याचीं माणसें आम्हीं आणविलीं आहेत त्यांचें. २ गोविंद हरीच्या हातची ही ओळ वाचून बिचारा विष्णुपंत अगदीं खजील होऊन गेला असेल! मुलांस व कारकुनास एकाच विषयासंबंधें मजकूर लिहिलेला आहे त्यांत किती अंतर ठेविलेलें आहे पहा! ३ हें पेशव्यांचें गोपिकाबाईस पत्र. ४ परळी वैजनाथ हें मोंगलाईत आहे.

गंगेवर यावें असें वर्तमान आहे. बसालतजंगाचा मोहिदीन साहेब या नांमें (वकील) कलबुर्ग्याजवळ आला आहे. त्याशीं मजकूर बोलावयासीं सरकारचा वकील नंदराम पाठविला आहे. महिन्यामध्यें बसालतजंगानें यावें यास्तव पाठविला आहे. त्यास या प्रमाणें करार केल्या घेऊन यावें ऐसें आहे. बसालतजंगाचे मुदे हे कीं, तो (आमच्या कुमकेस) आल्यानंतर नबाब निजामअल्लीशीं आह्मीं सलूख एकंदर न करावा; हा मुद्दा त्याचा मुख्यत्वें करून आहे. मुरारराव ही त्यास एक दोन दिवशीं येऊन मिळणार या प्रमाणें वर्तमान आलें आहें. हिंदुस्थान प्रांतांतून महादजी शिंदे ही नर्मदेवर आले आहेत ह्मणून वार्ता येथें दाट आहे. एका दोन रोजांत बातमी ही येईल. वरकड वर्तमान सर्व पूर्वी सेवेशीं लिहिलेंच आहे. रवाना छ० २ सवाल सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

पै॥ छ० १० साबान.

नं० २१८

(३० एप्रिल.)

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद[3] उपरी. येथील कुशल तागायत वैशाख वद्य तृतीया मंदवासर तिसरा प्रहर. यथास्थित असे. विशेष. रेवेंतगांवचें वर्तमान काली लिहिलें आहे त्यावरून कळेल. मिरआबस[4] मोंगेलअल्ली[5] याचा बक्षी केवळ दैत्यांशी ! (त्यास) कांहीं करुणा नाहीं. त्याणें साठ सत्तर माणसें रेवतगांवचीं जिवें मारिलीं. त्यांत पोरें पंधरा–पांच सात वरसांचीं, तीन वरसांचीं दोन वर्षांचीं, कापिलीं ! प्यादे[6] पंचवीस तीस त्यांत झुंजोन मेले. वरकड कुणबी, बायका, ब्राह्मण, जो देखीला तो त्यानें तोडिला, मारिला, असें

१ बसालतजंग हा निजामअल्लीचा भाऊ व अदवानीचा नबाब. २ मुरारराव घोरपडे सेनापति गुत्तीकर हा बसालतजंगास येऊन मिळणार. ३ हें गोविंद हरीचें गोपाळरावास पत्र. ४ हें मंगळवेढ्याचे आसपासच कोठें असावें. ५ मोंगलअल्ली हा निजामअल्लीचा भाऊ. मोठेंच प्रस्थ ! ६ सेनापति. ७ प्यादे रेवतगांवकरांचे.

मार्गे ही कोणी केलें नसेल. पुढें ही कोणी करणार नाहीं. बायको जितकी तरणी देखिली तितकी पळविली. कोठें ठिकाण नाहीं. गाई मारिल्या. गांव जाळिला. मागती[1] बंद धरून नेला. अंताजीपंत व नारोपंत उभयतां बंधु सांपडले. [त्यांचीं] बायका मुलें सांपडलीं. ज्यांस वाट ईश्वरें दिली तीं वांचलीं. कोठवर दुःख विपत्ति लिहावी !! काली शुक्रवारीं रेवतगांवा[2] वरून कूच करून उमदीचे सुमारें गेला. बराबर रयता, बायका, बंद तमाम नेला; व हे उभयतां बंधु व त्यांचीं मुलें एक दोन काय असतील तीं. अद्यापि ठीक नाहीं. पंचवीस हजार तीस हजार खंडणी जातीची मागतो. कोण चांडाल भेट्या झाला आहे. त्या कृतघ्नानें इतकें केलें ! त्याचें नांव ठिकाणीं लाविलें आहे. प्रस्तुत नवाबाचे सजावल[3] येऊन त्यांची सुटका होईल तर करणें. नारो भिमराऊ देशपांडे बरडोल मध्यस्तीस अंताजीपंताच्या आहेत. निदान कोठवर ठरेल पहावें. उमदीवरी[4] गेला होता, परंतु डफळे सात आठशें जमा झाले आहेत, यामुळें पुढें गेला नाहीं. आम्हांस लोक ही मिळते, करकंबची फौज व येथील वगैरे दोन हजार स्वार जमा होते, दोन हजार प्यादे जमा होते, परंतु काय करावें ! आधींच काल एक प्रकार; यामुळें परराज्यांत येणें झालें. येथें ही कजिया झाला तरी जावें कोणीकडे ? हे पेशेअंदेशी मनांत आणून सबुरी करून राहिलों. तुमचा उपाय युक्तीचे वाटेनें चालेसा असिला तरी करणें. नाहीं तर भोगाचे प्रवाहीं पडले आहेत, होणार तें होईल ! तो[5] ही या उपर कोठें गुंतत नाहीं. मजल[6] दर मजल विजापुरास जाईलसें दिसतें. तुम्हांस कळावें. हीं पत्रें तुम्हांकडे

---

१ इतकें करून शिवाय गांवचे लोक त्यानें धरून नेले ते नेलेच ! तो सांगेल ती खंडणी देऊन हे लोक सुटले तर सुटावयाचे ! २ हे दोघे रेवतगांवचे कोणी प्रतिष्ठित सुखवस्तु गृहस्थ. ३ बातमी बरोबर कळली नाहीं. ४ अंताजीपंत व नारोपंत यांस मीरआबस ह्मणतो कीं, पंचवीस हजार तीस हजार रुपये द्याल तर तुह्मांस मात्र सोडीन. जातीची ह्मणजे स्वतःची. ५ त्याच्या नांवाचा पत्ता पाडिला आहे. ६ मोंगलाच्या खासदिमतीचे शिपाई. ७ उमदी व उमराणी हे जतकर डफळ्यांचे तालुके. ८ वाईट, विपरीत. ९ दूरवर विचार. १० मीरआबस.

रवाना करावीं तों तुमचीं पत्रें छ० १२ सवालचीं आलीं तीं आजी दोन प्रहरां पावलीं. त्या वरून सविस्तर कळलें. लक्ष्मेश्वर[1], बंकापुर, व लक्ष्मण हरी यांचीं पत्रें रवाना कलीं. कुरुंदवाडचा माणूस कालीच येऊन बसला होता त्यास ही तुम्हांकडील पत्रें देऊन रवाना केला. नलदुर्गास उदईक पत्रें पाठवूं श्रीमंत नलेगांव नजाक उदगिरी[2] येथें आहेत. बाबूजीनाईक शिरढोणास वेढा घालून होते. अलीकडे खबर नाहीं. बातमी ही आली नाहीं. फिरते वेळेस श्रीमंत कोणीकडून येतील ते सुखें येऊत! आह्मीं खबरदारींत कोठवरी असावें! स्थल[3] मजबूत कळलेंच आहे. एक श्रीपंढरीनाथ साहकारी आहे. जें होणार तें होईल. तो लज्जारक्षक आहे. येथील काळजी न करणें. तिकडील तिकडे गेले तरी पीडाच टळली! बहु चारशें माणूस खंदक खणावया लाविले आहेत. प्यादे ठेविले आहेत. आणखी रोज बेरोज येत आहेत. मीरआबस आला या मुळें मुलखांत तमाम धास्त पडली. रेवतगांवचा सत्यानाश कागदीं लिहितां न पुरवे! कळलें पाहिजे. बहुत काय लिहिणें. हे आशीर्वाद.

नं० २४९

(१७ एप्रिल.)

श्रीगणराज.

अर्पेत्यें गोपाळ गोविंद कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत

---

१ लक्ष्मेश्वर व बंकापुर येथील ठाणेंदारांकडे व लक्ष्मण हारि लागू हा तुंगभद्रे पलिकडे हरिहर व बसवापट्टण या तालुक्यांचा मामलेदार होता त्याजकडे. लागू यांचे वंशज सांगली येथें राहतात. २ ज्या ठिकाणीं भाऊसाहेबानीं चार वर्षांपूर्वी मोंगलावर जय मिळवून त्याज पासून बासष्ट लक्षांचा मुलूख घेतला तें हें स्थल मोंगलाईत आहे ३ मंगळवेढ्यास पेशव्यांचा वेढा बसला तर बचाव होण्या सारखें तें कितपत मजबुदीचें आहे हें कळलेंच आहे. ४ हें पत्र गोपाळरावानें गोपिकाबाईस लिहिलेलें आहे. गेल्या पावसाळ्यांत सखारामबापू व दादासाहेब यांच्या हातून अधिकार काढून आपला मुलगा व राज्याचा खरा वारस माधवराव पेशवे यांच्या नांवावर राज्यकारभार चालविण्याचा जेव्हां गोपिकाबाईचा निश्चय ठरला त्या वेळीं त्रिंबकराव मामा, बाबूराव फडणीस,

छ० ३ सवाल रविवार. मुक्काम नगर. सुखरूप असों. विशेष. आपण कृपा करून तृतीया मंगळवारचें पत्र पाठविलें तें रविवारीं प्रहर रात्रीं पावलें. तेथें आज्ञा जे, श्रीमंत राजश्री "नारायणराव यांचें लग्न पंचमीस.

बाबूजी नाईक, पिराजी नाईक निंबाळकर, नरसिंगराव घायगुडे, मल्हारराव होळकर, रायाजी पंवार, रामचंद्रराव जाधव या सर्वांचें तिला पाठवळ होतें. परंतु तिचा खरोखर विश्वास व सारी भिस्त गोपाळराव पटवर्धनावर होती. दादासाहेब व सखारामबापू यांस आपण कधीं कधीं अनुकूल होणार नाहीं व तुमचा पक्ष यावज्जीव सोडणार नाहीं, असें तिनें गोपाळरावा पासून शपथपुरस्सर वचन घेतलें होतें. नानासाहेब पेशव्यानीं आपणास सरदारी देऊन एवढया योग्यतेस चढविलें, त्यांच्या स्त्रियेस व मुलांस कधीं सोडावयाचें नाहीं, अशा कृतज्ञताबुद्धीनें गोपाळरावानें अगदीं शेवट पर्यंत आपलें वचन राखिलें. गोपिकाबाई व माधवराव पेशवे यानीं दादासाहेबांशीं समेट करून घेऊन त्यांच्या आज्ञेंत वागावयाचें कबूल केलें. त्यांचे सरदार व मुत्सद्दी सारे तिकडे मिळाले. पण पटवर्धन मंडळीचा मात्र दादासाहेबांशीं विरोध कायम राहिला तो राहिलाच ! ज्या गोपिकाबाईची एकनिष्ठपणें सेवा करावयाचें व्रत अंगीकृत केल्यामुळें आपली पांच पंचवीस लाखांची नुकसानी झाली, मिरज वगैरे स्थळें हातचीं गेल्यामुळें आपण पदभ्रष्ट होऊन कुटुंबें देशोधडीस लागलीं, आपणास मोंगलाचा आश्रय करावा लागला, त्याच गोपिकाबाईचा आपणावर निष्कारण रोष झाला हें पाहून व तिच्या मुलाचें व आपल्या पूर्वीच्या धन्याचें राज्य व राजधानी यांचा विध्वंस करण्या करितां आपण मोंगलास घेऊन येत आहों असा तिचा गैर समज झालेला पाहून गोपाळरावास फारच वाईट वाटलें व त्यामुळें हें त्यानें तिला पत्र लिहिलें आहे. हें लिहिण्याचें कारण असें घडलें कीं, ज्याचा पुढें सुमेरसिंगाच्या हातें खून झाला तो भावी पेशवा नारायणराव या वेळीं नऊ वर्षांचा असून त्याचें लग्न व्हावयाचें होतें. तें कार्य उरकून घेण्या साठीं गोपिकाबाई पुरंदरावरून पुण्यांत येऊन राहिली होती. मोंगलाचें लष्कर नगरास येऊन ठेपलें होतें व राजे विनायकदास दहा हजार फौजेनिशीं नाशिकाकडे रवाना झाला होता. अशा स्थितींत गोपिकाबाई व नारायणराव पुण्यांतच राहिलीं तर मोंगल कदाचित् लांब दौड करून येऊन त्यांस गांठील व कैद करील, असें वाटून गोपाळरावानें आपला कारकून पुण्यांत होता त्याच्या द्वारें गोपिकाबाईस अर्ज करविला कीं, मोंगल जवळ आला आहे, या करितां आपण पुण्यास राहूं नये. तेव्हां गोपिकाबाई बोलली कीं, गोपाळराव व जानोजी भोंसले तिकडे आहेत ते मोंगल इकडे येऊं लागला तर आम्हांस सूचना ही करणार नाहींत कीं काय ? माझ्या मुलाचें लग्न कार्य एवढें उरके पर्यंत गोपाळरावानें दम धरावा, मग पुण्याचें त्यानें काय करावयाचें मनांत असेल तें करावें !

योजिलें असतां तुम्हीं गंगाधरपंतास लिहिलें कीं, 'पुण्यास न राहणें ह्मणून अर्ज करणें,' ह्मणून लिहिलें; त्यावरून अपूर्व दिसून आलें! चार दिवस लग्न उरकल्या उपरी तुमचे विचारास येईल तें करणें." ह्मणून लिहिलें–ऐशास तस्मात् जें (कोणी कांहीं) करितात तें आम्हींच करितोंसें आपणास भासलें! उत्तम आहे!! आपण गंगाधरपंताजवळ बोललीं कीं, "गोपाळराव व जानोजी भोंसले तेथें असतां आम्हांस येथें राहण्यास चिंता काय? जर पुण्याकडे मोंगलाचें यावयाचें जाहलें तरी आम्हांस सूचना तो करितील!" ह्मणून गंगाधरपंताजवळ बोललां, त्याज वरून त्याणें आम्हांस लिहिलें होतें. येथील[1] निश्चय पुण्यास जावयाचा दिसून आला त्या वरून आह्मीं त्यास लिहून सूचना करविली. श्रीमंतांचे लग्नाची संमत देखील आह्मास दखले[2] नाहीं. आपले लिहिण्याचा भाव कीं, आह्मीं अग्रेसर होऊन जें करणें तें करतों! ऐशास आमचे चित्तीं आपल्या राज्याचें अकल्याण असतें तरी मागेंच इकडून जाते समयीं आह्मांस पुण्यास जा ह्मणत होते[3], परंतु आह्मीं गोष्टी कबूल न केली. त्या पासून आम्हांस ह्मणतात कीं, 'यांस त्यांची माया सुटत नाहीं.' ह्मणून एखादी दगेची[4] गोष्ट केली तरी आम्हांस कळूं देणार नाहींत, ह्मणून आह्मीं सूचना करविली तें विपरीत मानून सारें अपेश आपण आम्हांवरीच ठेविलें! काल महिमाच!! त्यास कोणाचा काय इलाज? राजश्री राजे विनायकदास वगैरे दहा हजार फौज नाशिकाकडे गेली ते कोण्या लागावर गेली? कदाचित् ते सडे पुण्याकडे धांवतील, आपण आमचे भरंवशावर बेफिकीर राहतील, आम्हांवर अपेश येईल, ह्मणून आह्मीं सूचना करविली ते सारीच मांड[5] आम्हांवरी

---

१ मोंगलाचा. २ माहीत. ३ आह्मीं जेव्हां मोंगलाकडे गेलों तेव्हां तो आह्मांस ह्मणत होता कीं तुह्मां बरोबर फौज देतों, तुह्मीं पुण्यावर स्वारी करा. पण तें आह्मीं मान्य केलें नाहीं. ४ तेव्हां पासून मोंगल ह्मणतो कीं गोपाळरावास अजून पेशव्यांची माया सुटत नाहीं. ५ तुह्मांस एखादा दगा करावयाचा मोंगलानें बेत केला तर आह्मीं तुमच्या ममतेंतील असें समजून तो आपली मसलत आह्मांस कळूं देणार नाहीं. ६ युद्धाच्या वर्णनांत हा शब्द वाचण्यांत येतो व तेथें 'मांड येणें' ह्मणजे सैन्याची

आली ! उत्तम आहे ! आपण आमचें इमान प्रमाण घेतलें कीं, दुसरें चित्तांत आणूं नये. त्या वरून आम्हीं सर्वस्वास बुडोन राज्यभ्रष्ट झालों. तुमचे ममतेचे असोन दुलेंग राहिले त्यांस राज्यांतून कोणी बाहेर घातलें ? आम्हीं तसेच असतों तरी सर्वस्वास कशास बुडतों ? तें चित्तांत कांहीं न येतां बरें लिहिलें तें वाईट मानून. दोषारोप आम्हांवर ठेऊन, " चार दिवस कांहीं न करतां पुढें तुमचे चित्तास येईल तें तें करणें " ह्मणून लिहिलें, त्यावरून बहुत अपूर्व वाटलें ! आजी पावेतों कायावाचामनें आपल्या राज्याचें अकल्याण इच्छिलें नाहीं व पुढें ही आमचे चित्तीं आपण अग्रेसर होऊन करावयाचें असेल नसेल तें भगवंतास ठाऊक असेल ! आमचे गुणाचे ग्राहक [3]होते तरी मोंगलाईत देखील यावयाचें प्रयोजन नव्हतें ! असो. जें झालें तें बरेंच ह्मणावें ! आम्हीं सर्वस्वास तुम्हां करितां बुडालों तें चित्तांत किमपि न आणितां आमचे ठाईं दोषारोप ठेविले ! काल महिमा तशीच, त्यास आपला इलाज काय ? एकूण आपलेकडील माया सुटेना यामुळें अतोभ्रष्ट. आपले चित्तांत ' जें करितों तें आम्हींच. ' या मुळें ततोभ्रष्ट ! एकूण दोहींकडे धरावयास जागा नाहीं. धनी कारभारी यांचा राग रंग कळलाच होता. आपली कृपदृष्टि आमचे ठायीं असेल ह्मणून आपले चरणारविंदीं जीव ठेऊन होतों, त्याचा ही भाव कळला ! लग्न कार्य सिद्धीस न्यावें. बातमी असावी. हे विज्ञापना. या उपरी आम्हीं दुसरें पत्र सूचनेचें अगर कोणा एका मजकुराचें लिहीत नाहीं. हे विज्ञापना.

बाजूची बाजू शत्रूवर कोसळणें असा अर्थ असतो.

१ बेइमानीची गोष्ट. २ दोंहीं डगरींवर हात ठेवणारे. तुमच्या ममतेंतील असून दादासाहेबांकडे मिळणारे. ' अशा लोकांस राज्यांतून दादासाहेबानीं बाहेर घालविलें नाहीं. आह्मीं मात्र एकनिष्ठतेमुळें राज्यास मुकलों, ' असा भाव. ३ आमच्या गुणाचे ग्राहक नानासाहेब पेशवे जिवंत असते तर.

श.१६८५ मोंगल पुण्यावर चालून येतो इ.स.१७६३

नं० २५०

(१ मे.)

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद[1] उपरी येथील कुशल तागायत वैशाख वद्य चतुर्थी रविवार यथास्थित असे. विषेश. काली कुरुंदवाडाहून पत्रें आलीं तीं पाठविलीं आहेत त्यां वरून कळेल. आम्हीं कालीच पत्रें येतांच कुरुंदवाडचा माणूस रवाना केला. लष्कर श्रीमंतांचें भालकीकडे होतें येथून उदगिरीकडे आलें म्हणतात. भालकीचे मुक्कामचें पत्र काली सातवे दिवशीं बातमीचें आलें. त्याणीं सांगितलें कीं, दोन चार लष्करें वेगळीं झालीं आहेत. बाबूजीनाईक शिरढोणास (वेढा घालून) बसले होते. गांवकर बाहेर पडोन (त्यानीं यांस) कोसभर तळ उठऊन घालविलें, ते कोसावरी जाऊन राहिले. मीरआबस पंचवीस हजार रुपये अंताजीपंतास मागतो त्यांचें सर्वस्व गेलें. जिवासाठीं कांहीं देऊं म्हणतात. दहा हजार पावेतों (देऊं) म्हणतात. परंतु देणार कोण ! नारायणराव देशपांडे यानें लिहिलें कीं करार केला तरी वसुलाची वाट काय ? आम्हीं साफ लिहिलें कीं, त्यांचें सर्वस्व जन्माचीं जोड गेली. आम्हीं कर्जदार. नित्य खर्चाची टंगचाई. रुपये कोठून देणार ? बायका, पोरे, [यांच्या हत्या व] मोहत्या त्याणें घेतल्या, तैशाच हे चौघे ब्राह्मणांच्या हत्या घेईल ! तुम्हीं दरम्यान रदबदली करितां, तरी इतकें करणें कीं, एक अंताजीपंत ठेऊन घेऊन वरकड मुलें व बंधु [तो सोडील तर] सोडून आणणें. एकाचीच हत्या घेणार घेऊ ! एक घरचे चौघे ठेऊन घेणें हें काय ! श्रमी मात्र करितील. त्याचा भोग अ-

---

१ हें पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास. २ भालकी हें रामचंद्रराव जाधव याच्या जहागिरींतील मुख्य ठिकाण बेदरप्रांतीं मोंगलाईत आहे. ३ पल घेऊन येणाऱ्या जासुदानीं. ४ येथून पुढें आलेल्या मजकुराचा नं० २४८ च्या पत्रांतील मजकुराशीं संबंध आहे. ५ मीरआबस यानें. ६ मीरआबस बंदिवानांचे हाल मात्र करील. खंडणीचा पैसा द्यावयास त्यांजवळ नाहीं तो ते कोठून देतील ?

सेल तसें घडेल. " ह्मणून लिहिलें तुमचा यत्न चालेल तरी मोंगलअल्ली-चा सांडणीस्वार जलदीनें येईल तर पाठविणें. काली मंदवारीं त्याचा मु-क्काम उमदी पलीकडे होता. आजीची खबर नाहीं. श्रीमंतांकडील वर्तमा-न—तेथें[2] बातमी कोणे ठिकाणीं (आहेत) हे नाहीं, तेव्हां अपूर्व आहे. बहुत काय लिहिणें. बंकापुरचे जासूद पत्रें घेऊन आले आहेत. हे आ-शीर्वाद. कुरुंदवाडचीं पत्रें व रोखे यांच्या नकला तीर्थरूपांकडे पाठवाव्या तरी ते आधींच श्रमी. त्यांत विशेष राग येईल ! त्यांस स्थल बसावया नाहीं. उष्णांत आहेत. भोगास उपाय नाहीं ! हे आशीर्वाद. अनुकूल पडेल तर एक दोन कैच्या बाण व दोन बाणदार पाठवणें. हे आशीर्वाद.

पै॥ छ० २२ सवाल.

नं० २९१

(२ मे.)

श्री.

श्रीमंत राजश्री पंढरीनाथ तात्या स्वामींचे सेवेशीं.

विनंती सेवक केसो बल्लाळ गोरे. साष्टांग नमस्कार. विज्ञापना. येथील वृत्त तागायत वैशाख वद्य पंचमी पावेतों मुक्काम शिवपट्टण येथें सुखरूप असों. विशेष. आपण कृपा करून पत्र पाठविलें तें पावलें. बहुत आनंद झाला तो कोठवर लिहावा ? इकडील वृत्त तर यवनाची फौज दहा पंधरा

---

१ मीरआबस याचा. २ मोंगलाच्या लष्करांत. ३ त्रिंबक हरीकडे. मिर-जेच्या मामलेदारानें (लक्ष्मण कोन्हेरी यानें) कुरुंदवाड हें स्वतंत्र ठाणें त्रिंबक हरी-कडे असतां तें मिरजेखालचेंच आहे असा नसताच खोटा संबंध जुळवून कुरुंदवाडच्या गांवकरांकडे ताकीद पत्रें व रोखे पाठविले होते त्या विषयींच हें गोविंद हरीचें लिहिणें. ४ सदरहू मनुष्य पटवर्धनांचा कारकून होता त्याचें हें पांडुरंग गोविंद (हल्लींचे श्री. रा. तात्यासाहेब सांगलीकर यांचे आजे.) यांस पत्र. ५ शिवापुर. पण कोणचें शिवापुर ? आंवराईचें शिवापुर पुणें साताऱ्याच्या सडकेवर आहे तें तर नव्हे. पत्रांत आलेलें स्थळ मावलांत एखाद्या किल्ल्याच्या आसपास असलें पाहिजे.

हजार नाशेक त्र्यंबकाकडून लुटीत जप्ती करीत या प्रांतीं समीप आली. जुन्नर प्रांत वगैरे तमाम उरकले! आळंदी, मोशी, दिघी, भोसरी, वाघोली, अलीकडे वाकड, भांबवडें देखील उरकलें. चिंचवाडच्या देवांनीं पंधरा हजार रुपये खंडणी देऊन कौल घेतला. आज उदईक पुण्यास स्वारी येणार आहे. पुण्यांतील कारभारी यांणीं पांच सातशें गाडदी व राऊत मिळोन बंदोबस्तीस ठेविले आहेत. स्वारी यवनांचे लोकांची आलिया वर ते ही पाठी देऊन सिंहगडाकडे निघतील. यवनाचें पत्र पुण्यांतील कारभारी यांस व बाईस[3] व देशमुख व देशपांडे यांस आलें होतें कीं, "खंडणी दिल्हीत तर पुर्णे राहील. नाहीं तर लुटून जाळूं." त्याजवर बाईनीं उत्तर पाठविलें जे, "तुमचे वैरी तिकडेच[4] गेले. त्यांजकडे काय असेल तें पाहून घेणें. आम्हांस खंडणी द्यावयास गांठ पडत नाहीं. पुण्याचें काय करणार तें सुखरूप करणें!" या प्रमाणें उत्तरें गेलीं. या उपरी पुणें ठिकाणीं लागतें. तिलमात्र बाकी रहात नाहीं. एक दोन दिवसांवर आलें आहे. आम्हां * महिने झाले. पुढें गत काय न कळे! राजश्री रामाजी नाईक भिडे यांची मातुश्री व त्याची स्त्री सौभाग्यवती लक्ष्मीबाई वहिनी अशीं सारीं ये घरीं सुखरूप आहेत. वासुदेव काका व सदाशिवपंत काळे, रामाजीपंत गोखले, नारायणभट छत्रे वगैरे असे काल परवां येथें[5] आले. गुरें ही येथेंच आलीं आहेत. येथें ही स्वस्थ नाहीं. पुढें कशी गत होईल पहावें! रामाजीपंत रानडे व नरसो राम पुण्यास आहेत. वरकड सर्व बरेंच आहे! विठ्ठलवाडी पासून तोरण्या

१ पुणें प्रांतीं. २ नारो आपाजी तुळसीबागवाले यांस. ३ गोपिकाबाईस. ४ तुम्हीं जिकडून आलां तिकडेच, ह्मणजे मोंगलाईत. * या पत्रांत जेथें कोरी जागा सोडिली आहे तेथें मूळ पत्रांतील अक्षरें फाटून नाहींशीं झालीं आहेत. ५ हें पत्र ज्यांस लिहिलेलें आहे, त्या पांडुरंगरावाचे हे श्वशुर होत. या वाक्यांत लक्ष्मीबाईचें नांव आलें आहे ती पांडुरंगरावाची स्त्री. ६ ही सारी पटवर्धनांची कारकून आश्रित वगैरे मंडळी. यां पैकीं वासुदेव काकाचें नांव पूर्वी आलें आहे. [पहा अंक ५ पृष्ठ १५७. तिसरी टीप.] ७ पुण्याहून निघून येथें आलें.

पावेतों गुंढें दाटलें आहे. बोरघांटाकडे ही तसेंच. पाणी–केळीवर नारळी चढतात ! लोहगड, विसापुर या खालील ही गुढें यवनाचे फौजेनें लुटून नेलें. पृथ्वीप्रलय मांडला आहे !!! यांत जो वांचेल तो आपले प्राक्तना नुरूप वांचो ! आम्हीं तो अडचणींत आहों. परंतु निभावणार आपले चरण आहेत. आपल्या चरणाची तीर्थरूप सौभाग्यवती मातुश्री ताईस माझा साष्टांग नमस्कार अगत्य अगत्य सांगावा. हे विज्ञापना.

नं० २५२

(२ मे.)

श्री.

सेवेशीं गंगाधर आपाजी. साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत वैशाख वद्य पंचमी रविवार पर्यंत स्वामीचे कृपेकरून मुक्काम पुणें येथें सुखरूप असों. विशेष. रामाजी रघुनाथ यास पत्र सप्तमीचें आलें त्याजवर आम्हांस आशीर्वाद लिहिला तो शिरीं वंदून आनंद झाला. पेशजी शिवाजीपंत म्हैसकर येथें आले, त्यांनीं आम्हीं मिळोन सेवेशीं लिहिलीं आहेत तीं पावलीं असतील. त्यावर अलीकडील मजकूर श्रीमंत नारायणराव साहेबांचें लग्न सिंहगडास शुद्ध नवमीचें जाहलें तेव्हां श्रीमंत मातुश्री व सर्व माणसें लग्नास गेलीं तीं गडावरच आहेत. लग्नास राजश्री मामा गडावर आले होते. दशमीचे

---

१ गुढें, गुळें=शत्रूच्या धास्तीनें पळणारी रयत. २ ही गोविंद हरीची बायको सत्यभामाबाई. ३ गंगाधर अपाजी हा पटवर्धनांचा एक कारकून. याचें हें गोविंद हरीस पत्र. ४ शिवाजीपंत म्हैसकरांविषयीं अंक पहिला. पृष्ठ ११ यांतील चवथी टीप पहा. ५ मागें नं० २४८ चें पत्र छापलें आहे त्यावरून असें दिसतें कीं, नारायणरावाच्या लग्ना करीतां चार दिवस पुण्यांतच रहावयाचा गोपिकाबाईचा मनोदय होता. परंतु वरील उल्लेखावरून हें उघड झालें कीं, मोंगल पुण्याजवळ आल्याची बातमी कळल्यावरून गोपाळरावानें सुचना पाठविली होती ती प्रमाणें ती पुण्यास न राहतां सिंहगडावर गेली. तेथेंच नारायणरावाचें लग्न झालें. ६ शिवकराव मामा पेठे.

दिवशीं आम्हीं ही कल्याणास राजश्री नाना पुरंदरे व मामा होते तेथें गेलों होतों. चार दिवस राहोन माघारे आलों. फिरोन कल्याणास उदईक जाऊन लष्करास[1] जाणार होतों, परंतु यजमानांची आज्ञा नाहीं. 'तूर्त येथेंच रहावें' म्हणोन पत्रें येतात, म्हणून राहिलों आहों. परवांचे दिवशीं राजश्री व्यंकाजीपंत सबनीस व धोंडोपंत जोशी बरोबर स्वार पन्नास घेऊन लष्कराहून पुण्यास एरंडवणें यासीं आले. दिवस संध्याकाळचा प्रहरभर होता. त्यास मौजे मजकुरीं चाळीस राऊत ठेऊन सहा असामी बारगीर व चार असामी शिलेदार हत्यारें घेऊन गांवांत येत[3] होते. इतक्यांत नारो आपाजी यांजपाशीं दोनशें स्वार आहेत त्यांची चौकी संगमावर होती. त्यांची यांची गांठ पडल्यावर स्वारांनीं बादपुसी केली, तेव्हां जाबसालांत अंतर पडलें, त्यामुळें घोडीं हिराऊन घेऊन धोंडोपंत, व्यंकाजीपंत यांसीं सिंहगडास घेऊन गेले. बारगीर वगैरे वाड्यांत अटकेंत ठेविले. व्यंकाजीपंत कापड न्यावयासीं आले, परंतु कच्चें काम केलें! अगोदर आम्हांस सूचना न केली. तथापि रात्रौ आले असते तरी कामास येतें. तें न केलें. सिंहगडास नेले तेथें राजश्री जिवाजीपंत अण्णा व मामा व नारो आपाजी यांची गांठी पडली. त्यांणीं लौकिकीं "धोंडोपंत बाबूरायाचे पुराणिक आपल्या घरास आले." "व्यंकाजीपंत जिवाजीपंताचे मेहुणे, भेटावया-

---

१ हें गांव सिंहगडच्या पायथ्यास आहे. २ मोंगलाच्या लष्करास. तेथें गोपाळराव होता त्याची भेट घेण्या करितां. ३ पत्र लिहिणारा पुणें मुक्कामीं होता हें वाचकांच्या ध्यानांत आलेंच असेल. त्याजकडे मोंगलाच्या लष्करांतून पटवर्धनांचे दोघे कारकून कांहीं स्वार बरोबर घेऊन येत होते. त्यांस नारो आपाजीकडील स्वारांनीं हे शत्रूकडील स्वार आहेत असें समजून पकडलें ४ पटवर्धनांचे कारकून धोंडोपंत व व्यंकाजीपंत हे शत्रूच्या लष्करांतून पुण्यास येताना पकडले गेले, तेव्हां ते कैदेंतच पडावयाचे, परंतु मुख्य अधिकारी जिवाजीपंत खासगीवाले व त्रिंबकराव मामा व नारो आपाजी तुळसीबागवाले हे सारे गोपाळरावाचे स्नेहीच असल्यामुळें त्यानीं त्यांस बचाविण्या करितां धोंडोपंतास बाबूराव फडणिसाचा पुराणीक बनविलें व व्यंकाजीपंत खासगीवाल्यांचा मेहुणा ठरविलें, आणि दोघांस ही सोडून दिलें!

सीं आले. " (असें लटकेंच) ओळखोन सोडून दिल्हे. बारगीर व शिलेदार अटकेंत होते ते ही वस्तवानी घोडीं सुद्धां सोडून दिले. वरकड चाळीस स्वार एरंडवण्यांत होते ते यांसी धरलें हें ऐकून पळोन गेले. येणे प्रमाणें जाहलें. गृहस्त पेंचांत आले होते परंतु स्वामीचें पुण्य थोर, आणि नारो आपाजी गृहस्थ माणूस, यास्तव निभाव जाहला. आजी प्रातःकाळीं शिवाजीपंत म्हैसकर व धोंडोपंत जोशी व व्यंकाजीपंत व दहा स्वार निघोन लष्करास गेले. यवनाचें लष्कर राजापूर घोडनदीतीरास काल चतुर्थीचा मुक्काम झाला. आजी सहा कोस पुढें येतील. सातारियाच्या रोखें जाणार. विनायकदास व खंदारकर दहा हजार फौज जुन्नरप्रांतें येऊन शेंडोणीपर्यंत मुलूख मारिला. हल्लीं चाकणेस लागले आहेत. चिंचवड, दावडी, तळेगांव, वाफगांव, येथील तमाम खंडण्या घेतल्या. येथील अम्मलदारांस ही काल पत्रें आलीं आहेत कीं, ' खंडणी ऐंकूण करणें. नाहीं तरी शहर जाळिलें जाईल; ' ह्मणोन पत्रें आलीं. त्याजवरून नारो आपाजी यांणीं पत्रें देऊन कारकून पाठविला आहे. पन्नास हजार पर्यंत खंडणी करावी असा प्रकार आहे. वैशाख मास, अरण्यांत जल नाहीं, आणि लोकांस वनवास प्राप्त झाला ते ही सोसिते, परंतु विनायकदास यांणीं कांहीं बाकी ठेविली नाहीं. ते काय करतील ! त्यांच्या धण्याचा हुकूम त्या प्रमाणें चालतात. परंतु लोहगड, राजमाची या दोहों घेऱ्यांत गुढें बहुत होतें तें लुटून नेलें. आळंदी, वाघोली, आदिकरून गांवें जाळिलीं. ऐसा ईश्वरी क्षोभ झाला आहे. काय होईल पहावें ! खंदारकर यांचें पत्र आम्हांस आलें होतें कीं, " पुण्यावर स्वारी विनायकदास यांची येणार. त्यासीं गोपाळरावजीचीं पत्रें आम्हांस वाड्याच्या[2] रखवाली विशीं आलीं आहेत. तरी शेंपन्नास स्वार आमचे नेऊन रखवाली वाड्याची करणें, " ह्मणोन त्याज

---

१ पुण्यांतील सर्व लोकांबद्दल खंडणी किती देणार त्याचा ठराव करून घ्या.
२ मोंगलाचें लष्कर पुण्यांत शिरलें तर इतर वाड्यां बरोबर पटवर्धनांचा वाडा ही जाळिला जाईल, तो वचाविण्याची ही तजवीज.

वरून जोडी त्यांजपाशीं ठेविली आहे. जर करितां (मोंगलाचे लोक) पुण्यास आले तरी स्वार आणून बंदोबस्त करितों. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं० २९३

(३ मे.)

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वादें उपरी येथील कुशल तागायत वैशाख बद्य षष्ठी भौमवासर. यथास्थित जाणून स्वकीय लिहिणें. विशेष. तुम्हीं पत्रें रवाना करून आजी आठ दिवस झाले. त्या अलीकडे दुसरें पत्र आलें नाहीं. लष्करचा मुक्काम कोणे ठिकाणीं कळेना. श्रीमंतांचें लष्कर बेदरावरी आहे. एक फौज रामचंद्र गणेश मात्र नांदेडाकडे रवाना केले. बाबूजी नाईक शिरढोणास वेढा घालून बसले आहेत. गांवा शेजारीं अंबराईत होते. गांवकरानीं बाहेर निघोन तळ सोडविला. कोसावर जाऊन राहिले आहेत. सोलापुराहून दोन तोफा उतरोन व हजार पांचशें माणूस, ऐसें [3]नेलें. आजी तीन रोज झाले. मीरआबसखान मोंगलअल्लीकडील, उमदी पलीकडेच आजी चार रोज आहे. अंताजीपंतास दहा हजार खंड बांधिला. वोलीस त्यांचे

---

१ जोडी जासुदांची. २ हें पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास. ३ सोलापुराहून दोन तोफा व हजार पांचशें माणूस बाबूजी नाइकानें आपल्या कुसकेस नेलें. तो किल्ला त्याजकडे होता हें वाचकांच्या स्मरणांत असेलच. बाबूजी नाइकाच्या बापाचें नांव सदाशिव नाईक जोशी बारामतीकर. सातव्या अंकांत नं० १४६ चें पत्र छापिलें आहे तें बाबूराव सदाशिव ह्मणजे बाबूजीनाईक यानें लिहिलें आहे. त्यावेळीं ही गोष्ट आमच्या लक्ष्यांत न आल्यामुळें ' हा बाबूराव कोण हें कळत नाहीं ' असें लिहिलें होतें. शिवाय त्या पत्रांत ' राजश्री बाबूराव बारामतीस आहेत ' या वाक्यावर टीप देतांना बाबूराव ह्मणजे ' बाबूजी नाईक ' असें लिहिलें आहे तें ही चुकलें आहे. त्या ठिकाणीं ' बाबूराव फडणीस ' असें पाहिजे. सदरहू दोन्ही चुका बाबूजी नाईक यांचे वंशज रा. रा. गणपतराव कृष्ण उर्फ बाबा साहेब बावडेकर वकील, वास्तव्य पुणें, यानीं आमच्या नजरेस आणिल्या या बद्दल आम्ही त्यांचे फार आभारी आहों.

भाऊ ठेऊन घेऊन त्यांस निरोप दिला. त्याणें कंडे लैटके मोंगलअल्लीस लिहिले कीं, " आम्हीं गांवाजवळी घांसदाणा मागत होतों. नेदीत, (आमचीं) माणसें मारिलीं मग (आम्हीं) हल्ला केली. म्हणोन लिहिलें आहे. आम्हीं त्याजकडे महमद ढालाईत पत्रें देऊन पाठविला होता. काली उत्तर घेऊन आला. पत्रीं मात्र गोड. परंतु केवळ मात्रागमनी आहे ! उपाय जाला तरी करावा. पत्रें लवकर आलीं तर सुटका होईल. कुंदवाडाहून अस्तमानीं चार घटका रात्रीस पत्र आलें तेंच बजिन्नस पाठविलें आहे. लक्ष्मण कोन्हेर यार्णी नाहक कजिया लाविला आहे. त्याणें काय करणें ! महादजीपंतीं लिहिलें तेंच पत्र बजिन्नस पाठविलें आहे त्याजवरून कळेल. चिरंजीव सौभाग्यवती राधाबाई गरोदर. पंधरा दिवस उरले. तेथें[3] रहावया स्थल नाहीं. मग पूर्वस्थलास घेऊन चिरंजीव जानकीबाई आली. उभयता वडील[4] तेथें स्थल नाहीं म्हणून श्रमी. श्रीमंत एखादीकडे जाते म्हणजे बरें होतें गलग्रहिक होऊन बसले आहेत. कोणीकडे फिरतील न कळे. आम्हीं तर निराश्रित बसलों. स्थल मजबूत नाहीं. चिरंजीव बाळ व सौभाग्यवती कुसाबाई व सौभाग्यवती यशोदाबाई व खंडोजी तुम्हीं नेणें, म्हणजे आम्हीं स्वस्थ चित्तें राहूं. (ईश्वर) आमचा रक्षण करणार आहे तो करील यांत संदेह नाहीं. तथापि आम्हांस जावया स्थल नाहीं यास उपाय काय ? श्रीभगवान् लज्जा रक्षक ! तुम्हीं सातारियाकडे जात असिलां तरी लौकर तरी जाऊन मिरजेकडे येणें छावणी विजापुराकडे आम्हीं नेमिली, पण श्रीमंत गंगथडीनें जातील. तिकडील जप्ती उठवितील

---

१ खोट्या बातम्या. २ ही परशुरामभाऊची स्त्री. ३ नळदुर्गास. ४ अक्कलकोटास. ५ ही परशुरामभाऊची आई. ६ उभयतां वडील बंधु कृष्णभट व भिवक हरि. ७ श्रीमंत अमुक बाजूस जातात असें कळलें असतें तर आपल्या बचावा विषयीं कांहीं तजवीज करितां आली असती. ८ गळा धरणारे. छळणारे. ९ पेशवाई पैकीं गंगथडीच्या बाजूचा मुलूख मोंगलानें ताब्यांत घेतला आहे तिकडे श्रीमंत जाऊन मोंगलाचा अंमल उठवितील, सबब आम्हीं म्हणतों त्या प्रमाणें मोंगलाची छावणी विजापुराकडे होणार नाहीं. त्यास गंगथडीप्रांतीं वगैरे नवीन ताब्यांत घेतलेल्या मुलखांतच

बंदोबस्त करीत जातील. आम्हांविशीं चिंता न करणें. नवरी वाईट बरी म्हणावया प्रयोजन नाहीं. ते[1] दिवस मिरज प्रांतें आलां तरी उत्तमच आहे. समीप पडेल. कुंदगोळ[2] बर्‍यानीं घेतलें. तडस घेतलें. राहतां लक्ष्मेश्वर प्रांत राहिला. बंकापुर राहिलें. बसवापट्टण झुजतें. लक्ष्मण[3] हरी यानीं नरसिंगराव उद्धव याजकडे राजकारण केलें कीं, "ठाणीं सरकारचीं पैरकी घेतो. तुम्हीं राखोन जतन करणें" ऐसें केलें आहे. चिरंजीव बापूच्या पत्रीं आपलें स्थल झुजतें ऐसें लिहिलें आहे. कळलें पाहिजे. हे आशीर्वाद.

पै॥ छ० २१ सवाल.

नं० २५४

(वैशाख वद्य अष्टमी
५ मे.)

श्री.

तीर्थरूप मातुश्री बाई वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें माधवरायानें चरणावरी मस्तक ठेऊन शिरसाष्टांग नमस्कार. विनंती उपरी. येथील कुशल तागायत छ० २१ सवाल मुक्काम सगारडी (?) येथें भागानगरानजीक सुखरूप असों विशेष. वडिलीं बहुत दिवस पत्र पाठविलें नाहीं तरी ऐसें नसावें. सदैव आशीर्वादपत्र पाठवावयास आज्ञा केली पाहिजे. इकडील वर्तमान तर या मुक्कामास येऊन चार दिवस झाले. सगारडीस मोर्चे लाऊन एक लाख पांच हजार घेतले. त्यामध्यें

रहावें लागेल.

१ या दिवसांत. लग्नाचे मुहूर्त आहेत त्या दिवसांत. २ कुंदगोळ, तडस, लक्ष्मेश्वर, बंकापुर हीं पटवर्धनांच्या जहागिरींतील ठाणीं धारवाड जिल्ह्यांत आहेत. हरिहर व बसवापट्टण ही त्यांच्याच जहागिरीपैकीं, पण तीं तुंगभद्रेच्या पलीकडे आहेत. बसवापट्टणास हैदरअल्लीनें वेढा घातला होता. ३ लक्ष्मण हरि लागू हे हरिहर व बसवापट्टण येथील मामलेदार. ४ हैदरअल्ली. ५ पत्र पेशव्यानें गोपिकाबाईस भागानगरचे मुक्कामाहून लिहिलेलें आहे.

हल्लीं वसूल पाऊण लाख आला. वरकड आठ चहूं दिवशीं यावा अशा ओली घेतल्या आहेत. पुढें दोन तीन पेठा मातबर आहेत. त्यास उदईक कूच होऊन तिकडे जाऊं. मोंगलाचे बातमीचा कागद अकराबे तारखेचा आला. त्यांत मजकूर कीं नबाबाचें कूच होऊन चार कोस सिनेच्या पाण्यानें आला. तेथून दोन विचार आहेत कीं, सातारियाकडे जावें हा एक प्रकार. दुसरा प्रकार, इकडे यावें. हे दोन मनसबे आहेत. दुसरी बातमी आली ह्मणजे सेवेशीं लिहीन. बसालतजंगाकडील[3] प्रकार येण्याचा बहुत करून दिसतो. पुढें जो मनसबा ठरेल तो सेवेशीं लिहीन. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं० २९९

(अजमासें वैशाख वद्य
मेचा पहिला पंधरवडा.)

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वादें[3] उपरी तुम्हीं पिंपळसुटीच्या मुक्कामचें पत्र पाठविलें आपाजी कांडेकर याज बरोबर, त्याचें उत्तर तुम्हीं लिहिलें त्याच अन्वयें पाठविलें आहे, त्या वरून कळेल. त्या अलीकडे तुम्हीं नांदूरचे मुक्कामचें पत्र बुधवारचें पाठविलें तें परवां शनिवारीं चौथे दिवशीं पावलें, त्यावरून वर्तमान कळलें. दुसरें पत्र शुक्रवारचें राजश्री बाळाजी नरसिंह याजबरोबर पाठविलें तें काली रविवारीं दोन प्रहरां पावलें. अडिचा दिवसां मशारनिल्हे येथें आले. पुण्याचे रखवालीचा मजकूर तुम्हीं त्या गृहस्थास पत्र पाठविलें होतें त्याचें उत्तर समर्पक आलें त्या वरून बाणकरी व इतमामें पुण्यास रखवालीस पाठविलें, उत्तम केलें. ' कोणाचें घर बुडवावयाच्या प्रसंगीं आपण अग्रेसर

---

१ ता० ११ सवालचा [वैशाख वद्य अष्टमीचा.] २ मोंगलाचा भाऊ वे अदवानाचा नबाब बसालतजंग हा आम्हांकडेच मिळेलसें वाटतें. ३ पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास. ४ हा कोण गृहस्थ ? पुणें शहराचा अधिकारी नारो आपाजी ?

नाहीं ' म्हणोन लिहिलें, बहुत उत्तम गोष्ट. क्षुल्लक कर्म क्षुल्लकाचें ! आपलें नव्हे. श्रीमंतांकडील भाव वकिलास त्याणीं बोलल्याचा कळला. परंतु क्षणभंगुर बुद्धि! त्याचा विश्वास बोलिल्याचा काय? बिदेही पुरुष! त्यांतून चित्तास कांहीं शरीरीं स्वस्थ नसेल यामुळें बसोन बोलिले [?] परंतु तो बोलतो तें होतें. यांचें स्वाधीन काय ? एवंच हरतऱ्हेनें त्याणें चित्तपावन संस्थान बुडवावें हा संकल्प तो सिद्धीस नेला ! श्रीमंत वडीलें विदेही. अर्भक अज्ञान. मातुल मूर्ख. मातुश्री त्यांचे स्वाधीन. त्यामुळें सर्वांनीं मिळोन (राज्य) क्षयास नेलें ! अपसव्य व वैद्य प्रेरक पुण्यांत हितशत्रुत्वें बोध करीत होते तें (त्यांस) प्रमाण तेव्हां वाटलें, आतां रत्नाकर आळबीत बसलीं ! काडलबाडी [?] कडे श्रीमंत गेले. आतां वराडांत त्यां समागमें कोणी फौज जात नाहीं. गंगथडीनें येतील. शिवदेव शंकर गंगातीरचे रहाणवाले. ते तिकडे जातील. वडील ही त्रिंबकेश्वरास जातील. चौंकडे चार होतील. लष्कर फुटेल. तह केला तरी अद्याप तरी कार्यावरी पडेल. परंतु त्याच्या मतें पुणें भस्म जाहलियावरी तह करावा, तें न झालें तेव्हां कार्यभागी जे ठेविले त्यांजवरी इतराजी होईल. पुणें जळों कां दिलें

---

१ मोंगलाच्या वकिलास श्रीमंत दादासाहेब बोलले त्याचा. पुढील मजकुरावरून ' आपण पटवर्धनांस छळिलें हें वरें केलें नाहीं ' अशा अर्थाचा कांहीं उद्गार दादासाहेबानीं मोंगलाच्या वकिलाजवळ काढिला असावा असें दिसतें. २ दादासाहेबांची बुद्धि क्षणभंगुर. ३ सखारामबापू. ४ अर्थात् पेशवाई. ५ दादासाहेबांस एका तऱ्हेनें मूर्ख म्हणण्याचाच गोविंद हरीचा झोंक आहे ! ६ अर्भक माधवराव पेशवे ! ' अर्भका ' च्या शहाणपणानें गोविंद हरी सारख्या वृद्ध मनुष्यास ही चकित होण्याचा पुढल्याच वर्षी प्रसंग आला ! ७ रास्ते. ८ पेशव्यांची मातुश्री गोपिकाबाई रास्त्यांच्या (आपल्या भावांच्या) सांगण्या प्रमाणें वागत्ये. ९ आबा पुरंदरे. १० बाबा वैद्य. ११ गोपिकाबाईस. १२ रडत बसली ! १३ पेशवे वऱ्हाडांत जातील तर तिकडे त्यां बरोबर त्यांची फौज येणार नाहीं, या करितां ते गोदावरीच्या तीरातीरानें नाशिकाकडे येतील. १४ विठ्ठल शिवदेव व नारो शंकर. १५ दादासाहेबांच्या ताब्यांत त्रिंबकचा किल्ला होता व या वेळीं आनंदीबाई ही तेथेंच होती; या करितां ते तिकडे जातील, असा लिहिण्याचा अभिप्राय आहे. १६ सखारामबापूच्या मतें. १७ नारो आपाजी तुळसीबागवाले यांस पुण्याचा बंदोबस्त राखण्यासाठीं श्रीमंतानीं नेमिलें होतें त्यांजवर

नाहीं ' म्हणतील ! ' रुपये द्यावया गरज काय ? ' म्हणून रागें भरतील! असो. राजे बहादर श्री मोरेश्वर जेजुरीस आले. त्यांकडे तुम्हीं आलेत. पुण्याची बोली विल्हेस कशी लागेल ? द्रव्यें कसें येईल ? नबाबाचें कूच होतें म्हणजे बरें. फार दिवस एक तळावरी लागले म्हणजे कांहींच खेडियांची बाकी राहणार नाहीं: असा प्रकार होईल. तुम्हीं वकिलाजवळ भाषण केलें तें यथास्थित केलें. त्याचा भरंवसा न धरावा. वेंडील हंसतील. तो कृतघ्न हंसेल. पूर्ववत् कार्यभागी होऊन सूज मार्गे चालतील. तेव्हां प्रमाण ! आतां सारें त्याणीं आपलेंच केलें आहे. जुनें मोडून नवेंच केलें, तेथें स्थित काय ! मेंदांची[१] नगरी झाली आहे !!! ताळ नाहीं. श्रीची इच्छा धर्मराज्य वृद्धीस जावें अशी असेल तरी पूर्ववत् पाया बसोन चालेल. नाहीं तर कपाळ कळलेंच आहे ! लक्ष्मेश्वर, वंकापुराकडे पत्रें तुम्हांकडील पत्र येतांच रवाना केलीं. तिकडील आस्था [आम्हीं करीत] नाहीं. तुम्हीं जिवानिशीं सुखें असावें [म्हणजे झालें.] प्रत्यक्ष त्यांणें सांगोन लिहून

सखारामबापूची इतराजी होईल. इतराजी होण्याचें विलक्षण कारण पुढील वाक्यांतच आहे! १ ' पुण्याचें रक्षण करण्या साठीं मोंगलास खंडणी कां दिलीत ? पुणें जळालें असतें तरी बेहत्तर, पण खंडणी द्यावयाची नव्हती, ' असें सखारामबापू म्हणेल. २ मोंगलाचा दिवाण विठ्ठल सुंदर. ३ तुम्हीं पुण्याहून जेजुरीस राजे बहादरांकडे आलां. ४ ' जी रक्कम मोंगलानें पुण्याचा बचाव करावा म्हणून त्यास द्यावयाचें नारो आपाजी वगैरेनीं तुमच्या मध्यस्थीनें ठरविलें आहे, ती तुम्हीं पुण्यास नसलेत तर मोंगलास कशी मिळेल ? ' असा अभिप्राय. ५ ' नबाब पुण्याहून तळ हालविता तरी बरें होतें. ' ६ सखारामबापूचा. या वरून गोपाळरावाची कांहीं तरी समजूत काढून त्यास मोंगलाच्या कटांतून फोडण्याच्या हेतूनें पेशव्यांच्या दरबारी लोकानीं त्यांचा वकील मोंगलाच्या लष्करांत होता त्याच्या द्वारें कांहीं यत्न केला होता असें दिसतें. हा यत्न गोपाळरावास फसवून तोंडघशीं पाडण्या करितां दरबारी मंडळीनें केला होता असें गोविंद हरीस वाटणें साहजिकच आहे. ७ दादासाहेब. ८ सखारामबापू. ९ ' हल्लीं सखारामबापूनें कारभारांत फार लबाडी मांडिली आहे. नानासाहेब पेशव्यांच्या कारकिर्दीत जसा तो मना पासून कारभार पहात होता तसा पुनः केव्हां पाहूं लागेल तो लागो ! ' असा अभिप्राय. १० सरळ. ११ ' मेंदांचीं नगरी झाली आहे ' याला समानार्थक अलीकडील वाक्य ' लुच्चांचा बाजार भरला आहे ! ' १२ ' सावनूरच्या न-

पाठविलें कीं, ' स्थलें घेणें. ' तेव्हां धण्याच्या हितावर किंवा अहितावर हें कळतच आहे ! ' स्वांर चिरंजीव दाजीबरोबर पाठवितों ' म्हणोन लिहिलें, त्यास रोजमरा द्यावया पैसा नाहीं. चिरंजीव माधवरायाच्या मतें आणवावेसें होतें, परंतु आमच्या विचारास येत नाहीं. चाळीस पन्नास स्वांर दाजीच्या मायेचें त्या बरोबर पाठवणें. बरकडांसीं कारण नाहीं. यंदा स्वारांचें सत्व गेलें आहे. पुढें चढेल तेव्हां कामाचे. येव्हां कवडीचें मोल ! महादाजी[1] पंतीं लिहिलें म्हणोन तुळाजी सिंदे व शंकरराव [यांस] पाठवीत होतों; (पण) ते रत्नाकर[2] करूं लागले, तेथें गेल्यावर न पुसत आपल्या गांबास जातील, कानडीं माणसें, अधिकच घाबरीं होतील, यास्तव फिरोन ' जा ' म्हणोन चर्चा केली नाहीं. काली मागती पत्र कुरुंदवाडास अवसानाचें पत्र लिहून मुजरद जासूद जोडी रवाना केली. सासवड, हिंवरें यांजवरी फौज गेली तरी आपण अग्रेसर होऊं नये. नबाब पारेछिन्न माघारे फिरणार किंवा विजापुराकडे जाणार हें कळत नाहीं. विजापुराकडे आले तरी (आमच्या) कामाचे. औरंगाबादेकडे गेले तर कामाची गोष्ट नाहीं. निमित्य जे, आम्हांस स्थल मजबूत रहावया नाहीं; या निमित्य काळजी.

बाबास किंवा हैदरअल्लीस सखारामबापूनें सांमून पाठविलें आहे कीं, तिकडे पटवर्धनांची जहागीर आहे ती तुह्मीं ताब्यांत घ्या. परंतु असें करण्यांत पेशव्यांच्या राज्यापैकीं हा भाग शत्रूच्या हातीं जातो याचा त्यानें विचार केला नाहीं, असा गोविंद हरीच्या लिहिण्याचा अभिप्राय आहे. वास्तविक सखारामबापूनें असें केलेंच असेल असें म्हणण्यास आधार गोविंद हरीच्या लिहिण्या शिवाय दुसरा नाहीं. (या संबंधानें आणखी उल्लेख अंक आठवा पृष्ठ २७८ येथें चवथ्या टिपेंत व अंक नववा पृष्ठ ३४२ येथें पहा.)

१ हा गोविंद हरीचा पुतण्या. विशेष माहिती अंक सहावा पृष्ठ २०७ यांतील तिसऱ्या टिपेंत आहे. २ जमखिंडीजवळ गोपाळरावावर आबा पुरंदऱ्यानें छापा घातला तेव्हां पटवर्धनांचे स्वांर जसे लढावे तसे लढले नाहींत; या गोष्टीस अनुलक्षून हें गोविंद हरीचें लिहिणें असावेंसें वाटतें. ३ कुरुंदवाडाहून महादाजी बल्लाळ यानें कुमकेस कांहीं स्वांर पाठविण्याविषयीं लिहिलें होतें. ४ र र रत्नाकर करूं लागले=रडकथा सांगूं लागले. ५ गोपाळरावाचे द्वेषी आबा पुरंदरे व सखारामबापू यांचीं गांवें अनुक्रमें सासवड व हिंवरें.

सातारियाकडून कृष्णातीरें आले तरी स्थलें सुटेल. मग (तें मोंगलानें,) तुम्हांस दिलें तरी कार्यावरी पडेल. सारीं कुटुंबें एकत्र होतील. येथील पूर्वेकडील[1] खंदक तयार झाला. माती आंत भरावयाची तजवीज करीत होतों, परंतु त्वरा झाली. वैडुांचें[2] सामान भारी. चौं दिवसांत तयार झाला. उत्तरेकडील काम चालतें. तिकडे खिडकीच नाहीं. पश्चिमेकडे खिडकी असली तर माती आंत घेऊं. दक्षिणेकडील काम चालीस लागलें म्हणजे तिकडील घेऊं. आजिवर दोन महिने समग्र येथें गुदरान चालली. पुढें मध्यान्ह कालाचें संकट! ज्येष्ठ महिना समग्र दहा बारा हजार रुपये पाहिजेत याचें संकट पडलें आहे. हे आशीर्वाद.

नं० २५६

[अजमासें वैशाख वद्य मेचा पहिला पंधरवडा.]

श्री.

राजश्री गोपाळराव स्वामीस विनंती.

आपण पत्र पाठविलें तें पावलें. गडबड भारी. उपाय नाहीं. हें[3] उरकल्यावर जावें यावें असें फौजा गेल्या खेरीज कसें होईल? सांप्रत आजी गर्डाखालीं[4] फौज चार हजार आली. आणखी मागाहून येतात. डोणज्या पलीकडे नदीवर राहिली आहे. या उपरी काय होईल पहावें! आतां लिहावें हा विचार बुद्धींत राहिला नाहीं. बहुत काय लिहिणें. कृपा असों दीजे. हे विनंती.

---

१ मिरज. २ अर्थात् मंगळवेढें येथील. ३ खंदक खणणाऱ्या बद्दर लोकांचें. ४ नं० २५६ ची चिठी नारो आपाजी तुळसीबागवाले यांची. ५ मोंगलाशीं खंडणी देण्याविषयीं जाबसाल ठरल्यावर तुमच्या भेटीस जावयास यावयास ठीक पडेल. ६ सिंहगडाखालीं.

नं० २५७

(अजमासें वैशाख वद्य
मेचा पहिला पंधरवडा.)

श्री.

आशीर्वाद[1] उपरी. तुम्हीं पत्र पाठविलें तें पावलें. सविस्तर कळलें. कमजादा होईल त्या प्रमाणें करार करून घेऊन लेहून पाठवितों म्हणून लिहिलें, त्यास तुम्हांस पत्र पाठवावें त्यांत आंत बाहेर राखून लिहावें हा भाव नाहीं. निदान समजून लिहिलें आहे. तुम्हांस कळेल तसें बोलून, खर्च दरबारांत पडेल तरी त्यांतच, असें करून लिहून पाठवणें. ये विशीं राजश्री दिनकरपंत व राजश्री नारोबा यांणीं पत्र लिहिलें आहे त्याजवरून कळेल. तुम्हांस ये विशीं फार लिहावेंसें नाहीं. जेणें करून गांव वांचे, तुम्हांस यश ये, तें करणें. बहुत काय लिहिणें. हे आशीर्वाद.

नं० २५८

(अजमासें वैशाख वद्य
मेचा पहिला पंधरवडा.)

श्री.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री गोपाळराऊ स्वामीचे सेवेशीं पौष्य दिनकर महादेव व नारो आपाजी. साष्टांग नमस्कार. विनंती उपरी कुशल जाणून स्वकीय कुशल लेखन करीत असलें पाहिजे. विशेष आपण पत्र पाठविलें तें पावलें. लिहिला अर्थ कळला. उत्तम आहे.

---

१ ही नं० २५७ ची चिठी गोविंद शिवराम खासगीवाले यांणीं गोपाळरावास लिहिलेली आहे. ' आशीर्वाद ' लिहिण्याचें कारण गोपाळरावाचा चुलतबंधु परशुरामभाऊ याचें खासगीवाल्यांकडे आजोळ. २ दिनकर महादेव हे फडणिशीकडील कारकून. हे पुण्यांतील तपकीर गल्लींतील जोशांच्या घराण्या पैकीं होतेसें वाटतें. दुसरे गृहस्थ नारोबा म्हणजे नारो आपाजी तुळशीबागवाले.

आपण राजे बहादर जेजुरीस गेले तिकडे जाणार, आणि बोलून निश्चयांत गोष्टी आणून पत्राचें उत्तर पाठवितों म्हणून लिहिलें, (व) बाणदार इतमामी व्यंकाजीपंता बरोबर पाठविले म्हणून लिहिलें, त्यास ते पुण्यांत आले असतील. राजश्री नरसिंगरायास पत्र पाठविलें तें त्यांजकडे रवाना करितों. शहराचा बंदोबस्त आपण करविला त्या प्रमाणें होईल. सारांश पैका द्यावयाचा निश्चय एक वेळ करून आम्हीं पाठविला आहे. त्याजवर चढें बसल्यास निभावणी होणार नाहीं. याज करितां हें पत्र आपणास लिहिलें आहे. तरी सर्व प्रकारें भीड खर्चून पूर्वी लिहिलें आहे, त्या प्रमाणें करून घेऊन उत्तर पाठवावें. येथें चौघे[3] गृहस्थ भोंवताले पळणीस गेले, त्यांस पत्रें घरें जगवावीं या अन्वयें लिहिलीं त्यांचीं उत्तरें आलीं तींच तुम्हांस पहावयास पाठविलीं आहेत त्याज वरून कळेल. आपल्यास लिहावें त्यांत कांहीं ठेऊन लिहावें ऐसें नाहीं. आमच्या वचना वरून करार करून घेतील त्याचा निभाव झाला पाहिजे. यास्तव अधिक म्हटल्यास निभावणी होणार नाहीं. श्रीमंतांची आज्ञा नसतां आम्हीं आपले जिवावर धाडस करून लिहिलें आहे. दरबार खर्च देखील त्यांत आटोपावा. बहुत काय लिहिणें. कृपा लोभ करावा. हे विनंती.

---

१ नरसिंगराव धायगुडे. हे मोंगलानें तीन चार हजार फौजेनिशीं पुण्यास ठेविले होते. २ अधिक खंडणी मागितल्यास. ३ चौघे म्हणजे चारच नव्हत. 'पुष्कळ गृहस्थ आपलीं घरें सोडून पुण्यांतून पळून गेले आहेत त्यांस' असा अभिप्राय. ४ हा दरबार खर्च मोंगलाच्या दरबारांतील मुत्सद्दी व दरकदार वगैरे लोकांस लांच किंवा बक्षीस होय! कोणांचें कांहीं काम व्हावयाचें असलें म्हणजे दरबारी लोकानीं हा दरबार खर्च घ्यावयाचा सर्वत्र शिरस्ता होता व हें काम अगदीं राजरोसपणानें चालत असें. खुद्द राज्याचे मालकाचा सुद्धां यांत हिस्सा असे!

नं० २९९

(अजमासें वैशाख वद्य
मेचा प०पंधरवडा.)

श्री.

राजश्री गोपाळराव स्वामीचे सेवेशीं.

विनंती उपरी. पुण्याअलीकडील सिंहगडा नजीक दहा पांच गांवचीं घरें वांचलीं होतीं तीं काली अगदीं जळलीं. आज पुण्यांत ही उपद्रव झाला आहे. तोफखान्यांत माणसें जाऊन अगदीं खणून सांपडेल तें घेऊन गेले. फरासखान्याचा ही शोध असाच होणार. वरकड गांवांतील मातबरांचीं घरें खणावीं असें बोलतात. आम्हीं आपणास लिहिणें तें कालच लिहून पाठविलें आहे. आजच्या उद्यांच्या दिवसांत यांचें कूच होऊन जाईल तर उत्तम आहे. नाहीं तर चांगला परिणाम नाहीं. वृथा श्रम होतील. रुपये कबूल करून शेवटीं अब्रू गांवची राहिली नाहीं ! पर्वतीच्या[1], मूर्ति महादेव, विष्णु, सर्व मूर्ती फोडल्या ! तोफखान्यांत जाऊन तोफा उकरतात. गोळे थोडेसे होते ते काढिले. खाशा[2] वाड्यावर लहान सान गुंड गोळे आहेत तेथें उपद्रव करणार. व गांव ही लुटीत आहेच. इतकें असोन ही जेव्हां उठोन जात नाहींत तेव्हां काय विचार करावा ? आपण त्यांस सकाळच्या पत्रावरून उठोन जाण्याविशीं लिहिलें नसेल तरी त्याहावें. आपण करार केला तो मान्य म्हणऊन कालच लिहिलें आहे. बहुत काय लिहिणें. हे विनंती.

मौ॥ छ० २९ सवाल.

---

१ चिठी नारो आपाजीची. २ मोंगलाचें. ३ शनवारच्या वाड्यावर.

नं० २६०

[अजमासें वैशाख-वद्य
मेचा पहिला पंधरवडा.]

श्री.

राजश्री गोपाळराव स्वामीस—

विनंती उपरी. कैरांडे याची फौज येऊन सिंहगडाची माची, सरकारचा जामदारखाना देखील अगदीं कारखाने लुटून नेले. पहिलें तुम्हीं पत्र पाठविलें म्हणून भरंवशानें ठेविले होते. तें पत्र तुम्हीं त्यासै दिलें (आणि) या प्रमाणें विश्वासघात झाला ! तुम्हांस शब्द लावावा तरी तुम्हीं सर्व प्रकारें तेथून साहित्य करितां. डोणज्या पलीकडे फौज उतरून दोन खेपा लूट नेली. माणूस बेजाब मारलें. चार हजारांचा रट एकदांच आला ! आम्हीं सावध नव्हतों. भरंवशावर राहिलों होतों. परिणाम या प्रकारचा झाला ! या उपरी काय विचार, लिहावयाचा असेल तो लिहावा. पुण्यांत लूट होतच आहे. एवंच चहूंकडून या प्रमाणें झालें. हे विनंती.

नं० २६१

(अजमासें वैशाख वद्य
मेचा पहिला पंधरवडा.)

श्री.

पुरवणी. राजश्री गोपळाराव स्वामीचे सेवेशीं—

विनंती उपरी. दादा ! पुण्यांतील देव एक लहान मोठा राहिला नाहीं. महादेवाच्या पिंडी व मूर्ति, गणपती, हणमंत, सर्व फोडिले. पर्वतीस हेंच केलें. सरकारचा वाडा, धर्मशाळा—चाळीस हजार ब्राह्मण निवाऱ्यास

१ चिव्या नारो आपाजीच्या. २ रघोजी करांडे हा जानोजी भोंसल्याचा सरदार. ३ मोंगलास. ४ मदत. ५ मनस्वी. ६ लोट. चार हजार फौज एकदम येऊन घुसली.

बसावयाच्या–जळाल्या. तह झाला ह्मणून सिंहगडचे सरकारचे कारखाने, गरीबगुरीब, व घेऱ्याचे गांव सात आठ [स्वस्थ] होते ते गांव आजी रविवारीं दोन प्रहरां येऊन आगी दिल्या. तोफखान्याचे पानशांच्या घरा जवळी आग लाविली ते नागझरीस येऊन पोहोंचली. सयाजी नरसिंगराऊ देशमुख व कोन्हेरपंत हीं घरें जाळिलीं. सोमवार मंगळवारांत पांच सात हवेल्या जाळल्या. वरकड सर्व आमचें माणूस गांवांत जाऊं दिलें नाहीं. भोंवत्या फौजा उतरून लुटून फस्त केलें. तोफखाना अगदीं लुटला. लहान गोळे वगैरे सर्व नेलें. असो. तोफांचा मजकूर तुम्हीं पाहिला लिहिलाच होता. फरासखाना श्रीमंतांचा अगदीं लाख रुपयांचा, तह झाला ह्मणून (आम्हीं) तसाच ठेविला तो तह जाहलियावर लुटिला ! या प्रमाणें गांवची लूट झाली. जाळणें पोळणें तों सीमाच नाहीं. सिंहगडाच्या घेऱ्यांत गडाच्या पायथ्यास उपद्रव न व्हावा ह्मणून उपाय करून भोंसल्याचे कागद तुम्हीं पाठविले, लिहिलें, ह्मणून भरंवसा आला; त्यास आजी डोणजें जाळिलें. वरकड ही कांहीं राहिलें नाहीं. या उपरी सर्व विचार तुटला. त्याहावयाचें राहिलें. कळेल तें करावें. बोलण्याचा विचार एक, करण्याचा विचार एक, या प्रमाणें दिसतें. आपण त्यांचा भरंवसा मानून लिहिलें ह्मणून असे ढिलाईनें राहिलों. सर्व नाश झाला. असो ! तुमचा ही उपाय काय ! जेथवर होईल तेथवर करितां. ईश्वरी सत्ताच ऐशी आहे! हे विनंती.

पै॥ छ० २ जिल्काद.

नं० २६२

(६ मे.)

गोविंद हरीस रामाजी रघुनाथ व गंगाधर आपाजी यांचें पत्र वैशाख वद्य नवमीचें पुण्याहून––

१ मोंगल व भोंसले यांचा.

" खासा मोंगल यानें चाकणेस तोफा लाविल्या आणि तळेगांवची खंडणी चौं पासून सहा हजार घेतले. तळेगांवची खंडणी व चिंचवडची खंडणी व खेड्यांपाड्यांची खंडणी घेऊन शिंदेपंत[1] याचा वाडा खणून टाकिला. वाड्यांत वीस पंचवीस हजार रुपये सांपडले. तेथून लोहगडाकडे व आंबेगांव शेडाणीपर्यंत मावळ लुटून लोहगडचे माचीस पुण्याचे लोक वित्त विषय घेऊन कुटुंब सहीत राहिले होते त्यांस देखील लुटोन फस्त केलें. नाना फडणवीस वगैरे एक वस्त्रानिशीं गडावर गेले. या प्रमाणें स्थिती झाली. संगम पुणें नजीक दीड हजार फौजेनिशीं नरसिंगराव धायगुडे राहिले आहेत. मोंगल पुण्यास येऊन कांहीं खंडणी मागतो. त्यास नारो आपाजी यांणीं लाख रुपये पावेतों द्यावे आणि शहर वांचवावें या प्रमाणें बोलणें लाविलें आहे. विठ्ठल सुंदर हजार फौजेनिशीं तोफा वगैरे सामान सासवडच्या रोखें येऊन वाड्या समोर राहिले आहेत. आज आमची फौज ही त्याकडे जाणार. पुरंदरापासून शिरवळा पर्यंत गमाजीनीं दहा हजार फौजेनिशीं मारून लुटून सप्तऋषीस[2] गेले. तिकडे खासा मोंगल ही जाणार. मिरज घेऊन द्यावी असा ही करार आहे. पृथ्वी प्रलय झाला. गोरगरीबें फार बुडालीं ! "

नं० २६३

(अजमासें अधिक ज्येष्ठ शुद्ध
मेचा दुसरा पंधरवडा.)

गोपाळरावाचें गोविंद हरीस पत्र—

" मोंगलानें सालमजकुरीं या प्रांतीं कांहीं बाकी ठेविली नाहीं. दुसरी गोष्ट आज तीन पिढ्यांत मोंगलाच्यानें जाहलें नाहीं तें यानें केलें. पुणें व सासवड व पुरंदर येथील खंडणी घेतली. लौकिकांत त्या सारखें दहन न करितां स्थलें रक्षण करून कीर्ति संपादन केली असती (तर बरें होतें.)

---

१ शिंदेपंत कोण ? २ सातार्‍यास.

लोहगड राजमाचीस वीस लक्षांचा नाश केला. नाना फडणवीस कुशाबा[1] हे ही थोड्या बहुतास नागविले. आम्हीं तमाम सर्वांस निबदेहरे पासून सूचना करविली म्हणोन कोणी सांपडले नाहींत. व दगा ही त्यांच्या भांडवलास झाला नाहीं. एरवीं कांहीं बाकी रहात नव्हती. गकार[2]नामक सैन्यांत होता तोंच वांईस रास्ते आदीकरून सर्वांस पत्रें सूचनांचीं पाठविलीं. आपल्या तर्फेनें कांहीं कमी केलें नाहीं. या प्रसंगीं अग्रेसर असतों तर बहुतांचा नाश होऊन राज्य लयासच जातें. आमचें कर्ज ही फिटतें. परंतु पदरीं लहान माणसाई येत्ये. पुढें मागें सर्वांचा द्वेष पडतो. हे प्रकार न करितां " परराज्यांत गेले असतां ही हे[3] कांहीं यजमानाशीं व राज्याशीं विरोध करून नाहींत. आतां तरी समजाऊन आणावे तरच कल्याण. नाहीं तर बरा विचार नाहीं. " असें ही जन बोलत आहेत. राजे बहादरांस ही स्पष्ट सांगितलें कीं, आमचा पेंच एक सकार[4]नामकाशीं. बाकी कोणाशीं नाहीं, व आतां ही करीत नाहीं. असेंच दोन चार वेळां सांगितलें. आम्हीं नाश न करण्या विषयीं बहुत बोध केला परंतु त्यानें ऐकिलें नाहीं. "

नं० २६४

गोपाळराव यांचें गोविंद हरीस पत्र—

" राजश्री विनायकदास चाकणेकडे आहेत तिकडील वसुलाचें उरकलें म्हणजे ते ही येऊन पोंचतात. मग मनसब्याचा निश्चय ठरोन सप्तऋषीकडे जाऊंसें वाटतें. सप्तऋषीकडे गेले म्हणजे मिरजेकडे खामखॉ[5] घेऊन

---

१ कुशाबा लिमये खासगीवाले. २ इतकें असून मोंगलानें पुणें जाळिलें त्याचें अपेश गोपाळरावाच्या माथीं त्याच्या देशबांधवानीं त्यास ' गोपाळराव आगलावे ' ही संज्ञा देऊन ठेविलें आहे ! ३ गमाजी बावा वांईकडे स्वारी करण्या करितां मोंगलाचे लष्करांतून निघाला नव्हतां तोंच. ४ अर्थात् मी गोपाळराव. ५ आमचें वांकडें एकट्या सखारामबापूशीं. ६ साताऱ्याकडे. ७ निस्संशय.

जाऊं. सप्तऋषीकडे जाणेंच न घडलें तरी उपाय नाहीं. श्रीमंत बेदराकडेच आहेत. माघारे फिरले, येतात, म्हणोन वर्तमान आलें होतें, परंतु फिरोन[1] यावयाची सुरत दिसत नाहीं. व तह रहचा ही संदर्भाचा प्रकार काडीमात्र नाहीं. आवशीकडे[2] राजे बहादरांचे गांव होते ते जाळविले म्हणोन हठें यांणीं ही सासवडापाशीं आसपास गांव होते ते जाळिले. श्री मोरेश्वरची व जेजुरीची रखवाली उत्तम प्रकारें जाहली. भोंवतालचे गांवचे लोक फार करून (त्या) दोन गांवच्या आसऱ्यास येऊन राहिले आहेत. त्यांचा ही आज पावेतों बचाव झाला. कुंरकुंब्याची[3] रखवाली करविली आहे. सिद्धटेंकें[4] दूर राहिलें. तेथें उपसर्ग लागत नाहीं. आम्हीं व राजे बहादर येथें आलों. येउरीं बेंदड्यानीं कांहीं उपद्रव केला म्हणोन वर्तमान आलें. मागती नबाबानीं रखवाली करविली आहे. ''

नं० २६९

[अजमासें वैशाख वद्य
मेचा प०पंधरवडा.]

गोपाळरावांचें गोविंद हरीस पत्र—

सासवडकरांचा अडीच लक्षांवर गुंता उरकला. परंतु ऐवज हातास न ये, या मुळें या मुक्कामीं आठ दिवस लागले. किल्लेकरी यांचें नांव खंडणींत होतें त्यांणीं अडथळा घातला कीं आपण रुपये देऊं देत नाहीं. मोंगल माचीपर्यंत येऊन गुंळें लुटितात असें कळल्यावर काल अठ्ठावन हजार

---

१ परत फिरून. २ आवसें शहर मोंगलाईत वेदर प्रांतीं आहे. तेथें विठ्ठल सुंदराच्या जहागिरीचे गांव होते ते सखारामबापूनें मुद्दाम पेशव्यांच्या फौजेकडून जाळविले म्हणून विठ्ठल सुंदरानें ही त्या द्वेषानें सखारामबापूच्या जहागिरीचे गांव सासवडापाशीं होते ते जाळिले. ३ कुरकुंबा हें देवीचें स्थान पुणें जिल्ह्यांत धोंडच्या स्टेशना नजीक आहे. ४ सिद्धटेंक हें गणपतीचें स्थान नगरजिल्ह्यांत पेडगांवच्या दक्षिणेस तीन मैलांवर भीमातीरीं आहे. ५ पुण्याचे वगैरे लोक मोंगलाच्या भयानें पुरंदरच्या पायथ्यास येऊन राहिले होते ते.

रुपये रोख आणून दिले. आज संध्याकाळपर्यंत लाखाचा भरणा करितात. दीड लक्ष नक्त व पन्नास हजारांचें जवाहीर या प्रमाणें. दीड लक्ष बाकी (राहिली तिची) सावकारी निशा केली. परंतु ते ही चार दिवसांत पोंचवावे या निमित्य मुरादखानास सासवडानजीक जमावासहवर्तमान ठेऊन घेतले. राजे बहादर यांणीं स्वार पाठवून हिंवरें[1] येथील वाडे व घरें जाळवून अग्नि संतुष्ट केला ! आम्हीं कोणा ही कर्मास अग्रेसर नाहीं. "

नं० २६६

[६ मे]

गोपाळरावांचें गोविंद हरीस पत्र—वैशाख वद्य नवमी.

भृगुवार-मुक्काम नांदूरचें—

" पुण्याच्या रखवालीच्या यत्नाविषयीं चुकत नाहीं. येथें यांजवळें बहुता प्रकारें सांगितलें आहे. राजश्री नारो आपाजीस पत्र पाठविलें होतें, त्यांचें व जिवाजीपंत अण्णांचें उत्तर आलें जे, ' श्रीमंतांची तो आज्ञा पैसा द्यावयाविशीं नाहीं. ' परंतु शहर मातबर, रक्षण करावें हें सर्वांचें मानस आहे. ' एकोंवरी होईल तर करावें. ' म्हणून लिहिलें आहे. त्या वरून व्यंकाजीपंता बरोबर बाणदार व इतमामी यांस देऊन पुण्यास रखवालीस पाठविले आहेत. आम्हीं राजे बहादर यांजकडे जाऊन पोंचलों म्हणजे बोलीचालीचा करार मदार ठरेल. आमच्या चित्तांत पैका न घेतां रक्षण करावें असें मानस होतें. परंतु शहरापासून श्रीमंतांनीं रुपये घेतले व नाश कला व बेदर जाळिलें यास्तव कांहीं तरी खंडणी द्यावी हें मानस यांचें व

---

१ हिंवरें हा सखारामबापूचा मूळ गांव. तो खासगीद्वेषामुळें विठ्ठल सुंदरानें जाळविला. २ मोंगलाजवळ. ३ खासगीवाले. ४ एक लक्ष रुपये खंडणी घेऊन पुर्णे वांचविण्याचें मोंगल कबूल करील तर. ५ ' शहर ' म्हणजे औरंगाबाद हें पूर्वी अनेक वेळां लिहिलें आहेच व या मोहिमेंत औरंगाबादेपासून पेशव्यानीं खंडणी घेतली होती हें ही खरें. तथापि प्रस्तुत स्थळीं ' शहर ' शब्दाचा अर्थ ' भागानगर ' [हैदराबाद असा घेतला पाहिजे.

प्राप्त नाहीं. शिबंदी खालींच पुरे झालें. परंतु[1] ज्याचीं स्थलें त्याच्या हातास गेलीं हें ही बरें झालें. लक्ष्मेश्वर प्रांत विल्हे लागला असेल. भूकणजी, हरिपंत यांची अवस्था काय जाहली न कळे. राजे विनायकदास व फौजा कोठपर्यंत गेल्या होत्या? चिरंजीव सौभाग्यवती मुलींची अवस्था काय, कोण्या ठिकाणास गेल्या असतील, न कळे. चिंता लागली आहे. प्रस्तुत [मोंगलांचा] मुक्काम कोणे ठिकाणीं आहे? जावयाची कोणीकडे उमेद? पर्जन्यकालास अवकाश उरला नाहीं. श्रीमंत अद्याप बेदर भालकी या प्रांतीं आहेत. फिरते समयीं कोणेकडून फिरतील न कळे. चौ दिवसां एक पत्र पाठवणें. मीरआबस[2] विजापुराकडे गेला. अंताजीपंताविशीं (तुम्हांस) लिहिलें होतें. यत्न विचारें झाला तरी करणें. नाहीं तरी तुमचा उपाय काय! जिदीस पडाव्ययाचें कारण नाहीं. बहुत काय लिहिणें. लोभ असों दीजे हे आशीर्वाद.

समस्त चिरंजीव मंडळीस आशीर्वाद. लिहिलें परिसिजे. लोभ कीजे. हे आशीर्वाद.

पौ॥ छ० २९ सवाल.

नं० २६९L

(वैशाख वद्य एकादशी
८मे.)

श्री.

तीर्थरूप मातुश्री बाई वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें[3] माधवरायानें साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल तागायत

---

१ पेशव्यांचीं ठाणीं आह्मांकडे जहागीर होतीं तीं बलात्कारानें कां होईना, पण त्यांचीं त्यानीं घेतलीं; हैदरअल्लीच्या किंवा दुसऱ्या कोणाच्या हातीं लागलीं नाहींत हें ठीक झालें. २ हा रेवतगांव येथील मनुष्य मीरआबास यानें कैद केला होता. मोंगलाच्या दरबारीं खटपट करून त्यास सोडविण्याविषयीं गोविंद हरीनें गोपाळरावास लिहिल्याचा संदर्भ मागें दोन तीनदां आला आहे. ३ पत्र पेशव्यांचें गोपिकाबाईस.

छ० २४ सवाल पावेतों यथास्थित असों विशेष. अलीकडे आपणाकडून पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं तरी सविस्तर लिहून पाठविणें. इकडील वर्तमान तरी बेदराकडून भागानगर सुभ्यांत येऊन पोहोंचलें. पांच सात लक्ष रुपये. मिळाले. आणीक ही महिना पंधरा रोजांत दहा वीस लक्ष रुपये मिळतील. राजश्री रामचंद्र गणेश यांस डावे बाजूस खंदार, सासवड, (?) व लोहोगांव वगैरे महालांत पाठविलें. त्यांनीं ही लाख दोन लाख रुपये मिळविले. याच प्रकारें राजश्री बाबूराव हरी उजवे बाजूस बेदर डावें टाकून खंडण्या घेत आहेत. या प्रमाणें चोहोंकडून मोंगलाच्या प्रांताचा नीरा[1] काढून खंडण्या घेऊन मुलूख बेचिराख केला. बसालतजंग याकडील राजकारण ठीक केलें आहे. ते सत्वरच येणार. राजश्री केदारजी सिंदे व महादजी सिंदे यांस वऱ्हाडांत येऊन नागपुर, अंजनपुर वगैरे वऱ्हाड प्रांत उद्वस्त करावया करितां चार पांच पत्रें गेलीं. ते ही येतील. मुख्य गोष्ट ज्येष्ठमासीं खामखा निजामअल्लीशीं गांठ घालून लढाई करितों. श्रीकृपेनें या वेळेस यवनाचें पारिपत्य यथास्थित होईल[2]. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

पै॥ छ० १४ जिल्काद.

मं० २७०

[९ मे]

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद[3] उपरी. येथील कुशल तागायत वैशाख वद्य द्वादशी सोमवार नवतास यथास्थित जाणून स्वकीय कुशल लिहिणें. विशेष. तुम्हीं नवमी शुक्रवारचें पत्र पाठविलें तें काली एकादशी रविवारीं दोन प्रहरां पावलें. संतोष झाला. चौंकडील वर्तमान विस्तारें कळलें. येथील कार्याकारण

१ सत्व. २ मोंगलानें पुणें जाळल्याची बातमी कळल्यावरून पेशव्यांनीं हें क्रोधानें लिहिलेलें आहे. ३ पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास.

(वर्तमान) पुरवणी पत्रीं लिहिलें आहे त्या वरून कळेल. श्रीमंत मातुश्री मंडळीसह सिंहगडीं आहेत. पुण्याची रखवाली झाली, मोठी गोष्ट झाली. थोडें बहुत देऊन[1] निकाल काढिला. राजश्री नारो आपाजी शहाणे माणूस, सलूखी, ह्मणोन त्याणीं हें कार्य केलें. दुसरा तिकडे कोणी असता तरी न होतें. बरें. या उपरी नबाब कोणीकडे जातात? छावणी कोठील नेमिली? (त्यांचा) मनसबा तो कोणास कळत नाहीं. तथापि लिहिलें आहे. ऐकिलें लिहावें. राजश्री गमाजीबावा सातारियाकडे गेल्या उपरी पत्रें आलीं कीं नाहींत? जाणें सातारियाकडे होईल नव्हे[2] न कळे. आमचे मतें घांटे[3] चढले ह्मणजे कृष्णातीरें होतील, ह्मणजे योजिलेला मनसबा अनायासें घडेल. साताऱ्याकडे जाणें न झालें तरी (तो मनसबा) लांबावरी पडला. मग राहिलाच जाणावा. बसावया स्थल मिळतें ह्मणजे उपयोगीं पडतें. श्रीहरिसंकल्प! वर्तमान वरचेवर लिहीत जाणें. दोनशें स्वार न पाठवणें. चिरंजीव दाजी येतील त्यां बरोबर पन्नास स्वार चांगले गंवसाचे (?) त्यांच्या बरोबर देऊन पाठवणें. श्रीमंतांकडील तहाचा मजकूर कांहीं नूतन लागावासा आहे कीं नाहीं न कळे. तुम्हीं कोणाच्या कजियांत नाहीं हें वर्तमान वाकेलानें[4] लिहिल्या उपरी खरें वाटेल किंवा लटकें न कळे. असो. आतां वाटोन काय करणार! जेथवरी ईश्वरें बुद्धि दिली तेथवरी केलें[5]. श्रीभगवान् समर्थ आहे. सिदराम सेडगे यास तुम्हीं दोन हजार रुपये देविले त्या पैकीं आम्हीं हजार दिले. पुढें द्यावे कीं काय (तें) लिहिणें. सातारियाकडे गमाजीबावा गेले. वांईस उपसर्ग करितील. गाडगीळ, जोग, वेळणकर, तेथें आहेत ते तो पळाले असतील. परंतु हा गृहस्त भेदी आहे. जेथें गेले असतील तेथें तगादा करील. ये विशींचा शोध असावा. त्यांच्या परामर्षांत असावें. दूर न धरावें. राजश्री कोंडोबा

---

१ खंडणी देऊन. २ न होईल. ३ पुण्याहून साताऱ्याकडे येण्याच्या मार्गातील घांट. ४ मोंगलानें पटवर्धनांस मिरज घेऊन देण्याचा मनसबा. ५ मोंगलाच्या लष्करांत पेशव्यांचा वकील होता त्यानें पेशव्यांस लिहिल्यावर. ६ आमचें नुकसान केलें.

वरचेवर लिहितात कीं आमचा परामर्ष करीत जाणें, यास्तव सूचना लिहिली आहे. नलदुर्गाकडील सुखें आहेत. पत्र परवां पाठविलेंच आहे. तुमचे लाखोटे आलेले सारे जिकडील तिकडे रवाना केले. बहुत काय लिहिणें. लोभ असों दीजे. हे आशीर्वाद.

पै॥ छ० ३० सवाल.

नं० २७१

(९ मे.)

श्रीगणराज.

अप्रत्यें महादोजी बल्लाळ. दोनीकर जोडून साष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत वैशाख वद्य द्वादशी इंदुवारपर्यंत यथास्थित असे. विशेष. वडिलीं जिवाजी पन्हार याज बरोबर पत्रें पाठविलीं तीं मंदवारीं येऊन पावलीं. लिहिलें वर्तमान सविस्तारें कळों आलें. नबाबाचे लष्करचें वर्तमान लिहिलें तें ही कळलें. व श्रीमंतांच्या लष्कराकडील वृत्त लिहिलें तें ही कळों आलें. कोणे समयीं फिरोन कोणे रोखें येतील हें कळत नाहीं. काळजी जबर पडत आहे. श्री करील तें खरें. चरकड या प्रांतीं वर्तमान तर मिरजेतील[2] गृहस्थानीं उपद्व्याप मांडिला होता. शेडबाळांत शें पन्नास गाडदी आणून ठेविले होते. व ऐनापुरीं कांहीं राऊत ठेविले होते. अथणींत ही थोडा बहुत जमाव होता. ऐसें करून हजार भर अबघे मिळते. परंतु यवनाचें लष्कर घांटास[3] आलें व मराठी फौज घांट चढोन वांईकडे आली, हें वर्तमान ऐकून आपल्या ठाईं विघरलेसे झाले. शेडबाळचे गाडदी उठोन गेले. ऐनापुरचे स्वार ही मिरजेस नेले. अथणीकडे पोळींनीं[4] स्वारी शिकारी करूं लागले. तिकडे पायबंद बसला आहे. किल्या बाहेर यंत्रें[5] एक दोन

१ हा कुरुंदवाडच्या ठाण्यांतील पटवर्धनांचा मुख्य कारकून. त्याचें हें गोविंद हरीस पत्र. २ मिरजेचा किलेदार लक्ष्मण कोन्हेर यानें. ३ खांबटकीच्या किंवा सालप्यांच्या घाटा समीप. ४ पोळ आडनांवाच्या शिलेदारानीं. ही प्रथमार्थी तृतीया. ५ तोफा.

होतीं तीं आंत नेलीं. कांहीं यंवें हुड्यांवर ही चढविलीं. गडबड करीत आहेत. अवसान आहे तें कळतच आहे! लोक म्हणावे तरी दीडशें दोनशें राऊत जवळ आहेत. किल्ल्यांत प्यादे दोन अडीचशें आहेत. अद्याप नवे लोक ठेवावयाचा मजकूर तो दिसत नाहीं. मिरजेतील तमाम लोक पळों लागले. प्रांत ही पळोन जाऊं लागला. या प्रमाणें वर्तमान सध्यां ईश्वरें घडविलें आहे. तूर्त आम्हांवरील शह उठलासा झाला आहे. बरें. वडिलांचा आशीर्वाद मस्तकीं असतां चिंता करीत नाहीं. कागवाडीं दोनशें प्यादे ठेविले आहेत. तैसेंच कुरुंदवाडीं अडीचशें पर्यंत आहेत. प्यादे ठेवावयास अंतर केलें नाहीं. वडिलांस कळावें म्हणोन लिहिलें आहे. तिन्ही स्थलांची बंदोबस्ती करविली आहे. सावधपणें आहों. लज्जारक्षक ईश्वर आहे. करकीरचें पत्र रवाना करून दिलें. गुरवाण्णा मिरजे याचे भाऊ दोघे व लेंक एक असे कागवाडीं गलबले करितां महिना पंधरा रोज ठेऊन घेतले आहेत. सेवेशीं विदित होय. नजर महमद याज बरोबर पत्रें पाठविलीं तीं पावलीं. वरचेवर तिकडील व नलदुर्गाकडील वर्तमान लिहिलें पाहिजे. हे विज्ञप्ति.

नं० २७२

[१३ मे.]

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वादें उपरी. येथील कुशल तागायत वैशाख वद्य अमावास्या. गुरुवार प्रातःकाल. यथास्थित असे विशेष. तुम्हीं भृगुवारीं घांट चढोन मोरेश्वराकडे आलां ते दिवशीं बाळाजी नरसिंह याज बरोबर पत्र पाठविलें,

---

१ बुरुजावर. २ मोंगल मिरजेवर चालून येणार या भयानें तेथील लोक पळूं लागले. ३ कागवाड, कुरुंदवाड, व रेणदाळ या ठाण्यांची. ४ पत्र लिहिणाराचा यजमान त्रिंबक हरी या वेळीं नळदुर्गास राहिला होता. ५ पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास. ६ मोरेश्वर हें गणपतीचें स्थान जेजुरी समीप आहे. तेथें विठ्ठल सुंदर राजे

ल्या अलीकडे पत्र आलें नाहीं. राजे बहादर पुढें आले होते त्यांची तुमची कोणे मुक्कामीं भेटी जहाली? प्रस्तुत ते व तुम्हीं कोठें आहां? नबाब साहेब कोठें आहेत? हें विस्तारें लिहिणें. श्रीमंतांच्या लष्करास हणगोजी जासूद पाठविला होता तो परवां आला. मोमिनपेठे[1] जवळी लष्कर सोडिलें. चौ जागां वेगळाले चार चार कोसांच्या तफावतीनें राहतात. राजश्री बाबूजी नाईक कोंडलवाडीकडे गेले. श्रीमंत गेले ह्मणोन तुम्हांस लिहिलें होतें परंतु बाबूजी नाईकाचे लष्करचें पत्र आंबें[2] याच्या मुक्कामचें आलें होतें, त्यांत लिहिलें होतें (कीं,) श्रीमंत कोडलवाडीकडे गेले. यांस बलाविलें तेव्हां हे ही गेले ह्मणून लिहिलें, त्यावरून आम्हीं लिहिलें होतें. परंतु लक्ष प्रकारें मेदकाकडून नवलकोंडा[3]काडे होतीलसें दिसतें. न कळे कालाची गति. याच मार्गें येतील ह्मणोन भय किती बागवावें! आमचा धणी श्रीपंढरीनाथ समर्थ आहे. कालीं लक्ष्मेश्वरचीं पत्रें आलीं तीं पाठविलीं आहेत. श्रीमंतांच्या लष्करचें पत्र व नळदुर्गचीं पत्रें पाठविलीं आहेत, त्या वरून कळेल. मीरआबसखान यास ताकीद येती तरी ब्राह्मण मुक्त होते. सोळा रोज प्रत्यह तलबाना गाडदी यांस द्यावा लागतो. कळलें पाहिजे. चिरंजीव दाजीनीं बाळाजी केशव तुम्हांकडे रवाना करून आपण परवां पिंपळनेरास आले. काली करकंबेस आले. आजी श्रीक्षेत्रास येतील. उदईक येथें येतील. खंदकाचें काम चालत आहे. प्यादे वरचेवर ठेवीतच आहों. दारूगोळी तयार होत आहे लज्जारक्षक श्रीभगवान् समर्थ आहे.

बहादर गेला होता व त्याच्या फौजेस मिळण्या करितां गोपाळराव ही पुण्याहून आला होता.

१ मोमीनपेठ व मोमिनाबाद हीं एकच. मोमिनाबाद बीड जिल्ह्यांत मोंगलाईत आहे. २ आंबें जोगाईचें हें मोमिनाबादेपासून थोड्या अंतरावर आहे. ३ बाबूजी नाइकास. ४ नवलकोंडा व वर आलेलें कोडलवाडी हीं स्थळें अप्रसिद्ध असल्या मुळें मोंगलाईच्या नकाशांत सांपडत नाहींत. ५ रेवतगांवचें ब्राह्मण मीरआबस यानें कैदेत ठेविले होते ते. ६ ही सारी लढाईची तयारी पेशवे मोंगलाईतून परत फिरल्यावर मगळवेढ्यास येऊन बेढा घालण्यास प्रवृत्त होतील तर त्यांशीं टक्कर मारितां यावी

तुम्हांस यावया न फावे तरी अगोदर सूचना करणें. त्यां सुमारें वधू व पाटणकर यांची रवानगी करूं. या उपरी ज्येष्ठ वद्य पक्षींचा मुहूर्त राहिला ह्मणजे पुढें लांबीवरी गेलें. वधू आणवून मूर्खपण आणि चित्त प्रशस्त राहीना यास्तव परिछिन्न लग्न केलें पाहिजे. सारी भाईबंद मंडळी तुम्हीं एकत्र आहां. या उपरी शंभर बुद्धि कार्याच्या नाहींत. लष्करास दुसरी जोडी श्रीमंतांच्या काली रवाना केली. कळलें पाहिजे. वरचेवर पत्र पाठवीत जाणें. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

पै॥ छ० २ जिल्काद.

नं० २७३

(अजमासें चैत्र वद्य
एप्रिलचा प०पंधरवडा.)

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी. कोंकणांतून पाटणकर वधू घेऊन आले उद्यां येथें येतील. अवकाश आठ दिवसांचा आहे. तुम्हीं घांट तोंडीं अगर वरती आलां असाल तरी तीन मजलीचा कारभार आहे. यावें. लग्न करून सर्वच जावें. 'शुभश्चेत् शीघ्रं!' न फावे तरी उपाय नाहीं. काली जासूद जोडी रवाना केली तों दोन प्रहरां करीमें आला. काली भागला होता ह्मणोन आज दोन प्रहर पावेतों ठेवून घेऊन रवाना केला आहे. तिसरे दिवशीं तुम्हां जवळी पावावें ऐसें केलें आहे. ईश्वर सूत्र असेल तरी तुम्हीं

ह्मणून! मिरजेस इतकी दुर्दशा होऊन दोन तीन महिने झाले नाहींत तों एवढ्या ह्यातारपणीं मिरजे प्रमाणें मंगळवेढें झुजविण्याची गोविंद हरीस हिंमत आहेच!

१ तुह्मीं असाल तेथें. २ पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास. हें चैत्रवद्यांत लिहिलेलें असून येथें चुकून लागलें आहे. ३ गोविंद हरीच्या लिहिण्यांत संस्कृत वचनें पुष्कळ येतात पण तीं सारीं अशुद्ध असतात असें आह्मीं मागें लिहिलें आहे त्याचें हें आणखी एक उदाहरण. हें वचन 'शुभस्य शीघ्रं' असें पाहिजे. ४ हें एका जासुदाचें नांव.

लष्कर याल. गांठी पडेल. येथेंच मंगळवेढ्यांत उरकून घेऊं. तूर्त श्रीमंत दूर गेले आहेत. आगमन नव्हे तरी श्रीसत्ता प्रमाण ! होणार कालीं होईल. नवरीची मातुश्री प्रसूत झाली या मुळें चुलती व बाप बराबरी आहे. दोन महिने समग्र लागतील. इकडे राजिक[2] न झालें तरी चिंता नाहीं. श्रीमंत याच मार्गें माघारे फिरले तर पृथ्वी प्रळय करतील हे ही काळजी. कोठें ठेवावीं[3] ? आपण कोणीकडे जावें ? सर्व भार श्रीवरी आहे. निघावयाचा करार झाला तरी आधीं सांडणीस्वार रवाना करणें. येणें होत नसेल तरी रवाना करणें म्हणजे स्वस्थ राहूं. बहुत काय लिहिणें. ग्रहशांति आम्हीं येथें वद्य दशमीस केली. ग्रहणाची तुम्हीं केलीच असेल. हे आशीर्वाद. चिरंजीव दाजी आले कीं नाहीं ? माणसें पाठवून आणणें. मग यावया दूर पडेल. हे आशीर्वाद.

चिरंजीव राजश्री नारायणराऊ व नीलकंठराऊ व आबा व कोन्हेरराऊ व रामनराऊ व भाऊसाहेब यांसीं आशीर्वाद. लिहिलें परिसिजे. प्रसंगीं तुम्हीं असोन वरचेवर पत्रें येत नाहींत. म्हणगोजी आलियावरी म्हणावया तुम्हीं सांडस्वार पाठविलात हे गोष्ट अंगळीक जाहली. महिनाभर मध्यें पत्रेंच नाहींत. आम्हीं चिंतार्णवीं. पुणें वांचे असें करणें. पुणें आहे तों श्रीमंतांची दौलत स्थिर आहे. एवढें अगत्य करणें. प्रजेस उपसर्ग न होय तें करणें. बहुत काय लिहिणें. लोभ असों दीजे. हे आशीर्वाद.

---

१ नव्हे=न होईल. २ राजिक=राज्यक्रांति. राजकीय धामधुम, दंगाधोपा. 'श्रीमंतांनीं परत मंगळवेढ्यांकडे येऊन कांहीं धामधूम केली नाहीं तर तुमच्या लग्नाचा बेत सिद्धीस जाण्यास कांहीं हरकत नाहीं' असा लिहिणाराचा अभिप्राय. ३ ठेवावीं' या क्रियापदास अध्याहृतकर्म 'कुटुंबाचीं मुलें माणसें.' ४ हें लिहिणें उपरोधिक आहे.

श.१६८६ मोंगल स्वदेशाकडे निघून जातो इ.स.१७६३

नं० २७४

[अधिकज्येष्ठ शुद्ध
मेचा दु०पंधरवडा.]

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वादें उपरी. नबाब नादुरावरून कूच करून पुढें आले. पुण्याचा गुंता उरकल्यावरी पुढें जिकडे जाणें तिकडे होतील. अद्याप ही नबाबाची छावणी कोठें हें कोणास श्रुत नाहीं. पौर्णिमे पावेतों सारा मनसबा. पाऊस पडों लागलियावरी आपणच हरएक ठिकाणीं छावणी कर्तव्य तेथें जातील. विजापुराकडे आले तरी तुमची सोय आहे. ऋणाणुबंध प्रमाण. ज्या प्रांताचा नाश होणार तिकडे येतील ! किल्ले पुरंदरच्या पायथ्यास पाणियाचा तोटा. गुंदें साऱ्या प्रांताचें जाऊन भरलें. सासवडा पावेतों फौजा येतील हा भरंवसा नव्हता. किल्ल्याचा ही बंदोबस्त नव्हता. राजे बहादर यांस येऊन त्यांचे कार्यभागी भेटले यामुळें बांचले गेले. तुम्हीं दरम्यान बोलीस पडलां, तह बसवून दिला, बहुत उत्तम गोष्ट केली. तें कांहीं तरी म्हणोत; तुम्हीं केलें हें उत्तम केलें. नबाब जळगांवावरी जाणार, तेव्हां बारामतीचा रोंख झाला. जलगांवींहून पुढें नीरेस जावे. तेथून कोणीकडे होतील न कळे. फलटण लाख पन्नास देईल पुढें नीरेहून भिवरे (च्या तीरास) आले. म्हणजे निश्चिति ! त्रिवार भीमातीर झालें म्हणजे बुडालें. वसती राहणार नाहीं. मिरजेच्या रोंखें गेले तरी कार्य सरकारचें होईल. चिकोडी वगैरे संस्थानें आहेत. तेरदाळ, जमाखिंडी, रायबाग, चिकोडी, करवीर प्रांत, कऱ्हाड प्रांत आहे, वांई देश, म्हणतां दहा लक्ष

---

१ पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास. २ खंडणीचा वसूल झाल्यावर. ३ गुळें. मोंगलाच्या भयानें आलेले लोक. ४ पेशव्यांचे पुणें येथील कारभारी नारो आपाजी वगैरे. ५ तुमचे प्रतिस्पर्धी सखारामबापू वगैरे. ६ हें जळगांव कोठें आहे. नांदुराहून बारामतीस येण्याच्या वाटेवर असलें पाहिजे. ७ जातीलसें वाटलें. ८ भीमातीरच्या गांवांची तीनदां लूट झाली म्हणजे. ९ मोंगल सरकारचें कार्य लुटीचा पैका गोळा करण्याचें व पटवर्धनांस मिरज घेऊन देण्याचें.

रुपयांची प्राप्ति कनिष्ट पक्षीं होईल. जें त्यांस बरें दिसेल तें करतील. सातारियास जाऊं नये. मागोन जावें. इभ्रतेनें कार्य साधलें [तर] उत्तम. न साधे तर [ही] उत्तम. साध्य होतच नाहीं. नलदुर्गाचा लाखोटा आजी प्रातःकाळीं रवाना केला. लक्ष्मेश्वरास पत्रें रवाना केलीं. बंकापुरचे जासूद पत्रें देऊन रवाना केले. ढालाईताचा मजकूर विस्तारें कळला. कुरुंदवाडाकडील पत्र आजी आठ रोज येत नाहीं. लक्ष्मण कोन्हेर याचा भारी कजिया असता तरी एक दुसरें पत्र येतें. तस्मात् यवन येतो हे आवई त्यास ही आहे. एखादें स्थल सर्वांस बसावया उपयोगीं (प्राप्त) होतें तरी बरें. श्री इच्छा प्रमाण! बहुत काय लिहिणें. चौ दिसां पत्र रवाना केलें म्हणजे वर्तमान कळत जाईल, यास्तव तुम्हांस लिहिणें लागलें. बाळाजी नरसिंह शुक्रवारीं रवाना केला तो रविवारीं येथें आला. त्या उपरी काली मंदवारीं सातवे दिवशीं पत्र दुसरें आलें. यास्तव लिहिणें लागतें. वर्तमान नवीन असो नसो; आमचीं माणसें तुम्हांजवळी आहेत, चौ दिसां एक पत्र रवाना करीत जावें. बहुत काय लिहिणें. लोभ असों दीजे. हे आशीर्वाद. नलदुर्गाकडील लाखोटे आले ते पाठविले आहेत. समस्त चिरंजीव मंडळीस आशीर्वाद. लिहिलें पारिसिजे. लोभ असों दीजे. हे आशीर्वाद.

पै॥ छ० ६ जिल्काद.

नं० २७५

[अजमासें अधिकज्येष्ठ शुद्ध मेचा दु०पंधरवडा.]

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद[2] उपरी. नगरापासून सातारिया पावेतों छावण्या केल्या तरी

---

१ सातारा घेण्याचें कार्य. २ पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास. पुण्याचा विध्वंस केल्यावर मोंगलाच्या मनांत असें आलें होतें कीं, पावसाळा समीप आल्यामुळें

भक्षावयास काय? रोजमरे दिले पाहिजेत त्यांची गति काय? पुढें मुलूख लागला तरी पैसा मिळेल. इतकी निकड सोसून केलें तरी राज्य सारें

स्वदेशीं जावयाचें तें न जातां महाराष्ट्र देशांतच नगरापासून साताऱ्या पावेतों फौजेच्या टोळ्यांची जागजागीं छावणी करून रहावें. या मनसब्यास साधक बाधक गोष्टी कोणच्या होत्या त्या गोविंद हरीनें या पत्रांत फारच चांगल्या रीतीनें दाखविल्या आहेत.

१ पूर्वीच्या राज्यांत मुलखाची लावणी करणें हें मोठ्या प्रयासाचें काम असे. रयत नाहीं तर सरकार ही नाहीं ही गोष्ट कोणच्या ही काळा संबंधानें पहातां जरी खरी आहे तरी हल्लींच्या शांततेच्या काळांत ती कोणाच्या लक्ष्यांत ही येत नाहीं. हल्लींच्या सरकारच्या मनगटांत जबरदस्त जोर असल्यामुळें राज्यांत शांतता राखणें व परचक्रा पासून रयतेचें संरक्षण करणें या दोन्ही गोष्टी करण्यास त्यास बिलकुल अडचण पडत नाहीं. दुसऱ्या पक्षीं पहातां सरकार आपलें रक्षण करील व सरकारचें देणें काय असेल तेवढें देऊन टाकिलें ह्मणजे स्वकष्टार्जित पिकाचा उपभोग घेण्यास आपणास सांपडेल ही शेंकडों वर्षांच्या अनुभवावरून रयतेची पक्की खात्री झाली आहे ही पहिली गोष्ट. दुसरी बिलायती व्यापारानें इकडील उद्योग धंदे बुडविले, यामुळें रयतेस शेतकी शिवाय धंदा राहिला नाहीं व लोकसंख्या झपाट्यानें वाढत असल्यामुळें या धंद्यांत शिरणाऱ्या लोकांची गर्दी उडून राहिली आहे व दिवसें दिवस ती आणखी अशीच उडत जाणार. ही दुसरी गोष्ट. या दोन गोष्टींमुळें सरकारास आपली जमीन करण्यास रयत मिळेल कीं नाहीं ही काळजीच करण्याचें कारण राहिलें नाहीं. केवळ जमिनीवरील करापुरतें पाहिलें तर तो पेशवाईच्या कारकीर्दी पेक्षां हल्लींच्या कारकीर्दीत जबर नाहीं. तथापि या कराचें मान जरी अधिक वाढलें तरी इंग्रज सरकारच्या राज्यांत जमीन करणारे लोक अनन्यगतिक असल्यामुळें पिकाऊ जमीन कधीं ओस पडून रहावयाची नाहीं. पूर्वीची स्थिति अगदीं निराळी होती. पूर्वीचें सरकार पैक्याच्या टंचाईनें ग्रासलेलें [ही ओरड हल्लींच्या सरकारची ही नाहींसें नाहीं!] व नेहमी परचक्राचें निवारण करण्यांत गुंतलेलें असल्यामुळें आपल्या राज्यांत धामधुमी न होऊं देण्या विषयीं बंदोबस्त ठेवण्यास असमर्थ होतें. त्या राज्यांत बहुनायकी असल्यामुळें सरकारचा हा दुर्बळपणा अधिकच वाढला होता. एक एका तालुक्यावर पांच सहा संस्थानिकांची किंवा जमीदारांची किंवा जहागीरदारांची सत्ता असे. हे सारेच थोडा बहुत फौज फांटा बाळगणारे असत, व त्यांचीं भांडणें होण्याचे ही प्रसंग वारंवार येत. असें झालें ह्मणजे यानें त्याच्या रयतेस लुटावें व त्यानें याच्या रयतेस लुटावें हा क्रम चालू होई. यामुळें रयतेची पराकाष्टेची पायमल्ली होई. कोणी लुटावयास येतो अशी

पदरीं पडेल इतकें होईल. नवाबानीं नगर सोडून पुढें जाऊं नये. नगरा-भोंवतीं छावणी करावी. चौकडे लुटूं लागले तरी पोटास धान्य कोठें मिळे-

---

वातमी येतांच खेड्यांतील शेतकरी आपला उद्योग सोडून पोरें बाळें घेऊन एखाद्या शहराच्या, ठाण्याच्या किंवा किल्ल्याच्या आश्रयास जात. रयत या प्रमाणें पळून गेल्यावर मग सरकारचें देणें कोठून कोण देणार? वरील लिहिण्यावरून हें ध्यानांत येईल कीं, शेतकीच्या धंद्यास उत्तेजन येऊन तो नेहमीं निर्वाध चालावा अशी त्यावेळीं स्थिति नव्हती. शिवाय त्या त्या जातींचे इतर धंद्यांस परदेशच्या व्यापारापासून अडथळा होण्याचा त्यावेळीं संभवच नसल्यामुळें प्रत्येक मनुष्यानें शेतींत पडण्याचें कारण ही नव्हतें. आणखी एक गोष्ट ध्यानांत ठेवण्या सारखी आहे ती ही–पेशवाई लयास गेल्यावर एक दोन वर्षांनीं डा० कोट्स नांवाच्या इंग्रजानें असें लिहून ठेविलें आहे कीं, महाराष्ट्रांतील प्रत्येक खेड्यांतून चवथा हिस्सा लोक लष्करी पेशाचे आहेत! ही जर त्या वेळची स्थिति, तर मराठी राज्याच्या ऐन अमदानीच्या वेळीं दर गांवांतील निम्मे लोकांचा संबंध लष्करी धंद्याशीं असावा असें अनुमान करणें चावगें नाहीं. या पैकीं जे परदेशांत मोहिमेवर असतील त्यांचा चरितार्थ आठ महिने बाहेर होऊन पावसाळ्यापुरते मात्र ते घरीं यावयाचे. तेव्हां महाराष्ट्रांतील लोकांस या योगानें पोट भरण्याची त्या वेळीं एक सोय होती. या सर्व गोष्टींचें पर्यवसान असें होई कीं, शांतता असतां शेतकीचें काम नीट चाले व सरकारचा वसूल ही वेळेवर येई. दंगे धोपे सुरू असले ह्मणजे रयतेस धरधरून आणून कसें तरी दादा बाबा करून तिच्या गळ्यांत जमिनी अडकविणें सरकारी अमलदारांस भाग पडत होतें! प्रत्येक गांवांत जितक्या पिकाऊ जमिनी कुळानीं करावयाच्या असत तितक्या त्यानीं पतकरून त्या प्रमाणें सरकारांत कतबे लिहून दिले कीं झाली त्या गांवची त्या वर्षाची लावणी. या प्रमाणें साऱ्या तालुक्याची लावणी करण्यांतच कायतें मामलेदाराचें शहाणपण व रयतेवर असणारें वजन दिसून येई. वर्षप्रतिपदेच्या दिवशीं शेकदारानें चावडींत गांवची रयत बोलावून आणून प्रत्येकास यंदां अमुक जमीन तूं कर असें सांगून निवाचा पाला त्याच्या ओंजळींत घालण्याचा यत्न करावा, त्यानें आढेवेढे घ्यावे, नाहीं नाहीं ह्मणावें, आदल्या वर्षीं वसुलाच्या वेळीं झालेल्या जाचा विषयींच्या उखाळ्या पाखाळ्या काढाव्या, मग पाटलानें त्याजवर कांहीं पाटीलकीची, कांहीं वडीलपणाची भीड चालवून त्याजकडून तो निंब घेववावा व ती जमीन त्याच्या पदरीं बांधून त्या पासून कतबा लिहून घ्यावा! नुसती लावणी झाली ह्मणजे अंमलदारांची काळजी दूर होत असे असें नाहीं. पेरणीच्या वेळीं व वसूल तीन किंवा चार हप्त्यानीं घ्यावयाचा असे त्या त्या वेळीं स्वस्थता असली तर बरें, नाहीं तर गेली रयत पळून आणि बसला वसुलाला खो!

ल याची तरतूद केली पाहिजे. वरकड जितका मनसवा तुम्हीं लिहिला तो प्रमाणच. एवढें जहान[1] छावणीस खातील काय? हे काळजी. आधीं चित्तांत आणून मुलूख रक्षिला तर रयत नांदेल. पुढें लावणी होईल. पाठी मागील मुलूखचा दाणा येईल. यथास्थिच आहे. आम्हांजवळी स्वांर गणती तीनशें होतील. स्वांर चाकरीचे शंभर सव्वाशें. त्यांत दहा बीस माणूस[2]. वरकड गोटगणती! नाहक रोजमऱ्यास आट. कवडीच्या कामाचे! मंगळवेढ्यांत वसूल चालीस लाविला आहे. प्यादे यांस पोटास दरमहा पांच हजार व आम्हांकडे पांच हजार या प्रमाणें पाहिजेत. होतो वसूल तितका भक्षस्थानीं पडतो. आजी तेरा रोज झाले, लोकांस रोजमरा नाहीं. दोन दोन चार चार (रुपये) काली खर्चास दिले. ऐवज आलियाउपर देऊं म्हणोन सांगितलें. करकंबेस वसती होत होती तों श्रीमंत आले. मागती लोक पळाले ते आतां (तेथील ठाणेदार बहिरोपंत) जमा करितात. कसबे मंगळवेढेकर मात्र पळाले नाहींत. बहिरोपंत आपणाजवळी, पडले प्रसंगीं आणावे म्हणून लिहिलें; त्यास ते आले तर स्थळ[3] जाईल. एकाचा एकास आश्रय होतां होतां जें होईल तें पहातों. श्रीपंढरीनाथ समर्थ! चिंता कोठवरी करावी? तुम्हीं आमची काळजी न करणें. आमचा साह्यकारी श्रीभगवान् आहे. सासवैड[5] हिवरें यांचा मजकूर लिहिला तो कळला. सैन्यच गेल्या उपरी स्थित रहाणें कठीण आहे. श्रीसत्ता प्रमाण! नारो शंकर याजकडील लोक प्रतिनिधीचे जिल्हेंत पांचशें स्वांर व दोन तीनशें प्यादे घेऊन फिरतात [त्यानीं] इटेंभाळवणी घेतली. वसंतगडकर धामधूम करीत होते त्यानीं न करावी असा त्यांचा (त्यांशीं) तह केला. खानापुरावरी[6] आले होते. झुंज झालें. दोन तीन घोडीं पडलीं.

---

१ जहान म्हणजे; जग. मोंगलाच्या लष्करचे व बुनग्याचे असंख्य लोकांस उद्देशून हें लिहिणें. २ नावाजण्या सारखें माणूस. ३ अडचण. ४ करकंबचें ठाणें. ५ सासवड व हिंवरें हे सखारामबापूचे गांव जाळण्याचा दिवाण विठ्ठल सुंदर यानें निश्चय केला होता त्या विषयीं. ६ पत्रांत आलेलीं प्रतिनिधीच्या जहागिरीचीं ठाणीं इटें, भाळवणी, वसंतगड, खानापुर, कलढोण, मायणी हीं सारीं सातारा जिल्ह्यांत आहेत.

माणसें पडलीं. त्यांसीं तह करून दोन हजार तीन हजार [रुपये] तूर्त द्यावेसे करून गेले. कलढोण माइणीकडे गेले. राजश्री गमाजी बावाचे लष्करचे हजार दोन हजार लोक देशीं असते तरी किती धास्त बसती ! देशीं स्वांर नाहीं. श्रीमंतांचे लोक चौंकडून फिरतात त्यांस भयच नाहीं ! बर्वे (व) उद्धवसुत हुबळीकडे आहेत ते मोठे प्रतापी झाले आहेत ! खानदेश गंगथडी (येथील) जप्ती केली यामुळें दहा पांच लाख खानदेशांतील नबाबास मिळतीलसें दिसतें. बहुत काय लिहिणें. लोभ असों दीजे. हे आशीर्वाद.

श्रीमंत राजश्री मोरोबा दादा स्वामीचे सेवेशीं साष्टांग नमस्कार. आपण कृपा करून पत्र पाठविलें तें पावलें. समाधान झालें. असाच सर्वदा पत्रीं सांभाळ करावा. कृपा असों दीजे हे विनंती.

राजश्री धोंडोपंत जोशी स्वामीस नमस्कार. आपलें पत्र पावलें. उत्तम आहे. आपण राजश्री दादा समागमें आहेत. पत्रीं परामर्ष करावा हें उचित आहे. लोभ कीजे हे विनंती.

नं० २७६

(अजमासें अधिक ज्येष्ठ शुद्ध
मेचा दुसरा पंधरवडा.)

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी. तुम्हीं पत्रीं कितेक मजकूर लिहिला तो कळला. लोकांचा मजकूर लिहिला त्यास तो प्रमाणच आहे. लोक ठेवणें ते निंबाळ-

---

१ कृष्णराव बर्वे व नरसिंगराव उद्धव. हे दोघे कर्नाटकांत पटवर्धनांची जहागीर ध्यावयास पहात होते. त्यांचा या वाक्यांत उपहास केलेला आहे. २ मोरोबा दादा फडणीस. हे मोंगलाच्या लष्कराबरोबर होते. यांस गोविंद हरी 'श्रीमंत राजश्री' कां लिहितो ? ३ मोंगलाचे सरदार जानोजी निंबाळकर यांच्या.

करांच्या शिरस्त्या प्रमाणें महिने महाल बोली करून ठेवावे लागतील. तूर्त कांहीं गुंता नाहीं. मोंगलाई दरबार खोल आहे. भलतें एक निवडे तोंच संकट. निवडलियावरी मग गुंता नाहीं. ते थोर आहेत. बोलोन[1] दाखवावयाचे नव्हेत. कर्ज न मिळे यामुळें काहिले[2] न होणें. तह होय तों पर्यंत संकट. तह जाहलियावरी चिंता नाहीं. तह न होय तरी चिंता काय! जसें कर्ज मिळेल तसे चाकरीस लोक ठेवावे. स्वरूपा[3] सारखे फार लोक नाहींत म्हणून चिंता करून होणें काय! गुदरान करावी. हात खुशाद[4] होईल ते समयीं मागती[5] लोक ठेवावयास उशीर काय! तो प्रसंग व्हावया अद्याप दोन महिने दीड महिन्याचा अवकाश आहे. मग खासगत वर्तमान राजे बहादर यांस सांगावें कीं, "जितकें कर्ज मिळालें तितकें घेऊन तुमचे सोबतीस गुदरान केली. आतां कर्ज मिळेना. आपण तो जहागीर करार करून उमेदवार केलें, परंतु तूर्त पैसा कोठील यावयाचा नाहीं. कर्ज तो मिळेना. या करितां लोकं[6] उठोन जातील. तुम्हांस कोणी [भलतेंच] सांगतील यास्तव अगोदर सूचना करितों," म्हणोन सांगावें. जवपर्यंत श्रीमंतांचा व नबाबांचा तह होय तों पर्यंत संकटच आहे. तुम्हीं तो हुजूर[7] आहां. आम्हीं ईकडे आहों. वडील व कुटुंबें खेडियानीं आहेत त्यांची गति काय? कोठें उभें रहावया स्थल नाहीं. आम्हांस तो चौंकडून कजिये. स्थल मजबूत नाहीं. एखादी जागा प्राप्त होती तरी सारीं एक जागां होऊन चार दिवस काळाचे घालवितों. ज्याचा कश्यप धरिला त्याचें ईश्वरें कल्याण करावें म्हणजे सर्वांचें कल्याण. बिघाडामुळें

---

१ नबाब निजामअल्ली थोर आहेत. तुमच्या संतोषासाठीं यंव् करूं, त्यंव करूं, असें बोलून दाखवावयाचे नाहींत. करून दाखवितील. २ घाबरे. ३ नावालौकिका सारखे. ४ मोकळा. ५ पुनः ६ आह्मांवरोबरचे स्वार घरोघर निघून जातील. ७ नबाबापाशीं. ८ मंगळवेढ्यांस.

ते ही कजियांत. मोंगलाई खर्च भारी. कोठें पैसा येणें नाहीं. लुटीमुळें लष्कर चार महिने जगलें. छावणी झाली तरी रोजमरे परिछिन्न घावे लागतील, यास्तव संकट आहे. सर्व संकट हरणार श्रीसमर्थ आहे. इतके दिवस ज्यांची[1] सेवा केली त्यांची एकनिष्ठेनेंच केली. कालपरत्वें त्यांणींच (राज्या) बाहेर घालविलें. नबाबाच्या पदरीं पडल्या सारखें सेवा एकनिष्ठेनेंच करावी. परिणाम लाविणार श्रीभगवान् समर्थ आहे. राजकी कार्यभागांत कोणच्या बऱ्या वाइटांत ऐकंदर मन घालूं नये. आपले डेरां असावें. खावंद यादी[2] करितील तेव्हां जावें. पुसतील त्याचा सुचेल तो जाब यथास्थित करावा. आम्हांस (रहावयास चांगलें) स्थल नाहीं, परिणाम कोणे प्रकारें आमचा लागेल, ह्मणोन श्रमी व्हाल, तरी न होणें. श्रीमंतांजवळी आह्मांसाठीं फार जण घालमेल घालणार. जितकें त्याणीं करावयाचें तें केलें. आतां काय करणार? श्रीमंत चालून येतील तेव्हां काय करावें ह्मणोन भय मानावें तरी जावें कोठें? आमचा साहाकारी श्री भगवान् आहे. मारितां मारितां होईल तें हो! परिणाम[3] शुद्ध व्हावा. या उपरी पुढें उमेदीचे दिवस नाहींत. आमचा तो कृतसंकल्प या प्रकारचा आहे. प्रारब्ध गति! तुम्हीं एकंदर आमची काळजी न करणें. लक्ष प्रकारें श्रीमंत येत नाहींत. आले तर श्रीइच्छा प्रमाण! धाकटीं मुलें मात्र तुम्हीं लष्करास नेणें. ठिकाण तरी कोठें ही ठेवावया योजत नाहीं. लग्नाचा गुंता आहे. आजी पासून एक महिन्याची फुरसत नाहीं. पंचवीस दिवसांत तरतूद झाली पाहिजे. लष्कर पुणें प्रांतीं राहिलें तरी [वधूस] तिकडे पाठवूं. अगर सातारियाकडे (नबाब) गेले तरी या सुमारें लावून देऊं इकडे लोक म्हतात कीं, [नवाब] भिवरेच्या पाण्यानें येणार. कि-

---

१ अर्थात् पेशव्यांची. २ अगदीं. ३ स्मरण. ४ आह्मांस यशस्वी मृत्यु यावा.

तेक म्हणतात कीं बेदराकडे छावणीस जाणार. एक बोली ठीक नाहीं. मनसबा कळत नाहीं. श्रीमंतांनीं तो [त्यांचे] मुलुखाचा सत्यानाश केला. आबालवृद्ध कोणी बरें म्हणत नाहीं. अखेर नबाबाशीं बिघाड केला. नाहक बिघाड केला ! नबाबानीं फारच मोठी माणसाई केली. पुण्याकडे सातारियाकडे न जातां त्यांचे पाठीवर गेले. त्याणीं जाऊन औरंगाबादेशीं कजिया केला ! यामुळें इतकें झालें. होणार भावी तदनुसार बुद्धि ! सखारामपंताच्या मतें आमची मंडळी कोठें नाहींशीं करावी असें आहे. यांत ईश्वर इच्छा प्रमाण. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

---

१ पक्की. २ मोंगलाशीं बिघाड करूं नका असें लोक सांगत असतां. ३ मोंगलानें पुणें, साताऱ्यास उपद्रव दिला नाहीं हा उपकार न स्मरतां पेशव्यानीं औरंगाबादेस लुटालूट केली व खंडणी घेतली. ४ मोंगलानें पुण्याचा विध्वंस केला वगैरे. ५ कोंकणस्थांची जात.